सावंतवाडी संस्थानचा इतिहास.

लेखक

विठ्ठल पुरुषोत्तम पिंगुळकर.

सावंतवाडी येथें

'लक्ष्मी-विलास' छापखान्यांत छापिला.

किंमत दोन रुपये.



श्रीमंत राजे श्रीराम सावंत भोंसले बहादर

सरदेसाई परगणे कुडाळ व महालानिहाय

यांच्या चरणीं

त्यांच्या पराक्रमी पूर्वजांचा हा इतिहास

ग्रंथकर्त्यानें अत्यंत आदर बुद्धीनें व

निष्ठा पूर्वक अर्पण केला आहे.

A

HISTORY

OF THE

SAWANT WADI STATE.

सावंतवाडी संस्थानचा इतिहास.

लेखक

विठ्ठल पुरुषोत्तम पिंगुळकर.

सन १९११

किंमत दोन रुपये.

हें पुस्तक दत्तात्रय नारायण आठलेकर यांनीं आपल्या
"लक्ष्मी-विलास," छापखान्यांत छापिलें व
ग्रंथकर्त्यानें सावंतवाडी येथें प्रसिद्ध केलें.

प्रस्तावना.

सावंतवाडी हें जरी एक लहानसें संस्थान आहे, तरी तें इतिहास-दृष्टया बरेंच जनें असल्यामुळें त्याचा इतिहास समजण्याची जिज्ञासा कोणासही होणें स्वाभाविक आहे; परंतु आजवर तो प्रसिद्ध झाला नाहीं, त्याचें मुख्य कारण या संस्थानासंबंधीं जुनी ऐतिहासिक माहिती मिळणें अशक्य अशी समजूत हेंच असेल तर न जाणो, कारण ती माहिती मिळण्याचें मुख्य साधन जें संस्थानचें दप्तर तें बहुतेक पूर्वींच्या दंग्याधोप्यांत नाश झालें ह्मणतात. संस्थानच्या कारभाराशीं ज्यांचा संबंध होता, अशा लोकांकडे कांहीं कागदपत्र असावे; परंतु ते बाहेर सोडूं नयेत अशी अद्यापिही कांहीं लोकांची समजूत आहे. तथापि संस्थानचे मुख्य दरकदार घराण्यांपैकीं शिवराम रामचंद्र सबनीस व मंगेश रामचंद्र चिटणीस यांनीं आपल्याकडील माहिती मला आनंदानें देण्याचें कबूल केलें. संस्थानचे दप्तरांतही थोडी माहिती मिळाली. शिवाय विद्वद्वर्य डॉक्टर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांचा दक्षिण राष्ट्राचा इतिहास, पोर्तुगीज इन् इंडिया, सावंतवाडी ग्याझेटियर व मेमॉयर, विजापूरवर्णन, बक्षीबहादर जिवबादादा यांचें चरित्र या पुस्तकांतून आणि या प्रांताचे पूर्वींचे सरदेशमुख कुडाळदेशस्थ प्रभु यांचे वंशजांपैकीं कैलासवासी अनंत सिताराम देसाई यांनीं लिहून ठेविलेला हस्तलेख व संस्थानचे वार्षिक रिपोर्ट यांतून बरीच माहिती मिळाली. ती सर्व एकत्र करून हें पुस्तक तयार केलें आहे. ज्यांच्याकडून ही माहिती मिळाली त्या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहें.

अशा रीतीनें हें पुस्तक तयार झालें, पण तें छापून काढणें मोठ्या खर्चाचें काम असून तें माझ्या शक्तीच्या बाहेर होतें. तथापि सध्यांचे आमचे दयाळु प्रभु श्रीमंत राजे श्रीराम सावंत बहादुर यांनीं संस्थानच्या तिजोरींतून कांहीं मदत देऊन शिवाय खासगींतूनही कांहीं मदत देण्याचा हेतु दर्शविला आहे. तेव्हां त्यांच्याच आश्रयानें हें पुस्तक छापून प्रसिद्ध झालें. असें ह्मटलें पाहिजे. तसेंच सध्यांचे स्टेट कारभारी साहेब विनायकराव पांडुरंग गुप्ते यांची आपल्या कारकीर्दींत या संस्थानचा इतिहास प्रसिद्ध व्हावा अशी उत्कट इच्छा असून त्यांच्याकडूनही मला निरनिराळ्या अनेक तऱ्हांनीं पुष्कळ मदत झाली. याबद्दल त्यांचा मी कृतज्ञतापूर्वक अत्यंत आभारी आहें. शिवाय पेडण्याचे रावराजे आत्माराम उर्फ बाबुराव देशप्रभु, मुंबईचे प्रसिद्ध व्यापारी अनंतराव शिवाजी देसाई, संस्थानचे

दरकदार पुरुषोत्तमराव जिवाजी सबनीस यांजकडून बरीच मदत मिळाली त्याबद्दल त्यांचाही मी आभारी आहें.

आतां पुस्तकाच्या रचनेच्यासंबंधानें दोन शब्द लिहावयाचे आहेत. जरी या पुस्तकास इतिहास असें नांव दिलेलें आहे, तरी आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या इतिहासाहून याची रचना थोडीशी निराळी आहे. या इतिहासांत नेहमीं येणाऱ्या विषयांशिवाय पूर्वींची जमाबंदी ठरविण्याची, जकात घेण्याची, वसुलाची वगैरे राज्यव्यवस्थेसंबंधीं विशेष माहिती, जुने लेख, राजघराण्यांतील पुरुषांचे पोवाडे, लोकस्थितीविषयीं पत्रकें इत्यादि विशेष माहिती दिली आहे. जुन्या लेखांसंबंधानें लोकांत कांहीं मतभिन्नता आहे; कित्येकांचें ह्मणणें मिळतील तितके जुने लेख द्यावे, असें असून कित्येकांस ती गोष्ट आवडत नाहीं. तथापि जुन्या लेखांपैकीं नमुन्यासाठीं प्रत्येक जातींचे एकेक दोनदोन असे लेख निवडून दिलेले आहेत.

जुनी ऐतिहासिक माहिती मिळवितांनां कधीं कधीं एकमेकांशीं विलग असे लेख आढळून येतात, शिवाय हा इतिहास लिहिण्याचा पहिलाच प्रयत्न असून कांहींएका विशेष कारणानें तो प्रसिद्ध करण्याची थोडीशी घाई करावी लागली. अशा अनेक कारणांनीं यांत कांहीं चुका राहून जातील असा संभव आहे; तशा चुका कोणास आढळतील तर त्या मेहरबानी करून मला कळवाव्या अशी विनंति आहे. ह्मणजे दुसरी आवृत्ति काढण्याचा योग आल्यास त्यावेळीं त्याबद्दल आभारपूर्वक विचार करण्यांत येईल.


आरंभींच हें पुस्तक लिहिण्याच्या कामीं सरकारी दप्तरांतील माहिती देण्यासाठीं मोठ्या आनंदानें पूर्वींचे माझे वरिष्ठ व संस्थानचे चीफ जज्ज साहेब एझरा रुबेन यांनीं शिफारस करून, तसेंच येथील इंग्लिश शाळेचे हेडमास्तर रामचंद्र घनश्याम सबनीस, जुने माहितगार वकील शंकर सिताराम घोटगे व जुने दरकदार घनश्याम मंगेश रांगणेकर यांनीं मला या कामीं पुष्कळ मदत देऊन आभारी केलें आहे.

शेवटीं ज्या सर्व शक्तिमान् प्रभूच्या कृपेनें हें काम येथवर शेवटास गेलें त्याला शतशः प्रणाम करून हा लेख पुरा करितों.

तारीख २७ डिसेंबर १९११.

पुस्तककर्ता.

अनुक्रमणिका.



आचरें
कळसुली
कसाल
कडावल
पाटगांव
मनोहर
सांगेली
आंबोली
सुंदरवाडी
वेंगुर्लें
तेरेखोलची खाडी
मणेरी
कोलवाळची खाडी
म्हापसें
पंच महाल
स्केल दर इंचास १० मैल
इंग्रजांच्या ताब्यात गेलेला मुलूख
पोर्तुगीज च्या ,, ,, ,,
कोल्हापूरच्या ,, ,, ,,
सध्यांचें सावंतवाडी संस्थान

सावंतवाडी संस्थानचा इतिहास.

भाग १ ला.

सामान्य वर्णन.

सांप्रतकाळीं आपण ज्यास सावंतवाडी संस्थान असें ह्मणतों तो प्रदेश प्राचीनकाळीं हल्लीं असलेल्या नांवानें प्रसिद्ध नव्हता; किंवा हल्लींप्रमाणें निराळाही झालेला नव्हता. हिंदुस्थान देशाच्या दक्षिण भागांत दख्खन किंवा महाराष्ट्र या नांवाचें एक मोठें राष्ट्र होतें त्यांत हा प्रदेश मोडत असे. या राष्ट्राच्या पोटीं कांहीं सुभे व प्रत्येक सुभ्याच्या पोटीं कांहीं परगणे असत. कोंकण सुभ्याच्या पोटीं कुडाळ व भीमगड ह्या नांवांचे दोन परगणे होते. त्यांत सावंतवाडी प्रदेशाचा समावेश होत असे; कुडाळ परगण्यांत बारा तर्फा, दोन कर्याती व एक बंदर होतें. भीमगड परगण्यांत पांच महाल होते. दोन्ही परगण्यांत मिळून एकंदर ४२७ गांवें होते. इसवी सन १६९७ त सावंत भोंसले यांनीं कुडाळ देशस्थ प्रभूंस जिंकून ते वर सांगितलेल्या दोन्ही परगण्यांवर स्वतंत्रपणें सत्ता चालवूं लागले; व आपल्यास "सरदेसाई परगणे कुडाळ व महालानिहाय" असें ह्मणवूं लागले; त्यावेळीं त्यांच्याकडे असलेल्या मुलखाचें क्षेत्रफळ सुमारें १७०० चौरसमैल होतें, व त्याच्या मर्यादा पुढें लिहिल्याप्रमाणें होत्याः—उत्तरेस गडनदी पलीकडे साळशी महाल; पूर्वेस कोल्हापूर संस्थान व बेळगांव जिल्हा; दक्षिणेस गोवें अमलांतील बारदेश, फोंडा व पंचमहाल हे प्रांत; पश्चिमेस अरबी समुद्र.

कालांतरानें सावंतांकडील मुलखपैकीं थोडथोडा मुलख शेजारच्या राजांनीं काबीज केला. कुडाळ परगण्यापैकीं तीन तर्फा एक बंदर व दोन तर्फांपैकीं कांहीं गांव इंग्लिशांनीं घेतले. एक कर्यात कोल्हापूर संस्थानाकडे गेली. भीमगड परगण्यापैकीं तीन महाल पोर्तुगीज सरकाराच्या ताब्यांत गेले. शेवटीं नऊ तर्फा, एक कर्यात व दोन महाल

---

१ यांचा तपशील परिशिष्ट ४ थें यांत दिलेला आहे.

सावंत भोंसले यांच्या सत्तेखालीं राहिले. हा मुलुख व चंदिगडें तर्फेपैकीं मिळालेले आंबोली, गेळें व चौकूळ हे तीन गांव मिळून सध्याचें सावंतवाडी संस्थान झालेलें आहे. येथील राजे क्षत्रियांपैकीं प्रसिद्ध भोंसले घराण्यांतील असून त्यांस सावंत असें ह्मणतात. त्यावरून हल्लींचें "सावंतवाडी" हें नांव पडलें असावें; हें संस्थान उत्तर अक्षांश १५° व १७° आणि पूर्व रेखांश ७३° व ७६° यांच्या मध्यें आहे. याच्या मर्यादा पुढें लिहिल्या प्रमाणें:—उत्तरेस गडनदी, पलीकडे रत्नागिरी जिल्हा; पूर्वेस सह्याद्रिपर्वत पलीकडे कोल्हापूर संस्थान व बेळगांव जिल्हा; दक्षिणेस तेरेखोलची खाडी व गोवें प्रांत; पश्चिमेस रत्नागिरी जिल्हा. याची दक्षिणोत्तर लांबी सुमारें ५० मैल व पूर्वपश्चिम रुंदी सुमारें ३० मैल आहे. क्षेत्रफळ ९२६ चौरस मैल असून त्यांत २२६ गांव आहेत.

हिंदुस्थानांतील प्रसिद्ध पर्वतांपैकीं सह्याद्रि पर्वताचा कांहीं भाग या संस्थानाच्या पूर्वभागीं उत्तर टोंकापासून दक्षिण टोंकापर्यंत पसरलेला आहे; व कित्येक ठिकाणीं त्यांचीं बरींच उंच शिखरें आहेत. हिंदुस्थानांतील अतिशय मजबूत किल्ल्यांपैकीं मानिलेला जो मनोहरगड तो याच्या एका शिखरावर बांधिलेला आहे. त्याची समुद्रसपाटीपासून उंची सुमारें २५०० फूट आहे. शिवाय लहान लहान बरेच डोंगर गांवोगांव आहे त्यांत पुढें लिहिलेले डोंगर विशेष प्रसिद्ध आहेत:— कुणीचा, वालावल गांवीं; वाघेरीचा, मठ गांवांत; नरेंद्र, वाडी शहराच्या पश्चिमेस; रुमडाचा कणा, माजगांवांत; सिद्धाचा डोंगर, माणगांवांत; हळदीचा मठ, सांगेली गांवीं; मठ पर्वत, बांदें गांवाजवळ; सांगेली, विर्डी व कसईचा डोंगर; इत्यादि.

या संस्थानांत पांच मोठ्या नद्या आहेत, त्यांपैकीं चार नद्या सह्याद्रि पर्वतांत उगम पावून पश्चिमवाहिनी होऊन अरबी समुद्रास मिळतात. सर्वांत मोठी कर्लीची नदी ही मनोहरगड किल्ल्याजवळ शिवापूर गांवांत उगम पावून केरवडें, नानेली, मांडकुली, कुडाळ, नेरूर, चेंदवण कंवठी या गांवांतून वाहत जाऊन मालवणानजीक देवबाग येथें समुद्रास मिळते. तिला कुडाळ येथें भंगसाळ असें ह्मणतात. उगमापासून

मुखापर्यंत हिची लांबी सुमारें ४८ मैल आहे. दुसरी तेरेखोलची नदी ही मनोहर गडाजवळच शिराशिंगें गांवीं उगम पावून फलंविस्त, मांडखोल, ओटवणें, इनसुली, बांदें, सांतडें, कवठणी, किनळें, आरंवदें या गांवांतून वाहत जाऊन तेरेखोल किल्ल्यानजीक समुद्रास मिळते; हिला मांडखोल येथें वडकोंड असें ह्मणतात. हिची लांबी सुमारें ४२ मैल आहे. तिसरी गडनदी ही घोटगें घांटाजवळ उगम पावून या संस्थानाच्या उत्तर हद्दीवरून ब्रिटिश मुलखांत वाहत जाते व सर्जेकोटाजवळ समुद्रास मिळते; तेथें तिला कालावलीची खाडी असें ह्मणतात. चवथी तिळारी ही केंद्रे बुद्रुक गांवाजवळ उगम पावून हेवाळें, घोटगें, परमें, साटेली, सासोली, मणेरी या गांवांतून गोंवें प्रांतांत वाहत जाते व चापोरा येथें समुद्रास मिळते; तेथें तिला कोलवाळची खाडी असें ह्मणतात. पांचवी हिरण्यकेशी ही सह्याद्रिपर्वताच्या माथ्यावर आंबोली गांवीं एका भुयारांत उगम पावून पूर्ववाहिनी होऊन कोल्हापूर संस्थान व बेळगांव जिल्हा यांतून वहात जाऊन विजापूर जिल्ह्यांत कृष्णानदीस मिळते. तिला घटप्रभा असें ह्मणतात. यांशिवाय कसालची, पांग्रडची, पिठढवळ, हातेरीची, तळवड्याची, तिरवड्याचा पार, कडशी, कळण्याची, वगैरे लहान लहान नद्या आहेत.

वाडी शहरांतील मोतीतलाव हा बराच प्रसिद्ध आहे. बरेच वर्षांपूर्वी त्यांत एक मोत्यांचा शिंपला सांपडला होता. त्यावरून हें नांव पडलें असें ह्मणतात. अझूनही त्यांत केव्हां केव्हां एखादा शिंपला सांपडतो. याशिवाय पाट, वालावल, नेरूर, या गांवांतही लहान मोठे तलाव आहेत.

बांदें व कुडाळ येथें बादशाही अमदानींत बांधलेले कोट आहेत. बांदें येथील कोटांत विजापूरच्या बादशहाचा वजीर राहत असे असें सांगतात. हे दोन्ही कोट मोडून गेलेले आहेत तरी राहिलेल्या भागाची दुरुस्ती करून ते राखिलेले आहेत. बांदें येथें विजापूर अमलाच्यावेळीं बांधलेल्या मशिदी व घुमट अशा इतर इमारतीहि आहेत. त्यांचें काम फार पाहण्यासारखें आहे. या इमारती बांधून दोनशेंहून जास्ती वर्षें

झालीं आहेत व कितीएक वर्षेंपर्यंत त्यांवर झाडी व वेली वाढून त्यांनीं त्या अगदीं व्यापून गेलेल्या आहेत तरी त्यांस कांहीं धोका न पोंचतां त्या अद्याप जशाच्या तशाच आहेत. कुडाळ येथील कोटाच्या नजीक घोडेबांव या नांवाची एक मोठी विहीर आहे; स्वाराला घोड्यावर बसून पायऱ्या उतरून विहिरीचें पाणी घोड्यास पाजतां यावें अशा तजविजीनें ही विहीर बांधिली ह्मणून तिला घोडेबांव असें नांव पडलें असें ह्मणतात. वाडी व आवाडें येथेंही कोट होते; परंतु ते अगदीं मोडून गेलेले आहेत. तरी वाडी येथें ज्या भागांत कोट होता त्या भागास जुना कोट असें ह्मणण्याची अद्यापिही चाल आहे.

या संस्थानच्या पूर्व हद्दीवर सह्याद्रिपर्वताची ओळ आहे; तिच्या शिखरांवर अनेक किल्ले बांधिले होते. त्यांतील जे चांगल्या स्थितींत आहेत त्यापैकीं मनोहरगड हा विशेष प्रसिद्ध आहे. तो इसवी सन १८४४ च्या बंडानंतर कोल्हापूरकरांकडून सावंतवाडी संस्थानच्या ताब्यांत आला; या किल्ल्याची लांबी ४४० यार्ड व रुंदी ३९० यार्ड आहे; त्यावर चढून जाण्यास एकच वाट असून ती फारच बिकट आहे. त्याच्याच नजीक मनसंतोष या नांवाचा एक लहानसा किल्ला आहे दोन किल्ल्यांच्या मध्यें एक फार खोल दरी आहे शिवाय फुकेरी येथें हनुमंतगड, आंबोली येथें महादेवगड, गेळें येथें नारायणगड, सोनवडें येथें नरसिंहगड किंवा सोनगड, असे किल्ले होते; परंतु आतां ते अगदीं मोडून गेलेले व कांहीं साफ जमीनदोस्त झालेले आहेत.

या प्रदेशाची हवा साधारण उष्ण आहे. अतिशय उष्णतेच्या दिवसांत पारा १००° अंशावर असतो व अगदीं थंडीच्या दिवसांत तो ६०° अंशावर उतरतो. साधारणतः फेब्रुआरी महिन्याच्या अखेरीपासून उन्हाळ्यास सुरुवात होते व तो जून महिन्याच्या आरंभापर्यंत असतो. जून महिन्यांत पाऊस पडूं लागतो. पावसाचें प्रमाण सरासरी १३९ इंच असतें; परंतु घाटमाथ्यावर कधीं कधीं ३०० इंच पर्यंत पाऊस पडतो. अक्टोबर अखेरीपासून हिंवाळा सुरू होतो. पाण्याचा पुरवठा बहुतेक विहिरींपासून होतो. सह्याद्रि पर्वताच्या आसपास कोठें कोठें नदींतून

वाहत जाणाऱ्या व नदींत सांठलेल्या पाण्याचाही उपयोग करितात. वाडी शहरांत सह्याद्रि पर्वतांतून निघालेल्या एका झऱ्याचें पाणी नळानें आणिलेलें आहे. एप्रील महिन्यापासून एक दोन महिने कांहीं ठिकाणीं पाण्याची तूट पडते; परंतु त्यापासून लोकांना विशेष त्रास सोसावा लागला असें बहुधा होत नाहीं.

या प्रदेशांत मुख्य रोग ह्मटला ह्मणजे हिंवताप हा होय. तो सह्याद्रीच्या बाजूच्या ज्या गांवांत झाडी जास्त असते त्या गांवांत नेहमीं असतो. हल्लीं तो इतर गांवांतही वाढत चालला आहे. तो बहुतकरून बाराही महिने चालू असतो. आमांश व अतिसार हे विकार बहुधा प्रत्येक पावसाळ्यांत कांहीं गांवांत उद्भवतात. याशिवाय देवी, गोवरें, पटकी हेहि रोग केव्हां केव्हा उत्पन्न होत असतात.

या संस्थानांत भात, नाचणे, वरी, हरीक, बरग इत्यादि धान्यें; कुळीथ, मुग, उडीद, पावटे, तुरी, चंवळी, इत्यादि कडधान्यें; नारळ, सुपारी, काजुबिया, काफी, आंबे, फणस, अननस, केळीं, पपनस, साखर लिंबु, लिंबू, महाळुंग इत्यादि फळें; सुरंगी, मोगरा, चांफा, शेवंती, जाई, जुई, गुलाब इत्यादि फुलें; आणि शिवाय तीळ, मध, विड्याचीं पानें, कात [खैराचा], ताग, हरडा, बेहरडा, आमसोलें, मिरची, आलें, मिरीं, चिंच, हळद, ऊंस, कांदे इत्यादि इतर पदार्थ उत्पन्न होतात. शिसवा, साग, फणस, जांभा, जांभूळ, आंजण व दुसरीं कित्येक पंचरूख जातीचीं इमारतीचें लांकूड मिळण्यालायक झाडें आहेत. कांहीं ठिकाणीं बांबू व वेळू बरेच उत्पन्न होतात.

या ठिकाणीं बऱ्याच जागीं दाट जंगल असल्यामुळें त्यांत वाघ, चित्ता, रानडुकर, अस्वल, तरस, गवा, कोल्हा, सांबर, ससा, वानर इत्यादि पुष्कळ वन्य पशू राहतात; घोडा, बैल, गाई, डुकर, ह्मैस, रेडा, शेळी, बकरें, मांजर, कुत्रें इत्यादि ग्राम्य पशु लोक बाळगितात. याखेरीज कांसव, अनेक प्रकारचे मासे, खेंकडा वगैरे पाण्यांत राहणारे जीव चिमणी, कावळा, पोपट, पारवा, कबुतर, गरूड इत्यादि पक्षी; साप, विंचू, मणियार, फुरसें, घोणस इत्यादि दंश करणारे प्राणी आहेत.

या प्रांतीं लोखंडाचे दगड कोठें कोठें सांपडतात. म्यांगनीज धातूच्याहि कांहीं खाणी सांपडल्या आहेत. राम्रघांटावर सोनें निघण्यासारखी माती आहे असें ह्मणतात. आकेरी गांवांत एक प्रकारचा काळा दगड सांपडतो, त्याच्या उत्तम मूर्ति बनवितां येतात. सोनवडें व सोनुर्ली गांवांत मिळणाऱ्या दगडाचीं अनेक प्रकारचीं भांडीं तयार करितात. कडावल व पांग्रड या गांवांतील डोंगरांत अभ्रकाच्या भिंगांच्या खाणी आहेत. वालावल गांवांतील कुपीच्या डोंगरांत नक्षीच्या उपयोगी असा पांढरा व चकचकीत दगड सांपडतो.

सन १९११ च्या खानेसुमारी प्रमाणें संस्थानची लोकसंख्या[१] २१७२४० आहे. त्यांत बहुतेक वस्ती हिंदु लोकांची आहे. कांहीं मुसलमान व ख्रिश्चन यांची वस्ती असून थोडीशी जैन धर्माच्या लोकांची वस्ती आहे. हिंदु लोकांच्या निरनिराळ्या ८९ जाती आहेत. कित्येक जातींत खाणेंपिणें, पोषाख, लग्नाच्या चालीरिती यांत बराच भेद दिसतो. खालच्या दर्जाच्या कित्येक जातींत विधवाविवाह करण्याची चाल आहे. त्या लग्नास पाट लावणें असें ह्मणतात. धनगर जातीच्या लोकांत अगदीं लहानपणीं लग्नें करण्याची चाल आहे. ते कधीं कधीं पाळण्यातल्या मुलांचीं सुद्धां लग्नें लावतात. उच्च प्रतीचे मराठे व मुसलमान लोक यांच्यांत गोषाची चाल आहे.

लोकांचा मुख्य धंदा शेती हा आहे. एकंदर लोकवस्तीपैकीं सुमारें तीन चतुर्थांश लोक शेतीवर निर्वाह करितात. शेतीच्या खालोखाल व्यापार, हस्त कौशल्य व नोकरी हे धंदे आहेत. बहुतेक जातींत वंशपरंपरेचा धंदाच करण्याची चाल आहे. शेतकरी लोकांची साधारण स्थिति गरिबीची आहे. व्यापार व कलाकौशल्य हे धंदेही लहान प्रमाणावर होत असल्यामुळें त्या लोकांचीसुद्धां सांपत्तिक स्थिति ह्मणण्यासारखी चांगली नाहीं. गरीबीमुळें बरेच लोक उद्योगधंद्यांसाठीं बाहेरगांवीं जातात.

---

१ लोकसंख्ये संबंधीं तपशीलवार माहिति परिशिष्ट ४ थें पत्रकें १ व २ यांत दिलेली आहे.

वाडी शहरांत रंगीत माल तयार करण्याचे लहान लहान पांच कारखाने आहेत. त्यांत गंजिफे, बुद्धिबळ, अनेक प्रकारचे खेळाचे जिन्नस, पाळणे वगैरे लांकडाचें सामान तयार होतें. शिवाय या कारखान्यांत गव्याच्या शिंगाच्या देवाच्या मूर्ति, अभिषेक पात्रें, हरणें वगैरे जिन्नस तयार करितात. कित्येक कारागीर नारळाच्या कवचीवर नक्षी कोरून तींत पारा भरून बशी, पेले, गुडगुड्या वगैरे जिन्नस करितात. येथील रंगीत मालाची फार प्रसिद्धी असून कित्येक कारागिरांनीं परदेशांत सुद्धां झालेल्या मोठमोठ्या प्रदर्शनांत पदकें मिळविलीं आहेत. वाडी शहरांत एक टाईल व ब्रिक फ्याक्टरी आहे. तींत तऱ्हेतऱ्हेचीं कौलें व विटा तयार होतात.

या संस्थानचा जलमार्गानें होणारा व्यापार वेंगुर्लें व तेरेखोलच्या खाडीवरील आरंवदें या दोन बंदरांनीं होतो. हीं अनुक्रमें वाडी शहरापासून १७ व १९ मैलांवर आहेत. जलमार्गानें येणारा बहुतेक माल मुंबईहून येतो. त्यापैकीं मुख्य जिन्नस तांदूळ, विलायती व देशी कापड, साखर, केरोसीन तेल, बेलतेल, व्हार्निस, लवंग, जायफळ, बेलदोडा, वगैरे मसाल्याचे जिन्नस, तांब्यापितळेचीं भांडीं, लोखंडी हत्यारें व सुया टांचण्या वगैरे इतर जिन्नस, तऱ्हेतऱ्हेचें कांचेचें सामान, स्टेशनरी सामान, बदाम, खारीक, द्राक्ष, वगैरे सुकीं फळें, चहा, साबण, अनेक प्रकारचे औषधी जिन्नस, हरभरे, वाटाणे वगैरे कडधान्यें हे आहेत. दक्षिणेकडून मलबार किनाऱ्याहून खोबरेल तेल, तांदूळ वगैरे जिन्नस येतात. देशावरून खुष्कीनें येणारा माल येण्याचे मार्ग फोंडा, घोटगें, हनुमंत किंवा रांगणा, पारपोली (आंबोली), तळकट, मांगेली, रामघांट या घांटांतून आहेत. यांपैकीं फोंडा व पारपोली हे दोन घांट मात्र गाड्या येण्याजाण्यास सोईचे आहेत. रामघांटांतून पूर्वीं गाड्या जात येत असत; परंतु पारपोली घांट सुरू झाल्यापासून त्या जाण्यायेण्याचें बंद झालें आहे. बाकी घांट हे फक्त बैलमार्ग आहेत. देशावरून येणारे मुख्य जिन्नस जिरेसाळ व आंबेमोहर तांदूळ, गहूं, ज्वारी, बाजरी, तूर, हरभरा, वाटाणा, मसूर, मुग, उडीद, वगैरे कडधान्यें, तूप, तिळांचें तेल, सरकी,

पेंड, तंबाकु, गांजा, मिरची, कोथंबीर, कांदे, गुळ, जिरें, लसूण, मेथी, मोहरी, बडीशेप, चिंच, हळद, बटाटे, देशी कापड, हे आहेत.

या ठिकाणीं उत्पन्न होणारे जिन्नस बहुतेक इकडील लोकांच्या निर्वाहापुरतेच असतात. तथापि नारळ, सुपारी, ताग, मिरीं, काफी, काजूबी, आंबे, आमसोलें, तीळ, वगैरे कांहीं, जिन्नस विक्रीसाठीं बाहेर जातात. तसेंच तऱ्हेतऱ्हेचें रंगीत सामान, कौलें, वगैरे मालही बाहेर जातो. दरसाल सरासरी साडेपांच लक्ष रुपयांचा माल संस्थानांत येतो; व सुमारें पन्नास हजार रुपयांचा माल बाहेर जातो.

कसाल, घोटगें, नेरूर [दुकानवाडी], आंबोली, तळकट, भेडशी, मळेवाडी [आजगांव], आरोस येथें टोलनाकीं ठेविलीं आहेत. तेथें गाड्या, घोडीं व इतर वाहनें यांजवर जकात घेण्यांत येते. आंबोली व कसाल या नाक्यांवरील उत्पन्न ब्रिटिश सरकारास मिळतें. बाकी नाक्यांचा वसूल संस्थानांत जमा होतो. संस्थानांतून गोवें अमलांत जाणाऱ्या व येणाऱ्या कांहीं मालावर जकात घेण्यासाठीं सरहद्दीवर आरंवदें, सांतर्डे, वगैरे ठिकाणीं नाकीं बसविलीं आहेत. त्यांचें सर्व उत्पन्न ब्रिटिश सरकारास मिळतें.

इकडील व्यापारांत बत्तीशी व बंदरी अशा दोन वजनांचा मुख्यत्वें करून उपयोग करितात. बत्तीशी वजन ह्मणजे ३२ तोळ्यांचा एक शेर, ४० शेरांचा मण, आणि वीस मणांची खंडी. बंदरी वजन ह्मणजे ४० रुपये भार वजनाचा रत्तल आणि २८ रतलांचा एक मण. गल्ला मोजण्यासाठीं ६० तो० शेराचा उपयोग करितात. ६० तोळे कुळीथ वजन करून तितके कुळीथ ज्या मापांत माथावणी करून राहतील तो एक शेर मानितात. पुढील मापें ४ शेरांची पायली, दोन पायल्यांचा कुडव, वीस कुडवांची खंडी व चार खंडीचा भरा अशीं आहेत. यास कुडाळी माप असें ह्मणतात. प्रवाही पदार्थ मापण्यासाठीं दोन मापांचा उपयोग करितात— एक तेलाचा शेर व दुसरा दुधाचा शेर. शुद्ध पाणी ४० तोळे वजनाचें ज्या मापांत बरोबर राहील तो तेलाचा शेर व ऐंशीं तोळे वजनाचें ज्या मापांत बरोबर राहतें तो दुधाचा शेर. अशा चाळीश शेरांचा एक मण होतो.

या संस्थानचा बहुतेक भाग डोंगरांनीं व सुशोभित अरण्यांनीं व्यापिलेला असल्यामुळें कित्येक ठिकाणीं सृष्टिसौंदर्य फार चांगलें दिसतें. वाडी शहराच्या मध्यभागीं तलाव असून त्याच्या कांठीं सुंदर इमारती आहेत व पश्चिम बाजूस लहानशी डोंगराची ओळ आहे. त्यामुळें शहराचा तो भाग फार रमणीय दिसतो. घांटमाथ्यावरून खालील कित्येक ठिकाणच्या प्रदेशाचा देखावा फार बहारीचा दिसतो. त्यांतही आंबोली व चौकूळ येथून दिसणारा सह्याद्रीच्या पायथ्याशीं असलेला मलई नवाचा प्रदेश विशेष प्रसिद्ध आहे. आंबोली येथें ज्या भुयारांत हिरण्यकेशी नदीचा उगम झाला आहे. तें भुयार फार दूरवर पसरलेलें असून अगदीं अंधारमय आहे, व पुष्कळ लांबपर्यंत जाऊन तपास केला तरीहि त्या उगमाचें मूळ सांपडत नाहीं असें ह्मणतात. तेंडोली गांवांत बागलाची राई ह्मणून एक बाग आहे. त्या बागांत पूर्णानंद स्वामीचा मठ आहे. ही मठाची इमारत फक्त चिऱ्यांनीं बांधलेली आहे. ज्या भागांत पूर्णानंद स्वामींची समाधि आहे, तेथें दोन्ही बाजूंच्या भिंती पोखरून त्यांत एक लांकडी तुळई बसविलेली आहे. तींतून पाणी पाझरून एक एक थेंब समाधीवर पडत असतो. कांहीं वर्षांनी ही तुळई कुजून जाते तेव्हां ती काढून त्याजागीं दुसरी बसवितात. तरी चाललेल्या क्रमांत कधीं फरक पडत नाहीं, हा चमत्कार महाशिवरात्रीपासून मृगनक्षत्राचे सरवातीपर्यंत चालू असतो. पूर्वीं या ठिकाणीं दाट अरण्य असून त्यांत वाघाची वस्ती होती. त्यावरून त्या ठिकाणास "बागलाची राई" हें नांव पडलें असें ह्मणतात. अजूनही त्या ठिकाणीं दाट जंगल आहे.

या प्रदेशांतील गांवांत हिंदु लोकांचीच जास्त वस्ती असल्यामुळें प्रत्येक खेड्यांत लहान मोठीं देवस्थानें आहेत, व प्रत्येक देवस्थानाकडे वर्षांतून निदान एक वेळ तरी जत्रा भरत असते. त्यांतही आकेरी व नेरूर येथील महाशिवरात्रीच्या दिवसांत होणारा रथोत्सव, वैशाख अमावास्येच्या दिवशीं भरणारा तुळस येथील जैतीर व नारूर येथील खापरा, फाल्गुन वद्य षष्ठीचा कुणकेरी येथील हुडा आणि माघ शुद्ध पौर्णिमेस तळवणें येथील भंडारा ह्या जत्रा विशेष प्रसिद्ध आहेत. कुडाळ

येथील किल्ल्यामध्यें व आसोलीपाल येथील खाजणादेवीकडे रेडा बळी देण्याची चाल आहे.

या संस्थानांतील हिंदु लोक मराठी, मुसलमान लोक उर्दु व नेटिव्ह ख्रिश्चन लोक कोंकणी भाषा बोलतात.

संस्थानचें सालिना उत्पन्न सुमारें पांच लक्ष रुपये असून खर्च सुमारें साडेचार लक्ष आहे.

भाग २ रा.

प्राचीन इतिहासाची सामान्य माहिती.

सावंतवाडीचा मुलुख प्राचीनकाळीं दक्षिण राष्ट्रांत मोडत असे हें पूर्वीं सांगितलेंच आहे. या दक्षिण राष्ट्रावर जे राज्यकर्ते होऊन गेले त्यांपैकीं ज्या घराण्याविषयीं थोडीशी ऐतिहासिक माहिती मिळते असें सर्वांत जुनें घराणें ह्मणजे आंध्रभृत्य हें होय. या घराण्यांतील पहिला राजा सिमुक हा इसवी सनापूर्वीं ७३ व्या वर्षीं गादीवर बसला. त्याची राजधानी पैठण ही होती. आंध्र ह्मणजे तेलंग व भृत्य ह्मणजे सेवक. त्यावरून हे राजे मूळचे तेलंग देशावर राज्य करीत होते व ते आरंभीं पाटली पुत्रामध्यें राज्य करणारीं मौर्य आणि शुंग कुलें यांचे सेवक अथवा सामंत असावे. याच घराण्यास शातवाहन किंवा शालिवाहन असेंही नांव आहे. सिमुक यानें इ. स. पूर्वीं ५० व्या वर्षापर्यंत राज्य केलें. त्याच्या मागून कृष्ण यानें इ. स. पूर्वीं ४० पर्यंत राज्य केल्यावर शातकर्णी हा गादीवर बसला, तो इ. स. १६ पर्यंत गादीवर होता.

इसवी सनाच्या पहिल्या शतकाच्या चवथ्या पादांत शातवाहन राजांचें उच्चाटन करून शक राजांनीं दक्षिण राष्ट्रावर आपला अंमल बसविला. या शक राजांत क्षहरात नहपान हा राजा मोठा पराक्रमी

१ याचा तपशील परिशिष्ट ४ थें पत्रक नंबर ७ यांत दिलेला आहे.

होऊन गेला. शक राजे यवन (सीथियन) असून पूर्वी उज्जनीस राज्य करीत असत. शक नांवाची वर्षगणना शालिवाहनानें सुरू केली असें साधारणपणें समजतात. पण आरंभीं शकनृपकाल किंवा शककाल असेंच ह्मणतात. शकांचा पराजय शालिवाहनांनीं केल्यानंतर तोच शककाल पुढें सुरू राहून त्यास कोणा मोठ्या राजाचें नांव जुळविणें युक्त दिसल्यावरून त्या शककालास शालिवाहन याचें नांव जोडण्यांत आलें असावें. क्षहरात नहपान याचा जांवई उषवदात यानें बौद्ध भिक्षूंस[1] झगे व दुसरे कांहीं जिन्नस देण्यासाठीं तीन हजार कार्षापण व्याजीं लाविले होते. त्याचें व्याज सालिना १७५ कार्षापण येत असे त्यांतून या भिक्षूंस दरसाल श्रावण महिन्यांत नवीं वस्त्रें देत असत.

इसवी सन १३३ च्या सुमारास आंध्रभृत्य घराण्यांतील गौतमीपुत्र शातकर्णी[2] या नांवाच्या राजानें शक राजांस जिंकून दक्षिण राष्ट्रावर पुनः आपली सत्ता स्थापित केली. याच्यापुढें या कुलांत जे राजे झाले त्यांच्या कारकीर्दीचा काल पुढें लिहिल्याप्रमाणें आहे:—पुळुमाई इ. स. १९४–१९८; शिवश्री, इ. स. १९८–१६५; शिवस्कंद, इ. स. १६५–१७२; यज्ञश्री, इ. स. १७२–२०२; विजय, इ. स. २०२–२०८; चंद्रश्री, इ. स. २०८–२११; पुलोमवि, इ. स. २११–२१८. हे राजे पराक्रमी व कीर्तिमान होते. समुद्रवलयांकित २०० नगरांवर त्यांची सत्ता असून पाहिजे तेव्हां युद्धास सज्ज अशी दीड लक्ष सेना त्यांच्याजवळ होती असें वर्णन आढळतें. यांच्या वेळीं पश्चिम किनाऱ्यावर जयगड, उत्तर कानडांतील बनवाशी हीं बंदरें चांगल्या भरभराटीच्या स्थितींत होतीं. पहिल्या शतकांतील ग्रीक ग्रंथकर्ता पेरिप्लस यानें असें लिहिलें आहे कीं, मुंबई व गोवें यांच्यामधील समुद्रकिनाऱ्यावर

१ बौद्ध धर्मांत कांहीं लोक प्रपंच न करितां मठांत राहत असत त्यांस भिक्षू ह्मणत असत. २ या राजाच्यावेळचीं कांहीं रुप्याचीं नाणीं नाशिक जिल्ह्यांत जोगलटेंभी नामक खेड्यांत सांपडलीं आहेत. त्यांवर मूळ क्षहरात नहपान याचें नांव असून त्यावर गौतमीपुत्र शातकर्णी याचें नांव छापिलें आहे. त्यावरून गौतमीपुत्रानें शकास जिंकल्यावर नहपानाच्या नाण्यावर आपलें नांव छापिलें असें दिसतें.

चांचे लोकांचा सुळसुळाट होता. दुसऱ्या शतकाच्या मध्याच्या पूर्वी सर्व कोंकणावर महाक्षत्रप रुद्रदामन नांवाच्या राजाचें राज्य होतें. त्या-वेळीं या किनाऱ्यावरील चांचे लोक प्रसिद्ध असल्यामुळें, तो युरोपियन लोकांस माहित होता तरी सुद्धां, त्यांचें या बाजूस फारसें दळण वळण नव्हतें. यावेळीं प्रसिद्ध असलेलीं बंदरें Nitrias किंवा Nitra व Turranosboas हीं अनुक्रमें कोचरें गांवांतील निवती आणि आचरें किंवा बांदें किंवा तेरेखोल हीं असावीं.

पुळुमायी शालिवाहनाचा प्रधान गुणाढ्य यानें पैशाची भाषेंत बृहत्क-थासागर या नांवाचा ग्रंथ लिहिला. शालिवाहन राजांच्या कारकीर्दींत सप्तशती, कातंत्रव्याकरण वगैरे ग्रंथ प्रसिद्ध झाले. याच वेळेपासून जुन्या महाराष्ट्र भाषेंत ग्रंथरचना होऊं लागली. व्यापारही चांगला भर-भराटीस आला होता. यावेळीं भडोच, पैठण, नाशिक, कऱ्हाड, कोल्हापूर वगैरे शहरें व्यापारांत प्रसिद्ध होतीं. यांचे वेळीं निगमसभा या नांवाची हल्लींच्या म्युनिसिपल कार्पोरेशनसारखी सभा असे. व्याजाचा दर शेंकडा ९ पासून ७॥ पर्यंत होता. त्यावेळीं रस्तेसुद्धां चांगले करण्याची वहिवाट होती.

तिसऱ्या शतकाच्या प्रथम पादांत शालिवाहन घराणें लयास जाऊन शकांचा अंमल पुनः चालू झाला. आभीर (गवळी) राजांनीं खानदेश व नाशिक यांच्याजवळचा कांहीं मुलुख मिळविला. तिसऱ्या शतका-च्या अखेरीस राष्ट्रकूट घराण्याचे राजे उदयास येऊन त्यांनीं दक्षिण-राष्ट्र काबीज केलें. या कुळांत कृष्ण, इंद्र अशा नांवाचे राजे झाले.

इसवी सनाच्या सहाव्या शतकाच्या आरंभास चालुक्य कुळांतील राजांनीं राष्ट्रकूट घराण्यांतील राजांस जिंकून दक्षिण राष्ट्राच्या गादीवर आपल्या कुळाची स्थापना केली. चालुक्य कुळांतील राजे राज्य चाल-वीत असतां त्यांनीं या व इतर प्रांतांत दिलेले बरेच ताम्रपट सांपडले आहेत. शिवाय त्यांच्यावेळचे शिलालेखही मिळाले आहेत, त्यावरून त्यांच्या कारकीर्दीविषयीं कांहीं ठोकळ माहिती मिळते. या कुळांत जे राजे झाले ते:—जयसिंह, रणराग, पहिला सत्याश्रय पुलकेशी;

विक्रमादित्य पहिला, विनयादित्य, ६८०–६९७; विजयादित्य, ६९७–७३३; दुसरा विक्रमादित्य, इ. सन ७३३–७४७; दुसरा कीर्तिवर्मा, इ. सन ७४७–७५३.

हे चालुक्य[1] राजे प्रथमतः उत्तर हिंदुस्थानांत राज्य करीत होते. त्यांची राजधानी अयोध्या ही होती. त्या घराण्यांतील जयसिंहनामक मोठ्या पराक्रमी पुरुषानें दक्षिणेंत स्वारी करून राष्ट्रकूट घराण्यांतील कृष्णराजाचा मुलगा इंद्र हा राज्य करीत असतां त्यास जिंकून दक्षिण राष्ट्रांचें आधिपत्य संपादिलें. जयसिंहाचा पणतू कीर्तिवर्मा यानें उत्तर कोंकणांतील मौर्य व उत्तर कानड्यांतील कदंब या राजांस जिंकलें. कीर्तिवर्म्याचा भाऊ मांगलीश यानें पश्चिम किनाऱ्यापर्यंतचा प्रदेश जिंकला. त्यानें रेवती द्वीप (हल्लींचें रेडी बेट) घेतलें असें आढळतें. हा आपल्या थोरल्या भावाचा मुलगा दुसरा सत्याश्रय पुलकेशी राज्यावर येऊं नये ह्मणून खटपट करूं लागला. त्यांतच त्याचा अंत झाला

दुसरा सत्याश्रय पुलकेशी हा सन ६१० त गादीवर बसला. त्यानें कनोजचा राजा हर्षवर्धन हा दक्षिण बाजूचें राज्य जिंकण्यासाठीं येत असतां त्याचा पराभव करून त्यास हांकून लाविलें व त्यापासून परमेश्वर अशी पदवी धारण केली. यानें वातापीपूर ही आपली राजधानी केली होती, हें वातापीपूर विजापूर जिल्ह्यांतील बदामी शहर असावें. सत्याश्रय पुलकेशी याचे भाऊ विष्णुवर्धन व जयसिंह यांनीं मोठमोठे पराक्रम

---

१ उत्तरकालीन चालुक्यांपैकीं विक्रमादित्याच्या वेळचा कवि बिल्हण यानें विक्रमांकदेवचरित नांवाचा जो ग्रंथ लिहिला आहे त्यांत चालुक्यांच्या उत्पत्तीविषयीं पुढें लिहिल्याप्रमाणें माहिती दिली आहे:–एकेदिवशीं सृष्टिकर्ता ब्रह्मदेव याच्यापाशीं देवाधिपति इंद्र हा जाऊन सांगूं लागला कीं, पृथ्वीतलावर यज्ञयागादि कर्में कोणी करीत नाहींत, त्यामुळें देवांस हविर्भाग मिळत नाहीं. यास्तव कृपा करून देवांस हविर्भाग मिळेल अशी तजवीज करावी. ब्रह्मदेव यावेळीं स्नान करीत असून त्यांनीं चूळ भरण्यासाठीं हातांत पाणी घेतलें होतें. तें खालीं टाकून त्यापासून एक पुरुष निर्माण केला व त्यास पृथ्वीतलावर पाठविलें. त्याचे जे वंशज झाले त्यांस त्यांचा मूळपुरुष चूळोत्पन्न ह्मणून चालुक्य असें नांव पडलें. [डॉ॰ भांडारकरांचा दक्षिणचा इतिहास.]

केले. चिनी प्रवासी हुएनसंग हा सन ६३९ त पुलकेशीकडे आला होता. त्याचे लिहिण्यांत पुलकेशीच्या राज्याचा परीघ १२०० मैल होता असें आलें आहे; त्यावेळचें महाराष्ट्राचें वर्णन या प्रवाशानें फारच विस्तृत लिहिलेलें आहे

सत्याश्रय पुलकेशी यास चंद्रादित्य, विक्रमादित्य, आदित्यवर्मा, जयसिंहवर्मा, असे चार मुलगे होते. त्यांपैकीं दुसरा मुलगा विक्रमादित्य यानें गादीवर बसावें अशी राजाची इच्छा होती. ह्मणून त्यानें आपण हयात असतांनांच आपला वडील मुलगा चंद्रादित्य यास कुडाळ प्रांतावर राज्य करण्यासाठीं पाठविलें. चंद्रादित्याच्या वायकोचें नांव विजयभट्टारिका असें होतें, तिनें कोचरें गांवांत बकुलकच्छ नांवाचें शेत खाजणासहित एका ब्राह्मणास दान दिल्याचा ताम्रपट सांपडला आहे; [1] तसेंच तिनें आणखी दोन दानें दिल्याचे ताम्रपट नेरूर गांवीं सांपडले आहेत.

चंद्रादित्याचे मागून कुडाळ प्रांताची सत्ता; त्याचे वंशाकडे न चालतां ती मूळ गादीचा मालक विक्रमादित्य याजकडे गेली असें दिसतें, पुढें विक्रमादित्याचे मागून त्याचा मुलगा विनयादित्य हा गादीवर बसला. विनयादित्याच्या मागून त्याचा मुलगा विजयादित्य यास गादी प्राप्त झाली. या विजयादित्यानें शके ६२२ (सन ७००) व शके ६२७ (सन ७०५) या वर्षीं दिलेले दोन ताम्रपट नेरूर गांवीं सांपडले आहेत.

इसवी सन ७५३ मध्यें विजयादित्याचा नातू दुसरा कीर्तिवर्मा हा राज्य करीत असतां राष्ट्रकूट वंशांतील दंतिदुर्गनामक पराक्रमी पुरुषानें त्याजवर स्वारी करून त्यास जिंकलें व दक्षिण राष्ट्रावर पुनः आपला अंमल बसविला त्यामुळें कांहीं वर्षेंपर्यंत चालुक्यांची सत्ता नष्ट झाली.

चालुक्यांचे वेळेस बौद्ध धर्मास उतरतीकळा लागून ब्राह्मणधर्माची बरीच भरभराट झाली होती. पहिला पुलकेशी यानें अश्वमेध वगैरे पुष्कळ यज्ञ केल्याचा दाखला सांपडतो. यावेळीं जैनधर्मसुद्धां बराच प्रबळ झाला होता. या प्रांतीं जिकडे तिकडे जैन देवांच्या बऱ्याच मूर्ति

१ परिशिष्ट १ लें लेख नंबर ३. २ परिशिष्ट २ रें लेख नंबर १।२.

सांपडतात, त्या चालुक्यांच्या वेळच्याच असाव्या. त्यावरून चालुक्य राजे सर्व धर्मावरील लोकांवर सारखी प्रीति करीत असत असें दिसतें.

दंतिदुर्ग यानें दक्षिणराष्ट्रावर आपली सत्ता स्थापन केली खरी; परंतु त्याचा कांहीं उपभोग घेण्यास तो फार दिवस जगला नाहीं. तो त्याचवर्षीं मरण पावला. व त्याच्या मागून त्याचा चुलता कृष्णराज किंवा शुभतुंग हा गादीवर बसला. हा मोठा पराक्रमी व गुणज्ञ होता. वेरूळ येथील लेण्यांपैकीं कैलासमंदिर यानेंच खोदविलें. याच्याच वेळीं दक्षिण कोंकणांतील शिलाहार राजे उदयास आले. या घराण्याचा मूळ-पुरुष शणफुल्ल याच्यावर कृष्णराजाची मर्जी होती व कृष्णराजानें त्यास समुद्राकिनारा व सह्याद्रिपर्वत यांच्यामधील पट्टी दिली असें खारेपाटण येथील ताम्रपटांवरून दिसतें. कृष्णराज इ. स. ७७५ त मरण पावला.

कृष्णराज याच्या मागून दुसरा गोविंद, ध्रुव, तिसरा गोविंद, शर्व किंवा अमोघवर्ष, दुसरा कृष्ण, दुसरा जगत्तुंग, तिसरा इंद्र, दुसरा अमोघवर्ष, चवथा गोविंद, बडिग किंवा तिसरा अमोघवर्ष, तिसरा कृष्ण, खोटिक आणि दुसरा कर्क हे राजे क्रमानें गादीवर बसले. राष्ट्रकूट राजांच्यावेळीं पौराणिक देवतांची भक्ति फारच वाढली. बौद्धधर्म नामशेष झाला तथापि त्याचे अद्याप कांहीं अनुयायी होतेच. जैन धर्म कमी न होतां वाढताच राहिला. शर्व किंवा अमोघवर्ष यानें तर जैन धर्माचाच स्वीकार केला होता. हे राजे कवि व विद्वान् यांचा चांगला परामर्श घेत असत. आरब लोकांचे ग्रंथांत बल्हर ह्मणून जे राजे वर्णिले आहेत ते वल्लभ किंवा राष्ट्रकूटच असावे.

राष्ट्रकूट घराण्यांतील शेवटचा राजा दुसरा कर्क याला इ. स. ९७३ त तैलप नांवाच्या चालुक्यानें जिंकून त्याचे गादीवर आपण बसला. या चालुक्य घराण्याचा पूर्वीच्या चालुक्य घराण्याशीं कांहीं संबंध असल्याचें आढळत नाहीं. हा तैलप राजा मोठा पराक्रमी होता. त्यानें गुजराथ प्रांतांतील अन्हिलपट्टण जिंकिलें व माळव्याचे भोज राजास पकडून कैद केलें. तैलप इ. सन ९९७ त मरण पावल्यावर त्याचे मागून सत्याश्रय, इ. सन ९९७–१००८; पहिला विक्रमादित्य, १००८–१०१८;

जयसिंह, १०१८–१०४०; पहिला सोमेश्वर, १०४०–१०६९; दुसरा सोमेश्वर, १०६९–१०७६; दुसरा विक्रमादित्य, १०७६–११२७; तिसरा सोमेश्वर, ११२७–११३८; जगदेकमल्ल, ११३८–११५०; दुसरा तैलप, ११५०–११६५; चवथा सोमेश्वर, ११८२–११८९; हे राजे गादीवर बसले.

दक्षिण कोंकणांतील शिलाहारांपैकीं पहिला राजा शणफुल्ल हा मरण पावल्यावर त्याच्या मागून धर्म, दैयप, पहिला अवसर, आदित्यवर्मा, दुसरा अवसर, इन्द्रराज, भीम, तिसरा अवसर, रट्टराज हे राजे एकामागून एक गादीवर बसले. यांपैकीं शेवटचा रट्टराज हा चालुक्यांनीं राष्ट्रकूटांस जिंकल्यानंतर इ. सन १००८ त सत्याश्रयाचा मांडलिक होता असें खारेपाटण येथील लेखांवरून आढळतें. परंतु याच्यानंतर या घराण्यांत झालेले राजे चालुक्यांशीं एकनिष्ठपणें वागेनातसे झाले असें दिसतें. जयसिंह व पहिला सोमेश्वर यांस त्यांजवर स्वाऱ्या करून त्यांस पुनः पुनः जिंकावें लागलें.

शिलाहाराची दुसरी एक शाखा कोल्हापूर, मिरज, कऱ्हाड इत्यादि ठिकाणीं राज्य करीत होती. हे राजे आपली उत्पत्ती विद्याधरगंधर्वापासून झाली असें मानीत. त्यांचें राहण्याचें मुख्य ठिकाण पन्हाळगड हें होतें. ते आपल्या नांवास 'श्रीमहालक्ष्मी लब्ध वरप्रसाद' असें विशेषण लावीत असत. ह्यांनीं दक्षिण कोंकणांतील शिलाहारांस इ. स. ११६०च्या पूर्वीं जिंकिलें. गंडरादित्य या नांवाचा कोल्हापूरच्या शिलाहारांपैकीं एक राजा इ. सन ११६० त कोंकणावर राज्य करीत होता असें त्या वेळच्या एका दानपत्रावरून आढळतें. गंडरादित्याच्या मागून विजयार्क व दुसरा भोज हे राजे गादीवर बसले. भोज हा इ. स. १२०५ त गादीवर होता.

चालुक्यापैकीं दुसरा विक्रमादित्य हा गादीवर असतां त्याच्यावर द्वारसमुद्र[1] येथील होयसळ राजांपैकीं विष्णुवर्धन यानें पांड्य[2], गोवें व

१ हें शहर सध्या म्हैसूर संस्थानांत असून त्यास हळेबीड असें नांव आहे. २ हल्लीं जेथें अर्काट आहे तो देश.

कोंकण या देशांच्या राजांची मदत घेऊन स्वारी केली. त्याच्यावर विक्रमादित्यानें आपला एक दक्षिणेकडील सरदार आच किंवा आचगी यास पाठविलें. या सरदारानें होयसळाचा पराभव केला, गोवें घेतलें, पांड्य राजांचा पाठलाग केला, मलयांना[1] पळवून लाविलें आणि कोंकणावर हल्ला केला. यावेळीं कोंकणचें राज्य शिलाहारांच्या ताब्यांत होतें; परंतु ते दक्षिण कोंकणांतील शिलाहार किंवा कोल्हापूरचे शिलाहार तें समजत नाहीं.

पुढें देवगिरी येथील यादव राजे प्रबळ होऊन त्यांनीं चालुक्यांची सत्ता इ. सन ११८९ त हिरावून घेतली. या वंशांतील सिंघण राजानें शिलाहार राजांना इ. सन १२१४ पूर्वीं जिंकलें. या सिंघणाची कारकीर्द इ. सन १२१०–१२४७ पर्यंत होती. सिंघण याच्या मागून त्याचा नातू कृष्णराज हा गादीवर बसला. तो इ. सन १२६० त मरण पावला. त्याच्या मागून त्याचा भाऊ महादेव यानें अकरा वर्षें राज्य केल्यावर इ. सन १२७१ त रामचंद्र उर्फ रामदेवराव हा राजा गादीवर बसला. ठाणें येथें त्याच्या प्रतिनिधींनीं दिलेलीं दोन दानपत्रें सांपडलीं आहेत, त्यांपैकीं एक इ. सन १२७२ चें असून तें अच्युत नायक नांवाच्या ब्राह्मणानें दिलें होतें. दुसरें इ. सन १२९० चें तें भारद्वाज गोत्री कृष्ण नांवाचा ब्राह्मण कोंकणचा प्रतिनिधि होता त्यानें दिलेलें होतें. याच सुमारास पश्चिम किनाऱ्यावर चांचे लोक बरेच होते असें मार्कोपोलो ह्या व्हिनिशियन प्रवाशानें ह्मटलें आहे.

इसवी सनाच्या अकराव्या शतकापासून मुसलमान लोक हिंदुस्थानावर स्वाऱ्या करूं लागले होते; परंतु तेराव्या शतकाच्या आरंभापर्यंत त्यांनीं ह्या देशांत कायमचें ठाणें दिलें नव्हतें. इ. सन १२०६ त गुलाम घराण्याचा पहिला राजा कुतुबुद्दीन हा दिल्लीच्या गादीवर बसला. त्या नंतर मुसलमान राजे हिंदुस्थानांतील आपलें राज्य वाढविण्याचा प्रयत्न करूं लागले. इ. स. १२९४ त जलालुद्दीन खिलजी हा दिल्लीच्या तक्तावर असतां त्यानें देवगिरी (दौलताबाद) येथें राज्य करणारा हिंदु

१ गोव्यांचे राजे.

राजा रामदेवराव याजपाशीं अपार संपत्ति आहे असें ऐकिलें. तेव्हां त्या राजाविषयीं मत्सर उत्पन्न होऊन त्यानें आपला पुतण्या अल्लाउद्दीन याजबरोबर आठ हजार सैन्य देऊन त्यास रामदेवरावावर स्वारी करण्यासाठीं दक्षिणेंत पाठविलें. तो थेट एलिचपूरपर्यंत आला व नंतर पश्चिमेकडे वळून लवकरच देवगिरीस येऊन पोंहोंचला व त्यानें तेथील किल्ल्यास वेढा दिला. रामदेवरावाचा मुलगा शंकर हा त्यावेळीं मोठें सैन्य घेऊन दुसरीकडे गेला होता. अल्लाउद्दीनास किल्ला लवकर हातीं येण्याचें चिन्ह दिसेना. शंकर परत आल्यावर तर तो मिळण्याची मुळींच आशा नव्हती. तेव्हां रामदेवरावास अगोदरच घाबरा करण्यासाठीं अल्लाउद्दीनानें अशी कंडी पिकविली कीं, आपल्याबरोबर आलेलें सैन्य ही फक्त एका मोठ्या सैन्याची अघाडीची तुकडी आहे. ही बातमी ऐकून भिऊन जाऊन रामदेवरावानें तहाचें बोलणें सुरू केलें. इतक्यांत शंकर येत असल्याची खबर अल्लाउद्दीनास समजली. तेव्हां देवगिरीस फक्त १००० सैन्य ठेवून बाकी सैन्यानिशीं तो शंकरावर चालून गेला. त्या दोघांची प्रथमतः जी लढाई झाली तींत अल्लाउद्दीनाचा पराभव होऊन त्याचे लोक पळाले; तेव्हां देवगिरी येथें असलेलें त्याचें सैन्य त्याच्या मदतीला येऊं लागलें. हेंच दिल्लीहून येणारें अल्लाउद्दीनाचें मोठें लष्कर आहे, असें समजून शंकराच्या सैन्यानें पळ काढिला. अर्थातच अल्लाउद्दीनाची सरशी होऊन रामदेवरावास त्याच्याशीं तह करावा लागला. ह्या तहांत त्यानें अल्लाउद्दीनास एलिचपूर व त्याच्या भोंवतालचा मुलुख, सहाशें मण मोत्यें, दोन मण रत्नें, एक हजार मण रुपें, चार हजार रेशमी कापडाचीं ठाणें व इतर मौल्यवान जिन्नस देऊन दरसाल दिल्लीस खंडणी पोंचविण्याचें कबूल केलें. अशा रीतीनें ह्या स्वतंत्र हिंदु राष्ट्रावर मुसलमानांचा पगडा बसला.

पुढें कित्येक वर्षें रामदेवरावानें खंडणी पाठविली नाहीं; तेव्हां अल्लाउद्दीनानें आपला सेनापति मलिक काफूर यास त्याच्यावर पाठविलें. काफूरानें रामदेवरावास कैद करून दिल्लीस रवाना केलें. तेथें त्यास कांहीं दिवस कैदेंत ठेविल्यावर त्याची सुटका करून त्यास देवगिरीस

परत पाठविलें. तेव्हांपासून तो दिल्लीच्या बादशहाशीं निष्ठेनें वागूं लागला. रामदेवराव इ. स. १३०९ त मरण पावला, व त्याचा मुलगा शंकर हा गादीवर बसला. बापानें कबूल केलेली खंडणी तो पाठवीना, ह्मणून मलिक काफूर यानें त्याच्यावर स्वारी करून त्यास ठार मारिलें व आपण देवगिरीस राहून राज्य करूं लागला. पुढें शंकराच्या राज्यांतील मुलुखाचा एक एक भाग काबीज करतां करतां इ. स. १३१२ त त्यानें कोंकण प्रांत जिंकिला; परंतु त्याची राजधानी कोंकणापासून फार अंतरादर दौलताबादेस असल्यामुळें त्याचा अंमल बसावा तसा बसला नाहीं. यादव वंशाची गेलेली सत्ता पुनः मिळविण्यासाठीं रामदेवरावाचा जांवई हरपाळ ह्यानें बंड करून मुसलमानाच्या कांहीं अंमलदारांस हांकून लाविलें. हें बंड मोडण्यासाठीं अल्लाउद्दीनाचा मुलगा मुबारिक हा स्वतः दक्षिणेंत आला. त्यानें हरपाळ याला कैद केलें व क्रूरपणानें त्यास जिवंत सोललें. अशा रीतीनें यादववंशाचा शेवट झाला. (इ.स.-१३१८.)

दिल्लीचा जुलमी बादशहा महंमद तघलख याच्या अंमलास कंटाळून कांहीं सरदारांनीं स्वतंत्र राज्यें स्थापन केलीं. त्यांपैकीं बुकराज व त्याचा मुलगा हरिहर यांनीं इ. स. १३३६ त विजयानगरच्या बलाढ्य हिंदु राज्याची स्थापना केली. हे दोघेही काफूरानें इ. स. १३०९ त वरंगूळ हस्तगत केलें त्यावेळीं तेथून पळून गेले होते. त्यांचा मुख्य प्रधान माधवाचार्य नांवाचा प्रसिद्ध ब्राह्मण होता. त्यास त्यांनीं जयन्तीपूर (हल्लींचें बनवाशी) येथील अधिकारी नेमिलें होतें. त्यानें कोंकण प्रांताची राजधानी जी गोवें त्याला वेढा देऊन तेथील तुर्क लोकांस हांकून लाविलें व कोंकण सुभ्यावर आपला अंमल बसविला; आणि तेथील देवांच्या मूर्ति मुसलमानांनीं उपटून टाकिल्या होत्या त्यांची पुनः स्थापना केली. माधवाचार्य मरण पावल्यावर हरिहर राजानें त्याच्या जागीं नरहरि नांवाच्या अत्रिगोत्री ब्राह्मणाची नेमणूक केली. ह्यानें वैशाख वद्य ३० शके १३१३ (इ. स. १३९१) रोजीं सूर्यग्रहणाच्या वेळीं कोचरें येथील वृत्ति ब्राह्मणास अग्रहार करून दिल्याचा शिलालेख[1] त्या गांवीं

---

१ परिशिष्ट १ लें, लेख नंबर ४.

सांपडला आहे. कोचरें गांवाला त्यावेळीं माधवपूर असेंहि ह्मणत असत.

विजयानगरच्या राज्याचा विस्तार कृष्णा नदीपासून कन्याकुमारी टोंकापर्यंत होता. त्यांत त्यांना कारभार पाठविणारे 'नायक' ह्मणजे सुभेदार ह्मणवून घेणारे पुष्कळ लहान लहान राजे होते, त्यांस 'पाळेगार' असेंहि ह्मणत. जर्व्हिस याच्या मताप्रमाणें हे पाळेगार पुण्यांत चाकण व जुन्नर येथें; कुलाब्यांत रायगड येथें; कोल्हापुरांत पन्हाळा येथें; सावंतवाडींत कुडाळ येथें; आणि उत्तरकानड्यांत सौंदें येथें राहत असत. कुडाळ येथील पाळेगार हेच कुडाळदेशस्थ प्रभु असावे असें दिसतें. व ते विजयानगरचें राज्य स्थापन होण्याच्या पूर्वीं देवगिरी येथील यादव राजांचे मांडलिक असावे.

विजयानगरचें राज्य स्थापन झालें त्यानंतर अकरा वर्षांनीं ह्मणजे इ. सन १३४७ त त्याच्याच उत्तरेस ब्राह्मणी किंवा बहामनी या नांवाच्या मुसलमानी राज्याची स्थापना झाली. त्याचा स्थापक हसन कांगो या नांवाचा एक अफगाण होता. तो आपल्या वयाचीं पहिलीं तीस वर्षें होत तों दिल्लींतील गंगू नांवाच्या एका ब्राह्मणाच्या शेतांत काम करीत असे. एक दिवस हसनला जमिनींत पुरून ठेविलेलें कांहीं द्रव्य सांपडलें; तें त्यानें स्वतःच न घेतां आपल्या धन्यास दिलें. आपल्या चाकराचें हें इमान पाहून गंगू खूष झाला. त्याची व दिल्लीच्या बादशहाची चांगली ओळख होती. त्यानें त्यास राजाकडून शंभर स्वारांची सरदारी मिळवून दिली. महंमद तघलखानें जेव्हां देवगिरी अथवा दौलताबाद ही राजधानी करण्याचा प्रयत्न केला, तेव्हां इतर सैन्याबरोबर हसन हाही दखवनमध्यें गेला; व दुसऱ्या पुष्कळ अफगाण सरदारांप्रमाणें तोही तेथें एका लहानशा प्रदेशाचा सुभेदार होऊन राहिला. नंतर महंमद तघलखाच्या जुलमास त्रासून तो संधि साधून स्वतंत्र झाला. तो राजा झाल्यानंतर त्यानें आपला पूर्वींचा धनी गंगू यास आपला मुख्य प्रधान केलें; व स्वतःस 'सुलतान हसन कांगो ब्राह्मणी' अशी पदवी धारण केली. बहामनी हें ब्राह्मणी शब्दाचेंच रूपांतर आहे. त्याच्यानंतर जे दुसरे राजे त्या गादीवर बसले त्यांनींहि ब्राह्मणांस आपले प्रधान नेमिलें

व आपल्या हिंदु प्रजेस काहींसें चांगल्या रीतीनें वागविलें.


पंधराव्या शतकांत बाहमनी राजांनीं दक्षिण कोंकणचा मुलुख सर करण्यासाठीं तीन वेळ खटपट केली. इ. स. १४२९ त मलिक उत्तुज्जर यानें तो देश घेतला, आणि मराठ्यांनीं बाहमनी राजांचें स्वामित्व कबूल केलें; परंतु मलिक उत्तुज्जर यानें तेथील सत्तेला व्यवस्थित स्वरूप दिलें नाहीं. त्याचा परिणाम असा झाला कीं, पांच वर्षांतच रायगड व विशालगड येथील सरदारांनीं मुसलमानांची सत्ता मानण्याचें नाकबूल केलें. इ. सन १४३६ त दुसरी स्वारी झाली त्यावेळीं त्या सरदारांना वठणीस आणिलें; परंतु ह्या खेपेसहि तो प्रांत जिंकिला नाहीं, व थोड्याच वर्षांनीं तेथील सरदारांनीं खंडणी देण्याचें पुनः नाकारिलें. इ. सन १४५३ त मुसलमानांनीं हा देश पुरा जिंकण्याचा निश्चय केला. त्यांनीं जय्यत तयारी करून सह्याद्रीवरील किल्ले जिंकिले व शिरके नांवाच्या एका सरदाराच्या माहितीनें कोंकणांत प्रवेश केला. दोन दिवसपर्यंत त्यांनां चांगला रुंद रस्ता मिळाला. नंतर ते दरीखोऱ्यांत शिरले. तेथें सूर्यप्रकाशाचा मुळीं शिरकावसुद्धां होत. नसे तेथील वाटा "बायकांच्या कुरळ्या केंसापेक्षांहि वांकड्या तिकड्या होत्या व त्यांमधून सुटणें प्रीतीच्या सपाट्यांतून सुटण्यापेक्षांहि जास्त अशक्य होतें." तेथें सेनापतीला अतिसाराचा विकार झाला. सैन्याला छावणी करतां येईना व तंबूहि मारतां येईनात. लोकांचे फार हाल होऊं लागले व त्यांनां जागा मिळेल तेथें पडून राहावें लागलें. त्यांनां तेथें अशा विपन्नावस्थेंत ठेवून शिरके हा विशाळगडावर गेला व तेथून पुष्कळ सैन्य आणून मुसलमानांवर छापा घालून त्यानें त्यांचा पराभव केला. त्यांत त्यानें सेनापति, ५०० कुलीन सय्यद व २०००० लोक इतक्या सैन्यास ठार मारिलें. असा या स्वारीचा शेवट झाला. इ. सन १४६९ त महंमद गवान ह्यानें कोंकणावर स्वारी केली. त्यावेळीं विशाळगडचा राजा हा कोंकणच्या सर्व मराठ्यांत प्रमुख होता. त्यानें अलीकडे तीनशें गलबतांचें आरमार तयार करून मुसलमान व्यापाऱ्यांनां बराच त्रास दिला होता. महंमद गवानानें निरनिराळ्या ठिकाणांहून सैन्य जमवून, फंदफितुरी करून व लांच देऊन विशाळगड

किल्ल्याच्या आजूबाजूचा मुलुख काबीज केला; व विजयानगरच्या राजापासून गोव्याचा किल्ला व बेट हीं घेतलीं. अशा रीतीनें कोंकण हा ब्राह्मणी राज्याचा एक भाग झाला.

ब्राह्मणी राजांपैकीं शेवटचा राजा महमूद हा इ. सन १४८२ त गादीवर बसला. तो दुर्व्यसनी व आळशी होता; त्यामुळें राज्यांत अव्यवस्था होऊन जिकडे तिकडे बंडाळी माजली. प्रत्येक सुभेदार आपल्या ताब्यांत असलेला मुलुख बळकावून आपणास स्वतंत्र सुलतान ह्मणवूं लागला. त्यांत विजापूर येथील सुभेदार युसुफ हाही स्वतंत्र झाला; व इ. स. १४८९ त त्यानें आदिलशहा ह्मणजे न्यायी बादशहा असें पद धारण करून विजापूर येथें आपल्या गादीची स्थापना केली. इ. स. १५०० च्या सुमारास गोव्याच्या सुभेदारानें युसुफ आदिलशहाला आपला राजा ह्मणून कबूल केलें; आणि सावित्री किंवा बाणकोट नदीच्या दक्षिणेकडचा कोंकणाचा सर्व मुलुख युसुफाच्या हाताखालीं आला. अशा रीतीनें सावंतवाडीच्या मुलखावर विजापूरच्या सुलतानाचा अंमल सुरू झाला.

सावंत भोंसले यांचा मूळपुरुष याच काळीं किंवा त्याच्यापूर्वीं कांहीं वर्षें या प्रांतीं आला असें आढळून येतें. त्याचें नांव मांग सावंत असें होतें. तो उदेपूर येथील प्रसिद्ध शिंसोदिया[1] घराण्यापैकीं असून त्याचें उपनांव भोंसले असें होतें. मांग सावंत यानें या प्रांतीं आल्यावर कांहीं प्रांत मिळविला आणि होडावडें येथें आपलें राहण्याचें ठिकाण केलें. याच्या वंशांत पुढें भाम सावंत हा पराक्रमी पुरुष उत्पन्न झाला. त्यावेळीं या प्रांतीं विजयानगरच्या हिंदु राजांचा अंमल होता. भामसावंत यानें त्यांच्याविरुद्ध बंड केलें. तेव्हां त्याजवर बेळगांवाहून सैन्य येऊन त्याची व भामसावंत याची होडावडें येथें मोठी लढाई झाली. तींत

१ या घराण्याचे सूर्यवंशीय राजे पूर्वीं अयोध्या प्रांतांत राज्य करीत असत. त्यांपैकीं कोणी पुरुष नर्मदा नदीच्या दक्षिण तीरावर येऊन राहिला. पुढें तेथें शकांचा अंमल झाला, तेव्हां त्या घराण्यांतील एका पराक्रमी पुरुषानें या शिसोदिया घराण्यांतील राजास पराजित केलें; तेव्हां तो मेवाड प्रांतांत चितोड येथें आपली गादी स्थापून राहिला. याच प्रांतांत उदेपूर हें शहर आहे.



" मठगांवांतील शिलालेख."

The Bombay Art Printing Works, Fort.

भामसावंत याचा पराभव होऊन तो मारला गेला. याच भागांत याचा पूर्वज मांगसावंत याची छत्री बांधिलेली आहे; आणि त्याच कारणानें होडावड्याच्या या भागास 'मांगल्याचा मठ' असें नांव पडून तो स्वतंत्र गांव झाला असें सांगतात. भामसावंताचा मुलगा नऱ्यसीदेव दळवी यानें देऊळ बांधण्यासाठीं कांहीं पैसा देऊन पुढें पूजानैवेद्यासाठीं कांहीं जमीनही दिली होती असें त्यावेळच्या मठगांवांतील शिलालेखावरून दिसून येतें.

भाग ३ रा.

विजापूरचे आदिलशहा व त्याचे देशमुख.

विजापूरची गादी स्थापन करणारा युसुफ हा तुर्कस्थानचा राजा सुलतान मुराद याचा दुसरा मुलगा. तो लहान असतां त्याच्या जन्मग्रहांवरून तो मोठा राजा होईल असें दरबारच्या लोकांस वाटूं लागलें. ह्यावेळीं युसुफाचा थोरला भाऊ महंमद हा तुर्कस्थानच्या गादीवर होता. दरबारच्या लोकांनीं खोट्यानाट्या गोष्टी सांगून युसुफाविषयीं त्याचें मन कलुषित केलें व युसुफ मागेंपुढें आपल्यास पदभ्रष्ट करील अशीहि त्यास भीति घातली. महंमद याचें आपल्या धाकट्या भावावर पूर्वीं जरी अतोनात प्रेम होतें तरी ह्या गोष्टीनें भिऊन जाऊन त्यानें युसुफास मारण्याचा हुकूम केला. युसुफाचा त्याचवेळीं अंत व्हावयाचा परंतु त्याच्या आईनें मोठ्या युक्तीनें महंमदास त्याचा वध आपण करवितें असें सांगून त्यास आपल्या ताब्यांत घेतलें.

ह्यावेळीं आशिया व युरोप ह्या खंडांत गुलामांचा व्यापार चालत असे. ह्या गुलामांच्या व्यापाऱ्यांपैकीं अल्लाउद्दीन नांवाचा इराण देशांतील एक सौदागर त्यावेळीं कांस्टान्टिनोपल येथें व्यापारासाठीं गेला होता. युसुफाच्या आईनें त्यास बोलावून आणिलें व युसुफाविषयींची सर्व हकीगत सांगून व त्याचें चांगलें संरक्षण करीन असें त्याजकडून वचन घेऊन

---

१ परिशिष्ट १ लें, लेख नंबर ५.

युसुफास त्याच्या स्वाधीन केलें आणि बरोबर पुष्कळ द्रव्यही दिलें. नंतर तिनें त्या व्यापाऱ्यापासून युसुफाच्याच चेहऱ्याचा एक गुलाम विकत घेतला आणि त्याचा वध करवून त्याचें शीर महंमदास दाखवून त्याचें समाधान केलें. कांहीं दिवसांनीं अल्लाउद्दीन युसुफासह आपल्या सावें गांवीं येऊन पोहोंचला. अल्लाउद्दीनास मूलबाळ कांहीं नव्हतें. त्यानें युसुफाचा आपल्या पोटच्या मुलाप्रमाणें सांभाळ केला. कितीएक दिवस लोटल्यावर युसुफास असें स्वप्न पडलें कीं, तूं हिंदुस्थानांत जा ह्मणजे तेथें राजपद पावशील. युसुफानें हें स्वप्न आपल्या पालनकर्त्यास सांगितलें. तें ऐकून अल्लाउद्दीनासहि मोठा आनंद झाला. तो लवकरच कांहीं माल एका गलबतांत भरून युसुफास बरोबर घेऊन हिंदुस्थानांत येण्यासाठीं निघाला व पश्चिम किनाऱ्यावर दाभोळ नांवाच्या बंदरांत उतरला.

ह्यावेळीं दाभोळ हें बंदर ब्राह्मणी राजांच्या ताब्यांत असून त्यांचा खाजे जवान नांवाचा सुभेदार तेथें राहत असे. अल्लाउद्दीनानें युसुफास त्याचेजवळ नेलें. युसुफ हा फार रूपसंपन्न व गुणवान् होता. त्यास पाहून सुभेदारास असें वाटलें कीं, याला आपल्या राजाकडे पाठविल्यास त्याचें चांगलें चीज होईल; ह्मणून त्यानें त्यास त्यावेळचा ब्राह्मणी राजा महंमदशहा याजकडे पाठविलें. राजानें त्यास चोपदारीची जागा देऊन आपल्याजवळ ठेविलें. पुढें एका प्रसंगीं युसुफानें कुस्ती खेळण्यांत महंमदशहाच्या पदरच्या मोठमोठ्या पहिलवानांस चीत केलें. हें पाहून महंमदशहा खूष झाला व त्यानें त्यास त्याच वेळीं सरदारीचीं वस्त्रें व पांच गांवची जहागीर दिली. याच जागेवरून वाढत वाढत तो पुढें विजापूरचा सुभेदार झाला; व शेवटीं त्यानें मागील भागांत सांगितल्याप्रमाणें तेथेंच स्वतंत्र राज्याची स्थापना केली.

विजापूर हें प्राचीनकाळापासून नामांकित सुंदर शहर होतेंच; पण युसुफानें तें आपली राजधानी करून फार सुशोभित केलें. त्यानें आपल्या राज्याची मर्यादा बरीच वाढविली, व दरबारांत शिया पंथाची स्थापना केली. हिंदूंवर व विशेषतः मराठ्यांवर त्याची मेहरनजर असे. दरबारचें काम तो फार नियमितपणानें करी; त्याची धर्मासंबंधीं सम-

दृष्टि तर तारीफ करण्याजोगी होती. त्याचेवेळीं सर्व दप्तर मराठी भाषेंत होतें.

युसुफानें राज्यव्यवस्थेंतहि पुष्कळ सुधारणा केली. जमाबंदीची शिस्त लाविली. रत्नागिरी जिल्ह्यांत कांहीं गांवांत सध्या चालू असलेली खोती पद्धती यानेंच सुरू केली. ह्या पद्धतींत प्रत्येक गांवचा धारा एकवट ठरलेला असे. तो देण्याची जबाबदारी कोणीतरी एक मनुष्य पतकरीत असे; त्यास खोत असें ह्मणत. हा खोत पोटीं कुळें लावून जमिनीची लागवड करीत असे; आणि त्यांजकडून कांहीं नियमित खंड किंवा आकारानें होईल तें उत्पन्न घेत असे. हें उत्पन्न किंवा खंड ठरलेल्या धान्यापेक्षां ज्यास्त असल्यामुळें त्यांत खोताचा फायदा होत असे. हे खोतीचे हक्क वंशपरंपरेनें चालत असत. सावंतवाडी संस्थानांतही अशा शिस्तीनें चालणारे कांहीं गांव होते; परंतु संस्थानांत पैमाष जमाबंदी झाल्यानंतर ती शिस्त मोडलेली आहे.

याच सुमारास इ. सन १४९७ त पोर्तुगीज लोक यूरोपखंडांतून व्यापाराच्या निमित्तानें हिंदुस्थानांत आले. त्यावेळीं त्यांचा पुढारी वास्को दि गामा हा होता. त्यास हिंदुस्थानांत येण्यास ११ महिने लागले. तो प्रथम कलिकत बंदरांत उतरला. व तेथील झामोरीन राजाची भेट घेऊन त्याची तेथें व्यापार करण्यास त्यानें परवानगी मिळविली. पुढें पोर्तुगीज लोकांनीं कांहीं कुरापती काढून झामोरीन व इतर एतद्देशीय राजांबरोबर भांडण्यास सुरुवात केली; आणि हळूहळू मलबार किनाऱ्यावरील तीन चार बंदरें काबीज केलीं.

सुलतान युसुफ इ. सन १५१० त मरण पावला; व त्याचा मुलगा सुलतान इस्मायल हा गादीवर बसला. तो अज्ञान होता त्यामुळें राज्यकारभारांत तंटे उपस्थित होऊन जिकडे तिकडे गोंधळ माजला; आणि राज्याच्या संरक्षणाचा बंदोबस्त अगदीं ढिला पडला. त्यावेळचा पोर्तुगीज गव्हर्नर आल्फान्सो आलबुकर्क यानें ती संधी साधून गोव्यावर हल्ला करून तें घेतलें. नंतर उत्तरेस बांदें शहरावर सैन्य पाठवून तेथील मुसलमान लोकांस हांकून लाविलें. आलबुकर्क यानें त्यावेळच्या एका पत्रांत ह्मटलें आहे:—"मी डायोगो फर्नान्डेझ याजबरोबर

गलबतें, पडाव व तीनशें माणसें देऊन गोव्याच्या उत्तरेस १९ मैलांवर बांदें येथें पाठविलें. तेथें मुसलमान लोक अद्याप प्रबल होते. तेथून त्यांनां कुडाळच्या बाजूस पळवून लाविलें."

नंतर आल्बुकर्कनें विजापुरास तह करण्यासाठीं एक पत्र पाठविलें. परंतु त्याचें कांहीं उत्तर आलें नाहीं. पुढें लवकरच त्यास अशी बातमी लागली कीं, विजापूरचा सरदार मलिक आय हा मोठें सैन्य घेऊन गोव्यावर हल्ला करण्यासाठीं बांदें व कुडाळ या बाजूस आलेला आहे. आलबुकर्कनें कांहीं गलबतें देऊन डायोगो फर्नान्डेझ याला मलिक आयास अडविण्यासाठीं बांद्याच्या नदींत पाठविलें. तेथें डायोगो फर्नान्डेझ यानें मलिक आय याचा पराभव केला. तेव्हां मलिक आय तेथून निघून दिंवाड[1] येथें गेला. तेथून एकदम गोव्यावर हल्ला करावा असा त्याचा बेत होता. पण तेथें सुद्धां त्यास यश आलें नाहीं. नंतर तो डिचोलीस जाऊन तेथें खंदक ह्मणून छावणी करून राहिला. त्याठिकाणीं आलबुकर्क स्वतः त्याच्या मागून गेला. तेव्हां मालिक आय यानें आलबुकर्क याजकडे तह करण्यासाठीं वकील पाठविला. परंतु विजापूरच्या सुलतानानें त्याला तह करण्याचा अधिकार दिला नव्हता, असें आलबुकर्क यास समजलें. ह्मणून त्यानें मलिक आय याचें तहाचें बोलणें ऐकिलें नाहीं.

सुलतान इस्मायल आदिलशहा हा इ. सन १५३४ त मरण पावला; त्यास दोन मुलगे होते-एक मल्लू व दुसरा इब्राहीम. पैकीं मल्लू हा वडील असल्यामुळें तोच बापाचे मागून गादीवर बसला. परंतु पुढें लवकरच याच्या आंगच्या ज्ञानावरून यास पुढें राज्य चालवितां येणार नाहीं, असें कारभारी लोकांस वाटल्यावरून त्यांनीं मल्लू यास पदभ्रष्ट करून त्याचा धाकटा भाऊ इब्राहीम यास गादीवर बसविलें.

मल्लूला पदभ्रष्ट केल्यावर तो पोर्तुगीज लोकांच्या आश्रयास जाऊन राहिला. इ. सन १५४५ त त्याचा वजीर आसदखान यानें त्याच्या तर्फें बंड उभारिलें व इब्राहीम आदिलशहास पदच्युत करण्याचे कामीं

---

१ हें बेट गोवें बेटाच्या उत्तरेस आहे.

पोर्तुगीज लोकांनीं मदत करावी ह्मणून त्याच्या गव्हर्नरास नजराणे देऊन त्याचें मन वळविलें. तेव्हां आदिलशहास फार राग आला; परंतु पोर्तुगीज लोकांशीं विरोध न करितां त्यांना मोठमोठ्या देणग्या देऊन गव्हर्नरास आपल्या बाजूस वळवून घेण्याचा तो प्रयत्न करूं लागला. या कामीं गव्हर्नरास खरा पक्ष कोणता व खोटा कोणता याचा विचार करावयाचा नव्हता. त्याला कोणत्या पक्षाला मदत केली असतां आपल्या देशाचा जास्त फायदा होईल हेंच पहावयाचें होतें. त्याला मल्लूचाच पक्ष जास्त फायदेशीर वाटला. आसदखानानें त्याला दहा लक्षांपेक्षांही जास्त वसुलाचें कोंकणचें राज्य देण्याचें कबूल केलें व गव्हर्नरानेंहि मल्लूला मदत करण्याची तयारी केली. परंतु इब्राहीम आदिलशहा मोठा धूर्त व मसलती असल्यामुळें त्यानें लागलेंच शिकंदरखान नांवाच्या आपल्या सरदारास पुष्कळ सैन्यानिशीं त्याजवर पाठविलें, व जाहिरखान नांवाच्या दुसऱ्या एका मुत्सद्यास पोर्तुगालच्या राजाकडे आपला मुखत्यार ह्मणून बोलणें करण्यास पाठविलें. जाहिदरखान यानें तावडतोब गोवें येथील गव्हर्नरास त्याच्या राजाकडून 'तुह्मांला अशा भानगडींत पडण्याचें कारण नाहीं,' असें खरमरीत पत्र आणून लाविलें. तेव्हां गव्हर्नर आल्फान्सो डिसोझा यानें आपला बेत बदलून मल्लूस कैद केलें. आसदखान लवकरच मरण पावला. त्यानें उभारलेल्या बंडाचा पुरा मोड करण्यासाठीं आदिलशहा जातीनें मोठ्या सैन्यानिशीं घाट उतरून कोंकणांत आला व त्यानें कोंकणचें राज्य पुनः सर केलें. नंतर पोर्तुगीज लोकांबरोबर मैत्री राखण्यासाठीं आदिलशहानें त्यांस साष्टी व बारदेश हे प्रांत दिले, व त्यांनीं मल्लूस आपल्या स्वाधीन करावें अशी अट घातली. परंतु आपल्या आश्रयास आलेल्या मनुष्याचा असा विश्वासघात करणें हें बरें न वाटून गव्हरनरानें आदिलशहास त्रास न होईल अशा ठिकाणीं मल्लूला पाठविण्याचें कबूल केलें; व साष्टी व बारदेस हें प्रांत हातीं येतांच त्यास मलबार किनाऱ्यावर काननूर येथें पाठवून दिलें. आदिलशहानें साष्टी व बारदेश या प्रांतांबरोबरच आसदखानाचाही सर्व पैसा गव्हरनरास दिला. गव्हरनरानें लव-

करच काननुराहून मल्लूस परत आणिलें. आदिलशहानें आपण फसलों असें पाहून गव्हरनरास आपलें वचन पुरें कर अशी निकट लाविली. परंतु गव्हरनरानें तें करावयाचें सोडून त्या विषयावर बोलणें करण्यासाठीं आदिलशहाकडे वकील पाठविला. आदिलशहानें वकील व त्याच्या बरोबरचे सर्व लोक यांस कैद करून तह पुरा होईपर्यंत त्यांस ओलीस ठेविलें. तेव्हां आल्फान्सोनें अट कबूल करून उन्हाळा सुरू झाल्यावर मल्लूला मलाक्कास पाठविण्याचें वचन दिलें. परंतु आल्फान्सो लवकरच बदलून गेला; व त्याच्या मागून जो गव्हर्नर आला त्याचें व आदिलशहाचें कांहीं कारणावरून भांडण झालें त्यानें लढाईची तयारी केली. परंतु आदिलशहानें त्याच्याशीं तह केला. त्यांत आदिलशहानें साष्टी व बारदेश प्रांत पोर्तुगीज लोकांस कायमचे देईन व त्यांच्या बरोबर कधीं लढाई करणार नाहीं असें वचन दिलें; आणि पोर्तुगीजांच्या तर्फे त्यांच्या वकिलानें मल्लू व त्याचें कुटुंब यांस कैदेंत ठेवण्याचें, पोर्तुगालहून पत्र येईपर्यंत विजापुराशिवाय इतर राज्याशीं पत्रव्यवहार न करण्याचें, व आजपर्यंत झालेले व्यापारासंबंधीं करार पाळण्याचें कबूल केलें; परंतु पुढें पोर्तुगीज गव्हर्नरानें हा करार पाळला नाहीं. तेव्हां आदिलशहा साष्टी व बारदेश हे प्रांत सोडीना. त्यामुळें त्या दोघांत लढाई सुरू झाली. तींत पहिल्यानें आदिलशहास जय मिळाला. परंतु पुढें पोर्तुगीजाच्या सैन्यानें त्याचा पूर्ण पराभव केला.

इसवी सन १५५५ त मल्लूनें विजापूरचा राजा होण्यासाठीं पोर्तुगीज लोकांकडे मदतीची पुनः मागणी केली. ती त्यांनीं कबूल केली. मल्लूच्या पक्षाचे कांहीं लोक विजापूरच्या राज्यांत होते. त्यांच्या सहाय्यानें लवकरच तो आपणास राजा ह्मणवूं लागला; आणि त्यानें पोर्तुगीज लोकांस कोंकण प्रांत दिला. तेव्हां व्हाइसरायानें फोंड्याच्या व आचऱ्याच्या आसपासचा वसूल घेण्यासाठीं अंमलदार नेमिले. आचऱ्याजवळ विजापूरतर्फेच्या सैन्यानें पोर्तुगीज सैन्यावर हल्ला केला. परंतु त्यांत पोर्तुगीजांनांच यश मिळालें. नंतर आदिलशहानें विजयानगरच्या राजापासून १६००० लोकांची मदत घेऊन मल्लूस पदच्युत करून कैदेंत टाकिलें; व पोर्तुगीज

लोकांकडील मुलूख पुनः सर करण्यासाठीं सैन्य पाठविलें. परंतु झालेली सर्व हकीकत समजतांच गोव्याच्या व्हाइसरायानें आपण होऊनच फोंडें व आचरें येथें पाठविलेल्या अमंलदारांस परत बोलाविलें.

इसवी सन १५५६ त पोर्तुगीजांनीं आदिलशहाच्या दाभोळ नांवाच्या बंदराचा नाश केला. तेव्हां आदिलशहाचा सेनापति नझीर उल्मुल्क यानें साष्टी व बारदेश प्रांतावर स्वारी केली. गव्हर्नरानें त्याच्या सैन्याला फोंडा येथें गांठून त्याचा पराभव केला. नझीर उल्मुल्क यानें परत फोंडा येथेंच खंदक खणून छावणी केली. परंतु तितक्यांत पोर्तुगालाहून पांच गलबतें आलीं. तेव्हां नझीर उल्मुल्काला तहाचें बोलणें लावणें भाग पडलें व त्यानें पूर्वींची मैत्री कायम केली.

वर सांगितल्याप्रमाणें आदिलशहा व पोर्तुगीज यांच्या ज्या लढाया झाल्या, त्यांत मांगसावंताचे वंशज सावंत भोंसले यांनीं विजापूर सरकारास चांगली मदत केली. ह्मणून आदिलशहानें खूष होऊन त्यांस सावंत बहादर असा किताब दिला.

इब्राहीम आदिलशहा इ. सन १५५७ त मरण पावला. त्याच्या मागून त्याचा वडील मुलगा अल्ली हा गादीवर बसला. त्याला पोर्तुगीज लोकांच्या राज्याची होत असलेली वाढ पाहून बरें वाटेना. ह्मणून त्यानें इसवी सन १५७० त निजामशहाची मदत घेऊन त्यांचा नाश करण्याचा बेत केला. प्रथमतः त्यानें गोव्याला वेढा दिला व सेनापति नोरीखान यास फोंडा येथें छावणी करून राहण्यासाठीं पाठविलें. ही केवळ अघाडीची तुकडी होती. मागाहून आणखी बरेंच सैन्य आलें. तें निरनिराळ्या ठिकाणीं ठेऊन आदिलशहा आपण स्वतः फोंडा येथें ४००० घोडेस्वार, ६०० पायदळ, ३०० हत्तीं व २२० तोफा इतक्या सैन्यानिशीं राहिला. पोर्तुगीज लोकांनीं त्याच्या दाभोळ शहराचा नाश केला. लवकरच आदिलशहाचा सरदार अंकुशखान यानें पोर्तुगीजांवर जय मिळविला. नंतर आदिलशहानें आपल्या सर्व सैन्यानिशीं गोव्यास वेढा दिला. वेढ्यामुळें आंतील इमारतीचा बराच नाश झाला व बाहेर आदिलशहाचे बरेच लोक पडले. वेढा देऊन सुमारें दोन महिने झाल्यावर अंटोनिओ काब्राल हा कोलवाळच्या खाडींतून बर चार गल-

बतें घेऊन गेला, व पेडणें महालांत सुमारें '१० लोक उतरून त्यानें चार गांव आणि ५० गलबतें जाळलीं; व लूटही पुष्कळ मिळविली. आदिलशहानें आपला बराच तोटा झाला हें पाहून तहाचें बोलणें लाविलें. परंतु वेढा चालूच होता. शेवटीं कंटाळून आदिलशहानें नऊ हजार लोक घेऊन गोव्यावर हल्ला केला. त्यांत त्याचा पराभव झाला. त्याचा मेहुणा सुलेमान आगा हा हल्ल्यांत पडला व त्याचे कांहीं बावटे शत्रूस मिळाले. शेवटीं आदिलशहानें सन १५७१ च्या आगष्ट महिन्यांत वेढा उठविला व त्याच वर्षाच्या डिसेंबर महिन्यांत तह झाला. ही लढाई चालली असतां पोर्तुगीज लोकांनीं आदिलशहाचें अदिलाबाद बंदर जाळून याचा समूळ नाश केला. हें अदिलाबाद बंदर ह्मणजे सध्याचें बांदें शहर होय.

या विजापूरच्या राज्यांत वसुलाच्या सोईसाठीं सुभे व सुभ्याच्या पोटीं परगणे असे विभाग केलेले होते हें पूर्वीच सांगितलें आहे. प्रत्येक परगण्यावर देसाई किंवा देशमुख या नांवाचे अधिकारी असत ते आपापल्या परगण्याचा वसूल करून कांहीं ठरींव रकम विजापूरच्या सुलतानास देत असत. कुडाळ परगण्यांत कुडाळदेशस्थ प्रभु हे देशमुख होते.

---

१ "गोमा गणेश पितळी दरवाजा" अशा नांवाची एक जुनी आख्यायिका प्रसिद्ध आहे. ती याच घराण्यांतील एका पुरुषाविषयीं आहे असें ह्मणतात. व या कुळांत नांवाची जी परंपरा दिसून येते त्यावरून त्या ह्मणण्यास बळकटी येते. ती गोष्ट अशी:- गोमा गणेश नांवाचा या कुळांतील एक पुरुष कांहीं रोजगारासाठीं वरघांटीं विजापुरास गेला होता. त्यानें दरबारांत आपला प्रवेश व्हावा ह्मणून पुष्कळ खटपट करून पाहिली; परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. तेव्हां त्यानें पुढील युक्ति योजिली. त्यानें गांवाच्या वेशीवर एक लहानसें दुकान भाड्यानें घेऊन तेथें पेढी घातली आणि 'गोमा गणेश पितळी दरवाजा' अशा नांवाचा एक शिक्का पाडून, दरबारांतून सनदा घेऊन जे लोक जात, त्यांजपासून कांहीं द्रव्य घेऊन सनदेवर तो शिक्का मारून देण्याचा क्रम ठेविला. अशा रीतीनें त्यानें बरेंच द्रव्य मिळविलें. पुष्कळ दिवसपर्यंत या त्याच्या क्रमाकडे कोणी लक्ष दिलें नाहीं. पुढें एके दिवशीं एका सनदेवर विजापूरच्या दरबारांत कधींच चालू नसलेला असा हा शिक्का दरबारांतील कांहीं मंडळीच्या नजरेस पडला. पुढें ती गोष्ट बादशहाच्याही कानावर गेली. हा प्रकार काय आहे हें पाहण्यासाठीं त्यानें तपास केला तेव्हां त्यास गोमा गणेश याच्या पेढीची हकीकत समजली. मग त्यानें गोमा गणेश यास बोलावून आणिलें. व असें करण्याचें कारण विचारिलें. गोमा यानें नम्रपणानें बादशहास विनंति करून घडलेली सर्व हकीकत निवेदन केली. तेव्हां त्याच्या चातुर्याविषयीं बादशहास मोठें नवल वाटून त्यानें त्यास आपल्या पदरीं ठेवून घेतलें व मोठ्या योग्यतेस चढविलें.

या प्रभुघराण्याची सोळाव्या शतकापासून थोडथोडी माहिती मिळते त्यांची जी वंशावळ सध्या उपलब्ध आहे ती अशी:—

- मूळपुरुष (नांव समजत नाहीं)
  - १ (नांव समजत नाहीं)
    - ३ गोमप्रभु
      - ७ भानजी
    - ४ बायेप्रभु
      - ६ रामजी
        - दादबा
        - कानबा
      - ८ गोमजी
        - ९ गणेश
          - ११ गोमजी
          - बाबाजी
        - १० बाबाजी
          - १२ कानेप्रभु
          - १३ भानजी
          - १४ दादाजी
            - १५ नारायणप्रभु
              - बाबाजी
              - दादाजी
              - गोपाळ
              - जोगणप्रभु
    - ५ गणेशप्रभु
      - जोगणप्रभु (दत्तक घेतला)
        - कृष्णप्रभु
          - नारायणप्रभु
            - जोगणप्रभु (कुडाळच्या कोटांत मारला गेला इ. स. १६९७)
  - २ रामप्रभु
    - जोगणप्रभु (दत्तक दिला

सोळाव्या शतकाच्या आरंभाच्या सुमारास गोम प्रभूचा बाप व त्याचा भाऊ रामप्रभु यानें कांहीं वर्षें देशमुखी केली असावी. पुढें सोळाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास गोमप्रभु हा देशमुखीचें काम पाहूं लागला. त्यानें तें काम बरींच वर्षें केलें. त्याला भानजी नांवाचा एकच मुलगा होता. गोमप्रभु याच्या मागून त्याचा भाऊ बायेप्रभु हा गादीवर बसला. त्यानेंही बरींच वर्षें देशमुखीचें काम केलें. त्याला रामजी व गोमजी असे दोन मुलगे होते. आपल्या मागून गादी विषयीं तंटे उत्पन्न होऊं नयेत ह्मणून त्यानें अशी व्यवस्था करून ठेविली होती कीं, आपल्या पश्चात् आपला भाऊ गणेश यानें गादीवर बसावें; गणेशाच्या मागून गोम प्रभूचा मुलगा भानजी यानें देशमुखी करावी; आणि नंतर तो हक्क आपल्या मुलांस प्राप्त व्हावा. त्याप्रमाणें बायेप्रभु मरण

पावल्यावर गणेश हा गादीवर बसला; परंतु त्यास कांहीं दिवस लोटले नाहींत तोंच, बायेप्रभूचा मुलगा रामजी यानें बंड करून गणेश व भानजी या दोघांसही पळवून लाविलें; व आपण गादीवर बसला. भानजी हा मोठा कावेबाज होता. थोड्या दिवसांनीं तो रामजीकडे परत आला. व त्याच्याशीं गोडीगुलाबीनें वागूं लागला. पुढें रामजी हा रेडीगांवीं कांहीं कामासाठीं गेला होता; त्यास भेटण्यासाठीं ह्मणून भानजी तेथें गेला; व त्यास तेथेंच ठार मारून आपण कुडाळास येऊन गादीवर बसला (इ. सन १५७३). त्यानें इ. सन १५८४ पर्यंत अकरा वर्षे देशमुखीचें काम केलें. त्याच्या बायकोनें तळवणें गांवांत इसवी सन १५७५ त एक ल्हानसा तलाव बांधिला.

रामजी यास दादबा व कानबा असे दोन मुलगे व गोमजी नांवाचा एक भाऊ होता. या तिघांच्याही मनांत भानजीनें केलेल्या दुष्कृत्या-बद्दल त्याचा सूड घ्यावा असें होतें. परंतु बरेच दिवसपर्यंत त्यांस संधी मिळाली नाहीं. मांजारडेकर हर सावंत व रवळ सावंत देसाई हे त्यांस सामील झाले; व आणखीहि कित्येक मंडळी त्यांस मिळाली. पुढें एके दिवशीं भानजी प्रभु कांहीं कामासाठीं मसुऱ्यास गेला आहे अशीं संधी पाहून हे असामीहि मसुऱ्यास गेले. त्यानीं तेथील नायक गणेश यास वश करून घेतलें; आणि भानजी हा एका मंडपामध्यें कांहीं मंडळीसह राजकीय कामामध्यें गुंतला असतां, गणेश नायकाकडून बंदुकीची गोळी घालवून ठार करविला. नंतर सर्व मंडळी कुडाळास आली, व त्यांनीं गोमजीस गादीवर बसविलें. (इसवी सन १५८४)

या कुडाळदेशस्थ प्रभूंकडे दळवी या आडनांवाचे सेनापति होते. हे दळवी मूळचे जोधपूर येथें राहणारे असून कुडाळ देशस्थ प्रभूंची सत्ता या प्रांतांत सुरू झाली तेव्हां प्रभूंनीं त्यांस आपले सेनापति केलें. भानजी देशमुखीचें काम करीत असतां देव दळवी हा त्याचा सेनापति होता. मागें सांगितलेले सावंत भोंसले हे होडावडें येथें राहत असत. प्रभु देसा-यांत आपसांत तंटे उत्पन्न झाले ही संधी आपला लाग साधण्यास बरी आहे असें देव दळवी यास वाटलें. सावंत कुळांत यावेळीं मांग सावंत

हा पराक्रमी पुरुष निपजला होता. त्यास हातीं धरून मराठ्यांची सत्ता स्थापन करावी अशा हेतूनें देव दळवी यानें बंड केलें; तेव्हां देसायांनीं विजापूरच्या बादशहाकडे मदत मागितली. बादशहानें मदत देण्याचें कबूल करून सावंतांवर कांहीं सैन्य पाठविलें. त्याची व सावंत आणि दळवी यांची लढाई होऊन तींत मांगसावंत व देव दळवी हे दोघेही ठार झाले (इसवी सन १५८०). विजापूरकरांनीं भोंसल्याचा मुलुख घेऊन तो प्रभु देसायांस दिला. मांगसावंत यास सात बायका होत्या. त्यांपैकीं सहा बायका त्याच्या बरोबर सती गेल्या व एक बायको त्या-वेळीं गरोदर होती ती ओटवणें गांवीं तिचे कोणी आप्त होते तेथें जाऊन राहिली. मांगसावंत यास यावेळीं कांहीं संतान नव्हतें, यामुळें थोडीं वर्षेपर्यंत सावंत भोंसले हे नामशेष झाले.

इसवी सन १५९७ च्या सुमारास देसायांचा सेनापति नाग दळवी होडावडेकर यानें देसायांच्या विरुद्ध बंड करून प्रांतांत जिकडे तिकडे धुमाळी माजविली. गोमजी प्रभूनें त्यास पकडून कैदेंत ठेविलें. तो आठ वर्षेपर्यंत कैदेंत होता. नंतर कांहीं युक्तीनें कैदेंतून सुटका करून घेऊन तो गोवें अमलांत बारदेश प्रांतीं पळून गेला. त्यास शासन करण्या-साठीं गोमजीनें आपले पुतणे दादबा व कानबा यांस पाठविलें; परंतु त्यांस यश न येतां ते दोघेही मारले गेले. नंतर नाग दळवी यांस थारविण्यासाठीं सालीना साडेचारशें होनांची नेमणूक करून दिली; तथापि त्याची समाधानी न होतां त्याचा उपद्रव चालू होताच. त्याचा पूर्ण नाश करण्यासाठीं देसायांनीं विजापूरचे बादशहाकडे मदत मागि-तली. बादशहानें मीर मुरादखान नामक सरदाराबरोबर कांहीं फौज देऊन त्यास देसायांच्या मदतीस पाठविलें. त्यानें सांतर्डें येथें नाग दळवी व त्याचा मुलगा भाम दळवी या दोघांस गांठून ठार मारिलें व बंडाचा मोड केला. नाग दळव्याच्या बायका उसगांव येथें सती गेल्या. ही


१ पूर्वीं सती जाण्याच्या तीन चाली होत्या:—पहिली प्रेताबरोबर सहगमन करण्याची; दुसरी, पती निधन पावल्यावर त्याचें कांहीं चिन्ह बरोबर घेऊन सहगमन करण्याची; तिसरी, पती मरण पावल्यानंतर सगळीं सौभाग्यचिन्हें धारण करून कांहीं काळपर्यंत

गोष्ट इ. सन १६०५ त घडली.

विजापूरचा सुलतान अली आदिलशहा हा इ. सन १५८० त मरण पावला, व त्याचा वडील मुलगा इब्राहीम हा गादीवर बसला. त्यास 'जगद्गुरु'[1] असें ह्मणत असत. हा बादशहा विद्वानांचा चाहता होता. त्याच्यावेळीं देशांत जिकडे तिकडे शांतता होती. त्यानें पुष्कळ सुंदर इमारती बांधिल्या; व राज्यव्यवस्थेंत पुष्कळ सुधारणा केली. इसवी सन १६०६ त त्यानें गांवच्या कामाची शिस्त लावण्यासाठीं गोपाळ परशुराम व रामचंद्र पंत या दोघांस कुडाळ प्रांतीं पाठविलें व जमाबंदीची तपासणी करून व्यवस्था लाविली. गांवचें लिहिणें वगैरे करण्यासाठीं कायमचे वतनदार कुळकर्णी नेमिले. याप्रमाणें याच्या कारकीर्दींत अनेक प्रकारच्या सुधारणा झाल्या. हा बादशहा इ. सन १६२६ या वर्षीं मरण पावला.

गांवोगांव मिरवून शेवटीं अग्नींत उडी टाकण्याची. पहिली चाल विशेषेंकरून ब्राह्मणज्ञातींत होती. तिसऱ्या चालीची पद्धत बांदें व इतर कांहीं गांवांत शिमग्याच्या सणाच्या अखेरीस सतीची जी मिरवणूक काढतात तींत अद्यापिही दिसून येते. ही चाल बहुधा खालच्या जातींत चालू होती असें ह्मणतात.

१ यास 'जगद्गुरु' ह्मणण्याचें कारण मुसलमान इतिहासकारांनीं पुढें लिहिल्याप्रमाणें दिलें आहे:—हा इब्राहीम गायनकलेंत फार निपुण होता. एके दिवशीं तो आपल्या मंदिरांत सुस्वर गायन करीत असतां त्याच्या मंदिरावरून अंतरीक्षमार्गानें कोणीएक तपस्व्याचा शिष्य जात असतां तो गायनास लुब्ध होऊन तें ऐकण्यासाठीं खालीं माडीवर उतरला. तेथें गायन ऐकत असतां त्यास निद्रा लागली. गायन आटोपल्यावर बादशहा बाहेर आला व त्यानें त्यास पाहिलें. त्याच्या जवळच गुटिका पडलेली होती. हा मनुष्य कोण याचा शोध लावण्यासाठीं बादशहानें ती गुटिका आपल्याजवळ ठेविली. कांहीं वेळानें तो मनुष्य जागा झाल्यावर जवळ गुटिका नाहीं असें पाहून रडूं लागला. तेव्हां पहारेकऱ्यांनीं त्यास बादशहाकडे नेलें. बादशहानें त्यास रडण्याचें कारण विचारिलें. तो ह्मणाला मी काशीक्षेत्रस्थ एका तपस्व्याचा शिष्य असून गुरूनें दिलेली गुटिका तोंडांत घेऊन रोज रात्रीच्यावेळीं अंतरीक्षमार्गानें रामेश्वरास जाऊन तेथील पाणी गुरुजींस स्नानाकरितां काशीस नेतों. त्याप्रमाणें आज या मार्गानें जात असतां येथें चाललेल्या गायनास भुलून खालीं उतरलों, इत्यादि झालेली हकीकत मोठ्या नम्रतेनें सांगितली. तेव्हां राजास दया येऊन त्यानें ती गुटिका परत दिली. पुढें तो शिष्य काशीस गेल्यावर त्यानें झालेली सर्व हकीकत आपल्या गुरुजींस निवेदन



" इ०. स० १६०४ तलि मोडी लिपी."

The Bombay Art Printing Works, Fort

वर सांगितल्याप्रमाणें गांवच्या कामाची व्यवस्था लाविली, त्यावेळीं गोमजी प्रभु हा देशमुखीचें काम पहात असे. यानंतर थोड्याच दिवसांनीं तो मरण पावला; व त्याचा वडील मुलगा गणेश हा देशमुखीचें काम पाहूं लागला. त्याच्या कारकीर्दींत कांहीं विशेष गोष्ट घडून आली नाहीं. तो मरण पावल्यावर त्याचा धाकटा भाऊ बाबाजी हा गादीवर बसला.

हा गादीवर बसला त्याच सुमारास पुनः सावंतकुळांत पराक्रमी पुरुष उत्पन्न झाले; ते ओटवणें गांवीं राहत असत. मांगसावंत याची जी एक गरोदर बायको ओटवणें गांवीं जाऊन राहिली होती तिला, पुढें जो मुलगा झाला त्याचें नांव फोंड सावंत; या फोंड सावंतापासून खेमसावंत ओटवणेकर हे जन्मले. लहानपणीं त्यांची स्थिति फार गरिबीची होती. त्यावेळची त्यांच्यासंबंधीं एक आख्यायिका सांगतात ती अशीः—ओटवणें येथें त्यावेळीं वरदे उपनांवाचे शेणवी गृहस्थ कुळकर्णी होते. खेमसावंत हे त्यांच्या घरीं गुरें राखण्यासाठीं राहिले होते. एके दिवशीं दुपारच्यावेळीं ते गुरांस गोठणीवर बसवून आपण एका झाडाखालीं विश्रांति घेण्यासाठीं पडले. तेथेंच त्यांस झोंप लागली. इतक्यांत जवळच्या बिळांतून एक मोठा सर्प बाहेर येऊन त्यानें त्यांच्यावर आपली फणा पसरून धरिली. खेमसावंताच्या धन्यानें त्याच्या येण्याची वाट पाहून मग तो त्यास शोधण्यासाठीं रानांत गेला; तेथें हा चमत्कार त्याच्या दृष्टीस पडला. तें पाहून खेमसावंत हे पुढें मोठे भाग्यशाली होतील अशी त्याची खात्री झाली. त्यास पाहतांक्षणींच सर्प आपल्या

केली. त्यावरून गुरुजी खुष होऊन त्यांनीं बादशहास 'जगद्गुरु' असा किताब पाठवून दिला हा बादशहा श्रीनृसिंहसरस्वतीस भजत असे. त्यानें बांधलेलें श्रीनारसिंहाचें देऊळ अद्याप आहे. श्रीगुरुचरित्रांत ज्या रजकाला श्रीपाद श्रीवल्लभस्वामी यांच्या वरानें यवन कुलांत राजपद मिळालें असें सांगितलें आहे तो हाच बादशहा असावा असें ह्मणतात.

१ सबनीस याच्या दप्तरांत जी हकीकत लिहून ठेविलेली आढळते तींत पुढें लिहिल्याप्रमाणें माहिती दिली आहेः—मूळ पुरुष सोमसावंत. त्यास तीन मुलगे—गोम सावंत, रुप सावंत व पाय सावंत. गोम सावंताचे वंशज सालईवाडकर सावंत; रुप सावंताचे वंशज आकेरी, इनसुली, वेंगुलें व कुडाळ येथील सावंत; व पाय सावंताचे पुत्र खेम सावंत ओटवणेकर.

बिळांत निघून गेला. नंतर खेमसावंत यास त्याच्या धन्यानें जागें केलें व त्यास तो घरीं घेऊन आला. नंतर त्यानें खेमसावंतास विचारिलें कीं, जर तुला कांहीं मोठा लाभ झाला तर मला काय देशील? खेमसावंतास झाल्या गोष्टीची कांहींच माहिती नव्हती; परंतु आपला धनी विचारतो इतक्यावरच त्यानें 'जेथें माझी पत्रावळ तेथें तुझा द्रोण' अशी त्यास भाक दिली. खेमसावंत यास पुढें देशमुखी मिळतांच आपल्या पूर्वींच्या धन्यास त्यानें आपला प्रधान नेमिलें आणि तें प्रधानकीचें काम पुढें त्याच्या वंशजांकडेही चाललें होतें, व ज्या ज्या ठिकाणीं सावंत यांस राजभाग मिळे, त्या बहुतेक ठिकाणीं सबनीस यांचा कांहीं भाग असे. ज्या ठिकाणीं सर्पानें खेमसावंतांवर फणा धरिली त्या ठिकाणीं हल्लीं एक पाषाणी सर्प पूजेस लाविलेला असून त्याची तेथील पंचायतन देवांत गणना होते. यावरून वरील आख्यायिकेस बळकटी येते.

कुडाळ देशस्थ प्रभु हे या प्रांताचे देशमुख असतांना त्यांनीं प्रत्येक तर्फेवर नाईक ह्मणून अंमलदार नेमिलेला असे; तो आपल्या तर्फेचा वसूल करून देशमुखांकडे पाठवी. खेमसावंत यांजकडे माणगांव तर्फेची नाइकी होती. कांहीं दिवसांनीं ते देसाई यांस आपल्या तर्फेचा वसूल पाठवीनातसे झाले. त्या कामीं यश येतां येतां ते इतर तर्फांचाहि वसूल तेथील नाइकांकडून बळजबरीनें घेऊं लागले. अशा रीतीनें त्यांनीं पुंडाव्यास आरंभ केला. पुढें कांहीं दिवसांनीं ह्मामदराजा नांवाचा एक विजापूरचा सरदार पारपोली घांट उतरून येत असतां खेमसावंत यांनीं त्यावर स्वारी करून त्याचा पराभव केला. त्यावेळीं तो सरदार खेमसावंत यांच्या हातीं सांपडला. त्यास ठार मारावें असें बरोबरच्या सर्व लोकांचें मत होतें. परंतु खेमसावंत यांनीं दयाळुपणानें त्यास जीवदान देऊन सोडून दिलें. त्यानें बिजापुरास गेल्यावर खेमसावंतांच्या शौर्याची व दयाळू स्वभावाची बादशहाकडे फार तारीफ केली. त्यावरून बादशहा खूष होऊन त्यानें खेमसावंत यांस देशमुखीची सनद दिली. ही गोष्ट इसवी सन १६२७ च्या सुमारास घडली.

यूरोपखंडांतून पोर्तुगीज लोक व्यापाराच्या निमित्तानें हिंदुस्थानांत

येऊन त्यांनीं पश्चिम किनाऱ्यावरील कांहीं मुलुख काबीज केला, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. हे पोर्तुगीज लोक हिंदुस्थानांतून तऱ्हतऱ्हेचे मसाल्याचे जिन्नस यूरोपखंडांत नेत असत, व मनास मानेल तशा दरानें विकीत असत. पोर्तुगीज लोकांप्रमाणेंच हालंड देशांतील डच लोक दर्यावर्दी कामांत मोठे निपुण होते. त्यांच्याही मनांत पोर्तुगीज लोकांप्रमाणेंच पूर्वेकडील लोकांशीं व्यापार करून नफा मिळवावा असें येऊन, इसवी सनाच्या सोळाव्या शतकांत त्यांनीं हिंदुस्थानांत प्रवेश केला; व त्यांनीं व्यापारांत पोर्तुगीज लोकांशीं स्पर्धा करून त्यांना बहुतेक ठाण्यांतून हांकून लाविलें. फक्त गोवें मात्र त्यांच्या ताब्यांत राहिलें होतें. विजापूरचा आदिलशहा हा पोर्तुगीज लोकांचा शत्रु असल्यामुळें त्यांस गोवें प्रांतांतून हांकून लावण्याचे कामीं आपणास मदत करील, असें त्यांना वाटत होतें; ह्मणून त्यांनीं तशा प्रकारची मदत व वेंगुर्लें येथें वखार बांधण्याची परवानगी मिळविण्यासाठीं इ. सन १६३७ त आदिलशहाकडे आपला वकील पाठविला. आदिलशहानें त्यांस वखार बांधण्याची परवानगी दिली, व ती बांधण्यासाठीं त्यांनीं आपले लोक तेथें ठेविले; परंतु पुढें लवकरच ती परवानगी काढून घेतली. पुनः तारीख १९ नवंबर सन १६३८ रोजीं डच लोक गोव्याला आले व त्यांनीं त्या बंदराची नाकेबंदी केली. गोव्याचा गव्हर्नर डच लोकांशीं लढण्यास असमर्थ होता, ह्मणून त्यानेंही मदत मिळविण्यासाठीं आदिलशहाकडे आपला वकील पाठविला; परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं डच लोकांनीं वखार बांधण्याची परवानगी मिळविली, व त्या ठिकाणीं त्यांनीं वखार बांधिली. तिलाच हल्लीं 'डच फ्याक्टरी' किंवा 'वेंगुर्ल्याचा कोट' असें ह्मणतात.

खेमसावंत यांनीं चौदा वर्षें देशकर्तीचें काम केलें. ते इसवी सन १६४० त निवर्तले. त्यांचेवेळीं रवळ दळवी, फटसावंत गांगसावंत माणगांवकर, विठसावंत, अनसावंत हे सरदार होते. विश्राम नारायण शेणवी सबनीस, अनंत शेणवी चिटणीस, बाबाजी पंडित खसनीस असे कामदार त्यानें नेमिले होते. त्यांपैकीं चिटणीस हे पूर्वीं कुडाळदेशस्थ

प्रभु यांजकडे चिटणिसीचें काम करीत होते. नंतर ते सावंत यांस येऊन मिळालें असें ह्मणतात.

याच सुमारास उत्तर दिशेहून कोणी तीन साधु पुरुष या प्रांतीं आले. त्यांपैकीं दामोदर भारती हे चराठें गांवच्या ज्या भागांत पुढें सावंतवाडी शहर वसविलें त्या भागांत राहिले.[१] दुसरे गिरि पंथाचे गोसावी हे मातोंड गांवीं गोडेकोंड येथें राहिले.[२] तिसरे परशुराम भारती हे तळवणें येथें गेले. हे खेमसावंत यांचे गुरु होते व त्यांच्यापासून खेमसावंत यांनीं योगाभ्यासाची माहिती करून घेतली होती. असें सांगतात कीं, एके दिवशीं खेमसावंत हे पुष्कळ वेळपर्यंत समाधि लावून बसले होते व त्यांची हालचाल अगदीं बंद झाली होती. त्यावरून त्यांचें देहावसान झालें असें जवळच्या लोकांस वाटलें. त्यांनीं दहनाची वगैरे पुढील तजवीज केली. यावेळीं परशुराम भारती हे तळवणें येथें होते. त्यांस योगबलानें ही हकीकत समजली, तेव्हां ते आपल्या शिष्याची समाधि उतरण्यासाठीं ओटवण्यास जाण्याकरितां नदीमार्गानें येत होते. ते बांद्यापर्यंत आल्यानंतर त्यांस खेमसावंत यांच्या चितेवर बंदुकांचे बार काढल्याचे आवाज ऐकूं आले. तेव्हां परम खेद पावून ते परत तळवण्यास गेले. नंतर कांहीं दिवसांनीं परशुराम भारती यांनींहि तळवणें येथें समाधि घेतली. तळवणें येथें त्यांचा मोठा मठ असून तेथें दरसाल भंडारा ह्मणून मोठी जत्रा भरत असते. मठाकडे संस्थानाकडून मिळालेल्या इनाम जमिनीचें व दुसऱ्या नक्त नेमणुकांचें मिळून सालीना सुमारें एक हजार रुपयांचें उत्पन्न आहे. अद्यापिही या मठाकडे राजघराण्याची भजणूक चालते.

खेमसावंत यांच्या मागून त्यांचे वडील पुत्र सोमसावंत हे देशमुखीचें काम करूं लागले. त्यांनीं दीडच वर्ष काम केलें. नंतर त्यांचे धाकटे बंधु फोंडसावंत हे गादीवर बसले. ते इ. स. १६५१ त निवर्तले. या दोन्हीं कारकीर्दींत कांहीं विशेष गोष्ट घडून आली नाहीं.

फोंडसावंत मरण पावल्यावर त्यांचे धाकटे बंधु लखमसावंत यांच्या

---

१ त्याचा मठ सावंतवाडींत सालईवाड्यांत श्रीआत्मेश्वराच्या देवालयासमोर आहे.

२ यांचा मठ त्याच गांवीं आहे.

हातीं सत्ता आली. ते मोठे शूर व विलक्षण कारस्थानी होते. त्यांचे पुतणे खेमसावंत हेही तसेच शौर्यशाली असून ते त्यांस चांगली मदत करीत असत. त्यांच्याजवळ १२००० फौज होती. या दोघांनीं मिळून कुडाळ-देशस्थ प्रभूंचा समूळ नाश करून कुडाळ परगण्यावर आपली पूर्ण सत्ता स्थापन करण्याचा यत्न चालविला. मराठी राज्याची स्थापना करणारे शिवाजी महाराज यांचा याच सुमारास उदय होत चालला होता. त्यांनीं कोंकणप्रांत विजापूरकरांपासून जिंकून घेऊन तेथें आपली सत्ता स्थापन केली होती. आपल्या आंगचा पराक्रम दाखवून विजापूरच्या बादशहाची कृपा संपादन करण्यास ही संधि उत्तम आहे असें समजून लखमसावंत यांनीं विजापूरच्या बादशहास अशी विनंति केली कीं, मला कांहीं मदत मिळेल तर शिवाजीपासून कोंकणप्रांत मी सोडवून घेईन. बादशहास ती गोष्ट पसंत पडून त्यानें खवासखान नामक आपल्या एका बलाढ्य सरदारास दहा हजार फौज बरोबर देऊन लखमसावंत यांच्या मदतीसाठीं पाठविलें. मागाहून बाजी घोरपडे सुधोळकर हे १९०० स्वारांनिशीं खवासखान याच्या मदतीसाठीं येत होते. शिवाजीमहाराज यांनीं त्यांस वाटेंतच अचानक गांठून त्यांचा मोड केला. त्यांत बाजी घोरपडे व त्यांचा बंधु हे पडले; व बाराशें स्वार मारले गेले. नंतर घोरपड्याप्रमाणेंच खवासखानाची वाट लावण्यासाठीं शिवाजी महाराज यांनीं त्याजवर चाल केली. त्यांत खवासखानाचा पराभव होऊन तो थेट विजापुरास पळून गेला. नंतर सावंतांचा पूर्ण पराभव करण्यासाठीं शिवाजी महाराजांनीं कुडाळ प्रांतांत शिरून एकंदर ठाणीं व किल्ले घेतले व त्यांस जेरीस आणिलें. तेव्हां लखम सावंत व खेमसावंत हे पोर्तुगीज लोकांच्या आश्रयास जाऊन राहिले. शिवाजी महाराज यांनीं पोर्तुगीज लोकांवरही स्वारी करून त्यांचा फोंडा येथील मजबूत किल्ला घेतला. पोर्तुगीज लोकांनीं शिवाजी महाराजांशीं तह करून तोफा नजराणा पाठविल्या. पोर्तुगीज लोकांचा लखम सावंत यांस आश्रय देण्यांत निरुपाय झाल्यामुळें लखम सावंत यांनीं आपला कारभारी पितांबर शेणवी यास शिवाजी महाराजांकडे वकील ह्मणून पाठवून कळविलें कीं, "आपण सावंत भोंसले

कुळींचे आपले पुत्र आहों, सर्फराज करून देशकतीच्या वतनाची सेवा घेऊन प्रांताचा ठराव निम्मे ऐवज फौजेनिशीं चाकरी करितों त्यास निमे ऐवज, व निमे ऐवज सरकारांत वसूल घ्यावा." शिवाजी महाराज यांचाहि हेतु मराठी राज्याची जिकडे तिकडे स्थापना करावी, हाच असल्यामुळें त्यांनीं लखम सावंत यांचें बोलणें कबूल करून फाल्गुन वद्य ७ मी शके १५८० (एप्रील सन १६५९) रोजीं पांच कलमांचा तह केला. त्यावरून शिवाजी महाराजांनीं कुडाळ प्रांतांत घेतलेले किल्ले व ठाणीं लख्म सावंत यांच्या स्वाधीन केलीं व असें ठरविलें कीं, लखम सावंत यांनीं या प्रांताच्या वसुलांतून दरसाल सहा हजार होन घेऊन तीन हजार फौज ठेवावी, व जरूर लागेल तेव्हां त्या फौजेनिशीं मदत करावी. त्याचप्रमाणें लखम सावंत यांस कुडाळ प्रांताची देशकत बहाल करून सावंत बहादर हा किताब त्यांजकडे निरंतर चालावा असें ठरविलें. त्याचवेळीं शिवाजी महाराजांनीं लखम सावंत यांचे सरदार राम दळवी व तान सावंत यांस एक एक हजार स्वारांची मनसबदारी दिली; आणि आपले तीन सरदार कुडाळ प्रांतांत निरनिराळ्या ठिकाणीं ठेविले.

लखम सावंत व त्यांचे पुतणे खेम सावंत यांनीं अशा रीतीनें शिवाजी महाराजांशीं तह करून देशकत मिळविली; तथापि कुडाळदेशस्थ प्रभु यांची सत्ता निखालस नष्ट झाली होती असें नाहीं. गोमजी प्रभु हा त्यावेळीं देशमुखीचें काम पहात असे. त्यानें सावंत भोंसले यांस घालवून देण्यासाठीं मदत मिळावी ह्मणून विजापूर सरकाराकडे स्वतः जाऊन मागणें केलें; परंतु विजापूर सरकारानें मदत देण्याचें कबूल केलें नाहीं. यावेळीं वडाचें पाट हा गांव त्यास खासगी तैनातीस इनाम करून दिला.

गोमजीचा सर्वांत धाकटा भाऊ गणेश हा रामजी प्रभु यानें बंड केल्यामुळें इसवी सनाच्या सोळाव्या शतकाच्या मध्यानंतर कांहीं वर्षांनीं पळून गेला असें पूर्वीं सांगितलेंच आहे. तो माळवण येथें जाऊन राहिला. त्यास पुत्रसंतान नसल्यामुळें त्यानें आपला चुलतभाऊ जोगणप्रभु यास दत्तक घेतलें होतें. जोगणप्रभु याला कृष्णप्रभु नांवाचा एक मुलगा

१ परिशिष्ट १ लें लेख नंबर ७.

होता. इसवी सन १६६३ त शिवाजी महाराजांनीं मालवण येथें समुद्रांत एका बेटावर सिंधुदुर्ग किल्ला बांधिला. त्या जागेसंबंधीं सर्व माहिती त्यांनां कृष्णप्रभूनेंच दिली होती असें ह्मणतात. पुढें किल्ला बांधण्याचें कामही शिवाजी महाराजांनीं कृष्णप्रभु व विश्वनाथ नांवाचा आपला एक सरदार यांच्या देखरेखीखालीं करून घेतलें.

लखम सावंत यांनीं वर सांगितल्याप्रमाणें शिवाजी महाराजांशीं तह केला; परंतु तो फार दिवस टिकला नाहीं. लखम सावंत पुनः विजापूरकरांस जाऊन मिळाले. यावेळीं तळकोंकण सुभ्यावर विजापूरकर यांचा अजीजखान सरनोबत हा सुभेदार होता. लखम सावंत यांनीं त्यास मदत करून कुडाळ प्रांतांतील शिवाजीचीं सर्व ठाणीं उठवून त्या जागीं विजापूर सरकाराचीं ठाणीं बसविलीं. अजीजखानानें लखम सावंत यांच्या पराक्रमाविषयीं व मेहनतीविषयीं विजापूरच्या बादशहाकडे पुष्कळ तारीफ केली; तेव्हां बादशहा खूष होऊन त्यानें सावंत यांस मालवण गांव तेथील सर्व हक्कांसुद्धां इनाम करून दिला.[1] ही गोष्ट इसवी सन १६६४ त घडली.

यावेळीं लढाईमुळें मुलुख जिकडे तिकडे ओस पडला होता. गांवांत लागवड वगैरे होत नसे व सरकारास वसूलही कांहीं मिळत नसे. लखम सावंत यांनीं लोकांस कौल देऊन मुलुखांत जिकडे तिकडे लागवड व आबादानी केली. यानंतर लवकरच त्यांनीं आपला वकील पितांबर शेणवी यास विजापूरचे बादशहाकडे पाठवून आपली कर्तबगारी व आपला पूर्वापार हक्क बादशहाच्या नजरेस आणिला. थोडेच दिवसांपूर्वीं अजीजखान सुभेदार याजकडूनहि लखम सावंत यांजबद्दल शिफारस गेली होती. त्यावरून बादशहानें लखम सावंत यांस कुडाळ परगण्याची नाडगौडकी व मसुरें, पेंडूर, घावनळें, मळगांव, मठ, होडावडें, आरवली, रेडी व आरंवदें हे गांव दिले. हें फरमान[2] मालवण गांव इनाम दिल्याविषयीं फरमान झाल्यानंतर अवघ्या अकरा दिवसांतच मिळालें.

या नंतर सुमारें आठ महिन्यांनीं पितांबर शेणवी यानें त्यावेळचा

---

१ परिशिष्ट १ लें, लेख नंबर ८.

२ परिशिष्ट १ लें, लेख नंबर ९.

विजापूर दरबारांतील मुख्य कारभारी दयानंतराव मजलसी याच्यामार्फत बादशहाची पुनः भेट घेतली. त्यावेळीं बादशहानें लखम सावंत यांच्या-साठीं बहुमानवस्त्रें पाठविलीं. त्यावेळीं झालेल्या फर्मानांत बादशहानें म्हटलें आहे कीं, 'हीं वस्त्रें आंगावर घेऊन संतोषित होणें आणि सर्व कामाविषयीं हुजूर खातरजमा ठेवून कोणत्याच गोष्टीचा संशय न करणें. या उपर बादशहा मेहरबान जल्दी होऊन वतनभिरास तुह्मी पावाल.'[1]

याच सुमारास पुनः शिवाजी महाराज यांनीं कोंकणांत स्वारी केली. व रांगणा किंवा प्रसिद्धगड हा किल्ला घेतला. तो परत घेण्यासाठीं विजापुराहून बल्लखान नांवाचा सरदार मदत घेऊन आला. त्याच्या सैन्यानिशीं लखम सावंत यांनीं रांगण्यावर हल्ला केला; परंतु शिवाजी महाराज यांची तयारी फारच चांगली असल्यामुळें सावंत यांस यश आलें नाहीं. नंतर कुडाळ प्रांताच्या सरदेशमुखीचीं वस्त्रें शिवाजी महाराजांनीं कृष्णसावंत[2] यास दिलीं. तीं त्याजपासून परत मिळविण्यासाठीं लखम सावंत यांनीं विजापूरच्या बादशहाकडे मागणी केली. त्यावरून बादश-हानें सावंत यांच्या मदतीस वजीर महंमद एकखलासखान यास कोंक-णचा सुभेदार व श्रीपतराव मजलसी यास त्याचा कारभारी नेमून पाठविलें. त्यांची व शिवाजी महाराजांची कुडाळ येथें गांठ पडून मोठी लढाई झाली. तींत लखम सावंत यांनीं फारच शौर्य दाखविलें. शेवटीं शिवाजी महारा-जांचा पराभव होऊन त्यांस माघारें जावें लागलें. नंतर खानही विजापुरास गेला. त्यावेळीं त्यानें सावंतांच्या शौर्याविषयीं बादशहाकडे फार तारीफ केल्यावरून बादशहानें सावंतांस चौकूळ गांव मोकासा दिला. या नंतर लखम सावंत यानें बाकीचा मुलुखही काबीज केला; परंतु कृष्णसावंत त्यांच्या हातीं मिळाला नाहीं, तेव्हां त्यांनीं विजापूर सरकाराकडे कृष्णसा-

---

१ परिशिष्ट १ लें, लेख नंबर १०.

२ त्याचे वंशज सावंत भोंसले हे तिरवडें येथें राहतात. कृष्णसावंत याच्या वंशजां-कडे वाडीकर सावंत भोंसले यांच्या कारकीर्दींत कांहीं दिवस सरदारीहि चालली होती, परंतु त्या घराण्यांतील एक पुरुष रामसावंत रवळसावंत हा सन १८३८ त बंडांत सामील झाल्यामुळें त्याच्याकडून सरदारी काढून घेतली.

घेत यास धरून आपल्या स्वाधीन करण्याविषयीं विनंति करून त्या मोबदला पंचवीस हजार होन देण्याचें कबूल केलें. परंतु शेवटीं लखम सावंत यांनींच त्यास कैद करून ठार मारिलें, व अशा रीतीनें बादशहाच्या ताबेदारींत आपली देशमुखीची सत्ता कायमची स्थापित केली (इसवी सन १६६९.)

सतराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास कुडाळदेशस्थ घराण्यापैकीं गोम प्रभु मरण पावला; आणि त्याच्या वंशजांत गादीविषयीं तंटा उत्पन्न झाला. गोमजीचा भाऊ बावाजी हा तंट्यांतून आपलें आंग काढून घेऊन गोमजीनें मिळविलेल्या वडाचें पाट ह्या गांवांतील वतनाचा उपभोग घेत तेथेंच राहिला. तथापि त्याचे चुलतभाऊ कानेप्रभु, भानजी व दादाजी यांच्यामध्यें वाद चाललाच होता. त्याचा निकाल लावण्यासाठीं ते विजापुरास गेले. तेथें या तंट्याचा निकाल होऊन वडील भाऊ कानेप्रभु हा गादीवर बसला. तो थोड्याच दिवसांनीं मरण पावला. त्यास पुत्रसंतान नसल्यामुळें त्याचा धाकटा भाऊ भानजी यास गादी मिळाली. याच्या कारकीर्दींत सावंतांच्या व प्रभूंच्या बऱ्याच चकमकी झडल्या; परंतु प्रभूंनीं आपलें कुडाळचें ठाणें सोडिलें नाहीं. भानजीनें आपल्या कारकीर्दींतील शेवटचें इनामपत्र इ. स. १६६६ त दिलेलें आहे. याला मुलगा नसल्यामुळें दादाजीप्रभु गादीवर बसला. यानें दिलेलें पहिलें इनाम इ. स. १६६८ चें आहे. त्यावरून भानजी इ. स. १६६७ त मरण पावला असावा.

यावेळीं सावंत हे वेंगुर्लें बंदरांतून चांचेपणा करीत असत. इ. स. १६७४ त लखम सावंत यांचे पुतणे खेमसावंत यांनीं गोवें व वेंगुर्लें यांच्या मधील किनाऱ्यावर एक गलबत पकडिलें; तें ते लुटीत असतां त्यांच्यावर एका इंग्लिश व्यापारी गलबतानें हल्ला केला. या हल्ल्याची हकीकत त्या गलबतांत असलेल्या फ्रायर नांवाच्या इंग्रजानें दिली आहे ती अशीः–" आह्मीं हल्ला करतांच आमच्याबरोबर लढाई करण्यासाठीं चांच्यानां आपण पकडलेलें गलबत सोडून द्यावें लागलें. त्यांनीं आमच्या गलबतावर कवच्यांचे गोळे फेंकिले; परंतु त्यापासून आमचेकडील कोणीही मनुष्य जायां झाला नाहीं. तथापि त्यांपासून आमच्या वल्हेवाल्यांना

इतकी भीति वाटली कीं, ते कडक उपायांशिवाय वठणीस येईनात. यांच्यांनीं आमच्यावर दारू गोळा बराच उडविला, गोफणीनें दगड फेंकले, व ढाल फिरवून भालेही फेंकूं लागले. त्यांचें गलबत आमच्या गलबताच्या जवळ जवळ दसपट मोठें होतें व त्याची तयारीहि कडेकोट होती. त्यावर वल्हेवाले खेरीज करून लढाऊ असामी सुमारें साठ असावे. आमच्या तोफा उडविण्यास कोणीच मनुष्य नव्हता;" कारण त्यांचा गोलंदाज गोव्यास उतरला होता. परंतु यांत शेवटीं खेमसावंत यांचा पराभव होऊन त्यांस परत यावें लागलें.

लखम सावंत इ. सन १६७५ त निवर्तले. त्यांनीं आपल्या नांवाचा शिक्काहि पाडिला होता. लखम सावंत यांच्या मागून त्यांचे पुतणे खेमसावंत हे गादीवर बसले. हे लहान असतांना मोठमोठ्या बिकट प्रसंगांत सुद्धां त्यांनीं चुलत्याबरोबर राहून आपलें शौर्य प्रकट केलें होतें. त्यांच्या शौर्याबद्दल विजापूरच्या दरबारांतही ख्याति होती. हे गादीवर असतां विजापूरच्या बादशहाकडून त्यांस एकामागून एक अशीं जीं तीन फरमानें झालीं, त्यांत तुह्मीं वडिलांप्रमाणें एकनिष्ठेनें वागावें, मोंगलांबरोबर मैत्री ठेऊं नये, संभाजीस मदत करूं नये, मार्गाच्या रहदारीचा बंदोबस्त चांगला राखावा वगैरे गोष्टी मोठ्या गौरवानें लिहिलेल्या आहेत. यावेळीं खेमसावंत यांनां कुमकेकरितां बादशहानें आपल्या फौजेंत बोलाविलें होतें, व त्यांचा एक मनुष्य नेहमीं विजापूरच्या दरबारांत रहावा, आणि त्याजकडे हुकूम होतील त्याप्रमाणें खेमसावंत यांनीं वागावें अशीहि व्यवस्था केली होती.

वर सांगितलेल्या घडामोडी झाल्या त्यावेळीं प्रथमतः महंमद आदिलशहा हा तक्तावर असून तो इसवी सन १६५६ त मरण पावल्यावर त्याचा मुलगा अल्ली हा गादीवर बसला. सुलतान महंमद गादीवर असतां दिल्लीच्या बादशहाची त्याजवर स्वारी येऊन झाल्या तहांत असें ठरलें होतें कीं, विजापूर दरबारांतील कोणतीहि महत्वाची गोष्ट मोंगल बादशहाच्या संमतीशिवाय होऊं नये. पण अल्ली गादीवर बसला त्यावेळीं मोंगलांची सल्ला घेतली नाहीं. त्यामुळें शहाजहान बादशहास राग येऊन त्यानें अशी अफवा उठविली कीं, "अल्ली हा महंमदाचा खरा वारस नसून

दासीपुत्र आहे." आणि ती उठविल्यानंतर खरा वारस कोण, हें ठरविण्यासाठीं ह्मणून त्यानें आपला मुलगा औरंगजेब यास मोठें सैन्य देऊन विजापुरास पाठविलें. त्याचा खरा हेतु वारस ठरविण्याचा नसून विजापूरच्या राज्यावर आपला अंमल बसवावा असा होता. त्यानें प्रथम विजापूरच्या आसपासचा मुलूख काबीज केला. नंतर विजापूरचा सेनापति खानमहंमद यास फितूर करून घेऊन त्यानें एकदम विजापूर शहरांत प्रवेश केला. याचवेळीं विजापूरच्या बादशाहीचा शेवट व्हावयाचा; परंतु इतक्यांत शहाजहान हा फार आजारी पडल्यामुळें औरंगजेबाची बहीण रोषनार हिचें त्यास पत्र आलें कीं, 'तूं असशील तसा निघून ये.' त्यामुळें ही स्वारी तशीच टाकून औरंगजेबास परत जावें लागलें. अशा रीतीनें विजापुरावर आलेलें संकट कांहीं दिवस टळलें.

इकडून शिवाजी महाराजांचीही खटपट विजापूरचें राज्य ढांसळून पाडण्यासाठीं चालली होती. अशा दोन प्रबळ शत्रूंच्या त्रासामुळें विजापूरचें राज्य अधिकाधिक जेरीस येत चाललें. कांहीं दिवसांनीं मोंगलांनीं जयसिंग नामक आपल्या सरदारास मोठें सैन्य देऊन विजापुरावर पाठविलें. त्यास शिवाजी महाराजांचीही मदत होतीच. जयसिंगानें विजापूरकरांचा पराभव करून त्यांस तह करावयास लाविलें. त्यांत विजापूरकरांनीं मोंगलांस दरसाल १८०००० होन खंडणीदाखल द्यावे असें ठरलें. यानंतर तर विजापूरकरांची स्थिति फारच वाईट होत चालली. वरचेवर लढायांचे प्रसंग आल्यामुळें खजिना संपून गेला; जमिनीचा साराही वसूल होईना; शिपाई लोकांचे पगार थकत चालले; त्यामुळें अर्थातच ते नाखूष होऊं लागले. ही स्थिति सुधारण्यास काय उपाय करावे हें सुलतान अल्ली यास सुचेना. त्याच काळजीनें त्यास दुखणें येऊन इसवी सन १६७२ त त्याचा अंत झाला.

अल्ली यास शिकंदर नांवाचा चार वर्षांचा मुलगा व शहरबानो नांवाची दहा अकरा वर्षांची मुलगी अशीं दोन मुलें होतीं. त्यांच्या अज्ञानावस्थेंत राज्यकारभार चालविण्यासाठीं अबदुल करीम, खोवासखान, अबदुल महंमद, बहिलोलखान व मुझफरखान यांस अल्ली यानें आपण

हयात असतांनांच पंच नेमून, दोन्ही मुलांस त्यांच्या स्वाधीन केलें होतें. परंतु अल्लीच्या मरणानंतर या व्यवस्थेपासून कांहीं उपयोग झाला नाहीं. राज्यांतील अंदाधुंदी नाहींशी करण्यासाठीं मुख्य पालक खोवासखान यानें मोंगल लोकांशीं गुप्तपणें असें बोलणें चालविलें होतें कीं, दिल्लीच्या सार्वभौम बादशाही अमलाखालीं हें राज्य घेऊन राजकन्या शहरबानो ही आपल्या मुलास करावी. ही मसलत बाकीच्या चार पंचांस कळली; परंतु त्यांस ती रुचली नाहीं. त्यांनीं खोवासखान याचा नाश केला. तेव्हां औरंगजेबाशीं चाललेलें बोलणें तसेंच राहिलें. तथापि औरंगजेबास आशा दाखवून दिल्यामुळें त्याला जास्त राग येऊन इसवी सन १६७९ त त्यानें आपला दिल्लीरखान नामक सरदार विजापुरास पाठविला. त्यानें शहरास वेढा दिला व राजपालकांस निरोप पाठविला कीं, शहरबानो हिला माझ्या स्वाधीन कराल तर वेढा उठवीन. पण तसें करण्याचें पालकांस व शहरवासी लोकांस आवडेना. पुढें ही गोष्ट राजकन्येस समजतांच, आपल्या पायीं आपल्या प्रियबंधूची व राज्याची किती दुर्दशा होईल, हें मनांत येऊन तिला फार वाईट वाटलें व ती वेळ टाळण्यासाठीं ती एकटीच पुरुषवेष घेऊन दिल्लीरखानाच्या गोटांत जाऊन त्यांच्या स्वाधीन झाली; तेव्हां त्यांनीं तिला दिल्लीस पाठवून दिली.

इतकें झालें तरी दिल्लीरखानानें वेढा उठविला नाहीं. विजापूरकरांचा अगदीं निरुपाय झाला. यावेळीं शिवाजी महाराज हे विजापूरकर यांचे शत्रू होते, तरी त्यांनीं झालेली एकंदर हकीकत महाराजांस कळवून त्यांची मदत मागितली. ती देण्याची महाराजांनीं कबूल केलें; व ती मदत घेऊन विजापूरकरांनीं दिल्लीरखानास परत जावयास लाविलें. परंतु त्यानंतर लवकरच इसवी सन १६८० त शिवाजी महाराज निवर्तले. यामुळें त्यांची दहशत नाहींशी होऊन औरंगजेबानें पुनः इसवी सन १६८५ त आपला मुलगा अजीम यास मोठ्या सैन्यानिशीं विजापुरावर पाठविलें. व नंतर स्वतःहि येऊन त्यास मिळाला. इतकें मोठें सैन्य एकत्र झालें, तरी कांहीं दिवसपर्यंत विजापूरचा किल्ला हातीं येईना. परंतु शेवटीं धान्याची तूट पडून किल्ल्यांतील शिपाई वगैरे लोकांस अन्नान्न करावें

लागल्यामुळें सुलतान शिकंदर स्वतः ता० १९ अक्टोबर सन १६८६ रोजीं आपल्या सर्वस्वासुद्धां औरंगजेबाच्या स्वाधीन झाला. पुढें चौदा वर्षेंपर्यंत तो मोंगलांच्या कैदेंत होता. शेवटीं औरंगज़ेबानें त्यास खर-बुजातून विष घालून मारिलें. अशा रीतीनें या प्रांतावर राजसत्ता चाल-विणाऱ्या विजापूरच्या बादशाहीचा शेवट झाला.

कुडाळदेशस्थ प्रभूंस विजापूरकरांकडून केव्हां तरी मदत मिळेल अशी आशा होती ती आतां समूळ नाहींशी झाली. दादाजी प्रभु इ. स. १६८० च्या सुमारास मरण पावून त्याचा मुलगा नारायण प्रभु हा गादीवर बसला. त्याला मालवण येथील कृष्ण प्रभूचा नातू जोगण प्रभु हा कुडाळ येथें राहून मदत करीत असे. नारायण प्रभूनें सावंतांस घालवून देण्यासाठीं मानधाता वल्लद कान्होजीराजे प्रभानवल्लीकर[1] यांजकडे मदत मागितली, आणि त्याबद्दल कुडाळ परगण्याच्या देशमुखीच्या हक्कापैकीं तिसरा भाग ९००१ होन त्यांजपासून घेऊन त्यांस देण्याचें कबूल केलें. प्रभानवल्लीकरही त्या गोष्टीस मान्य होऊन, दोघांचा मणेरी येथें राजीनामा[2] झाला (इ. स. १६८९). परंतु बरेच दिवसपर्यंत प्रभूंस कुमक मिळाली नाहीं. म्हणून जोगण प्रभु हा तुळापुरास प्रभानवल्ली-करांकडे गेला; व तेथें त्यांचें सैन्य बरोबर घेऊन येण्याचा ठराव झाला. परंतु इतक्यांत प्रभानवल्लीकरांसच आपलें सैन्य चंदीकडे घेऊन जाण्या-विषयीं त्यांचे धन्याचा हुकूम झाला. तेव्हां प्रभूंस मदत मिळण्याचें सह-जींच राहिलें. प्रभानवल्लीकरांनीं प्रभूंस दिलेला पैसा परत घेऊन त्यांनीं दिलेला राजीनामा त्यांस परत दिला.

मोंगलांनीं वर सांगितल्याप्रमाणें विजापूरच्या आदिलशाहीची वाट लावि-ल्यावर खेमसावंत यांनीं दिल्लीच्या बादशहाकडे संधान लाविलें; व कुडाळ परगण्याची देशमुखी आपल्याकडे चालण्यासाठीं त्यांजकडून इ. स. १६८९ त फेरमान मिळविलें[3] शिवाय त्या बादशहाकडून आपल्यासाठीं चार हजार स्वारांची व फोंडसावंतांसाठीं एक हजार स्वारांची मनसबदारी[4] मिळविली.

---

१ प्रभानवल्ली हा गांव रत्नागिरी जिल्ह्यांत संगमेश्वर तालुक्यांत विशाळगड कि-ल्ल्याच्या दक्षिणेस आहे. २ परिशिष्ट १ लें, लेख नं. १६. ३ परिशिष्ट १ लें, लेख नं. २०. ४ हा मान त्यावेळीं दिल्लीच्या दरबारांत दुसऱ्या प्रतीच्या सरदारांस मिळत असे.

याचवेळीं शिवाजीमहाराजांचा वडील मुलगा संभाजी हा औरंगजेबाच्या कैदेंत होता, तो कैदेंतून पळाला ह्मणन कोंकणच्या बाजूचा बंदोबस्त जास्त चांगला ठेवण्यासाठीं औरंगजेबानें आपला सरदार अबदुल रजाकखान यास तळकोंकणचा सुभेदार नेमून पाठविलें; आणि त्यास मदत करण्याचें काम खेमसावंत यांजवर सोंपविलें. अदिलाबाद (बांदें) बंदराचा पोर्तुगीजांनीं इ. स. १६७० त नाश केला होता; तें बंदर या दोघांनीं इ. स १६९० त पुनः वसविलें.

खेमसावंत यानें आपलें ठाणें चराठें गांवच्या एका भागांत (ज्यांत पुढें त्यांनीं सुंदरवाडी हें शहर वसविलें) ठेविलें होतें. हा भाग गर्द झाडींनें व्यापिलेला असून त्याच्या तीनही बाजूंस मजबूत डोंगरांनीं नैसर्गिक तटबंदी केली असल्यामुळें, या ठिकाणीं राहून शत्रूवर छापे घालण्यास व शत्रूपासून आपलें रक्षण करण्यास त्यांस ही जागा फार सोईची झाली.

इ. स. १६९१ त सखोजी हा प्रभुदेसायांस एक नवीन शत्रु उत्पन्न झाला. त्यानें त्यांच्याविरुद्ध बंड केलें. याच्या त्रासामुळें देसायांनीं आपलीं माणसें बारदेशांत नेऊन ठेविलीं. सखोजीच्या व देसायांच्या अनेक झटापटी झाल्या; परंतु त्यांत कोणासच ह्मणण्यासारखें यश मिळालें नाहीं. नंतर तो वेंगुर्लें येथें जाऊन तळ देऊन राहिला. त्याच्या मनांतून सावंत व कुडाळदेशस्थ प्रभु या दोघांसही जिंकून आपली सत्ता स्थापावी असें होतें. खेमसावंत आरवली येथें असतां सखोजीनें त्यांच्यावरहि चाल केली (इ. स. १६९२). दोघांची तेथील वेताळाच्या देवळांत लहानशी लढाई झाली. व तींत सखोजीचा मेहुणा पडला; त्यामुळें सखोजी पळून गेला. नंतर कांहीं दिवसांनीं सखोजीनें खेमसावंत यांच्याशीं तह केला व कुडाळदेशस्थ प्रभूंचें ठाणें जें कुडाळ शहर त्याजवर दोघांनीं मिळून हल्ला करण्याचें ठरविलें. आणि त्याप्रमाणें इ. सन १६९३ मध्यें सखोजीनें प्रथम कुडाळावर स्वारी केली. नंतर त्यास खेमसावंत येऊन मिळाला. या दोघांचा कुडाळ येथें बरेच दिवस तळ पडला होता. नंतर देसायांच्या मदतीस सरदाजखान व पीरखान हे दोन मुसलमान सरदार आले. तिघांनीं मिळून सखोजी व खेमसावंत यास तेथून घालवून दिलें. ते गोवें अमलांत

पळून गेले. सरदाजखानानें बांदेंपेडण्यापर्यंत त्यांचा पाठलाग केला. हे महाल त्यावेळीं खेमसावंत यांच्या ताब्यांत होते. तेथें सरदाजखानानें आपलीं ठाणीं बसविलीं.

थोड्याच दिवसांनीं खेमसावंत यांनीं बांदें व पेडणें हीं परत घेतलीं. व कुडाळचा सुभेदार भानजी गोपाळ व बांद्याचा सुभेदार आवजी नागनाथ यांजवर चाल करून त्यांस पळवून लाविलें, आणि बारदेशपर्यंत त्यांचा पाठलाग करून त्यांस ठार मारिलें [इसवी सन १६९६]. नंतर नारायण प्रभु व जोगण प्रभु कुडाळच्या किल्ल्याचा आश्रय धरून राहिले होते, त्यांस त्यांनीं वेढा दिला; परंतु बरेच दिवस किल्ला हातीं आला नाहीं. शेवटीं एकदां किल्यांतील सैन्य बाहेर येऊन लढाई जुंपली. तींत जोगण प्रभु गोळी लागून पडला. त्यामुळें सैन्यांत भीति उत्पन्न होऊन पळापळ सुरू झाली. नारायण प्रभूसही पुढें कांहींच आशेचें चिन्ह दिसेना; तेव्हां तोहि आपल्या मुलांमाणसांसह पळून गेला. अशा रीतीनें इसवी सन १६९७ त या कुडाळदेशस्थ प्रभूंच्या सत्तेचा शेवट झाला.

दिल्लीच्या मोंगल बादशहांनीं विजापूरच्या राज्याची सत्ता नष्ट करून या प्रांतांत आपली सत्ता स्थापन केली होती. तथापि त्यांचे राज्याचा विस्तार फार मोठा असल्यामुळें या सावंतवाडीच्या लहानशा प्रदेशाकडे त्याचें विशेष लक्ष गेलें नाहीं असें दिसतें. विजापूरच्या बादशहास या परगण्याच्या सरदेसायांकडून जसा वसूल पोंचत असे तसा दिल्लीच्या बादशहास तो पोंचत असल्याचें आढळून येत नाहीं. शेवटीं खेमसावंत यांनीं कुडाळदेशस्थ प्रभूंस या प्रांतांतून घालवून दिल्यावर तर, ते स्वतंत्र झाले असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

भाग ४ था.

भोंसले राजघराण्याची स्वतंत्र कारकीर्द.

दुसरे खेमसावंत इ. सन १६९७-१७०९.

खेमसावंत यांनीं स्वतंत्रता मिळविली त्यावेळीं त्यांच्या ताब्यांत कुडाळ परगणा व बांदें, मणेरी, पेडणें, डिचोली व सांखळी हे पांच महाल होते. यावरूनच हरएक पत्रव्यवहारांत सावंत यास 'सरदेसाई परगणे कुडाळ व महालानिहाय' असें ह्मणण्याची चाल पडली. हे पांच महाल भीमगड परगण्यांत मोडत असत. भीमगड या नांवाचा किल्ला सांखळी महालाच्या पूर्वेस सह्याद्रिपर्वताच्या शिखरावर आहे. त्याच किल्ल्याच्या नांवावरून परगण्याचें नांव पडलें असावें असें दिसतें.

खेमसावंत यांनीं चराठें येथें आपलें ठाणें ठेविलें होतें. तेंच पुढें राजधानीचें शहर करून त्यास सुंदरवाडी असें नांव दिलें; व त्या ठिकाणीं एक राजवाडा बांधिला. त्यासच नवा कोट असें ह्मणतात. पूर्वींहि येथें शहराच्या पश्चिमेस एक लहानसा कोट होता. त्यास तेव्हांपासून जुना कोट असें ह्मणूं लागले. या शहराचें क्षेत्रफळ सुमारें पाऊण चौरस मैल आहे. त्यांनीं या ठिकाणीं कांहीं सारा न घेतां लोकांस राहण्यासाठीं मोफत जमिनी देऊन वसाहत करविली. राजपुरोहित कोळंबेकर, शास्त्री देवस्थळी, पुराणिक जांभेकर, ताटकर वगैरे आश्रितमंडळीस राजवाड्यानजीक ठेविलें. पूर्वीं सबनीस, चिटणीस व खासनीस असे तीनच दरकदार होते. त्याशिवाय जमाबंदीचें काम पाहण्यासाठीं दप्तरदार रांगणेकर, खजिन्याच्या व्यवस्थेसाठीं पोतनीस, पागेच्या देखरेखीसाठीं पागनीस, सामानाच्या कोठीवर कोटणीस, तटाचें काम पाहण्यासाठीं तटणीस, बारनिशीच्या कामासाठीं फडणीस असे दरकदार नेमिले. आश्रितमंडळी ही सर्व कऱ्हाडे ब्राह्मण जातीची व सर्व दरकदार लोक गौडसारस्वत ब्राह्मण जातीपैकीं शेणवी पोटभेदाचे होते सैन्याच्या कामावरील मुख्य अधिकारी

भोंसले राजघराण्याची वंशावळ.


- खेमसावंत १६२७–४०.
  - सुंदराबाई नागोजी सुर्वे
  - सोमसावंत १६४०–४१
  - फोंडसावंत १६४१–६१
    - खेमसावंत १६७६–१७०९
      - द्वारका-रामराव पाटणकर
      - भवानी-घाटगे
      - भागू-जयदेवराव निंबाळकर
    - नारसावंत
      - फोंडसावंत १७०९–३८
        - नारसावंत
          - रामचंद्र सावंत १७३८–५६
            - खेमसावंत (राजश्री) १७६६–१८०३
              - दत्तक गोपिका-भाने पंढरपूरकर
              - ललाबाई
              - रामचंद्र सा. (भाऊसाहेब) १८०३–०८
              - हंसाबाई-जानराव निंबाळकर
              - आकूबाई-घाटगे
              - त्रिवणा-आपाजीराव पाटणकर
        - अंबुबाई मांधाते सुर्वे
        - गोडूबाई-आनंदराव घाटगे
        - कृष्णा-यदीवंत सर्जेराव
        - नागसावंत
          - चिमाबाई-नीळकंठराव जांभुटकर
          - लखमसावंत हेरेकर
            - विश्वासराव
              - रामचंद्रराव
        - लखमसा.
        - खेमसा.
        - जयराम सा. १७३८–५३
        - सोमसा.
          - आकाबाई-नारायणराव पाटणकर
          - जयराम सा.
          - बायजाबाई-जोत्याजीराव पाटणकर
          - फोंडसावंत (बाबासाहेब) १८०८–१२
            - नारसावंत
            - खेमसावंत (बापूसाहेब) १८१२–६७
              - साहेबजी-दादासाहेब घाटगे झुंझारराव
              - बायामा-नानासाहेब जांभुटकर
              - फोंडसावंत (आनासाहेब) १८६७–६९
                - रघुनाथ सावंत (बाबासाहेब) १८६९–९९
                  - हंसाबाई-श्री. उदाजीराव पोवार संस्थान धार
                  - तानीबाई-बाबा जहाग
              - रामचंद्र सावंत (भाऊसाहेब)
                - बाबइसाहेब-श्री. जयाजीराव शिंदे ग्वालेर
              - सोमसावं (आबासाहे
                - लाडूबाई-आ साहेब घाटगे
          - राजाराम सा.
        - रघुनाथ सा.
        - शिवराम सा.
          - सीता-पिरोजी निकम
          - आकूबाई-भवानराव कोकुडकर
          - भगवंत सावंत
        - आत्माराम सा.
          - जिवाजी सावंत
            - गुणाबाई-नागोजीराव घाटगे
  - लखमसावंत १६६१–७६
  - नारसावं

राम दळवी सेनापति हा असून, त्याशिवाय कानसावंत गुरबुटकर, मादसावंत कारिवडेकर, भोजसावंत व रुपसावंत माणगांवकर वगैरे मराठे सरदार मुख्य होते. सरदार, दरकदार व आश्रित या सर्वांचीं कामें वंशपरंपरेनें चालत असत.

खेमसावंत यांस मुख्य शत्रु गोवें येथें राज्य करणारे पोर्तुगीज लोक हे होते. त्यांच्या व यांच्या नेहमीं चकमकी होत असत. खेमसावंत हेही पोर्तुगीज लोकांच्या मुलुखांत जाऊन तेथें लुटालूट व जाळपोळ करीत. व तेथील ख्रिश्चन लोकांचीं देउळें जाळून नासधूस करीत. त्यावरून पोर्तुगीज लोक त्यांच्या खेमसावंत या नांवाचा अपभ्रंश करून त्यांस Queimar Sant (केमार सांत) असें ह्मणत असत. या पोर्तुगीज शब्दाचा अर्थ 'साधूंनां जाळणारा' असा आहे. पोर्तुगीज लोकांनींहि सावंतांस बराच त्रास दिला. इसवी सन १७०३ त कैतान डिमेलो हा गोव्याचा गव्हर्नर जनरल असतां त्यानें सावंतांच्या आमोणें किल्ल्यावर स्वारी करून तो जमीनदोस्त केला. पुढें दोन वर्षांनीं त्यानें स्वतः डिचोलीच्या किल्ल्यावर जाऊन तो सर केला. इ. सन १७०६ त त्यानें खोरजुवें व फोंडें हीं बेटें घेतलीं. खेमसावंतांपासून डिचोली घेतल्यानंतर गव्हर्नर जनरलानें डिचोलीच्या व सांखळीच्या आसपासचा मुलुख सौंध्याच्या राजाला दिला व सावंत, आंग्रे वगैरे यांचे लोकांपासून त्याचें संरक्षण करण्याचें कबूल केलें. त्यावरून तो पोर्तुगालच्या राजाचा मांडलिक होण्यास कबूल झाला. आणि त्यानें आपल्या मुलुखांत पोर्तुगीज लोकांनां देउळें बांधण्याची व कांहीं कर न देतां राहण्याची मोकळीक दिली.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें कुडाळदेशस्थ प्रभूंची सत्ता नष्ट झाली, तथापि सावंतांस घालवून देण्यासाठीं नारायण प्रभूची खटपट चालू होतीच व मालवणाकडील कितीएक गांवांचा वसूलही तो घेत असे. तो कान्होजी आंग्रे यांजकडे मदत मागण्यासाठीं गेला. आंग्रे हा मराठ्यांचा मोठा पराक्रमी सरदार होता. त्यानें त्याला इसवी सन १६९९ त सैन्याच्या खर्चासाठीं पैशाचीहि मदत केली; परंतु या मदतीचा कांहीं उपयोग झाला नाहीं. कारण सावंत हे शिरजोर असल्यामुळें आंग्र्यांचें त्यांच्यापुढें कांहीं चाललें नाहीं.

भोंसले राजघराण्याची वंशावळ.



राम दळवी सेनापति हा असून, त्याशिवाय कानसावंत गुरबुटकर, मादसावंत कारिवडेकर, भोजसावंत व रुपसावंत माणगांवकर वगैरे मराठे सरदार मुख्य होते. सरदार, दरकदार व आश्रित या सर्वांचीं कामें वंशपरंपरेनें चालत असत.

खेमसावंत यांस मुख्य शत्रु गोवें येथें राज्य करणारे पोर्तुगीज लोक हे होते. त्यांच्या व यांच्या नेहमीं चकमकी होत असत. खेमसावंत हेही पोर्तुगीज लोकांच्या मुलुखांत जाऊन तेथें लुटालूट व जाळपोळ करीत. व तेथील ख्रिश्चन लोकांचीं देउळें जाळून नासधूस करीत. त्यावरून पोर्तुगीज लोक त्यांच्या खेमसावंत या नांवाचा अपभ्रंश करून त्यांस Queimar Sant (केमार सांत) असें ह्मणत असत. या पोर्तुगीज शब्दाचा अर्थ 'साधूंनां जाळणारा' असा आहे. पोर्तुगीज लोकांनींहि सावंतांस बराच त्रास दिला. इसवी सन १७०३ त कैतान डिमेलो हा गोव्याचा गव्हर्नर जनरल असतां त्यानें सावंतांच्या आमोणें किल्ल्यावर स्वारी करून तो जमीनदोस्त केला. पुढें दोन वर्षांनीं त्यानें स्वतः डिचोलीच्या किल्ल्यावर जाऊन तो सर केला. इ. सन १७०६ त त्यानें खोरजुवें व फोंडें हीं बेटें घेतलीं. खेमसावंतांपासून डिचोली घेतल्यानंतर गव्हर्नर जनरलानें डिचोलीच्या व सांखळीच्या आसपासचा मुलुख सौंद्याच्या राजाला दिला व सावंत, आंग्रे वगैरे यांचे लोकांपासून त्याचें संरक्षण करण्याचें कबूल केलें. त्यावरून तो पोर्तुगालच्या राजाचा मांडलिक होण्यास कबूल झाला. आणि त्यानें आपल्या मुलुखांत पोर्तुगीज लोकांनां देउळें बांधण्याची व कांहीं कर न देतां राहण्याची मोकळीक दिली.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें कुडाळदेशस्थ प्रभूंची सत्ता नष्ट झाली, तथापि सावंतांस घालवून देण्यासाठीं नारायण प्रभूची खटपट चालू होतीच व मालवणाकडील कितीएक गांवांचा वसूलही तो घेत असे. तो कान्होजी आंग्रे यांजकडे मदत मागण्यासाठीं गेला. आंग्रे हा मराठ्यांचा मोठा पराक्रमी सरदार होता. त्यानें त्याला इसवी सन १६९९ त सैन्याच्या खर्चासाठीं पैशाचीहि मदत केली; परंतु या मदतीचा कांहीं उपयोग झाला नाहीं. कारण सावंत हे शिरजोर असल्यामुळें आंग्र्यांचें त्यांच्यापुढें कांहीं चाललें नाहीं.

नंतर नारायण प्रभु हा इसवी सन १७०४ त मदत मागण्यासाठीं विजापूर येथील मोंगलांच्या सुभेदाराकडे गेला. तेथें त्यास मदत मिळाली नाहीं. मात्र सैन्याच्या वगैरे खर्चाकरितां ह्मणून या प्रांताच्या उत्पन्नापैकीं १००१ होनाची नेमणूक त्यास करून दिली.[1]

खेमसावंत हे दिल्लीच्या बादशहास या परगण्याचा कांहीं वसूल देत नसत. तरीपण त्यांनीं दिल्लीपतीची सत्ता साफ झुगारून दिली होती असें नाहीं. मधून मधून त्यास मदत करण्याचा त्यांनीं क्रम ठेविला होता. इसवी सन १७०६ च्या सुमारास मोंगलांचा सरदार सय्यद गजफर अल्लीखान हा फोंडा येथील लष्करचा मुख्य अंमलदार होऊन आला; तेव्हां त्यास हरवक्तीं मदत करण्याचें काम दिल्लीच्या बादशहानें खेमसावंत यांजवर सोंपविलें होतें. तसेंच इसवी सन १७०७ त औरंगजेब मरण पावल्यानंतर त्याचा मुलगा मोअज्जीम यानेंही खेमसावंत यांस मोठ्या गौरवानें पत्र लिहून फौज घेऊन मदतीसाठीं बोलाविलें होतें. यानंतर मात्र दिल्लीच्या गादीविषयीं आपसांत तंटे लागून त्या राज्यास उतरतीकळा लागली; व सावंत यांनीं त्यांच्याशीं संबंध ठेवण्याचें सोडून दिलें.

नंतर सावंत यांनीं सातारच्या छत्रपतीकडे संधान लाविलें. याच संधींत औरंगजेब मरण पावून त्याचा वडील मुलगा मोअज्जीम हा गादीवर बसला. यानें आपल्या राज्यारोहणप्रसंगीं संभाजीचा मुलगा शाहू हा कैदेंत होता, त्यास बंधमुक्त केलें. त्यावेळीं सातारच्या गादीवर राजारामाचा मुलगा शिवाजी हा असून सर्व राज्यकारभार त्याची आई ताराबाई ही पाहत असे. शाहू हा दक्षिणेंत येऊन राज्यावर आपला हक्क सांगूं लागला. तें देण्यास ताराबाई कबूल होईना. तेव्हां तो सरदारांस आपल्या बाजूस वळवून घेऊन लढाई करून तें घेण्याचा प्रयत्न करूं लागला. त्या प्रसंगीं खेमसावंत यांनीं शाहूस न मिळतां शिवाजीचीच बाजू राखिली; आणि रांगणा व पन्हाळा या किल्ल्यांच्या रक्षणांत त्यास चांगली मदत केली. नंतर त्यांनीं आपलेकडील विश्राम अनंत सबनीस व जिवाजी राम चिटणीस या दोघांस शिवाजीकडे पाठवून त्यास विनंति केली कीं, आपणाकडे कुडाळ

1 परिशिष्ट १ लें लेख नंबर २५.

परगणा व पांच महाल वतनादाखल मोकासा चालवावे. ही विनंति कळतांच शिवाजीनें रामचंद्र नीळकंठ अमात्य हुकमतपन्हा व गिरजोजी जाधव या दोघांस खेमसावंत यांस भेटण्यासाठीं पाठविले. खेमसावंत यांनीं त्यांची माणगांव येथें भेट घेऊन त्यांजकडे आपण एकनिष्ठेनें वागूं व शाहूराजास मिळणार नाहीं- असें कबूल केलें. त्यावरून शिवाजीनें खूष होऊन सावंत यांस त्यांच्या मागण्याप्रमाणें ता० २७ फेब्रुवारी सन १७०८ रोजीं कुडाळ परगणा व पंचमहाल मोकासा करून दिले, आणि शिवाय सावंतांचा बहुमान करण्यासाठीं त्यांस एक हत्ती, एक घोडा, एक उरानडाव व एक गुस्त इतके जिन्नस पाठवून दिले. यावरून सातारच्या दरबारांत त्यावेळीं खेमसावंत यांचें किती वजन होतें हें दिसून येतें.

शाहू व शिवाजी यांच्यामध्यें चाललेल्या युद्धांत शेवटीं शाहूचीच सरशी होऊन तो सिंहासनावर बसला. आणि थोड्याच दिवसांनीं तो रांगणा किंवा प्रसिद्धगड या किल्ल्याच्या बाजूला आला. सातारच्या छत्रपतीशीं एकनिष्ठेनें वागावें हाच खेमसावंत यांचा निश्चय होता. ह्मणून त्यांनीं आपले कारभारी विश्राम अनंत सबनीस व जिवाजी राम चिटणीस यांस पाटगांव येथें पाठवून आपला एकनिष्ठभाव शाहू छत्रपतीस कळविला. त्यावरून शाहू छत्रपति हेही खूष होऊन त्यांनीं सावंत यांस कुडाळ परगणा व पांच महाल इनाम करून दिले. यावेळीं त्यांनां साळशी महालाचा अर्धा वसूल इनाम मिळाला.

अशा रीतीनें त्या वेळच्या मुख्य मुख्य सत्ताधिकाऱ्यांकडून देशमुखी आपल्याकडेच चालावी अशाबद्दल संमति मिळवून, आणि आपल्या राज्याची भक्कम पायावर स्थापना करून खेमसावंत हे इसवी सन १७०९ त निवर्तले. त्यांस पुत्रसंतान नव्हतें. तीन मुली मात्र होत्या. पहिली द्वारका रामराव पाटणकर यांस, दुसरी भवानी ही घांटगे यांस व तिसरी भागू ही जगदेवराव निंबाळकर यांस दिली होती. ते एकपत्नीव्रत असल्यामुळें त्यांस नाडीबंद असें ह्मणत. त्यांच्या माठ्यांत कोणी स्त्रीनें जातां नये असा अद्यापिहि नियम आहे. त्यांनीं देशकतीचें व स्वतंत्रपणें राज्याचें ३४ वर्षें काम केलें.

१ परिशिष्ट १ लें, लेख नंबर २६.

दुसरे फोंडसावंत (आनासाहेब)

इ. स. १७०९–१७३८

खेम सावंत निवर्तल्यावर त्यांच्या बंधूचे पुत्र फोंड सावंत उर्फ आनासाहेब हे इ. सन १७०९ त गादीवर बसले. या वेळीं त्यांचें वय ४२ वर्षांचें होतें. हे गादीवर बसून कांहीं दिवस लोटले नाहींत तोंच, कोल्हापूरच्या छत्रपतीनीं वाडीवर चाल करून तें शहर हस्तगत केलें. या स्वारीचें कारण, सावंत भोंसले यांनीं साताऱ्याच्या शाहू छत्रपतींचें वर्चस्व कबूल करून त्याच्याशीं दळणवळण ठेविलें हेंच असावें. पण भोंसले यांनीं थोड्याच दिवसांनीं तें शहर परत घेतलें. याच संधींत नारायण प्रभु हाही कोल्हापूरकर यांजकडे सावंतांच्याविरुद्ध मदत मागण्यासाठीं गेला होता. त्यावरून जंजिरे सिंधुदुर्ग येथील बऱ्हाणजी मोहिते यास नारायण प्रभूस मदत देण्याविषयीं छत्रपतींनीं लिहिलें होतें; परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं.

तारीख ७ एप्रिल सन १७१२ रोजीं फोंड सावंत यांनीं गोव्याचा गव्हर्नर राड्रिग दकोस्त याच्याबरोबर तह केला. त्यांत असें ठरलें कीं, भोंसल्याच्या मुलुखापैकीं जो मुलुख पोर्तुगीज लोकांनीं सौंद्याच्या राजाला दिला आहे, त्याच्यासाठीं भोंसल्यांनीं पोर्तुगीज लोकांबरोबर लढाई करूं नये; सरदेसाई यांच्याजवळ असलेला मुलुख त्यांच्याकडेच राहावा; भोंसल्यांच्या राज्यांत व बंदरांत पोर्तुगीज लोकांना पूर्ण स्वतंत्रता असावी; भोंसले यांनीं अरब लोकांशीं व्यापार करूं नये किंवा त्यांना आपल्या बंदरांत येण्याची परवानगी देऊं नये; त्यांनीं पनेळें व खोरजुवें या बेटांवरील आपला सर्व हक्क सोडावा; रेव्हों[1]रा येथील ख्रिश्चन देऊळ बांधण्याकरितां १०००० झेऱ्[2]यांफीन द्यावे; आणि दोन अरबी घोडे किंवा त्याच्याऐवजीं १००० झेऱ्याफीन पोर्तुगीज लोकांस दरसाल देत जावे.

ह्या वेळीं कुडाळदेशस्थ प्रभु हे आंग्र्याच्या आश्रयानें साळशी महालांत राहत होते. त्यांचा समूळ नाश करण्यासाठीं खारेपाटण येथें फोंड

१ रेव्होरा हा गांव बारदेशांत पिरणें गांवाजवळ आहे. २ एक झेऱ्याफीन म्हणजे सुमारें कंपनी एक रुपया होतो.

सावंत यांनीं त्यांच्यावर स्वारी केली. तेथें नारायण प्रभूची व सावंतांच्या सैन्याची मोठी लढाई झाली. तींत नारायण प्रभूचा वडील मुलगा बाबाजी प्रभु हा पडला व त्याची बायको सती गेली, आणि नारायण प्रभु कुंभवड्यास पळून गेला (इ. सन १७१९). परंतु नारायण प्रभूची आशा अजूनही सुटली नाहीं. पुनः तो मदत मागण्यासाठीं कोल्हापूरकरांकडे गेला. पण त्यांनीं मदत देण्याचें कबूल केलें नाहीं. मात्र कुडाळच्या कोटांत मारला गेलेला जोगण प्रभु याच्या बायका काशीबाई व येसूबाई यांचा योगक्षेम चालण्यासाठीं आडेली गांव हा इनाम दिल्याची सनद दिली (इसवी सन १७१८). परंतु तो सावंत यांच्या मुलुखापैकीं असल्यामुळें सनदेचा कांहीं उपयोग झाला नाहीं. नारायण प्रभु कुंभवड्यास गेल्यानंतर तो त्याच ठिकाणीं कांहीं वर्षें राहिला व इसवी सन १७३६ त तेथेंच मरण पावला. नंतर त्याचे वंशज कोल्हापूरकरांच्या आश्रयानें मालवण येथील किल्ल्यांत राहूं लागले.

इसवी सन १७१९ च्या सुमारास फोंड सावंत यांच्या वडील बायकोचा मुलगा नार सावंत यानें बापाच्या विरुद्ध बंड केलें. याचें कारण असें कीं, फोंड सावंत यांस पुष्कळ मुलें असून कुटुंब फार मोठें होतें. त्यांचीं मुलें श्रीमंत स्थितींत वाढलेलीं असल्यामुळें चांगले कपडेलत्ते व दागदागिनें आपल्यास असावे अशी त्यांची इच्छा असे. फोंड सावंत हे बेताबातानें वागणारे व व्यवहारांत फार दक्ष असत. त्यांनीं आपल्या मुलांस 'स्वतः मिळवावें व खावें' असें सांगितलें. त्यावरून राग येऊन नार सावंत यानें बंड केलें असें ह्मणतात. नार सावंत यानें आपल्या साहाय्यास कांहीं लोक घेऊन मुलुखांत धुमाळी मांडिली, व लोकांस फार त्रास देऊं लागला. त्यानें या मुदतींत कांहीं जमिनी इनाम करून दिल्याच्या सनदाहि सांपडतात. इसवी सन १७१६ त त्यानें बांदें येथील मठपर्वतावरील देवस्थानाकडे कांहीं जमीन इनाम दिली त्याबद्दल दिलेली सनद अजून चालत आहे. तशाच आणखीही कित्येक सनदा आढळतात.

---

१ परिशिष्ट १ लें, लेख नंबर २७.

ह्या बंडाचा मोड करण्यासाठीं फोंड सावंत यांनीं त्यास पकडण्याकरितां कांहीं लोक त्याजवर पाठविले. ह्या लोकांनीं नार सावंत यास अगदीं जेरीस आणिलें; तेव्हां तो वाडी येथें जुन्या कोटांत जाऊन राहिला. तेथेंही फोंड सावंतांचे लोक त्यास धरण्यासाठीं गेले. दोघांची चकमक सुरू झाली; त्यावेळीं नार सावंत हा खिडकींतून बाहेर पाहत असतां त्यास अकस्मात् गोळी लागून तो ठार झाला (इ. स. १७१६). त्या वेळीं नार सावंत यांस रामचंद्र सावंत या नांवाचा चार वर्षांचा एक मुलगा होता. नार सावंत यांची बायको राजसबाई हिनें त्या लहान मुलास फोंड सावंत यांच्या स्वाधीन केलें आणि नवऱ्याबरोबर ती सती गेली.

ह्या मुलाच्या मरणानें फोंड सावंत यांस फार दुःख झालें; आणि त्यांतही त्यांची वडील बायको ह्मणजे नार सावंताची आई लक्ष्मीबाई, हिचा पुत्राच्या मरणामुळें त्यांस विशेष जाच झाल्यामुळें त्यांचें दुःख दुणावलें. शेवटीं आपल्या बायकोचें व स्वतःच्या मनाचेंहि कांहीं शांतवन व्हावें ह्मणून नार सावंतांचा अज्ञान मुलगा रामचंद्र सावंत याच्या गळ्यांत राज्याचे शिक्के घालून ते त्याच्या नांवें आपण राज्यकारभार पाहूं लागले.

त्याचप्रमाणें फोंड सावंत यांच्या दुसऱ्या बायकोचे मुलगे नाग सावंत, लखम सावंत व खेम सावंत यांनीं वरघाटीं जाऊन चंदिगडें व हेरें ह्या महालांवर स्वारी करून ते हस्तगत केले; आणि चंदिगडें येथें नाग सावंत यांनीं आपलें ठाणें स्थापन करून गंधर्वगड किल्ला बांधिला (इ.स.१७२१). कांहीं दिवसांनीं चंदिगडें महाल त्यांच्या हातून गेला. नाग सावंत यांच्यामागून लखम सावंत हा गादीवर बसला. लखम सावंत यास मुलगा नव्हता, ह्मणून त्याच्यामागून त्याची आई भागीरथीबाई हिनें एक वर्षपर्यंत राज्यकारभार चालविला. नंतर लखम सावंत यांची बायको मैनाबाई ही कारभार पाहूं लागली. तिनें इसवी सन १८४२ च्या सुमारास कुडाळच्या किल्लेदारसावंतांच्या घराण्यांतील एक दहाबारा वर्षांचा मुलगा दत्तक घेऊन त्याचें नांव विश्वासराव असें ठेविलें. तो कांहीं वर्षें राज्य करून मरण पावल्यावर त्याचा मुलगा रामचंद्र सावंत उर्फ बाळासाहेब हा गादीवर बसला. हेच तूर्त हेरें संस्थानचे जाहागिरीचें काम पाहतात.

युरोप खंडांतून व्यापाराच्या निमित्तानें कित्येक देशचे लोक हिंदुस्थानांत येण्यास पहात असून त्यांपैकीं पोर्तुगीज व डच हे हिंदुस्थानांत येऊन त्यांनीं कांहीं मुलूखही काबीज केल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. त्यांच्या मागून सोळाव्या शतकाच्या अखेरीस इंग्लिश लोक हिंदुस्थानांत आले, व इसवी सन १६१२ त त्यांनीं सुरत येथें आपली वखार घातली. पुढें त्यांनींहि व्यापारासाठीं थोडथोडा मुलुख आपल्या हाताखालीं घातला. इ. सन १६६२ त पोर्तुगालच्या राजाकडून इंग्लंडच्या दुसऱ्या चार्लस राजाला मुंबई बेट आंदण मिळालें. इंग्लिश लोक हिंदुस्थानांत जूटीनें व्यापार करीत असत व त्यासाठीं त्यांनीं जी मंडळी स्थापन केली होती तिला ईस्ट इंडिया कंपनी असें नांव दिलें होतें. इंग्लंडच्या राजाला मिळालेलें मुंबई बेट त्यानें इ. सन १६६८ त या कंपनीस विकत दिलें. त्या ठिकाणीं त्यांनीं आपलें पश्चिम किनाऱ्यावरील मुख्य ठाणें ठेविलें व गव्हर्नरची नेमणूक केली.

या व्यापारी लोकांस पश्चिम किनाऱ्यावरून जात येत असतांनां चांचे लोकांपासून फार उपद्रव होत असे. चांचे लोकांत सावंतवाडीचे सावंत व कुलाब्याचे आंग्रे हे विशेष प्रसिद्ध होते. आणि त्यांचा उपद्रव नाहींसा करण्यासाठीं इंग्लिश लोकांचे नेहमीं प्रयत्न चालू होते. इ. सन १७१७ च्या एप्रिल महिन्यांत मिस्तर बून हा मुंबईचा गव्हर्नर असतां त्यानें वेंगुर्ल्यावर हल्ला करण्यासाठीं कॉमोडोर वीक्स् नांवाच्या अधिकाऱ्याच्या हाताखालीं Fame 'फेम्' आणि Britannia 'ब्रिटानिया' या नांवाचीं दोन गलबतें[1] देऊन त्यास पाठविलें. या गलबतावर स्ट्यांटन् नांवाच्या कंपनीच्या सैनिकाच्या हाताखालीं एक शिपायांची तुकडीहि होती. वाटेंत Revenge 'रिव्हेंज' नांवाचें आणखी एक गलबत त्यांस येऊन मिळालें. याशिवाय त्याच्याबरोबर आणखी लहान दहाबारा गलबतें होतीं. वीक्स् हा भित्रा असल्यामुळें लढाईच्या कामाला नालायक होता; आणि त्याच्याजवळ त्या कामाला पुरे इतकें सैन्यही नव्हतें.

---

१ गलबतें ह्मणजे वल्हवून न्यावयाचीं दोन डोलकाठ्यांचीं मोठीं तारवें असत. त्यांत ४० पासून ५० टनांपर्यंत ओझें राही; व त्यांच्यावर चार पासून आठपर्यंत तोफा असत

वेंगुर्लें बंदर फार खडकाळ असून त्याच्याजवळ फार लाटा उसळत असल्याकारणानें कित्येक दिवसपर्यंत त्यांस किनाऱ्यावर उतरण्याजोगी जागाच मिळेना. शेवटीं ते किल्ल्यानजीक एका जागीं उतरले, आणि निरनिराळ्या बाजूंनीं त्यांनीं किल्ल्यावर तोफांचा भडिमार सुरू केला; परंतु इतक्यांत वॉक्स् आणि स्ट्यांटन् या दोघां अधिकाऱ्यांचें मोठें भांडण झालें; व त्यामुळें ही स्वारी लवकरच मुंबईला परत गेली.

इसवी सन १७२० त इंग्लिशांनां आंग्र्याचा बंदोबस्त करण्यासाठीं त्याच्याबर स्वारी करावयाची होती. याच सुमारास कान्होजी आंग्र्यानें सावंत भोंसले यांच्या कांहीं गलबतांवर हल्ला करून त्यांनां लुटल्यामुळें सावंत हेही आंगऱ्याचा सूड उगविण्यास पहात होते. त्यांना ही आयतीच संधि मिळाली. त्यांनीं याच वर्षाच्या सप्टंबर महिन्यांत आपला वकील इंग्लिशांकडे पाठवून आंगऱ्यांवर हल्ला करण्याच्या कामीं आपण मदत करतों असें त्यांस कळाविलें; आणि अशी अट घातली कीं, विजयदुर्गाच्या दक्षिणेस सुमारें २० मैल असलेल्या आंगऱ्याच्या देवगड किल्ल्यावर पहिल्यानें हल्ला करावा. त्यावरून पहिल्यानें देवगड जवळील किनाऱ्याची पाहणी करण्यासाठीं इंग्लिशांनीं आपलीं कांहीं गलबतें ता० ७ आक्टोबर सन १७२० रोजीं पाठविलीं. ता० १८ आक्टोबर रोजीं इंग्लिशांचा ॲडमिरल ब्राऊन हा आपल्या हाताखालचें आरमार घेऊन देवगडास आला; आणि प्रथम त्यानें किल्ल्यावर तुरळक तुरळक तोफा सोडण्याचा आरंभ केला; परंतु त्यापासून कांहीं उपयोग होईना. तेव्हां ब्राउननें तो किल्ला एकदम हल्ला करून सर करण्यासाठीं आपल्या सैन्यास जमिनीवर उतरण्यास हुकूम केला. परंतु त्याच्या हाताखालच्या अंमलदारांनीं तो मानिला नाहीं. त्यामुळें त्याला किल्ल्याचा वेढा उठवून मुंबईस परत जाणें भाग पडलें. या स्वारींत इंग्लिशांचें बरेंच नुकसान झालें. सावंत यांनीं या लढाईंत मदत देण्याचें कबूल केलें होतें खरें; परंतु त्याप्रमाणें त्यांनीं मदत केल्याचा कोठें उल्लेख सांपडत नाहीं.

तारीख ९ जानेवारी सन १७२२ रोजीं बून आपली गव्हर्नरची जागा सोडून स्वदेशीं जाण्यास निघाला, व त्याच्या जागीं फिप्स् याची

नेमणूक झाली. तो कारवार आणि अंजेंगो येथें माल पुरविण्यासाठीं
'Victoria' (व्हिक्टोरिया) आणि 'Revenge' (रिव्हेंज) या
नांवाचीं दोन गलबतें जात होतीं, त्यांच्याबरोबर 'London' (लंडन)
नांवाच्या आपल्या गलबतांत बसून निघाला. तो किनाऱ्यानें दक्षिणेस
चालला असतां, त्याला [1]अंजेदिवाजवळ सावंत यांच्या गुराबा एक गल-
बत लुटीत आहेत असें आढळलें. त्यानें सावंतांच्या गुराबांवर हल्ला
करून त्यांच्यापासून त्या गलबताला सोडविलें; आणि सावंतांची एक
गुराब घेतली व दुसरी किनाऱ्यावर घालवून दिली. अशा रीतीनें शेवटीं
हिंदुस्थानांतून जातांना आपल्या हाडवैऱ्यावर लहानसा तरी जय
मिळविल्याबद्दल त्याला फार समाधान वाटलें.

सावंत भोंसले यांच्या चंचेपणापासून पोर्तुगीज लोक व सौंद्याचा
राजा यांसहि बराच त्रास सोसावा लागत असे. इ. स. १७२६ त
सावंत भोंसले यांनीं सौंद्याच्या राजाच्या ताब्यांत असलेल्या फोंडा
किल्ल्यावर हल्ला करून तो हस्तगत केला. तेव्हां सौंद्याचा राजा पो-
र्तुगीज लोकांचा दोस्त असल्यामुळें त्यानें त्यांच्याकडे मदत मागितली.
पोर्तुगीज लोकांनीं त्याचें मागणें कबूल केलें, व भोंसल्यापासून तो किल्ला
जिंकून घेऊन सौंद्याच्या राजास परत दिला.

कुलाब्याचा कान्होजी आंग्रे इ. स. १७२९ त मरण पावला. त्याला
लग्नाच्या बायकोपासून तीन व दासीपुत्र तीन मिळून सहा मुलगे होते.
त्याच्या मरणानंतर त्याच्या मुलांत गादीविषयीं लढा पडला. दासीपुत्रां-
पैकीं तुळाजी हा त्या सर्वांत बलिष्ट व कावेबाज असल्यामुळें त्यानेंच
सत्ता बळकाविली व तो कान्होजीच्या मागून पश्चिमकिनाऱ्यावर राजाच
झाला. त्याच्यापासून सावंत व इंग्रज या दोघांसहि फार त्रास पोंचूं
लागला. तेव्हां त्याचा नाश करण्यासाठीं दोघांनीं जंजिरे मुंबई येथें ता. २०
जानेवारी सन १७३० रोजीं तह केला. हा तह करण्यास सावंत भोंसले
यांच्यातर्फे आरमारावरील मुख्य अधिकारी बापूजी नाईक तोंडोलकर
हा असून इंग्रजातर्फेनें मुंबईचा गव्हरनर राबर्ट कावन हा होता. या

[1] हें बेट मुरगांवच्या दक्षिणेस सुमारें २० मैलांवर आहे.

तहांत असें ठरलें कीं, समुद्रांत एकमेकांचीं गलबतें एकमेकांस आढळल्यास तीं एकमेकांनीं सुखरूपपणें जाऊं द्यावीं; तसेंच दोघांपैकीं कोणाचेंहि गलबत तुफानामुळें किंवा तंट्याबखेड्यामुळें संकटांत पडून दुसऱ्याच्या किनाऱ्यास लागल्यास त्यास लागेल ती मदत करावी; एकमेकांच्या मुलुखांत एकमेकांस वाजवी जकात देऊन व्यापार करण्यास मोकळीक असावी; तुळाजी आंग्रे याचा नाश करण्यासाठीं दोघांनींहि जुटीनें खटपट करावी, व दोघांचें आरमार एकत्र होऊन जाईल तेव्हां त्यावर इंग्रज अधिकाऱ्याची हुकमत चालावी; सावंतांस तोफांची गरज लागेल तेव्हां त्या योग्य किंमत घेऊन इंग्रजांनीं त्यांस पुरवाव्या; शत्रूकडील मुलुख व किल्लेकोट हस्तगत होतील ते सावंत यांनीं घ्यावे व गेरीयांचा कोट आणि खांदेरी बेट हीं इंग्लिशांस मिळावीं. एतद्देशीय संस्थानिकांशीं इंग्लिश लोकांचे तह झाले, त्या सर्वांत हाच पहिला तह होय.

इसवी सन १७३० च्या सुमारास कोल्हापूरकर यांनीं सावंतांच्या मुलुखावर दुसरी स्वारी केली. तींत त्यांचा सरदार उदाजीराव मोहिते हा मुख्य होता. या स्वारींत त्यांना यश न येतां परत जावें लागलें. या नंतर इ. सन १७३२ च्या जून महिन्यांत फोंडसावंत यांनीं बोलवण घोणसरीच्या डोंगरावर तटबंदी करण्यासाठीं आपलें सैन्य पाठविलें. परंतु ही बातमी भगवंतराव पंत अमात्य यास कळून त्यानें सावंतांचें सैन्य येऊन पोंचण्यापूर्वीं आपलें सैन्य पाठवून तो डोंगर अडविला; आणि मदत पाठविण्याविषयीं कोल्हापूर सरकारास लिहिलें. त्यावरून कोल्हापूरकरांनीं रांगणा, भूधरगड वगैरे ठिकाणचा जमाव बाळाजी देसाई व सरवडे वगैरे अधिकाऱ्यांबरोबर पाठविला. त्यामुळें सावंत भोंसले यांस परत यावें लागलें. यानंतर त्याच वर्षाच्या आगष्ट महिन्यांत फोंडसावंत यांनीं सदानंद गडावर स्वारी केली. तेव्हां कोल्हापूरकरांनीं त्या किल्ल्याचें रक्षण करण्याविषयीं भगवंतराव पंत अमात्य हुकमतपन्हा यांस लिहिलें. त्यावरून त्यानें आपला मुतालिक गोपाळ रामराव यास तेथें पाठविलें. त्यामुळें सावंत यांचा हेतु साध्य झाला नाहीं.

१ हा कोट विजयदुर्गानजीक सुमारें सहा मैलांवर आहे.

याच सुमारास पोर्तुगीज लोकांनींहि पुनः उचल खाल्ली. इसवी सन १७३२ त कोंद दि सांदोमिल हा गोव्याच्या गव्हर्नर जनरल होऊन आला. त्याचें असें मत होतें कीं, एतद्देशीय लोकांत पोर्तुगीज लोकांचा जितका दरारा बसेल, तितकाच पोर्तुगीजांविषयीं त्यांचा आदर वाढेल; ह्मणून त्यानें कांहीं कुरापत काढून सावंत भोंसले यांना जिकण्याचा निश्चय केला. त्यानें भोंसल्याच्या मुलुखांत सैन्याच्या तीन टोळ्या पाठविल्या. या सैन्यानें सावंत भोंसले यांच्या मुलुखांत शिरून धुमाळी व लुटालूट मांडिली; परंतु ही लुटालूट करितांना त्यांच्या सैन्यांत नीट व्यवस्था राहिली नाहीं. आणि त्यामुळें सावंतांकडील अवघ्या ८० लोकांनीं त्यांजवर छापा घालून व त्यांचा पराभव करून त्यांस पळवून लाविलें.

फोंड सावंत यांनीं आपल्या राज्यांत बरेच नवीन किल्ले बांधिले; ते हे:-फुकेरी येथें हनुमंतगड; गेळें गांवीं नारायणगड; आंबोली येथें महादेवगड; सोनवडें गांवीं नरसिंहगड किंवा सोनगड; मसुरें गांवीं भरतगड; ओंवाळियें (तर्फ मालंड) येथें सिदगड; कोचरें येथें निवती; व आवाडें आणि हळर्ण येथील कोट. याशिवाय त्यांनीं कुडाळ, बांदें, डिचोली, सांखळी व बेंगुलें येथील जुन्या कोटांची दुरुस्ती केली.

ह्यांनीं जमाबंदींतही पुष्कळ सुधारणा केली. संस्थानांत पैमाष जमाबंदीप्रमाणें धारा घेऊं लागण्यापूर्वीं जो जमिनीवरील सारा घेत असत व ज्यास कुंबळें असें ह्मणत, तें यांच्याच कारकीर्दींत यांचा कारकून गणोराम यानें ठरविलें असें ह्मणतात. परंतु खेमसावंत यांनीं इसवी सन १६७६ त आपले चुलते लखम सावंत यांच्या और्ध्वदेहिकासंबंधीं भूमिदानाची राजपुरोहित कोळंबेकर यांस जी सनंद[1] दिली आहे तींत दान दिलेल्या जमिनीचें कुंबळें स्पष्ट लिहिलें आहे. यावरून कुंबळ्याचा ठराव त्यांच्या पूर्वींच झाला असला पाहिजे. परंतु यांनीं त्या जमाबंदीवर आणखी कितीएक पट्ट्याबाबत्या[2] बसवून जमाबंदींत बरीच सुधारणा केली.

---

१ परिशिष्ट १ लें लेख नंबर १९. २ यांची सविस्तर माहिती भाग ५ यांत दिलेली आहे.

यांनीं या पट्या अशा रीतीनें बसविल्या होत्या कीं, त्या योगें राजवाड्यांत लागणाऱ्या वस्तु कराच्या रूपानें प्रत्यक्ष वसूल येत असत[1]. या पट्याबाबत्यापैकीं कितीएक पट्या कारणपरत्वें कितीएक लोकांस माफीहि देण्याची चाल होती. तीस 'वजाकरी कसर' असें ह्मणत. पैमाष जमाबंदी झाल्यापासून ही सर्व चाल बंद झालेली आहे.

फोंड सावंत हे ता० २ जानेवारी सन १७३८ रोजीं निवर्तले. त्यांस सहा बायका होत्या; व त्यांपासून त्यांस ११ मुलगे व ६ मुली मिळून एकंदर १७ अपत्यें झालीं. वडील बायको लक्ष्मीबाई तांबूळकर सावंत यांची मुलगी. हिला नारोबा सावंत नांवाचा एक मुलगा आणि अंबुबाई व गोदुबाई नांवाच्या दोन मुली होत्या. त्या अनुक्रमें मांधाते सुरवे प्रभावळीकर व आनंदराव घाटगे बुधकर यांस दिलेल्या होत्या. दुसरी बायको सावित्री ही बुधकर घाटगे यांची मुलगी. हिला नाग सावंत, लखम सावंत व खेमसावंत हे तीन मुलगे होते. तिसरी बायको रुक्मिणी ही संभाजीराव निंबाळकर यांची बहीण. तिला जयराम सावंत नांवाचा एक मुलगा, आणि कृष्णाबाई व राजसबाई नांवाच्या दोन मुली होत्या. मुली अनुक्रमें यशवंत सर्जेराव व शिवराम जगदेवराव निंबाळकर यांस दिलेल्या होत्या. चवथी पार्वती ही खोडुलकर यांची मुलगी. तिला गंगा व आनंदी ह्या दोन मुलीच होत्या. त्या पिलाजी राम घाटगे कागलकर व ढाडगांवकर यांस दिल्या होत्या. पांचवी बायको तारा ही मुलतान रायजादे यांची मुलगी. तिला रघुनाथ सावंत, सोम सावंत, शिवराम सावंत व आत्माराम सावंत असे चार मुलगेच होते; आणि सहावी अहिल्या, पिसाळ यांची मुलगी. तिला श्रीराम सावंत व कृष्ण सावंत असे दोन मुलगे होते. ह्या सर्व मुलांत नार सावंत, नाग सावंत, जयराम सावंत व सोम सावंत हे बरेच प्रसिद्धीस आले.

---

१ यांच्यावेळची अशी एक गोष्ट सांगतात कीं, एकदां हे श्राद्ध चालविण्यास बसले असतां तेथें लागणारे तीळ आणलेले नव्हते; परंतु ते बाजारांतून न आणतां चराठें गांवावर रोखा दिला आणि तेथून तीळ आणून नंतर श्राद्धाचें काम सुरू केलें.

रामचंद्र सावंत व जयराम सावंत.

इ. सन १७३८—१७५५.

फोंड सावंत हयात असतांना त्यांनीं रामचंद्र सावंत यांस गादीचे मालक केले होते हें पूर्वीं सांगितलेंच आहे. फोंड सावंत निवर्तल्यावर राज्यकारभाराचें काम रामचंद्र सावंत व त्यांचे चुलते जयराम सावंत यांच्या नांवानें चालूं लागलें. रामचंद्र सावंत यांचें वय या वेळीं सव्वीस वर्षांचें होतें. जयराम महाराज हे शरीरानें धिप्पाड व मोठे शूर होते. सावंत कुळांत त्यांचासारखा योद्धा कोणी झाला नाहीं असें ह्मणतात. पूर्वींच्या राजांच्या कारकीर्दींत गेलेलें वैभव यांनीं परत मिळविलें. इतकेंच नव्हे तर तें बरेंच वाढविलें. त्यांचें सैन्य व आरमार फार मोठें होतें. त्यांच्यावेळीं सावंत भोंसले यांच्या वैभवाचा कळस झाला होता.

रामचंद्र सावंत राज्यकारभार पाहूं लागले, त्यावेळीं बाजीराव बल्लाळ हा पेशवा होता; आणि पोर्तुगीजांच्या ताब्यांतील वसईचा किल्ला घेण्याविषयीं त्याचे प्रयत्न चालू होते. सावंत भोंसले हे पोर्तुगीजांचे पूर्वापार शत्रु होतेच; आणि बाजीरावास पोर्तुगीज लोकांस होईल तितकें जेरीस आणावयाचें होतें. तेव्हां अर्थातच सावंत भोंसले व पेशवे यांचा सहजींच स्नेह जडला, व त्यामुळें पोर्तुगीज लोकांचें बळ कमी कमी होत चाललें. इसवी सन १७३८ त पोर्तुगीज लोकांपासून डिचोली व सांखळी हे आपले दोन्ही महाल सावंतांनीं परत मिळविले व पोर्तुगीज लोकांच्या बारदेश प्रांतावर स्वारी करून तो प्रांत हस्तगत केला. या स्वारींत सावंतांना पोर्तुगीज लोकांच्या बऱ्याच तोफा व निशाणें मिळालीं. या स्वारीवर जयराम महाराज स्वतः गेले असून त्यांच्याबरोबर २२०० घोडेस्वार होते; व पोर्तुगीजांचें सैन्य बारदेशाचें रक्षण करण्यास अगदींच पुरेनासें होतें; त्यामुळें तो प्रांत हातीं येण्यास फारसे आयास पडले नाहींत. या स्वारींत पांडुरंग विश्राम सबनीस व जिवाजी विश्राम सबनीस हे दोघेहि बंधु जयराम महाराजांबरोबर गेले होते. बारदेश प्रांत

---

१ यांचें लढाईच्यावेळचें आंगांतील चिलखत व शिरस्त्राण सावंतवाडी येथील वेस्ट्रॉप म्युझियममध्यें ठेविलेलें आहे. तें पाहिलें ह्मणजे यांच्या शक्तीची कल्पना होते.

हस्तगत झाल्यानंतर जयराम महाराजांनीं तेथील व्यवस्थेसाठीं या दोघांहि बंधूंस तेथें ठेवून आपण सावंतवाडीस परत आले. कांहीं दिवसांनीं जिवाजी विश्राम हेही वाडीस परत आले; परंतु पांडुरंग विश्राम हे कितीएक वर्षेंपर्यंत तिकडील बंदोबस्तासाठीं राहिले होते.

तिकडे पोर्तुगीज व पेशवे यांची लढाई चाललीच होती. शेवटीं वसईचा किल्ला पेशव्यांच्या स्वाधीन झाला. आणि त्यानंतर ता० २ मे सन १७३९ रोजीं पोर्तुगीज लोक व पेशवे यांच्यामध्यें तह झाला त्यांत पेशव्यांनीं सावंत भोंसले यांच्यासाठीं असें ठरवून घेतलें कीं, खोरजुवें व पांडिवें हीं बेटें पोर्तुगीजांनीं सावंतांस द्यावीं; पूर्वीच्या तहावरून भोंसले यांनां दरसाल १००० झेऱ्याफीन पोर्तुगीज लोकांस द्यावे लागत, ते भोंसल्यांनीं पुढें देऊं नयेत; साष्टी, बारदेश वगैरे सर्व प्रांतांतील एकमेकांचे कैदी एकमेकांनीं खंडणी न घेतां सोडून द्यावे; आणि कैद्यानें आपल्या स्वातंत्र्याची फारकत लिहून दिली असल्यास ती त्याची परत द्यावी. या तहानंतर पोर्तुगीजांनां बारदेश प्रांत परत मिळाला.

या वेळीं पोर्तुगीज लोकांची स्थिति किती दुर्बळ झाली होती, हें त्यांच्या हातांतून गेलेल्या मुलुखाचें वर्णन एके ठिकाणीं केलें आहे, त्यावरून दिसून येतें:- 'तारीख ६ एप्रिल सन १७३७ व तारीख १३ फेब्रुवारी सन १७४० या दरम्यान पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांतील चार मुख्य बंदरें व ३४० गांव असलेली सुमारें २३०० पौंड वसुलाची वरसेवापासून दमणपर्यंतची ६६ मैल लांबीची पट्टी, वसईचा किल्ला, शिवाय आणखी आठ शहरें, वीस किल्ले, दोन तटबंदी केलेले डोंगर, ठाण्याचा किल्ला व ठाणें शहर यांसुद्धां साष्टी बेट, जुवा किंवा करंजाबेट, आणि गोव्यांतील साष्टी व बारदेश हे प्रांत इतका मुलुख गेला. आणि गव्हर्नर जनरलच्या ताब्यांत सहा मैल लांबीचें व अठरा मैल रुंदीचें गोव्याचें बेट, चोडण, दिवाडी, सेंडइस्टेव्हाव, कुंभारजुवा व अंजेदीव बेट इतकाच मुलुख राहिला.

इसवी सन १७४० च्या आरंभास सावंत भोंसले यांनीं पुनः बारदे-

१ हीं दोन्हीं बेटें गोवें बेटाच्या उत्तरेस आहेत.

शावर स्वारी केली. त्यावेळीं गोव्याचा गव्हरनर जनरल डॉम पेट्रो म्यास्केरेन्हास हा होता. त्यानें आपलें सैन्य पाठवून सावंत यांस पुढें येऊं दिलें नाहीं. नंतर ता. २७ फेब्रुवारी सन १७४० रोजीं भोंसल्यांचा व पोर्तुगीजांचा तह झाला; तो असाः—भोंसल्यांचीं जीं गलबतें प्रतिवर्षीं मस्कत येथें जात असतात, त्यांवर पोर्तुगीजांच्या गलबतांनीं हल्ले करूं नयेत; पोर्तुगीज लोकांनीं बाजारभावानें भोंसल्यांस दारू पुरवावी; एकमेकांच्या आरमारांनीं एकमेकांच्या वाटेस जाऊं नये; पोर्तुगीज लोकांना भोंसल्यांच्या शत्रूंना आश्रय देऊं नये; याउपर खोरजुवें बेट भोंसल्यांचें व पनेळें बेट पोर्तुगीजांचें आहे असें समजावें; मात्र पोर्तुगीजांनीं आपल्यास मिळालेल्या बेटावर किल्ला बांधूं नये; भोंसल्यांनीं दिलेल्या पनेळें बेटाबद्दल पोर्तुगीजांनीं त्यांस बारदेशप्रांतांतील पिरणें हा गांव द्यावा. याशिवाय या तहाच्या वेळीं सावंत यांस पोर्तुगीजांकडून २९००० रुपये खंडणी मिळाली; आणि तहाच्या अटी अमलांत येईपर्यंत त्यांचा मनुष्य दाबक फिरंगी हा सावंत यांजकडे ओलीस राहिला.

यानंतर जयराममहाराज यांच्या मनांत सौंद्याच्या राजावर एकवेळ स्वारी करून त्यास जेरीस आणावें असें आलें, आणि त्याबद्दल इ. स. १७४३ त त्यांनीं मोठी तयारी चालविली. पांडुरंग विश्राम सबनीस हे डिचोली, सांखळी वगैरे प्रांतांच्या व्यवस्थेसाठीं तेथेंच राहिले होते. त्यांस बांदें येथें बोलाविलें व बरोबर हेवाळकर व उसपकर देसाई, भीमगडकरी, सांखळीकर राणे वगैरे सरदारांचीं पथकें बरोबर आणण्यास सांगितलें. विठ्ठल विश्राम सबनीस यांसहि जमावासुद्धां बोलाविलें. या जमाबास भि-

---

१ यावेळीं फिरंगी व सावंत भोंसले यांच्यामध्यें कांहीं महत्वाच्या राजकारणाबद्दल पांडुरंग विश्राम सबनीस यांच्यामार्फत पत्रव्यवहार सुरू होता. त्यासंबंधानें सबनीस यांस सावंत भोंसले यांजकडून गेलेल्या एका पत्रांत लिहिलें आहे कीं, 'फिरंगी याचे कागद आले होते, ते वाचून पाहून जाबास सिके करून तुह्मांकडेस पाठविले होते, तेथें भरायास कोणी नाहीं याजकरितां हुजूर पाठविलेत; त्यावरून अन्वें धरून ढवळें तुह्मांकडेस पाठविलीं आहेत. तुमच्या विचारें जसजसें भरावें तसतसें भरून रवाना करावें' यावरून सबनीस यांच्या आंगची कर्तबगारी व त्यांजवरील सावंत यांचा दृढ विश्वास व्यक्त होतो.

ळण्यासाठीं जयराममहाराज हे ता. १२ एप्रील सन १७४२ रोजीं सावंतवाडीहून निघून बांद्यास गेले. ता. २९ एप्रीलपर्यंत त्यांनीं एकंदर सैन्याची जमवाजमव करून त्या दिवशीं तेथून पुढें कूच केलें; परंतु या स्वारीपासून कांहीं विशेष फायदा झाल्याचें आढळून येत नाहीं.

इ. स. १७४४ त कोंद दी अशुमर हा गोव्याचा गव्हरनर जनरल असतां त्यानें सावंतांवर पुनः पोर्तुगीजांचें वर्चस्व स्थापन करण्याचा प्रयत्न केला. त्यानें त्यांच्या मुलखावर स्वारी करून त्यांचे डिचोली व सांखळी हे किल्ले आसपासच्या मुलखांसह हस्तगत केले. पुढें ता. ५ मे सन १७४६ रोजीं त्यानें पेडणें महालांतील सावंतांच्या फार बळकट अशा हळर्ण किल्ल्यावर हल्ला करून तो सर केला. या हल्ल्यासंबंधाचें सविस्तर वर्णन त्यानें पोर्तुगालला लिहिलेल्या एका पत्रांत केलें आहे तें असें:-

"जी नदी कोलवाळच्या किल्ल्याजवळून वाहत जाऊन चापोरा येथें समुद्रास मिळते, त्या नदीवर हळर्ण किल्ला बांधिलेला आहे. तेथें नदीला पोरोकाव असें ह्मणतात. हळर्ण हा शत्रूचा एक अतिशय मजबूत किल्ला असल्यामुळें मला असें वाटलें कीं, जर तो सर करतां आला तर मग रेडी किंवा डिचोली या किल्ल्यावर हल्ला करण्यास सोपें होईल. परंतु तो सर करण्यास बऱ्याच अडचणी होत्या. गाड्या व ओझीं नेणारे बैल मिळणें मुष्किलीचें होतें. या बाजूला दारूगोळा वगैरे सामग्री नेण्याचें काम माणसेंच करितात व ते फार अशक्त प्रकृतीचे असून बंदुकीचा आवाज कानीं पडतांच हातांत असेल तें टाकून पळत सुटतात. ता. ३ मार्च सन १७४६ रोजीं मी जमिनीवरील सैन्याचा अधिपति पेरिपॉट (फ्रेंचमन) याला कूच करण्यास हुकूम दिला. त्याच्याजवळ ग्रेनेडरांच्या [पायदळांतील निवडक शिपाई] सहा तुकड्या व पायदळाच्या १७ पलटणी मिळून एकंदर सुमारें ४००० सैन्य होतें. याशिवाय त्याच्या सैन्यांत ८० घोडेस्वार व १९० तोफखान्यावरील लोक हे गोरे शिपाई, १००० काळे शिपाई, आणि शार्पशूटर (अचूक नेम मारणारे) शिपायांची एक तुकडी इतके लोक होते. हें सैन्य नव्या गोव्यापासून १३॥ मैलांवर रेव्होरा येथील डोंगरावर जमलें होतें. ता. ४ मार्च रोजीं सकाळीं या सैन्यानें पुढें

कूच केलें. त्याच दिवशीं मी २७ गलबतें घेऊन नदींतून वर गेलों. जाण्यापूर्वीं पेरिपाँटला जमिनीवरचा व नदींतला हे दोन्ही किल्ले बरोबर होतील अशा बेतानें कूच करण्याविषयीं फर्माविलें होतें. त्याप्रमाणें दोन्हीं सैन्यें दहा तासांनीं तेथें जाऊन पोहोंचलीं व हल्ला सुरू झाला. मी ग्रेनेडर शिपायांस जमिनीवर उतरून त्यांस बाजूनें हल्ला करण्यास सांगितलें. हा हल्ला इतक्या चांगल्या रीतीनें पार पडला कीं, शत्रूला तेथून लवकरच पाय काढावा लागला. यांत आमच्या बाजूचा एक शिपाई पडला व सात शिपाई जखमी झाले. शहरास वेढा देऊन राहण्यास आमचें सैन्य पुरेसें नसल्यामुळें तें एकदम हल्ला करून घेण्याचा मी निश्चय केला.

'ता. ९ मे सन १७४६ रोजीं पहांटे तीन वाजतां माझें सैन्य गुपचुप पुढें गेलें; आणि मुख्य दरवाजाखालीं एक कुलपी गोळा घालून तो त्यांनीं उडवून दिला. नंतर ते शत्रूच्या बंदुकांच्या मोठ्या आगीला न जुमानतां शहरांत शिरूं लागले. त्यांत आमचा बराच तोटा झाला. आमचे बहुतेक लोक मेले व जखमी झाले. त्यांत पेरिपाँटलाहि जखम लागली, परंतु त्यानें तिला न जुमानतां शिपायांस उत्तेजन देण्याचें सुरूच ठेविलें.

'नंतर किल्ल्यावर शिड्या लावून व तटाखालून जबरदस्त हल्ला सुरू केला. तो कांहीं वेळ तसा चालविल्यावर तेथील किल्लेदारास असें कळविलें कीं, जर तुला आपला प्राण वांचवावयाचा असेल तर किल्ला आमच्या स्वाधीन कर. त्यानें आपल्या नेहमींच्या उद्धटपणास अनुसरून असें उत्तर दिलें कीं, किल्ला मर स्वाधीन करणार नाहींच; परंतु हळदण येथें ज्याप्रमाणें आपला समाचार घेतला, त्याप्रमाणें आह्मींहि येथें घेणार आहों.

'हें उत्तर आल्यावर दुप्पट जोरानें किल्ल्याच्या दरवाजावर हल्ला सुरू केला. त्यांत आमचा अतोनात तोटा झाला. आमचे ग्रेनेडर लोक तटावर चढले होते, ते आमच्याच डोक्यावर कौलें घसरून पाडूं लागले व त्यामुळें कल्पना न होण्याइतकी कत्तल झाली. आमचे कित्येक अंमलदार मेले, कित्येकांना घातक जखमा झाल्या. आमचें सैन्य शत्रूनें किल्ल्याच्या बुरुजावरील दोन तोफा कुलपी गोळ्यानें भरल्या आहेत, या बातमीमुळें भिऊन जाऊन अगदीं अव्यवस्थित झालें. यावेळीं जय किंवा अपजय

होणार तें मुळींच समजेना. कामांत अशा वेळीं दिरंगाई होणें ह्मणजे नाशच होता. परंतु सार्जंट मेजर पेद्रो व्हिसेंत यानें मोठ्या चपलतेनें आगीला तोंड देऊन किल्ल्याच्या दरवाजाखालीं कुलपी गोळा फेंकून दिला. त्यामुळें दरवाजा उडून जाऊन त्याचे तुकडे तुकडे झाले; आणि आमच्या लोकांस आंत जाण्यास वाट मिळाली. नंतर दोन्ही सैन्यें भिडून चकमक उडाली; तींत आमची सरशी झाली. परंतु इतक्यांतच आमच्या श्रमांची समाप्ति झाली नाहीं. कारण आंत पूर्वींच्याहूनही जास्त मजबूत दरवाजा आह्मांला आड आला. परंतु कुलपी गोळा टाकतांच त्या दरवाजाचे तुकडे तुकडे होऊन आह्मीं शेवटीं किल्ल्याचे मालक झालों. किल्लेदार, किल्ल्यांतील इतर अंमलदार व किल्ल्याच्या रक्षणार्थ ठेविलेले लोक या सर्वांना आमच्या सैन्यानें कापून काढिलें. या वेळीं आमच्या सैन्याचा क्रोध इतका अनावर झाला होता कीं, त्यांनीं अतिशय क्रूर कृत्यें केलीं.

'याप्रमाणें पांच तास निकराचें युद्ध झाल्यावर आह्मीं हळर्ण गांवाचे व किल्ल्याचे धनी झालों, व त्याच्यावर आह्मीं आमचा बावटा रोंविला. अशा रीतीनें भोंसल्यांचा गर्व व उद्धटपणा खालावला.

'शिपायांनीं एकमतानें किल्ल्याला सान्ता क्रूझ दी अलर्न असें नांव दिलें, व जयोत्सवानिमित्त त्याच्यासमोर एक क्रूस उभा केला.

'किल्ल्याची झालेली नुकसानी दुरुस्त करून व त्याचा अधिकार जुजे लोपेस याला देऊन मी डिचोलीकडेस कूच केलें. आह्मीं या किल्ल्याच्या जवळ जातांच शत्रू त्याचा त्याग करून पळून गेले."

या मोठ्या जयामुळें कोंद दी अशुमर याला पोर्तुगीज सरकाराकडून मार्क्विस दी अलर्न असा किताब मिळाला. यानंतर कांहीं दिवसांनीं त्यानें तेरेखोल, रेडी व निवती हेहि किल्ले घेतले.

पुढें याच वर्षाच्या आक्टोबर महिन्याच्या २६ व्या तारखेस डिचोली व सांखळी या प्रांताच्या देसायांनीं पोर्तुगालच्या राजाकडे आपण निष्ठेनें वर्तणूक करूं, अशी शपथ घेतली. त्यानंतर पोर्तुगालच्या राजाच्या वतीनें असें प्रसिद्ध केलें कीं, या देसायांना भोंसल्याच्या हाताखालीं मिळत असत, तेच हक्क त्यांना पुढेंहि भोगावे; व भोंसल्यांनीं त्यांचे जे हक्क काढून

घेतले असतील ते त्यांस परत द्यावे; पोर्तुगीज सरकारानें देसायांच्या उपयोगासाठीं ८०० शिपाई ठेवून त्यांना दरमहा चार रुपये व दहा अंमलदारांना ३० परडांव प्रमाणें पगार द्यावा; ज्यावेळीं सरकारास जरूर लागेल त्यावेळीं या शिपायांनीं व अंमलदारांनीं सरकारची नोकरी करण्यास तयार असलें पाहिजे; देसायांनां आपल्या धर्माप्रमाणें आपल्या देउळांत पूजा करण्याची मोकळीक असावी; मात्र त्यांच्या मुलुखांत मिशनरी लोक कांहीं देउळें बांधतील, तर त्यांना देसायांकडून आडकाठी होऊं नये; देसायांच्या देउळांत किंवा त्यांच्या आसपास गोवध होऊं नये; देसायांनीं पोर्तुगीज सरकारच्या परवानगीवांचून सावंत भोंसले यांच्याशीं बोलणें करूं नये. देसायांच्या ताब्यांत असलेल्या मुलुखांतील जकात; तंबाखूवरील कर वगैरे सर्व पैसा पोर्तुगीज सरकारच्या खजिन्यांत जमा व्हावा.

इ सन १७५० त मार्किस दी अलर्न हा आपली गव्हर्नरची जागा सोडून स्वदेशीं जाण्यास निघाला. त्यावेळीं त्यानें आपल्या मागून येणारे गव्हर्नर जनरलास उपयोगी पडण्यासारखी अशी हिंदुस्थानाविषयीं कांहीं माहिती लिहून ठेविली त्यांत त्यानें सावंतांविषयीं असें ह्मटलें आहे कीः—

'माझें असें मत आहे कीं, ज्यांना समुद्रकिनारा नाहीं अशा शत्रूच्या मुलुखांत स्वाऱ्या करणें निरुपयोगी आहे. मी हळर्ण किल्ला घेतला, त्याला दोन कारणें होतीं एक, त्याच्याजवळ वांकड्या तिकड्या गेलेल्या अशा नदींतून जातां येतें; दुसरें, तो किल्ला त्या प्रांताच्या अगदीं मध्यभागीं होता. आणि मला असें वाटलें कीं, जर तो किल्ला एकदा माझ्या हातीं आला, तर त्यापासून भोंसल्यांला जबरदस्त धक्का बसेल.

'जर भोंसले सह करून सांखळीपासून आरंदयाचे नदीपर्यंत तेरेखोलच्या किल्ल्यासुद्धां सर्व मुलूख आह्मांस देत असला, तर आमची समाधानी होईल व मग आह्मीं त्याला रेडी व निवती हे किल्ले परत देऊं. आणि भोंसले जर पुढें आमचा शत्रू झाला, तर हे दोन्ही किल्ले किनाऱ्याजवळ असल्यामुळें आमच्या गलबतांच्या ताब्यांत सहज येतील.'

तुळाजी आंग्र्यापासून जसा इंग्लिश लोकांस व सावंतांस त्रास पोंचत होता, तसाच सातारकर छत्रपतीसही पोंचूं लागला. तेव्हां त्याचे पारिप-

त्याची तरतूद करणें त्यांस भाग पडलें. त्यांचा हेतु मुख्यत्वेंकरून सावंत यांनीं आंग्र्याच्या मुलुखांत येऊन स्वारी करावी व त्यावेळीं आपण त्यांस मदत करावी असा होता. याच सुमारास सावंत यांनीं सुलतान रायजादे यास कांहीं राजकारणानिमित्त साताऱ्यास पाठविलें होतें; परंतु आंग्र्याचें पारिपत्य झाल्याशिवाय सावंत यांचें बोलणें ते कबूल करीनात. शेवटीं इ. सन १७४९ त सावंत व मराठ्यांचा सरदार भगवंतराव पंडित यांनीं मिळून आंग्रे याजवर स्वारी करून व लांज्यापर्यंत त्याचा मुलूख जिंकून त्यास बरेंच जेरीस आणिलें.

पुढें कांहीं वर्षांनीं तुळाजी आंग्र्यानें सावंतांच्या मुलुखावर रोंख धरिला. प्रथम त्यानें मसुरें येथील भरतगड किल्ल्यावर हल्ला करून तो सर केला. पुढें जयराम महाराज यांस हें वर्तमान कळल्यावर ते स्वतः मसुऱ्यास गेले, व किल्ल्यावरील नाइकवडी लोकांस वश करून घेऊन त्यांनीं किल्ला आपल्या सत्तेखालीं आणिला. नंतर तुळाजीनें मोठ्या जमावानिशीं इ. सन १७५० त कुडाळावर स्वारी केली. सावंतांच्या त्यांच्या शत्रूंशीं ज्या अनेक लढाया झाल्या, त्यांत ही आंग्र्याची लढाई फार प्रसिद्ध आहे. आंग्रे हा अस्यामठावरून तळगांवच्या वाटेनें बांबर्ड्यास येऊन, त्या ठिकाणीं त्यानें तळ दिला. आंग्रे मोठ्या जमावानिशीं येत आहे, ही खबर शिवाजी लोंडे यानें वाडी येथें येऊन जयराम महाराज यांस कळविली; तेव्हां त्यांनींहि आंग्रे यास तोंड देण्यासाठीं मोठी तयारी केली. हेवाळकर, उसपकर वगैरे मुख्य मुख्य सरदारांस तावडतोब बोलावणें पाठविलें. सर्व सैन्य जमल्यावर जयराममहाराज हे स्वतः आपल्या आवडत्या बोरमाणकी[१] घोडीवर बसून स्वारीस निघाले. बांबर्डें येथें त्यांची व आंग्र्याची गांठ पडून लहानशी लढाई झाली. तींत सावंत यांचा मोड होऊन त्यांस माघार खावी लागली. पुढें आंग्र्यानें कुडाळावर हल्ला केला. त्या ठिकाणीं दोघांचें

---

१ ही घोडी जयराममहाराजांची फार आवडती होती व तिच्यावर बसून त्यांनीं अनेक लढायांत यश मिळविलें होतें. शेवटीं ही घोडी खंदकावरून उडी टाकतांना पडून मरण पावली. तिला बांदें येथें पुरून त्या ठिकाणीं थडगें बांधिलें आहे. व या थडग्याकडे नित्य दिवाबत्ती लावण्यासाठीं सरकारांतून कांहीं जमीन इनाम दिली आहे. (परिशिष्ट १ लें, लेख नंबर १०८.)

भयंकर युद्ध झालें. शत्रूकडील पराक्रमी सरदार मानाजी फांकडे हा पडला व सावंत यांजकडील रजपूत सरदार नवसिंग व आंगोजी काव्या हेही मरण पावले. पण शेंवटीं सावंतांचाच जय होऊन आंग्रे यास पळ काढावा लागला. जयराम महाराज यांनीं लांजें देवरूखपर्यंत त्याचा पाठलाग केला. वाटेंत त्याचे गांवही बरेच जाळिले. या लढाईपासून आंग्रे यास सावंत यांचा इतका वचक बसला कीं, तो पुनः कधींही त्यांच्या वाटेस गेला नाहीं. सावंतवाडींत राजवाड्यांत जी नौबत वाजते, ती आंग्रे याजपासून याच लढाईंत घेतली होती असें ह्मणतात. या लढाईंत मुख्य प्रधान जिवाजी विश्राम सबनीस यांनीं फार शौर्य दाखविलें; ह्मणून त्यांस बांव गांव इनाम दिला. तो हल्लीं त्यांच्या वंशजांकडे चालत आहे.

या जयानें सावंत यांची बरीच कीर्ति झाली. सातारच्या छत्रपतीच्या नांवानें पेशवेच राज्यकारभार करूं लागले होते. त्यांच्या दरबारांतही भोंसले व त्यांचे प्रधान जिवाजी विश्राम यांचें पूर्वींपेक्षांही विशेष वजन पडूं लागलें. परंतु यानंतर लवकरच ह्मणजे इ. स. १७५२ च्या सुमारास रामचंद्र सावंत व त्यांचे चुलते जयराममहाराज या दोघांमध्यें कलह उत्पन्न झाला. तो होण्याचें खरें कारण काय तें समजत नाहीं. परंतु त्याचें कारण असें सांगतात कीं, रामचंद्र सावंत यांस पूर्वीं कांहीं अपत्य नव्हतें; जयराम महाराज यांस मात्र तीन मुलगे होते. इसवी सन १७४९ त रामचंद्र सावंत यांस मुलगा झाला. त्यामुळें जयराममहाराजांस प्रथम मोठा आनंद झाला; परंतु मागाहून कोणी विघ्नसंतोषी मनुष्यानें त्यांच्या मनांत असें भरून दिलें कीं, आतां रामचंद्र सावंत यांचा मुलगा गादीचा वारस तयार झाल्यामुळें पुढें आपणास ते विचारणार नाहींत. त्यामुळें जयराममहाराज यांचें मन कलुषित होऊन तेंच तंट्यास कारण झालें. दुसरें कारण असेंही सांगतात कीं, सावंत यांनीं एकदा फळीं वगैरे बरेंच इमारतीचें लांकूड जमविलें होतें. रामचंद्र सावंत यांच्या मनांतून आपल्या कीर्तीस साजेसा भव्य वाडा बांधण्याकडे त्या लांकडांचा उपयोग करावा असें होतें. जयराम महाराज यांचा हेतु त्या सामानानें आणखीं गलबतें बांधून आपलें आरमार वाढवावें असा होता;

व याचमुळें दोघांत कलह लागला. खरें कारण कांहींही असो, परंतु त्यामुळें सावंत यांचें बळ बरेंच कमी झालें.

हा कलह मिटविण्यासाठीं जवळच्या लोकांनीं पुष्कळ प्रयत्न करून पाहिला, परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. पुढें पेशव्यांच्या कानीं ही गोष्ट गेली; त्यावेळीं बाळाजी बाजीराव हा पेशवा होता. त्यानें रामचंद्र सावंत व जयराममहाराज या दोघांसही कलह मिटविण्यासाठीं उपदेशपर पत्रें लिहिलीं. तरीसुद्धां त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं त्यानें आपला शहाणा मुत्सद्दी रामचंद्र बाबा सुखठणकर यास मुद्दाम सावंतवाडीस पाठविलें. त्यानेंही चुलत्यां पुतण्यास परोपरीनें सांगून पाहिलें, परंतु व्यर्थ. यानंतर पेशवे यांनीं अशी तोड काढिली कीं, रामचंद्र सावंत यांनीं वाडीस राहून जिवाजी विश्राम यांच्या मदतीनें राज्यकारभार चालवावा, व जयराममहाराज यांनीं आपले दोन मुलगे व पांडुरंग विश्राम सबनीस यांसह आपल्या दरबारीं येऊन रहावें. परंतु आपलें राज्य सोडून दुसऱ्याच्या दरबारीं जाऊन राहणें जयराममहाराजांसारख्या मानी पुरुषास आवडणें शक्य नव्हतें. शेवटीं ते कुडाळ येथें जाऊन राहिले [इ. सन १७५३]. व त्यानंतर थोड्याच दिवसांनीं त्यांचा अंत झाला. त्यांची छत्री कुडाळ येथें आहे. त्यांस तीन मुलगे होते असा दाखला सांपडतो. पण त्यांच्या विषयीं विशेष माहिती कांहींच आढळत नाहीं.

हा कलह चालल्यावेळीं विठ्ठल विश्राम सबनीस[1] यांनीं पेशव्यांच्या

---

१ हे एकंदर पांच बंधु होते:—पांडुरंग ऊर्फ देवबा, जगन्नाथ, जिवाजी, विठ्ठल व गुणाजी. पांडुरंग विश्राम हे डिचोलीच्या प्रांतावर व्यवस्थेसाठीं राहिले होते वगैरे वर्णन पूर्वीं आलेंच आहे. यांचे नातु गोपाळराव अनंत हे मोठे शूर सरदार होऊन गेले. यांचे वंशज अमृतराव पुरुषोत्तम सबनीस बी. ए. हे बडोदें संस्थानांत चांगले नांवाजलेले कामदार आहेत. जिवाजी विश्राम हे मुख्य प्रधान असून पुढें प्रधानकीचें काम इ. सन १८३६ पर्यंत त्यांच्याच वंशजांकडे चाललें. त्यांचे वंशज पुरुषोत्तमराव जिवाजी सबनीस हे सावंतवाडी येथें राहतात. विठ्ठल विश्राम हे पेशव्यांचे सेनापति होते; आणि फौजेच्या खर्चासाठीं त्यांस २८ लक्षांची जहागिरी दिली होती. नारायणराव पेशव्यांच्या कारकीर्दींत यांचें व कारभाऱ्यांचें जमेना. तेव्हां यांजकडील जहागीर

दरबारांतून रामचंद्र सावंत यांस उपदेशपर असें एक पत्र पाठविलें होतें. त्यांत लिहिलेल्या कित्येक गोष्टी फार पोक्त विचाराच्या असल्यामुळें त्या पुढें देतों:—'लहान माणूस मनस्वी मिळतील; भलतेंचें भलतें करितील; स्वामीसी नाना ते प्रकारें सिकवितील; स्वामीस तें सत्य वाटेल; आण मागुती केल्या कर्तृत्वाची घाण होईल. मग आह्मांशीं शब्द नाहीं. स्वामीसच भारी पडेल. राज्यामध्यें पाई दुसरे घालतील. आपण तत्रस्थानीं पाहावें लागेल. तेव्हां मग यत्न होणार नाहीं. याकरितां हें सर्व रामचंद्र बाबा आह्मीं बोलून याप्रमाणें साध्यांत लेहून पाठविलें आहे. आपणास फिरंगी यांची पाठ आहे ह्मणून भरोंसा धरला तर तें मृगजळ आहे. कांहीं मजला सर्व कळत आहे येथें राहिलेमुळें. याकरितां हद्द तोडून लिहिलें आहे.'

इतकें लिहिलें तरी त्याचा कांहीं उपयोग न होतां शेवटीं जो परिणाम झाला, तो वर सांगितलाच आहे. आणि त्यामुळें भोंसल्याचे शत्रू जे पोर्तुगीज लोक त्यांनां आपला हेतू पूर्णपणें साधून घेण्यास आयतीच संधी मिळाली. आणि त्यांनीं आपल्यास पाहिजे तसा तह करण्यास रामचंद्र सावंत यांस भाग पाडलें. ता. २९ आक्टोबर सन १७९४ रोजीं गोव्याचा गव्हर्नर जनरल कोंद दी आल्वा आणि रामचंद्र सावंत यांच्यामध्यें झालेल्या तहांत असें ठरलें कीं, मिशनरी लोकांनां भोंसल्याच्या मुलुखांत धर्मसंबंधीं खटपट करण्यास मोकळीक असावी; पोर्तुगीज सरकारानें केरी, सांखळी व मोरली येथील देसाई व दुसऱ्या ज्यांनीं पोर्तुगीज सरकाराकडे एकनिष्ठपणें वागण्याची शपथ घेतली असेल त्या सर्वांचें रक्षण करावें; कुडाळ परगण्याचे सरदेसाई यांनीं डिचोली व पेडणें महाल, आणि हळर्ण, मोरली, सत्तरी व तेरेखोल हे किल्ले, यांवरील सर्व हक्क पोर्तुगीज सरकारास सोडून द्यावा; व त्या ऐवजीं पोर्तुगीज लोकांनीं रेडी व निवती हे किल्ले सरदेसाई यांस परत द्यावे; मागील

काढून पटवर्धनांस दिली. नंतर ते तुरुकवाडीस येऊन राहिले. तो गांव त्यांच्या वंशजांकडे इनाम चालतो. त्यांच्या वडील घराण्यांतील पुरुष भैरवराव वासुदेव हे त्याच गांवीं राहतात. पांडुरंग विश्राम याच्या बाकीच्या दोन बंधूंविषयीं विशेष प्रसिद्धी नाहीं.

१ परिशिष्ट पहिलें लेख नंबर ६७.

शिल्लक असलेली सर्व खंडणी व थोड्याच दिवसांपूर्वी सावंतांच्या चांचे-पणापासून झालेलें नुकसान भरून देण्यास सावंत असमर्थ आहेत, ह्मणून पोर्तुगीज सरकारानें तें सर्व येणें सोडून द्यावें; परंतु हा तह झाल्या तारखेपासून सावंतांनीं पुढील खंडणी नियमितपणें देत जावी.

या कारकीर्दींत मुलूख जिंकून राज्यवृद्धि करण्याकडे जसें लक्ष होतें तसेंच व्यापारवृद्धीकडेही लक्ष होतें. इ. स. १७३९ त सातारा येथील व्यापारी गोविंदशेट व त्रिविक्रमशेट यांस कौल देऊन त्यांनीं या प्रांतांत उदीमव्यापार करावा अशी तजवीज केली. व त्यासाठीं त्यांस कंवठी गांवचें उत्पन्न पंचवीस वर्षेंपर्यंत तसरीब ह्मणून [1] दिलें. ही मुदत संपल्यावर दोन वर्षांनीं तो गांव बरवे यांस इनाम मिळाला. तो सध्या त्यांच्या वंशजाकडे चालत आहे.

रामचंद्र सावंत इ. स. १७५५ त निवर्तले. त्यावेळीं त्यांचें वय ४२ वर्षांचें होतें. त्यांनीं सतरा वर्षें राज्य केलें. त्यांस एक मुलगा व चार मुली मिळून पांच अपत्यें होतीं. वडील मुलगी सगुणाबाई ही बाजी घाटगे नरसिंगराव यास, दुसरी लाडूबाई ही रामराव पाटणकर यास, तिसरी बाळाबाई ही सुबराव निंबाळकर यास व चवथी आनंदीबाई ही नरसिंगराव लाडगांवकर यास अशा त्या दिल्या होत्या.

तिसरे खेमसावंत (राजश्री)

इ. स. १७५५–१८०३

रामचंद्र सावंत निवर्तल्यावर त्यांच्या मागून त्यांचे पुत्र खेमसावंत ऊर्फ राजश्री हे गादीवर बसले. यावेळीं त्यांचें वय सहा वर्षांचें होतें. ह्मणून सर्व राज्यकारभार त्यांच्या मातुश्री जानकीबाई ह्या मुख्य प्रधान जिवाजी विश्राम सबनीस यांच्या मदतीनें पहात असत.

कुडाळाहून इ. स. १६९७ त पळून गेलेला नारायण प्रभु याचा मुलगा दादाजी यानें इ. स. १७५६ त आपली नष्ट झालेली सत्ता पुन्हा मिळविण्याचा शेवटचा प्रयत्न केला. त्यानें आपला मनुष्य पुण्याच्या

---

१ परिशिष्ट १ लें, लेख नंबर ७४.

दरबारीं पाठवून पेशव्यांकडे मदत मागितली. पेशव्यांनीं त्याचें मागणें कबूल करून, आपला सरदार नारो त्रिंबक हा दंडाराजपुरी येथें होता. त्यास प्रभु देसायांस मदत करण्याविषयीं लिहून पाठविलें. त्याप्रमाणें तो ३००० फौज बरोबर घेऊन कोंकणांत उतरला व नेरूरपर्यंत चाल करून गेला. इतक्यांत सावंतांनीं विठ्ठल विश्राम सबनीस यांच्याकडून पेशव्यांचें मन वळवून घेऊन नारो त्रिंबक यास माघारें येण्याविषयीं त्यांच्याकडून हुकूम आणून लाविला. यामुळें प्रभु देसायांचा प्रयत्न व्यर्थ गेला. यानंतर त्यांच्याकडून सावंत यांस त्रास पोंचला नाहीं.

या प्रमाणें आपल्यावर आलेलें संकट टळल्यावर जिवाजी विश्राम यांनीं पोर्तुगीज लोकांकडे गेलेला आपला मुलूख परत मिळविण्याची खटपट चालविली. यावेळीं पोर्तुगीज लोकांसही कांहींशी उतरतीकळा लागली होती. थोड्या दिवसांपूर्वीं त्यांनीं मिळविलेल्या पेडणें महालांतील रयतेवर करासाठीं जुलूम चालविला होता, व सर्व लोकांनीं तंबाखू गोवें येथेंच विकत घेतला पाहिजे अशी सक्ती ठेविली होती. हें सावंत यांस आयतेंच कारण मिळालें. त्यांनीं ता. ९ एप्रिल सन १८९८ रोजीं पोर्तुगीज लोकांवर चाल करून त्यांच्यापासून पेडणें व सांखळी हे महाल घेतले. परंतु या प्रांतांतील हळर्णे, तेरेखोल व डिचोली हे तिन्ही किल्ले त्यांच्या हातीं आले नाहींत. हे किल्ले सावंतांच्या ताब्यांत गेले तर त्यांस पेशवे येऊन मिळतील अशी पोर्तुगीज लोकांस भीति वाटत होती. ह्मणून त्या दोघांचें दळण वळण बंद करण्यासाठीं गव्हर्नर जनरल हा स्वतः आमोणें येथील टेंकडीवर तटबंदी करून राहिला. शत्रू जवळ असलेल्या देवळांत गेले. पोर्तुगीज लोकांनीं तेथें त्यांच्यावर हल्ला करून त्यांस मागें पळावयास लाविलें. पुढें ता. १६ जुलई सन १७५९ रोजीं गव्हर्नर जनरलानें सावंत भोंसले यांच्याशीं एक गुप्त तह केला. त्यांत त्यानें ता. २५ आक्टोबर सन १७५४ च्या तहानें पोर्तुगीज लोकांकडे भोंसल्याचा जो मुलुख गेला होता तो सर्व किंवा त्याचा कांहीं भाग भोंसल्यांस परत देण्यासाठीं पोर्तुगीज सरकाराकडे शिफारस करण्याचें कबूल केलें. परंतु त्याप्रमाणें घडून आलें नाहीं. पुढें इ. सन १७६१

त सावंतांनीं पोर्तुगीज लोकांवर पुनः स्वारी करून पेडणें, डिचोली व सांखळी या महालांतील जीं ठाणीं त्यांजकडे होतीं तीं हस्तगत करून घेतलीं.

याच सुमारास पेडणें महालांतील केरी गांवीं राहणारे जिवाजी बल्लाळ उर्फ जिवबादादा बक्षी यांच्या उदयास आरंभ झाला. इ. सन १७५६ त सोळा वर्षांचें वय असतां ते आपलें जन्मस्थान केरी गांव सोडून निघाले, व कोल्हापुरावरून साताऱ्यास जाऊन तेथें पेशव्यांचे दरबारीं कांहीं दिवस नोकरीस राहिले. इसवी सन १७६१ च्या पानपतच्या घोर संग्रामास ते होते. तेथून परत आल्यावर इसवी सन १७६२ त पेशव्यांनीं त्यांस शिंद्याचे सेनापती नेमिलें. शिंद्याच्या नोकरींत त्यांनीं अनेक पराक्रमाचीं व शौर्याचीं कामें करून आपली व आपल्या धन्याची कीर्ति वृद्धिंगत केली. शिंद्याच्या दरबारांत त्यांचें फारच वजन होतें. आणि त्यांचे मूळ धनी जे सावंत भोंसले त्यांचाही त्या वजनापासून बराच फायदा झाला. शिंद्यांचे गादीवर त्यावेळीं महादजी हे असून त्यांच्या शौर्याबद्दल व वैभवाबद्दल बरीच कीर्ति पसरली होती. महादजीचा बंधु जयाप्पा शिंदे याची मुलगी लक्ष्मीबाई ही यावेळीं लग्नाची होती. ती खेम सावंत यांस मिळून शिंद्यांचा संबंध जुळला, तर तो वाडी दरबारास पुष्कळ हितावह होईल, असें सावंतवाडींतिल मुत्सद्दी मंडळीस वाटत होतें. ह्मणून त्यांच्या सूचनेवरून जिवबादादांस वडील बंधु नरोबा यांनीं हा संबंध जुळून येईल तर पहावें, असें एक वेळ लिहिलें होतें. इतक्यांत जयाप्पाची बायको सखूबाई शिंदे हिजकडूनही महादजीस मुलीच्या लग्नाची तजवीज करण्याविषयीं निकडीचें पत्र आलें. तेव्हां शिंद्यानीं ही गोष्ट एके दिवशीं जिवबादादा, बाळोबातात्या वगैरे मंडळीपाशीं काढली. जिवबादादानीं ह्मटलें सावंतवाडीचे सरदेसाई खेम सावंत हे कुलीन व रूपसंपन्न आपल्या पुतणीस योग्य वर आहेत, मर्जीस येईल तर कोंकणांत माणूस पाठवून खात्री करून घ्यावी. त्यावरून शिंदे यांनीं कांहीं लोक सावंतवाडीस पाठविले. जिवबादादांनींही ही बातमी नरोबा यांस व वाडीच्या मुत्सद्दीमंडळास कळविली. पुढें शिंद्याचे लोक वाडीस आल्यावर एके दिवशीं दरबार भरून त्यांची भेट घेतली. त्यांनीं शिंद्या-

चा हेतू राजेसाहेब, त्यांची मातुश्री व इतर मुत्सद्दीमंडळी यांस कळविला व त्यांनींहि त्या गोष्टीस रुकार दिला. पुढें ती मंडळी ग्वाल्हेरीस गेल्यावर त्यांनीं वाडीच्या मुत्सद्दीमंडळीचा रुकार कळवून तेथील दरबारच्या थाटाची वगैरे बरीच तारीफ केली. त्यावरून महादजी शिंदे व त्यांची भावजई सखूबाई या दोघांसही हें स्थळ पसंत होऊन, शिंद्याचा मूळ जहागिरीचा गांव श्रीगोंदें येथें हें लग्न इ. स. १७६३ त मोठ्या थाटानें झालें. यावेळीं खेमसावंत यांचें वय चौदा वर्षांचें होतें. यावेळीं महादजी शिंदे यांनीं सावंतांस बरेंच जडजवाहीर दिलें. पुढें खेमसावंत यांचीं आणखी तीन लग्नें झालीं. या बायकांचीं नांवें दुर्गाबाई, नर्मदाबाई व सावित्रीबाई अशीं होतीं. दुर्गाबाई ही धारराव खानविलकर यांची मुलगी, नर्मदाबाई ही मानसिंगराव सुरवे यांची व सावित्रीबाई ही हनमंतराव घाटगे यांची मुलगी होती.

खेमसावंत साधारण वयांत आल्यावर त्यांनीं व त्यांच्या मातुश्री जानकीबाई यांनीं जिवाजी विश्राम सबनीस यांस इ. स. १७६३ त कारभारावरून दूर करून रघुनाथ दळवी भोंसले, सदाशिव नारायण चिटणीस व अनंत रामभट आरोसकर यांस कारभारी नेमिलें. त्यांनीं एक वर्ष काम केल्यावर त्यांस कमी करून पुन्हां जिवाजी विश्राम यांस नेमिलें. परंतु पुनःहि दीड वर्षानें त्यांस दूर करून सकु फर्जंद यास कारभार सांगितला. यानंतर लक्ष्मण नारायण लेले, सदाशिव रामचंद्र सबनीस, हिरो रामशेट, लक्ष्मण नारायण दातार, सदाशिवपंत काळे, लक्ष्मण नारायण देशमुख, विठ्ठल विश्राम सबनीस, सांतोराम आकेरकर, फटंभट नातु, गोपाळराव अनंत सबनीस, भीमाजी कडवाडकर, जिवाजी कृष्ण नेरूरकर, विष्णु व्यंकटेश कामत, विठ्ठल नारायण रेगे आरवलीकर असे अनेक कारभारी झाले. मधूनमधून जिवाजी विश्राम, व ते निवर्तल्यावर त्यांचे पुत्र शिवराम जिवाजी व शिवराम जिवाजींचे मुलगे माधवराव यांनींही कांहीं मुदतपर्यंत कारभाराचें काम केल्याचें आढळून येतें. अशा तऱ्हेनें वरचेवर नवेनवे कारभारी नेमिल्यामुळें राज्यकारभाराचें धोरण एक न राहून राज्यांत बरीच अव्यवस्था झाली.

इ. स. १७६३ च्या आरंभास मराठ्यांनीं मकाव (चीन देशांतील पोर्तुगीज लोकांचें एक ठाणें) पासून येणारें पोर्तुगीज लोकांचें एक जहाज पकडलें. ह्मणून त्यांना शिक्षा करण्यासाठीं पोर्तुगीज लोकांनीं सौंद्याच्या राजाकडे व सावंत भोंसले यांजकडे मदत मागितली. सौंद्याच्या राजानें दहा हजार लोक मदतीसाठीं पाठविण्याचें कबूल केलें; परंतु भोंसले यांस मराठ्यांविरुद्ध मदत देणें योग्य वाटेना, ह्मणून त्यांनीं दोन्ही पक्षांपासून अलिप्त राहण्याचें कबूल करून त्याप्रमाणें ते वागले.

सरदेसायांच्या सरदारांच्या चांचेपणापासून इंग्लिश व्यापाऱ्यांस बरेंच नुकसान पोंचत असे. त्यांचें निवारण करण्यासाठीं मुंबई सरकारनें आपल्या आरमारांतील मेजर गोर्डन आणि क्याप्टन् वॅाटसन् यांच्या हाताखालीं सैन्य देऊन त्यांस सरदेसायांवर स्वारी करण्यासाठीं पाठविलें. त्यांनीं ता. ६ मार्च सन १७६५ रोजीं रेडी येथें उतरून यशवंतगड किल्ल्यास वेढा दिला. त्यांच्यावर रात्रीच्यावेळीं जाऊन छापा घालावा, असा जिवाजी विश्राम यांनीं बेत करून सैन्याची जमवाजमव ते करूं लागले. परंतु किल्ल्यावर तयारी चांगली नसल्यामुळें सैन्य जाऊन पोहोंचण्यापूर्वींच शत्रूंनीं एकदम हल्ला करून तो हस्तगत केला (ता. ९ मार्च सन १७६५). यावेळीं भरतगड किल्ल्यावर विश्राम नरहर हा किल्लेदार होता. त्याचा बेत, इंग्लिश लोक रेडीस जातांनां सिंधुदुर्ग, सर्जेकोट व राजकोट येथें तात्पुरतें सैन्य ठेवून गेले होते, अशा स्थितींत पांचसातशें लोकांनिशीं भानशेट भोगटे यास बरोबर घेऊन राजकोट व सर्जेकोट हे किल्ले घ्यावे, असा होता. कारण तसें झालें ह्मणजे इंग्लिश लोक त्यांच्या संरक्षणासाठीं सहजींच रेडीहून निघून आले असते; परंतु भानशेट भोगटे यास त्याजकडील जमावानिशीं रेडी येथें जाण्याचा हुकूम झाल्याप्रमाणें तो एकदम रेडीस निघून गेला. त्यामुळें विश्राम नरहर यानें योजिलेला बेत जागच्या जागीं राहिला. शत्रूंनीं किल्ला हस्तगत केल्यावर त्यास फोर्ट आगस्टस असें नांव दिलें.

असें झालें तेव्हां सरदेसाई यांनीं तहाचें बोलणें सुरू केलें. इंग्लिश लोकांचें ह्मणणें रांगण्यापासून मालवणपर्यंतचा मुलूख व लढाऊ गलबतें

भोंसले यांनीं आपल्या ताब्यांत द्यावीं ह्मणजे तह होईल,- असें होतें. सरदेसाई ती गोष्ट कबूल करीनात. तेव्हां इंग्लिश लोकांनीं आपलें सैन्य भरतगड किल्ल्यावर स्वारी करण्यासाठीं रवाना केलें [ता. १३ मार्च सन १७६९]. नंतर सरदेसाई इंग्लिशांच्या ह्मणण्याप्रमाणें तह करण्यास कबूल झाले व त्याप्रमाणें ता. ७ एप्रिल सन १७६५ रोजीं त्या दोघांमध्यें रेडी येथें तह झाला. त्यांत असें ठरलें कीं, भोंसले यांनीं दोन इसम कबिलासुद्धां आपल्या खर्चानें मुंबईस ठेवावे; त्यांनीं साळशीची खाडी व कर्लीचीखाडी यांमधील घाटाच्या पायथ्यापासून बंदरकिनाऱ्यापर्यंत मुलूख इंग्लिश लोकांस द्यावा; सिंधुदुर्ग किल्ल्याचा तनखा कर्ली नदीच्या पलीकडील गांवांतला ब्रिटिश सरकारास मिळतो, तो भोंसल्यांनीं घ्यावा; लढाईच्या खर्चाबद्दल एक लक्ष रुपये भोंसल्यांनीं ब्रिटिश सरकारास द्यावे; त्यांपैकीं निम्मे रक्कम आठ दिवसांत देऊन बाकीची रक्कम हासेबंदीनें द्यावी; भोंसल्यांनीं आपल्या मुलुखांत इंग्लिश लोकांस वखारी बांधण्यास जागा द्यावी; इंग्लिश किंवा पोर्तुगीज यांशिवाय दुसऱ्या युरोपियनास आपल्या मुलुखांत व्यापार करण्याची मोकळीक देऊं नये; भोंसल्यांनीं आरमार ठेवूं नये; भरतगड किल्ला आंतील सामानासुद्धां भोंसल्यांनीं कंपनी सरकारास द्यावा; भोंसल्यांनीं इंग्लिश किंवा दुसरे युरोपियन लोकांस चाकरीस ठेवूं नये; भोंसल्यांस दारूगोळा वगैरे लढाईचा सरंजाम वाजवी किंमतीनें इंग्लिशांनीं द्यावा. याप्रमाणें अमलांत आल्यावर रेडीचा किल्ला इंग्लिश लोकांनीं भोंसले यांस परत द्यावा.

हा तह वाडीसरकारानें पाळिला नाहीं; आणि चांचेपणाचा धंदा सुरू होताच. ह्मणून त्याबद्दल कांहीं तरी व्यवस्था लावण्यासाठीं मुंबई सरकारानें मि० टामस मास्टीन यास सर्व अधिकार देऊन पाठविलें. त्यानें ता० २४ आक्टोबर सन १७६६ रोजीं रेडी येथें पुनः तह केला. त्यांत इसवी सन १७६५ च्या तहांत ठरलेल्या कलमांपैकीं, मुलूख व भरतगड किल्ला देण्याचें व आरमार न ठेवण्याचें कलम खेरीज करून बाकी कलमें कायम ठेवून कांहीं विशेष कलमें घातलीं; तीं अशीं:—लढाईच्या खर्चाबद्दल भोंसले यांनीं एकंदर दोन लक्ष रुपये द्यावे; त्यांपैकीं ८०००० रुपये या

तहाच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आंत देऊन बाकी रुपये दरसाल ६०००० प्रमाणें दोन वर्षांत फेडावे; फेडीच्या खात्रीसाठीं विठोजी कामत यास जामीन द्यावा; व कामत याच्या खात्रीसाठीं शिवराम जिवाजी सबनीस व दौलत दळवी भोंसले सेनापति यांनीं आपल्या खर्चानें मुंबईस रहावें; सदरहू रकमेची फेड होण्यासाठीं तेरा वर्षेपर्यंत वेंगुर्लें गांव कंपनीच्या ताब्यांत द्यावा, व वेंगुर्लें येथें ब्रिटिश सरकारचा बावटा लावावा; पहिल्या हाप्त्याची फेड झाल्यावर ब्रिटिश सरकारानें रेडी किल्ला भोंसल्यांस द्यावा. त्या मुदतीप्रमाणें भोंसले यांजकडून पैशाची फेड होऊन रेडीचा किल्ला त्यांस परत मिळाला.

परंतु कांहीं काळ लोटल्यावर इ. सन १७७१ त ओलीस पाठविलेले मनुष्य पळून गेले; आणि गहाणदाराचे लोक वेंगुर्ल्याचा वसूल घेण्यास गेले, तेव्हां त्यांस सरदेसायांच्या लोकांकडून अडथळा होऊं लागला. सहा वर्षांत मिळून एकंदर ४५००० रुपयांची फेड झाली. त्यानंतरचा पुर्ता वसूल गहाणदारास मिळाला नाहीं; तथापि तेरा वर्षांची मुदत पुरी होतांच भोंसल्यांनीं वेंगुर्ल्याचा किल्ला गहाणदाराकडे परत मागितला. कराराप्रमाणें देण्याची फेड न झाल्यामुळें गहाणदारानें तो देण्याचें नाकबूल केलें. तेव्हां भोंसल्यांनीं त्याजवर हल्ला करून इसवी सन १७८० त तो परत घेतला.

खेम सावंत यांच्या कारकीर्दींत वेळोवेळ निरनिराळे कारभारी होत होते हें पूर्वी सांगितलेंच आहे. सबनीस हे परंपरेनें कारभाराचें काम पाहणारे होते; तरी जिवाजी विश्राम यांसही कितीएक वेळ कारभार सोडून जावें लागलें. इ. सन १७७१ च्या सुमारास कांहीं कर्जाच्या बोजासंबंधानें सरकाराकडून त्यांस तोशीस पोंचूं लागल्यामुळें ते कारभाराचें काम सोडून सडाजांबोटीस जाऊन राहिले. कांहीं दिवस तेथें राहून नंतर ते केरीस आले (इ. सन १७७२). पुढें ही खबर माधवराव बल्लाळ पेशवे यांस समजून त्यांनीं खेमसावंतांचे चुलत आजे सोम सावंत व जिवाजी विश्राम यांस एकमत करून संस्थानचा बंदोबस्त करण्याविषयीं लिहिलें[1], परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. पुढें पेशव्यांनीं त्यांस

१ परिशिष्ट पहिलें लेख नंबर ८७.

आपल्या पदरीं राहण्यासाठीं बोलाविलें. पण जिवाजी विश्राम हे एकनिष्ठ सेवक असल्यामुळें त्यांनीं तिकडे जाण्याचें कबूल केलें नाहीं. याच सुमारास राजश्रींकडे त्यांनीं एक अर्ज[1] पाठविला. त्यांत त्यांनीं आपले जे विचार प्रकट केले आहेत, त्यावरून त्यांची स्वामिनिष्ठा व्यक्त होते. पुढें खेम सावंत यांचेंहि मन वळून त्यांनीं व त्यांची सासू सखुबाई शिंदे हिनेंही त्यांस पत्रें लिहून वाडीस आणविलें; व पूर्ववत् कारभाराचें काम सांगितलें (इ. सन १७७३). इतकें झालें तरी एकच वर्ष त्यांनीं कारभाराचें काम केल्यावर त्यांस कमी करून सदाशिव रामचंद्र यांस कारभारी नेमिलें (इ. सन १७७४).

बरेच दिवसपर्यंत पोर्तुगीज लोकांचा भोंसल्यांच्या मागें उपद्रव नव्हता; परंतु भोंसले यांनीं ठरलेल्या तहाप्रमाणें आठ वर्षेपर्यंतची खंडणी दिली नाहीं. शिवाय पोर्तुगीज लोकांचीं व्यापारी गलबतें समुद्रांतून जातांयेतांनां भोंसल्यांनीं त्यांजवर हल्ले करून त्यांस लुटिलें. पोर्तुगालच्या राजाचे मांडलिक झालेले जे देसाई त्यांजकडील खंड ते बळकावून बसले. त्यामुळें पोर्तुगीज सरकारास राग येऊन त्यांनीं आपला सेनापती फ्रेडरिक गिलेर्मे याजबरोबर सैन्य देऊन त्यास देसायांच्या मुलुखांत पाठविलें. त्यानें डिचोलीच्या किल्ल्यास वेढा घालून तो ता. २९ आक्टोबर सन १७८१ रोजीं सर केला. दुसऱ्या दिवशीं त्यानें सांखळी येथील देसायांचें मजबूत घर घेतलें; आणि ते दोनही महाल आपल्या राज्यास जोडिले. ता. १ आक्टोबर सन १७८२ रोजीं भोंसले हे आपलें सैन्य जमा करून गुळुलें गांवीं तळ देऊन राहिले. दुसऱ्या दिवशीं त्यांनीं धुमाशें व साळ हे गांव घेतले, तेव्हां त्यांच्यावर पोर्तुगीज सैन्यानें ताबडतोब चाल केली. ठिकठिकाणीं त्यांच्या चकमकी होऊन त्यांत भोंसल्यांचा कांहींसा तोटा झाला. यावेळीं भोंसल्यांचें मोठें सैन्य बारदेशांत होतें. तारीख २२ आक्टोबर सन १७८२ रोजीं बारदेशांत माकझान नदीवर दोन्हीं सैन्यांची गांठ पडून मोठी लढाई झाली. तींत जय असा कोणासच मिळाला नाहीं. पोर्तुगीजांनीं भोंसल्यांच्या सैन्याच्या मागून जाऊन त्यांचा कितीएकदां

१ परिशिष्ट १ लें, लेख नंबर ८८.

पराभव केला; परंतु इतक्यांत भोंसल्यांस कुमक आल्यामुळें पोर्तुगीज सेनापतीला माघार घ्यावी लागली. भोंसल्यांचें सैन्य पुढें पुढें जाऊं लागलें आणि त्यांनीं वाटेंत पुष्कळ गांव जाळिले. त्यांतील लोक रक्षणासाठीं गोवें बेटांत जाऊन राहिले. ता. २४ नोव्हेंबर सन १७८२ रोजीं भोंसल्यांनीं सांखळीच्या किल्ल्यावर हल्ला केला व ते त्याला वेढा देऊन राहिले. ता. ७ डिसेंबर रोजीं किल्ल्याला मदत येऊन पोंचली. त्यांनीं एकदम भोंसल्यांवर हल्ला सुरू केला. सुमारें सव्वादोन तासपर्यंत दोघांत सारखी लढाई चालली. शेवटीं शत्रूची सरशी होऊन भोंसल्यांस मागें फिरावें लागलें; व त्यांचें पुष्कळ सामानसुमान पोर्तुगीज लोकांस मिळालें. नंतर किल्ल्याच्या रक्षणासाठीं तेथें कांहीं लोक ठेवून पोर्तुगीज लोक डिचोलीस गेले, आणि तेथून त्यांनीं बारदेशाच्या सरहद्दीचें रक्षण करण्यासाठीं कांहीं सैन्य पाठविलें. मार्मगांव, आग्वाद व रछोल या किल्ल्यांवर लोक ठेविले. ता. १८ जानेवारी सन १७८३ रोजीं भोंसले हे चार हजार पायदळ व कांहीं घोडेस्वार इतक्या सैन्यासह डिचोलीच्या किल्ल्यानजीक आले. तेथून त्यांनीं ता. ६ फेब्रुआरी रोजीं केरीच्या किल्ल्यावर हल्ला केला; परंतु तेथें त्यांस यश न येतां तोटा मात्र सोसावा लागला. ता. २३ मार्च रोजीं ३७२६ पोर्तुगीज शिपाई बारदेशांतून निघून भोंसल्यांवर चाल करून आले. त्यामुळें भोंसले यांस ती टेंकडी सोडून मागें वळावें लागलें. ते तेथून निघून मेणकुऱ्यास आले व एका टेंकडीवर तटबंदी करून राहिले. तेथेंही पोर्तुगीज सैन्य चाल करून आलें; तेव्हां भोंसले यांस ती टेंकडी सोडून मागें यावें लागलें. पोर्तुगीज लोक हळर्ण येथें नदीच्या दोन्ही तीरांवर तळ देऊन राहिले. तेथून त्यांनीं मणेरी येथें असलेल्या भोंसल्यांच्या मुख्य सैन्यावर हल्ला करून तेथें त्यांचा पूर्ण पराभव केला. नंतर हळर्ण, मर्दनगड वगैरे ठिकाणीं पोर्तुगीजांनीं आपला अंमल बसवून व संरक्षणासाठीं लोक ठेवून ते परत जाण्यास गेले. अशा रीतीनें दोन वर्षेंपर्यंत चाललेल्या या लढाईचा शेवट झाला.

याच सुमारास अशी गोष्ट घडून आली कीं, दिल्लीचा मोंगल बादशहा शहाअलम याचे उमराव फार शिरजोर होऊन त्याचा हुकूम मानीनातसे

झाले, व प्रत्येकजण आपणास वजीरी मिळावी या हेतूनें दुसऱ्यांशीं भांडूं लागला. तेव्हां त्यांचा बंदोबस्त शिंद्यांशिवाय दुसऱ्या कोणाच्या हातून व्हावयाचा नाहीं, असें बादशहास वाटून त्यानें महादजी शिंदे यांस या बळावलेल्या उमरावांस शासन करून त्यांच्या मुलुखावर अंमल करण्यासाठीं गुप्त रीतीनें फर्मान पाठविलें. ही कामगिरी फार जबाबदारीची पण तशीच फायदेशीरहि होती. ती करण्यास आपले सेनापती जिवबादादा हेच योग्य आहेत, असें समजून शिंदे यांनीं ती त्यांच्यावर संपविली. जिवबादादांनींहि मोठ्या तयारीनिशीं शिताफीनें आंग्र्याच्या बाजूनें त्यांजवर चाल करून त्या उन्मत्त सरदारांचा पराभव केला (इ. सन १७८४). यामुळें शिंदे व जिवबादादा या दोघांचेंहि दिल्लीच्या दरबारांत वजन बरेंच वाढून, शहाआलमानें शिंदे यांस आपला सर्व कारभार पाहण्यास सांगितलें. आपले पूर्वींचे धनी सावंतवाडीचे सरदेसाई यांचें हित साधण्यास ही संधि चांगली आहे, असें जिवबादादा यांच्या मनांत येऊन त्यांनीं शिंदे यांजपाशीं तशी गोष्ट काढिली. शिंदे व सरदेसाई यांचा आप्तपणा असल्यामुळें शिंद्यांसही त्यांचें अगत्य होतेंच. ह्मणून त्यांनीं ती गोष्ट लक्षांत घेऊन बादशहाकडून सरदेसाई यांस राजेबहादर असा किताब चालावा व मोरचलांचा मान मिळावा, असें फरमान मिळविलें.

नंतर जिवबादादांनीं शिंदेशाहींतील नोकर बळवंत रघुनाथ दळवी व सावाजी वासुदेव आरवलीकर यांजकडे बादशहाकडून मिळालेली मरामत मोर्चेलें व पोषाख[1] हीं देऊन तीं सरदेसाई यांस बहुमानपुरस्सर देण्यासाठीं त्यांस सावंतवाडीस पाठविलें. त्यांनीं आकेरीपर्यंत आपण आलों आहों, व अशा प्रकारची किताबत घेण्यास सामोरें येण्याची चाल आहे, असें जिवबादादांचे बंधु नरोबा यांचे मार्फतीनें सरदेसाई यांस कळविलें. मग त्यांनीं आकेरीपर्यंत आपल्या तर्फेचे मनुष्य सामोरे पाठवून मरामत घेऊन येणाऱ्या माणसांस मोठ्या समारंभानें सावंतवाडीस आणविलें. आणि शके १७०७ त अक्षय्य तृतीयेच्या (ता. ११ मे सन १७८५) सुमुहूर्तावर त्या बहुमानाचा आदरपूर्वक स्वीकार केला. यापासून पुढें सरदेसाई हे

१ हा भरजरी पोशाख सावंतवाडींत वेस्ट्राप म्युझियममध्यें ठेविलेला आहे.

आपल्या नांवास राजेबहादर असा किताब लावूं लागले. ज्यांनीं दिल्लीहून ही मरामत आणिली त्या दोघांसही रेडी व आरवली गांवीं जमिनी इनाम दिल्या असून तीं इनामें त्यांच्या वंशजांकडे अद्याप चालत आहेत. ह्या मरामतीबद्दल बादशहाकडून मिळालेलें फरमान कांहीं दिवस जिवबादादा यांजकडेसच होतें. पुढें इ. सन १७८६ त ते जयपुरावर स्वारीस गेले असतां त्या ठिकाणीं तें फरमान गमावलें. ह्मणून इ. सन १७९० त पुनः त्यांनीं दिल्लीच्या बादशहाकडे विनंति करून नवीन फरमान मिळविलें. व त्याच वेळीं शाहूछत्रपती, कोल्हापूरकर, पेशवे, गोव्याचा गव्हर्नर जनरेल, निजामउल्मुल्क व टिपूसुलतान यांसही दिल्लीच्या बादशहाकडून सरदेसाई यांस हा मान दिल्याबद्दल साहित्यपत्रें पाठविलीं.

करवीरकर व सरदेसाई यांचा पूर्वापार द्वेष होताच. तो दिल्लीपतीकडून सरदेसाई यांस वर सांगितल्याप्रमाणें मान मिळाल्यामुळें जास्त वाढला. पेशवे यांसही ही गोष्ट आवडली नाहीं; ह्मणून त्यांनीं आपला सरदार हरीपंत फडके यास कोल्हापूरकर यांस मदत करण्यासाठीं पाठविलें. नंतर दोघांची मसलत होऊन, हा मिळालेला मान सरदेसाई यांजकडे चालूं नये ह्मणून करवीरकर यांनीं मोठ्या फौजेनिशीं इ. सन १७८७ त सावंतवाडीवर स्वारी केली, आणि हेरेचें ठाणें, गंधर्वगड व रांगणा या किल्ल्यांवर आपले सरदार नरसिंगराव शिंदे व यशवंतराव शिंदे सुभेदार यांस पाठवून ते सर केले. नंतर घाटाखालीं उतरून त्यांनीं नरसिंहगड, भरतगड व निवती हेही किल्ले घेतले; आणि वेंगुर्ल्याचा कोट घेऊन तेथें तळ देऊन राहिले.

यावेळीं कोल्हापूरकर यांजबरोबर सामना देण्यासारखी सरदेसाई यांची स्थिति नव्हती, त्यांच्याकडे भरपूर सैन्य नव्हतें, दारू गोळा वगैरे सामग्री नव्हती. खजिन्यांत पैसाही शिल्लक नव्हता. यामुळें या सर्व साहित्यासाठीं यांस निरुपायानें पोर्तुगीज सरकाराकडे मदत मागणें भाग पडलें; आणि त्यासंबंधानें पोर्तुगीज सरकारास जो खर्च येणार होता, त्याच्या फेडीसाठीं पेडणें महाल त्यांस सरदेसाई यांनीं देऊं केला. पोर्तुगीज लोक हे सरदे-

१ परिशिष्ट पहिलें, लेख नंबर १०४.

साई यांचे कट्टे शत्रू होते, तरी त्यावेळीं त्यांना असें वाटूं लागलें होतें कीं, कोणी शत्रू घाटावरून उतरून आला तर अशा प्रसंगीं सरदेसाई यांस स्वतंत्रता असल्यास तें आपल्यास हितावह होईल. ह्मणून त्यांनीं सरदेसाई यांचें मागणें झिटकारिलें नाहीं. परंतु सरदेसाई यांनीं मोबदल्याबद्दल जो एक महाल देण्याचें कबूल केलें होतें, तितक्यावर समाधान न होतां सरदेसाई यांस अडचणींत आणण्यास ही संधी फार चांगली आहे, असें मनांत आणून, डिचोली व सांखळी हे महाल, हळर्णचा कोट व पेडणें महालाचा जो भाग पोर्तुगीजांनीं पूर्वीं जिंकला होता तो, या सर्व मुलुखावरील आपला हक्क सरदेसाई यांनीं कायमचा सोडून द्यावा, अशी त्यांनीं अट घातली. भोंसले ह्या अटी कबूल करण्यास कांकूं करूं लागले. तेव्हां पोर्तुगीज सेनापतीनें पेडणें महालावर सैन्य पाठविण्याची भीति घातली. यामुळें भोंसले यांचा अगदीं निरुपाय होऊन त्यांस पोर्तुगीज लोकांचें ह्मणणें कबूल करणें भाग पडलें. आणि त्याप्रमाणें तारीख २९ जानेवारी सन १७८८ रोजीं उभयतांचा तह झाला; व त्यानंतर ता. ४ फेब्रुवारी रोजीं पोर्तुगीज सैन्यानें पेडणें महालाचा ताबा घेतला.

पेडणें महालाचा ताबा घेतल्यानंतर दुसऱ्याच दिवशीं ह्मणजे तारीख ६ फेब्रुवारी रोजीं पोर्तुगीज लोकांनीं आपलें सैन्य भोंसल्याच्या सैन्यास जाऊन मिळण्याकरितां पाठविलें. कोल्हापूरकर यांनीं वेंगुर्ल्याचा कोट घेतल्यानंतर त्यांच्या मालंड येथील आरमारानें रेडी येथें जाऊन तेथील किल्ल्याची नाकेबंदी केली होती. त्या ठिकाणींहि पोर्तुगीज लोकांनीं गोव्याहून आपलें आरमार वेढा उठविण्यासाठीं पाठविलें. अशा रीतीनें भोंसल्यांस पोर्तुगीज लोकांकडून मदत आलेली पाहून कोल्हापूरकर हे घेतलेलीं ठाणीं सोडून मालवण येथें परत गेले. या निघून गेलेल्या फौजेचा पाठलाग करून त्याचा भोंसल्यांनीं पूर्ण पराभव केला नाहीं.

कांहीं दिवसांनीं पुनः कोल्हापूरकर यांनीं सावंतवाडीवर चाल करण्यासाठीं मालवणाहून आपलें सैन्य रवाना केलें. त्यांची वाटेंत नांदोस येथें सरदेसाई यांचें कांहीं सैन्य होतें, त्याच्याशीं गांठ पडून लढाई झाली. तींत सरदेसाई यांचा पराभव होऊन त्यांच्याकडील शिवराम जिवाजी सबनीस,

माणगांवकर भोंसले व उसपकर आणि परमेकर देसाई हे सरदार कोल्हापूरकरांच्या हातीं लागले. त्यांस त्यांनीं मालवण येथील किल्ल्यांत नेऊन ठेविलें. नंतर कोल्हापूरकरांच्या सैन्यानें पुढें चाल केली; त्यांची व भोंसल्यांचें कांहीं सैन्य आकेरीस होतें, त्यांची गांठ पडून तेथेंही मोठी लढाई झाली. तींत कोल्हापूरकर यांजकडील मोठा सरदार डुबल हा व दुसरे कांहीं लोक ठार झाले; व त्यांचें आणखींहि पुष्कळ नुकसान झालें. तेव्हां ते आकेरीहून निघून मालवण येथें परत गेले.

भोंसल्यांस पोर्तुगीज लोकांचें पाठबळ असल्यामुळें त्यांस जिंकण्याचें आपल्यास साधत नाहीं, ह्मणून पोर्तुगीज लोकांस शह देण्यासाठीं कोल्हापूरच्या राजानें आपलें कांहीं सैन्य रवाना केलें. ते लोक रामघाट उतरून खालीं आले व त्यांनीं डिचोली प्रांतावर स्वारी करण्याची भीति घातली; परंतु त्यापासून कांहीं उपयोग झाला नाहीं. नंतर सेनापती मळ्ळ्याच्या वाटेनें आपल्या सैन्यासह आरवंद्याच्या नदीपर्यंत चालून गेला, व आकेरी येथेंही आपले कांहीं लोक पाठवून दिले; परंतु इतक्यांतच भोंसले व पोर्तुगीज लोक यांचीं सैन्यें एकत्र झालीं. तेव्हां त्यांच्यापुढें आपला टिकाव लागावयाचा नाहीं, असें समजून तो सैन्यासह परत गेला. मात्र कोल्हापुरास परत जातांनां आपण जिंकून घेतलेल्या किल्ल्यांच्या संरक्षणांसाठीं लोक ठेविले. कोल्हापूरकर परत जातांच पोर्तुगीज सरकारानें भोंसल्यांच्या मदतीसाठीं पाठविलेलें आपलें सैन्य परत बोलाविलें.

अशा रीतीनें पोर्तुगीज लोकांच्या मदतीनें कोल्हापूरचें सैन्य परत गेलें खरें; परंतु त्यानें घेतलेलीं ठाणीं भोंसल्यांस परत मिळवून देण्याच्या कामांत पोर्तुगीज लोकांचा उपयोग झाला नाहीं. ह्मणून तीं ठाणीं परत मिळविण्यासाठीं भोंसले यांस महादजी शिंदे यांजकडे जिवबादादांच्या मार्फत खटपट करावी लागली. शिंदे यांनीं पेशव्यांकडे मध्यस्थी केली, त्यावरून भोंसल्यांचीं ठाणीं कोल्हापूरसरकाराकडून परत देववावीं, असा पुण्याच्या दरबारांत ठराव झाला; आणि त्याप्रमाणें तजवीज करण्यासाठीं पेशव्यांचा कारकून बाळाजी गणेश, शिंदे यांजकडील सीताराम नाईक व कोल्हापूरकर यांजकडील बच्चाजी जिवाजी हे तिघेजण पुण्याहून येऊन त्यांनीं मालवणच्या

किल्ल्यांत ठेविलेले भोंसल्यांचे सरदार शिवराम जिवाजी सबनीस वगैरे यांस सोडून दिलें; परंतु ठाणीं परत देण्याची कांहींच तजवीज झाली नाहीं.

त्यामुळें सावंत यांनां पुन्हा शिंदे यांस ठाणीं परत मिळण्याची खटपट करण्यासाठीं लिहून पाठविणें भाग पडलें. त्यावरून शिंदे यांनीं पुण्याच्या दरबारीं असलेला आपला वकील रामजी पाटील जाधव यास पेशव्यांकडे याबद्दल गोष्ट काढून पूर्वींच्या ठरावाप्रमाणें कोल्हापूरकर यांस भोंसल्यांचीं ठाणीं परत देण्यासाठीं अगत्याचीं पत्रें त्यांजकडून जाण्याची तजवीज करण्याविषयीं लिहिलें. यावेळीं पेशव्यांच्या दरबारांत नाना फडनवीस आणि हरीपंत तात्यांचा मुलगा दाजीबा फडके हे मुख्य असून ते सावंत यांस त्यांचीं ठाणीं परत मिळावीं, या गोष्टीस अनुकूल नव्हते. त्यामुळें रामजी पाटील याच्या खटपटीस बऱ्याच अडचणी येत. शेवटीं त्या सर्वांचें पाटील यानें निवारण करून त्यांजकडून करवीरकरांकडे ठाणीं देण्याच्या बाबतींत बोलणें करण्यासाठीं एक कारकून रवाना करविला. परंतु कोल्हापूरकर त्या कारकुनास दाद देईनात. ते आग्रहास पडून त्याला नानातऱ्हेच्या सबबी सांगूं लागले; आणि त्यामुळें ही गोष्ट बरीच लांबणीवर पडत चालली. शेवटीं रामजी पाटील यानें अशी युक्ति काढिली कीं, पेशव्यांचे सेनापती परशुरामभाऊ पटवर्धन धारवाडच्या बाजूस मोहिमेवर गेले होते, त्यांजकडून कोल्हापूरकर यांस जरब पोहोंचवून भोंसले यांचीं ठाणीं त्यांस देववावीं. आणि पाटील यानें नाना फडनवीस यांस आपला हेतु कळवून त्याप्रमाणें पत्रें पाठविण्याचाही ठराव केला; परंतु पुढें सुद्धां कितीएक दिवसपर्यंत हें प्रकरण तसेंच खितपत पडलें. तथापि जिवबादादा यांस आपल्या जुन्या धन्याच्या कामाविषयीं फार कळकळ असल्यामुळें व पत्रोपत्रीं काम होत नाहीं असें त्यांस दिसून आल्यामुळें या गोष्टीचा पुरता निकाल करून घेण्यासाठीं आपला मुलगा नारायणराव व बाजी कृष्ण महाजन या दोघांस त्यांनीं पेशव्यांच्या दरबारीं पाठविलें. तेव्हां पेशव्यांस सहजींच विशेष अगत्य उत्पन्न होऊन त्यांनीं कोल्हापूरकर यांस किल्ले सोडून देण्याविषयींच्या चिठ्या पाठविण्याविषयीं फार निकडीचीं पत्रें पाठविलीं. तेव्हां करवीरकर यांनीं

किल्ल्याच्या खर्चाची सबब पुढें आणिली. तथापि त्यासाठीं सोडचिठ्या अडवून न ठेवितां आपला खर्च मिळण्याच्या अटीवर त्या पेशवे यांजकडे लागल्याच पाठवून दिल्या. खर्चाचा पैसा देण्यासारखी वाडीच्या खजिन्याची स्थिति नव्हती. यामुळें हा एक घोंटाळाच उत्पन्न झाला. शेवटीं त्या खर्चाचीही कोणी सावकार पाहून तडजोड करण्याविषयीं व सोडचिठ्या वाडीस लवकर पाठविण्याविषयीं जिवबादादांनीं नारायणरावास लिहिलें. त्याप्रमाणें नारायणरावानें सावकार पाहून किल्ल्यांचा खर्च देण्याची तजवीज केली. तथापि वाडीस सोडचिठ्या पाठविल्या तरी करवीरकर हे एकदम किल्ले सोडून देतील अशी त्यास खात्री पटेना. ह्मणून त्यानें सोडचिठ्या व पेशव्यांकडील पत्र पूर्वीच्या बेताप्रमाणें परशुरामभाऊंकडे तासगांव येथें कृष्णाजी महादेव फळणीकर याजकडे देऊन पाठवून दिलीं. परशुरामभाऊ यांनीं आपल्या धन्याचा हुकूम करवीरकर यांस कळवून ठाणीं सोडून देण्याविषयीं सांगून पाठविलें. परंतु करवीरकर हे पुन्हां टगळमंगळ करूं लागले. शेवटीं परशुरामभाऊंनीं फौज जमा करून करवीरकर यांजवर शह दिला. आतां मात्र कोल्हापूरकर यांचा अगदीं निरुपाय झाला. तेव्हां त्यांनीं आपला वकील आपाजी भगवंत यास पेशव्यांच्या दरबारीं पाठवून त्यांजकडे बोलणें लाविलें; पण त्यांनीं तें मान्य केलें नाहीं. नंतर आपाजी भगवंत हा नारायणराव केरकर यास भेटला; व भोंसल्यांचीं ठाणीं आह्मीं परभारें सोडून देतों, परंतु परशुराम भाऊंचा शह करवीर संस्थानावर नसावा वगैरे कितीएक तडजोडीच्या गोष्टी त्यानें सांगितल्या. तेव्हां नारायणराव यानें तें बोलणें कबूल करून आपाजी भगवंत याजकडे पत्रें देऊन त्यास वाडीस पाठविलें; व त्याप्रमाणें पहिल्यानें तारीख ५ नोव्हेंबर सन १७९३ रोजीं नरसिंहगड हा किल्ला भोंसल्यांच्या ताब्यांत परत आला. त्याचप्रमाणें बाकीचे किल्लेही लवकरच परत मिळाले.

सावंत भोंसले यांस राजेबहादर ही मरातब मिळाली ही गोष्ट पेशव्यांस आवडली नव्हती; परंतु केरकर यांनीं त्यांचें मन वळविल्यावरून त्यांनीं तो किताब चालविण्यासाठीं आपलीहि संमति आहे, असें ता. ८

१ यांचे वंशज सध्यां सावंतवाडी येथें राहतात.

आक्टोबर सन १७९२ रोजीं सावंत भोंसले यांस मुद्दाम पत्र पाठवून
कळविलें. तसेंच पूर्वीं इ. सन १७५६ त कुडाळदेशस्थ प्रभूस मदत
करण्यासाठीं पेशवे यांनीं आपला सरदार नारो त्रिंबक यास सावंतवाडी-
वर पाठविलें होतें; त्यावेळीं त्यानें काबीज केलेल्या मुलुखापैकीं सिदगड
किल्ला हा वेळपर्यंत पेशवे यांच्याच ताब्यांत होता. तोही पेशवे यांनीं
जिवबादादांच्या मध्यस्थीवरून भोंसले यांस परत देण्याचें कबूल करून
त्याप्रमाणें किल्ला भोंसल्यांच्या ताब्यांत देण्यासाठीं गोविंद दादाजी यास
पाठविलें. त्यानें तारीख ४ डिसेंबर सन १७९३ रोजीं सावंतवाडीस
येऊन व राजेबहादर यांची भेट घेऊन नंतर थोड्याच दिवसांत किल्ला
त्यांच्या हातीं परत दिला. या प्रसंगीं किल्ल्याच्या मागील खर्चाबद्दल
बावीस हजार रुपये पेशवे यांस सावंत यांनीं दिले.

जिवबादादा व त्यांचे बंधु आणि चिरंजीव यांनीं वाडी सरकारचीं
अशा प्रकारचीं मोठमोठीं कामें केल्यामुळें, राजेबहादर यांस फार आनंद
होऊन त्यांस कांहीं जमीन इनाम द्यावी असें त्यांनीं मनांत आणिलें. व
त्याप्रमाणें तळगांव तर्फ बराड हा गांव ता. २ एप्रिल सन १७९४
रोजीं वंशपरंपरेनें इनाम करून दिला. कोल्हापूरकर यांजकडून किल्ले
परत घेतले त्यावेळीं जो पैसा द्यावा लागला, तो सर्व केरकर यांनीं आप-
ल्या पतीवर सावकाराकडून देवविला होता. त्याच्या फेडीसाठीं तेच किल्ले
केरकरांच्या स्वाधीन करावे असा वाडीसरकारचा हेतु होता; परंतु केरकर
यांनीं ते घेण्याचें कबूल केलें नाहीं. यामुळें तो विचार तसाच राहिला.

इसवी सन १७९२ त या प्रांतांत पाऊस कमी पडल्यामुळें पिकें फार
कमी झालीं; आणि त्यामुळें भयंकर दुष्काळ पडून जिकडे तिकडे हाहाः-
कार झाला. धान्याचे भाव इतके वाढले कीं, नेहमीं एक रुपयास तांदूळ
तेवीस किंवा चोवीस शेर मिळत; त्या ठिकाणीं पांच शेरही मिळेनातसे
झाले. यावेळीं बाहेरूनही धान्य येण्याची सोई नसल्यामुळें लोकांस त्या
वर्षीं फार हाल सोसावे लागले. पुढील सालीं पर्जन्यवृष्टि होऊन पिकें
झालीं; तथापि धान्याचे वाढलेले भाव उतरण्यास एक दोन वर्षें लागलीं.

वर सांगितल्याप्रमाणें कोल्हापूरकरांकडील ठाणीं परत मिळाल्यावर

सावंत भोंसले पेडणें महाल त्यांनीं ज्या कामाचा मोबदला ह्मणून दिला होता, तें काम पोर्तुगीज लोकांकडून पूर्णपणें तडीस न गेल्यामुळें, तो महाल परत मिळविण्यासाठीं प्रयत्न करूं लागले. त्यांनीं आपला कांहीं जमाव पेडणें येथें पाठवून व सरहद्दीवर चौक्या बसवून आपला अंमल सुरू केला. तेव्हां पोर्तुगीज लोकांनींहि जागजागीं आपले लोक ठेविले, व तेथील रहिवाशांनां कुटुंबासुद्धां बारदेशांत जाऊन राहण्याचा हुकूम केला. भोंसले यांस पेशव्यांचें पूर्ण पाठबळ होतें व त्यांच्या मदतीकरितां कांहीं फौज घेऊन परशुरामभाऊ पटवर्धन यांस पाठविण्याचें ठरलें होतें. पोर्तुगीजांचें ह्मणणें भोंसले यांनीं आपला खर्च घेऊन महाल कायमचे आपल्याकडे ठेवावे असें होतें; आणि त्याबद्दलचें बोलणें करण्याकरितां त्यांनीं आपला वकील बहुगुण कामत यास पेशव्यांच्या दरबारीं पाठविलें. देवबा लाड यानें पोर्तुगीज लोकांस त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें तजवीज करून देण्याचें कबूलही केलें; परंतु जिवबादादांस ती गोष्ट आवडली नाहीं. सावंत यांचें ज्यांत हित होईल तीच गोष्ट त्यांस कर्तव्य होती. ह्मणून सावंत भोंसले यांच्या ह्मणण्याप्रमाणें पेडणें महाल त्यांस पोर्तुगीज लोकांकडून परत देवविण्यासाठीं पेशव्यांकडून त्यांस जरब पोहोंचविली. परंतु याच संधींत (तारीख १२ फेब्रुवारी सन १७९४) महादजी शिंदे निवर्तले. आणि त्यामुळें भोंसले यांची आशा कांहींशी कमी होऊन स्वतःच्या जोरावर महाल परत घेण्याची तजवीज ते करूं लागले. त्यांनीं सैन्याची वगैरे जमवाजमव करून सोम सावंत ऊर्फ आबासाहेब व सांतो राम आकेरकर[1] यांस इसवी सन १७९४ च्या सप्टेंबर महिन्यांत पोर्तुगीज लोकांपासून पेडणें महाल परत घेण्यासाठीं पाठविलें. ते पेडणें येथें तळ देऊन राहिले. पोर्तुगीज लोकांनींहि भोंसले यांजबरोबर सामना देण्यासाठीं चांगली तयारी केली. शेवटीं दोघांच्या कांहींशा चकमकी उडून पोर्तुगीज लोकांस माघार खावी लागली; व नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस एकंदर पेडणें महाल भोंसल्यांच्या हातीं आला. नंतर सोम सावंत यांनीं पोर्तुगीज लोकांचा पुरा पराभव करण्यासाठीं पुढें चाल

१ हे पारसेकर देसाई यांच्या कारकून घराण्यापैकीं असून शिंदेशाहींत सरदार होता.

केली. तेव्हां भोंसले यांस दुसऱ्या रीतीनें अडविण्यासाठीं रेडी येथील यशवंतगडावर पाठविण्यासाठीं पोर्तुगीजांनीं आपलें आरमार तयार केलें. भोंसले यांनीं आपलीही कांहीं फौज तेथें पाठवून नरोबादादा केरकर यांजकडील स्वार मदतीसाठीं तेथें पाठविण्याविषयीं त्यांस लिहिलें. शिवाय याच सुमारास जिवबादादा खर्ड्याच्या लढाईसाठीं पुण्यास यावयाचे होते. तेव्हां त्यांच्याकडूनहि भोंसले यांस मदत येईल असें पोर्तुगीजांस वाटलें. त्यामुळें रेडीच्या किल्ल्यावर स्वारी करण्याचा बेत त्यांनीं सोडून दिला. तथापि भोंसले यांची चाल पुढें होतीच. फोंड्याच्या अलीकडे कांहीं अंतरावर पुनः पोर्तुगीज लोकांची व भोंसल्याची गांठ पडून भयंकर लढाई झाली. तींत पोर्तुगीज लोकांचा पूर्ण पराभव होऊन त्यांची पुष्कळ खराबी झाली; व सर्व फोंडा महाल सावंत यांच्या हातीं आला.

खेम सावंत यांच्यावेळीं लढाईचे प्रसंग बरेच आल्यामुळें खजिन्याची स्थिति खालावत चालली होती. आणि वरील लढाईपासून तर ती फारच अडचणीची झाली. यामुळें सावंत यांस अनेक तऱ्हांनीं पैसा काढावा लागत असे. पेडणें महालांत आराबा येथें राहणारे लखबादादा लाड हे शिंदेशाहींत पागनिशीच्या कामावर होते. त्यांचीं मुलेंमाणसें आपल्या गांवीं राहत असत. एकदां भोंसले यांनीं त्यांस कैदेंत ठेवून त्यांजकडे पंचवीस हजार रुपयांची मागणी केली. पुढें ती हकीगत लाड यांच्याकडून जिवबादादांस समजली. तेव्हां त्यांस फार वाईट वाटून त्या कैद केलेल्या माणसांची सुटका करण्यासाठीं आपले वडील बंधु नरोबादादा यांस ता. ९ फेब्रुआरी सन १७९५ रोजीं पत्र त्यांनीं लिहिलें. त्यांत असें ह्मटलें आहे कीं:–'लखबा आदीकरून आह्मां सर्वत्रांस तिकडील संस्थानचें अगत्य. याजकरितां राजश्री तात्या पागनीस यांसही अगत्य पडतें. लखबा तिकडे पारसेकर देसाई यांजकडील कारकून परंतु येथें सरकारचे चाकरीचे उपयोगी. श्रीमंतांस सर्व प्रकारें अभिमान असें असतां दूर दर्शन पाहून तेथ अशा गोष्टी घडाव्या हें ठीक नाहीं. येविशीं वाडींत सरकारांत चार गोष्टी सांगून त्याचे मुलेंमाणसें चीजवस्त सुद्धां काडीमात्र धोका न पोंहचतां जी जेथें राहतील तेथें पोंहचवून देवावीं.

आण येविसीं आपली गोष्ट सरकारांत न ऐकून त्याजकडेस रुपये द्यावे, अशीच मर्जी असल्यास लखबांचीं माणसें तेथून काढून आपलीं माणसें येथून रवाना केलीं आहेत त्यांस त्यांचे ऐवजीं तेथें कैदेंत ठेऊन, यामागां वडील सरकारांत दंड देत गेले तसे हेही पंचवीस हजार रुपये चीजवस्त विकून देऊन, मुलेंमाणसें सुद्धां वतनाची आस्था न धरितां घांट चढून यावें. लखबांचीं मुलेंमाणसें चीजवस्त सोडून देतात असें असल्यास सोडून देववून तीं जेथें वस्तभावसुद्धां पोहोंचल्याचें पाठवावें. हें सरकारांतून न होतां तशीच मर्जी असली तर वडिलांस माझें अगत्य असल्यास मुलें-माणसें सुद्धां तेथून निघून घांट चढून यावें. लाड यांचीं मुलेंमाणसें सोडवून द्यावीं. आण ते ऐकत नसल्यास आपली ओलीस देऊन सोडावीं तेंही ऐकत नसल्यास रुपये देऊन तुह्मी मुलेंमाणसें घेऊन देशांत येणें' याप्रमाणें जिवबादादा यांस लाड यांचें अगत्य आहे, असें भोंसले यांस समजलें तेव्हां लाड यांचीं कैदेंत असलेलीं माणसें त्यांनीं सोडून दिलीं. यापूर्वीं नरोबादादा यांजकडूनही भोंसल्यांनीं वेळोवेळा वरील लढाईच्या खर्चासाठीं ह्मणून सुमारें १८००० रुपये कर्जाऊ घेतले होते.

यानंतर लवकरच ह्मणजे तारीख ६ जानेवारी सन १७९६ रोजीं जिवबादादा निवर्तले. आणि महादजी शिंदे यांच्या मागें केरकर यांचें भोंसले यांस जें पाठबळ होतें तेंही नाहासें झालें. यामुळें भोंसले यांचे शत्रु कोल्हापूरकर व पोर्तुगीज लोक या दोघांनींहि पुनः उचल खाल्ली. थोड्याच दिवसांनीं कोल्हापूरकर यांनीं सावंतवाडीच्या मुलखावर स्वारी करून बरीच धुमाळी मांडिली. तेव्हां भोंसले यांनीं आपल्याकडील [1]चंद्रो फर्जंद यास त्यांचें पारिपत्य करण्यासाठीं पाठविलें. त्यांनीं आंवळेगांव येथें त्यांस गांठून त्यांचा पराभव केला व त्यांस पळवून लाविलें (तारीख २९ आक्टोबर सन१७९८). या लढाईत चंद्रो फर्जंद यानें मोठा पराक्रम केला. त्यामुळें खेम सावंत यांस फार आनंद होऊन त्यास त्यानीं आपला कायमचा सरदार नेमिलें.

कोल्हापूरकर यांची स्वारी येऊन परत गेली नाहीं तोंच, इ. सन

१ चंद्रो फर्जंद हा श्रीरामसावंत ऊर्फ रावसाहेब यांच्या राखेचा मुलगा होता.

१८०० त पोर्तुगीज लोकांचा गव्हर्नरजनरल फ्रान्सिस्को अंटोनिओ डाव्हेगा काब्राल यानें आपला सेनापती कर्नल जाकी व्हिसेन्ट गोडिनो डिमीरा याजबरोबर सार्जंट मेजर डॉस्यांटास केलाडो आणि ४०० निवडक शिपाई व थोड्या तोफा देऊन त्यास पेडणें महाल भोंसल्यांकडून जिंकून घेण्यासाठीं पाठविलें. भोंसल्यांचें सैन्य यावेळीं पेडणें येथील श्रीरवळनाथाच्या देवालयांत होतें. तेथें पोर्तुगीज सैन्यानें त्याजवर हल्ला केला. दोघांची थोडीशी चकमक उडाल्यावर पोर्तुगीज सैन्याची सरशी होऊन भोंसल्यांच्या सैन्यास माघार घ्यावी लागली. या लढाईंत राजेबहादर यांच्या जवळच्या तीन नातलगांस पोर्तुगीज लोकांनीं पकडून आग्वादच्या किल्ल्यांत नेऊन ठेविलें. नंतर पेडणें महालांतील मुख्य देसाई नागो मादे प्रभु पेडणेकर व रघु वेंक नाईक पारसेकर यांनीं पोर्तुगीज सरकाराकडे हजर होऊन निष्ठेनें वागण्याची शपथ घेतली, व महालाच्या वसुलासाठीं कबुलायती दिल्या. अशा रीतीनें पोर्तुगीज लोकांनीं पेडणें महालावर आपला कायमचा अंमल बसविला. यानंतरही भोंसले यांनीं एक दोन वेळां आपला वकील पोर्तुगीज लोकांकडे तह करण्यासाठीं पाठविला होता; परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

खेम सावंत यांस विद्येची फार अभिरुची असून ते दानशूर होते, अशीहि त्यांची ख्याति आहे. त्यांनीं पुष्कळ लोकांस व देवस्थानांस इनाम जमिनी व नक्त नेमणुका दिल्या होत्या. संस्थानांत हल्लीं जीं इनामें चालतात, त्यांपैकीं अर्धीं इनामें यांच्यावेळीं दिलेलीं आहेत. वाडींतील प्रसिद्ध देवस्थान श्रीआत्मेश्वर याची स्थापना त्यांनीं इ. स. १७९९ त करविली. त्याबद्दल अशी गोष्ट सांगतात कीं, आत्मारामबावा रामदास या नांवाचा कोणीएक साधुपुरुष काशीयात्रेस जाऊन परत येत होता. त्यानें येतांना सावंतवाडींत स्थापन करण्यासाठीं एक लिंग आपल्या बरोबर घेतलें होतें. पुढें वाटेंत वालावली गांवीं तो उतरला असतां रात्रीं त्यास शंकराचा दृष्टांत झाला कीं, 'अमुक मनुष्याच्या घरीं मी आहें व माझ्या आंगास मिरचीपासून जाळ पडला आहे. याकरितां तूं मला घेऊन जा व माझी पूजाअर्चा चालव.' दुसऱ्या दिवशीं त्यानें त्या मनु-

ष्याच्या घरीं जाऊन चौकशी केली. तेव्हां मिरची वांटण्यासाठीं दगड असें समजून ज्याचा ते उपयोग करीत असत, तो एक उत्तम प्रकारचें बाणलिंग आहे असें त्यास आढळून आलें. मग त्या मनुष्यापासून तें बाणलिंग त्यानें मागून घेतलें, व सावंतवाडीस येऊन त्यानें ती हकीकत खेम सावंत यांस कळविली; आणि त्यांच्याच संमतीनें हल्लींच्या ठिकाणीं त्या लिंगाची स्थापना करून देऊळ व तळी बांधिली. त्याच लिंगाच्या शेजारीं काशीहून आणलेल्या लिंगाची स्थापना करून त्यानें पहिल्यास आत्मेश्वर व दुसऱ्यास प्राणेश्वर अशीं त्यांस नांवें दिलीं. या देवस्थानास संस्थानाकडून कांहीं जमीन इनाम असून त्यांतून त्या देवस्थानाकडे उत्सव होत असतात.

या राजाची कीर्ति ऐकून दूरदूर देशींचे कवी व पंडित त्याजकडे आश्रय मागण्यासाठीं येत असत, आणि यांच्याकडूनही त्यांची योग्य संभावना होत असे. इ. स. १७८० च्या सुमारास आंध्र देशांतील (हल्लींचें तेलंगण) गौतमी तीरावर राहणारा गोपाळ कुंदावोझ्झल या नांवाचा एक कवि त्यांच्या दरबारीं आला. त्यानें राजाज्ञेवरून सामंतविजय नामक एक संस्कृत ग्रंथ लिहिला. त्याचे ६ सर्ग असून श्लोकसंख्या ३४७ आहे. त्यांत प्रथमतः मांगलीक नांवाचा सावंत यांचा मूळपुरुष उत्तर दिशेहून या देशांत आला असें वर्णन केलें असून त्यापुढें पहिल्या खेमसावंतांपासून पुढील परंपरा दिली आहे आणि प्रत्येक पुरुषाच्या पराक्रमाचें बरेंच वर्णनहि केलेलें आहे. परंतु त्याच्यापासून ऐतिहासिक माहिती ह्मणण्यासारखी मिळत नाहीं. या संस्कृत ग्रंथाचें इसवी सन १७८१ त विठ्ठल नरसिंह सांखवळकर यानें प्राकृत ओवीबद्ध भाषांतर केलें असून त्याची ग्रंथसंख्या ९०७ आहे.

प्रसिद्ध साधुपुरुष सोहिरोबानाथ आंबिये हे यांच्याचवेळीं होऊन गेले. ते मूळचे पेडणें महालांतील पालयें गांवीं राहत असत व तेथील कुळकर्णपणाची वृत्ति त्यांच्या घराण्याकडे होती. सोहिरोबा यांचा जन्म इ. सन

---

१ अशाच प्रकारच्या एका बाणलिंगाची स्थापना मातोंड येथें केलेली आहे. (परिशिष्ट १ लें, लेख नंबर ११५).

१७१४त पालयें येथें झाला. पुढें मोठे झाल्यावर त्यांच्या कुटुंबांत विभक्तपणा होऊन ते बांदें येथें येऊन राहिले व कुळकर्णपणाचें काम करूं लागले. तथापि जन्मापासून त्यांची वृत्ति सात्विक व विरक्त अशीच असे. पुढें कुळकर्णाचें काम करीत असतां त्यास त्या वेळच्या दरबाराकडून कांहीं सरकारी कामांत तोशीस पोहोंचल्यामुळें पश्चात्ताप होऊन त्यांनीं आपलें नोकरीचें काम सोडून दिलें. पुढें वाडीहून बांदें येथें जात असतां वाटेंत इनसुली गांवीं एका सत्पुरुषाशीं त्यांची गांठ पडून त्यानें त्यांस उपदेश केला. तेथपासून त्यांची वृत्ति पूर्णपणें बदलून ते परमार्थमार्गाला वळले. या वेळीं त्यांचें वय ३५ वर्षांचें होतें.

पुढें ते बांद्यास घरीं गेले; परंतु तेव्हांपासून त्यांनीं प्रपंचांत अलिप्त राहून लोकांस उपदेश करण्यांत व वेदांतपर काव्यें रचण्यांत आपलें बहुतेक आयुष्य घालविलें. त्यांनीं यावेळीं अक्षयबोध, महदनुभवेश्वरी, पूर्णाक्षरी, अद्वयानंद व सिद्धांतसंहिता हे पांच मोठे ग्रंथ लिहिले. याशिवाय त्यांनीं पद्येंही पुष्कळ केलेलीं आहेत. नंतर आपल्या वयाच्या साठाव्या वर्षीं ह्मणजे इ. सन १७७४ त ते आपल्या दोन मुलांस बरोबर घेऊन उत्तरहिंदुस्थानांतील तीर्थें करण्यासाठीं निघाले. यावेळची त्यांची अशी एक गोष्ट प्रसिद्ध आहे कीं, ते घरांतून निघाले तेव्हां मागें त्यांची सून व तिचा एकुलता एक मुलगा अशीं दोनच मनुष्यें असून तो मुलगाही त्यावेळीं फार आजारी होता. सोहिरोबांनीं घरांतून बाहेर निघतांना आपल्या सुनेस 'आतां आह्मीं येतों' असें सांगितलें. सोहिरोबांची घरांतून जातांना असें सांगून जाण्याची कधींच चाल नव्हती. तेव्हां तिला हे आतां परत येत नाहींत असें वाटून ती रडूं लागली, आणि आपली व आपल्या मुलाची वाट काय? असें मोठ्या दीनवाणीनें तिनें विचारिलें. तेव्हां सोहिरोबांचेंहि मन कळवळल्यावांचून राहिलें नाहीं. ते त्या आजारी मुलाजवळ जाऊन घटकाभर बसले व त्याच्यावर हात फिरवून त्यांनीं देवाकडे त्याच्या आरोग्याविषयीं मोठ्या प्रेमानें विनंति केली.

---

१ हे सर्व ग्रंथ त्याचप्रमाणें सोहिरोबानाथांचीं पद्यें, हीं एकत्र करून सावंतवाडीनजीक होडावडें येथें राहणारे भगवंत बाळकृष्ण पै यांनीं हल्लीं प्रसिद्ध केलीं आहेत.

कांहीं वेळानें तो मुलगा चांगला झाला. नंतर सुनेची समजूत करून ते दोघां मुलांसह बाहेर पडले. पुढें त्यांनीं अनेक तीर्थें हिंडत हिंडत शेवटीं प्रयाग, काशी, गया इत्यादि ठिकाणीं जाऊन इ सन १७७५ च्या सुमारास ते ग्वाल्हेरीस पोहोंचले. तेथें ते जिवबादादा केरकर यांच्या वाड्यांत राहत असत. एके दिवशीं महादजी शिंदे यांनीं त्यांस आदरपूर्वक आपल्या दरबारांत नेलें. तेथें त्यांचा चांगला सत्कार करून त्यांस पुष्कळ द्रव्य देण्यास काढिलें; परंतु सोहिरोबांनीं त्याचा तिटकारा दाखवून शिंदे यांस पुष्कळ उपदेश केला. त्यामुळें शिंद्यांच्या मनासही कांहीं उपरति होऊन त्या साधुपुरुषावर त्यांची श्रद्धा बसली. त्यांनीं त्यांस उज्जनी येथें मठ बांधून दिला. नंतर ते तेथेंच राहूं लागले; व राहिलेल्या आयुष्याचा भाग उत्तरेकडील बदरीकेदार, पुष्कर वगैरे तीर्थें करण्यांत घालवून, शेवटीं चैत्र शुद्ध नवमी शके १७१४ (तारीख १ एप्रिल सन १७९२) रोजीं रात्रीं ते मठांतून कोणास न सांगतां बाहेर पडले ते पुनः दिसले नाहींत. जातांना त्यांनीं एक पद लिहून ठेविलें होतें, त्यावरून त्यांनीं आपली इहलोकींची यात्रा संपविली असावी असें दिसतें. यांच्या कवितेंत 'गैबीप्रसादें गैबीच झालों' असें म्हटलेलें आहे त्यावरून गैबीनाथ किंवा गहिनीनाथ हेच त्यांचे गुरु असावे.

याच सुमारास कुडाळदेशस्थ गौड सारस्वत ब्राह्मणांत गोपाळबुवा गोसावी हे साधुपुरुष होऊन गेले. त्यांचा जन्म परुळें गांवीं इसवी सन १७६० च्या सुमारास झाला. कांहीं वर्षें गेल्यावर तेथें महामारीचा उपद्रव होऊन त्यांच्या कुटुंबाचा नाश झाल्यामुळें ते आपल्या आईसह सावंतवाडीनजीक मळगांव येथें येऊन राहिले. लहानपणापासून ते फार भाविक असत. पुढें पंढरपुरास जाणारी कांहीं मंडळी पाहून त्यांसही पंढरपुरास जाण्याची इच्छा झाली. पंढरपुरास गेल्यावर तेथें प्रसिद्ध असलेल्या बोधलेबुवा या धामणगांवच्या साधुपुरुषाशीं त्यांची गांठ पडली. गोपाळानें बारा वर्षेंपर्यंत त्या साधुपुरुषाची एकनिष्ठपणें सेवा केली. शेवटीं त्यानें गोपाळावर अनुग्रह करून त्यास श्रीविठोबाचें प्रत्यक्ष दर्शन करविलें. नंतर गुरूचा निरोप घेऊन ते मळगांव येथें येऊन राहिले, पण

तेथून ते दरवर्षी पंढरपूरची कार्तिक शुद्ध एकादशीची वारी करीत होते. एके वर्षीं पुनः पंढरीनाथानें त्यांस दर्शन देऊन चंद्रभागेंतून आपली व राईरखुमाईच्या मूर्ति देऊन त्यांची स्थापना करण्यास सांगितलें, व खेम सावंत राजश्री यांसही तसेंच स्वप्न झालें. नंतर गोपाळबुवांनीं मळगांव येथें येऊन खेम सावंत यांच्या आश्रयानें त्या मूर्तींची स्थापना केली. खेम सावंत यांनीं त्याच वेळीं त्या देवस्थानास परुळें व मळगांव येथें दोन जमिनी इनाम करून दिल्या. त्या हल्लीं त्या देवस्थानाकडे चालत आहेत.

नंतर गोपाळबुवा हे कीर्तन करीत फिरत असत. ते उत्तम कीर्तन करणारे होते, अशी त्यांची ख्याति आहे; आणि त्यावेळीं त्यांनीं अनेक चमत्कार करून दाखविले. बांव गांवीं एका नव्वद वर्षांच्या बायकोस यांच्या आशीर्वादानें मुलगा झाला; दुसऱ्या एका प्रसंगीं हे देवीउपासनेंत मग्न असतां त्यांच्यावरील दोष टाळण्यासाठीं प्रत्यक्ष पंढरीनाथानें कीर्तन केलें; कीर्तनाचा बेरंग होऊं नये म्हणून श्रीविठ्ठलानें मृदंगी होऊन त्यांची साथ केली, व त्यापासून कीर्तनप्रसंगीं आरंभीं मागें वळून नमस्कार करण्याची यांची चाल पडली; आजगांव येथें कीर्तन करीत असतां प्रत्यक्ष समई चालविली; वगैरे त्यांच्या आख्यायिका प्रसिद्ध आहेत. हे साधुपुरुष ऐशीं वर्षांचे होऊन इसवी सन १८४० त त्यांनीं मळगांव येथें समाधी घेतली. त्यांचे वंशज मळगांव येथें राहत असून परंपरेनें चालत आल्याप्रमाणें दरसाल कार्तिकी एकादशीची पंढरपूरची वारी करण्याची त्यांच्यांत चाल आहे.

खेम सावंत हे चौपन्न वर्षांचे होऊन तारीख २५ सप्टंबर सन १८०३ रोजीं निवर्तले. त्यांस पुत्रसंतान नव्हतें; मुली मात्र चार होत्या. लक्ष्मीबाईच्या दोन मुलींपैकीं हंसाबाई ही जानराव निंबाळकर यांस दिली होती. दुसऱ्या दोन आकुबाई व त्रिवेणी ह्या अनुक्रमें दुर्गाबाई व सावित्रीबाई यांच्या असून त्या घाटगे व आपाजीराव पाटणकर यांस दिल्या होत्या.

रीजन्सी राज्यकारभार.

इ. स. १८०३-१८२२

खेमसावंत यांस पुत्रसंतान नव्हतें, ह्मणून अंतकाळीं त्यांनीं संस्थानचीं शिक्कामोर्तबें आपल्या वडील पत्नी लक्ष्मीबाई यांच्या स्वाधीन केलीं व त्या रीजंट ह्मणून राज्यकारभार चालवूं लागल्या; परंतु आनासाहेब यांचे पुत्र सोमसावंत ऊर्फ आबासाहेब व नातू श्रीरामसावंत उर्फ रावसाहेब या दोघांसही ती गोष्ट आवडली नाहीं. प्रत्येकाची इच्छा लक्ष्मीबाई यांनीं आपला मुलगा दत्तक घेऊन त्यास गादीवर बसवावें व अशा रीतीनें राज्यकारभार आपल्या हातीं पडावा अशी होती; व त्याबद्दल दोघांचेही प्रयत्न चालू होते. गादी रिकामी राहून कारभार आपल्याच ताब्यांत राहावा, असा लक्ष्मीबाई यांचा हेतु असल्यामुळें त्या दोघांच्याही ह्मणण्याकडे लक्ष्य देईनात. या कामीं तिचा प्रधान विष्णु कामत याची तिला फार मदत होती.

आपलें काम साधण्यासाठीं सोमसावंत यांनीं लक्ष्मीबाई व दुर्गाबाई यांस कैद करण्याचें योजिलें. त्यांनीं आपला मुलगा फोंडसावंत यास यशवंतगड येथें पाठवून तेथून लोक जमा करून आणावे, व उभयतां बाई राजवाड्यांत रहात असत तो वाडा हस्तगत करून घ्यावा, असा बेत केला. संकेताप्रमाणें ठरलेल्या दिवशीं आबासाहेबांनीं वाडा हस्तगत करून घेतला; परंतु यशवंतगडाहून मदत यावयाची ती येऊन पोंचली नाहीं. इतक्यांत हें वर्तमान रावसाहेब बाहेर गांवीं होते त्यांस कळतांच ते सैन्यासह वाडीस येऊन जुन्या कोटांत तळ देऊन राहिले; आणि त्यांनीं सोम सावंतांच्या तुकडीवर एकदम हल्ला करून तिचें पुष्कळ नुकसान केलें, व ते राजवाड्याचे दरवाजे अडवून बसले. सोम सावंत यांस प्रथम वाडा हस्तगत केल्यावेळीं लक्ष्मीबाई आपलें मागणें कबूल करील अशी आशा होती; परंतु तसें घडून आलें नाहीं. पुढें तर स्वतः सोम सावंतच आपल्या कुटुंबासुद्धा रावसाहेबांच्या वेढ्यांत सांपडले. रावसाहेब यांनीं दोन्ही बायांस मोकळें करून दरवाजावर सक्त पहारा

ठेविला. यावेळीं स्वतः सोम सावंत, त्यांची बायको जयवंतीबाई, मुलगा जयराम सावंत उर्फ बाबासाहेब, मुलीचा मुलगा बाबुराव घाटगे व कांहीं चाकरमाणसें इतकी मंडळी आंत सांपडली होती. शत्रूच्या हातून सुटून जाण्याचा कांहीं उपाय त्यांस सुचेना. तेव्हां शत्रूच्या हातांत सांपडण्यापेक्षां मरून जाणें चांगलें असें त्यांस वाटलें. त्यांच्याजवळ दारूचीं बरलें होतीं त्यांजवर बसून व त्यांस आग लावून देऊन आपल्या मुलांमाणसां-सुद्धां अठरा असामींचा त्यांनीं नाश करून घेतला (तारीख १६ एप्रिल सन १८०४). या अनर्थाच्या प्रसंगीं सोम सावंत यांचा एक मुलगा फोंड सावंत उर्फ बाबासाहेब हा रेडीस होता ह्मणून बचावला. त्याचेच वंशज हल्लीं गादीवर आहेत.

सोम सावंताचा अशा रीतीनें नाश झाला, तेव्हां लक्ष्मीबाई आपलें बोलणें कबूल करील अशी रावसाहेब यांस आशा झाली; परंतु ती सफल होण्याचें चिन्ह दिसेना. फोंड सावंत यांस बापाच्या मरणाचा सूड उगवावा असें वाटत होतें; पण रावसाहेबांशीं सामना देण्यास ते असमर्थ होते. तेव्हां मदत मागण्यासाठीं ते कोल्हापुरास गेले. कोल्हापूरच्या छत्रपतींनीं त्यांचें मागणें कबूल करून आपल्याकडील सरदार रत्नाकर आपा राजाज्ञ यास मालवण येथें पाठविलें. तेथून तो यशवंतगडास आला. तेथें त्याची व फोंडसावंत यांची भेट होऊन यशवंतगडाच्या बंदोबस्तासाठीं रत्नाकर आपानें आपले लोक ठेविले व तो कोल्हापुरास परत गेला. नंतर फोंड-सावंत हेही कोल्हापुरास गेले व पावसाळ्यानंतर मदत देण्याचें कोल्हापूरसरकाराकडून आश्वासन मिळवून ते पावसाळ्यांत मालवण येथें येऊन राहिले. पावसाळा संपतांच रत्नाकरपंत फौजेसुद्धां घांट उतरून खालीं आला, आणि भोंसल्यांचे नरसिंहगड, भरतगड व निवती हे किल्ले घेऊन मुलुखांत जिकडे तिकडे धुमाळी मांडिली. तेव्हां लक्ष्मीबाईनीं फोंडसावंत यांस त्यांच्या वडिलांचे सर्व हक्क देण्याचें कबूल करून त्यांस वाडीस आणविलें. असें झाल्यावर रत्नाकरपंत फौजेसुद्धां घांट चढून परत गेला.

फोंड सावंत याचें अशा रीतीनें वजन वाढल्यामुळें रावसाहेबांस वाडी शहर सोडून जाणें भाग पडलें. त्यांनीं बांद्याची बाजू धरून बांद्याचा

कोट व हनुमंतगड हे हस्तगत केले आणि तेथें चंद्रोबा व जैतोबा यांस ठेविलें. फोंडसावंत व लक्ष्मीबाई यांनीं लवकरच चांगलें सैन्य जमविलें आणि तें घेऊन राणी दुर्गाबाई, जानराव निंबाळकर व दुसरे मुख्य मुख्य सरदार यांसह फोंडसावंत वागडोळा येथें गेले. तेथें त्यांजवर रावसाहेबांनीं पांचशें लोकांनिशीं हल्ला करून त्यांचा पराभव केला (इ.स. १८०९). फोंडसावंत यांस वेष बदलून आकेरीस पळ काढावा लागला. राणी दुर्गाबाई, जानराव निंबाळकर व इतर सरदार रावसाहेबांच्या हातीं लागले. त्यांस त्यांनीं हनुमंतगड येथें पाठवून दुसऱ्या दिवशीं वाडींत मोठ्या थाटानें प्रवेश केला.

भोंसल्यांत अशा रीतीनें घरचेघरांत कलह लागल्यामुळें व त्यापायीं खजिनाही रिता होऊन गेल्यामुळें किल्ल्यावरील लोकांचे पगार थकले. ही संधि साधून साळसीमहालाचा पेशव्यांचा अंमलदार चिटकोपंत यानें सिदगड किल्ल्यांतील शिपाई लोकांस पैसा देऊन त्यांचें मन वळविलें; आणि किल्ला आपल्या ताब्यांत घेतला. पेशव्यांपासून किल्ला परत घेतला, तरी कोल्हापूरकरांचा उपद्रव आहेच; अशा समजुतीनें भोंसले यांनीं पेशव्यांपासून तो परत घेण्याची खटपट केली नाहीं.

रावसाहेबांनीं वाडींत आल्यानंतर कित्येक क्रूर कृत्यें केलीं; आणि लक्ष्मीबाईला आपला मुलगा रामचंद्र सावंत उर्फ भाऊसाहेब हा दत्तक देऊन त्यास गादीचा अधिकारी केलें. हा समारंभ इ. सन १८०९ त मोठ्या थाटानें झाला. वागडोळ्याच्या लढाईत दुर्गाबाईस धरून हनुमंतगड येथें पाठविलें होतें, त्यांला या समारंभाच्यावेळीं मोकळीक दिल्यामुळें त्याही यावेळीं हजर होत्या.

फोंड सावंत हे आकेरीस गेले होते. तेथून त्यांनीं रांगण्यास जाऊन तेथील किल्लेदार राणोजी नाईक निंबाळकर आणि त्याचप्रमाणें साळशी महालाचा पेशव्यांचा अंमलदार चिटकोपंत याजकडे मदत मागितली. त्यांनीं मदत देण्याचें कबूल करून निंबाळकर आपल्या सैन्यासह व

१ साळसी महालांतील अर्धा वसूल भोंसले यांस मिळत असे तो राजश्रींच्या वेळीं झालेल्या धांदलींत कित्येकवर्षेपर्यंत वसूल करणें राहिल्यामुळें तो पेशवे बळकावून बसले.

चिटकोपंत आपल्या सिदगडावरील तुकडीसह फोंडसावंत यांच्या मदतीस आले. ते आकेरी येथें तळ देऊन राहिले असतां राणोजी नाईकानें चिटकोपंत यास अकस्मात् धरून मालवण येथें बंदींत ठेविलें. यामुळें फोंड सावंत यास मदत मिळण्याचें एकीकडेच राहिलें.

राणोजी नाईकानें इ. सन १८०६ च्या पावसाळ्यांत एक महिन्या-पर्यंत सिदगडची नाकेबंदी केली होती. त्यास मदतीसाठीं मालवणाहूनही कांहीं फौज आली. इतकें झालें तरी, सिदगड किल्ला फार बळकट अस-ल्यामुळें तो निंबाळकर यांस घेतां आला नाहीं.

फोंड सावंत यांनीं बहुतेक पावसाळा आपले सरदार बाबणो गोपाळ व संभाजी सावंत यांच्याबरोबर वालावल व कुडाळ येथें घालविला. इत-क्यांत श्रावण शुद्ध १४ (ता. २८ आगष्ट सन १८०६) रोजीं रावसा-हेब हे निवर्तले.

सावंतवाडी दरबारची झालेली स्थिति पाहून आपला हेतू साधण्यास ही संधी चांगली आहे, असें पाहून कोल्हापूरच्या राजानें स्वतः सैन्यासह येऊन नांदोस येथें ठाणें दिलें; व तेथें एक गढी बांधिली; आणि आसपासच्या गांवांचा वसूल ते घेऊं लागले. पुढें लक्ष्मीबाई यांस हें वर्त मान कळलें. इतक्या अवधींत पोर्तुगीज लोकांच्या मनांतील भोंसल्यावि-षयींचा द्वेष बराच कमी झाला होता. ह्मणून पेडणें महाल घेतांनां भोंस-ल्यांचे जे लोक त्यांनीं धरून नेऊन कैदेंत ठेविले होते, त्यांपैकीं [1]धोंडो-गोविंद हा अद्याप कैदेंत होता; त्यास सोडून देण्याविषयीं पोर्तुगीज लोकांस लक्ष्मीबाईनीं लिहून वाडीस आणविलें. आणि त्याजबरोबर फौज देऊन त्यास नांदोस येथें कोल्हापूरकरांनीं ठाणें दिलें होतें, त्यांस घालवून देण्या-साठीं पाठविलें. तेथें दोघांची लढाई होऊन तींत धोंडो गोविंद हा ठार

१ हा फोंड सावंत ऊर्फ आनासाहेब यांच्या राखेचा मुलगा गोंद सावंत, याचा मु-लगा. यास आणखी संभाजी गोविंद नांवाचा भाऊ होता. या राखेचें नांव नागलें असें असून ती तांबूळकर देसायांनीं आपली मुलगी लक्ष्मीबाई हिच्याबरोबर आंदण दिली होती. तिला आणखीं चार मुलगे होते. त्यांपैकीं गण सावंत यांच्या मुल-चा मुलगा बाबणो गोपाळ हाही पुढें प्रसिद्धीस आला. तो निवतीच्या किल्ल्यावर किल्लेदार होता.

झाला व गेलेली फौज माघारी आली. यावेळीं लक्ष्मीबाई यांच्या मागण्यावरून कांहीं पोर्तुगीज लोक मदतीसाठीं आले होते; परंतु त्यांचा उपयोग झाला नाहीं.

नंतर दुर्गाबाई यांचा बंधु रामचंद्रराव खानविलकर हा आणखी फौज जमा करून व चंद्रोबा सुभेदार वगैरे सरदार बरोबर घेऊन रामचंद्र सावंत ऊर्फ भाऊसाहेब यांच्यासह कोल्हापूरकरांवर स्वारी करण्यास निघाला; आणि नांद्रोस येथें जाऊन त्यानें तळ दिला. तेथें उभयपक्षांची मोठी लढाई होऊन शत्रूचे सुमारें दोन अडीचशें लोक प्राणास मुकले व शत्रूस तेथून पळ काढावा लागला. शत्रूंनीं बांधिलेली गढी त्यांनीं मोडून टाकिली, आणि आसपासच्या गांवांत पुनः आपला अंमल बसविला. नंतर त्यांनीं यशवंतगड व निवती या किल्ल्यांकडे आपला मोर्चा वळविला. त्या ठिकाणीं कोल्हापूरकर यांनीं आपला अंमल बसविला होता. त्यांस तेथून त्यांनीं हांकून लाविलें. यावेळीं चंद्रोबा सुभेदार यानें बरेंच शौर्य दाखविलें. नंतर चंद्रोबाची नेमणूक कोल्हापूरसरकाराकडून भरतगड किल्ला परत मिळविण्याचे कामावर झाली. त्याप्रमाणें त्यानें मसुरें येथें जाऊन किल्ल्यास वेढा दिला. बरेच दिवसपर्यंत किल्ला त्याच्या हातीं येईना. शेवटीं किल्ल्यांतील लोकांस १००० निवडक लोकांची एक टोळी कोल्हापुराहून मदत करण्यासाठीं आली. शिवाय मालवणहूनही कांहीं सैन्य आलें. यामुळें चंद्रोबास वेढा उठवून परत यावें लागलें.

पुढें लक्ष्मीबाई व भाऊसाहेब या दोघांच्या मनांत परस्परांविषयीं कांहीं वितुष्ट येऊन भाऊसाहेब लक्ष्मीबाईच्या हुकुमांत वागेनातसे झाले भाऊसाहेबांचें वय यावेळेस अवघें तेरा वर्षांचें होतें. तथापि ते जात्याच पाणीदार असल्यामुळें त्यांस लक्ष्मीबाईचा अव्यवस्थित कारभार बिलकूल आवडत नसे; व ते त्यांचा वारंवार निषेध करीत असत. यामुळें लक्ष्मीबाई कांहीं दिवस आकेरी येथें जाऊन राहिल्या. त्यावेळीं फोंड सावंत हेही त्यांच्या बरोबर होते. या मुदतींत रामचंद्रराव खानविलकर आणि रावसाहेबांकडील सरदार यांनीं प्रांतांत बरीच धुमाळी मांडून लोकांस फार त्रास दिला असें म्हणतात.

भाऊसाहेब दिवसेंदिवस लक्ष्मीबाईच्या हुकुमांस जुमानीनातसे झाले. हें पाहून जवळच्या लोकांनीं पुढें तुह्मांला ते मुळींच जुमानणार नाहींत, असें सांगून लक्ष्मीबाईचें मन जास्त कलुषित केलें. हा घोटाळा इकडे चालला आहे तोंच, पुनः कोल्हापूरकरांच्या स्वारीची तयारी झाली. त्यांनीं आपला सरखवास हैबतराव गायकवाड याजबरोबर दोनशें घोडेस्वारांची टोळी देऊन त्यास पुढें पाठविलें; व मागाहून स्वतः कोल्हापूरचे छत्रपती ३०० पायदळानिशीं रत्नाकर आपा राजाज्ञा यास बरोबर घेऊन स्वारीस निघाले. ते महादेवगडाच्या रस्त्यानें पारपोली घाट उतरून येत असतां त्यांस प्रतिबंध करण्यासाठीं चंद्रोबा सुभेदार याजबरोबर कांहीं सैन्य देऊन पाठविलें. तेव्हां उभयपक्षांची आठ दिवसपर्यंत लढाई होऊन कोल्हापूरकर पराभव पावून परत गेले. या लढाईत चंद्रोबास गोळी लागून तो जखमी झाल्यामुळें त्यास परत बोलावून कोल्हापूरकरांचा पाठलाग करण्याचे कामीं फोंड सावंत तांबूळकर यांची नेमणूक केली; परंतु कोल्हापूरकर यांनीं त्यास झुकांटी देऊन ते हनुमंतघाटानें खालीं उतरले. आणि सावंतवाडीनजीक कोलगांव येथें तळ देऊन राहिले. तेथून त्यांनीं वाडीशहरावर हल्ला करून तें घेतलें, व कोटास वेढा दिला. इतक्या अवधींत लक्ष्मीबाई पेडण्यास जाऊन राहिल्या; व रामचंद्रराव खानविलकर हा भाऊसाहेबांस घेऊन रेडीस गेला. मागें चंद्रोबा सुभेदार कोटाच्या संरक्षणासाठीं राहिला होता, त्याची व कोल्हापूरकरांच्या सैन्याची मुशीच्या दरवाजावर मोठी लढाई होऊन तींत कोल्हापूरकरांचा प्रसिद्ध सरदार बाळा थाकू चांभार हा गोळी लागून पडला. तेव्हां फौजेची दाणादाण होऊन तो पुन्हां कोलगांवास जाऊन राहिला.

लक्ष्मीबाई पेडण्यास गेल्या होत्या. त्या कांहीं दिवस तेथें राहून नंतर शिंद्यांकडून मदत आणण्यासाठीं ग्वाल्हेरीस जाण्यास निघाल्या. त्या तळकट घांटानें निपाणीवरून जात असतां निपाणी जवळ त्यांस शिदोजीराव निंबाळकर सरलष्कर ऊर्फ आपासाहेब निपाणकर हा भेटला;

१ 'कोल्हापूरच्या राजवाड्यांत एक वेळ निपाणकर हे भेटीस जात असतां पुढील चौकांत तेथील राजानें वाघ सोडून दिला होता. इतक्यांत सिदोजीराव निंबाळकर

व तुम्ही ग्वाल्हेरीस जाण्याचें कारण नाहीं, मी संस्थानचा चांगला बंदोबस्त करून देतों, असें सांगून व कांहीं फौज बरोबर देऊन त्यांस वाडीस परत पाठविलें. वाडीस परत आल्यावर त्यांनीं भाऊसाहेबांसही रेडीहून परत आणविलें. निपाणकरांच्या सैन्यांत १००० लोक (बहुतेक अरब) असून तें आबाजी सुबराव राणे याच्या हाताखालीं होतें. याशिवाय व्यंकटराव जांमुटकर यांजकडून ४०० मराठे लोकांची मदत आली. शिवाय निपाणकरानें आणखी अशी एक तजवीज केली कीं, त्यानें आपलें कांहीं सैन्य कोल्हापुरावर पाठविलें, व त्यांचे चिकोडी व मनोळी हे तालुके घेतले. या निपाणकरांच्या युक्तीचा परिणाम फार चांगला झाला. निपाणकरांची स्वारी कोल्हापुरावर झाली आहे, हें कोल्हापूरच्या छत्रपतींस समजतांच मुलुखाच्या संरक्षणासाठीं त्यांस वाडीचा तळ उठवून ताबडतोब कोल्हापुरास जाणें भाग पडलें.

अशा रीतीनें हें मोठें अरिष्ट टळलें खरें; परंतु निपाणकरांचा जो सरदार मदतीसाठीं ह्मणून आला होता, तोच आपल्या धन्यासाठीं या मुलुखावर आपली सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न करूं लागला. त्यानें लक्ष्मीबाई आणि त्यांचा दत्तक मुलगा भाऊसाहेब या दोघांसही कैद केलें. लक्ष्मीबाई कांहीं युक्तीनें कैदेंतून आपली सुटका करून घेऊन पेडणें येथें नागेश

सरदेसाई सरलष्कर यांची स्वारी आली. तों पुढें लोक होते त्यांनीं सांगितलें कीं, 'आंत वाघ आहे' तेव्हां निपाणकर बोलले कीं 'मी आतां मागें फिरावयाचा नाहीं.' असें ह्मणून ते आंत शिरले, तों वाघ आंगावर येतो असें पाहून त्यांनीं त्याचे पुढील पाय धरून त्यास उभें केलें, इतक्यांत मागील लोकांनीं तरवारीनें त्यास तोडिलें. मग निंबाळकर जाऊन राजास भेटले! याच मनुष्यानें कोल्हापूरकर महाराजांची मुलगी मागितली होती. परंतु ती त्यांनीं दिलेली नाहीं, ह्मणून निपाणकरांनीं कोल्हापूर घेऊन जबरदस्तीनें मुलीशीं लग्न लाविलें. असा हा उग्रकर्मा मनुष्य होता." [ऐतिहासिक गोष्टी व उपयुक्त माहिती भाग १ ला, पृष्ठ १५१.]

१ हे नागेश प्रभु पूर्वापार पेडणें महालाचे देसाई असून त्यांस पहिल्यानें विजापूरच्या बादशहाकडून देशप्रभु असा किताब मिळाला. वाडी सरदेसाई यांस शत्रूच्या भीतीमुळें वगैरे दुसऱ्या ठिकाणीं जाऊन राहण्याचा प्रसंग आला असतां त्यांस हें एक आश्रयस्थानच होतें. या पूर्वींहि कोल्हापूरकरांची स्वारी झाल्यावेळीं खेमसावंत यांच्या पत्नी लक्ष्मीबाई आणि सखुबाई शिंदे ही मंडळी त्यांच्याकडे कांहीं दिवस जाऊन राहिली होती असें ह्मणतात. पूर्वीं भोंसल्यांच्या व हल्लीं पोर्तुगीजांच्याही अमलांत

महादेव प्रभु याच्या येथें जाऊन राहिल्या. फोंड सावंत वालावलीस गेले व भाऊसाहेबांस रामचंद्रराव खानविलकर हा रेडीस घेऊन गेला. या सर्वांस आपाजी सुब्राव यानें अभिवचन दिल्यामुळें ते सर्व वाडीस परत आले; परंतु यावेळीं आपाजी सुब्राव याच्या शब्दावांचून कांहींच काम होत नसे. त्यानें यशवंतगड, वेंगुर्ले, निवती व इतर किल्ले आपल्या ताब्यांत घेतले. यानंतर थोड्याच दिवसांत अज्ञान भाऊसाहेब बिछान्यावर निजलेले असतां मारले गेले (ता ७ आक्टोबर सन १८०८). हा खून करविण्यास पुढारी कोण होते, याच्यासंबंधानें बराच मतभेद आहे. यांच्या मरणासंबंधानें जो एक पोवाडा प्रसिद्ध आहे त्यावरून असें दिसतें कीं, लक्ष्मीबाई व भाऊसाहेब यांच्यामध्यें बेबनाव होऊन लक्ष्मीबाईनीं काळू भिकाजी, लक्ष्मण हिर्लोककर व लक्ष्मणभट यांच्याकडून हा खून करविला. कोणी ह्मणतात, निपाणकर यांच्याकडून हें काम झालें. क्याप्टन अचिन्सन यानें सन १८१८ त संस्थानच्या ऐतिहासिक माहितीबद्दल जो रिपोर्ट लिहिला आहे, त्यांत फोंडसावंत यांस गादी मिळण्यासाठीं आणि दादीबाई (रावसाहेबांची बायको व भाऊसाहेबांची आई) व चंद्रोबा सुभेदार यांचें दरबारांत असलेलें वजन नाहींसें करण्यासाठीं लक्ष्मीबाई व फोंडसावंत यांनीं दुर्गाबाई यांचाही सल्ला घेऊन हा खून करविला असें ह्मटलें आहे.

हें घराणें खानदानीचें समजलें जातें. नागेश प्रभूचे चिरंजीव आत्माराम प्रभु यांनीं
फोंडें, उसप, मणेरी, तेरेखोल येथील लढाया जिंकण्यांत चांगली मदत केली. ह्या घरा-
ण्याची दानशूरपणाविषयींहि फार ख्याति आहे. आत्माराम प्रभु यांचे पुत्र वासुदेव
प्रभु यांनीं 'गायत्रीपुरश्चरण' व 'संहितास्वाहाकार' हे दोन मोठे यज्ञ केले. त्यांचे
चिरंजीव आत्माराम ऊर्फ बापूसाहेब हे तूर्त इस्टेटीचे मालक असून ते मोठे दानशूर,
गुणज्ञ आणि तसेच विद्याभिलाषीहि आहेत; आणि त्याहूनही त्यांचा वर्णनीय गुण ह्मटला
ह्मणजे ते इतके संपत्तिवान असूनही अगदीं निर्व्यसनी आहेत. आपल्या पदरच्या खर्चानें
त्यांनीं आपल्या प्रांतीं कित्येक शाळाही स्थापन केल्या आहेत. त्यांस पोर्तुगालच्या राजा-
कडून 'व्हायकौंट' असा बहुमानाचा किताब मिळाला आहे. त्याचप्रमाणें थोड्या दिव-
सांपूर्वीं कोल्हापूरच्या छत्रपतींकडून त्यांस 'रावराजे' असा किताब, हत्ती, पालखी व
घोडे असा बहुमानाचा सरंजाम मिळाला आहे.

[1] परिशिष्ट ३ रें पृष्ठ ६.

फोंडसावंत यांची वडील बायको पार्वतीबाई ही सुबराव घाटगे कागलकर याची भाची. या सुबरावाचा व आपासाहेब निपाणकराचा कांहीं आप्तपणा होता, व त्यासंबंधानें सुबराव निपाणीस राहत असे. तो व आपासाहेब निपाणकर या दोघांनीं मिळून अशी मसलत केली कीं, फोंडसावंत यांस कैद करून त्यांचा पार्वतीबाईच्या पोटीं झालेला मुलगा खेमसावंत यास लक्ष्मीबाईच्या मांडीवर देऊन गादीस अधिकारी करावें आणि सुबराव घाटगे यानें निपाणकरांचे लोक वाडीस होते, त्यांच्या मदतीनें राज्यकारभार करावा. त्याप्रमाणें सुबराव घाटगे आणि निपाणकराचा मावसभाऊ मानसिंगराव पाटणकर हे बरोबर चारपांचशें स्वार व पायदळ घेऊन खेम सावंतांसह वाडीस आले, व खेम सावंत यांस लक्ष्मीबाई यांच्या मांडीवर बसविलें. सुबराव घाटगे चारआठ दिवस वाडींत राहून तोरगलास परत गेला. इकडे मानसिंगराव पाटणकर हा सैन्यासह वालावलीस फोंड सावंत यांस भेटण्यासाठीं म्हणून गेला, व तेथें त्यांस त्यानें देउळात वेढा दिला. तेव्हां फोंड सावंत हे देउळाच्या दरवाजावरील माडीच्या कडण्या कापून बाहेर पडले. ते काळसें, कलमठ, नांदगांव, खारेपाटण या गांवांवरून महाडास जाऊन पोहोंचले. मानसिंगराव पाटणकरानें राजापुरापर्यंत त्यांचा पाठलाग केला; परंतु फोंडसावंत त्याच्या हातीं लागले नाहींत. नंतर तो सिदगडास परत आला. तेथें त्यास कोल्हापुरावर हल्ला करण्याचा एक बेत चालला आहे अशी बातमी समजली; तेव्हां तो ताबडतोब कोल्हापुरास निघून गेला.

लक्ष्मीबाई यांनीं थोडेच दिवसपर्यंत राज्यकारभार केला. तरी त्यांची बहुतेक कारकीर्द अनेक प्रकारच्या क्लेशांत व दुःखांत गेल्यामुळें आणि शेवटीं आपाजी सुबरावानें द्रव्यासाठीं त्यांचा छळ केल्यामुळें त्यांस दुखणें येऊन त्यांतच त्यांचा अंत झाला (इ. स. १८०८).

लक्ष्मीबाई निवर्तल्यावर राजश्रींच्या द्वितीय पत्नि दुर्गाबाई ह्या राज्यकारभार चालवूं लागल्या. त्या मोठ्या कारस्थानी व न्यायी होत्या. कित्येक इंग्लिश अंमलदारांनींही त्यांच्या राज्यपद्धतीची तारीफ केलेली आहे. त्यांनीं राज्यकारभार हातीं घेतल्यावर प्रथमतः आपले सरदार संभाजी

गोविंद सावंत, चंद्रोबा वगैरे वाडींतील दंग्याधोप्यामुळें बाहेर जाऊन राहिले होते, त्यांस वाडींत बोलावून आणिलें; आणि त्यांस चार उपदेशाच्या गोष्टी सांगून त्यांचा आपसांतील द्वेष मोडून टाकिला. त्यामुळें संस्थानच्या फौजेस आलेलें दुर्बलत्व नाहींसें झालें. चंद्रोबानें प्रथमतः हनुमंतगड किल्ल्यास वेढा दिला होता, तो उठविण्यासाठीं ह्मणून आपाजी सुबराव यानें आपलें कांहीं सैन्य तिकडे पाठविलें. हें चंद्रोबास समजतांच ती संधी साधून आपलें बहुतेक सैन्य त्यानें वाडीवर पाठविलें. आपाजी सुबराव याचें वाडींतील सैन्य थोडें असल्यामुळें चंद्रोबास फारसे आयास न पडतां वाडीचा कोट घेतां आला. नंतर त्यानें आपाजी सुबराव यास फुकेरीच्या घाटांत गांठून गराडा दिला. त्यामुळें आपाजी सुबराव याचा निरुपाय होऊन त्यास शरण यावें लागलें (एप्रिल सन १८१०). या नंतर इतर सरदारांच्या मदतीनें बांद्याचा कोट व निपाणकरांच्या ताब्यांत असलेलीं बाकीचीं ठाणींही हस्तगत करून घेतलीं; आणि पावसाळा सुरू होण्यापूर्वींच निपाणकर यांस या प्रदेशांतून हांकून लाविलें.

यानंतर दुर्गाबाई यांनीं गादीस कोणीतरी मालक असावा, असा आपल्या सरदारांच्या मतानें विचार ठरविला. यावेळीं सावंत भोंसलेवंशांत फोंड सावंत हे एकटेच हयात असून ते महाडास पळून गेले होते. दुर्गाबाईनीं आपले सरदार चंद्रोबा सुभेदार आणि बाबुराव राणे यांस महाडास पाठवून त्यांस वाडीस आणविलें; आणि त्यांस गादीवर बसवून आपण राज्यकारभार चालवूं लागल्या. फोंड सावंत यांनींही मागील सर्व गोष्टी विसरून दुर्गाबाईशीं सलोख्यानें वागण्याचें कबूल केलें. अशा रीतीनें कांहीं दिवस जिकडेतिकडे शांतता झाली.

दुर्गाबाईनीं निरनिराळ्या किल्ल्यांवर आपल्या सरदारांच्या नेमणुका करून व किल्ल्यांकडील खर्चासाठीं त्यांस जवळच्या गांवांतला वसूल लावून देऊन बंदोबस्त केला. चंद्रोबा सुभेदार याची बांद्याच्या कोटावर बाबणो गोपाळ याची निवती येथें, संभाजी गोविंद याची रेडीच्या यशवंतगडावर, फोंड सावंत तांबुळकर याची महादेवगडावर व कुडाळकर सावंताची कुडाळच्या कोटांत अशा नेमणुका केल्या. त्याप्रमाणें प्रत्येक कि-

ल्ल्याचा किल्लेदार आपणास नेमून दिलेल्या गांवांचा वसूल घेऊन किल्ल्याचा खर्च चालवीत असे. कांहीं दिवस लोटल्यावर हे किल्लेदार आपणास नेमून दिलेली मर्यादा सोडून दुसऱ्या गांवांतील वसूल घेऊं लागले. अशा रीतीनें त्यांच्या आपसांतील कलहास थोडथोडी सुरुवात होऊन पुढें तो दिवसेंदिवस वाढत चालला. त्यांतही चंद्रोबा सुभेदार, बावणो गोपाळ व संभाजी गोविंद यांच्या भागांत तर फारच घोंटाळा झाला होता. दुर्गाबाई याजकडे त्यासंबंधानें या तिन्ही किल्लेदारांच्या वारंवार एकमेकांविरुद्ध कागाळ्या येत असत. तथापि प्रत्येकाची थोडीनाथोडी तरी आगळीक असल्यामुळें या तंट्याचा निकाल लावणें फार कठीण होतें.

शिवाय बावणो गोपाळ व संभाजी गोविंद हे समुद्रकिनाऱ्यावरील किल्ल्यांवर असल्यामुळें त्यांनीं आपला चांचेपणाचा धंदा जोरानें चालविला. त्यामुळें मुंबईहून येणाऱ्याजाणाऱ्या इंग्लिश व्यापाऱ्यांना फार त्रास पोंचूं लागला. तेव्हां तो धंदा पार नाहींसा करावा अशी ब्रिटिश सरकारची इच्छा होती; ह्मणून त्यासंबंधानें भोंसल्यांशीं बोलणें करून व्यवस्था लावण्यासाठीं ब्रिटिशसरकारानें आपला गोवें येथील वकील क्याप्टन स्कुइलर यास नेमिलें. त्यानें चंद्रोबा सुभेदार याच्यामार्फत यापुढें चांचेपणाचा धंदा चालूं नये, अशा बंदोबस्तासाठीं उभयपक्षांत तह ठरवावा, असें भोंसल्यांबरोबर बोलणें लाविलें; व त्याप्रमाणें भोंसले कबूल होऊन तारीख ३ माहे आक्टोबर सन १८१२ रोजीं मडुरें येथें तह झाला. त्यांत असें ठरलें कीं, चांचेपणा बंद करण्यासाठीं भोंसले यांनीं वेंगुर्ल्याचा कोट, बतेरी (तोफखाना) चौकी गणेराम टेंब व बंदर यांसह पूर्ण अधिकार सोडून इंग्लिशांस द्यावा; सर्व लढाऊ जहाजें इंग्लिशांच्या स्वाधीन करावीं; कोणतेंहि गलबत इंग्लिश अंमलदारांनीं तपासल्याशिवाय निवती बंदरांतून बाहेर जाऊं नये; त्या कामासाठीं त्या अंमलदारांनां त्या ठिकाणीं कांहीं सैन्य ठेवण्याची मोकळीक असावी; आणि जर यापुढें वाडीसरकारच्या प्रजेनें चांचेपणा केला, तर रेडी व निवती हे किल्ले वाडी सरकारानें इंग्लिशांस द्यावे. हा तह करण्यास स्वतः फोंड सावंत हे हजर होते.

पुढें लवकरच फोंड सावंत वालावल गांवीं कांहीं कामाकरितां गेले.

ते तेथें आजारी होऊन वाडीस येत असतां वाटेंत आकेरी येथें ता. २७ आक्टोबर सन १८१२ रोजीं घटका दिवसास त्यांचा अंत झाला. त्यावेळीं त्यांचें वय ३२ वर्षांचें होतें. नंतर त्यांचें शव वाडीस आणून येथेंच त्यांचें दहन केलें. फोंड सावंत यांस दोन बायका होत्या. वडील बायको पार्वतीबाई ही लक्ष्मणराव शिंदे सेना खासकील तोरगलकर याची मुलगी. तिचा मुलगा खेम सावंत ऊर्फ बापूसाहेब याचा जन्म तारीख २६ मार्च सन १८०५ रोजीं पेडणें महालांत आराबा येथें झाला. पुढें कांहीं दिवसांनीं ती तोरगलास जाऊन राहिली. तेथें तिच्या भावानें कांहीं कारणानें तिला ठार मारिलें. नंतर फोंड सावंत यांचें दुसरें लग्न इ. स. १८०७ त नरसिंगराव शिंदे नेसरीकर यांची थोरली बहीण कृष्णाबाई हिच्या बरोबर नेसरी येथें झालें. तिच्यापासूनही फोंड सावंत यांस इसवी सन १८११ त नार सावंत ऊर्फ नानासाहेब या नांवाचा एक मुलगा झाला. तो अगदीं लहानपणांत ह्मणजे इसवी सन १८१९ त मरण पावल्यामुळें त्याची फारशी प्रसिद्धी नाहीं.

खेम सावंत ऊर्फ बापूसाहेब हे जन्मापासून तोरगलास आपल्या आजोळीं राहत असत. त्यांस गादीवर बसविण्याची सुबराव घाटगे यानें एकदां खटपट केली होती हें पूर्वी सांगितलेंच आहे. त्यांसच फोंड सावंत निवर्तल्यावर दुर्गाबाईनीं तोरगलाहून वाडीस आणविलें, व त्यांस गादीवर बसवून पूर्ववत् आपण राज्यकारभार चालवूं लागल्या. यावेळीं बापूसाहेब यांचें वय ८ वर्षांचें होतें.

इसवी सन १८१३ च्या जानेवारी महिन्यांत भोंसल्यांचा कोल्हापूरकर यांनीं घेतलेला भरतगड किल्ला घेण्याचा दुर्गाबाईनीं निश्चय करून त्यासाठीं भरतगडावर आपलें कांहीं सैन्य संभाजी सावंत व चंद्रोबा सुभेदार यांच्या हाताखालीं देऊन त्यांनीं किल्ल्यावर हल्ला करून तो हस्तगत केला. थोड्या दिवसांपूर्वी ह्मणजे फोंड सावंत व इंग्लिश लोक यांचा तह झाला त्यापूर्वी दोन दिवस कोल्हापूरसरकारचा ब्रिटिश सरकाराशीं तह होऊन त्यांत कोल्हापूरकरांपासून सिंधुदुर्ग, पद्मगड, राजकोट व सर्जेकोट हे किल्ले घेऊन कोल्हापूरकरांच्या राज्याचें रक्षण करण्याची ब्रिटिश

सरकारानें हमी घेतली होती. ह्मणून भोंसल्यांनीं कोल्हापूरकरांकडून घेतलेला भरतगड किल्ला पुन: त्यांस द्यावा, असें ब्रिटिश सरकाराचें ह्मणणें पडलें; परंतु दुर्गाबाई तें कबूल करीनात. ह्मणून ब्रिटिश सरकारानें कर्नल डाउसी याच्या हाताखालीं सैन्य देऊन त्यास भोंसल्यापासून भरतगड घेऊन तो कोल्हापूरकरांस देण्यासाठीं पाठविलें. तो घांट उतरून ता. १७ मार्च सन १८१३ रोजीं भरतगडास येऊन पोहोंचला. तो येतांच भोंसले यांनीं किल्ला सोडून दिला; आणि एप्रिल महिन्यांत तो कोल्हापूरकर यांच्या स्वाधीन करण्यांत आला.

आपल्या दोस्तांशीं दुर्गाबाईनीं केलेलें शत्रुत्वाचें वर्तन आणि त्यामुळें आलेला खर्च यांचा मोबदला ह्मणून भोंसल्यांनीं पाट व हवेली या तर्फांत असलेला सिंधुदुर्ग किल्ल्याचा तनखा घेऊन त्याबद्दल वराड व मालंड या तर्फा ब्रिटिश सरकारास द्याव्या, अशा प्रकारचें बोलणें करण्यासाठीं कर्नल डाउसी हा परत आपल्या गांवीं न जातां यशवंतगडास आला. तेथें त्याचें व राणी दुर्गाबाई यांचें बोलणें होऊन, त्यानें तळ उठवून जावें ह्मणून दुर्गाबाईनीं, वेंगुर्ल्याचा जो भाग अजून इंग्लिशांस दिला नव्हता, त्यावरील आपला हक्क सोडून दिला; आणि इंग्लिश लोक मुलूख सोडून गेल्यावर वाडीस जाऊन सर्व तंट्यांचा सामोपचारानें निकाल करण्याचें वचन दिलें. परंतु वाडीस पोंचल्यानंतर बरेच दिवसपर्यंत दुर्गाबाईनीं तडजोड केली नाहीं; आणि ता. ३ आक्टोबर सन १८१२ रोजीं तह होऊन ज्या गोष्टी ठरल्या, त्याबाहेर तह करण्यास आपण कबूल नाहीं, असा आपला निश्चय कर्नल डाउसी यास कळविला. तेव्हां या नकारानंतर तो वेंगुर्लें ही देणगी ह्मणून न समजतां जिंकून घेतलेला मुलूख समजलें जाईल, असें दुर्गाबाई यांस कळवून घांट चढून परत गेला. (मे सन १८१३).

पावसाळ्यांत दादीबाई हा एक नवीन शत्रू उत्पन्न झाला. तिचा नवरा रावसाहेब व मुलगा भाऊसाहेब हे दोघेही निवर्तल्यावर तिला तिच्या नवऱ्याला मिळत असलेली नेमणूक मिळूं लागली; तरी तितक्यावर संतुष्ट न राहतां तिचें असें ह्मणणें पडलें कीं, फोंड सावंत यांच्या

दोन मुलांपैकीं एक आपल्यास दत्तक देऊन त्यास आपल्या मुलाचें नांव रामचंद्रराव हें ठेवावें, आणि त्यास गादीचा मालक करावें. दुर्गाबाई या गोष्टीस कबूल नव्हत्या; कारण तसें केलें असतां आपल्या हातचा अधिकार जाऊन तो दादीबाईला मिळेल, अशी त्यांना भीति होती. दादीबाईस रावसाहेबांच्या राखेचा मुलगा चंद्रोबा सुभेदार याची मदत होती.

ब्रिटिश सरकारानें वराड, मसुरें व मालंड या तर्फा आपल्यास देऊन त्या ऐवजीं वाडी संस्थानचे पाट व हवेली या तर्फांत असलेला सिंधुदुर्ग किल्ल्याचा तनखा द्यावा, असें पूर्वीं बोलणें चालविलें होतेंच. त्याचा निकाल लावण्यासाठीं इ. सन १८१३ सालीं डन्लॉप साहेब यानें भोंसले यांस लिहून पाठविलें; परंतु भोंसले ती गोष्ट कबूल करीनात. तेव्हां बाँबे नेटिव्ह इन्फंट्रीच्या सातव्या पलटणींतील दुसरी तुकडी, मालवण येथील तोफखाना आणि कर्नल डाउसीच्या सैन्याची एक तुकडी इतकें सैन्य वराड व मालंड या तर्फा हस्तगत करून घेण्यासाठीं आलें; आणि कांहींएक अडथळा न होतां ता. २७ जानेवारी सन १८१४ रोजीं त्यानें त्यांचा ताबा घेतला. पाट, हवेली, वराड, मसुरें व मालंड या पांचही तर्फांत मालवणच्या सिंधुदुर्गाचा तनखा असून त्यांचा बाकीचा वसूल वाडीसरकारास मिळत असे. अशा रीतीनें अधिकार विभागलेला असल्यामुळें रहिवाशांनां ज्या गैरसोई सोसाव्या लागत, त्या नाहींशा करण्यासाठीं ब्रिटिश सरकारास अशी व्यवस्था करावी लागली. वराड, मसुरें व मालंड या तर्फा घेतल्यावर ब्रिटिश सरकारानें त्याच दिवशीं एक जाहिरनामा काढून त्यांत आपले हे हेतु स्पष्टपणें प्रसिद्ध केले; व त्यांतच पाट व हवेली या दोन्ही तर्फांतील सिंधुदुर्गाच्या तनख्यावरचा आपला हक्क वाडीसरकारास सोडून दिल्याचेंही प्रसिद्ध केलें.

वाडीसरकारच्या सरदारांचीं आपसांत भांडणें सुरू होतीं, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. कांहीं दिवसांनीं यशवंतगड येथील किल्लेदार संभाजी गोविंद यास अर्धांगवायूचा झटका येऊं लागला. चंद्रोबा सुभेदार यानें जादू केल्यामुळें आपणास हा झटका येऊं लागला अशी त्याची समजूत होऊन बरा झाल्यावर आपण याचा सूड घेईन, अशी त्यानें शपथ घेतली.

दुर्गाबाई यांच्या मनाचा ओढा संभाजी गोविंद याजकडे विशेष होता. दादीबाईचा सर्व भरंवसा चंद्रोबावर होता. यामुळें सहजींच दोन पक्ष होऊन दादीबाई माजगांव येथें राहत होती, तेथून ती आपल्या सैन्यासह ता. १९ एप्रिल सन १८१५ रोजीं बांदें येथें जाऊन चंद्रोबास मिळाली. यावेळीं कारभाराचें काम लक्ष्मण कृष्ण नेरूरकर हा पाहत असे. तो संभाजी गोविंद आणि बाबणो गोपाळ हे एकत्र होऊन त्यांनीं त्याच सालीं चंद्रोबा याच्यावर स्वारी केली. त्या दोघांची वागडोळा येथें गांठ पडून तीन महिनेपर्यंत सारखी लढाई चालू होती. शेवटीं संभाजी गोविंद याचा मोड होऊन त्यास वाडीस पळून यावें लागलें. त्याच्या मागें चंद्रोबाची फौज येऊन दोघांचे वाडी येथें तंटे होऊं लागले. तेव्हां दुर्गाबाई यांनीं मध्यें पडून दोघांसही आपापल्या जागीं जाऊन राहण्याविषयीं ताकिदी दिल्या; परंतु तितक्यावर चंद्रोबाची समाधानी झाली नाहीं. ह्मणून संभाजी गोविंद याजकडून त्यास पुन्हां त्रास पोहोंचणार नाहीं, अशा खात्रीसाठीं त्याच्या मागण्यावरून माधवराव शिवराम सबनीस व मंगेशराव शिवराम चिटणीस या दोघांस त्याच्या बरोबर देऊन त्यास बांद्यास पाठविलें. नंतर संभाजी गोविंद व बाबणो गोपाळ हेही आपापल्या किल्लेदारीच्या जागीं यशवंतगड व निवती येथें गेले. इतकें झालें तरी या सरदारांपासून रयत लोकांस होणारा त्रास चालू होताच.

इसवी सन १७१७ त पोर्तुगीज लोक व भोंसले यांमध्यें लढा उत्पन्न होऊन पोर्तुगीज लोकांनीं ९००० लोकांनिशीं उसप तर्फेवर स्वारी केली. त्यांनीं हरये गंवस देसाई उसपकर याचें घर लुटून तें व उसप गांवांतील इतर घरेंही जाळिलीं. त्याचा सूड उगविण्यासाठीं वाडी सरकारानें आपला सरदार संभाजी गोविंद यास तेरेखोल किल्ला घेण्यासाठीं यशवंतगडाहून सैन्य पाठविण्याचा हुकूम केला. त्याप्रमाणें त्यानें आपले लोक पाठवून तेरेखोल किल्ला सर केला. मागाहून लवकरच पोर्तुगीज गव्हर्नर जनरल मोठ्या फौजेनिशीं येऊन त्यानें तेरेखोलचा किल्ला परत घेतला.

---

१ लखम सावंत यांच्यासाठीं विजापूरच्या बादशहाकडून ज्यानें फर्मान मिळविलें, त्या पितांबर शेणव्याचे हे वंशज होत. पितांबर शेणव्यापासून हे आठवे पुरुष होत.

आणि रेडीस येऊन यशवंतगड किल्ल्यास वेढा दिला. त्याच्याबरोबर पंचवीस तोफा होत्या. हा वेढा सत्तावीस दिवसपर्यंत पडलेला होता. यावेळीं दुर्गाबाई स्वतः होडावडें येथें जाऊन राहिल्या होत्या, व तेथून त्या सैन्याचा वगैरे पुरवठा करीत असत. दोन्ही पक्षांच्या नेहमीं चकमकी चालू होत्या. त्यांत उभयपक्षांचें बरेंच नुकसान झालें. भोंसले यांजकडील तातो काक सावंत परुळेकर व आणखी एकदोन सरदार पडले, कांहीं शिपाई मेले व जखमीहि झाले. पोर्तुगीजांचें तर फारच नुकसान झालें. त्यांचेकडील बरेच लोक पडले व जखमी झाले. शेवटीं आपला इलाज कांहीं चालत नाहीं, असें पाहून पोर्तुगीज लोक रात्रींच्या वेळीं वेढा उठवून गोव्यास परत गेले.

याच सुमारास खेम सावंत यांचें नारायणराव पाटणकर यांची तिसरी मुलगी अंबिका हिच्याबरोबर लग्न झालें. पण दरबारच्या बहुतेक लोकांस ही गोष्ट आवडली नाहीं. त्यांचा हेतु शिंद्यांशीं संबंध व्हावा असा होता व शिंदेही त्या गोष्टीस आतुर होते; परंतु दुर्गाबाईस तो संबंध जुळवून आणणें पसंत न वाटल्यामुळें तें बोलणें तसेंच राहिलें. खेम सावंतांच्या या पहिल्या बायकोचें नांव लक्ष्मीबाई असें ठेविलें.

इसवी सन १८१८ त पूर्वीं निपाणकरांच्या धांदलींत ज्याचा खून झाला असें ह्मणतात, तो भाऊसाहेब आपण आहें, असें सांगणारा एक मनुष्य पाटणाहून सावंतवाडीस आला. त्याच्याबरोबर भोंसल्याची पाटणकरांपैकीं कांहीं आप्तमंडळी होती. त्याचें ह्मणणें असें होतें कीं, निपाणकरांच्या कैदेंत आपण असतां सेख हुसेन हा अरब जमादार आपल्यावर पहारेकरी होता व त्याची आपल्यावर ममता होती; आपल्यास मारण्याचा हुकूम झाला, तेव्हां त्या अरब जमादारानें आपल्या चेहऱ्याचा एक पोरगा तेथें ठेवून आपल्यास रानांत नेऊन ठेविलें; दुसरे दिवशीं सकाळीं त्यानेंच आपल्याला बैलावर बसवून बरोबर एकदोन माणसें देऊन बेळगांवास पाठविलें; तेथें बैल विकून खर्चास पैसे दिले; तेथून आपण नवलगुंदास गेलों; नंतर पुढें गुर्लमसुरास जाऊन कांहीं दिवस चिदंबर दीक्षित याजकडेस राहून ते ून नरसोबाची वाडी, मिरज, तासगांव यां-

वरून विजापुरास गेलों; पुढें कांहीं वर्षें ब्रह्मचारीवेष धरून काढिलीं; पुढें पुणें, माहुली, वांई असे गांव फिरून शेवटीं आपली आजी राजसबाई (रावसाहेबांची आई) व चुलतआते आकाबाई ह्या पाटण येथें होत्या तेथें गेलों; तेथून चंद्रोबा सुभेदार व खानविलकर वगैरे मंडळीस पत्रें पाठविलीं; त्यावरून चंद्रोबानें एक माणूस व खर्चास दोनशें रुपये पाठविले. दुर्गाबाईनीं त्याच्याबद्दल चौकशी करून व भाऊसाहेबांची आई दादीबाई हिजकडे परीक्षेसाठीं त्यास पाठवून तो भाऊसाहेब नव्हे असें ठरविलें; व त्यांत शेवटीं असेंही निष्पन्न झालें कीं, फोंड सावंत ऊर्फ बाबासाहेब यांजकडे बाबी दुलशेट तानवडा याचा मुलगा मुकुंद तानवडा खिजमतगार होता, व चोरी करून तो पळून गेला होता; तोच हा तोतया भाऊसाहेब आहे. तेव्हां त्याचें कांहीं पारिपत्य करावें असा दुर्गाबाईचा हेतु होता; परंतु त्याच्याबरोबरची पाटणकर मंडळी होती, ती त्यास आपण पार करणार असें ह्मणूं लागली. यावेळीं रावसाहेबांची वृद्ध मातुश्री राजसबाई हीहि त्याच्याबरोबर होती. दुर्गाबाईचें ह्मणणें या आप्तमंडळीनें त्या तोतयास लावून देऊन आपण कांहीं दिवस येथें रहावें असें होतें; परंतु तें सुद्धां न ऐकतां ती मंडळी तोतयास घेऊन रागानें निघून [1]गेली.

ह्या वेळेस वाडीसरकार आपल्या सरदारांवर दाब ठेवण्यास समर्थ नव्हतें. यामुळें कित्येक सरदार ते ज्या किल्ल्याचे किल्लेदार होते ते किल्ले बळकाऊन बसले होते. संभाजी सावंतानें रेडीचा, बाबणो गोपाळ यानें निवती आणि चंद्रोबा सुभेदारानें बांद्याचा कोट बळकाविला. ते वाडीसरकारच्या हुकुमास न जुमानतां मनास वाटेल तशी चोंहींकडे लूट करीत असत. ह्या गोष्टीचा बंदोबस्त करण्यासाठीं सन १८१२ च्या तहाप्रमाणें यशवंतगड व निवती हे किल्ले ब्रिटिशसरकारच्या ताब्यांत देण्याविषयीं सर विल्यम ग्रांट केर यानें दुर्गाबाईस पत्र पाठविलें. त्या यावेळीं फार आजारी होत्या, व त्यांतच ता. १७ जानेवारी सन १८१९ रोजीं त्यांचा अंत झाला. यामुळें वरील मागणीचा निकाल होण्याचें राहिलें.

१ परिशिष्ट १ लें लेख नंबर १११.

दुर्गाबाईच्या मागाहून खेम सावंत यांच्या राहिलेल्या दोन बायका नर्मदाबाई व सावित्रीबाई ह्या कारभार पाहूं लागल्या. इसवी सन १८१९ च्या अवेलीस सर विल्यम ग्रांट केर यानें संस्थानच्या हद्दीवर येऊन पुढें लिहिल्याप्रमाणें मागण्या केल्याः–[१] कांहीं गुन्हेगार द्यावे; [२] जी मालमत्ता लुटून नेली असेल ती परत द्यावी; [३] संभाजी सावंत व बाबणो गोपाळ यांस अधिकारापासून दूर करावें; [४] आणि रेडी व निवती हे किल्ले तीन वर्षेपर्यंत इंग्लिशांस द्यावे. वाडी दरबारानें ह्या मागण्या कबूल केल्या नाहींत; तेव्हां मेजर जनरल केर यानें लढाईची तयारी केली. यावेळीं चंद्रोबा सुभेदार हा शूर सरदार भोंसल्यांचे पदरीं होता. त्यास केर साहेब यानें पत्र पाठवून या कामीं तुह्मी दोन्हीं पक्षांस मदत न करतां स्वस्थ रहाल, तर तुमची असलेली सत्ता व अधिकार ब्रिटिशसरकार कायम ठेवील असें कळविलें. त्यामुळें सुभेदाराची मदत वाडीसरकारास मिळाली नाहीं इतकेंच नाहीं तर, सुभेदार यानें ब्रिटिशसरकारास अंतस्थ रीतीनें कांहीं मदतही दिली. तेव्हां भोंसले यांचा निरुपाय होऊन ते दोन्ही किल्ले ब्रिटिशसरकारच्या स्वाधीन करण्यास तयार झाले; परंतु किल्लेदार ते सोडून देईनात. ह्मणून मेजर जनरल केर यानें प्रथम निवती किल्ल्यावर हल्ला करून तो सर केला. नंतर त्यानें यशवंतगडास जाऊन त्या किल्ल्यास वेढा दिला. बरेच दिवसपर्यंत किल्ल्यांतील लोकांनीं दाद दिली नाहीं. शेवटीं ता. १३ फेब्रुआरी सन १८१९ रोजीं इंग्लिशांनीं किल्ल्यावर आपला तोफखाना सुरू केला. तेव्हां आंतील लोकांचा निरुपाय होऊन त्यांतील बहुतेक लोक रात्रीच्या वेळीं ती जागा सोडून गेले; आणि दुसऱ्या दिवशीं किल्ला ब्रिटिशसरकारच्या हातीं आला.

नंतर ता. १७ फेब्रुआरी सन १८१९ रोजीं वाडीदरबार आणि ब्रिटिशसरकार यांच्यामध्यें तह झाला. त्यांत असें ठरलें कीं, संभाजी सावंत व बाबणो गोपाळ यांनां वाडीसरकारानें कामावर ठेवूं नये; मागें ज्या लोकांनीं लूट केली असेल, त्यांपैकीं जितक्यांस पकडतां येईल तितक्यांस पकडून ब्रिटिशसरकारच्या स्वाधीन करावें; तसेंच पुढें ब्रिटिशसरकार

किंवा त्यांचे दोस्त यांच्या मुलुखांत वाडीच्या प्रजेपैकीं जे लोक लूट वगैरे करितील त्यांसही धरून इंग्लिशांच्या स्वाधीन करावें; भोंसले यांनीं ब्रिटिशसरकारास पाट व आजगांव या दोन तर्फा आणि कर्लीनदीपासून पोर्तुगीज अमलापर्यंत समुद्रकिनाऱ्याची ओळ रेडी व निवती या किल्ल्यांसह कायमची द्यावी; ब्रिटिश लोकांस सावंतवाडी संस्थानांतील गुन्हेगारांस पकडण्यासाठीं येण्याची मोकळीक असावी व त्या कामांत भोंसले यांनीं त्यांस पूर्ण मदत करावी. याप्रमाणें तह करून व वाडी संस्थानच्या बंदोबस्तासाठीं क्याप्टन गायडियन अचिन्सन यास ठेवून, मेजर जनरल केर हा परत जाण्यास गेला याचवेळीं चंद्रोबा सुभेदार यानें केलेल्या कामाबद्दल त्यास सालीना १०००० रुपयांची वाडीसरकाराकडून नेमणूक ठरवून देऊन चंद्रोबा यानें पुढें कांहीं हालचाल न करितां स्वस्थ रहावें असें ब्रिटिशसरकारानें ठरविलें व ती नेमणूक त्यास पोंचण्याची हमी घेतली; आणि चंद्रोबा व त्याचें कुटुंब यांस राहण्यासाठीं बांद्याचा[1] कोट वाडीसरकाराकडून देवविला. यानंतर चंद्रोबा सुभेदार कांहीं हालचाल न करितां स्वस्थ राहिला. तथापि तो व त्याचा कारभारी विठ्ठल नारायण गायतोंडे हे चांगले मुत्सद्दी असल्यामुळें वाडीसरकार केव्हां केव्हां त्यांची मदत घेत असे.

क्याप्टन अचिन्सन एक वर्षपर्यंत सावंतवाडीस होता, व त्या मुदतींत संस्थानचा बंदोबस्त उभयतां बाई यांनीं चांगल्या प्रकारें राखिला. त्यावेळची संस्थानची स्थिति पाहून, वाडी सरकारकडून घेतलेल्या गांवांपैकीं जे समुद्रकिनाऱ्यास लागून नव्हते, ते गांव वाडीसरकारास परत देण्याविषयीं त्यानें ब्रिटिशसरकारास लिहिलें. त्यावरून ब्रिटिशसरकारानें पाट व आजगांव या तर्फा वाडीसरकारच्या प्रजेनें केलेला चांचेपणा बंद करण्यासाठींच केवळ घेतल्या होत्या, असें स्पष्ट दाखविण्यासाठीं पुनः ता. १७ फेब्रुआरी सन १८२० रोजीं तह करून त्या दोन्ही तर्फांतील रेडी व निवती हे किल्ले व समुद्रकिनाऱ्यालगतचे गांव खेरीज करून बाकी सर्व मुलूख वाडीसरकारास परत दिला.

---

१ याचे वंशज बांदें येथें राहतात. त्यांचें घराणें संस्थानच्या नांवाजलेल्या घराण्यापैकीं एक आहे.

नमदाबाई व सावित्रीबाई यांचें ह्मणणें, संस्थानांतील कांहीं मुलूख परक्यांकडे गेला असतां तो लढाया करून परत मिळविण्याचें आजवर चालत असे, परंतु ब्रिटिशसरकाराशीं झालेल्या तहावरून तसें करितां येत नाहीं; ह्मणून कोल्हापूरकर व वाडीसरकार यांच्यामध्यें कित्येक गांवांतील तनख्याबद्दल जो लढा आहे, त्याचा निकाल ब्रिटिशसरकारानें करावा असें होतें. त्यावरून क्याप्टन् अचिन्सन यानें प्रथम मनोहरगड किल्ल्याच्या तनख्याबद्दलचा प्रश्न हातीं घेऊन त्याचा निकाल लाविला; व कोल्हापूर संस्थानचा त्या किल्ल्याच्या तनख्याबद्दल असलेला शिलशिला मोडून टाकिला (इ. स. १८२०).

इ. स. १८२० च्या अखेरीच्या सुमारास ब्रिटिशसरकारानें क्याप्टन अचिन्सन याची नेमणूक रद्द केली, व त्यास सांगितलेलें काम रत्नागिरी जिल्ह्याचे जज्जावर संपविलें. इ. स. १८२२ त तें त्याच्याकडून काढून रत्नागिरी जिल्ह्याचे कलेक्टरास सांगितलें.

कोल्हापूर संस्थान व वाडीसरकार यांच्यामध्यें असलेल्या वादापैकीं प्रसिद्धगड व नरसिंहगड यांच्या तनख्याचा निकाल होण्याचें राहिलें होतें. तो प्रश्न इ. स. १८२२ त रत्नागिरीचा कलेक्टर मि० रीड यानें हातीं घेऊन त्याच्या चौकशीसाठीं पांवशी येथें कांहीं दिवस राहून निकाल लाविला. त्यांत असें ठरविलें कीं, वाडीसरकारानें कोल्हापूरसंस्थानास दरसाल ७८२४८६६८ रुपये द्यावे व पुढें घांटाखालील गांवांत कोल्हापूरसरकारानें वसूल घेऊं नये.

यावेळीं (इ. स. १८२२) खेमसावंत यांचें वय १८ वर्षांचें होतें. राज्यकारभार उभयतां बाई पहात तो यापुढें खेमसावंत यांनीं पहावा, अशी ब्रिटिशसरकारची इच्छा होती. ह्मणून ब्रिटिशसरकारतर्फे मि० डन्लॉप यानें नेरूर येथें उभयतां बाई व खेमसावंत यांची भेट घेऊन ब्रिटिशसरकारची इच्छा त्यांस कळविली; परंतु खेमसावंत यांची तशी इच्छा नव्हती. ह्मणून बाईसाहेब कारभार पाहतात तो आपल्याचसाठीं आहे इतकेंच त्यांनीं उत्तर दिलें. नंतर मि० डन्लॉप पाटणास निघून गेला; आणि ही त्रिवर्ग मंडळी वाडीस आली. परंतु पुढें कांहीं दिवसांनीं

सोबतीच्या मंडळीच्या सांगण्यावरून बाईसाहेबांविषयीं खेम सावंत यांच्या मनांत वैषम्यभाव उत्पन्न झाला. नंतर दोघीहि बाई व खेम सावंत यांनीं युक्तीनें बाईंकडील राज्याचीं शिक्कामोर्तबें त्यांस न कळवितां घेऊन कांहीं खवास, बंदे, नाइकवडी वगैरे शंभर मंडळीसह ते वाडीस आले; आणि कोटाचा बंदोबस्त करून बाईंनीं आंत येऊं नये ह्मणून कोटाचे दरवाजे लावून घेतले. मागाहून कांहीं वेळानें उभयतां बाई एकंदर स्वारीचा सरंजाम व जमावसुद्धां वाडीस कोटापर्यंत आल्या; परंतु कोटाचे दरवाजे लविलेले असल्यामुळें त्यांस आंत जातां येईना. दोन घटका दरवाजांत उभे राहून त्यांनीं वाट पाहिली. शेवटीं बापूसाहेबांची बायको आपल्या बरोबर आहे, तिला तरी आंत घ्यावी असें सांगून तिला आंत पाठविली व आपण तेथून फिरून माठ्यांत जाऊन राहिल्या. नंतर बापूसाहेब स्वतः राज्यकारभार करूं लागले. तरी बायांनीं आपली सत्ता चालविण्याचें सोडिलें नव्हतें. माधवराव शिवराम सबनीस वगैरे मुख्य मुख्य मंडळी बापूसाहेब यांजकडे असून कांहीं किरकोळ मंडळी बायांकडे होती. दोघांचेही शिपाई प्रांतांत वसुलासाठीं फिरत असत, त्यामुळें रयतेस त्रास होऊं लागला. त्याचा बंदोबस्त करण्यासाठीं रत्नागिरीहून मि० डन्लॉप वाडीस आला. त्यानें प्रथम बापूसाहेबांची भेट घेतली. नंतर माठ्यांत जाऊन बायांचीहि भेट घेतली; व बापूसाहेबांच्या अमलांत तुह्मी जमाव ठेवून कटकट करणें योग्य नाहीं, मुलुखाचे मालक बापूसाहेब आहेत, तुह्मी त्यांच्या सांगण्यांत राहिलें पाहिजे, ते आपल्या मर्जीप्रमाणें नेमणुका वगैरे करून देतील, तुह्मांस सैन्य ठेवण्याचें कारण नाहीं, त्यास निरोप द्यावा वगैरे पुष्कळ गोष्टी सांगितल्या. दुसरे दिवशीं विष्णुभट मिरवणकर यास आपल्या स्वाधीन करावें, ह्मणून बापूसाहेबांकडील कांहीं लोक येऊन बसले. तेव्हां दोन्ही बाया जमावासुद्धां माठ्यांतून निघून पांवशीस गेल्या. यावेळीं त्यांच्याबरोबर सुमारें हजार बाराशें लोक होते. तेथूनसुद्धां त्यांनीं गांवांत वसुलासाठीं शिपाई पाठवून पैसा गोळा करण्याचा क्रम सुरू ठेविलाच होता. यामुळें गांवकरी व रयतलोक यांस फारच उपद्रव होऊं लागला. तेव्हां या तंट्याचा पूर्ण निकाल लावण्यासाठीं मि० डन्लॉप पुन्हां वाडीस आला,

व बापूसाहेबांची भेट घेऊन उभयतां बाईंस खर्चासाठीं सालीना दोनदोन हजार रुपयांची नेमणूक देण्याचें ठरवून नंतर तो पांवशीस गेला. तेथें त्यानें असा जाहिरनामा प्रसिद्ध केला कीं, बायांकडे जे लोक असतील, त्यांनीं आपापल्या घरीं निघून जावें. दुसरे दिवशीं पुढील बंदोबस्तासाठीं चौके येथें क्यांप होता, तेथून कांहीं लोक आणविले. शिवाय वाडीहूनही कांहीं लोक गेले. त्यांच्या मदतीनें बाया होत्या त्याजागीं चौकी ठेवून बायांकडील कारकून व सरदार वगैरे यांस धरून कैद करून वाडीस पाठविलें. नंतर मि० डन्लॉप मालवणास निघून गेला व उभयतां बाई एकएक शिपाई बरोबर घेऊन सावंतवाडीस माठ्यांत येऊन राहिल्या. त्या अखेरपर्यंत तेथेंच होत्या. याप्रमाणें उभयतां बायांची हरकत दूर होऊन खेम सावंत ऊर्फ बापूसाहेब हे स्वतंत्रपणें राज्यकारभार पाहूं लागले. (इसवी सन १८२३).

चवथे खेम सावंत (बापूसाहेब).

इ. सन १८२३-३८.

बापूसाहेबांनीं कारभार आपल्या हातीं घेतल्यानंतर दररोज पांचसहा घटकापर्यंत दरबारास बसून कामकाज पहात असत. हा क्रम उभयतां बाई पांवशीहून माठ्यांत परत येऊन राहीपर्यंत सारखा चालू होता. बाई येऊन माठ्यांत राहिल्या, हें स्वतः बापूसाहेब यांस आवडलें नाहीं. म्हणून ते त्यांस भेटण्यासाठीं माठ्यांत गेले, व कोटांत येण्याविषयीं त्यांस विनंति केली. त्यांनींहि 'बरें आहे' असें म्हटलें; परंतु त्या कोटांत परत आल्या नाहींत. त्यापासून बापूसाहेबांनींही दरबारास येण्याचें व कामकाजांत मन घालण्याचें सोडून दिलें. नेहमीं देवधर्मांत वगैरे निमग्न असावें, असा क्रम चालला. यामुळें राज्यकारभारांत विशेष घोंटाळा होण्याची सुरुवात झाली. वसुलासाठीं राजेसाहेबांच्या मर्जीतील पाहिजे त्या लोकांनीं गांवांवर चिठ्या द्याव्या, व रयतेस त्रास द्यावा असा क्रम सुरू झाला. वसुलांत घोंटाळा झाल्यामुळें तिजोरी अगदीं रिकामी पडली. संस्थानचें कर्ज, चंद्रोबा सुभेदाराची नेमणूक, कोल्हापूरचा तनखा वगैरे

संबंधाच्या देण्याच्या रकमा न फिटतां वाढत चालल्या.

कोल्हापूर संस्थानास देण्याच्या रकमेसाठीं वाडीसरकारानें जामीन देण्याचें कबूल केलें; पण ब्रिटिशसरकारानें इ. सन १८२६ त त्याबद्दल दुसऱ्या रीतीनें अशी तोड लाविली कीं, वाडीसरकारानें कोल्हापूर सरकारास दरसाल जितकी रकम द्यावयाची, तितक्या उत्पन्नाचा आपल्या दक्षिणमहाराष्ट्रांतील मुलुखापैकीं भाग दिला व वरील रकम दरसाल वाडीसरकारानें ब्रिटिशसरकारास द्यावी असें ठरविलें.

बापूसाहेब हे स्वतः राज्यकारभारांत मन घालीत नसून त्यांच्या नांवावर हलके लोक वसुलाच्या वगैरे कामांत फार धांदल करीत. त्यामुळें रयतलोक, गांवकरी, किल्लेदार वगैरे लोकांस फार त्रास पोंचत असे, ह्मणून ते अगदीं कंटाळून जात. शेवटीं इ. स. १८२८ यावर्षीं महादेवगडचा पूर्वींचा किल्लेदार फोंडसावंत तांबूळकर यानें वाडीसरकाराविरुद्ध बंड करून महादेवगड किल्ल्यावर हल्ला केला. त्याचा मोड करण्यासाठीं वाडीसरकारानें आपलें सैन्य त्याजवर पाठविलें; परंतु त्या सैन्याला न जुमानतां त्यास त्यानें मागें पळावयास लाविलें व तो किल्ला बळकावून बसला. तेव्हां त्या बंडाचा नाश करण्यासाठीं राजेसाहेबांनीं मुंबईसरकाराकडे मदत मागितली. मुंबईसरकारनें आपली एक पलटण त्या किल्ल्यावर पाठविली. तेव्हां बंडवाले तावडतोब किल्ला सोडून शेजारच्या इचलकरंजी संस्थानांत पळून गेले (इ. स.१८३०).

इकडे अशी बंडाळी चालली असून दुसऱ्या बाजूनें कर्जाची रकम वाढत चालली होती, व तिची फेड करण्याची काळजी बापूसाहेब मुळींच घेत नसत. तिजोरींत तर पैसा नव्हताच. कोणत्याही तोडीनें देण्याची फेड करण्याविषयीं ब्रिटिश सरकारची राजेसाहेबांच्या मागें निकट होती. चंद्रोबाची नेमणूक न पोंचल्यामुळें त्याचे लोक गांवोगांव फिरून पैसा काढण्यासाठीं गांवकरी लोकांस त्रास देऊं लागले. रत्नागिरीचे कलेक्टर गिलबर्ट मूर यांनीं चंद्रोबाच्या देण्याची फेड न केल्यास त्यास मुलूख तोडून द्यावा लागेल, असेंही सरदेसाई यांस लिहिलें. सरदेसाई यांचें ह्मणणें असें होतें कीं, चंद्रोबाची वागणूक आपल्याशीं सरळपणाची नाहीं;

सरकारचाकरीच्या उपयोगी माणसांस तो धरून नेतो; सरकारांतून कैद केलेल्या माणसांच्या बेड्या तोडून त्यांस सोडून देतो; बाजारच्या व्यापारी उद्मी लोकांस त्रास देतो; सरकारच्या रोख्याशिवाय गांवगन्ना वरातदार पाठवून पैसे गोळा करितो व घेतलेला पैसा हिशोबांत मजरा देत नाहीं; इतकेंही असून त्यास पैसा देवविण्याचा असल्यास त्यासाठीं गांवगन्ना रोखे देतां, त्याप्रमाणें त्यानें वसूल करून घ्यावा. पण ही तोड ब्रिटिशसरकारास पसंत नव्हती. गांवगन्ना रोखे दिल्यापासून रयतेस फार त्रास होतो, यासाठीं ती पद्धत होतां होईल तों मोडून टाकावी अशी ब्रिटिशसरकारची इच्छा होती. ह्मणून चंद्रोबास पैसा देणें तो तुह्मी वसूल करून त्यास रोख द्यावा असें त्यांचें ह्मणणें होतें. याशिवाय प्रसिद्धगडचा तनखा व वेळोवेळ घेतलेलें कर्ज मिळून वाडीसरकार ब्रिटिशसराकारची बरीच मोठी रक्कम देणें होतें. त्यासाठीं त्रेपन्न खेड्यांची मामलत रघुनाथ नारायण ह्मापसेकर यास देऊन त्यानें परभारें देण्याची रक्कम ब्रिटिश सरकारच्या तिजोरींत जमा करावी असें ठरविलें होतें; परंतु चंद्रोबाच्या आणि दुसऱ्या लोकांच्या धांदलीमुळें ह्मापसेकर यास वसूल मिळेना. ह्मणून त्याजकडून कराराप्रमाणें रक्कम जमा झाली नाहीं. पुढें माधवराव शिरके यानें, आपल्यास मामलत दिली तर आपण मृगापूर्वी एकदम पंचवीस हजार रुपयांचा भरिणा करितों, असें कबूल केलें. त्यावरून त्यास मामलत दिली; पण त्याजकडूनही उलगडा झाला नाहीं. पैसा जमा करण्याविषयीं त्यास प्रथम ताकीद दिली व नंतर जरब्ही पोहोंचविली. तेव्हां त्यानें आपली मामलत दुसऱ्यास गहाण देऊन दहा हजार रुपयांची रक्कम दिली. बाकी रक्कम त्याजकडून मिळेना; व तो घेतलेल्या पैशाचा हिशोबही देईना. ह्मणून त्याजकडील मामलत काढून घेऊन तो पुन्हां ह्मापसेकर यास दिली (इ. स. १८२९). परंतु त्याजकडूनही बरेच दिवसपर्यंत फेड होईना. शेवटीं ब्रिटिशसरकारानें चंद्रोबा सुभेदार याच्या नेमणुकीचा चढलेला ऐवज व आपलें राहिलेलें येणें यांच्यासाठीं पाट, आजगांव, हवेली व बोर्डवें या तर्फांतील कांहीं गांव जप्त करून तसा एक जाहिरनामा प्रसिद्ध केला (ता. १४ जून सन १८३०). असें करतांच वाडीसरकारनें

देण्याच्या रकमेची फेड करून पुढेंही वेळच्यावेळीं पैसा देण्याचें कबूल केलें; आणि पुढच्या वर्षी जप्ती दूर झाली.

इ. सन १८३२ त पुन: बरीच धामधूम सुरू झाली. रावसाहेबांची बायको यमुनाबाई ऊर्फ दादीबाई हिचें व राजेसाहेबांचें वैमनस्य येऊन तिनें कांहीं लोक मदतीस घेऊन बंड केलें. त्याचा मोड करण्यासाठीं धोंडो शंभु सरसुभेदार, माधवराव पाटणकर व तातो रघुनाथ नेरूरकर यांच्या हाताखालीं कांहीं लोक देऊन पाठविलें. त्यांची व दादीबाईकडील लोकांची वाडी येथें लढाई होऊन तींत दादीबाईकडील लोकांचा मोड होऊन ते पळून गेले. याच सुमारास माधवराव शिरके ज्यास थोड्या-वर्षांपूर्वी त्रेपन्न खेड्यांची मामलत दिली होती, त्यानें गांवांचा वसूल गोळा करून त्याचा हिशोब तो देत नव्हता. तो आपल्यावरील गुन्हेगारी चुकविण्यासाठीं तातो रघुनाथ नेरूरकर, अंताजी विठ्ठल नेरूरकर, बाबू रघुनाथ मोरमकर व विठ्ठल पुंडलीक रांगणेकर यांस मदतीस घेऊन फोंड सावंत तांबूळकर यास जाऊन मिळणार, अशी खबर शिरके याजकडील नोकर आपा गोंदजी नाटेकर यानें सरकारांत दिली. उभयतां नेरूरकर व मोरमकर या तिघांनीं मसलत करून, तातो रघुनाथ याच्या नांवें त्रेपन्न खेड्यांच्या वहिवाटीबद्दल इ. सन १८२३ त सनद घेऊन सुमारें तीस हजार रुपये वसूल केले; शिवाय मोरमकर याजकडे सरकारी शेतें वगैरे दिलीं त्याचा हिशोब त्यानें दिला नाहीं; रांगणेकर यानें गांवगन्ना रोखे देऊन चार हजार रुपये वसूल करून ते सरकारांत जमा केले नाहींत; असे या चौघांवरही आरोप होते व ते आरोप चुकविण्यासाठीं ते बंडांत जाणार अशी बातमी होती. ह्मणून दोन्ही नेरूरकर व रांगणेकर यांस कैद केलें. शिरके यास त्याच्या हातीं नागवी तलवार असतां रामचंद्र महादेव हवालदार[1] यानें कांहीं खासकील लोक मदतीस घेऊन मोठ्या शौर्यानें व शिताफीनें पकडून आणिलें. शेवटीं हे सर्व लोक आरोपांतून मोकळे होऊन सुटले.

---

१ हाच पुढें संस्थानचा मनसुबदार झाला. त्याचे वंशज कुडाळ येथें राहतात. कुडाळचें हें हवालदार घराणें संस्थानांत चांगल्या नांवालेल्या घराण्यांपैकीं एक आहे.

तथापि फोंडसावंत तांबूळकर यानें बंड करून तो महादेवगड किल्ला वळकावून बसला. दुसऱ्याही कित्येक लोकांनीं लहानलहान बंडें उभारलीं. त्यांचा मोड करण्यास वाडदिरबार असमर्थ होतें. यामुळें ब्रिटिशसरकारास पुन्हां वाडीसंस्थानच्या कारभारांत हात घालावा लागला. त्यांनीं कांहीं सैन्य पाठवून महादेवगड किल्ला हस्तगत केला; आणि तो त्याचवेळीं मोडून टाकून अगदीं जमीनदोस्त केला. फोंडसावंत व त्याचे मुलगे पळून जाऊन कांहीं दिवस दडी मारून राहिले. दुसऱ्या बंडवाल्यांशीं तडजोड करून निकाल लाविला. अशा रीतीनें ब्रिटिशसरकारानें बंडाळी मोडून टाकिली.

यापुढें तरी राज्यकारभार सुरळीत चालून जिकडे तिकडे शांतता रहावी, ह्मणून ब्रिटिशसरकारानें रत्नागिरिचा कलेक्टर मि० जिबर्न याच्या मार्फत राजेसाहेबांबरोबर ता. २९ दिसेंबर सन १८३२ रोजीं एक करारनामा केला. त्यांत राजेसाहेबांनीं असें कबूल केलें कीं, आपण आपला प्रधान विठ्ठलराव माधव सबनीस यास ब्रिटिशसरकारच्या संमतीवांचून कारभारावरून दूर करणार नाहीं, व खर्चांत काटकसर करण्याच्या कामीं त्यास मदत करीन.

आजवर संस्थानांत चालू असलेल्या वसुलाच्या व खर्चाच्या पद्धतीपासून रयत लोकांस वगैरे त्रास पोंचून संस्थानच्या तिजोरीचीहि स्थिति चांगली राहत नाहीं, ह्मणून एखादी चांगली शिस्त लावून देण्याकरितां ब्रिटिश सरकारानें इ. सन १८३२ त दक्षिण कोंकणाचा कलेक्टर जॉन अलेक्झांडर फार्बस यास सावंतवाडीस पाठविलें. त्यानें राजेसाहेबांच्या माहितीनें जमेच्या व खर्चाच्या अजमासाच्या यादी (जांबते)[1] तयार केल्या. त्यावरून संस्थानचें सालीना उत्पन्न २०४८२७ रु. व खर्च १६९८७१ रु. यावरून दरसाल शिल्लक ३४९५६ रु. रहावी असें ठरविलें. आजपर्यंत गांवगन्नाचा वगैरे वसूल रोख न घेतां त्यासाठीं चिठ्या देण्याची वहिवाट होती, ती बंद करून वसुलाच्या कामासाठीं संस्थानचे चार भाग करावे,

---

१ संस्थानांतील देवस्थानांकडील वगैरे नक्त नमणुका चालविण्याच्या बाबतींत मागील जुना दाखला पहातांना मुख्यत्वेंकरून याच कागदाचा आधार घेतला जातो.

प्रत्येक भागावर एकएक मामलेदार नेमावा, आणि त्याचमामार्फत एकंदर वसुलाचें काम करावें व मुशाहिरा वगैरे देणें तो हुजूरपोतांतून मेख द्यावा अशी राजेसाहेबांस सल्ला दिली. तसेंच हल्लीं नोकरलोकांची संख्या फाजील आहे, तेव्हां त्यांतून कोणी मयत झाल्यास त्या ठिकाणीं नवीन इसम न ठेवितां ती जागा कमी करावी. व अशा रीतीनें होईल तेवढी खर्चांत काटकसर करावी असेंही राजेसाहेबांस सुचविलें. राजेसाहेबांनीं ह्या सर्व गोष्टी कबूल केल्या.

इतकें झालें तरी, त्यापासून कांहीं फायदा झाला नाहीं. खर्चाच्या कामीं काटकसर करण्याचें राजेसाहेबांनीं जे वचन दिलें होतें, तें बाजूस ठेवून उलट कारभाऱ्यानें खर्चांत काटकसर केली असतां त्यास ते प्रतिबंध करूं लागले; आणि पुढेंपुढें त्यास कामांतून कमी करण्याची खटपट त्यांनीं चालविली. शेवटीं इ. सन १८३४ च्या आरंभास त्यास कमी करून भवानीशंकर ऊर्फ बाबा पाध्ये यास कारभारी नेमिलें. ही गोष्ट ब्रिटिशसरकारास समजली. बाबा पाध्ये हा पूर्वीं रत्नागिरी जिल्ह्यांत ब्रिटिशसरकारचा नोकर होता; व कांहीं गैरचालीच्या वागणुकीवरून कलेक्टरनें त्यास कामावरून बडतर्फ केलें होतें. अशा मनुष्यास कामावर ठेवणें योग्य नाहीं, त्या जागेस विठ्ठलराव माधव हाच लायक मनुष्य आहे, असें ब्रिटिशसरकारचें ह्मणणें पडलें. त्यावरून विठ्ठलराव माधव सबनीस हा पुनः कांहीं दिवस काम पाहूं लागला. या मुदतींत त्यानें कामाची बरीच शिस्त लाविली (जुलई सन १८३४). पोतनीस, कोटणीस, पागनीस, खासगीकडील कारकून, उष्टरखाना, पिलखाना व थटी या कामावरील कामदार, जकातींवरील जकातदार, मनसुबदार, किल्लेदार, दप्तरदार यांनीं कोणकोणतीं कामें कशा पद्धतीनें करावीं, कोणी किती अधिकार चालवावा, दप्तर कसें राखावें, मनसुबदारानें कोणत्या गुन्ह्यासाठीं किती पर्यंत शिक्षा द्यावी, देवघेवीच्या व मालमिळकतीच्या वादाच्या कामांत चौकशीची शिस्त कशी ठेवावी, देवघेवीच्या कामांत व्याज देण्याची मर्यादा किती असावी, हरकी गुन्हेगारी व मनसुबदारानें स्वतः साठीं कारकुनी घ्यावयाची ती कितीपर्यंत घ्यावी, केलेले हुकूम कोणत्या

रीतीनें बजावावे, दप्तरदारानें वसुलाचें काम कसें चालवावें वगैरे एकंदर कामाबद्दल नियम करून त्या प्रत्येक कामावर आपली देखरेख रहावी, अशीहि व्यवस्था लाविली. कचेरीचा वेळ बारा घटका दिवसापासून हुजूरकचेरी बरखास्त होईपर्यंत ठरविला होता.

या नंतर थोड्याच दिवसांनीं त्याची कारभाराच्या कामावरील नेमणूक कमी करून मोरो कृष्ण लेले यास कारभाराचें काम सांगितलें (आगष्ट १८३४). ही नेमणूक ब्रिटिशसरकारानें ता. १६ सप्टेंबर रोजीं कायम केली.

इसवी सन १८३४ त या प्रांतांत सह्याद्रीच्या बाजूनें टोळधाड येऊन त्यांनीं डोंगरांतील नाचण्याचें पीक खाऊन फार नासाडी केली.

इसवी सन १८३५ त. जयराम सावंत तांबूळकर या नांवाच्या इसमानें एक बंड केलें. त्यानें मनोहरगडच्या बाजूच्या गांवांत जिकडेतिकडे धुमाळी मांडून लोकांस फार त्रास दिला. तेव्हां त्याचा मोड करण्यासाठीं ब्रिटिशसरकाराकडे मदत मागावी लागली. ब्रिटिशसरकारानें आपली फौज वाडीच्या सैन्याला मदत करण्यासाठीं पाठविली. त्यांनीं पारपोली व सांगेली या गांवांत बंडवाल्यांचा तळ पडला होता, तेथें त्यांवर हल्ला करून बंडाचा मोड केला. नंतर कांहीं वेळ मुलखांत थोडीशी शांतता झाली.

इसवी सन १८३५ पासून संस्थानांत गहाण विक्रीत झालेल्या मिळकतीचे पटे नोंदून ठेवण्याची पद्धती सुरू झाली. सरकारानें तारीख ६ फेब्रुआरी सन १८३५ रोजीं एक जाहिरनामा काढून असें प्रसिद्ध केलें कीं, यापूर्वील पटे तीन महिन्यांचे आंत नोंदून न घेतल्यास व पुढें होणारे पटे जेव्हांचे तेव्हां न नोंदविल्यास ते पटे निरुपयोगी मानिले जातील. हें नोंदणीचें काम दप्तरदार याजकडे सोंपविलें होतें.

इसवी सन १८३६ त वेंगुर्लें बंदराहून या संस्थानांतून रामघाटावर लष्कर जाण्याचा जो रस्ता होता, त्या रस्त्यावरील जकाती भोंसले यांनीं ब्रिटिशसरकारास दिल्या. पुढें इ. सन १८३८ तारीख २९ सप्टेंबर

---

१ याबद्दलची सविस्तर माहिती 'भाग ५ वा जुनी राज्यव्यवस्था' यांत दिलेली आहे.

रोजीं एक सहा कलमांचा करारनामा करून त्यांत संस्थानांतील बाकी जकातीहि ब्रिटिशसरकारास दिल्या. या तहांत ब्रिटिशसरकारानें असें कबूल केलें होतें कीं, राजेबहादर यांनीं ब्रिटिशसरकारास दिलेल्या जकातींवरील उत्पन्नाचा हिशोब पाहून तीन वर्षांच्या उत्पन्नावरून सरासरी ठरवून तितकी रक्कम दरसाल राजेबहादर यांस देऊं. राजेबहादर यांचें ह्मणणें या जकातींवरून आपला स्वतःचा माल जाईल येईल, त्यासाठीं पांचशें रुपयेपर्यंत जकातीची आपल्यास माफी असावी. ब्रिटिश सरकारानें तीही गोष्ट कबूल केली; परंतु त्यासंबंधानें हिशोबांत घोंटाळा राहूं नये, ह्मणून अशी तोड काढिली कीं, तीन वर्षांच्या सरासरीवरून जी रक्कम देण्याचें ठरेल त्याबाहेर ही आणखी पांचशें रुपयांची रक्कम निराळी द्यावी. असें करून संस्थानांतून जाणाऱ्या येणाऱ्या मालावर ठिकठिकाणीं जी जकात द्यावी लागत असे, ती ब्रिटिशसरकारानें बंद करून टाकिली.

राज्यव्यवस्थेंत सुधारणा करण्यासाठीं राजे साहेब यांस वारंवार सूचना केल्या; वसुलाची व खर्चाची मर्यादा ठरवून शिस्तवार काम होण्यासाठीं सल्ला दिली; बंडें मोडण्यासाठीं वारंवार मदत केली, परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं; तिजोरीची स्थिति कांहींच सुधरेना; नोकर लोक व सरदार यांस मिळणारा मुशाहिरा वेळीं मिळेनासा झाला; त्यामुळें ते लोक रयतेस नानातऱ्हेनें त्रास देऊं लागले; राजेसाहेब यांच्या मर्जींतील खवास, खासकील वगैरे लोक पैसा काढण्यासाठीं रयतेवर जुलूम करूं लागले; कोणास दाद मागणें झाल्यास राजेसाहेबांची भेट होणेंही दुर्लभ झालें; राजेसाहेबांकडील शिक्कामोर्तबें हातीं मिळाल्यास ढवळें तयार करून पाहिजे त्या मनुष्यास भलत्यावेळीं एखादी सनद तयार करून घेण्याची संधि मिळूं लागली; वसुलाच्या कामांत शिस्त नसल्यामुळें लोकांत पळापळ होऊन मुलुखांत लागवड होईनाशी झाली; लहानलहान बंडें होऊन त्यांपासून लोकांस त्रास होऊं लागला. अशा स्थितींत राजेसाहेबांच्या हातांत कारभार ठेवणें कोणत्याही बाजूनें हितावह होणार नाहीं, असें ब्रिटिशसरकारास दिसून आलें. ह्मणून सरदेसाई यांच्या

घराण्यांत राज्य करण्यालायक पुरुष उत्पन्न होईपर्यंत तूर्त या संस्थानच्या कारभाराची व्यवस्था आपल्या हातीं घ्यावी, असें ठरवून तो पाहण्यासाठीं एका पोलिटिकल सुपरिन्टेंडेंटची नेमणूक केली; व त्यानें ता. १७ सप्टेंबर सन १८३८ रोजीं या संस्थानचा कारभार हातीं घेऊन त्याच दिवशीं ही नवीन केलेली व्यवस्था आणि त्याचीं कारणें लोकांस समजण्यासाठीं एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. तेव्हांपासून या संस्थानावर ब्रिटिशसरकाराची पूर्ण देखरेख सुरू झाली.

भाग ५ वा.

जुनी राज्यव्यवस्था.

या संस्थानचा राज्यकारभार पाहूं लागल्यापासून ब्रिटिश सरकारानें खालसा मुलुखांतील राज्यव्यवस्थेस अनुसरून पूर्वींच्या व्यवस्थेंत थोडथोडा फेरफार करण्याचें सुरू केलें. तोंपर्यंत चालू असलेली व्यवस्था बरीच जुनी असून ती बहुतांशीं एकसारखीच चालत आलेली होती. मध्यें एक दोन राजांच्या कारकीर्दींत जमिनीचा सारा थोडथोडा वाढविला. इतकी एक गोष्ट खेरीज करून बाकी व्यवस्थेंत बहुधा फेरफार झाल्याचें दिसून येत नाहीं. ह्मणून पूर्वींपासून चालत आलेल्या राज्यव्यवस्थेची सर्व माहिती एकत्र या भागांत देण्याचें योजिलें आहे.

राज्यव्यवस्थेसाठीं दुसरे खेम सावंत यांनीं निरनिराळीं खातीं करून त्यांजवर निरनिराळे कामदार नेमिल्याचें थोडेंसें वर्णन पूर्वीं आलेंच आहे. या कामदारांच्या कामांपैकीं मुख्य महत्वाचें काम जमाबंदी ठरविणें ह्मणजे रयतेपासून राजास मिळणारा कारभार किती मिळावयाचा तें ठरवून तो वसूल करणें हें होय. हा कारभार सावंताचा अंमल होण्यापूर्वीं जमिनीच्या उत्पन्नांतील राजभाग, रहदारी मालावरील जकाती आणि तंबाखूवरील कर अशा तीनच रूपांनीं मिळत असे. सावंत भोंसले यांच्या कारकीर्दींत धंद्यांच्या संबंधानें वगैरे कितीएक नवीन कर घेण्याची सुरवात झाली. त्या-

सुद्धां सावंतांच्या कारकीर्दीत खालीं लिहिल्याप्रमाणें उत्पन्नाच्या बाबी असून प्रत्येक मनुष्यापासून कर किती घ्यावयाचा, तें पुढें लिहिल्याप्रमाणें ठरविलेलें असे:-

जमीनबाब किंवा कुंबळें:-ही उत्पन्नाची मुख्य बाब होय. जमिनींतील उत्पन्नापैकीं जो राजभाग मिळावयाचा, त्यास कुंबळें असें पूर्वी ह्मणत असत. हें कुंबळ गणो राम नांवाच्या एका पुरुषानें पूर्वी नजरमानानें प्रत्येक जमिनींतील उत्पन्नाचा आकार करून त्यावरून ठरविलेलें होतें असें ह्मणतात. प्रत्येक जमिनातील उत्पन्नाचा राजभाग ठरवितांनां त्यानें कोणतें प्रमाण धरिलें होतें, त्याचा प्रमाणसिद्ध दाखला मिळत नाहीं. तरी परंपरेनें मिळत आलेली माहिती जी लिहून ठेविलेली सांपडते, तिजवरून त्यानें पुढें लिहिलेल्या प्रमाणानें तें ठरविलें होतें असें दिसतें.

ह्या कुंबळ्याचे मुख्य प्रकार सात:-सर्द, विदळ, गिमवस, नारळ, सुपारी, गळ व फणस. पावसाळ्यांत मिळणाऱ्या उत्पन्नांतील राजभाग तें सर्द; नदीच्या मुखांतून भरतीचें पाणी चढतें, त्यामुळें कांहीं ठिकाणीं नदीच्या दोन बाजूस ओलावा राहून त्यापासून जें उत्पन्न मिळतें, त्यांतील राजभाग तें विदळ; कांहीं जमिनींत उन्हाळ्याच्या दिवसांत पाण्याचा पुरवठा असतो, त्यामुळें तेथें त्या दिवसांत जें उत्पन्न कारितात, त्यांतील राजभाग तें गिमवस; बाकी चार कुंबळ्यांचे प्रकार त्यांच्या नांवावरूनच उघड होतात.

हें कुंबळ किंवा राजभाग तीन वर्षांतील उत्पन्नाचा नजरमानानें आकार करून, त्यावरून एक वर्षाचें उत्पन्न काढून त्यांतून जमिनीच्या मगदुराप्रमाणें व तींत जी मेहनत करणें आवश्यक असेल तें मान मनांत आणून, त्यावरून ठरविला होता.

सर्द कुंबळें:-सर्द कुंबळ ठरविण्यासाठीं उत्पन्नाचा आकार करितांना तिचे खालीं लिहिल्याप्रमाणें चार वर्ग केले होते व त्या चार वर्गांतील जमिनींतील राजभाग पुढें लिहिल्याप्रमाणें ठरविला होता.

प्रत १ ली अव्वल:-ज्या जमिनीस पावसाळ्याच्या पाण्यानें उन्हाळ्या दिवसांत नेहमीं ओल राहत असते, व त्यामुळें पाऊस सुरू होण्यापूर्वीं नांगरणी करून बी पेरतां येतें आणि आक्टोबरअखेर पीक मिळतें,

ती शेळी किंवा अव्वल जमीन. तिच्या उत्पन्नांतून $\frac{१}{६}$.

प्रत २ री दूमः–कांहीं जमिनींस विहिरींच्या किंवा ओढ्यांच्या पाण्यानें उन्हाळ्याच्या दिवसांत भिजवण करून नांगरणी करतां येते व बीं पेरतां येतें, व तिचें उत्पन्न आक्टोबरअखेर मिळतें; ती लावणीची किंवा दूम जमीन. तींतील उत्पन्नाचा $\frac{१}{८}$.

प्रत ३ री सीमः–ज्या जमिनीस उन्हाळ्या दिवसांत राब घालून ती भाजावी लागते, व पाऊस पडल्यानंतर नांगरणी करून बीं पेरतां येतें, आणि भाताचीं रोपें तयार झाल्यानंतर तीं काढून त्याच प्रकारच्या जमिनींत नांगरणी करून लावावीं लागतात व त्यांचें उत्पन्न सप्टेंबरअखेर मिळतें, ती भरडी किंवा सीम. तींतील उत्पन्नाचा $\frac{१}{१०}$.

प्रत ४ थी चारसीमः–कांहीं भरडी जमिनींत दरसाल लागवड न होतां पडणानें मात्र लागवड करतां येते; व तींत उडीद, कुळीत, नागली, हरीक, सांवा वगैरे हलक्या प्रतीचीं धान्यें व क्वचित् ठिकाणीं भात उत्पन्न होतें, ती निकृष्ट किंवा चारसीम. तींतील उत्पन्नाचा $\frac{१}{१२}$.

कित्येक ठिकाणीं डोंगरी जमिनींसही कुंबळें बसविलें होतें. तें निकृष्ट जमिनीच्या दरानेंच बसविलें होतें.

विदळ कुंबळें:–वर सर्द कुंबळ्याच्या पोटीं जमिनीचे चार वर्ग केले, त्यांपैकीं दूमप्रतीच्या जमिनींतील सर्द पीक कापून घेतल्यानंतर तींत कुळीथ, उडीद, तूर, पावटा वगैरे धान्यें पेरतात. त्याचे उत्पन्नांतील $\frac{१}{८}$ राजभाग.

गिमवस कुंबळें:–हें कुंबळें ठरविण्यासाठींही जमिनीचे तीन वर्ग केले होते. वर्ग १ लाः–ज्या जमिनींत पावसाळ्यांत पाणी फार असल्यामुळें सर्द पीक होत नाहीं, उन्हाळ्या दिवसांत मात्र पाणी कमी होऊन उत्पन्न होतें, त्या जमिनींतील उत्पन्नाचा $\frac{१}{८}$ राजभाग. वर्ग २:–सर्द कुंबळें ठरविण्यासाठीं केलेल्या वर्गांपैकीं पहिल्या वर्गाचे ह्मणजे अव्वल प्रतीचे जमिनींत सर्द पीक मिळून पाण्याच्या पुरवठ्यामुळें गिमवस पीक मिळतें, त्यांतील $\frac{१}{१०}$ राजभाग. वर्ग ३ राः–सर्द पिकाचे जमिनीपैकीं दुसरे प्रतीची ह्मणजे दूम जमीन, यांत विहिरीच्या किंवा ओढ्याच्या पाण्यानें

नाचणी (हळवी) उत्पन्न करितात; त्यांतील १/१२ राजभाग.

नारळ कुंबळें:-हें ठरविण्यासाठीं बागायत जमिनीचे वेळागर, कुळागर व आडागर असे तीन वर्ग केले होते. माडाचे झाडावरील नारळांची मोजदाद कार्तिक [नोव्हेंबर] किंवा माघ [फेब्रुआरी] महिन्यांत करून, कार्तिक महिन्यांत माप केल्यास भाद्रपदखिस्तीबद्दल[1] त्यांत दर ८५० नारळांस १५० प्रमाणें किंवा माघ महिन्यांत माप केल्यास दर ६५० नारळांस २५० प्रमाणें जास्त वाढवून वर्षाचे नारळ ठरवीत असत. त्यांतून वांझफूट वगैरेसाठीं दर शेंकडा १० प्रमाणें वजा देऊन बाकी राहतील त्यांतून राजभाग वर्गवारी प्रमाणें घेत असत तो असा:-वेळागर ह्मणजे समुद्रकिनाऱ्याची जमीन, हिच्यांतील १/३; कुळागर ह्मणजे ज्या जमिनींतील माडांत पाटानें पाणी लावण्याची सोई असते, असें सपाट जमिनींतील बागायत, याच्या उत्पन्नापैकीं १/४; आडागर ह्मणजे डोंगरी किंवा भरडी जमिनीवरील बागायत, याच्या उत्पन्नांतील १/५. या तीन वर्गांपैकीं शेवटचा ह्मणजे आडागर याचें उत्पन्न ठरवितांना जमिनीच्या स्थितीप्रमाणें एखाद्या खिस्तीचें उत्पन्न कमी धरीत असत.

सुपारी कुंबळें:-हें ठरविण्यासाठींही बागायत जमिनीचे कुळागर व आडागर असे दोन वर्ग केले होते. माड असलेल्या ज्या जमिनीस कुळागर ह्मणत, त्याच प्रतीच्या पोफळी असलेल्या जमिनीसही कुळागर असेंच ह्मणत. ज्या जमिनींतील झाडांची मोजदाद करीत, त्यांत १०० झाडांत झीट [फार जुनाट पोफळी] वगैरे नापीक झाडें २० वजा करून बाकी राहतील त्यांपैकीं १/३ उत्तम, १/३ मध्यम, व १/३ कनिष्ठ प्रतीचीं झाडें मानीत असत. उत्तम प्रतीच्या दर झाडास सुपारी कुडाळी मापें एक शेर, मध्यम प्रतीच्या झाडास पाऊण शेर व कनिष्ठ प्रतीच्या

१ खिस्त ह्मणजे नारळ काढून घेण्याचा हंगाम. हे हंगाम एका वर्षांत पांच असतातः- भाद्रपद (सप्टेंबर), कार्तिक (नोव्हेंबर), शिवरात्र (फेब्रुआरी), अक्षय्यतृतीया (मे) व आषाढ (जुलई). ज्या माडास वर्षास १००० नारळ मिळतात, त्याचें खिस्तवार प्रमाण पुढें लिहिल्याप्रमाणें:-भाद्रपद १५०; कार्तिक २००; शिवरात्र २५०; अक्षय्यतृतीया [अक्षत] २५०; आषाढ १५०. हेंच प्रमाण धरून नेहमीं नारळांचा आकार करण्याचा परिपाठ आहे.

झाडास पावशेर, या दरानें मोजदाद केलेल्या सर्व झाडांचें उत्पन्न ठरवीत; व त्यांतून $\frac{1}{६}$ राजभाग घेत असत. आडागर ह्मणजे ज्या भरडी जमिनींत थोडें तरी पाणी मिळण्याचा आधार असल्यामुळें पोफळीची लावणी करितात, ती. या जमिनींतील उत्पन्नाचा आकार करण्याची रीत बहुतेक कुळागर जमिनीच्या पद्धतीप्रमाणेंच आहे. भेद इतकाच कीं, त्यांत झाडांच्या तीन प्रती करितात, त्या ऐवजीं आडागर जमिनींतील झाडांच्या चार प्रती करून त्यांतील पहिल्या प्रतीच्या प्रत्येक झाडास एक शेर, दुसऱ्या प्रतीच्या झाडास पाऊण शेर, तिसऱ्या प्रतीच्या झाडास अर्धशेर, व चवथ्या प्रतीच्या झाडास पावशेर याप्रमाणें उत्पन्न आकारून त्यांतून $\frac{1}{८}$ राजभाग घेत असत.

गूळ कुंबळें:-हें वर सांगितलेली मूळची जमाबंदी ठरविल्यानंतर कांहीं वर्षांनीं ज्या गांवांत गुळाचें उत्पन्न आढळलें, तेथें उत्पन्नाचा मान पाहून एकंदर उत्पन्नापैकीं दोन तृतीयांश राजभाग ह्मणून घेत असत. त्या ऐवजीं ज्या जमिनींत तें गूळ कुंबळें घेत, त्या जमिनीचें सर्द कुंबळें कांहीं कमी करीत असत. कितीएक गांवीं हें कुंबळें सगळ्या गांवासाठीं मिळून एक रकमेनें मोघम ठरविलेलें असे; व गांवकरी लोक धारेकऱ्यांवर त्याची हिस्सेरशी बसवीत असत.

फणस कुंबळें:-हेंही प्रत्येक गांवांत फणसांच्या झाडांची जशी लावणी दृष्टीस पडली, त्या मानानें त्या गांवांवर एकरकमेनें ठरविलेलें असे, व त्याचीहि हिस्सेरशी गांवकरी धारेकऱ्यांवर बसवीत असत. हें कुंबळें नक्कीच ठरविलेलें असे.

वर प्रत्येक उत्पन्नाचा कांहीं भाग राजभाग ह्मणून ठरविल्याचें सांगितलें आहे. परंतु नागली (नाचणी), कुळीथ, वरी, तीळ या उत्पन्नाचा राजभाग घ्यावयाचा तो त्या त्या जिनसांचा न ठरवितां त्याऐवजीं पुढे लिहिल्याप्रमाणें भात घेण्याचें ठरविलें होतें:-नाचणी व कुळीथ यांच्या सवापट भात; वरीच्या इतकेंच भात; हरीकांच्या निम्मे; तीळ व उडीद यांच्या दीडपट.

हें कुंबळें कांहीं विवक्षित भागाचें ठरविलेलें असे. त्या विवक्षित

भागास 'ठिकाण' असें ह्मणत. प्रत्येक ठिकाणास निरनिराळीं नांवें दिलेलीं असत. प्रत्येक ठिकाणाचें ठरविलेलें कुंबळें एका चोपडांत लिहून ठेविलेलें असे, त्यास 'जाबता' असें ह्मणत. त्यांत लिहून ठेवें त्याप्रमाणें वसूल घेत असत. तो कांहीं ऐनजिनसी गल्ला घेत व कांहीं ठरींव दरानें नक्की आकार करून तो घेत असत. हे दर निरनिराळ्या भागासाठीं तेथील विक्रीच्या वगैरे मानानें ठरविलेले असत.

वर लिहिलेल्या कुंबळ्याशिवाय कितीएक 'पट्यावाबत्या' ह्मणून कर फोंड सावंत ऊर्फ आनासाहेब यांच्या कारकीर्दींत बसविलेले होते. त्यांपैकीं कितीएक मूळ कुंबळ्यावर कांहींएका ठरींव प्रमाणानें सर्व गांवावर सारख्याच दरानें बसविलेल्या असून कांहीं ठिकाणीं उत्पन्न पाहून बसविल्या होत्या. त्या अशाः–दाणा उडीद, दर एक भरा कुंबळ्यास तीन कुडव; तूप, दर भऱ्यास दोन शेर (वजनी); तीळ–मूग–तुरी; तांदूळ पक्ष; साळी, पाटण्या, तांदूळ जहाज; वतनबाव, दर भऱ्यास ०६०१० सहा आणे दहा पै; पयाण, दर भऱ्यास चार आणे; खरेदी दाणा; पांजी; खणपागा; रावतेपटी; वर्तोळा भात, दर भऱ्यास सवासहा कुडव; सण नारळ, दर १००० नारळ कुंबळ्यास २०; सौदागिरी, दर १००० नारळ कुंबळ्यास सव्वारुपया.

यानंतर खेम सावंत (राजश्री) यांच्या कारकीर्दींत बाळंभट धोपेश्वरकर विष्णु गणेश मराठे, बाळंभट सिद्धये, सदाशिव मंगेश रांगणेकर, असे मामलेदार होऊन त्यांनीं गांवगन्नाच्या जमाबंदीची चौकशी करून ज्या गांवांत नवीन लावणी वगैरे झाली, त्या गांवांवर कांहीं चढ कुंबळें ह्मणून ठेविलें. तसेंच खेम सावंत यांच्या कारकीर्दींत सांतो राम आकेरकर यानेंही कांहीं गांवीं चढ कुंबळें ठेविलें.

अशा रीतीनें ठरलेलें हें कुंबळें ह्मणजे जमीनमहसूल या संस्थानांत शास्त्रीयपद्धतीनें जमिनीचा धारा ठरेपर्यंत अमलांत राहिला होता. या जमीनमहसुलाचें उत्पन्न दरसाल सरासरी १७३६११ रु० होत असे.

तंबाखुपट्टीः–पूर्वीं तंबाखूच्या करासंबंधानें सरकारास बरेंच उत्पन्न मिळत असे. सगळ्या संस्थानांत तंबाखू विकण्याचा मक्ता कोणीतरी

एक असामी पतकरून गादी (दुकान) लावून तंबाखूची विक्री करीत असे. तिसरे खेम सावंत (राजश्री) यांच्या कारकीर्दींत ही गादीची वहिवाट मोडून प्रत्येक गांवांतील उत्पन्नाचें मान पाहून गांववार कर बसविला. तो गांववाले ज्याच्या नांवें जमिनीचें खातें नाहीं अशा गांवांतील रहिवाशांवर पटी बसवून किंवा त्यांत भर न झाल्यास गांवांत तंबाखूविक्री करावयाचा मक्ता देऊन त्यांतून या रकमेची भर करीत असत. कूळवार वांटणी करण्यास कोणतेंही प्रमाण ठरलेलें नव्हतें. कुळाची ऐपत पाहून पटी बसवीत असत. पटी देणारीं कांहीं कुळें मयत झालीं ह्मणजे उरलेल्या कुळांवर पटी वाढवीत किंवा नवीन कुळांवर पटी बसवीत. या नवीन व्यवस्थेस 'सौंडाळ' असें ह्मणत. तंबाखूविक्रीसाठीं मक्ता देत, त्या मक्तेदारास आपले हक्क पूर्ण रीतीनें अमलांत आणतां यावे यासाठीं कांहीं निर्बंध किंवा कायदा नव्हता. यामुळें हा तंबाखूचा कर ह्मणजे घोंटाळ्याचाच विषय होता. थोड्या दिवसांपूर्वीं इसवी सन १९०१ त सरकारानें हा कर घेण्याचें बंद केलें.

धंद्यांवरील कर:-हे फोंड सावंत ऊर्फ आनासाहेब यांच्या कारकीर्दींत बसविले. ते धंदेवाले असेः—कुंभार, सुतार, सोनार, घाणेकर तेली, दुकानदार वाणी, परीट, हजाम, मासळी विकणारा दुकानदार, माड कापणारा भंडारी, दारू (पिण्याची) विकणारा दुकानदार, गवळी, चांभार, महार, जोशी. या करांस 'बाजेदस्त' [इतर कर] असें साधारण नांव होतें. ते प्रत्येक धंदेवाल्याच्या धंद्याचें मान पाहून गांवकरीलोक ठरवीत असत. यांपैकीं कांहीं करांचीं ठरींव नांवेंही होतीं. तीं अशीं:-कुंभारपटी, सुतारपटी, सोनारशिक्केपटी, (वाण्यांवरील) मोतर्फा, [दारू दुकानदारांवरील] खुमारी बाजे दस्त, जोसकी. हे सर्व कर जमिनीवरील साऱ्याबरोबरच गांवकामगार वसूल करीत असत. यांशिवाय आणखी कित्येक कर मक्ते देऊन मक्तेदारांमार्फत वसूल करण्याची रीत असे. त्यांस 'खेरीज मक्ते' असें ह्मणत. ते असे:-आतषबाजी, धवडखूम, मधमेण, खंडजकात आडवीपाताड, गावडे कातकरी, धनगर महाल, डुकरपटी, तागबीज. (१) आतषबाजी हा मक्ता दारूसामान तयार

करून विकण्याबद्दल होता. त्यांत मक्तेदारानें सरकारास सोरमीठ बाजार भावापेक्षां दरमणीं एक रुपया व गंधक दरमणीं आठ आणे कमी दरानें पुरवावा, अशी विशेष अट होती. (२) धवडखूमः—हा धवड लोक अशोधित धातूपासून शुद्ध लोखंड तयार करितात त्यांच्यापासून कर घेण्यासाठीं होता; व त्यांत प्रत्येक दुकानदारापासून मक्तेदारानें दरसाल एकमण लोखंड घ्यावें असा दर ठरविला होता. (३) मधमेणः—हा गांवांत कुंबळ्यांच्या जमिनींवर जीं काळवीं (मधांचीं पोळीं) बसत त्यांतील मध काढून घेण्यासाठीं दिलेला असे. (४) खंडजकात आडवी पाताडः--हा मक्ता तेलाचा घाणा, चुरमुऱ्याचें खापर, चारणीचे बैल, पोह्यांची लाठ, व दारूचें दुकान यांजपासून ठरलेला कर वसूल करण्यासाठीं दिलेला असे. त्या करांचे दरः—घाणा, २ रु.; खापर, ٥४; बैल, ٥१; लाठ, २ रु. (५) गावडे कातकरीः—हा मक्ता कातगावडे खैराचीं झाडें तोडून त्यापासून जो कात तयार करितात, त्याबद्दलचें सरकारी हांशील घेण्यासाठीं देत असत. (६) धनगर महालः—पर अमलांतून धनगरलोक या मुलुखांत चारणीसाठीं गुरें किंवा मेंढरें घेऊन येत, त्यांच्यापासून कर घेण्यासाठीं हा मक्ता होता. त्या कराचे दरः—वित्यागाबत्या दर म्हशीस, ٥८; इतर म्हशीस, ٥४; वित्यागाबत्या शेळीस, ٥٥६; इतर शेळीस, ٥٥३; नानीदेवासाठीं दर १० म्हशीस एका म्हशीची माफी असे. (७) डुकरपटी—ख्रिश्चियन किंवा चांभार लोक घरडुकरें पाळितात, त्यांजवरील कर घेण्यासाठीं हा मक्ता होता. त्यांचे दर—प्रत्येक डुकराची तिराईतमतें किंमत ठरवून त्या किंमतीच्या दर रुपयास एक आणा प्रमाणें. (८) तागबीज--शेतकरी लोक ताग पेरून त्यापासून जें उत्पन्न करितात, त्याचा आकार करून कर घेण्यासाठीं हा मक्ता होता.

हे सर्व मक्ते बहुतकरून प्रसिद्धीनें लिलांव करून त्यांत जास्त मागणारांस देत असत. तंबाखूपटी, बाजेदस्त व खेरीज मक्ते यांचें एकंदर उत्पन्न सालीना सुमारें ९७८० रु. येत असे. या करांपैकीं सोनारशिकेपटी, परीटबाजेदस्त, मासळीच्या दुकानावरील कर, महारबाजेदस्त, धवडखूम, मधमेण व तागबीज हे कर हल्लीं कमी झालेले आहेत.

जकाती:—जमीनबाबीच्या उत्पन्नाच्या खालोखाल जकातीचें उत्पन्न होतें. संस्थानांत पुढें लिहिल्या ठिकाणीं जकात घेत असत-- वाडी शहरांत जकात दरवाजेवाड, कापड दलाली व बाजारांत फस्की; बांदें बाजार व बांदें नदी बंदरअदिलाबाद, कुडाळ, माणगांव, सांतर्डें, न्हईबाग व तरी न्हईबाग, बोर्डवें, मठ, तुळस, तळकट घांट, तर आरवंदें, कारिवडें व पारपोली, नदी सरंबळ, रामघाट, कांसरपाल, मांगेली. या जकातींच्या ठिकाणीं कोणत्या जिनसासाठीं किती जकात घ्यावयाची त्याचे दर पूर्वापार ठरवून त्याबद्दल एक कानुजाबता लिहून ठेविलेला असे. त्याप्रमाणें कर घेत असत. **जकात न्हईबाग**:-तेल डबडें ओझें, ।·।; सिंगोटी (बैल), ·।-; मेण वजन एक मण, ·॥·; मिरच्या व सुंगटें ओझें, ०= (बायको मनुष्याचें ओझें असल्यास निम्मे); साखर ओझें, ·।=; कागद रीम, ०।·; आमसोलें ओझें, ०=; जुतें, ०।·; खजूर ओझें, ०≡; दारू [पिण्याची], ०-।; कापडाची पेंडी, ·।-; गोमांतकी आंबे ओझ्यास, ०- [बायको असल्यास ०॥·]. **दुबार कोलवाळी:**—तेल, ओझ्यास ०=; सिंगोटी, ·।·।; तूप, ओझ्यास ·।·; मेण दर मणी ·।=; साखर, ओझ्यास ·।-; मिरच्या व सुंगटें, ओझ्यास ०=॥; कागद, रीमास ०=; सोलें, ओझ्यास ०=॥; खजूर, ओझ्यास ०≡; सरा (पिण्याची दारू), ०=।; कापड, पेंडीस।≡; जायफळ, प्रत्येक पौंडास ०-; लवंग, एका पौंडास ०-; पत्री, पौंडास ०-; मोवला [काजूचा गर], ओझ्यास ·॥·॥. **घांटावरून कोंकणांत येणाऱ्या जिनसांस दर बैलास:**-तंबाखू, कापूस, जिरें व कापड यांवर, ·॥=॥; गांजा, ·॥·।।; तेल, ·।-॥; तूप, ·।≡॥; सोरामीठ, ०≡; ताग, ०=; हरडे व बायाच्या शेंगा, ०-।; गंधक ·॥≡; अफू, दरमणीं १ रु.; रंगबेगड, शंभर पुड्यांस ३। रु; घोडेरास, शेंकडा ३। रु.; कुणबीणनफर, शेंकडा ३। रु. **कोंकणांतून वरघांटीं जाणाऱ्या जिनसांस दर बैलास:**—बारीक मीठ, ०=॥; मोठें वडागर मीठ, ०≡॥।; नारळ, सुंभ व आमसोलें, ·।·; पिण्याची दारू व काबळा, ·।·; सुपारी व कात, ·।-॥; मोवला, (काजू गर), ·।≡॥; विड्याचीं पानें, मच्छी व आलें, ·।-॥; खजूर, खारीक व हळद, ·।-॥; शिसें व लांख, १ रु.; हिंग १। रु.; तांबें, १॥ रु.; रेशीम,

४ रु.; रोजगारी असामी, दर एकास ८९. दर बैलास जी जकात घेत त्याच्या निम्मे दर ओझ्यास घेण्याचा शिरस्ता होता. कोंकणांतून भरताड करून वरघांटीं नेलेल्या बैलावरून परत माल आणला, तर त्यापैकीं तांदूळ, नाचणे, जोंधळे, गहूं, हरभरे, मूग, तुरी, तुरीची डाळ, मिरची, कांदे, कोथंबीर, लसूण, गूळ, मोहरी, मेथी, बडीशेप या जिनसांस जकातीची माफी मिळत असे. वाडी येथें **कापडदलाली** (किंवा कापडछपावणी) घेत असत तीः–कांबळें प्रत्येकीं ८१; सणंग (लुगडें) प्रत्येकीं ८८६; सकलाद ८१८९; चवाळ (शाहापुरी पंचाची) ८८६; रुमाल ८८३; धाबळी ८१; मुगटा ८१. ही जकात घेतांना शेंकडा पांच सणंगाची सूट देत असत, व वर लिहिलेल्या जकातींशिवाय देवाचें हांशिल ह्मणून शेंकडा दहा टक्के घेत असत. या सर्व जकातींपासून दरसाल सुमारें १९८७७ रुपये उत्पन्न येत असे. ब्रिटिशसरकारानें इ. सन १८३८ त संस्थानांतील रहदारी मालावरील जकाती मोबदला दरसाल १३४७० रुपये देण्याचें ठरवून आपल्या ताब्यांत घेतल्या व तेव्हांपासून मालावरील जकात घेण्याचें बंद केलें.

वसुलाची पद्धतीः–संस्थानच्या एकंदर वसुलाचें काम पाहण्यासाठीं एक अंमलदार नेमलेला असे. त्यास मुजूमदार असें ह्मणत. प्रथम कांहीं वर्षें हें काम सुखटणेकर[1] उपनांवाच्या इसमाकडे होतें. पुढें तें अंतोबा कागजी याजकडे दिलें. त्याच्या हाताखालीं खोटलेकर, धारगळकर, परुळेकर, बांदेकर व रांगणेकर हे कारकून होते. त्यांस दप्तरदार असें ह्मणत, या प्रत्येक असामीनें दरसालची प्रांताच्या वसुलाची खतावणी घालून ताळेबंद करावा अशी रीत होती. त्या ताळेबंदास ‘ झडती ’ किंवा ‘ झाडा ’ असेंही ह्मणत. ही बादशाही अमलांतील पद्धत या संस्थानांत कांहीं वर्षें चालू असावी. पुढें त्याच दप्तरदारांपैकीं रांगणेकर हे संस्थानचे दप्तरदार झाले, व त्यांजकडून एकंदर संस्थानच्या वसुलाची व्यवस्था होऊं लागली.

---

१ वळगांव येथें लक्ष्मण विठ्ठल ऊर्फ तात्या सुखटणेकर या नांवाचे गृहस्थ राहत असत, ते यांचेच वंशज असे ह्मणतात.

जमिनीचें कुंबळें ठरविण्याची पद्धती वर सांगितली आहे, तसें कुंबळें देऊन जमीन उपभोगण्याचा जो हक्क असतो, त्या जमिनी धारासत्ता प्रकारच्या समजल्या जातात. संस्थानांत आणखी अशा कांहीं जमिनी आहेत कीं, त्याचा खंड घेण्याचा हक्क सरकारचा असतो. अशा जमिनीस 'शेरी' असें ह्मणतात. कांहीं जमिनी राजकुटुंबांतील माणसांकडे चालत असत. त्यांस 'शेरी खासगी' असें ह्मणत. शेरी जमिनींच्या वसुलासाठीं प्रत्येक तर्फेस किंवा एकदोन तर्फांसाठीं मिळून कमाविसदार या नांवाचा अंमलदार नेमिलेला असे. गांवांचा वसूल करण्यासाठीं हल्लीं प्रमाणेंच गांवकर व कुळकर्णी हे कामगार होते. दप्तरदार व गांवकामगार हे परंपरेनें काम करीत असत. कधींकधीं कितीएक गांवांचा मिळून वसूल करण्याचा वगैरे मक्ता एखाद्या चांगल्या वजनदार गृहस्थास कांहीं ठरींव मुदतीसाठीं देत असत. त्यास 'मक्त्याची मामलत' असें ह्मणत. हीच 'इजारा पद्धती' होय. हे मामलतदार ह्मणजे साधारणपणें हल्लींच्या कमाविसदारांच्या दर्जाचे असत. त्यांचा पगार दरमहा ७५ पासून १२५ रुपये असे. त्यांस एक शागीर्द (पगार दरमहा ३ रुपये), दोन खिजमतगार (पगार प्रत्येकीं ३ रु.), एकदोन कारकून (पगार सालीना १०० रुपये), पंधरा तहशीलदार शिपाई (पगार प्रत्येकीं ४ रु.) असे नोकर त्यास दिलेले असत. त्याच्या मामलतीच्या गांवांतील एखाद्या इसमाची गरज लागल्यास त्यासाठीं त्या मामलतदारास कळवावें लागे; व मग तो मामलतदार त्या इसमास पाठवून देत असे. जकाती व खेरीज मक्ते यांच्या वसुलासाठीं बहुतकरून मक्ते ठरवून दिलेले असत. कधींकधीं कच्च्या रीतीनेंही नोकर ठेवून तो वसूल गोळा करण्याची रीत होती. मामलतदार, कमाविसदार आणि गांवकामगार यांस दप्तरदाराकडे हिशोब द्यावा लागे. वसुलाच्या कामांत तकादा करण्यासाठीं दप्तरदाराकडे तहशीलदार शिपाई असत. तहशीलदारांवर शिवलकर उपनांवाचा मुख्य कामदार होता. जमीनबाब व इतर उत्पन्न भाद्रपद [सप्टेंबर] किंवा आश्विन [आक्टोबर] महि-

१ परिशिष्ट १ लें, लेख नंबर ११७.

त्यापासून आठ हाप्त्यांनीं वसूल करीत असत. नेमिलेल्या मुदतींत वसूल आला नाहीं, तर दप्तरदार 'खासुदग्या' [वरातचिठ्या] तयार करून त्या शिवलकर याजकडे देई. मग शिवलकर त्या आपल्या तहशीलदार असामींकडे देऊन गांवांत पाठवीत असे. तकाद्यासाठीं जाणाऱ्या तहशीलदारास दररोज एकआणापर्यंत 'मसाला' [भत्ता] द्यावा लागे. वसुलासाठीं सक्तीचे उपाय उन्हांत उभें करणें, पोटावर धोंडे देणें अशा प्रकारचे होते असें ह्मणतात. वसुलाचा बराचसा भाग चिठ्या देऊन परभारें देवविण्याची वहिवाट होती. नोकरलोकांचा मुशाहिरा, देवस्थानांस व ब्राह्मणांस दिलेल्या नेमणुका, कोणाहि इसमास द्यावयाची देणगी फार तर काय, एखाद्या वैराग्यास चारआठ आणे द्यावयाचे असले, तर त्यासाठीं सुद्धां चिठ्या देण्याची चाल होती. सन १८३८ सालापासून ही चाल मोडून पुढें एकंदर पैसा रोख वसूल करावा व मुशाहिरा किंवा कोणतेंही देणें खजिन्यांतून रोख द्यावें, असा नियम होऊन तशी शिस्त सुरू झाली.

वर सांगितलेल्या उत्पन्नाच्या मुख्य बाबींशिवाय आणखी किरकोळ उत्पन्नाच्या कांहीं बाबी होत्या त्या पुढें दिल्या आहेत.

न्यायाधिशी:—रयतेकडून चोरी, मारामारी वगैरे फौजदारी गुन्ह्यांच्या आणि देवदेव, वतनदारी वगैरे संबंधाच्या फिर्यादी येतील, त्यांचा न्याय करण्यासाठीं नेमलेला अंमलदार फौजदारी गुन्हा करणाऱ्यापासून दंड व दिवाणी फिर्यादींतील वादीप्रतिवादींपासून हरकी व गुन्हेगारी घेत असे. फौजदारी कामांत पांच रुपयेपर्यंत दंड करण्याचा त्या अंमलदारास अधिकार असे. तसेंच दिवाणी फिर्यादींत दाव्याच्या रकमेवर दर शेंकडा ५ रुपये गुन्हेगारी व १। रुपया हरकी घेत. ज्याच्या बतानें फैसला होई, त्याजकडून हरकी व दुसऱ्याकडून गुन्हेगारी घेण्याची चाल होती. हें न्यायाधिशी उत्पन्न सालीना सुमारें १५०० रुपये होत असे.

पाटदाम:—शूद्र लोकांत विधवापुनर्विवाह करण्याची चाल आहे. त्या विवाहास 'पाट लावणें' असें ह्मणतात. पूर्वी कोणास पाट लावावयाचा असला, तर त्यासाठीं त्याला पहिल्यानें राजेसाहेबांकडे अर्ज करावा लागत

असे. नंतर सरकारांतून त्या पाट लावणाऱ्या बायकोची कबुली विचारीत व तिला पूर्वीच्या नवऱ्यापासून कांहीं मुलें आहेत कीं काय, तीहि चौकशी करीत. पूर्वीच्या नवऱ्यापासून कांही मुलें आहेत असें समजून आल्यास पाट लावण्याची परवानगी देत नसत. तसें नसल्यास पाट लावण्याची सनद (हुकूम) देत. तिच्यासाठीं कांहीं कर सरकारास द्यावा लागे. त्यास 'पाटदाम' असें ह्मणत. हा कर प्रत्येक सनदेसाठीं २ पासून ५ रुपये होता; व त्याचें उत्पन्न दरसाल सुमारें १५० रुपये मिळत असे. इ. सन १८४५ पासून हा कर घेण्याचा व सनद देण्याचा निर्बंध काढून टाकिला.

जात देण्याचा कर:-ब्राह्मणेतर लोकांत कोणास जातीबाहेर टाकल्यास त्याबद्दल चौकशी करून त्यास जातींत घेण्यास लावण्याचा अधिकार राजेसाहेबांस होता. जातींत घेण्याची सनद देतांना वाळींत टाकलेल्या इसमापासून गुन्हेगारी ह्मणून कांहीं कर घेत असत. त्याचें उत्पन्न सालीना सुमारें १०० रुपये होत असे. ब्रिटिशसरकार कारभार पाहूं लागल्यापासून हा कर घेण्याचें बंद झालें.

टांकसाळ:-सावंतवाडी येथें ठशांनीं नाणीं पाडण्यासाठीं एक टांकसाळ ठेविली होती. तें काम एक सोनार करीत असे. १०० पीरखानी रुपये पाडण्यास ठसावणी सरासरी दहा आणे घेत असत. टांकसाळीचें उत्पन्न सालीना सुमारें १०० रुपये होतें. ही टांकसाळ इसवी सन १८४९ पर्यंत सुरू होती.

उत्पन्न व खर्च:-उत्पन्नाच्या बाबी वर सांगितल्या आहेत. त्याचप्रमाणें खर्चाच्याही कांहीं ठरींव बाबी होत्या. त्यांत देवस्थानें व ब्राह्मणयांस करून दिलेल्या नेमणुका, राजेसाहेबांच्या कुटुंबाचा खर्च, सैन्य, आरमार, कोटकिल्ले, पागा पिलखाना, नोकरमुशाहिरा या बाबी मुख्य होत्या. तरी लढाई, लुटालूट, आणि वसुलाच्या कामांतील अव्यवस्था यामुळें उत्पन्न व खर्च यांच्यात नेमस्तपणा राहत नसे. फोंड सावंत उर्फ आनासाहेब यांच्या कारकीर्दीपर्यंत खजिन्याची स्थिति चांगली असावी असें दिसतें. पुढें राजश्रींच्या कारकीर्दींत जी खजिन्यांत तूट पडूं लागली, ती पुढें मुळींच आवरेनाशी झाली. इ. सन १८३२ त मि० फार्बस यानें शिस्त लावण्या-

साठीं उत्पन्नाचें व खर्चाचें जें मान ठरविलें, त्यावरून दरसाल ३४२९६ रुपये शिल्लक रहावे असा अंदाज केला होता. तथापि त्यापुढें सुद्धां खजिन्याच्या स्थितींत कांहीं फेरबदल झाला नाहीं. शेवटीं ता. १७ सप्टेंबर सन १८३८ रोजीं ब्रिटिश सरकारानें कारभार हातीं घेतला, तेव्हां खजिन्यांत ५३८॥ शिल्लक होती.

जुनीं नाणीं:-इसवी सन १६७९ त करी दाभोळी या नांवाचें एक नाणें येथें चालू होतें, असा कोठेंकोठें उल्लेख आढळतो. चार करी दाभोळी म्हणजे एक पीरखानी रुपया होत असे. त्याशिवाय होन हें नाणें विशेष प्रचारांत होतें. सावंत भोंसले यांच्या अव्वल कारकीर्दींतील एकंदर व्यवहार याच नाण्यांत होत असे. या नाण्याचें कोष्टक खालीं दिलें आहे.

सर्वांत लहान नाणें अरविस (ऽऽ।·)	२ दुवल= १ चवल [ऽ=]
२ अरविस= १ वीस (ऽऽ-)	२ चवल= १ धरण [।·]
२ वीस= १ बेळ (ऽ।·)	२ धरण= १ प्रताप (·॥·)
२ बेळ= १ दुवल [ऽ-]	२ प्रताप= १ होन किंवा वराय

यांपैकीं होन किंवा वराय हें नाणें सोन्याचें होतें. त्यावर वराहाचें [डुकर] चित्र असे. वराह हें चालुक्यांचें राजचिन्ह होतें. त्यावरून हें नाणें चालुक्यांच्या वेळेपासून चाललें असावें हें नाणें अठराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत चालू होतें. सरकारी हिशोबांत वगैरे याच नाण्याचा उपयोग करीत एक होन म्हणजे पीरखानी २ रुपये २ आणे [कंपनी १ रुपया १३ आणे २ पै] होतात. हें नाणें लिहिण्याची व वाचण्याची पद्धत पुढें लिहिल्याप्रमाणें होती.

५॥-ऽ- साडेपांच होनु दुवल वीस
२१॥=ऽ। साडेएकवीस होनु तीन दुवल अरवीस
२९ऽ-ऽ-। एकुणतीस होनु दुवल दीडवीस
१॥-।·। दीड होनु दुवल बेल अरवीस
ऽ= होनु चवल
ऽ≡।- होनु तीनदुवल बेल वीस
६।॥≡ऽ- पावणेसात होनु तीन दुवल वीस

१ हे नाणें सावंतवाडी येथें वेस्ट्रापम्युझियममध्यें ठेविलेलें आहे.

यानंतर पीरखानी नाणें जास्त प्रचारांत आलें, व सरकारी हिशोबांत त्याचाच फार उपयोग करूं लागले. त्याचें कोष्टक पुढें दिल्याप्रमाणें:–

२६ रेस=१ आणा [८/]	२ पावले= १ अधेला [।।•]
४ आणे=१ पावला [।•]	२ अधेले= १ रुपया.

विजापूरचा पीरखान नांवाचा कोणी एक सुभेदार भिमगड परगण्याचा अंमलदार होता. त्यानें हें नाणें पाडलेलें होतें. त्यावरून त्यास पीरखानी रुपया असें नांव पडलें. यापैकीं रुपया, अधेला व पावला हीं नाणीं रुप्याचीं असत. शंभर पीरखानी रुपयांबरोबर ८७·१७९ कंपनी रुपये होतात. इ सन १८४८ पर्यंत हें नाणें संस्थानांत चालू होतें. तेथपासून कंपनी नाणें सुरू झालें.

यांशिवाय संस्थानांत आणखी खालीं लिहिलेलीं तांब्याचीं नाणीं चालत असत. तीं व त्यांचा खुर्दाचा भाव दर पीरखानी रुपयास असा:–

नांव.	भाव.	नांव.	भाव.
गांव सुरती	८२	मकरशाही	७९
कंपनी	८१	नवारी	७९
शंभु	८०॥	पुणेशिक्का	७८
मुडे सुरती	८०	दोब्राव	७४॥
राजेबहादरी	८०	पनाळी	७१॥
शहापुरी	८०	बेलापुरी	७१
मिरजी	७९	तांग	१२॥

हा खुर्दाचा भाव बाजारांतील इतर जिनसांप्रमाणेंच वरचेवर बदलत असे. आणखी छत्रपती, दुराडी व बाणकोटी असे पैसे चालू होते. परंतु ता. ९ जुलई सन १८३४ रोजीं वाडीसरकारानें हीं तीन नाणीं बंद करून, व्यापारी व इतर लोकांनीं आपल्याकडे असलेलीं त्या प्रकारचीं नाणीं टांकसाळींत देऊन त्याऐवजीं अनुक्रमें ६०, ८०, व १४० नाण्यांबद्दल ८० राजेबहादर शिक्क्याचे पैसे घ्यावे, असा ठराव केला.

सैन्यः–सावंत भोंसले यांच्या कारकीर्दीच्या अवेलीस लखम सावंत यांजकडे सुमारें १२००० पायदळ होतें. पुढें फोंड सावंत ऊर्फ आना-

१ हीं नाणीं सावंतवाडी येथें वेस्ट्रापमयुझियममध्यें ठेविलेलीं आहेत.

साहेब यांच्या कारकीर्दींत जिकडे तिकडे बहुधा शांतता झाली असल्या-कारणानें सैन्याची संख्या कमी झाली होती; परंतु पुनः रामचंद्र सावंत व जयराम सावंत यांच्या कारकीर्दींत ती बरीच वाढली. जयराममहाराज यांनीं बारदेश प्रांतावर स्वारी केली; त्यावेळीं त्यांच्याबरोबर घोडेस्वारच २२०० होते. तसेंच कुडाळ येथें आंग्र्याबरोबर जी मोठी लढाई झाली, तींत सावंत यांच्या बाजूला १२००० पायदळ, ९०० घोडेस्वार आणि ३०० सरदार इतकें सैन्य होतें. हे ३०० सरदार ह्मणजे लहान-लहान पतकांचे मुख्य होते. जयराममहाराज यांच्या कारकीर्दीनंतर खेम-सावंत यांच्या वेळीं सैन्याची संख्या पुनः कांहीं कमी झाली. तरी त्यावेळीं लहान मोठीं मिळून सुमारें १९० पतकें होतीं; व त्यांत एकंदर ७९६७ शिपाई होते. त्यांतील मुख्यमुख्य पतकें रघुनाथ दळवी २४०, सावंत २०१६, सबनीस ९०२, सिदसावंत भोंसले १९०, अनंत फट शेणवी ९०, नारसावंत पेंडूरकर १९६, गणोजी भाट १९८, नाईक साटम २४७, भिरवडेकर व नाटलेकर १४४, रघु फर्जंद १७८, दत्ताजी प्रभु सातर्डेकर १२०, जमाव मसुरकर २२९ हीं होतीं. सावंत व सबनीस यांच्या पोटींही आणखीं लहानलहान पतकें होतीं. या सर्व सैन्याचा सालीना खर्च ९०८१२ होन (९२७३२ रु.) होता. ह्मणजे दर असामीस सालीना सुमारें सव्वाबारा रुपये मिळत असत. पुढें हा खर्च कमी होतां होतां चवथे खेमसावंत यांच्या कारकीर्दींत तो २५८१७ रु. पर्यंत आला होता. यावेळीं सैन्याची संख्याही बरीच कमी झाली होती. शिपायांचा मुशाहिरा त्यांस निमे त्यांच्या शेतांतून मिळणाऱ्या धान्याच्या रकमेंत वजा देत असत; त्यास 'शेतसनदी नेमणूक' ह्मणत. बाकी निमे गांवावर वरात देऊन देववीत. या लोकांस नेहमीं चाकरीस राहावें लागत नसे. लढाईचा प्रसंग पडेल त्यावेळीं त्यांस बोलावून आणीत; यामुळें सावंत यांस थोड्या खर्चांत पुष्कळ सैन्य ठेवितां येई. कवाईत वगैरे शिकविण्याची कल्पना त्यावेळीं मुळींच नव्हती. लढाईच्या वेळीं या लोकांस त्यांच्या मुशाहिऱ्याशिवाय अडेसरी [रोजची पोटगी] निराळी देत असत. ती दररोज दर असामीस

कुडाळी मापानें तीन शेर भात मिळे. लढाईंत पडलेल्या शिपायांच्या मुलांस निर्वाहासाठीं 'बाळप्रवेशी' म्हणून नेमणूक देत असत. ती दरसाल १२ पासून २४ रु. असे. अशा प्रकारें दिलेली एक नेमणूक अद्यापिही चालत आहे. क्वचित्प्रसंगीं निर्वाहासाठीं जमीनही इनाम देत असत. तसेंच लढाईंत कोणी इसम जखमी होऊन निरुपयोगी झाला, तर त्यास निर्वाहासाठीं कांहीं नेमणूक देण्याची चाल होती.

आरमारः-पूर्वीचें आरमार म्हणजे कांहीं गुराबा व कांहीं गलबतें इतकेंच असे. 'गुराबा' हा आरबी शब्द 'घोराब्' [डोंबकावळा] यापासून झालेला आहे. गुराबा हीं बहुधा दोन डोलकाठ्यांचीं तारवें असत. त्यांत १५० पासून ३०० टन वजन राहत असे. त्यांचें बूड पाण्यांत फार खोल जात नसे; व त्यामुळें पश्चिम किनाऱ्यावरील हलक्या वाऱ्यांत तीं फारच वेगानें चालत. त्यांची नाळ पाण्याच्या सपाटीवर फार लांबपर्यंत तिर्कस गेलेली असे. समुद्रांत एकटें तारूं आढळलें म्हणजे ह्या गुराबा दोनतीन मिळून त्याच्यावर हल्ला करीत; व नाळीवरून त्या तारवावर जाऊन तलवार घेऊन लढत असत. ह्या गुराबा फक्त लढाईकरितांच बांधलेल्या होत्या. त्यामुळें विलायतच्या ओबडधोबड व्यापारी गलबतांवर हल्ला करण्यास त्यांस सोपें पडत असे. कदाचित् त्या व्यापारी गलबतांकडून यांच्यावर निकराचा हल्ला झाल्यास, यांस चटकन् पळून नदीच्या उथळ पात्रांत सुरक्षितपणें जाऊन राहतां येई. गलबतें हीं गुराबांहून कांहीं लहान आकाराचीं होतीं. सावंत यांच्या आरमारांत लक्ष्मीप्रसाद, भवानीप्रसाद व साहेबसदर या नांवाच्या तीन गुराबा आणि रामबाण, रघुनाथ, दुर्गा, यशवंती, लक्ष्मी, हनुमंत अशीं सहा गलबतें होतीं. त्यांवर लढाऊ असामी ३३१ व दर्यावर्दी २०६ मिळून एकंदर ५३७ असामी होते. त्यांचा दरमहाचा खर्च २७१३ रुपये होता. म्हणजे प्रत्येक असामीस दरमहा सरासरी ५ रुपये खर्च पडत असे. इ. सन १८१२ त हें आरमार ब्रिटिशसरकारच्या ताब्यांत दिलें हें पूर्वीं सांगितलेंच आहे.

कोट व किल्ले:-फोंड सावंत ऊर्फ आनासाहेब यांनीं आपल्या कार-

---

१ परिशिष्ट १ लें, लेख नंबर १३१.

कीर्दींत संस्थान अमलांत कोट व किल्ले बांधिले हें पूर्वीं सांगितलेंच आहे. सावंतांच्या भरभराटीच्यावेळीं त्यांच्या ताब्यांत वाडी, कुडाळ, बांदें, वेंगुर्लें, आवाडें, डिचोली, हळर्ण हे सात कोट आणि सिदगड, महादेवगड, नारायणगड, हनुमंतगड, निवती, भरतगड, यशवंतगड, नरसिंहगड असे आठ किल्ले होते. या कोटांच्या व किल्ल्यांच्या खर्चासाठीं बहुतकरून जवळच्या गांवचा वसूल लावून दिलेला असे. त्यास 'तनखा' असें ह्मणतात. त्याशिवाय तिजोरींतूनही कांहीं नेमणूक होती. इसवी सन १७४२ त या सगळ्या कोटांसाठीं व किल्ल्यांसाठीं मिळून पुढें लिहिल्याप्रमाणें नेमणूक ठरली होतीः—

तांदूळ ४९ भरे दर रुपयास ८३॥। कुडव प्रमाणें.	९६०
तुरीची डाळ भरे १०८१० दर रुपयास ८४ प्रमाणें.	२०२॥
तूप खंडी ३॥८५ दर रुपयास वजनी ८८९ शेर प्रमाणे.	५६१
तेल खंडी २८१॥५ दर मणीं ३ रु. प्रमाणें.	१२४॥।=
नारळ २८८० दर शेंकडा २॥ प्रमाणें.	७२
विड्याचीं पानें ९२१६०० दर हजारीं ८–८१ प्रमाणें	६१।
सुपारी वजन खंडी १॥।२८९ दर मणीं ३ रु. प्रमाणें	१११।=
दिव्यास तेल खंडी १०।२ दर मणीं ३ रु. प्रमाणें	६२१
	२७१४

पुढें यांपैकीं बहुतेक किल्ले व कोट शत्रूंनीं बळकावून घेतले; व शेवटीं इ. सन १८३२ त वाडी, कुडाळ, बांदें व आवाडें हे चार कोट आणि हनुमंतगड, नारायणगड व नरसिंहगड हे तीन किल्ले सावंतांच्या ताब्यांत राहिले. यावेळीं किल्ल्यांतील खर्चासाठीं गांवांतून तनखा तोडून देण्याची चाल बंद झाली होती; व किल्ल्यांतील वस्तीही थोडीशी कमी झाली होती. नारायणगड व नरसिंहगड हे किल्ले बहुतेक मोकळेच होते. बाकी किल्ल्यांस पुढें लिहिल्याप्रमाणें खर्चाची नेमणूक होतीः—

कोट बांदें, किल्लेदार १, कारखाननीस २, लोक ६९, हलकेकरी १ व कुणबीण १	१२४९ रु.
कोट कुडाळ, किल्लेदार १, कारखानवीस १, तासेकरी ३, लोक २० व कुणबीण १	७२० रु.

कोट आवाडें, किल्लेदार १, कारखाननीस १, तासनी १,
लोक ३९, व कुणबीण १, ९७३ रु.

हनुमंतगड किल्लेदार १, कारकून ३, कीर्तनी २, कोठवळा १,
गडकरी ८०, लोक ४७, व कुणबिणी २ ३००० रु.

६९१२

याशिवाय शहरपन्हा येथील ह्मणजे वाडी शहरांतील बंदोबस्तासाठी लोक होते ते—परवानगीच्या दरवाज्यावर, १०; छपावर्णाच्या कव्या-वर, ७; तंबाखूच्या दुकानावर, ६; मासळीच्या तिठ्यावर, ७; बंदि-वान लोकांच्या रखवालीस, २६; तटाच्या निरनिराळ्या बुरुजांवर, वडा-च्या बुरुजावर, ७; नगारखान्याकडेस, १३; फुटसाटीवर, ६; काळे बुरुजावर, ११; ब्राह्मणबुरुजावर, ६; महालाचे दारावर, १०; माजघ-रांत जामदारखान्याकडे, ७; शाळेंत चौकीस, ४६; सालई दरवाज्यावर, ११; काजीची दिंडी, ११; दरवाजा कोलगांव, ७; दिंडी सबनीस, ६; दिंडी कारिवडें, ९; दिंडी खासकीलवाडा, ११; मुशीचा दरवाजा, पाट-णकरांची दिंडी, पागेचा दरवाजा, सदरेचा दरवाजा, थोरलेसदरेवर, हनु-मंताच्या देवळांत वगैरे ठिकाणीं २८६; लबईचे (निरोप पोंचविण्याचे वगैरे) कामास, ११; गस्तीस, ९०; मिळून एकंदर ९६९. हे सर्व लोक सेनापतीचे हुकुमांत वागत. त्यांच्या नेमणुका करणें किंवा त्यांस शिक्षा करणें ती, कारभाऱ्याचेमार्फत राजेसाहेबांस कळवून, त्यांचा हुकूम होईल त्याप्रमाणें सेनापती करीत असे. यापैकीं मनसुबीकडे जरूर लागेल त्याप्रमाणें ३० पासून ९० लोक व तहशीलदाराच्या कारकुनाकडे १५० पर्यंत लोक सेनापतीनें द्यावे असा नियम होता. शहरपन्हा येथील लोक एक महिन्यानें व किल्लेकोटावरील गडकरी खेरीज करून लोक तीन महिन्यांनीं फेरपाळीनें बदलीत असत. शहरपन्हा येथील लोकांची दररोज पहाटेच्या नौबतीच्यावेळीं हजिरी घेण्याचा वेळ नेमिला होता, व किल्लेकोटांकडील लोकांच्या हजिरीची वगैरे खबर (रिपोर्ट) दररोज सेनापतीकडे येऊन पोंचावी अशी व्यवस्था केलेली होती. शहरांत रोज रात्रीच्यावेळीं तोफ मारीत. त्यानंतर नौबत वाजेपर्यंत सेनापतीची

विशेष परवानगी घेतल्यावांचून शहरांत कोणी फिरूं नये, किंवा बंदुकीचा आवाज काढूं नये, असा नियम होता. ब्रिटिश सरकारानें या संस्थानचा राज्यकारभार हातीं घेतल्यानंतर किल्ल्यांत असलेले थोडथोडे लोक कमी केले. एक किंवा दोन महिन्यांचा पगार घेऊन जरूर पडेल त्यावेळीं लढाईसाठीं हजर व्हावें, अशा प्रकारचें जें सनदकरी सैन्य होतें, त्यांस लहानमहान नोकऱ्यांचीं कामें नेमून दिलीं. किल्ल्यावर तोफा वगैरे जें कांहीं थोडें सामान होतें तें तेथून काढिलें; आणि वाडींत स्वतंत्र पलटण ठेविली. तेव्हांपासून हे किल्ले व कोट नामशेष झाले.

शिक्षणः–राजकुटुंबांतील मुलगे आणि दरकदार, मेहमान, सरदार यांचे मुलगे यांस शिकविण्यासाठीं राजवाड्यांत एक शाळा सरकारानें ठेविलेली होती. बाकी गांवांतील लोक आपापल्या सोयीप्रमाणें पंतोजी ठेवून मुलांस शिक्षण देववीत असत; आणि तें शिक्षण देण्याची चाल बहुतेक ब्राह्मणलोकांत मात्र होती. शाळांतील मुलांची संख्या ह्मटली ह्मणजे गांवांतील उच्च जातीच्या संख्येच्या मानानें ९ पासून ३० पर्यंत असे. शिक्षणाचा क्रम बालबोध व मोडी वाचन व लिहिणें, गणीत व हिशोब इतका होता.

न्यायमनसुबीः-लोकांकडून फौजदारी व दिवाणी या दोन्ही स्वरूपाच्या येणाऱ्या फिर्यादींची चौकशी करण्यासाठीं एकच अंमलदार नेमिला होता. त्यास मनसुबदार असें ह्मणत. ह्या सर्व अर्ज्या प्रथम मुख्य कारभारी याजकडे गुजराव्या लागत; आणि तेथून त्या चौकशी करून चौकशीचा सारांश जाहीर करण्यासाठीं ह्मणून मनसुबदाराकडे येत असत. मनसुबदार हा फिर्यादीस व प्रतिवादीस हजर ठेवून त्याचे जे साक्षीदार असतील, त्यांचे करिणे (जबाब) घेत असे, व त्यांचे पुराव्याचे कांहीं कागदपत्र असल्यास तेही पहात असे. फौजदारी गुन्ह्यापैकीं शिव्यागाळी, धक्काबुकी, मारामारी, वईआडा मोडणें, परवानगीशिवाय झाड तोडून नेणें, रस्त्यास पाण्यास व लागवडीस हरकत करणें हे लहान स्वरूपाचे अपराध समजले जात; व अशा अपराधास कारभारी याचें मत घेऊन चार आण्यांपासून पांच रुपयेपर्यंत दंड करण्याचा मनसुबदारास अधिकार

होता. चोरी, दरवडा, हाणमार, खून, घर मोडणें, लुटालूट, बायकोवर बलात्कार, घरास आग लावणें, शेतांतील पीक जाळणें, बंडांत सामील होणें हे मोठ्या स्वरूपाचे अपराध मानीत. अशा कामांत चौकशी करून व चौकशींत समजून आलेल्या हकीगतीचा सारांश तयार करून तो कारभारी याजकडे पाठवावा, आणि कारभारी यानें तो राजेसाहेबांस समजावून दिल्यावर, ते शिक्षा सांगतील ती अमलांत आणावी हें मनसुबदाराचें काम होतें. मोठ्या गुन्ह्यास दंड, जेरबंद मारणें किंवा कैदखान्यांत ठेवणें अशी शिक्षा देत असत. दिवाणी दावे दोन प्रकारचे असत:-देवघेव व वतनदारी. या दोन्ही प्रकारच्या दाव्यांत चौकशीचा सारांश तयार करून तो कारभारी याजकडे पाठवावा, आणि त्याचा शेवट निकाल राजेसाहेबांकडून होईल, त्याप्रमाणें मनसुबदारानें अंमल करावा असा नियम होता. देवघेवीच्या दाव्यांत व्याज देवविणें तें, पैशाची देवघेव असेल तर दाम दुप्पट व गल्ल्याची देवघेव असेल तर कण तिप्पट, याप्रमाणें देववीत. व्याजाचा करार नसलेल्या पैशाच्या बाबतींत दरसाल दर शेंकडा ६ पासून १२ टक्के व गल्ल्याच्या बाबतींत सवाई या दरानें व्याज आकारीत असत. तसेंच निवाड्याच्या अंतीं हरकी व गुन्हेगारी आणि मनसुबदार याची कारकुनी यांबद्दल सरकारांत पैसा जमा करावा लागत असे. देवघेवीच्या दाव्यांत गुन्हेगारी दर शेंकडा ६ टक्के व गुन्हेगारीच्या चतुर्थांश हरकी घेत. जो हरेल त्याच्याकडून गुन्हेगारी व दुसऱ्या पक्षाकडून हरकी घेत असत. हरकी व गुन्हेगारी मिळून जी रक्कम होई, त्याच्यावर दर शेंकडा ५ टक्के प्रमाणें कारकुनी द्यावी लागत असे. ती खुद्द मनसुबदारास मिळत असे. साक्षीदारांस बोलावण्यासाठीं ताकिदी पाठवीत, त्या बजावून आणण्याबद्दल दर कोसास (तीन मैलांस) एक आणा प्रमाणें 'मसाला' (भत्ता) ज्याच्या तर्फेचा साक्षीदार असेल त्यास भरावा लागे. मनसुबदाराकडे चौकशीचें काम चालवीत असतां ज्याचें काम असेल त्याशिवाय दुसऱ्या इसमानें बिलकूल बोलतांकामा नये, असा सक्त नियम होता; व त्याचें उल्लंघन करणारास दंडाची शिक्षा ठरविली होती.

याशिवाय पंचायतीनें वाद तोडण्याची चाल बरीच प्रचारांत होती; आणि गांवांची हद्द, ठिकाणाची मेर अशा प्रकारच्या तंट्यांत बहुतकरून पंच नेमून आणि गांवकामगार यांच्या माहितीनें पुरातनचा भोगवटा पाहून निवाडा करीत असत. पंच नेमणें ते आठ, दहा, बारा, पंधरा इतक्यापर्यंत नेमीत; आणि ते सगळे दूरदूरच्या गांवांतील चांगले निवडक असे नेमून पाठवीत असत. हे नेमिलेले पंच वादीप्रतिवादींचा पुरावा पाहून त्यावरून आपलें मत कळवीत; व त्यानंतर गांवकामगारांची खबर राजेसाहेब यांजकडे गेल्यावर, त्याप्रमाण राजेसाहेब अखेरचा ठराव करीत असत. कधींकधीं हे नेमिलेले पंच शपथांनींही मेरेचा निवाडा करीत असत. शपथ करण्याची चाल अशी होती कीं, वादी किंवा प्रतिवादी यांतून जो कबूल असेल, त्यानें शेणतुळस मस्तकावर घेऊन व एका पायांत वहाण घालून जी आपली मेर असें तो ह्मणत असेल, त्या मेरेवरून चालावें. अशा रीतीनें शपथ करणें ती अन्यायानें जमीन मिळविण्यासाठीं केली तर, त्यापासून कांहीं दैविक बाधा होते अशी समजूत होती. ह्मणून शपथ केल्यापासून असुक मुदतींत कांहीं बाधा झाली नाहीं तर, ती शपथ खरी मानावी असें ठरवीत; आणि तितक्या मुदतीपर्यंत वाट पाहून जसा अनुभव येईल तसा निकाल लावीत असत. निवाडा करण्यासाठीं गांवकामदारास दिलेला हुकूम घेऊन एखादा खासकील जात असे. त्यास ज्याच्याविरुद्ध निकाल होईल, त्यानें मसाला (भत्ता) द्यावा असा नियम होता. ही भत्त्याची रक्कम साधारणपणें एक होन असे.

कांहीं महत्वाच्या वादांत राजेसाहेब किंवा कारभारी यांच्या समोर वादी प्रतिवादींची तक्रार चालली तर, त्यांत दोन्ही पक्षकारासाठीं कोणी चांगल्या समजूतदार गृहस्थांनीं पुढाकार घेऊन आपापल्या पक्षकाराच्या ह्मणण्याचें मंडन करावें, व त्यांत शेवटीं जो सिद्धांत ठरेल त्याप्रमाणें निकाल करावा अशी एक चाल होती.

अशा रीतीनें जे निकाल ठरवीत, त्यांबद्दल लेखी ठराव लिहून त्यांवर राजेसाहेबांचे शिक्के करीत असत; आणि त्या ठरावाप्रमाण अंमल करण्या-

१ परिशिष्ट १ लें, लेख नंबर ११२.

साठीं गांवकामदार यांस सनद (हुकूम) पाठवीत असत.

संस्थानचे कामदार व त्यांचीं कामें:-राज्यव्यवस्थेच्या सोयीसाठीं खेम सावंत यांनीं सबनीस, चिटणीस, फडणीस, दप्तरदार, पोतनीस, पागनीस, कोटणीस, तटणीस, हे दरकदार व दळवी भोंसले सेनापती, परमेकर, माणगांवकर सावंत, तिरवडेकर वगैरे सरदार नेमिल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. यांस पुढें लिहिल्याप्रमाणें कामें नेमून दिलीं होतीं.

सबनीस:-मुख्य कारभाराचें काम. इतर सर्व दरकदार व सरदार यांच्या कामावर देखरेख ठेवणें, आणि हरएक कामाची राजेसाहेबांकडे सुनावणी करून हुकूम देणें हें काम यांच्याकडे होतें. तें इ. स. १८३४ पर्यंत बहुतेक या घराण्याकडे चाललें होतें. यांस बहुतेक गांवांत जमिनी इनाम असून प्रत्येक गांवांत हक्क म्हणून कांहीं नक्त नेमणूक होती. शिवाय जकाती, तंबाखू अशा प्रकारच्या करांवरही त्यांस कांहीं हक्क भोगत असे. तंबाखूचे करांवर भोगणाऱ्या हक्कांचें प्रमाण सरासरी शेंकडा २॥ रु. प्रमाणें होतें. यापैकीं इनाम जमिनी व गांवगन्नाच्या हक्कांपैकीं कांहीं भाग यांच्याकडे अद्यून चालत आहे.

चिटणीस:-हरएक जातसाली कागदांचें दप्तर व बारनिशी राखणें; राजेसाहेबांकडून दुसरे संस्थानिकांस किंवा परकीय राजांस थैलीपत्रें पाठविणें झाल्यास त्याचे मसुदे करून व ते राजेसाहेबांस दाखवून त्याप्रमाणें थैलीचीं पत्रें लिहिणें व परकी राजांकडून किंवा संस्थानिकांकडून पत्रें येतील त्यांची कारभाऱ्यामार्फत सुनावणी करणें हें त्यांचें काम होतें; व त्याप्रमाणें राजेसाहेबांकडील खासगी काम कांहीं विशेष प्रसंगीं हे अद्यून करितात. जुन्या सरकारी दप्तराचा बहुतेक भाग अद्याप यांच्याच ताब्यांत आहे. यांस पूर्वापार चिटणीशीबद्दल १०० होनांची नेमणूक होती. शिवाय कांहीं मोकासाही चालत होता, व रहदारीच्या मालावर दरगोणीस एक रुकाप्रमाणें हक्क मिळत असे. इसवी सन १८३२ त यांची नेमणूक सालीना पीरखानी २०७९ रुपये होती. हल्लीं यांस दरसाल स्वत:साठीं व नोकराबद्दल मिळून १३०८ रुपये नेमणूक चालत आहे.

फडणीस:-सरकारांतून ज्या सनदा देण्यांत येतील त्यांवर सरकारचे

शिक्के करून घेऊन त्यांची बारानिशी करणें आणि प्रत्येक सनदेवर 'बारसूद' असा शेरा लिहिणें हें काम यांच्याकडे होतें, तें ब्रिटिशसरकार या संस्थानचा राज्यकारभार पाहूं लागेपर्यंत त्यांच्याकडे चाललें. यांस सालीना पीरखानी २२५ रुपये मुशाहिरा मिळत असे; या घराण्यांतील एका पुरुषास या दरकासंबंधानें पेन्शनादाखल सालीना ८४ रुपयांची नेमणूक आहे.

दप्तरदारः–हा दरक रांगणेकर या घराण्याकडे चालत असून संस्थानच्या जमाबंदीचें व वसुलाचें काम त्यांच्याकडे होतें. याचें थोडेसें वर्णन पूर्वीं आलेंच आहे. प्रत्येक गांवाकडे किंवा मक्तेदाराकडे येणें किती, पैकीं वसूल किती आला, बाकी किती राहिली, त्याचा हिशोब राखून वसुलाची तजवीज करणें व त्याचा दरमहा हिशोब हुजुरांत देणं हें याचें मुख्य काम होतें. खेरीज मक्तत्यांचे किंवा जकातींचे मक्ते ठरवून देऊन त्यांच्या, तसेंच गांव व शेरी जमाबंदीच्या कबुलायती घेणें, गांवकामदाराच्या दप्तराची तपासणी करणें, त्यांजकडील हिशोब घेणें, हींही कामें त्यांस करावीं लागत. शिवाय पाटदामाबद्दल पैसा घेऊन सनद देणें, ज्या वाळीत टाकलेल्या इसमास जातींत घेण्याबद्दल राजेसाहेबांचा हुकूम झाला असेल, त्यापासून ठरलेली गुन्हेगारी घेऊन सनद देणें, मिळकत गहाण किंवा विक्रीत दिल्याबद्दल झालेले दस्तऐवज ठरलेलं हांशील घेऊन नोंदून देणं हीं कामें त्यांच्याकडे सोपविलीं होतीं. हा दरक ब्रिटिशसरकार या संस्थानचा कारभार पाहूं लागेपर्यंत रांगणेकर घराण्याकडे चालला होता. त्यांचा सालीना मुशाहिरा पीरखानी २५० रु. होता. पुढें त्या जागीं दुसरे मनुष्याची नेमणूक झाली. इ. सन १८७८ त सरकारानें संस्थानासाठीं स्वतंत्र कारभारी नेमिल्यानंतर ही जागा कादून टाकिली.

पोतनीसः–सरकारांत जमा होणारा हरएक प्रकारचा पैसा पारखून घेऊन ठेवणें, आणि सरकारांतून पैसा द्यावयाचा असेल तो पावती घेऊन देणें व त्याबद्दल जमाखर्च टेवून हुजुरांत हिशोब पाठविणें, तसेंच सरकारांचे जडजवाहीर, मौल्यवान दागिने व इस्ताद (सर्व प्रकारचें सामान) सांभाळून ठेवणे हीं कामें यांच्याकडे होतीं. हा दरक अद्यापिही या घराण्याकडे चालू आहे. पूर्वीं यांचा मुशाहिरा सालीना पीरखानी २९०

रुपये होता. हल्लीं सालीना नेमणूक ८४० रुपये आहे.

पागनीसः—पूर्वीं संस्थानची पागा बरीच मोठी होती. लढाईवर जाणारे घोडेस्वार यांस 'शिलेदार' ह्मणत; व प्रत्येक शिलेदार त्यास मिळणाऱ्या नेमणुकींतून घोडे बाळगीत असत. तरी संस्थानच्या पागेंत नेहमीं सुमारें २५० घोडेस्वार असत; व त्यांचा सालीना खर्च सुमारें ७००० रुपये होता. त्याची सर्व व्यवस्था पागनीसाकडे सोंपविली होती. त्याचा सालीना मुशाहिरा पीरखानी २५० रुपये होता. हा दरक अद्यापीही या घराण्याकडे चालू आहे. हल्लीं यांस सालीना २०० रुपये नेमणूक चालते.

याशिवाय पिलखाना, उष्टरखाना व थटी (गुरांचा कारखाना) असे कारखाने असून त्यांवर निरनिराळे कामदार नेमिले होते. हत्ती तीन असून त्यांचा खर्च सुमारें २२५० रुपये; उंटें तीन असून त्यांचा खर्च सुमारें २०० रुपये; व थटीकडे १२५ रुपये असा सालीना खर्च होत असे.

कोटणीसः—नक्त वसूल आलेला घेण्यासाठीं जशी पोतनीस याची नेमणूक होती, त्याचप्रमाणें ऐनजिनसी वसूल आलेला घेऊन त्याची व्यवस्था करण्यासाठीं कोटणीस याची नेमणूक होती. राजेसाहेबांच्या कुटुंबखर्चास वगैरे जो जिन्नस खरेदी करीत असत, तोही कोटणीस याच्याच ताब्यांत राहत असे. गल्ल्याचें माप करण्यासाठीं त्याच्या मदतीस दोन मापारी दिलेले होते. या कोठींतून दरसाल शेंकडों खंडी गल्ल्याची घडामोड होत असे. सरकारचे आश्रित, मेहमान, सरदार, दरकदार किंवा इतर कोणी मर्जींतले मनुष्य यांच्या घरीं कांहीं लग्नकार्य, श्राद्धपक्ष किंवा दुसरें कांहीं विशेष कार्य असलें ह्मणजे या कोठींतून बहुतेक प्रकारचे जिनसांचा पुरवठा करण्यांत येत असे. कोटणीस याचा सालीना मुशाहिरा पीरखानी १२५ रुपये होता. ब्रिटिश सरकार या संस्थानचा कारभार पाहूं लागल्यानंतर सुद्धां कांहीं वर्षें ही कोठी चालू होती. पुढें इ. सन १८४७ च्या सुमारास ऐनजिनसी गल्ला घेण्याची वहिवाट मोडून टाकिली; व त्यापासून ही कोठीहि बंद झाली.

दप्तरः—या संस्थानांत सावंत यांचा अंमल सुरू होण्यापूर्वींचे जे थो-

डेसे कागदपत्र मिळतात, त्यावरून सावंतांच्या अमलापूर्वी सुद्धां या मुलुखांतील दप्तर मराठी भाषेंत मोडी लिपींत ठेवीत असत असें दिसतें. तथापि या मराठी भाषेंत फारशी व आरबी भाषेंतील शब्द बरेच मिसळलेले आढळतात. दप्तरांतील मुख्य मुख्य कागदांचीं नांवें आरबी व फारशी भाषेंतलींच होतीं; जसें, बार [कार्द], मोहफर्द [खतावणी], इजमायली [जमाबंदीचा हिशोब], झाडा [वसूलबाकी], रवासुदगी [वरातचिठी], रहिशी [निरख], करिणा [जबानी] इत्यादि. हरएक लेखांतही आरबी सनाचाच उपयोग केलेला आढळतो. ब्राह्मणांस दिलेल्या देणग्यांत वगैरे कचित्प्रसंगीं शालिवाहन शकाचा उपयोग करीत असत. आरबी सनास सूरसन असें ह्मणतात. त्याचा आरंभ मृगनक्षत्रापासून होतो. सूरसनांत हिजरी सालांतल्याच महिन्यांचा व तारखांचा उपयोग करितात. हिजरी तारखेस ' चंद्र ' असें ह्मणतात. ' चंद्र ' हा शब्द ' छ ' या ठराविक खुणेनें लिहिण्याची चाल आहे. प्रत्येक महिन्याचे चंद्र पाळीपाळीनें ३० किंवा २९ असतात. अशा बारा महिन्यांचें एक वर्ष होतें. ते महिनें:-मोहरम, सफर, रबिलावल, रबिलाखर, जमादिलावल, रज्जब, साबान, रमजान, सव्वाल, जिल्काद, जिल्हेज. प्रत्येक लेखाच्या आरंभास सन आणि शेवटीं चंद्र घालितात. तो घालण्याची पद्धत समजण्यासाठीं प्रथम अंकांचीं नांवें समजणें अवश्य आहे. तीं अशीं:-१ इहिदे, २ इसन्ने, ३ सल्लास, ४ आर्बा, ५ खमस, ६ सीत, ७ सबा, ८ समान, ९ तिस्सा, १० अशर, २० अशरीन, १०० मय्या, २०० मय्यातैन, १००० अल्लफ. इतकीं नांवें ठरींव आहेत. बाकी संख्यांचीं नांवें यांचपैकी कांहीं नांवांस प्रत्यय लावून किंवा दोन नांवें एकत्र जोडून तयार होतात. तीनपासून नऊपर्यंतच्या आंकड्यांचीं जीं नांवें वर सांगितलीं, त्यांस ' ऐन ' हा प्रत्यय लावला ह्मणजे त्यांची दसपट होते; जसें, सल्लास (३), सल्लासैन (३०); आर्बा (४), आर्बैन (४०); इत्यादि. तसेंच या तीनपासून नऊपर्यंतच्या अंकांस ' मय्या ' हा शब्द जोडिला ह्मणजे त्याची शंभरपट होते; जसें, सल्लासमय्या (३००), आर्बामय्या (४००), इत्यादि. आतां १२६९ हे लिहिणें असल्यास

५ (खमस), ६० (सितैन); २०० (मय्यातैन) व १०००(अल्फ) ह्मणजे खमस सितैन मय्यातैन व अल्फ असें लिहिलें पाहिजे; तसेंच १९६५ हें साल खमस सितैन खमसमय्या व अल्फ असें लिहिलें पाहिजे. सूरसनाचा इसवी सन करणें झाल्यास, त्यांत मृगापूर्वी ६०० व मृगानंतर ५९९ वर्षे मिळवून काढावा.

या दप्तराचे मुख्य भाग पांच होतेः—चिटणिशी, फडणिशी, जमाबंदी, नगदी आणि मनसुबदारी. परकी राजांशीं, संस्थानिकांशीं किंवा इतर लोकांशीं झालेला पत्रव्यवहार तें चिटणिशी; सरकारांतून दिलेल्या सनदांची वगैरे बारनिशी फडणीस यांजकडे रहात असे, तें फडणिशी; जमाबंदी व तिच्या वसूल बाकीचे हिशोब व त्या संबंधानें झालेला पत्रव्यवहार ज्यांत आहे तें जमाबंदी; पैशाच्या देवघेवीसंबंधाचें तें नगदी; आणि दिवाणी किंवा फौजदारी संबंधानें आलेल्या फिर्यादी, त्यांची चौकशी केल्याबद्दलचे कागदपत्र व त्यांचे निवाडे हें मनसुबदारी. यांपैकीं जमाबंदी दप्तराचे कागद इ. स. १६७९ पासूनचे थोडथोडे मिळतात. बाकी दप्तर बहुतेक अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांतील आहे. त्याच्यापूर्वीचे बरेच कागद निपाणकरांच्या धामधुमीच्या वेळीं नाश झाले असें ह्मणतात.

बाजारभावः—हा समजण्यासाठीं निरख ठेवण्याची चाल सन १८०७ पासून सुरू झाली. त्याच्यापूर्वीचे बाजारभाव किल्ल्यांतील खर्चाचा एक हिशोब उपलब्ध आहे त्यावरून समजून येतो तोः—इ. सन १७४२ त दर कंपनी रुपयास तांदूळ, ८४। कुडव; डाळ, ८४॥ कुडव; तूप वजनी, ८८६॥ शेर; तेल, ८।९ शेर; सुपारी, ८।९ शेर; नारळ, ४०. इ. सन १८०७ त दर कंपनी रुपयास तांदूळ, ८३ कुडव; डाळ, ८२॥ कुडव; नाचणे, ८७ कुडव; मीठ, ।२ कुडव; तूप वजनी, ८८५ शेर; तेल, ८८८ शेर; साखर, वजनी ८८५ शेर; सुपारी, ८॥ मण; खडीसाखर, ८८२॥। शेर; नारळ, ४६; कागद (उत्तम), ७० ताव; याप्रमाणें बाजारभाव होता.

किरकोळ माहितीः—पूर्वी मक्त्याच्या मामलती, मनसुबदारी वगैरे जागा मिळविण्यासाठीं राजेसाहेबांस नजराणा देणें हें एक साधन होतें. रामचंद्र महादेव वैद्य हवालदार हा मनसुबदारीचे कामावर असतां इ. स.

१८३७ त त्याजवर सरकारची इतराजी होऊन त्यास कमी केलें; तेव्हां ती जागा आपणास परत मिळण्यासाठीं राजेसाहेबांस २५० रुपये नजराणा देण्याचें ठरवून ती रक्कम उभी करण्यासाठीं त्यानें आपलें एक ७। भरे भात उत्पन्नाचें शेत विकलें. पुढें ज्याच्याकडे हा व्यवहार केला होता, तो मनुष्य बंडांत सांपडून कैद झाल्यामुळें त्याचा हेतू सिद्धीस गेला नाहीं नोकरलोकांनीं मक्त्याच्या मामलती करूं नयेत, लिलांवांत लास ठेऊं नये, मक्त्यांत भागीदार होऊं नये, व्यापार करूं नये; असे नियम होते. गहाण खरेदी व्यवहाराबद्दलचे दस्तऐवज गांवकर कुळकर्णी यांच्या जाणवीनें करावे लागत; आणि त्यासाठीं खरेदी व्यवहारांत रकमेच्या शेंकडा ५ रु. व गहाण व्यवहारांत रकमेच्या शेंकडा २॥ रु. हांशील द्यावें लागे.

भाग ६ वा.

भोंसले राजघराण्याची स्वतंत्र कारकीर्द (पुढें चालू).

चवथे खेम सावंत [बापूसाहेब]

इ. सन १८३८-६७.

ब्रिटिश सरकारानें या संस्थानचा राज्यकारभार हातीं घेतल्यानंतर तो चालविण्यासाठीं मि० रिचर्ड स्पूनर यांची पोलिटिकल सुपरिंटेन्डेंटच्या जागीं नेमणूक केली. त्यावेळीं मूळ कारभारी मोरो कृष्ण लेले हे त्यांचे मदतगार होते. स्पूनरसाहेब यांनीं खालसा मुलुखांतील पद्धतीस अनुसरून वसुलाची व खर्चाची शिस्त लाविली; नोकरलोकांचा मुशाहिरा व इतर देणग्या परभारें देववीत, ती चाल बंद करून सर्व वसूल खजिन्यांत रोख जमा करावा, व मुशाहिरा वगैरे खजिन्यांतून रोख द्यावा अशी व्यवस्था केली. वसुलांत लबाडी होऊं नये, ह्मणून त्याचे रुजुवातीसाठीं गांवगन्ना कारकून नेमिले; खर्चांत काटकसर व्हावी व त्यांत नेमस्तपणा रहावा, ह्मणून त्याचें अंदाजपत्रक तयार केलें; व लोकांचें जीवित व मालमत्ता यांचें रक्षण होण्यासाठीं जागोजाग पोलीस ठेविले.

थोड्याच दिवसांनीं ह्मणजे ता. ६ नोव्हेंबर सन १८३८ रोजीं एक मोठें बंड झालें. या बंडाचा पुढारी खासाकिलांपैकीं आत्मो चौकेकर हा होता. ह्मणून तें आत्मो चौकेकराचें बंड या नांवानें प्रसिद्ध आहे; चौकेकर यानें राम सावंत व शिवा सावंत तिरवडेकर व बापू पालयेकर यांस मदतीस घेऊन वर लिहिलेल्या दिवशीं सकाळीं एक घटका दिवसास १०० लोकांनिशीं मोरो कृष्ण लेले यांच्या घरावर हल्ला केला. लेले यावेळीं संध्या करीत बसले होते. त्यांस बंडवाल्यांनीं पकडून कोटांत नेलें व त्यांस सदरेवर बसवून तेथें त्यांच्यावर पहारा ठेविला. बापूसाहेब या वेळीं निजलेले होते. ते हा गलबला ऐकून जागे झाले; व चौकशी करितां त्यांस लेले कारभाऱ्यांस पहाऱ्यांत आणून ठेविल्याचें वर्तमान समजलें. पुढें बंडवाल्यांनीं जबरीनें कोठीचीं कुलुपें तोडून आपल्या जमावाच्या लोकांस त्यांतील धान्य वांटिलें. नंतर त्यांनीं लेले यांस सदरेवरून काढून जवळच्या एका खोलींत कोंडून ठेविलें. नंतर बंडवाले बापूसाहेबांकडे जाऊन त्यांस भेटले; व तुह्मांस गोमांतकीं नेणार, निघण्याची तयारी करावी असें त्यांनीं त्यांस सांगितलें; आणि दरवाजावर आपले लोक ठेवून ते आपल्या जमावांत परत गेले. थोड्या वेळानें बापूसाहेब हे देवदर्शनाच्या निमित्तानें जाऊन लेले यांस भेटले. नंतर सरकारानें पोत्याच्या माडीवर, दसरचे माडीवर व सदरेवर थोडथोडे लोक ठेवून बंदोबस्त केला. संध्याकाळीं सहा वाजण्याच्या सुमारास अशी बातमी उठली कीं, बंडवाले कारभाऱ्याचा खून करून बापूसाहेब व आनासाहेब यांस घेऊन पळून जाणार. दुसऱ्या दिवशीं सकाळीं स्पूनर साहेबांनीं लोकांची जमवाजमव करून ते सकाळीं सहा वाजतां मुशीच्या दरवाजावर आले. तें पहातांच बंडवाले आर्काच्या दिंडीनें पळून जाण्याचा प्रयत्न करूं लागले. त्यांस स्पूनर साहेबांनीं अडवून बंडवाल्यांतील मुख्य पुढारी राम सावंत व शिव सावंत तिरवडेकर आणि बाबू पालयेकर यांस पकडून कैद केलें. आत्मो चौकेकर व दुसरे कांहीं बंडवाले कोटाच्या तटावरून तळ्यांत उडी टाकून पळून गेले.

नंतर बंडवाल्यांपैकीं कैद केलेल्या असामींची चौकशी केली. बापू-

साहेबांचें मत संस्थानच्या रिवाजाप्रमाणें बंडांतील पुढारी मनुष्यांचे हातपाय काढावे, असें होतें. परंतु पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांनीं ब्रिटिश कायद्याच्या धोरणानें तिन्ही पुढाऱ्यांस जन्मठेपेची काळ्या पाण्याची शिक्षा दिली; चौदा असामींस त्यांच्या अपराधांप्रमाणें शिक्षा देऊन अमदाबाद येथें तुरुंगांत पाठविले; व बाकी बासष्ट असामींस जामीन घेऊन सोडून दिलें.

पुन्हा चौकेकर यानें भोजसावंत माणगांवकर यास मदतीस घेऊन व गोवें अमलांतील व वाडी संस्थातांतील कांहीं लोक गोळा करून ता. १९ डिसेंबर सन १८४८ रोजीं हनुमंतगड किल्ला घेतला; व वाडीचा कोट घेण्यासाठीं वाडीनजीकचीं मेटें धरून मार्ग बंद केला. तेव्हां पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांनीं त्यांजवर लोक पाठऊन बंडांतील पुढारी अत्मो चौकेकर व दुसरे अठरा असामी यांस पकडून आणिलें. बंडांतील दुसरा पुढारी भोजसावंत यास पकडण्यासाठीं लोक पाठविले होते, त्यांची व भोनसावंत याची गोळागोळी होऊन तो मारला गेला. नंतर कैद केलेल्या असामींची चौकशी करून बापूसाहेब यांजकडे शिक्षेचा अभिप्राय विचारला. त्यांचें मत, बंडांतील पुढाऱ्यांपैकीं सदाशिव रामचंद्र जोशी हा ब्राह्मण असल्यामुळें संस्थानांतील चालीप्रमाणें देहांत शिक्षा देतां येत नाहीं. त्यास जन्मठेपेची व बाकीच्या पुढाऱ्यांस फांशीची शिक्षा द्यावी, बाकी बंडास सामील असलेल्या लोकांपैकीं कांहीं असामींचा एकएक हात व एकएक पाय काढावा, व उरलेल्या सर्व असामींस कैदेची शिक्षा द्यावी; असें होतें. पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांनीं या बंडांतील लोकांसहि ब्रिटिश कायद्याप्रमाणें काळ्या पाण्याची व बाकी लोकांस कैदेची शिक्षा देऊन निकाल लाविला.

तसेंच दुसरा प्रसिद्ध बंडवाला फोंड सावंत तांबूळकर व त्याचे मुलगे हे छपून राहून लोकांस वरचेवर त्रास देत असत. त्यांच्यासाठीं स्पूनर साहेब यांनीं असा जाहीरनामा काढिला कीं, जर ते हजर होऊन सरकारच्या स्वाधीन झाले, तर त्यांस मागील अपराधांबद्दल पूर्ण माफी देण्यांत येईल, त्याप्रमाणें फोंड सावंत व त्याचे सात मुलगे हजर झाल्यानंतर, त्यांपैकीं चार असामींनीं आळीपाळीनें वाडींत राहावें व बाकीच्या चार असामींनीं कलंबिस्त येथें राहून वतनाची व्यवस्था करावी; परवा-

नगीशिवाय बाहेर कोठें जाऊं नये, रयतेपासून दस्तऐवज लिहून घेतले असतील त्यांचा पैसा वसूल करूं नये; अशा अटींवर त्यांस चांगली नेमणूक करून दिली.

नंतर स्पूनर साहेबांनीं निरनिराळ्या खात्यांत सुधारणा करण्याचे प्रयत्न सुरू केले. किल्ल्यांत व इतर ठिकाणीं थोडथोडे लोक होते, त्यांस कमी करून वाडींत स्वतंत्र पलटण (लोकलकोर) ठेविली; व तींतील शिपायांस कवायतीचें शिक्षण देण्यासाठीं एका युरोपियन अंमलदाराची नेमणूक केली. लोकांस शिक्षण देण्यासाठीं एक शाळा स्थापन केली (ता. १२ नोव्हेंबर सन १८३९). या शाळेंत मोडी बालबोध लिहिणें वाचणें, व्याकरण करणें, गणीत व बीजगणीत हे विषय शिकवीत असत. थोड्याच दिवसांत शाळेंतील मुलांची संख्या ९० पर्यंत झाली. त्यांत २२ ब्राह्मण जातीचे, ११ वाणी व बाकी इतर जातीचे मुलगे होते. एकाच वर्षांत हीं संख्या १२० पर्यंत वाढली. 'पाटदाम' म्हणून कर घेत असत, तो बंद केला. पत्रांची नेआण करण्यासाठीं पोस्टखात्याची स्थापना केली. यावेळीं पोस्टाचें हांसील पैशाच्या रूपानेंच घेत असत; व तें पत्र पाठविण्याच्या स्थलाच्या अंतराप्रमाणें कमजास्ती द्यावें लागे. ठाण्याहून आलेल्या एका पत्राचें हांसील एक रुपया नऊ आणे पडलें, असा त्यावेळचा एक दाखला सांपडतो. पलटणींतील लोकांची शुश्रूषा करण्यासाठीं व लोकांस मोफत औषधें मिळण्यासाठीं त्यांनीं दवाखान्याची स्थापना केली. अशा अनेक सुधारणा यांच्या व्हानशा कारकीर्दींत झाल्या.

हा वेळपर्यंत राज्यकारभाराचें बहुतेक काम बापूसाहेब यांच्या सल्ल्यानेंच चालत असे; परंतु कांहीं दिवसांनीं त्यांनीं कामांत मन घालण्याचें सोडून दिलें. पुढेंपुढें ते पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांचीं भेटही घेईनातसे झाले. पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांनीं भेट घेण्यासाठीं पुष्कळ प्रयत्न केले व कित्येक पत्रेंही पाठविलीं; परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. नंतर थोड्याच दिवसांनीं म्हणजे इ. सन १८४० च्या मे महिन्यांत स्पूनर साहेब बदलून गेले; व त्यांच्या जागीं मि. विलयम कोर्टनी हे पोलिटिकल सुपरिंटेंडेंट होऊन आले.

कोर्टनी साहेबांनीं राजेसाहेब यांनीं कारभारांत मन घालावें, म्हणून

पुष्कळ खटपट केली. मुंबई सरकारास लिहून त्यांजकडूनही राजेसाहेबांस थैलीपत्रें आणविलीं; परंतु राजेसाहेबांनीं तिकडे लक्ष्य दिलें नाहीं. त्याचें ह्मणणें, पाटदाम कर घेण्याचें बंद केलें तें योग्य नाहीं, तो कर पुन्हा सुरू करावा; व मोरो कृष्ण लेले यांस कारभारांतून कमी करावें; असें होतें. गरीब लोक अडचणीच्या वेळीं पाट लावितात, अशा लोकांपासून कर घेणें पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांस आवडत नव्हतें. तरी तो पुन्हा सुरू करण्याचें त्यांनीं कबूल केलें; परंतु लेले कारभारी यांस कमी करण्यासाठीं योग्य कारण समजल्यावांचून कारभारांतून काढण्याचें त्यांस कबूल करितां येईना. राजेसाहेबांस तर या गोष्टीला कारण देतां येईना.. शेवटीं त्यानीं कारभारांतून मन घालण्याचें सोडून दिलें तें दिलेंच.

कोर्टनी साहेबांनीं राज्यव्यवस्थेंत पुष्कळ सुधारणा केली. दिवाणी फिर्यादींचा इनसाफ करण्यासाठीं तिरायत–कोर्टाची स्थापना करून विनाकारण पुष्कळ दावे होऊं नयेत, ह्मणून कांहीं फी घेण्याचें ठरविलें. हें फीचें प्रमाण दाव्याच्या रकमेवर चार आण्यापासून बारा हजार रकमेपर्यंत ठरविलें होतें. वसुलाच्या सोईसाठीं संस्थानचे तीन भाग करून प्रत्येक भागावर कमाविसदार नांवाचा एकेक मुलकी अंमलदार नेमिला (ता. १ सप्टेंबर सन १८४३). व त्यांसच 'पोलीस अंमलदार' असा हुद्दा देऊन चोरी, मारामारी अशा फौजदारी फिर्यादींचा इनसाफ करण्याचेंही काम सांगितलें. सती जाण्याची असलेली वहिवाट जाहिरनामा प्रसिद्ध करून बंद केली. देवींपासून अपघात होऊं नये, ह्मणून देवी डाक्टर नेमून गोस्तन देवी काढण्याची व्यवस्था केली.

इ. सन १८४४ त एक मोठें भयंकर बंड उत्पन्न झालें. या बंडाचा मूळ उगम कोल्हापूर संस्थानांत झाला. तेथील कारभारी दाजी कृष्ण पंडित आणि सामानगड किल्ल्यावरील गडकरी यांचें भांडण होऊन त्यांनीं बंड केलें. तें बेळगांवाहून कर्नल वॉलेस यानें जाऊन मोडलें. नंतर भूधरगडकऱ्यांनीं बंड केलें. त्याचा बंदोबस्त करण्यासाठीं जनरल डी ला मोटी हा गेला. भूधरगडकऱ्यांनीं त्याजबरोबर युद्ध वगैरे न करितां किल्ला त्याच्या स्वाधीन केला. तथापि कोल्हापूरसंस्थानांत शांतता न होतां जिकडेतिकडे बंडाळी

सुरू होतीच; व या संस्थानांत ब्रिटिश लोकांनीं केलेल्या बंदोबस्तामुळें ज्यांस आपले अन्यायाचे हेतू साधण्यास अडचण आली, अशा कितीएक लोकांचीं मनें दूषित झालीं होतीं. तेव्हां कदाचित् इकडे बंड उत्पन्न झाल्यास त्याचा बंदोबस्त करण्यासाठीं आणि कोल्हापूरचे बंडवाले इकडे आल्यास त्यांस इकडे आश्रय मिळूं नये अशी व्यवस्था करण्यासाठीं, तसेंच रांगणा व मनोहरगड या किल्ल्यांमधील हालचाल पाहतां यावी, म्हणून सावंतवाडी लोकलकोरचा अंमलदार मेजर बेनबो याच्या हाताखालीं सैन्याची एक टोळी देऊन हनुमंतघाटाच्या पायथ्याशीं नेरूर येथें छावणी देऊन राहण्यासाठीं त्यास पाठविलें. थोड्याच दिवसांनीं कोल्हापूर संस्थानांतील कितीएक बंडवाले मनोहरगडास आले; व त्यांस संस्थानांतील प्रसिद्ध बंडवाले फोंडसावंत व त्यांचे मुलगे जाऊन मिळाले. नंतर ता. १० अक्टोबर सन १८४४ रोजीं रात्रीं ते किल्ल्याखालीं उतरून गोठोस गावांत शिरले. तेथें त्यांनीं मनोहरगडचा सबनीस व गोठोसचा कुळकर्णी घन:शाम कृष्ण गोठोसकर याच्या घरावर हल्ला करून त्याच्या ताब्यांतील सरकारी व खासगी कागदपत्र जाळून टाकिले; व त्याच्या एका भावास घेऊन ते गडावर परत गेले. याप्रमाणें या बंडाचा आरंभ झाला. ही गोष्ट जेथें घडली, तेथून लोकलकोरची छावणी फक्त तीन मैलांवर होती.

बंडवाल्या लोकांचें हें धाडस पाहून, बंडापासून रयतेचें रक्षण करण्यासाठीं चांगले उपाय योजणें पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांस अवश्य वाटलें. त्यांनीं मेजर बेनबो यांस विचारून असें ठरविलें कीं, याउपर सदर स्टेशनमधून सैन्याच्या टोळ्या बाहेर न पाठवितां, इतर उपायांनीं बंड मोडण्याचा प्रयत्न करावा; मात्र पारपोली येथील टोळीच्या मदतीसाठीं थोडे लोक पाठवावे.

ता. ११ अक्टोबर रोजीं रात्रीं मनोहरचे गडकरी २०० दांडगे असामी बरोबर घेऊन पुन: खालीं उतरले; आणि दुकानवाडी (नेरूर) येथें सावंतवाडी लोकलकोरचा एक जमादार, कांहीं लोकांनिशीं तळ देऊन होता, त्याजवर त्यांनीं हल्ला केला. हा हल्ला जमादारानें मागें हटविला.

इकडे सैन्याची जमवाजमव करण्यासाठीं पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांनीं

सनदकरी व इतर हत्यारबंद लोक यांस हजर होण्यासाठीं कळविलें; परंतु त्यांपैकीं बऱ्याच लोकांचें मन असंतुष्ट असल्यामुळें थोडेच लोक हजर झाले.

ता. १३ अक्टोबर रोजीं मेजर बेनबो यानें रांगणा व मनोहरगड येथील गडकऱ्यांवर चाल केली. यावेळीं मनोहरगडावर सुमारें ५०० व रांगण्यावर ७०० गडकरी होते. रांगण्यांतील गडकऱ्यांनीं ह्यावेळपर्यंत संस्थानाविरुद्ध कोणतेंच कृत्य केलें नव्हतें; तथापि ते मनोहर येथील गडकऱ्यांस गुप्तपणें मदत करीत असत. जेव्हां मेजर बेनबो यानें त्यांजवर चाल केली तेव्हां ते एकदम मनोहरगडावरील लोकांस जाऊन मिळाले; व ते दोघे एकत्र होऊन मेजर बेनबो यास चारी बाजूंनीं भीति दाखवूं लागले. तेव्हां वाडीहून पन्नास लोकांची टोळी मेजर बेनबो यांच्या मदतीसाठीं पाठविली; आणि वेंगुर्ल्याहून पलटण आणविणें जरूर वाटल्यास, सूचना मिळतांच निघून येण्याची तयारी ठेवण्याविषयीं लेफ्टनंट कर्नल वायली यांस कळविलें.

यानंतर संस्थानांत जिकडे तिकडे बंडाळी सुरू झाली. तारीख ३० आक्टोबर रोजीं हत्यावंद लोकांच्या एका टोळीनें सासोली येथें कांहीं गाड्यांवर हल्ला करून दोन गाडीवाल्यांस ठार मारिलें; व लष्करी सामान असेल अशा समजुतीनें कांहीं दारूचीं पिपें फोडून टाकिलीं. पुन्हां गडकऱ्यांनीं दुकानवाडीवर हल्ला करून तेथील लोकांस धमकी दिली; व पुष्कळ धान्य लुटून नेलें. यावेळीं लोकलकोरची टोळी तेथून वाडीस आणविलेली होती. तेव्हां सावंतवाडी लोकरकोरमधील लेफ्टनेंट प्राइस याला तावडतोब ओरोस येथें जाऊन तेथून आपलें सैन्य, घेऊन दुकानवाडी येथें जाण्यासाठीं पाठविलें; व बंडाची एकंदर हकीगत कोल्हापूर येथें असलेला कर्नल औट्रम यास कळण्यासाठीं बेळगांव येथील पोलिटिकल एजंटास कळविलें.

फोंडसावंत यानें या बंडास चांगलें स्वरूप यावें, ह्मणून युवराज आनासाहेब यांस पळवून नेण्याची तजवीज केली. यावेळीं आनासाहेब यांचें वय सोळा वर्षांचें होतें; व त्याला बंडांत नेण्याविषयीं बापूसाहेब यांची कनिष्ठ बायको जानकीबाई हिची खटपट चालू होती. तिला असें वाटत होतें कीं, आनासाहेब बंडांत गेला ह्मणजे त्याचा गादीवरील हक्क

दूर होऊन तो आपल्या मुलास मिळेल. या मसलतीसाठीं फोंड सावंताच्या लोकांच्या व तिच्या बारंवार भेटीहि होत असत. त्या मसलतीप्रमाणें फोंड सावंत यानें आनासाहेबांकडे आपले लोक पाठवून, बंडांत सामील झाल्यापासून तुमचें वैभव वाढेल, असें सांगून त्यांचें मन वळविलें; व त्याप्रमाणें तारीख १६ नोव्हेंबर दिवशीं रात्रीं आनासाहेब, फोंड सावंताचा मुलगा बाबादेसाई यास जाऊन मिळाले. नंतर ते मनोहरगड येथें जाऊन पोहोंचले. आनासाहेब किल्ल्यामध्यें जाऊन पोहोंचतांच त्यांच्या सन्मानार्थ तोफांची सलामी दिली. तो आवाज वाडींत स्पष्टपणें ऐकूं येत होता.

दिवसेंदिवस बंडास अधिकाधिक उग्र स्वरूप येत चालल्यामुळें, बाहेरची मदत मागणें आवश्यक झालें. यावेळीं मेजर बेनबो हा बाहेर कामगारीवर होता. त्याला आनासाहेब बंडांत गेल्याचें कळवून वाडीस येण्याविषयीं ताबडतोब लिहिलें. त्याप्रमाणें मेजर बेनबो हा ता. १७ नोव्हेंबर रोजीं संध्याकाळीं वाडींत येऊन पोहोंचला. त्याच रात्रीं वेंगुर्ल्याहून क्याप्टन ह्यूम याच्या हाताखालील दहाव्या पलटणीची एक तुकडीही येऊन दाखल झाली. शिवाय मद्रासच्या सोळाव्या पलटणींतील ६० लोकांची एक टोळी मेजर बेनबो याच्या मदतीसाठीं पूर्वींच आली होती. अशा रीतीनें शहराचें संरक्षण करण्यास बरीच फौज जमा झाली.

तारीख १९ नोव्हेंबर रोजीं अशी बातमी आली कीं, फोंडसावंत वगैरे लोक घांटाखालीं मजबूत ठिकाणीं राहिलेले आहेत; व खेड्यांत जाण्यायेण्याच्या पायवाटा त्यांनीं अडविलेल्या आहेत; आणि भूधरगड किल्ल्यांतून आलेले २००, शिवाय गोव्याच्या हद्दीवरील कांहीं लोक व मनोहरचे गडकरी मिळून त्यांचा जमाव १००० आहे. यामुळें भरपूर मदत मिळाल्याशिवाय त्यांजवर चाल करून जाण्याचा उपाय नव्हता. ह्मणून मेजर बेनबो यास आणखी कांहीं मदत येईपर्यंत स्वस्थ रहावें लागलें. त्याच दिवशीं रात्रीं बंडवाल्यांची एक मोठी टोळी बंदुकांचे आवाज काढीत व रणवाद्यें वाजवीत वाडीच्या दरवाजापर्यंत येऊन

पोहोंचली; व शहराच्या रक्षणासाठीं राहिलेल्या सैन्याला त्यांनीं बराच त्रास दिला. नंतर लोकलकोरच्या लोकांनीं त्यांस हांकून लाविलें तेव्हां त्यांनीं पळ काढून आपल्या डोंगरी किल्ल्यांची वाट धरिली.

तारीख २२ नोव्हेंबरच्या सुमारास क्याप्टन स्किपर याच्या हाताखालील २०० लोकांची एक टोळी कलंबिस्ताच्या पूर्वेस तीन चार मैलांवर सांगेली येथें ठाण्यावर राहण्याकरितां मेजर बेनबो याच्या हुकुमावरून जात असतां, बंडवाल्यांच्या एका मोठ्या टोळीनें तिच्यावर हल्ला केला. या टोळींत फोंडसावंत यांचे मुलगे स्वतः होते. कांहींवेळ लढाई झाल्यावर स्किपर यास मागें पळावें लागलें. त्याचे लोकांपैकीं तिघेजण मेले व २२ जखमी झाले. बंडवाल्यांपैकींहि चार असामी ठार झाले व ३० असामी जखमी झाले. यावेळीं बंडवाल्यांबरोबर चार लहान तोफा होत्या. या पराभवाची बातमी सावंतवाडी येथील त्यावेळचा मुख्य अंमलदार क्याप्टन ह्यूम यास समजली. तेव्हां त्यानें सातव्या पलटणींतील लेफ्टनंट बेट याच्या हाताखालीं २०० लोक देऊन त्याला क्याप्टन स्किपरच्या मदतीसाठीं पाठविलें. इतकी मदत मिळाली तरीसुद्धां, त्यास सांगेलीहून येऊन मांडखोल येथें तळ देऊन रहावें लागलें.

नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस बंडवाल्यांनीं आनासाहेबांच्या सहीनें आपल्या पगारासाठीं गांवांवर चिठ्या पाठविल्या; आणि मनोहर व माणगांव तर्फेतील कित्येक गांवांचा वसूल त्यांनीं बळजबरीनें घेतला.

थोड्या दिवसांनीं बंडवाल्यांनीं सावंतवाडीच्या पलटणींतील लोकांस फितूर करण्याचा प्रयत्न चालविला. त्यांनीं पलटणचे जमादार व सुभेदार यांजकडे आपले लोक पाठवून त्यांस त्यांच्या हाताखालील लोकांसह आपल्यास येऊन मिळण्यासाठीं पराकाष्ठेनें सांगून पाहिलें; परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. यासंबंधानें फोंडसावंताचा मुलगा तानसावंत उर्फ बाबादेसाई यानें सुभेदाराच्या नांवें पाठविलेलें पत्र सुभेदारानें मेजर बेनबो याच्या स्वाधीन केलें. ह्या त्याच्या इमानीपणाबद्दल सरकारानें त्यास ३०० रु., व प्रत्येक जमादारास १३० रुपये अशीं बक्षिसें दिलीं. याच वेळीं सावंतवाडी पलटणींत २०० लोक जास्ती ठेविले. असें करण्याचा

हेतू असा होता कीं, एक तर संस्थानांतील लायक मनुष्यांस बक्षीस द्यावें; व जे तरुण लोक बेकार असल्यामुळें बंडवाल्यांस जाऊन मिळण्याचा संभव होता, त्यांस नोकरींत गुंतवून टाकावें. या लोकांवर आणखी एक युरोपियन अंमलदारही नेमिला.

सन १८४९ त जानेवारीमहिन्याच्या आरंभास सर्व संस्थानामध्यें जिकडे तिकडे बंडवाले पसरले. अगदीं लष्करी ठाण्यानजीकसुद्धां जीविताचें व मालमत्तेचें रक्षण होणें दुरापास्त झालें; व बरोबर हत्यारबंद लोक असल्यावांचून कोठेंही जातां येईना. त्याचें एक उदाहरण असें घडलें कीं, दोन तरुण अंमलदार बेळगांवाहून वेंगुर्ल्यास घोडेस्वार बरोबर घेऊन जात असतां बांद्यापासून सुमारें एक कोसावर जंगलामध्यें लपून राहिलेल्या बंडवाल्यांनीं त्यांजवर गोळ्या घातल्या. त्यापासून त्यांपैकीं एकास प्राणांतिक जखम होऊन तो त्याच दिवशीं संध्याकाळीं मरण पावला.

या प्रदेशांत जिकडे तिकडे दाट जंगल पसरलेलें असल्यामुळें त्यांत लपून राहण्याची बंडखोर लोकांस उत्तम सोई होती; आणि त्यामुळें त्यांचा नाश करणें फार कठीण झालें. बंडाचा जास्त प्रसार होऊं नये, म्हणून सारखे प्रयत्न सुरू होते. गांवकर, कुळकर्णी, व फौजदार, यांनीं एकत्र जमावें व आपल्या खेड्यांतील कोणी असामी गैरहजर होतील, तर त्याच्याबद्दल तपास ठेवावा, सर्व हत्यारें हजर करून घ्यावीं, व शक्य तितकें आसपासचें जंगल तोडून टाकावें असे हुकूम सोडिले. तसेंच हत्यारबंद दरोडेखोरांस पकडण्यासाठीं दरमहा चारचार रुपये पगाराचे प्रत्येकीं ५० लोक ठेवण्याविषयीं बांद्यांचा सुभेदार व बाबुराव राणे या दोन विश्वासू सरदारांस जानेवारी महिन्यांत अधिकार दिला; व त्यांनीं अनुक्रमें बांदें व कुडाळ येथील कमाविसदारांकडे काम करावें असें ठरविलें. त्याच महिन्याच्या १४ व्या तारखेस सरकारच्या अधिकाराखालीं लष्करी कायदा सुरू करण्यांत आला. याच वेळेस असाही एक जाहीरनामा प्रसिद्ध केला कीं, फोंडसावंताच्या घराण्यांतील मनुष्यें, बंडामध्यें पुढारी म्हणून प्रसिद्धीस आलेले लोक, तसेंच पूर्वीं घडलेल्या निर्दय कृत्यांमध्यें

ज्यांचें आंग होतें, असे असामी खेरीज करून बाकीचे जे कोणी लोक बंडवाल्यांस सोडून आपापल्या घरीं आपला धंदा करून स्वस्थ राहतील, त्यांस पूर्वींच्या सर्व अपराधांची माफी देण्यांत येईल.

सरकारानें बंडाचा मोड करण्यासाठीं जनरल डे ला मोटी व लेफ्टनेंट कर्नल औट्रम यांची नेमणूक केली. जनरल डे ला मोटी हा आपल्या सैन्याचा मुख्य भाग घेऊन हनुमंत घाटाच्या माथ्यावर छावणी करून राहिला. लेफ्टनेंट कर्नल कारुथर्स सो. बी. याची तुकडी हनुमंत घाटाच्या पायथ्याशीं व कर्नल वॅालेस याची तुकडी शिवापुरावर असलेल्या एका टेंकडीच्या शिखरावर ठेवण्यांत आली. कर्नल औट्रम हा आपलें सैन्य बरोबर घेऊन ता. १६ जानेवारी रोजीं कलंबिस्तावर चाल करून गेला. तसेंच कर्नल वॅालेस हा आपण तळ दिलेल्या टेंकडीवरून शिवापुरांत गोळ्या मारून तेथें असलेल्या बंडवाल्यांस त्रासवून सोडीत होता.

याच महिन्याच्या मध्याच्या सुमारास कोल्हापूर संस्थानांतील सामान गडावरील प्रसिद्ध बंडवाला सुभाना निकम हा बेळगांवाहून इंग्रजांच्या कैदेंतून पळून या बाजूला आला. त्याला बंडवाल्यांनीं ब्रिटिश सरकारच्या मुलुखांत बंडाचा बावटा उभारण्यासाठीं आणि तेथील लोकांच्या मनांत इकडील बंडवाल्यांविषयीं सहानुभूति उत्पन्न करण्यासाठीं मालवणच्या बाजूस पाठविलें. त्यानें सर्व पुढारी हिंदूंनीं आपल्यास येऊन मिळावें, नाहींतर त्यांस भयंकर शिक्षा केली जाईल, अशा मजकुराचे कोल्हापूरसरकारच्या नांवें कांहीं जाहिरनामे लाविले. या प्रयत्नानें कित्येक असंतुष्ट लोक त्याला येऊन मिळाले.

याच सुमारास या संस्थानच्या उत्तर भागांत दाजी लक्ष्मण काळे या नांवाच्या एका मनुष्यानें बंडवाल्यांच्या एका टोळीचा पुढाकार घेऊन संस्थानांतील कांहीं गांवांतला सरकारास मिळणारा वसूल लोकांपासून जबरीनें घेतला; इतकेंच केवळ नव्हे तर, पूर्वीं या संस्थानच्या अमलाखालीं असलेल्या वराड तर्फेतील इंग्लिश सरकारच्या ताब्यांतील खेड्यांचासुद्धां वसूल घेण्यासाठीं त्यानें आपले लोक पाठविले. काळे हा पूर्वीं आनासाहेबांकडे खासगी नोकर होता.

याप्रमाणें जिकडे तिकडे अव्यवस्था माजली आहे अशी संधी पाहून दुसऱ्या लोकांसही बंड करण्यास हुरूप आला. हिरसावंत डिंगणेकर नांवाच्या एका मनुष्यानें कांहीं लोक जमवून रामघांट रस्त्यावरील भेडशी ठाण्यावर रोख धरिला. त्यास हेवाळकर व उसपकर देसाई येऊन मिळाले. देसाई यांचीं मनें सरकाराविषयीं दूषित होण्यास असें कारण झालें होतें कीं, ब्रिटिशसरकारानें कस्टमवरील आपले हक्क कमी केले, व आपल्या खेड्यांत फौजदार नेमण्याचा आपला हक्क नाहींसा केला अशी त्यांची कुरकुर होती. पोलिटिकल सुपरिन्टेंडेंट मि० कोर्टनी यांचें ह्मणणें, देसायांच्या खेड्यांतून जाणाऱ्या रामघांट रस्त्यावर व गोंव्याच्या सरहद्दी वर दरवडे पडून वाटसरांस जी भीति उत्पन्न होते, ती नाहींशी होण्या-साठीं प्रत्येक खेड्यामध्यें पोलीस नेमणें अवश्य आहे; याकरितां देसा-यांनीं फौजदार नेमण्यासाठीं इसम निवडून त्यांचीं नांवें कळवावीं; ह्मणजे आपण त्यांस सनदा देऊं, असें होतें. परंतु देसाई त्या गोष्टीस कबूल नव्हते. आपल्या गांवांतील पोलिसांचे अधिकारी आपण आहों असें ते ह्मणत. परंतु लोकांचें जीवित व मालमत्ता यांच्या सुरक्षितपणाबद्दल त्यांच्याकडून बंदोबस्त होईना. ह्मणून पोलिटिकल सुपरिन्टेंडेंट यांस त्यांच्या गांवांत फौजदार नेमणें भाग पडलें होतें. इतक्याच कारणानें देसाई बंडांत सामील झाले होते. शेवटीं मद्रासच्या आठव्या पलटणींतील मेजर लुकस यास त्यांच्यावर पाठविलें. त्यानें बंडखोरांनीं अजीबात बंद पाडलेल्या वाटा मोकळ्या करून त्या रस्त्याचें दळणवळण चालू केलें.

बंडखोरांचा नाश करण्यासाठीं जे अनेक उपाय चालू होते, त्यांत त्यांस युद्धसामग्रीचें सामान मिळूं नये ह्मणून बंड सुरू होतांच संस्था-नांतील दारूसामान तयार करण्याचे कारखाने बंद पाडण्याचाही प्रयत्न केला होता. तथापि गोंव्याची सरहद्द अगदीं जवळ असल्यामुळें तिकडून पुष्कळ युद्धोपयोगी सामान येत असे. शिवाय मनोहरगड येथील बंड-वाल्यांनीं शिवापूर व शिरशिंगें गांवांच्या जंगलांत स्वतःचा एक दारू तयार करण्याचा कारखाना ठेविला होता. त्यासाठीं लागणाऱ्या सामा-नाचा पुरवठा त्यांस देशावरून होत असे.

मनोहरगड किल्ल्यांतील बंडखोरांस हांकून देण्यासाठीं नेमलेल्या सैन्यापैकीं कर्नल वॉलेस याच्या तुकडीनें केलेल्या कुलपीगोळ्यांच्या भडिमारामुळें गडकरी अगदीं त्रासून गेले. तिकडन जनरल डे ला मोटी यानेंहि त्यांस बरेंच जेरीस आणिलें. त्यामुळें तारीख २६ जानेवारी दिवशीं रात्रीं फोंड सावंत व त्याचे मुलगे आणि इतर गडकरी आनासाहेबांस घेऊन किल्ला सोडून पळून गेले. दुसरे दिवशीं जनरल डे ला मोटी यानें मनोहर व मनसंतोष हे किल्ले ताब्यांत घेऊन तेथें आपले लोक ठेविले. कर्नल औट्रम याचें सैन्य बंडवाल्यांच्या पाठीस लागल्यामुळें ते गोव्याच्या सरहद्दीकडे पळून गेले. त्यांस उसपकर व हेवाळकर देसायांनीं आश्रय दिला; व ते देसायांच्या मदतीनें रामघांट रस्त्यावरील खेड्यांत बंडाळी करूं लागले व वाटसरांस लुटूं लागले. भेडशी येथें एक लहानसें लष्करचें ठाणें होतें, त्यास त्यांनीं वेढा दिला. परंतु कर्नल औट्रम याचें सैन्य आपल्यामागें आहे असें पाहून ते तेथून पळून गेले.

हेवाळकर देसायांनीं रामघांटाच्या पायथ्याशीं मुळस येथें एक चौकी वसविली; व बेळगांवाहून येणाऱ्या सैन्यास हरकत व्हावी ह्मणून रस्त्यावर खोल खंदक खणून ठेविले. उसपकरांनींहि मांगेलीच्या घाटांत तसेंच केलें. यामुळें जिकडे तिकडे घोंटाळा उडाला. शिवाय सरहद्दीवरील पोर्तुगीजांच्या आश्रयाखालीं असलेले बंडवाले या मुलुखांत येऊन लूट व अनेक प्रकारचीं जुलमी कृत्यें करीत असत. शेवटीं कर्नल औट्रम याच्या हाताखालील एका तुकडीनें बराच त्रास सोसून त्यांस हांकून लाविलें. तेव्हां ते गोवेंअमलांत पळून गेले.

फोंड सावंत व त्याचे मुलगे आणि आनासाहेब यांनीं मनोहरगड सोडिल्यावर नेतर्डे व मोप यांच्यामध्यें असलेल्या कोलबाग जंगलाचा आश्रय धरून राहिले. तेथून ते जोगसावंताची वाडी येथील दाट अरण्यांत गेले; व तेथून गोवें अमलाच्या पेडणें महालांतील वराव्डें गांवांत छपून राहिले (फेब्रुआरी १८४९). तेथें गोवें सरकाराकडून आपल्यास आश्रय मिळेल कीं काय याबद्दल गोवें सरकारच्या हुकुमाची वाट पहात ते बरेच दिवस राहिले होते.

तारीख १३ फेब्रुआरी रोजीं मुंबई सरकारच्या मंजुरीनें असा जाहिरनामा प्रसिद्ध केला कीं, फोंड सावंताचे तिघे मुलगे भीम सावंत ऊर्फ नानादेसाई, तान सावंत ऊर्फ बाबा देसाई व हनुमंत सावंत यांस जो धरून देईल, त्यास ३००० रुपयांचें व आपू देसाई व फोंड सावंत यांस धरून देणारास प्रत्येकीं १००० रुपयांचें अशीं बक्षिसें देण्यांत येतील. फोंडसावंत याचें वय यावेळीं ८० वर्षांहूनही जास्त होतें; तथापि तो अजूनही चांगला धट्टाकट्टा व मजबूत होता. आपू देसाई हा व्यसनी व दारूबाज होता. तरीसुद्धां या बंडवाल्यांतून एकासही धरून देण्याची कोणास छाती झाली नाहीं. शेवटीं ते सर्व गोवेंसरकारच्या आश्रयास जाऊन राहिले.

यानंतर जिकडे तिकडे थोडथोडी शांतता दिसूं लागली. कांहीं काळपर्यंत बंद असलेला वसूल मिळूं लागला. बंडवाल्यांस सामील झालेले बहुतेक लोक आपापल्या घरीं येऊन धंद्यास लागले. संस्थानामध्यें चोहींकडे शिपाई लोकांचीं ठाणीं बसविलीं. कर्नल औट्रम यानें बांद्याच्या पूर्वेस गोव्याच्या सरहद्दीजवळ तळ दिला; व जे बंडखोर गोव्यांत पळून गेले होते, त्यांचें व त्यांच्या आप्तांचें दळणवळण बंद पाडण्याकरितां आणि गोव्याच्या अधिकाऱ्यांवर शह देण्याकरितां, सरहद्दीवर त्यानें ब्रिटिश सैन्याच्या तुकड्या ठेविल्या.

बंडखोर इंग्लिश लोकांच्या आवांक्याबाहेर गोवेंअंमलांत जाऊन राहिल्यामुळें त्यांच्या संबंधानें गोवें सरकारचा हेतू काय आहे त्याचा तपास करणें भाग झालें. ह्मणून त्या विषयावर बोलणें करण्याकरितां, आणि वाडी संस्थानांतील बंडाळींत मदत करणाऱ्या आपल्या प्रजेबद्दल गोवेंसरकार काय तजवीज करणार, ते समजून घेण्याकरितां गव्हर्नरचा मिलिटरी सेक्रेटरी (सैन्यखात्याचा चिटणीस) क्याप्टन ऑर्थर यास दोन वेळ गोव्यास पाठविलें. परंतु गोवेंसरकाराकडून समाधानकारक असें कांहींच उत्तर मिळालें नाहीं.

इ. सन १८४५ च्या मार्च महिन्यांत मि० विल्यम कोर्टनी हे बदलून त्यांच्या जागीं मेजर लीग्रांड जेकब हे पोलिटिकल सुपरिंटेंडेंट होऊन आले.

मुंबईसरकाराकडून गेलेल्या सेक्रेटरीस गोवेंसरकाराकडून निश्चयात्मक उत्तर न मिळाल्यामुळें बंडखोरांस स्वाधीन करून घेण्याच्या बाबतींत गोवें सरकाराशीं पत्रव्यवहार करण्यासाठीं मुंबईसरकारानें मेजर जेकब यांस लिहिलें; परंतु त्याचाहि कांहीं उपयोग झाला नाहीं. ह्मणून यापुढें या बाबतींत गोवेंसरकाराबरोबर पत्रव्यवहार करण्याचें कारण नाहीं; असा मुंबईसरकारानें ता. १६ एप्रील सन १८४६ रोजीं ठराव केला. गोवें अमलांत पळून गेलेल्या लोकांची एकंदर संख्या १६१ होती. त्यांत सुमारें पंधरावीस असामी चांगले वजनदार होते.

गोवेंअमलांत कांहीं दिवस घालविल्यानंतर या बंडखोरांस वाडी संस्थानांत परत येण्याची इच्छा झाली; आणि इ. सन १८४७ च्या मे महिन्यापासून ते त्याविषयीं खटपट करूं लागले. त्यांनीं मोरो कृष्ण लेले यांच्यामार्फत मेजर जेकब यांच्या नांवें कांहीं कागद पाठविले. त्यांत हेवाळकर, उसपकर व तांबूळकर देसाई, हुमरसकर, बापू घाटगे यांचीं कांहीं पत्रें व दुसऱ्या ९२ इसमांचे अर्ज आपल्यास कृतापराधांची क्षमा मिळावी; असे होते. तसेंच आनासाहेब यांनीं आपला मामा आबासाहेब पाटणकर यांस आपल्यास अपराधांची क्षमा मिळून वाडीस परत येण्याची परवानगी मिळण्याबद्दल खटपट करण्याविषयीं एक पत्र लिहिलें. तेंही पाटणकर यांनीं पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांजकडे पाठविलें. तांबूळकर देसायांपैकीं फोंडसावंताचे दुसऱ्या बायकोचे मुलगे साबाजी, तातोबा, लाडोबा व भोजू यांचा मात्र अर्ज आलेला होता. पहिल्या बायकोच्या मुलांचें त्यांत आंग नव्हतें.

मेजर जेकब यांनीं या मागणीचा विचार करून ते सर्व अर्ज मुंबईसरकाराकडे पाठविले व आपलें मत कळविलें कीं, ज्यांनीं कोणत्याहि प्रकारचा जुलूम केलेला नाहीं अशा खालील दर्जाच्या अनुयायांवर थोडीशी मेहरनजर केल्यास, त्यापासून सार्वजनिक शांततेस धोका येण्याचा संभव नाहीं; तसेंच बंडाचा नांवाचा पुढारी जो तरूण युवराज तो कारस्थानी आणि पातकी अशा कलंबिस्तकर देसायांच्या तावडींत सांपडल्यामुळेंच एवढा परिणाम झाला. मुंबईसरकारास बंडवाले गोवेंसरकारच्या ताब्यांत

असेपर्यंत या गोष्टींचा निकाल करणें प्रशस्त वाटेना. तथापि त्यांनीं मेजर जेकब यांस असें कळविलें कीं, ज्यांनीं स्वतः कोणताहि घोर अपराध केलेला नाहीं, अशा खालील दर्जाच्या बंडवाल्यांवर मेहरनजर करण्याविषयीं आपण मुंबईसरकाराकडे शिफारस करूं, असें योग्य प्रसंग आल्यावर गोवेंसरकारास तुम्हीं कळवावें. याच वेळेच्या सुमारास गोवेंसरकारच्या आश्रयास आलेल्या वाडीच्या बंडखोरांस माफी देण्याविषयीं पोर्तुगाल सरकारानें इंग्लंडास ब्रिटिशसरकाराकडे लिहिलें. त्यावरून नोव्हेंबर सन १८४७ त मेजर जेकब यांस, बंडखोरांपैकीं कोणाकोणास माफी द्यावी, त्याबद्दल मुंबईसरकारानें मत विचारलें. मेजर जेकब यांनीं त्याबद्दल निवड करून, बंडवाल्यांपैकीं पुढारी फोंडसावंत, त्याचे दोन मुलगे नाना व हनुमंत देसाई, हिरसावंत डिंगणेकर, बाबा भोगटे, येसू कुबल, फटंभट, नाना तळगांवकर हे इसम खेरिजकरून बाकीच्या लोकांस, आणि त्याचप्रमाणें कांहीं अटींवर आनासाहेब यांस माफी द्यावी, असें आपलें मत कळविलें. यानंतर गोवेंसरकाराशीं थोडा पत्रव्यवहार होऊन आणि गोवेंसरकारचा चिटणीस मि० गोम्स व सावंतवाडी लोकलकोरमधील लेफ्टनेंट स्नायडर यांच्या मुलाखती होऊन शेवटीं जेकब साहेबांनीं शिफारस केलेल्या बंडखोरांस, पुढें चांगल्या रीतीनें वागूं अशी हमी घेतल्यावर, मागील सर्व अपराधांची माफी देऊन त्यांस वाडींत येऊन राहण्याची परवानगी दिली; व त्याप्रमाणें बंडवाले उसपकर व हेवाळकर देसाई व फोंडसावंताचे धाकट्या बायकोपासून झालेले चार मुलगे व त्यांचा नातू आत्माराम देसाई हे वाडी संस्थानांत येऊन राहिले. नंतर जेकबसाहेबांनीं त्या सर्वांस निर्वाहापुरत्या लहानलहान नेमणुका करून दिल्या व फोंडसावंताच्या मुलांस शिलेदार सदरांत नोकरी करण्याचें काम सांगितलें.

तसेंच युवराज आनासाहेब यांस; त्यांचा संस्थानच्या गादीवरील हक्क दूर करून दरमहा शंभर रुपये नेमणूक घेऊन त्यांनीं वाडींत येऊन राहावें अशी मोकळीक दिली; व त्याप्रमाणें ता. २१ आगष्ट सन १८४९ रोजीं ते सावंतवाडींत येऊन राहिले.

बंडांत गेलेले उसपकर देसाई आणि त्यांचे भाऊ परमेकर देसाई हे उ-

सप तर्फेतील खेड्यांत निमानिम भागदार होते परंतु उसपकर बंडास सामील झाल्यामुळें त्यांचे हक्क जप्त केले; आणि परमेकर देसायांनीं बंडांत सामील न होतां बंडखोरांशीं वैर उत्पन्न होण्याजोगीं कामें करून आपली राजनिष्ठा व्यक्त केल्याबद्दल त्यांस ते हक्क बक्षीस दिले. शिवाय परमेकर हे यावेळीं निपुत्रिक होते; ह्मणून त्यांस दत्तक घेण्याची परवानगी द्यावी असें सरकारानें ठरविलें. त्याचप्रमाणें माणगांव येथील सरदार सिदसावंत भोंसले तळीकर यांनीं बंडाचा मोड करण्यांत चांगली मदत केली, ह्मणून त्यांची सालीना९९० रुपये असलेली मेमणूक १२०० रुपये केली. अशा रीतीनें या भयंकर बंडाचा शेवट झाला. या बंडाच्या पायीं वाडी सरकारास सुमारें ४८९०६८ रुपये खर्च आला.

याप्रमाणें मुलखांत जिकडेतिकडे शांतता झाल्यावर मेजर जेकब यांनीं राज्यव्यवस्थेंत फेरफार करण्याकडे लक्ष्य दिलें. ऐनजिनसी गल्ला वसूल घेण्याची असलेली पद्धत मोडून सर्व वसूल नक्की घेण्याचें सुरू केलें. पीरखानी नाणें मोडून कंपनी नाण्यांत सर्व देवघेव व्हावी असें ठरविलें. प्रत्येक खात्याचें काम शिस्तवार चालण्यासाठीं नियम घालून दिले. विद्यावृद्धीस उत्तेजन दिलें. त्यानीं विद्यार्थ्यांस दरसाल इनामें देण्यासाठीं आपल्या खासगींतून कांहीं रक्कम दिली असून तिच्या व्याजांतून एक स्कालरशिप व कांहीं इनामें देण्याचें अद्याप चालू आहे. मेजर जेकब इ. सन १८५० च्या मे महिन्यांत कच्छ येथें बढतीच्या जागीं गेले, व हेन्री लेकन अंडरसन हे पोलिटिकल सुपरिंटेंडेंट झाले.

मि० अंडरसन यांनीं इ. सन १८५१ त संस्थानची पहिली खाने सुमारी केली. यावेळीं संस्थानची लोकवस्ती सुमारें १६००६५ होती. त्यांत ११२४२ ब्राह्मण, १३२८७० इतर हिंदु, २८३९ मुसलमान, १९६९ खिश्चन, १९१ शिद्दी व ८ ज्यू होते.

इ. सन १८५३ च्या मे महिन्यांत मि० अंडरसन हे बदलून त्यांच्या जागीं जॉन विल्सन ऑल्ड हे आले. यांच्यावेळीं पूर्वीची पोस्ट खात्याची व्यवस्था मोडून त्याऐवजीं सर्व हिंदुस्थानांत चालू झाल्याप्रमाणें या संस्थानांतही अर्ध्या आण्याचीं पोस्ट-तिकिटें सुरू झालीं; व लांबच्या जागीं पद्म

पाठविण्यासाठीं पुष्कळ हांशील पडे, तें बंद होऊन अर्ध्या आण्यांत हिंदुस्थानच्या कोणत्याही भागांत पत्र पाठविण्याची उत्तम सोयी झाली (इ. सन १८५४). मेजर ऑल्ड हे इ. सन १८५९ च्या जानेवारी महिन्याच्या अखेरीस बदलून त्यांच्या जागीं, क्याप्टन फ्रेडरिक स्नायडर हे सेकंड-इन-कमांडच्या जागीं होते, त्यांसच पोलिटिकल सुपरिंटेंडेंटच्या जागीं नेमिलें.

क्याप्टन स्नायडर यांनीं संस्थानच्या राज्यकारभारांत पुष्कळ सुधारणा केली; व त्यांच्याच वेळीं संस्थानच्या भरभराटीस सुरवात झाली. संस्थानास असलेलें बरेंच मोठें कर्ज त्यांनीं फेडून तिजोरींत शिल्लक पाडिली. नोकरलोकांचे पगार वाढविले. थोडथोडीं लोकोपयोगी कामें सुरू केलीं. विद्यावृद्धीस उत्तेजन दिलें; इंग्रजी शिक्षण देण्यासाठीं व मुलींस शिक्षण देण्यासाठीं वाडी शहरांत शाळा सुरू झाल्या; व मुलांच्या शाळांची संख्याही कांहीं वाढविली. यावेळचा शिक्षणक्रम मोडी व बालबोध लिहिणें-वाचणें, नकाशा पाहणें, व्याकरण करणें, गणीत, सिद्धांत व त्रिकोणमिती असा होता.

गादीचे मालक खेमसावंत ऊर्फ बापूसाहेब हे ता. ११ अक्टोबर सन १८६७ रोजीं निवर्तले. यावेळीं त्यांचें वय ६२ वर्षांचें होतें. त्यांस ३ बायका होत्या. पहिली लक्ष्मीबाई हीं पाटणकरांची मुलगी. तिच्यापासून मुलें तीनः—वडील मुलगी साहेबजी ही दादासाहेब घाटगे बुधकर झुंजारराव यांस दिली होती; दुसरे, युवराज आनासाहेब; तिसरी, बायामा ही नागोजीराव जांभुटकर यांस दिली होती. दुसरी बायको सावित्रीबाई, पाटणकरांची मुलगी, हिच्यापासून एकच मुलगा रामचंद्र सावंत ऊर्फ भाऊसाहेब हा होता. तिसरी बायको, जानकीबाई ही खानविलकरांची मुलगी. तिच्यापासून सोमसावंत ऊर्फ आबासाहेब व नारसावंत ऊर्फ बुवासाहेब असे दोन मुलगे होते. बापूसाहेब यांच्या नांवानें एकंदर ५६ वर्षें राज्यकारभार चालला. त्यांत १६ वर्षें त्यांनीं स्वतंत्रपणें राज्य केलें. स्नानसंध्या, देवदेवतार्चन, ईश्वरभक्ती यांतच त्यांचा बहुतेक वेळ जात असे. यामुळें राज्यकारभारांत ते विशेष लक्ष्य देत नसत. त्यांच्या नैसर्गिक भिड-

स्तपणामुळें कावेबाज लोकांकडून ते सहजच फसले जात असत.

यांच्या कारकीर्दीत पूर्णदास ऊर्फ बाबा उसपकर व बालाजी बुवा असे दोन साधुपुरुष प्रसिद्धीस आले. पूर्णदास हे जातीचे गौड सारस्वत ब्राह्मण असून उसप येथील कुळकर्णी होते. इ. सन १८३८ त संस्थानांत झालेल्या धामधुमीच्या वेळीं ते आपल्या बंधूबरोबर केरी येथें गेले. त्यांचा स्वभाव लहानपणापासून भाविक होता. इ. सन १८९८ त कपिलाषष्ठीचा योग आला होता; त्यावेळीं बाबा केरी गावीं स्नानास समुद्रतीरावर गेले होते. त्या ठिकाणीं त्यांस कोणाएका सिद्ध पुरुषानें दर्शन देऊन त्यांजवर अनुग्रह केला. त्यानें त्यांचें 'पूर्णदास' असें नांव ठेवून त्यांची समाधि लावून तो गेला. त्यानंतर तीन दिवसांनीं समाधि उतरून ते घरीं आले. पुढें त्यांचा नित्यक्रम भजनपूजन, तीर्थयात्रा याप्रमाणें चालला. यावेळीं त्यांनीं पडते नांवाच्या वाण्याचा भागवत लिहिण्यासाठीं आणलेल्या कागदांचा पैसा देणें होता, तो कबूल केलेल्या मुदतींत त्यास देतां आला नाहीं, ह्मणून देवानें कुणब्याच्या वेषानें जाऊन तो पैसा दिला; हरमल गांवीं केणी या आडनांवाच्या मृत मनुष्यास कृपादृष्टी करून उठविलें; उपदंशानें मरणोन्मुख झालेल्या एका मनुष्यास केवळ तीर्थ देऊन वांचविलें. इत्यादि त्याच्या आख्यायिका प्रसिद्ध आहेत. त्यांनीं वेदांतपर व भक्तिपर असे कांहीं ग्रंथ व पदें केलेलीं आहेत. त्यांतील ज्ञानघन व स्वात्मानुभव हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. कांहीं काळ गेल्यावर ते केरी गांव सोडून वेंगुर्लें येथें जाऊन राहिले. तेथें त्यांनीं श्रीविठोबा रुक्मिणीच्या मूर्ति स्थापन करून सुंदर देवालय बांधिलेलें आहे. शेवटीं इ. सन १८७० त तेथेंच त्यांनीं आपल्या ९२ व्या वर्षीं समाधि घेतली. बालाजीबुवा हे मूळचे कोणत्या गांवीं राहणारे वगैरे बरोबर माहिती मिळत नाहीं; तरी ते सातार्‍याहून आले असावे असें ह्मणतात. ते केवळ अवलिया होते. त्यांच्याही चमत्कारांच्या कांहीं आख्यायिका प्रसिद्ध आहेत. एक वेळ बाजारांतून जात असतां एका रोगग्रस्त मनुष्यानें त्यांच्या पायावर घालून घेतलें; तेव्हां हातांत असलेली पहार त्यांनीं उचलून त्याच्या डोक्यांत घातली. त्यामुळें तो तेथेंच निचेष्टित पडला; व

कांहीं वेळानें चांगला सावध होऊन घरीं गेला. त्यापासून त्याचा रोग जो माहींसा झाला तो पुनः कधींहि उद्भवला नाहीं. नेहमीं भिक्षा मागत फिरावें, जें मिळेल तें खावें, कांहीं भिक्षा मिळाली तर ती सगळी कोणास तरी देऊन टाकावी असा त्यांचा परिपाठ असे. बापूसाहेब निवर्तल्यावर थोड्याच दिवसांनीं वाडी येथें ते समाधिस्थ झाले. त्यांच्या शिष्यवर्गानें त्यांचा येथें मठ बांधिलेला आहे.

चवथे फोंड सावंत (आनासाहेब.)

इ. सन १८६७–६९.

बापूसाहेब निवर्तल्यावर त्यांचे वडील पुत्र आनासाहेब हे इसवी सन १८६८ त गादीवर बसले. सन १८४४ च्या बंडांत हे गेल्यामुळें गादीवरील त्यांचा हक्क त्यावेळीं कमी केला होता; परंतु ब्रिटिशसरकारानें मेहरनजर करून व एका वर्षाच्या वसुलाइतका नजराणा घेऊन त्यांस गादीवर बसविलें. ते गादीवर बसल्यानंतर त्यांस राज्यकारभारासंबंधाचे पूर्ण अधिकार देण्याचा विचार चालू होता; परंतु थोड्याच दिवसांत ते आजारी झाल्याकारणानें तो विचार जागच्याजागीं राहिला; व पोलिटिकल सुपरिन्टेंडेंट स्नायडर हेच काम पाहूं लागले. शेवटीं आनासाहेब यांचा आजार जास्तच वाढून, त्यांतच तारीख ७ मार्च सन १८६९ रोजीं त्यांचा शेवट झाला. मरणसमयीं त्यांचें वय ४१ वर्षांचें होतें. त्यांची बायको ताराबाई ही सुभानराव शिंदे सेनाखासकील तोरगलकर यांची मुलगी. तिच्यापासून त्यांस रघुनाथ सावंत ऊर्फ बाबासाहेब नांवाचा एकच मुलगा होता. आनासाहेब हे फार उदार, मनमिळाऊ व लोकप्रिय होते.

रघुनाथ सावंत (बाबासाहेब.)

इ. सन १८६९-९९.

आनासाहेबांच्या मागून त्यांचे पुत्र रघुनाथराव ऊर्फ बाबासाहेब हे गादीवर बसले. तारीख २९ आगष्ट सन १८७० रोजीं त्यांस राज्या-

भिषेक झाला. त्यावेळीं त्यांचें वय ८ वर्षांचें होतें. ह्मणून राज्यकारभाराचें काम पोलिटिकल सुपरिन्टेंडेंट यांजकडेसच राहिलें.

इसवी सन १८६८ पासून या संस्थानांत कायम शर्तीनें शेरी ठिकाणें ठरवून देण्यास सुरुवात झाली; व त्याप्रमाणें २४२ ठिकाणें देण्यांत आलीं. पुढें इसवी सन १८७२ त मुंबईसरकारानें ती पद्धत बंद केली.

इसवी सन १८६९ च्या नोव्हेंबर महिन्यांत व्यापाराच्या रहदारीस फार सोईकर असा आंबोलीघांट रस्ता सुरू झाला. हा रस्ता तयार करण्याचें काम सन १८६१ त सुरू झालें होतें; व तो तयार करण्यास १३९९३२९ रुपये खर्च आला. हा रस्ता सुरू झाल्यामुळें रामघांट रस्त्यानें जाण्यायेण्यापासून व्यापारी लोकांचे होत असलेले हाल दूर झाले. वेंगुर्ल्याहून रामघांट रस्त्यानें बेळगांवास जाण्यास गाडीभाडें १९ रुपये पडे तें या रस्त्यानें ९ रुपये पडूं लागलें; व त्यामुळें व्यापाराची बरीच भरभराट झाली.

इ. सन १८७० त या संस्थानांत शास्त्रीयपद्धतीनें जमिनीचे धारे ठरविण्याकरितां जमीन मोजण्याचें काम सुरू झालें. स्नायडर साहेबांच्या वेळीं चोहोंबाजूनें संस्थानची भरभराट होत चालली. त्यामुळें मुंबईसरकारानें खूष होऊन स्नायडर साहेबांची फार तारीफ केली.

इ. सन १८७३ त मुंबई इलाख्याचे गव्हर्नर नामदार वुडहाऊस हे सावंतवाडीस आले.

इ. सन १८७३ च्या डिसेंबर महिन्याच्या २३ व्या तारखेस बाबासाहेबांची चुलतबहीण (रामचंद्रसावंत ऊर्फ भाऊसाहेब यांची मुलगी) बाबईसाहेब यांचें लग्न अलिजाबहादूर जयाजीराव शिंदे यांच्याशीं ग्वाल्हेर येथें मोठ्या थाटानें झालें. नंतर लौकरच ह्मणजे इ. सन १८७४ च्या एप्रील महिन्याच्या २१ तारखेस कर्नल स्नायडर हे बढती होऊन कोल्हापुरास पोलिटिकल एजंट होऊन गेले, व त्यांच्या जागीं कर्नल लेस्टर यांची नेमणूक झाली.

कर्नल लेस्टर हे पूर्वीं शाळाखात्यांत एज्युकेशनल इन्स्पेक्टर होते. त्यांस विद्येची फार आवड होती. त्यांनीं संस्थानांत मराठी शाळांची संख्या

बरीच वाढविली. याच सुमारास पूर्वीचा शिक्षणक्रम बदलून हल्लीं चालू असलेला शिक्षणक्रम सुरू झाला. पूर्वी दस्तऐवज नोंदण्याचें काम लोकांच्या मर्जीवर होतें, तें ता. १९ फेब्रुआरी सन १८७६ पासून आवश्यक करून त्यासाठीं कांहीं नियम ठरविले; व हें नोंदणीचें काम दप्तरदार यांजकडेस होतें, तें कमी करून प्रत्येक पेठ्यास सबरजिस्ट्रार नांवाचा एकएक अंमलदार नेमिला.

इ. सन १८७४ त संस्थानांत मोठी ह्मणजे साधारण प्रमाणाच्या दीडपट (२२९ इंच) पर्जन्यवृष्टि होऊन पिकांचें फार नुकसान झालें; परंतु घांटावरून धान्याचा पुरवठा झाल्यामुळें लोकांचा बचाव झाला. तथापि पुढें थोड्याच दिवसांनीं ह्मणजे १८७६ सालांत देशावर भयंकर दुष्काळ पडला. त्याचा बराच परिणाम या संस्थानांतही दिसून आला. धान्याचे व चाऱ्याचे भाव तिपटीनें वाढले. घांटावरील हजारों मनुष्यें आपलीं मुलेंबाळें व गुरेंढोरे घेऊन कोंकणांत उतरलीं. गरीब लोकांसाठीं रिलीफ कामें सुरू केलीं; व पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांनीं धान्याचा सांठा करून लोकांस पुरवठा केल्यामुळें प्राणहानि झाली नाहीं.

इ. सन १८७७ तील जानेवारीच्या पहिल्या तारखेस महाराणी व्हिक्टोरिया यांनीं 'केसर-इ-हिंद' (हिंदुस्थानची बादशाहीण) असा किताब धारण करण्यासाठीं दिल्ली येथें मोठा दरबार भरविला. त्यावेळीं सावंतवाडी येथेंही राजेसाहेबांनीं मोठा दरबार भरवून आपली राजनिष्ठा दाखविली. या दिल्लीदरबारांत राजेसाहेबांस एक बावटा (दिल्ली ब्यानर) बक्षीस देण्यांत आला.

इ. सन १८७७ च्या आगष्ट महिन्याच्या १४ व्या तारखेस कर्नल लेस्टर हे पेन्शन घेऊन विलायतेस गेले; व त्यांच्या जागीं ले० कर्नल जी. आर. सी. वेस्ट्राप हे पोलिटिकल सुपरिंटेंडेंट झाले.

इ. सन १८७७ पासून या संस्थानच्या कांहीं बाबतींसंबंधीं पत्रव्यवहार दक्षिणभाग-कमिशनरच्या मार्फत प्रथमच होऊं लागला. याच वर्षी वाडी शहरांतील आरोग्य वाढविण्यासाठीं म्युनिसिपालिटीची स्थापना झाली.

इ. सन १८७८ पासून संस्थानांतील मुलकी वगैरे कामांसाठीं स्टेट कारभारी व दिवाणी कामासाठीं जुडिशियल असिस्टंट टु धी पोलिटिकल सुपरिंटेन्डेंट अशा हुद्याचे दोन कायमचे कामदार नेमिले. स्टेट कारभारी यांस डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटचाही अधिकार दिलेला आहे. तसेंच जुडिशियल असिस्टंट यांस पहिला वर्ग माजिस्ट्रेटचाही अधिकार दिलेला आहे. स्टेट कारभारी यांच्या जागीं पहिल्यानें वाडी सरकारचे दरकदार रावबहादूर वामनराव पितांबर चिटणीस[1] यांची नेमणूक झाली. याच वर्षापासून दप्तरदार कचेरी कमी करून जमाबंदी व रजिस्ट्रेशन यांसंबंधीं सर्व काम स्टेट कारभारी यांजकडे सोंपविलें.

याच वर्षी मुंबई इलाख्याचे गव्हर्नर नामदार सर रिचर्ड टेंपल हे ता. १८ नोव्हेंबर रोजीं सावंतवाडीस आले होते. वाडीचें सृष्टिसौंदर्य व सुधारणा पाहून त्यांस फार आनंद झाला. वेस्ट्राप साहेब यांनीं इ. सन १८७९ त आंबोलीशहराची व तेथील बाजाराची वसाहत केली. हें शहर सह्याद्रीच्या माथ्यावर आहे. उन्हाळ्यांत तेथील हवा फार सुखकर असल्यामुळें राजकुटुंबांतील माणसें, पोलिटिकल एजंट व सुखवस्तु गृहस्थ तेथें जाऊन राहतात. सर रिचर्ड टेंपल हे कांहीं दिवस तेथें येऊन राहिले होते. त्यांच्या सन्मानार्थ तेथील एका टेंकडीस 'टेंपल टेंकडी' असें नांव दिलेलं आहे.

तारीख २१ डिसेंबर सन १८७९ रोजीं रघुनाथराव ऊर्फ बाबासाहेब यांचें लग्न खंडेराव गायकवाड यांची मुलगी ताराबाबा हिच्याशीं बडोदें येथें मोठ्या थाटानें झालें. बडोदेंसरकारानें बाबासाहेब यांस हुंडा एक लक्ष रुपये व शिवाय ताराबाबा यांस दागिने जडजवाहीर सुमारें ४ लक्ष रुपयांचें व सालीना नेमणूक २५००० रुपये दिली होती. ताराबाबा यांचें घरचें नांव 'सीताबाई' असें ठेविलें होतें.

सन १८८० त ब्रिटिशसरकारचा व गोंवेंसरकारचा तह होऊन, गोंवें सरकारानें आपलें मिठागर १२ वर्षांच्या मुदतीनें ब्रिटिशसरकारास दिलें.

---

[1] लखम सावंत यांचे शिवाजी महाराज व विजापूरचे बादशहा यांजकडे गेलेले वकील पितांबर शेणवी चिटणीस यांचे हे वंशज (आठवे पुरुष) होत.



कै० श्री० रघुनाथ सावंत (बाबासाहेब) व कै० श्री० सौ० सीताबाई (ताराबाबा).

जन्म १८६२. मृत्यु १८९९. जन्म १८७१. मृत्यु १८९७.

The Bombay Art Printing Works, Fort.

त्यावेळीं ब्रिटिशसरकारचा व वाडीसरकारचा तह होऊन वाडीसंस्थानां-तले मिठागर बंद केले; व त्याबद्दल मोबदला दरसाल ५५०० रुपये वाडीसरकारास देण्याचें ब्रिटिशसरकारानें कबूल केलें.

तारीख २१ मार्च १८८१ रोजीं मुंबई इलाख्याचे गव्हर्नर सर जेम्स फर्ग्युसन हे सावंतवाडीस आले. त्यावेळीं त्यांनीं दरबारहॉलच्या इमारतीच्या पायाचा दगड बसविला. याच वर्षाच्या आक्टोबर महिन्याच्या २९ व्या तारखेस संस्थानचे कारभारी रावबहादूर वामनराव पीतांबर चिटणीस हे निवर्तले. त्यांच्या जागीं त्यावेळचे जुडिशियल असिस्टंट सखाराम बाजी बावडेकर यांची नेमणूक झाली.

इ. सन १८७० पासून चालू असलेलें पैमाष—जमाबंदीचें काम १८८९ सालांत पुरें होऊन सर्व संस्थानांत पैमाष—जमाबंदी अमलांत आली. या कामासाठीं संस्थानास एकंदर ३६००९५ रुपये खर्च आला; व सरकारचा वसूल दरसाल ५४४६८ रुपये ह्मणजे शेंकडा ३९.७७ टक्के वाढला.

संस्थानांतील प्रत्येक खात्याचें काम कायदेशीर व पद्धतशीर रीतीनें चालावें, ह्मणून इ. सन १८८९ त सावंतवाडी येथें लेजिस्लेटिव्ह कमिटी [कायदे करणारी मंडळी] स्थापन करण्यांत आली. या कमिटींत संस्थानचे पोलिटिकल एजंट, स्टेट कारभारी, व जुडिशिअल असिस्टंट [ज्यांस पुढें चीफ जज्ज असें ह्मणूं लागले] हे सभासद असतात. या कमिटीनें सुचविलेले कायदे मुंबई सरकारच्या मंजुरीनें दरबारतर्फे अमलांत येतात.

ता. २८ फेब्रुआरी १८८८ रोजीं श्रीरामसावंत ऊर्फ रावसाहेब [हल्लींचे राजेसाहेब] यांचें लग्न इंगळीकर जहागीरदार यांची कन्या ताराबाई हिच्याशीं झालें. त्यांचें दुसरें नांव जानकीबाई असें होतें.

वेस्ट्रॉप साहेब यांच्या कारकीर्दींत संस्थानची पुष्कळ सुधारणा व भरभराट झाली. त्यांनीं सुमारें सहासात लक्ष रुपये खर्च करून दरबारहॉल, हास्पिटल, तुरुंग वगैरे मोठमोठ्या इमारती बांधिल्या; दुसरींहि लोकोपयोगी कामें केलीं. स्थानिक पदार्थसंग्रहालय [वेस्ट्रॉप म्युझियम] स्थापन केलें; शाळांची संख्या वाढविली; रस्त्यांची पुष्कळ सुधारणा

करून जागजागीं धर्मशाळा बांधिल्या. यांच्यावेळीं संस्थानचें उत्पन्नही बरेंच वाढलें.

इ. सन १८८८ च्या डिसेंबर महिन्यांत कर्नल वेस्ट्राप पेन्शन घेऊन विलायतेस गेले; व त्यांच्या जागीं कर्नल ए. एम्. फिलिप्स हे आले. त्यांनीहि दोन वर्षें काम केल्यावर पेन्शन घेतली; व कर्नल एच्. एल्. नट हे पोलिटिकल सुपरिंटेंडेंट होऊन आले [इ. सन १८९०]. इ. सन १८९१ त वाडी शहरांत भाजीपाल्याचा व्यापार करणाऱ्या लोकांसाठीं मार्केट बांधिलें. त्यास 'रघुनाथ मार्केट' असें ह्मणतात. इ. सन १८९३ त वाडीशहरांत केसरी गांवाहून नळानें पाणी आणिलें. त्यापासून शहरांतील लोकाचें आरोग्य बरेंच वाढलें. या नळानें दररोज सुमारें ९०००० ग्यालन पाणी शहरांत येतें. नटसाहेबांनीं, शेतकरी लोकांस आपले व्यवसाय सांभाळून शिकतां यावें, ह्मणून नाइटक्लास व डेक्लास सुरू केले. इ. सन १८९६ त नटसाहेब पेन्शन घेऊन विलायतेस गेले; व त्यांच्या जागीं मि० एल. पी. वॉल्श यांची नेमणूक झाली.

ता. १९ जून १८९७ रोजीं सीताबाईसाहेब निवर्तल्या. मरणसमयीं त्यांचें वय २६ वर्षांचें होतें. त्यांस अपत्य नव्हतें. पुढच्या वर्षीं बाबासाहेब यांचें दुसरें लग्न सावंतवाडींत मेहमान संभाजीराव निंबाळकर यांच्या बहिणीशीं झालें. या नवीन राणीचें नांव लक्ष्मीबाई असें ठेविलें.

इ. सन १८९६ त महागाईस आरंभ झाला. इ. सन १८९९ त पाऊस फारच कमी [८८ इंच] पडून पिकांचें फार नुकसान झालें. त्यामुळे धान्यांचे व इतर जिन्नसांचे दर फारच वाढले. त्यावेळीं सरकारानें लोकांस तगाई वगैरे देऊन त्यांचा बचाव केला.

इ. सन १८९८ त संस्थानचे कारभारी रावबहादूर[1] सखाराम बाजी बोवडेकर यांनीं पेन्शन घेतली; व त्यांच्या जागीं मिस्टर विनायकराव पांडुरंग गुळे यांची नेमणूक झाली. तेच सध्यां काम पाहतात.

बाबासाहेब हे उदराच्या व्यथेनें फार दिवसांपासून आजारी होते. शेवटीं त्याच रोगानें तारीख १४ डिसेंबर रोजीं त्यांचा अंत झाला. त्यावेळीं

१ यांस इ. सन १८९१ त रावबहादूर असा किताब मिळाला होता.



युवराज खेमसावंत ऊर्फ बापूसाहेब.

(वय वर्षे १४.)

त्यांचें वय २८ वर्षांचें होतें. ते शूर, उदार व पाणीदार होते. त्यांची बुद्धि फार तीव्र होती. घोड्यावर बसण्यांत व शिकार करण्यांत ते फार पटाईत होते. त्यांस अपत्य नव्हतें.

श्रीराम सावंत (रावसाहेब)

इ. सन १८९९—

बाबासाहेब यांच्यामागून त्यांचे चुलतबंधु श्रीरामसावंत ऊर्फ रावसाहेब हे गादीवर बसले. त्यांस ता. २३ जुलई १९०० रोजीं राज्याभिषेक झाला. याच वेळीं असा ठराव झाला कीं, सर्व काम राजेबहादूर यांच्या नांवानें व शिक्क्याखालीं पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांनीं चालवावें; व पोलि-टिकल सुपरिंटेंडेंट यांस पुढें पोलिटिकल एजंट असा हुद्दा असावा.

तारीख ७ फेब्रुआरी १९०२ रोजीं जानकीबाई राणीसाहेब निवर्त-ल्या त्यावेळीं त्यांचें वय २५ वर्षांचें होतें. राजपत्नीला योग्य असे सर्व गुण त्यांच्या आंगीं होते. त्यांस ४ मुली व एक मुलगा आहे. हेच प्रस्तुतचे संस्थानचे युवराज खेमसावंत ऊर्फ बापूसाहेब होत. त्यांचा जन्म ता० २० आगष्ट १८९७ रोजीं झाला. रावसाहेब यांचें दुसरें लग्न तारीख १८ मे १९०३ रोजीं अक्कलकोटच्या राजाची वडील कन्या गजराराजा यांच्याशीं झालें. त्यांचें दुसरें नांव यमुनाबाई असें ठेविलें.

इसवी सन १९०३ च्या मे महिन्यांत मि० वाल्श हे पेन्शन घेऊन गेले; व त्यांच्या जागीं कर्नल ओडोनेल यांची नेमणूक झाली. १९०३ व १९०४ या सालांत या प्रांतांत टोळधाड येऊन फार नुकसान झालें. सरकारानें रयतेस पुष्कळ सूट व तहकुबी देऊन त्यांचा बचाव केला, व टोळांच्या नाशाचेही पुष्कळ उपाय योजिले.

इसवी सन १९०३ त युवराज बापूसाहेब यांच्या वयास ६ वर्षें होऊन गेल्यामुळें त्यांस शिक्षण देण्यासाठीं पुणें येथें एका युरोपियन बाईच्या देखरेखीखालीं ठेविले होतें. आतां पुढील अभ्यासासाठीं त्यांचा इंग्लंडास जाण्याचा विचार ठरलेला आहे. इसवी सन १९०४ त वाडी शहरची म्युनिसिपालिटी मोडून तिच्याजागीं सिटीवहिवाटखातें स्थापन

केलें. याच वर्षाच्या मे महिन्यांत कर्नल ओडोनेल रजेवर गेले, ते पुनः इकडे आले नाहींत. त्यांच्या रजेच्या मुदतींत क्याप्टन बर्थन हे काम पहात. नंतर कर्नल हाईडकेट्स् यांची नेमणूक झाली (जुलै १९०३). ते इसवी सन १९०६ च्या आक्टोबर महिन्यांत बदलून जाऊन त्यांच्या जागीं कर्नल डेव्हिस हे आले.

इसवी सन १९०७ च्या डिसेंबर महिन्याच्या २९ व्या व २७ व्या तारखेस राजेसाहेबांच्या कन्या हंसाराजा व तानीराजा यांचे विवाह अनुक्रमें धारचे महाराज उदाजीराव पोवार व मलठाणचे जहागिरदार सेतुरामबाबा यांच्याशीं धार येथें झाले. धार हें संस्थान माळव्यांत आहे. हे पुराणप्रसिद्ध क्षत्रियराजे विक्रम व भोज यांचे वंशज आहेत. त्यांचें सालीना उत्पन्न सुमारें ११ लक्ष रुपये असून त्यांस १७ तोफांची सलामी आहे. ब्रिटिशसरकारानें हल्लीं त्यांस के. सी. एस्. आय्. असा किताब दिला आहे. मलठाण ही लहानशी जहागीर पुण्याहून ३० मैलांवर आहे.

इसवी सन १९०८ च्या जून महिन्यांत कर्नल डेव्हिस हे रजेवर जाऊन त्यांच्या जागीं मेजर जेकब यांची नेमणूक झाली. याच वर्षीं वाडीपलटण मोडून त्याऐवजीं हत्यारबंद पोलिसांची नवीन रचना केली. रावसाहेब यांस संस्थानची पागा, दरबार व देवस्थान या खात्यासंबंधाच्या कामांची पूर्ण मुखत्यारी दिली. एप्रिल १९०९ त जेकब साहेब बदलून गेले व त्यांच्या जागीं कांहीं दिवस मेजर बर्थन व लेफ्टनंट ब्यारेट यांनीं काम केल्यावर, मेजर पॉटिंजर यांची नेमणूक झाली.

तारीख १२ डिसेंबर १९११ रोजीं सार्वभौम पांचवे जार्ज हे दिल्लीच्या तक्तावर बसले. त्यासंबंधानें सावंतवाडी येथें मोठा दरबार व दीपोत्सव करून राजेसाहेब व प्रजाजन यांनीं आपली राजनिष्ठा प्रगट केली.

ब्रिटिशसरकारानें या संस्थानचा राज्यकारभार हातीं घेतल्यास जवळ जवळ पाऊण शतक होत आलें आहे. इतक्या काळांत लोकांस सुखकारक अशा अनेक सुधारणा व सोई होऊन संस्थानची भरभराट झाली आहे. लोकांचें जीवित आणि मालमत्ता यांचें संरक्षण व्हावें म्हणून

जागजागीं पोलीस ठेविलें आहे, व चीफ पोलीस ऑफिसर या नांवाचा मुख्य अंमलदार नेमिला आहे. आजारी मनुष्यांस मोफत औषध मिळण्यासाठीं वाडी शहरांत मोठा दवाखाना ठेविला असून कुडाळ, वाडी, बांदें व माणगांव येथें लहान लहान डिस्पेन्सऱ्या घातल्या आहेत. वाडी शहरांत नळानें उत्तम प्रकारें पाण्याचा पुरवठा केला आहे. यामुळें रोगराई पुष्कळ कमी झाली आहे. शिवाय स्वच्छता व आरोग्यता राखण्यासाठीं वाडी शहरांत सिटिवहिवाटखात्याची, बांदें व कुडाळ येथें सानिटेशन बोर्डाची योजना केली आहे. देवी काढण्यासाठीं देवीडॉक्टर ठेविले आहेत. कर वसूल करण्यासाठीं कमाविसदार, न्यायमनसुबी करण्यासाठीं न्यायाधीश व मुनसफ असे अंमलदार नेमिले असून चोरी, मारामारी, खून, दरवडे, इत्यादि फौजदारी अपराधांची चौकशी करण्यासाठीं त्यांस माजिस्ट्रेटचा अधिकार दिलेला आहे. त्यांनीं केलेल्या निकालावर अपील झाल्यास त्यांची तपासणी आणि त्यांच्या कामाची देखरेख स्टेट कारभारी व चीफ जज्ज हे करितात. स्टेट कारभारी यांस डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटचा अधिकार असून चीफ जज्ज हे पहिला वर्ग माजिस्ट्रेट आहेत. दस्तऐवज नोंदणीसाठीं रेजिस्ट्रेशनखातें ठेविलें आहे, त्यामुळें बनाऊ दस्तऐवज होण्याची भीति नाहींशी झाली आहे. या सर्व कामदारांनीं आपलीं कामें कोणत्या रीतीनीं करावीं त्याबद्दल कायदे ठरविले आहेत. यामुळें एकंदर काम नियमबद्ध होऊन रयतेस आपले हक्क रक्षण करण्याची उत्तम सोय झाली आहे. व्यापाराच्या आणि दळणवळणाच्या सोयीसाठीं उत्तम रस्ते केले असून जागजागीं धर्मशाळा बांधिल्या आहेत. फार थोड्या खर्चांत पत्रांची व पैशांची नेआण करण्यासाठीं गांवोगांव पोष्ट ठेविलीं आहेत. फार त्वरेनें बातमी नेण्याआणण्यास वाडीशहरांत तारऑफिस आहे. मुलांस व मुलींस शिक्षण देण्यासाठीं इंग्लिश, मराठी व हिंदुस्थानी अशा शाळा ठेविल्या आहेत. संस्थानांतील शाळांची संख्या १४५ असून त्यांत ६३०० विद्यार्थी व ६०० विद्यार्थिनी शिकत आहेत. अस्पृश्य मानिलेल्या जातींच्या मुलांसाठीं स्वतंत्र शाळा ठेविली आहे. तींत महार व चांभार या जातींचीं ४० मुलें शिकत आहेत. शेतकरी वगैरे

धंद्यांच्या लोकांस आपला व्यवहार सांभाळून शिक्षण मिळावें ह्मणून नाईट-क्लास व डे क्लास सुरू केले आहेत. ह्या व अशा प्रकारच्या पुष्कळ सोयी ब्रिटिशसरकारच्या राज्यकारभारांत आपल्यास प्राप्त झाल्या त्याबद्दल आपण ईश्वराचे आभार मानिले पाहिजेत.

परिशिष्ट १ लें.

जुने लेख.

नंबर १

चालुक्य शासन.

हें तांब्याच्या तीन पत्र्यांवर लिहिलेलें आहे. प्रत्येकाची लांबी ७॥ इंच व रुंदी ३ इंच आहे. हे तीनही पत्रे कड्यांमध्यें गुंतविलेले आहेत. त्याचा घेर १० इंच ह्मणजे व्यास ३ इंच व जाडी $\frac{1}{4}$ इंच आहे. खालीं सील आहे. त्यांत डुकराचें चित्र आहे, त्याचें तोंड पूर्वेकडे आहे.

स्वस्ति श्रीमतां सकलभुवनसंस्तूयमानमानव्यसगोत्राणांहारितिपुत्राणां सप्तलोकमातृभिस्सप्तमातृभिरभिरक्षितानां कार्तिकेयपरिरक्षणप्राप्तकल्याण-पराणां भगवन्नारायणप्रसादसमासादितवराहलाञ्छनेक्षणक्षणवशीकृताशेष-महीभृतां चलुक्यानां कुलमलंकरिष्णोरश्वमेधावभृथस्नानपवित्रीकृतगात्रस्य श्री पुलकेशीवल्लभमहाराजस्य प्रपौत्रः पराक्रमाक्रान्तवनवास्यादिपरनृपति-मंडलप्रणिबद्धविशुद्धकीर्तिश्रीकीर्तिवर्मपृथिवीवल्लभमहाराजस्यपौत्रस्समरसं--सक्तसकलोत्तरापृथिवीश्वरश्रीहर्षवर्धन पराजयोपलब्धपरमेश्वरापरनामधेयस्य सत्याश्रयश्रीपृथिवीवल्लभमहाराजाधिराजपरमेश्वरभट्टारकस्य प्रियतनयो रा-जरिपुनरेन्द्रहन्तादिशिदिशिजित्वा स्ववंशजानां लक्ष्मीं प्राप्य प्राप्य च परमेश्वरतामनिवारितविक्रमादित्यः तस्य ज्येष्ठं भ्रातुः श्रीन्द्रादित्यपृथिवी-वल्लभमहाराजस्य प्रियमहिशी विजयभट्टारिका स्वराज्य **पर्धोमः** संवत्सरे आश्वयुजपौर्णमासस्य द्वितीयायाम् विषुवे बहुपुण्यार्थम् नरकागाहरे वत्ससगोत्राय गृहपतिपौत्राय स्वामिचतुर्वेदस्य पुत्राय आर्यस्वामिदीक्षिताय पोलियमपथादि गिरिकाप्रभृति दक्षिणोपरिश्वष्टाट्टेक्षिका उदकपूर्वदत्ताःतस्य वंशजेष्ठा निर्विशेषं परिपालयति स दातुः पुण्यभाग्भवति यो अपहर्ता स पंचभिर्महापातकैस्संयुक्तो भवति उक्तंच भगवता व्यासेनः—

स्वदत्तां परदत्तांवा योहरेत वसुंधरां ।
षष्टिवर्ष सहस्राणि विष्टायां जायते क्रुमिः ॥

नंबर २

चालुक्य शासन.

हें तीन पत्र्यांवर आहे. प्रत्येकाची लांबी ६।। इंच व रुंदी ३ इंच आहे. हे कड्यांमध्यें गुंतविलेले आहेत त्या कडीचा व्यास २ इंच आहे. खालीं डुकराची निशाणी आहे. त्याचें तोंड पूर्वेकडे आहे.

स्वस्ति श्रीमतां स्वामिमहासेनपादानुध्यातानां मानव्यसगोत्राणां हारितिपुत्राणां चलिक्यानां वंशे संभूतः मानवपुराण रामायणभारतेतिहासकुशलः नीतौ बृहस्पतिसमः अग्निष्टोमवाजपेयपौण्डरीकबहुसुवर्णाश्वमेधावभृतस्नानपवित्रीकृतशरीरः स्वगुणैर्लोकवल्लभोवल्लभः तस्य पुत्रः परब्रह्मण्यः परराष्ट्रावमर्दी स्वराष्ट्रन्यायानुवर्ती देवद्विजगुरुपूजानिरतः सकलमहीमण्डलव्यापिविमलयशाः स्वभुजबलपराक्रमोपार्जितान्यराजवित्तः वृषभगमननयननिनादः समदवरवारणविलासः सिंहविक्रमः नयविनयदानदयादाक्षिण्यसत्यसंपदोपेतः शक्तित्रयसंपन्नः परमभागवतः मङ्गलराजः बभौसत्वेन्यप्रतिमानकीर्तिस्तम्ॐप्रमृन्दन्स्वगुणांशुजालैः तेनराज्ञा शंकरगणपुत्रं गजतुरगपदातिकोशबलसंपन्नं बुद्धराजं विद्राव्य चालिक्यवंशसंभवंअष्टादशसमरविजयिनं स्वामिराजं च हत्वा संवत्सरपूज्यतमायांकार्तिकद्वादश्यां कृतोपवासेनार्चित विष्णुना काश्यपगोत्रस्य वेदवेदांगविदुषः सुमतिस्वामिनः पुत्राय वेदवेदांगपारगायःप्रियस्वामिने कुलशीलवृत्तसंपन्नाय कोंकणविषये निःश्रेयसमुदकपूर्वं कुण्डिवादकग्रामोदत्तः उक्तंचतेन राज्ञा योस्मत्कुलाभ्यन्तरोन्योवा रागद्वेषलोभमोहाभिभूतो हिंस्यात् स पंचमहापातकोपपातकैस्संयुक्तस्यात् धर्मशास्त्रेष्वप्युक्तं बहुभिर्वसुधा भुक्ता राजाभिःसगरादिभिः । यस्य यस्य यदा भूमिः तस्य तस्य तदा फलम् ॥ स्वदत्तां परदत्तांवा यो हरेतवसुंधराम् । षष्टिवर्ष सहस्राणि विष्टायांजायतेक्रमिः ॥ षष्टिवर्ष सहस्राणि स्वर्गे तिष्ठति भूमिदः । आच्छेत्ताचानुमन्ताच तान्येव नरके वसेत् ॥ स्वंदातुं सुमहच्छक्यं दुःखमन्यस्य पालनं । दानंवा पालनंवेति दानाच्छ्रेयो नुपालनम् ॥ इति.

नंबर ३

चालुक्य शासन.

याचे तीन पत्रे आहेत. प्रत्येकाची लांबी ७। व रुंदी ३। इंच आहे. हे एका कडींत अडकविलेले आहेत. तिची जाडी $\frac{1}{3}$ इंच व व्यास २ इंच आहे. निशाणी वर्तुळाकार असून वर प्रथम चंद्रसूर्यांच्या प्रतिमा आहेत. त्याच्या खालीं "**श्रीचन्द्रादित्य**" हीं अक्षरें आहेत; व अगदीं खालीं कमळ कोरिलें आहे. निशाणीचा व्यास १। इंच आहे.

स्वस्ति श्रीमतां सकलभुवनसंस्तूयमानमानव्यसगोत्राणां हारीतिपुत्राणां सप्तलोकमातृभिः सप्तमातृभिरभिवर्धितानां कार्तिकेयपरिरक्षणप्राप्तकल्याणपरंपराणां भगवन्नारायणप्रसादसमासादितवराहलाञ्छनेक्षणक्षणवशीकृताशेषमहीभृतां चलुक्यानां कुलमलंकरिष्णोरश्वमेधावभृथस्नानपवित्रीकृतगात्रस्य श्रीपुलकेशीवल्लभमहाराजस्य प्रपौत्रः पराक्रमाक्रान्तवनवास्यादिपरनृपतिमण्डलप्रणिबद्धविशुद्धकीर्ति श्रीकीर्तिवर्म प्रिथिविवल्लभमहाराजस्य पौत्रः समरसंसक्तसकलोत्तरापथेश्वरश्रीहर्षवर्धनपराजयोपलब्धपरमेश्वरापर--नामधेयस्य सत्याश्रयश्रीप्रिथिवीवल्लभमहाराजाधिराजपरमेश्वरस्य प्रियतनय रणशिरसि रिपुनरेन्द्रान् दिशि दिशि जित्वा स्ववंशजां लक्ष्मीं प्राप्य च परमेश्वरतयानिवारितविक्रमादित्य स्तस्य ज्येष्ठो भ्राता श्रीचन्द्रादित्य प्रिथिवीवल्लभमहाराजाधिराजस्तस्य प्रियमहिषी कलिकालप्रतिपक्षभूता श्री विजयमहादेवी वोड्डि (हि) पोधी (थी) सर्वानाज्ञापयति विदितमस्तु वो वैशाखशुक्लद्वादश्यां सोमवासा अस्यवत्ससगोत्राय..........गोलस्वामिने कोचुरकग्रामेवकुलकच्छक्षेत्रनाम खज्जनसहितं उदकपूर्व दत्तं अपरपूर्वेनोर्वतःसेतुना निवार्यते योस्मद्वंशजोन्योवा नुपालयति स पुण्यभाग्भवति षष्टिवर्षसहस्राणि स्वर्गेमोदति भूमिद । आच्छेत्ता चा नुमन्ताचतान्येव नरके वसे ॥ स्वदत्तां परदत्तांवा यो हरेत वसुन्धरां । षष्टिवर्षसहस्राणि विष्टायां जायते क्रिमि ॥

नंबर ४

अग्रहार.

॥ श्रीमहागणाधिपतयेनमः ॥

॥ अविघ्नमस्तु ॥

नमस्तुङ्गशिरश्चुम्बिचन्द्रचामरचारवे ।
त्रैलोक्यनगरालंभमूलस्तंभायशंभवे ॥
लीलाकोल:सजयति हरि:कुन्दलक्ष्मीदधद्य ।
दंष्ट्रानालेनलिनमिव भूमण्डलंतद्विभाति ॥
यत्र स्वर्णक्षितिधरपति:कर्णिकावर्षपंक्ति ।
पत्रश्रेणीकुलशिखरिण:केसराणांप्रसार: ॥
तस्मिन्भारतवर्षदक्षिणदलेदेशोस्तिकर्णाटक ।
स्तन्मध्येसरिदुत्तमाविजयतेसातुंगभद्राभिधा ॥
यत्तीरेदुरिताटवीहुतवहेदेवो विरूपाक्ष ।
इत्यास्तेसंततमन्तरेणसुमन:स्रोतस्विनीचिन्तनम् ॥
तस्योपकण्ठेविजयाभिधाना–सादुर्जयाराजतिराजधानी ॥
यस्यांविरूपाक्षकटाक्षदग्ध–मुज्जीवयन्तिस्मरमुत्पलाक्ष्य: ॥
वंशेयदोरभिनवांशइवाच्युतस्य–श्रीसंगमादजनिसंगररंगभीम: ॥
श्रीबुक्कराजइतिधिक्कृतशत्रुरेष–तामध्यतिष्ठदधमध्यमलोकपाल: ॥
अथभुवंभुवगामिन:सुतं–हरिहरि दीशपराक्रमम् ॥
जगदिन:समजीगमदादरा–त्सचतुरंचतुरम्बुधिमेखलाम् ॥
आकर्णस्थसरिद्वरोत्तरतटादापूर्वपाथोनिधे ।
रासेतोरवनिंचिरादवतिसत्यापश्चिमाम्भोनिधे: ॥
स्थानेऽस्मिन्गुणनामभिर्हरिहरीराजाधिराजादिभी ।
राजोर्वीपतिमौलिमालितपदाम्भोजेमहीवल्लभे ॥
तस्याज्ञयामाधवमन्त्रिवर्य:–प्रशाज्जयन्तीपुरराज्यमृद्धम् ॥
यन्मन्त्रशक्त्यावपुरुत्सृजन्तो–प्यरातय:स्वास्थ्यमहोभजन्ते ॥
आशान्तविश्रान्तयशा:समन्त्री–दिशोजिगीषुर्महताबलेन ॥
गोवाभिधांकौंकणराजधानी–मन्येनमन्येरुणदर्णवेन ॥
प्रतिष्ठितांस्तत्रतुरुष्कसंघा–नुत्पाद्यदोष्णाभुवनैकवीर: ।

उन्मूलितानामकरोत्प्रतिष्ठां—श्रीसप्तनाथादिसुधाभुजांयः ॥
तस्मिन्गतेक्षितितलेसतिकीर्तिशेषं । सन्मन्त्रिभिर्हरिहरोनृपतिर्विचार्य ॥
गोवापुरेनृहरिमन्त्रिणमादरेण । राज्यपदेसमभिषिच्यपुरोजयन्त्याः ॥
आत्रेयान्वयवारिदावुदभवन्मम्बाम्बिकागर्भतः ।
साक्षाद्ब्रह्माभिधद्विजवराद्योभास्करस्याग्रजः ।
विद्याशंकरसत्कृपामररसासारेणसंवर्धितो ।
विद्वत्कल्पमहीरुहोनरहरिःक्षोणीपतिर्भासते ॥
कृत्वासप्तपदानिसप्तसुमहाद्वीपेषुभूभृच्छिला ।
मास्थायाथविमुच्यशात्रवयशोलाजान्प्रतापानले ॥
प्रत्यक्षेणविलोकितुंदिवमपिप्राप्तातथारुन्धती ।
मित्थंकीर्तिवधूःसदानरहरिक्ष्मापंवृणीतेवरम् ॥

स्वस्तिश्री शकेत्रयोदशाधिकत्रिशतोत्तरसहस्रेगते वर्तमानप्रजापतिसंवत्सरे वैशाखमासे कृष्णपक्षे आमावास्यायां सौम्यदिने सूर्योपरागपुण्यकाले स्वस्ति श्रीमन्महामन्त्रीश्वर उपनिषन्मार्गप्रवर्तकाचार्यः श्रीमन्माधवराज्ञः कुच्चरविषयवर्तिनं कुच्चरनामानंग्रामं माधवपुरमिति प्रथितनामधेयं सर्वमान्यमग्रहारं कृत्वा पञ्चविंशतिवृत्तिकल्पनामाकलय्य श्रुताध्ययनसंपन्नेभ्यः चतुर्विंशतिब्राह्मणेभ्यः सहिरण्योदकदानधारापूर्वकं तंग्रामं संप्रदद इतिप्रदात्तंधर्मशासनं.

तेषां ब्राह्मणानां गोत्रनामविवरणम् ॥

भारद्वाजगोत्रस्य ऋक्शाखा ध्यायिनः अनंतभट्टपुत्रदामोदरभट्टस्य वृत्तिरेका ॥१॥ वाशिष्ठगोत्रस्य ऋक्० महादेवपुत्रानंतभट्टपुत्रस्यवृत्तिरेका ॥२॥ आत्रेयगोत्रस्य ऋक्० नारसिंहभट्ट पुत्रवासुदेवभट्टस्य वृत्तिरेका ॥३॥ भारद्वाजगोत्रस्य ऋक्० अनंतभट्ट पुत्र दामोदर कानभट्टस्य वृत्तिरेका ॥४॥ आत्रेयगोत्रस्य ऋक्० वासुदेवभट्ट पुत्र दामोदरभट्टस्य वृत्तिरेका ॥ ५ ॥ आत्रेयगोत्रस्य ऋक्० नारंभट्ट पुत्र महादेवभट्टस्य वृत्तिरेका ॥६॥ जामदग्न्यगोत्रस्य ऋक्० महादेव पुत्र वामनभट्टस्य वृत्तिरेका ॥ ७ ॥ आत्रेयगोत्रस्य ऋक्० दामोदरभट्ट पुत्र रामभट्टस्य वृत्तिरेका ॥८॥ भारद्वाजगोत्रस्य ऋक्० अनंतभट्ट पुत्र कानभट्टस्य वृत्तिरेका ॥९॥ जामदग्न्यवत्स

गोत्रस्य ऋक्० विठ्ठलभट्ट पुत्रपौम्नि देवभट्टस्य वृत्तिरेका ॥ १० ॥ कुत्स-गोत्रस्य ऋक्० महादेवभट्ट पुत्रानंतभट्टस्य वृत्तिरेका ॥ ११ ॥ जामदग्न्य गोत्रस्य ऋक्० केशवभट्ट पुत्रानंतभट्टस्य वृत्तिरेका ॥१२॥ आत्रेयगोत्रस्य ऋक्० गोविंदभट्ट पुत्र जनार्दनभट्टस्य वृत्तिरेका ॥१३॥ जामदग्न्यगोत्रस्य ऋक्० रामकृष्ण पुत्र विष्णुभट्टस्य वृत्तिरेका ॥ १४ ॥ आत्रेयगोत्रस्य ऋक्० दामोदरभट्ट पुत्र हरिभट्टस्य वृत्तिरेका ॥१५॥ कौशिकगोत्रस्य ऋक्० मांदेशी पुत्र गोविंदभट्टस्य वृत्तिरेका ॥ १६ ॥ जामदग्न्यगोत्रस्य ऋक्० विठ्ठलभट्ट पुत्र वासुदेवभट्टस्य वृत्तिरेका ॥ १७ ॥ कौशिकगोत्रस्य ऋक्० गोविंदभट्ट पुत्रस्य पौम्निदेवभट्टस्य वृत्तिरेका ॥१८॥ जामदग्न्यवत्सगोत्रस्य ऋक्० बाहरिभट्ट पुत्र महादेवभट्टस्य वृत्तिरेका ॥ १९ ॥ वाशिष्ठगोत्रस्य ऋक्० नारायणभट्ट पुत्र तानभट्टस्य वृत्तिरेका ॥ २० ॥ जामदग्न्यवत्सगोत्रस्य ऋक्० महादेवभट्ट पुत्र भट्टंभट्टस्य वृत्तिरेका ॥२१॥ भारद्वाज गोत्रस्य ऋक्० नामदेवभट्ट पुत्र विठ्ठलभट्टस्य वृत्तिरेका ॥२२॥ भारद्वाज गोत्रस्य ऋक्० वामदेवभट्ट पुत्र महादेवभट्टस्य वृत्तिरेका ॥२३॥ वाशिष्ठ गोत्रस्य ऋक्० गोविंदभट्ट पुत्र केशवभट्टस्य वृत्तिरेका ॥ २४ ॥ भारद्वाजगोत्रस्य ऋक्० अनंतभट्ट पुत्र दामोदरभट्टस्य पुनर्महाजनैरन्यादत्ता वृत्तिरेका ॥२५॥

एवं पंचविंशति वृत्तयः

कुचरिनामधेयस्येदानींकृतमाधवपुराभिदंतस्याग्रहारस्यचतुःसीमाविवरणम्

पूर्वस्यांदिशिपाटग्रामस्यसीम्निपर्वताशिरसिवटवृक्षपाषाणः

दक्षिणास्यांदिशिह्मापणग्रामस्यसीम्निअरण्यमध्यस्थपरगालीतिक्षारिक्षेत्रा-न्तर्गतंकृत्वातत्प्रभृति पश्चिमदिगनुखारीप्रकारं समीपतः समुद्रवेलायांहृदश्च ॥

पश्चिमस्यां दिशि समुद्रः ॥

उत्तरस्यां दिशि परौल्यग्रामस्य सीम्नि प्रवाहादधः समुद्रपर्यंतौ क्षारोदकनदीच ॥

एवं चतुःसीमान्तर्गतं माधवपुराग्रहारं सहिरण्योदकदानधारापूर्वकं सर्वनमस्यं सर्वबाधाविवर्जितं निधिनिक्षेपजलपाषाणसिद्धिसहितं चतुर्विंशति ब्राह्मणाःसुखेनभुञ्जीरन् ॥

सामान्योयंधर्मसेतुर्नृपाणाम् । कालेकालेपालनीयोभवद्भिः ॥

सर्वानेतान् भाविनः पार्थिवेन्द्रान् । भूयो भूयो याचते रामचंद्रः ॥
स्वदत्तां परदत्तां वा यो हरेत वसुंधराम् ।
षष्टिवर्षसहस्राणि विष्ठायां जायतेक्रमिः ॥
॥ श्रीशुभमस्तु ॥

नंबर ५

मठ गांवचा शिला लेख.

स्वस्ति श्री सालीवान सकु कु १३१९ वरीसे चीत्रभानु संवत्सर आदीक बाहुळ ३ गुरुवारी चांदगडाङ्गजीपती नऱ्यसी देवाचा दळवै यानें याचा पीता भाम सावंतु तदोद्दीसी उपभोगासी देण वीडा धुणा तेला द्रेया उपभोगासी दत्त रौप्य टांके १४ आखेरतोपी टांके चौदा उपभोगासी देउळाच्य कामाया वेचू द्राम १५०० दळवैपणोचे जाले दीनु आर्थे एखंधर याची ला दीनु नीची वेचू द्राम १००० आखेरतोपी सासु उफरासी भाम सावता वेळाचा दळवै यदोद्दीसी भूमी भऱ्यया २ मडायी भेव ओंयू व्ययी मेरं नेयी मेर सडे खडीचे यी मेर आंभऱ्ययी.

नंबर ६

शिवाजी महाराजांनीं लिहिलेलें पत्र.

सन १६५८

श्री.

वडिलांचे शेवेसीं शिवाजी राजे यांणीं चरणावरी मस्तक ठेवून विज्ञापना ऐसीजे. बाजी घोरपडे मुधोळकर यांणीं स्वधर्म साधणता सोडून यवन दुष्ट तुरुक हाचे कृत्यास अनकूल होऊन दगाबाजीचे हुजुरे करून विज्यापुरास येणें घडलें तेथें गुजरला प्रकार निर्वाणचा तो तुह्मी समज-लांच आहां तोही प्रसंग श्री तुमचा मनोरथ सिद्धीस नेणें व स्वधर्म राज्यवृद्धि करणें ह्मणोन पार पडलां सांप्रत पुन्हा दुर्बुद्धि धरून खवास-खान विजापुराहून फौजेसुद्धां रवाना जाहले. त्याची हरोळी बाजी यांणीं व लखम सावंत व खेम सावंत यांणीं प्रतिज्ञापूर्वक जत करून सेना समवेत निघाले ते तिकडे येत आहेत तुम्हांस श्रीसांब व अंबे यश देणार पूर्ण आहे. येसमयीं त्यांचे वेढे घ्यावे आण आमचे मनोदय सेवटास

नेणार तुम्ही सुपुत्र निर्माण आहां म्हणोन आज्ञा केली त्यास बाजी घोरपडे पुढें मुधोळास घरीं कांहीं जमेतीनसी आले हें कळतांच फौजेनसी आम्ही तेच क्षणी स्वार केली त्यांचा प्रांत लुटून तळपट जाल करून ठाणीयास जेरदस्तीत आणिले हें जाणोन त्यांणीं सर्व जमेतीनसी लढाईस निघाले युद्ध तारफेचें जहालें. बाजी मारिले व कितेक खासे लोक पडले याप्रकारें तो प्रसंग करून लुटून फस्त केले मत्ता बहुत लागली. पुन्हा आपलेसे करून मुधोळ पंचमहाल आपला करून स्थापिले. यानंतर खवासखान पुढें आला पाहून त्याजवर चाल केली ते मारीत लुटीत गर्दी केली खटा होऊन पळूं लागले ते विजापुरास पावविले यानंतर सावंताचा निशाच करावा म्हणोन त्या प्रांतांत शिरलों तेही येऊन पावले मुलुख तळपट करीत चालिलों ठाणीं व किल्ले तमाम घेतले सावंत दमोन गेले गोमंतकराचा आश्रय निघोन फोंड्याचा किल्ला भांडुं लागला त्यास सुरंग लावून बुरूज उडवून बळयानें घेतला. याप्रमाणें एकंदर तें सवस्थान घेतलें. यानंतर फिरंगी याजवर शह देऊन त्याचा प्रांत मारीत चाललों त्यांणी तह करून तोफा नजराणा पाठविला. सावंत यास तेथें दम न निघे. टोपीकार यास धीर न पडे त्याजवरून पितांबर शेणवी कारभारी वकील पाठविले आपण सावंत भोंसले कुळींचे आपले पुत्र आहों सर्फराज करून देसगतीच्या वतनाची सेवा घेऊन प्रांताचा ठराव निमे ऐवज फौजेनशी चाकरी करितों त्यास निमे ऐवज व निमे ऐवज सरकारांत वसूल घ्यावा ऐसें करून घेतलें त्याप्रमाणें स्वामीचे पुण्यप्रतापें करून आज्ञे प्रमाणें घडोन आलें तें कळावें म्हणोन लि॥ हे विज्ञापना.

मोर्तब.

नंबर ७

शिवाजी महाराज व सावंतवाडीकर भोंसले यांचा तह.

सरदेसाई यांनीं शिवाजी महाराजांशीं केलेला तह.

तहनामा राजश्री खेमसावंत व लखम सावंत सरदेसाई बहादूर प्रांत कुडाळ यांजकडील पितांबर शेणवई कारभारी येऊन ठराव करून दिला. सुरु सन तिस्सां खमसेन अल्लफ.

प्रांत मजकूरचे महाल वगैरे चालत आहेत. आकार होईल त्याचा ऐवज दरसाल निमे हुजूर पावता करावा. निम्मा आकार राहील त्यांत तीन हजार लोक पायदळ, हेटकरी ठेवावे आणि ज्यावेळेस हुजूर चाकरीस बोलाविले जातील तेव्हां तीन हजार लोकांनिशीं सेवा करावी. खासा जातीनें येण्याचें प्रयोजन पडेल तेव्हां बोलावणें होईल तेव्हां यावें.
कलम १

किल्ले फोंडाप्रांत तालुका घेऊन हुजूर ठेविला त्यास हरएक प्रसंगास कुमक राखीत जावी. विदनूर वगैरे संस्थानच्या खंडण्या घेण्यास स्वारी होईल त्याच्या कुमकेस जात असावें.
कलम १

स्वराज्य साधनाच्या ठायीं वकिलापाशीं मध्यें राहून तुरुक लोकांचें साधान करावें.
कलम १

प्रांतांतील जमाबंदीच्या चौकशीस हुजुरून लोक रहातील ते ठेवून त्यांच्या नेमणुकीबद्दल हुजूर अंमल प्रमाणें पावतें करावें. कलम १

प्रांत मजकूरची देसकत वतनें व बहादूर किताबत अजरामत चालेल. त्यांतील किल्ले कोट व ठाणीं तुमच्या स्वाधीन केलीं आहेत. तेथें दास्तान करून जतन करावीं. तेथें हुजूरचे कारकून व लोक येतील ते ठेवावे.
कलम १

शके १५८० विलंबीनामसंवत्सरे फाल्गुन वद्य ७ मी एकूण ५ कलमीं करार करून तहनामा दिला असे.

मोर्तब.

नंबर ८

विजापूरच्या बादशहाचें फरमान[1].

सिक्का आहे. इ. सन १६६४.

आज्ञापत्र कृपाळू होऊन थोरपणास पावले. अंमलदार हल्लींचे व पुढें होतील त्यांस व देसाई परगणे कुडाळ यांस सुरू सन आरबा सीतैन

[1] हें व याच्यापुढें दिलेलीं दुसरीं फरमानें पारशी भाषेंत व ऊर्दू लिपींत लिहिलेलीं आहेत.

अल्लफ या दिवसांत लिहिणेस कारण जे अब्रू व थोरपणा योग्य तरवार बहादर इभ्रतवान फौजेचे सरदार निष्टावंत सुलतान बादशाहि दरबारी पसंत व ईश्वरी कृपेस योग्य निष्टावान थोर अब्रूचे अजीजखान सरनोबत सुभेदार तळकोंकण यांणीं मुलुख संरक्षण करणार बादशाहि दरबारामध्यें विदित केलें जे लखम सावंत सरदेसाई परगणे मजकूर हे फौजेसुद्धां बराबर येऊन मेहनत फार करून शिवाजीच्या फौजेबरोबर लढाई करून परगणे मजकूर मध्यें बादशाही दौलत रुजू केली त्याजवरून बादशहा मेहरबान होऊन जास्ती बक्षीस मौजे मालवण परगणे मजकूर निसबत अबदुल कादीथ खर्च इनाम सरदेसाई मशारनिल्हे यांस कुलबाब कुल कानु देखील ऐवज सरकारचा व देसकाचा व सरकारवाडा व बाजेवस्त व जकात उभामार्ग व कुलबा व कुली रुजवात व सर्व बाबतीत सरकारचे दसरांत लिहून दिले प्रमाणें समजून खेरीज ठिकाण दस्त कृपा करून दिला असे यास व याचे मागें पुत्रपौत्रास चालूं देणें नूतन आज्ञापत्राचा हुजूर न धरणें साल दर साल या आज्ञापत्राप्रमाणें चालूं देणें तालीक लिहून घेऊन अस्सल सनद फिरावून देणे जाणिजे हजरत बादशहा याच्या आज्ञापत्रीं हुकुम झाल्याप्रमाणें चालणें छ ५ माहे मोहरम सन १०७५

फरमान हजरत बादशहा महमदशहा तक्त विजापूर.

नंबर ९

विजापूरच्या बादशहाचें फरमान.

महंमद बादशहा विजापूर याचा सिका आहे. इ. सन १६६४.

आज्ञापत्र कृपाळू होऊन थोरपणास पावले अमलदार हल्लीचे आण पुढें होणारे ते व देसाई परगणे कुडाळ यांस सुरू सन आरबा सितैन अलफ या दिवसांत पितांबर शेणवी निसबत लखम सावंत सरदेसाई परगणे मजकूर यांणीं सरकारांत अर्जी केली कीं सरदेसाई मशारनिल्हे बरोबर फौज चांगली व योग्यतेचे व तरवार बहाद्दर व फौजेचे मातबर बादशाहि सुलतानीचे कृपेंतील हे बादशाहि पसंत कृपावंत ईश्वराचे खान थोर दैवाचे बहुत लौकिकाचे हुजुर दौलतींत राहणारे अजीजखान

सरनोबत सुभेदार तळकोंकण यांजबरोबर हुजुरच्या चाकरींत असून मुलखांत लावणी व आबादानी केली याजकरितां मेहरबान होऊन इनाम गांव व बागायत, जिराईत, नमास कट्टबाण पासोडी हक्क लाजमा देखील नाडगौडगी परगणे मजकुरची बरहुकुम फरमान पहिले भोगवटीप्रमाणें बादशाहा यांहीं कृपा करुन बक्षीस द्यावें ह्मणून त्याजवरून विनंती तुमची ध्यानीं आणून मौजे मसुरा व मौजे मालवण मौजे पेंढूर व मौजे चावनळें मौजे डोंगर मळगांउं व मौजे मठ व मौजे होडवडें मौजे आरवली मौजे रेडी मौजे आरंवदें व बागायत आणखी जिरायत नमस कट्टबाण व गांव इनाम पासोडी व हक्क लाजमा देखील नाडगौडी परगणे मजकुराची बरहुकुम पूर्व फरमान व भोगवटे सालाबादप्रमाणें सरदेसाई मशारनिल्हेस करार करून दिला असे गांव इनाम बागायत वगैरे लिहिले प्रमाणें भोगूं देणें याचे मागें याचे पुत्रपौत्रांस देत जाणे नूतन फरमानाचा हुजुर न धरणें तालीक लिहून घेऊन अस्सल फरमान परतून देणें छ १५ मोहरम सन १०७५.

फरमान अलीअदलशा बिन महमदशहा बादशहा विजापूर.

नंबर १०

विजापूरच्या बादशहाचें फरमान. इ. सन १६६४.

आज्ञापत्र कृपाळु होऊन थोरपणास पावला. लखम सावंत भोसले सरदेसाई पो कुडाळचे यास सुरू सन्न खमसशीतैन व अल्लफ या दिवसांत पितांबर शेणवी वकील तुमच्या तर्फेनें बादशाही मेहेरबानीचा चाकर खातर जमी दयानंदराव मजलसी याजबरोबर हुजूर येऊन बादशाहा यांस सन्मुख अर्ज केला तो पृथिवीपति बादशहा यांहीं ध्यानीं घेऊन कृपाळुपणें बादशहा बहुमानवस्त्रें रवाना केलीं आहेत हीं अंगावर घेऊन संतोषित होणें व सर्व कामाविषयीं हुजुरखातर जमा ठेवून कोणतेंच गोष्टीचा संशय न करणें याउपर बादशाहा मेहरबानी जलदी होऊन वतनमिरास तुह्मीं पावाल हा हुकुमाप्रमाणें योग्य निष्ठेनें चालणे लेखन ता. ९ माहे रमजान सन १०७५.

नंबर ११

विजापूरच्या बादशाहाचें फरमान.

महंमद बादशाहा विजापूर याचा सिका आहे. इ. सन १६६४.

आज्ञापत्र कृपाळू होऊन थोरपणास पावले लखम सावंत सरदेसाई परगणे कुडाळ यास सुरू सन खमस सीतैन अलफ या दिवसांत पितांबर शेणवी वकील तुमचा बादशाही दरबारीं प्रसिद्ध लौकिकाचा सलतान चालविणारा दयानंतराव मजलसी याचे विद्यमानें येऊन हुजूर अर्ज केला कीं तुह्मीं पुरातन बादशाहाचे चाकर आहां व हरएक सुभेदार होऊन तळकोंकणांत येतात त्यास मिळून त्याच्या आज्ञेप्रमाणें शिवाजीपाशीं लढतां पेशजी शिवाजीनें परगणे मजकूर येथें आपला अमल बसवून तुह्मांस परागंदा केलें आण सरदेसकतीचें काम कृष्ण सावंत करीत आहे त्यास कृपा करून आज्ञा व्हावी ह्मणून त्याजवरून सरदारांत थोर हशमास हुकुम चालविणार चांगले बहुतलौकिकाचे थोर निष्टावंत कृपे योग्य मान्य पदवीचे सरदारी लायक थोर कुळांतील दैवानें थोर थोर कीर्तिवान हिरेप्रमाणें मोतियासमान सर्व चाकरांत थोर तरवार बहाद्दर दौलतीचे खांब बादशहापाशीं थोर थोर कीर्तिवंत फार कृपेचे महमद एक खलासखां वजीर यांस परगणे मजकूर व महालानिहाय येथील सरसुभेदारी श्रीपतराव मजलसी यास कारभार देऊन पाठविले आहेत. त्यास तुमच्या कामाविषयीं सर सुभेदार व मजलसी यांस आज्ञा जाहली आहे तर तुह्मीं कोणे गोष्टीविषयीं दिकत न घेणें मिरास देसकी देखील इनामगांव वगैरे ठिकाणीं नमस कट्ठबाण वगैरा देखील तैनात पासोडी हक्क लाजिमा मीरास नाडगौडी बरहुकुम पूर्व आज्ञापत्र व भोगवटेप्रमाणें मीरास तुमची करार करून दिली असे सरसुभेदार यांस भेटून परगणे मजकुराचा बंदोबस्त करून चाकरीस हजीर राहणें तुम्हांवर कृपा होईल आण तुम्ही आपले लष्कर घेऊन सर सुभेदार यांजकडेस येणें दर असामीस रोजमुरा ३ तीन होनु मजलास होईपर्यंत महा दरमहा देत जाणेविषयीं त्यांस ताकीद असे आज्ञापत्र बरहुकूम चालणें छ २० माहे जिल्काद सन १०७५

नंबर १२

विजापूरच्या बादशहाचें फरमान. इ. सन १६६५.

आज्ञापत्र कृपाळु होऊन थोरपणास पावले हुर्मतवंतराव हवालदार व कारकून हल्लींचे व पुढें होतील पाो कुडाळ यास सुरू सन सीतसीतैन अल्लफ या दिवसांत सरदार थोर हुकूम करणार कीर्तिवंत सर्व चाकरांत तरवार बहादर लढाईचा समुद्र पोहणार बादशाही कृपेंतील महंमद येकलासखा वजीर मुखत्यार यांही हुजूर अर्जी केली कीं, लखम सावंत सरदेसाई पाो मजकूर हे कदीम बादशाही चाकर या दिवसांत कृष्ण सावंत भोंसले याणें गैर समजुतीनें समजावून देसकत पाो मारची आपले नावें करून घेतली. त्यास दूर करून कदीम लखम सावंत याजवर कृपा करून सरदेशमुखी पुरातन प्रमाणें करार करून द्यावी म्हणोन त्याजबरोन विनंति मनास आणून कृष्ण सावंत यास दूर करून सरदेशकत मशारनिल्हे लखम सावंत भोंसले यास करार करून दिल्ही असें पुरातन प्रमाणें चालो देणे व इनाम गांव देखील बागायत, जिराईत व जकात उभामार्ग व पायवाट जकात लाजिमा व गादी तंबाकु देखील बंदर वेंगुर्लें मिठागर तैनात नाडगौडी बागायत जिरायत पासोडी हर-गांवीं जकात खुमारी बाजेबाब खासगतबाब ज्याप्रमाणें भोगवटे सालाबाद तागायत साल गुदस्त रुपये लाजमा इनामत खासगी नारसावंत पुतण्या लखम सावंत याचा त्याचे असत भागीं गैरवाजवी करितात त्यास वाजवी महाजन व पितांबरधारी याचे भोगवटेप्रमाणें सालाबाद चालिले आहे या प्रमाणें चालो देणे ज्याजती करणे याचे मागे पुत्रपौत्रास चाल-विणें मुतालिक लखम सावंत सरदेसाई याणे कतबा लिहून दिला होता कीं कृष्ण सावंत मार यास धरून आपले हातीं द्यावा पंचवीस हजार होन नजर देऊं त्यास कृष्ण सावंत मजकूर यास त्याचे हातीं दिला नाहीं. या करितां पंचवीस हजार होन सोडले असत दरसाल ताजे फरमानाचा हुजुर न धरणें या हुकुमाप्रमाणें चालो देणे तालिक लिहून घेऊन असल फरमान फिरावून देणे सनद बरहुकुम चालणें छ ११ रबिलाखर सन १०७६

फरमान हजरत बादशहा महमदशाहा तख्त विजापूर.

नंबर १३

विजापुरच्या बादशहाचें फरमान.

आज्ञापत्र दिले थोरपणांत पावले व तरवारीचे बहाद्दर बहुत जवळचे पुत्र सिदी अमर दंडा राजपुरी यांस बादशहाने कृपाळू होऊन आज्ञा केली जाणिजे या दिवसांत खेम सावंत सरदेसाई परगणे कुडाळ व महालानीहाय हे सरकार कामीं एकनिष्ट व चाकरीचे व तरवारीचे बहाद्दर असून चाकरी करीत आहेत व पुढांही करतील त्यांणीं बादशाही दरबारांत विनंती केली ती हुजुर खातरीस आली येविषयीं समजणे जे मशारनिल्हे सरदेसाई खबरदारीनें बादशाही मुलखांत चाकरी बहुत करितात व पुढेंही करीतील त्यापक्षीं दिवसेंदिवस बादशाहि कृपाच होणार मोंगल यांजकडेस ममता न राखावी व सर्व गोष्टीनी हुजुर खातर जमा ठेवावी ह्मणजे तुह्मावर कृपा पूर्ण होईल असें त्यांस कळवून आज्ञापत्र पावतांच सरदेसाई मशारनिल्हे यांनिसबत वकील हुजूर रवाना करणें ह्मणजे ज्याप्रमाणें हुजुरून वकील यास आज्ञा होईल त्याप्रमाणें लिहितील तसें काम करावें जाणिजे. छ ५ माहे रबिलावल.

नंबर १४

विजापूरच्या बादशहाचें फरमान.

सिक्का आहे.

आज्ञापत्र कृपाळु होऊन बादशहाचे आश्रयानें थोरपणास पावले होत्साते खेम सावंत सरदेसाई परगणे कुडाळ महालानीहाय यांस तुह्मांवर बादशहा कृपा जहाल होऊन या दिवसांत तुह्मीं एका मनुष्याकडे अर्जी पाठविली ती बादशहा याचे नजरेस गुजरून सर्व हकीगत विदित जहाली तुह्मी आपले वडिलार्जीत बादशहाचे चाकरीवर आलां आहां व पुढांही कराल सबब मेहरबानी तुह्मांवर होणार तुह्मी सर्व प्रकारें खातर जमा ठेऊन कोणते तऱ्हेनें राजा संभाजिशीं ममता राखून मोंगल याजबरोबर मैत्री न ठेवावी बादशाही मुलख खराबी झाला त्याची मेहनत बहुत चांगली करावी तुमचे वाडवडील या सरकारांतून इनाम पावले

त्याप्रमाणें तुह्मी इनाम भोगून सर्फराजी पावाल व तुमची योग्य चाकरी हुजूरच्या समजांत येईल. दुसरे तुह्मांस हुकमजे कुमकेकरितां तुह्मी बादशाही फौजेंत येऊन पोंहोचणें आणि तुह्मांकडचा कोणी चांगला मनुष्य हुजूर रवाना करणें ह्मणजे हुजुरून आज्ञा होईल त्याप्रमाणें तुह्मांकडेस लिहून पाठवील लिहिल्याप्रमाणें कामें करून बादशहाचे हुकुमास बहुत सावध राहणें हुजुर मनुष्य येईल त्याजकडेस हुजुरून आज्ञा होईल त्याप्रमाणें तुह्मांस लिहिणार तें समजांत आणून ध्यानीं घेणें तुमचे निष्टेकरितां खातरजमा होणेंबद्दल हें आज्ञापत्र बहुत शोभा करून हस्तपंजे बादशहाचे करून तुम्हांसाठीं तुमच्या लौकिकानुरुप सर्फराज होऊन पोशाख बादशाहि देऊन रवाना केला आहे हा पोशाख घेऊन व संतोषयुक्त चाकरीवर निष्टेनें खंबीर पायीं व निश्चयानें राहणें जाणिजे. छ १५ रबिलावर परवानगी हुजूर.

फरमान हजरत महंमद बादशहा तक्त विजापूर.

नंबर १५

विजापूरच्या बादशहाचें फरमान.

जवळच्याहून जवळ खेमसावंत सरदेसाई परगणे कुडाळ व महालानिहाय सुखी असावे हुकूम पाळणारे मोठे नशिबवंत कार्यधुरंधर सर जमीनदार या दिवसांमध्यें हुजुर आकाशाप्रमाणें थोर बादशाही जाग्यांत शेवेसी हजर जाहाले त्याजकडे पातशाहा यांहीं कृपादृष्टीनें पाहून तमाम परगणे घाटांचे पायाखालील पो कुडाळ वगैरे बरोबर बक्षीस इनाम करून दिला असे पहिल्या कवलाप्रमाणें लिहिलें जातें कीं आपले खात्रीनें जमाबंदी करून परगणे मजकूरची आबादानी केली पाहिजे व रयताकडून वाजवी वसूल सरकारी व हक्क सुभा विजापूर पृथ्वी पाळणवाले यांजकडून कदीम भोगवटे प्रमाणें बक्षीस झाला आहे व अर्जोबरहुकूम कानु कायदा जमीनदारी इनाम गाव तपशील मौजे मसुरा व मौजे आरवली व मठ व होडवडें व पेंडूर व घावनळें व डोंगर मळगांव रेडी व मालवण व आरवंदें व तळवडें खुर्द व वसरगांव व चौकुळी तपें चंदगडें

एकूण तेरा गांव व शिवाय हक्क लाजमा कदीम आदलखान अमलांत हिंदमीत लिहिल्याप्रमाणें कृपा करून पुरातन दस्तुराप्रमाणें दिल्हे असे साफ दिलानें पृथ्वी आहे तोंपर्यंत पातशहाचे दौलतींतून तुमचे चाकरी-वर नजर देऊन वक्षीस दिलें गेलें आंहे ज्यावेळीं घांटावरून फौजा येतील त्या समई तुम्ही हजर रहावें आणि मार्गानें रहदारीस हरकत न होई असा बंदोबस्त करून सेवेंत हजर असावें हा लिहिलेला हुकूम फार थोर असें जाणावें ज्यादा काय लिहावें छ २१ माहे जिल्काद

फरमान हजरत बादशहा अलि अदलशहा बिन मंहमदशहा

तक्त विजापूर.

नंबर १६

सेराशरीफेचा. इ. सन १६६८.

राजीनामा शके १६१० वर्तमान प्रभवनामसंवत्सर माघ वधी दशमी सोमवार मुक्काम नणेरी तदिनी राजश्री मान धाता बल्लद कानोजी राजे प्रभावळीकर यास नारायण प्रभु बिन दादाजी प्रभु देसाई परगणे कुडाळ लिहून दिधला राजीनामा ऐसाजे परगणे मजकुरची देशमुखी आपली व जोगण प्रभु बिन नारायण प्रभूची पुरातन पिढी दरपिढी दरोबस्त चालत आली आहे ऐसियासी भोंसले याणी मुलूख लुटून खराब केला या करितां हक्क लाजिमासेत बाग कूळ बुडाले म्हणोन बहुत नातवान जाहालो त्यावरील मुलूख यात पातशाही तरुफतीस आला पुढें कीर्दीत आबादाणी करावें यासी आपणासी कुवत नाहीं पुरातन आमच्या वडिलावडिली-पासून तुमच्या वडिलाचा आश्रय चालत आला आहे याकारणें आम्हीं व जोगणप्रभु दोघे वगैरे आपली वृत्त देशमुखी एकत्रातील याचे तीन विभाग करून त्यामधील तिसरा विभाग तुम्हांस दिधला याची किमती तुम्हांपासून होन पादशाहा ५००१ पांचहजार एक आतमसंतोषें घेऊन तिसरा विभाग वृत्तिवाम वालावली खेरीज करून विकली असे तरी आपली वृत्तीचे इनाम गांव हक्क पटी व वोबाळ तैनाती व नमसी व बागसेत व घरटावावसेवा फसकी व पान माण व बाजे लाजिमामाल व

जकाती व बाजे बाबी देखील पानतीठाई विभाग करून तिसरा भाग तुमास दिला हा असे बी तपशील.

पहिला भाग नारायण प्रभू देसाई.

दुसरा भाग जोगण प्रभु देसाई.

तिसरा भाग मानधाते व० कानोजी राजे प्रभावळीकर.

येणें प्रमाणें बराबर वाटून खावे आमी आपले आत्मसंतोषें तुम्हांस धाकटे भाऊ केले असे तुह्मीं आपले पुत्रपौत्र आपला विभाग खाऊन सुखे असावे व आमी आमचे पुत्रपौत्री येणेंप्रमाणें चालवावे या वेघळे नवी वृत्ति दिवाणातून जे साधोन येईल ते त्रिवर्गी बराबर वाटून खावे. आमचा डाईज गोत्रज शकवक करितील तरी त्यास आह्मी वारु तुह्मांस या गोष्टीचा संबंध नाहीं. आमी परगणे मजकुरास गेले यावरी थळचे माहाजर करून देऊन हे गोष्टीस अंतर पाई तरीं गुन्हेगार व आपले कुलदेवता व पूर्वजाची आण असे व गोताचे अन्यायी हे लिहिले राजीनामा सई छ २४ माहे रबिलाखर सन हजार १०९८ तिस्सा समानैन अलफ बी कलम दादाजी प्रभु देसाई ता। साळसी मामले प्रभावळीकर. (अक्षरें गेलीं) सी मामिले प्रभावळी नारायण प्रभु सही जोगण प्रभु देसाई.

मोर्तब सा। मोर्तब

(अक्षरें गेलीं आहेत.)

नंबर १७

रामराम श्रीदेवदत्त.

श्रीमंत सकलगुणाअलंकरण सौजन्यकनिकेतन राजमान्य राजश्री नारायण प्रभु देसाई प्रा। कुडाळ गोसावी यासी प्रति पूर्वक कान्होजी राजे प्रभावळीकर तुमी आपली वृत्ति तिसरी तक्षीम आमास दिली जे खेमसावंत आपणावर जोरावर होऊन त्यास देसकतीचा अधिकार नसतां आमची वृत्तभूम खातो यास मारून काढणें आणि तुमी आमचे तिसरे भाऊ होऊन दिले प्रमाण देशमुखी चालावणें ह्मणवून तुह्मी वृत्तीची पत्रें उभयवर्गी दिली तो आमी मुबा कबूल केला असे यास तुम्हीं तुळापूरीचे

मोकामी मागतेन आलेत तेव्हां स्वारी तुम्हाबराबर देऊन कोकणामध्यें रवाना करावे तंव आम्हास हुकूम चंदीस जाण्याचा जाहाला त्यावरून तुमी आपलीं पत्रें फिरावून मागतलेत लिहिले प्रमाणे कार्य होऊन आलें नाहीं उगेच वतनदारास गुतवावें काय निमित्य याकरितां तुमची पत्रें फिरावून दिली व आमचे पैका जोगण प्रभु देसाई याचे गुजारतीनें मणेरीचे मुक्कामी दिले होते ते आमी आपला दि (अक्षरें समजत नाहींत) घेतला.

नंबर १८

राजश्री नारायण प्रभु सरदेसाई गोसावी यास.

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो कानोजी आंग्रे सरखील राम राम विनंति सुा मयां व अल्लफ तुह्मीं विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन वर्तमान विदित जहालें भेटीस यावयाचा अर्थ लिहिला ऐशास राजश्री विसाजी राम मोत पाटणीं येतील त्यांजपाशीं वर्तमान जें असेल तें सांगणें आण मशारनिले जंजिरा आल्यावरी तुमचे मसलत जे आसतील त्याची विल्हे कर्तव्य ते केली जाईल. तुह्मी आपलें समाधान असों देणें जाणिजे रा छ १५ माहे रजब. बहुत काय लिहिणें तूर्त तुह्मांस दोनसें खंडी गल्ला गडींपैकीं देविला आसे. घेणें.

मोर्तब.

नंबर १९

कोळंबेकर पुरोहित यांस भूमिदानाबद्दल दिलेला शासनपटा.

इ. सन १६७६.

॥ श्रीगणेशायनमा: श्रीशर:श्वत्यनम:

॥ श्रीगुरुभ्योनम: श्रीकुलदेवताप्रसन: ॥

॥ अनंतभट बीन हरभट कोळंबेकार॥

॥ विनायकं गुरु भानं: ब्रह्मावीष्णु महेश्वर: शरस्वती प्रणी माधव: ॥ सर्व कार्यार्थ सीधं: ॥ ॥ श्वस्ती श्री नृप शाळीवान सके १५९८

॥ वर्शे प्रवर्तमान वेव्हारीक नळनाम संवत्सेरे आश्वीन वध प्रतीपदा गुरु-
॥ वारी खेमभावंत भौसुले सरदेसाई परगणे कुडाळ यानी बेदमुर्ती
॥ राजश्र पुरोहीत यास लीहुन दिला भूमीदानाचे ससन यैसाजे आमचे
॥ वडीले लखम सावंत वैकुटवासी जाहाले त्याचे दाहावे दीवसी भुमी
॥ दानासी आमचे इनामत सेत कसबा कुडाळ ते पैकी टीकण बाा तळे
॥ तुह्मासी मेर करुन दीले याचे चतुरसीमाः
॥ वीडख हरबा मादरेकर याचे सीमाः ॥
॥ पुर्व दीसे............दक्षीण दीसेः पछीम दीशा माड उत्तर दीसाः
॥ मेरेनमेर............खडक मरनमेर गाची मेरनमेर बावीची मेरेनमर
॥ या चतुरसीमामधील भुमी व टीकण येकुण हरसाला कुबळे भात
॥ भरे २॥. अडीच भरे हे तुह्मास जलमन्नभाभे भुमीदान साभन दीले
॥ आहे ते तुम्ही वा तुमचे जालेजातेने जलमात्र भासे यावश्चद्रार्कवरी
॥ सुखें भोगावे आम्ही व आमचे जालेजातेने वा जात प्रजातने पाळावे
॥ म्हणोन भासन सही.

मोर्तब फारशी हर्पाचें.

नंबर २०

दिल्लीच्या बादशहाचें फरमान.

इ. सन १६९०

सिक्का आहे.

बादशाही ताबेदार खेम सावंत बादशाही कृपेस योग्य उमेदवार जाणून या दिवसांत अर्जदारास शूरत्वाच्या योग्य पूर्ण कृपेंतील बहादरखान यानीं सर्व श्रेष्ठ बादशहा याच्या मजालशींत मशारनिल्हे याणी विनंती केली जे संभा खोटा व हरामी याच्या किल्ल्यांस व तालुक्यांस वेढून यत्न प्रयत्न करून ठाणीं तळकोंकण अदलखानीं स्थापावयास तुम्ही उमेदवार आहां व सरदेशमुखी परगणे कुडाळची पुरातन प्रमाणें बहाल व्हावी यास्तव तुह्मांवर कृपाळू होऊन पुरातन प्रमाणें सरदेशमुखीं परगणे मजकुरची इनाम दिली पावाल व उत्तम रितीनें बहुत मेहनत करून दौलत मिळवाल आण दरबार आकाशाप्रमाणें थोर याची

निष्ठेनें चाकरी केल्यास तुम्हांस बरवेपण व सामर्थ्य व दौलत आपली जाणिजे आण करार केले प्रमाणें आपले बरवेपणासाठीं ठाणीं बसवणें व बादशाही निशाणी फत्ते लष्करास खर्चामाफक रसद पोंहोंचवणें आणि आरमारी जहाजानें जलमार्गे नीट येण्याकरितां कोंकणामधीं बहुत मेहनत करणे हे विषयीं हुकूम जाणिजे छ ६ मोहरम वर्ष ३२ बादशहा तक्तारुढ जाहल्यापासून फरमान अलमगीर बादशहा २

नंबर २१

दिल्लीच्या बादशहाचें फरमान.

सिक्का आहे. इ. सन १६९०

देशमुख व देशपांडे व रयतान व कमाविसदारान परगणे कुडाळ जाणों कीं थोर व तरवार बहादर खेमसावंत वगैरे बहुत दैवाचें जाणून दरबार आकाशाप्रमाणें थोर यांजकडेस चाकरी करून रुजुमनसब पांच हजार जातीचे व चार हजार स्वार व मुलाची मनसब दोन हजार जातीचे व हजार स्वारानिशी दरबारची चाकरी आहे यास्तव सर्फराजी होऊन परगणे मजकूर व जहागीर खर्च खुद्द जातीचा व मुलाचा खर्च हुजुरुन करार जाहला ऐवज महाग वाजवी देणें सरकारचे हंगामी समया बरजाबते प्रमाणें करार सरकारकून जहागीरदाराचे ऐवज देत जाणें आज्ञेबाहेर न जाणें सरकारकून यास ताकीद जे जहागीरदार याचे रजा तलबेंत वर्तणूक करणें व रयतेस चांगली वाजवी रीतीनें रजावंत ठेवून लावणी करवून व बहुत आबादानी राखून वहिवाट करणें हे विषयीं ताकीद असे छ १ रबिलावल सन ३२ बादशहा तक्तारुढ जाहल्यापासून.

बहादरखान अमीर अलमगीर बादशहा.

नंबर २२

दिल्लीच्या बादशहाचें फरमान.

सिक्का आहे. इ. सन १६९०

ताबेदार बादशहाचे खेमसावंत बादशाहि इनामायोग्य उमेदवार जाणून तुम्हावर कृपा मेहरबानी अधिकाधिक ईश्वराची असे संभा बहुत

हरामी महत्पातकी खोट्या कामाचा नाकारा पसंत नव्हे जाणून यशवत लष्करांत अटकाविला असतां एकीकडून पळाला व रामादेव बिन दरीपूर्ण यशवंत लष्करास भयाभीत होऊन आडमार्गे रानांत पळाला त्यास साम्रत चांगला बंदोबस्त मजबुतीनें व्हावया करतां पूर्ण कृपेतील अबदुल रजाकखान बादशाहि जहाजाकडेस सर्वत्रीं पहाणार यास्तव कृपाळू होऊन लष्करची सरदारी व तळकोंकणचा सुभा दिला असे तरी तुम्ही याजबरोबर रहाणे उर्जीतास पावाल तुम्ही बादशाही तावेदार त्यापक्षीं बरोबर फौज चांगले स्वार व प्यादे घेऊन हमेशा खान मजकूर यांजबरोबर रहाणें आणि त्याचे आज्ञेबरहुकूम मजबुती करणें म्हणजे तुमचे चाकरी जाणून इजत थोरपणा बादशाहि समजांत येईल पृथ्वीपति पालक सूर्यप्रकाशवंत समर्थ रयतेची आबादानी करणार बादशहा याजकडेस आपली चाकरी दाखवून पुढें उमेदवारीनें निष्टेनें उदंड सेवेचे इच्छेनें नेहमीं रहाणें छ २७ रजब वर्ष ३२ बादशहा तक्तारुढ जाहालेपासून. लेखन असे.

नंबर २३

दिल्लीच्या बादशहाचें फरमान.

सिक्का आहे.

छ जवळचे पेक्षां जवळ बहुत थोर व बहुत विश्वासू संनिध तरवारीचे बहादुर खेमसावंत इनामायोग्य व कृपेचे उमेदवार जाणून या दिवसांत अर्ज केल्याप्रमाणें बादशहा पृथ्वीपालक दरबारांत तक्तारुढ असोन आज्ञास्वरूप यांणीं तुमचे नांवें जाहागिरी चालती होणेंस हुकूम केला जाणून व पुर्ते समजेनें तुम्ही कर्तृत्वाचे पूर्ण यास्तव आज्ञापत्र सादर जहालें असे तर फौज चांगली बहुत खातरजमेची बराबर घेऊन लष्कर यश्वंतपूर्ण तरवार बहादर येथें येऊन पोंचणें या हुकुमाप्रमाणें सादर होणें म्हणजे बहुत प्रीतीचे रीतीनें इनाम इच्छेनुरूप मिळेल छ १ जिल्काद थोर महिन्यांत कागद लिहून तयार.

फरमान हजरत बादशहा मोदुदीन तक्त दिल्ली.

नंबर २४

दिल्लीच्या बादशहाचें फरमान.

सिक्का आहे. इ. सन १७०६.

जवळचे पेक्षां जवळ ताबेदार बादशहाचे खेमसावंत इनाम घेणेस उमेदवार होऊन अर्जी केली होती ती पृथ्वी रक्षण करणारे दरबार आकाशाप्रमाणें थोर येथें येऊन महालांत दाखल करणार यांच्या हातीं बादशाही तक्ता जवळ फौजेचे पालनवाले बादशहा यांचे नजरेस गुजरिली अर्जी केल्या प्रमाणें सयद गजफर अल्लीखां याजबरोबर खातरजमेचे सरंजाम चाकरी दरबारांत केली याजकरितां सरदेशमुखी व मनसब जमेदारी तुह्मांस कृपाळूपणें इनाम दिली असे लष्करची अंमलदारी फोंडेची सयद मजकुरास करार केली कारण चित्तापासून बहुत कृपेनें इनामास योग्य समजून करार केला याजबरोबर बहुत मेहनत करून सर्व सरंजाम त्वरित देणें तुह्मी उमेदवार जाणून इनाम व कृपा बादशहाची बहुत यास्तव हे ताकीद जाणिजे छ ११ जमादिलावल सन ४८ बादशहा तक्तारुढ जाहल्यापासून लिहिला असे.

फरमान अलमगीर बादशहा तक्त दिल्ली.

नंबर २५ इ. सन १७०४.

बो हुजूर सुभा विज्यापूर याणीं अजम नारायण प्रभु देसाई प्रा कुडाळ वा ह्मालानिहाय सुा खमस मयांते तुह्मी हुजुर येऊन अर्ज केला कीं प्रा मजकूरचे देशक पुरातन आम्ही पिढी दर पिढी चालत आहे त्यास देसगतीचे देहाय हक्क वा इनामती वा नमसी वा बागा वा वोंबळ तेनाती वा म्हासुली येणे प्रमाणें वतन आहे तेणे करोन जमावाची बेगमी होत नाहीं याकरितां साहेबा मेहरबान होऊन ज्याजती द्यावें म्हणोन अर्ज केला तो मालूम होऊन तुम्ही सरकार चाकरीस इमानी यैसी खातरी जहाली त्याजवरून मेहरबान होऊन तुम्हांस पुरातन वतन सदरीं लिहिलें आहे तें खेरीज करून ज्याजती दरसाल निशाणी होन १००१ऽ एक

हजार एक प्रा (मजकूरचे ऽ) मामचे जंमींबदात दिले तुम्ही व तुमचे आवलाद हाफलाद यासी चालविले जाईल. भोगवट्यास तुम्ही देशक केला सबबां हें फरमाण तामर पत्रावर दिल्हें असे. तेरीख २ शाबान.

नंबर २६

राजश्री खेमसावंत भोंसले सरदेसाई प्रा कुडाळ व
महालानिहाय गोसावी यास.

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य प्रती राजश्री राजा शाहू छत्रपति उपरी सांप्रत स्वामी प्रसिद्धगड प्रांतें आलियावरी पाटगांवींचे मुकामीं तुम्ही आपणाकडील राजश्री विश्राम शेणवी राजश्री जिवाजी शेणवी स्वामी समीप पाठविले त्यांनीं तुम्हांकडील भावभक्ति एकनिष्ठतेचा प्रसंग कितेक विदित केला कीं आपण या राज्यांतील पुरातन वतनदार या राज्यासी पहिलेपासोन एकनिष्ठतेनें वर्तणूक करीत आलों प्रस्तुत स्वामी या प्रांतीं आले स्वामीचे पायांसी सर्व प्रकारें एकनिष्ठ होऊन वर्तणूक करावी हा निर्वाद केला आहे. तरी स्वामी कृपाळू होऊन आपलें उर्जित करून चालविलें पाहिजे म्हणून तुमची विनंति उभयतांनीं केली त्यावरून तुम्ही एकनिष्ठ प्रामाणीक जाणून स्वामी तुम्हांवरी कृपाळू होऊन तुम्हांस इनाम करून दिल्हें असे बी ताा.

सुभा पाा कुडाळ; कित्ता महाल—तर्पे बांदें, तर्पे पेडणें, तर्पे डिचोली, तर्पे सांखळी, तर्पे मणेरी, तर्पे साळसी निमे. सुभाप्रांत फोंडेंपैकीं इनाम गांवः—५ तर्पे अंबुज—मडकई, पिरखटी, वेरें, बेतगी, पंचवाड; २ तर्पे अष्टाग्रहार—रेवण, नेत्रावली; २ ताो हेमाडबारसें—बांदोडबारसें, सीगांव; २ ताो बललीखेंडार—सुलखण, फातरपें; २ ताो चंद्रवाडी—काकवडे, सेलवण; =१३. सुभा अकोलें पैकीं इनाम गांव. २ तर्पे कदें, हणकोण, इट्टगें; २ ताो सिवेश्वर—माजाळ, चिताकूळ; २ तर्पे अकोलें—आवरसें, आलकेरी; २ तर्पे कडवाड—आमदळ, बाड; २ तर्पे आडवाट - १ तगरसें, १ किजलें=१० किता सुभे हाय व महाल पैकीं इनाम गांव. २ ताो खारेपाटण—धावकवली, नांदवडें; २ तर्पे सोपल—विलियें,

डोंगर; २ तर्पे चांदगडें, १ अटकूर, इश्रामपुरी. २ तर्पे आजिरें—१ देवर्डे १ इटें; २ तर्पे खानापूर—मौजे सेणगांव, मौजे ल्लसवें. २ तर्पे टिकरी खानापूर १ टागुर्डे, १ हस्तवाड=१२

तेरीज गांव—१३ कित्ता, १० कित्ता. १२ कित्ता,=३५.

येणें प्रमाणें माहाल साडेसहा व गांव पंचतीस कुलबाब कुलकानू खेरीज हकदार व इनामदार करून इनाम करून दिल्हा असे तरी तुह्मी व तुमचे वंशपरंपरेनें भोगवटा करणें स्वामी व स्वामीचे वंशपरंपरेनें चालवितील. सदरहु साडेसाहा माहालामध्यें स्वामीचे गडकिल्ले आहेत त्यांस तनखा इस्ताद आहे तो सालगुदस्तप्रमाणें किलि याचा किलि यास ऐवज पाववीत जाणें स्वामीनें तुह्मांस इनाम करून दिल्हा आहे. त्यास तुह्मी स्वामीचे पायांसी एकनिष्ठेनें वर्तणूक करावयास अंतर न करणें. स्वामी तुमचें चालवावयास अंतर करणार नाहीं जाणिजे छ ७ मोहरम बहुत काय लिहिणें.

नंबर २७

श्री इ. सन १७१८.

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४४ हेमलंवी नाम संवत्सरे कार्तिक बहुळ ५ भोमवासरे क्षात्रिय कुलावतंस श्रीराजा शंभु छत्रपति स्वामी यांणीं

राजश्री देशाधिकारी व कारकून वर्तमान भावी सुभा परगणे कुडाळ यांसि आज्ञा केली ऐसीजे. जोगण प्रभु देसाई परगणे मजकूर हे पूर्वी कोट कुडाळ येथें होते त्यास खेम सावंतानें कोटास परीघ घालून कोट हस्तगत केला ते समई वरी शर्त करून जोगण प्रभु स्वामी कार्यावर खर्च जहाला. त्याच्या बायका काशीबाई व येसुबाई उभयतां आहेत त्याचा योगक्षेम चालवावा हें स्वामीस आवश्यक यास्तव स्वामी उभयतां बायकांवर कृपाळू होऊन शंभर होन निशाणी होनांचा गांव इनाम द्यावा असा सिद्धांत करून यांस नूतन इनाम कुलबाब कानु खेरीज हकदार व इनामदार करून मौजे अंडेली तालुका तळवडें हा गांव इनाम अज-

---

१ हा गांव हल्लीं इनाम चालत नाहीं. खालसाकडे आहे.

रामत करून दिला असे तरी तुह्मी मौजे मजकुरीं सदरहु प्रमाणें इनाम यांस नेमून देऊन बायकांचा योगक्षेम चालवून सुखरूप रहात ते गोष्ट करणें साल दरसाल ताजे सनदेचा उजूर न करणें. तालीक लिहून घेऊन अस्सल सनद परतोन देणें जाणिजे निदेश समक्ष.

"मोर्तब"

नंबर २८

कौलनामा.

इ. सन १६३५.

कौलनामे श्रीमंत खेमसावंत सरदेसाई परगणे कुडाळ सुहुरसन्न सीत सलासीन अलफ कारणे अंत शेणवी बिन नारशेणवी यार्दी नाडकर्ण व मिरासी चिटणवीस परगणे मजकूर यासी दिल्हा कौलनामा ऐसाजे. तूं कदीम मिरासी चिटणवीस पइले तुजे आजा अंत शेणवी चिटणविशी चालवित असतां तुजे बाप नार शेणवी यासी हरकारगी मिरास देसाई याणीं मोकरर करून दिवाण चाकरीसी ठेविले होते. येणें प्रमाणें आमचे वडील वडिलांनीं तुमचे वडिलासी मिरास करून देऊन तेणें प्रमाणें हुजती फर्मान हुमायून बादीवन आलेले आणवून मिरास चिटणवीसी व हरकारगी तुमचे पिडी दरपिडी भोगवट करून दिवाण चाकरी यकसान होऊन चालवीत आले व हालीं तुमी चालविता ती तुमचे मुशाहिरा कदीम चिटणवीसीचे यार्दी नाडकर्णी यामध्यें तकदीम होते व हरकारगीचे मुशाहिरा आलाहिदा कानुनी होते तनाहातान जालेवरी गावगन्ना पटीया होते ते तमाम कुलबाब मोकासा याचे दुबले जाले तेमध्यें तुमचे मुशाहिरा पट्या दुबले होऊन गेले व महाताज मध्येंही मुधो पंडित सुरुम मालिक मजुमदार परगणे मजकूर दीदर मुरारी पंडित याने वरअकसकरितां तनखा असल घातले नाहीं तुमचे पुरातन मिरास चिटणविसी व हरकारगी देशताल माचीचे तुमी भिन मुशाहिरा चाकरी करितां ती व आमावरी यकसान होऊन आमच्या सेवे यकनीयारी असता दखोन आमी तुमावरील संतोषोन तुमचे मूल गंगाधर शेणवी यासी हरकारगी देस तालुका तिचे मिरास मोकरर करून

देऊन यासी मुशाहिरा सालिना तिला होनु ३६ मोकरर करून खेरीज हक्क मोकासा इसा दिल हरीपटी करून देऊन दिवाण खिजमतीसि ठेविले असे तरी गंगाधर शेणवी मजकुराची दिवाण खिजमतीसी लाऊन सदरहू मुशाहिरा सालबसाल होऊन तो व त्याचे अवलाद अहवयाद सुके भोगवटा किजे.

नंबर २९

कौलनामा.

इ. सन १६५४.

कौलीनामे श्रीमंत लखम सावंत देसाई परगणे कुडाळ सुरु सन खमस खमसेन अलफ ताहां शेटिये वो महाजनांनी वो बकालांनीं कसबा पा मजकूर यांसी दिला कौलनामा ऐसाजे. तुमी येऊनु सांगितलें जे मोईनी वो दिवाण बाब अवल साली आपणापासून खडे मसाले शिवा वरात करून घेताती ते करितां आपणाचाने तकादा सोसले न जाय चार खेपे प्रमाणें सर्ती विलायत आपण पासून पैके घेऊनु आमचे निसबतीचा माणूस दिवाण तिजणुकेस वो आपले हरएक कारबाराशीं ठेवणें. त्यापाशीं ४ चार खेपेनें पैके देऊं तयानें दिवाण तिजणूक करावे आपणास तोसीस तकादा नलगे ऐसें करणें ह्मणुनु तरी आतां तुमचे हवाल मनाशीं आणून तुमचे मोईनी वो दिवाणबाब आमी आपले निसबत करून घेऊन दिवाण तिजणुकेस वो हरएक तुमचे कारबारासी आमचे निसबतीनें रामजी फर्जद पितांबरधारी चिटनीवीस यांसी ठेविलें असे तुमी त्यापाशीं खेपे ४ प्रमाणें मोईनी वा दिवाण बाव वा गावसिर्दी बकालांनीं जे दिवाण रुपयेचे तिजणूक असे ते ४ खेपेनीं अवल सालपासून ह्मईने ९ नवमधें झाडा करून सालबेसाल देणें वो सेणवी मजकुराचे (अक्षरें गेलीं) दीनें दिवाण तिजणूक व हरएक कारबार चालवणें. येणे प्रमाणें तुमास ठाणेचे कौली करून देर्घाले असे. तुमी हरएक विसीं खातीर जमा करून चूक मापीनें वारमाहा साला देऊ जाणीजे छ १ माहे जमादिलावल.

नंबर ३०

चिटणीस यांचे कागद त्यांस परत देण्याबद्दल आज्ञापत्र.

इ. सन १६७६.

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक ३ नळ संवत्सर मार्गशीर्ष शुध द्वादशी बुधवासरे क्षत्रिय कुलावतंस श्रीराजा शिव छत्रपति यांणीं राजश्री बाळाजी

सिक्का आहे

सुा देशाधिकारी ताा कुडाळ यास आज्ञा केली ऐसीजे. पितांबर शेणवी यास दस्त केले ते वेळेस याचे कागदपत्र वृत्ति समधें पहिले व हल्लीं व वरकड खासगत कागद आणून तुम्ही ठेविले आहे ती ते जे असतील ते याचे यास देणें अनमान न करणें फर्मान व पटे असतील ते तमाम देणें.

शिका.

नंबर ३१

चिटणीस यांचे हक्काबद्दल सनद.

इ. सन १६८३.

राजश्री भानजी गोपाळ सुबदार व कारकून पाा
कुडाळ गोसावी यासी.

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य

स्नेहंकित कवी कलश आशिर्वाद सुरु सन आर्बा समानीन अल्लफ. माा जिवाजी राम चिटनिवीस सुद माा पाटगांवीचे माो विनंति केली कीं आपला वडील पितांबर शेणवी याचे यदीलशहाचे कारकीर्दीस चिटनिशी व हर कारागिरी मिरास पाा मजकूर माहाल देसतालयत मुशाहिरा चिटनीशी होन निाा ४४ चवेताळीस व हरकारागिरी ३६ एकूण ८० ऐशी बमोजी हतकशीक कानुवत निा विलातीवर होते व इनाम वाडी-वरावडें मौजे नेरुर व वाडीहुबरमळा मौजे अणव कुलबाब कुलकानु व कुळकरण माहाल जकात देखील बंदर वेंगुर्लें यास मुशारा तैनात कुल व सालास दरसदे होन १ प्रमाणें व विस्वा हर जिन्नस केणें १ चरीस दर गोणींस रुका एक बाा फर्मान हुमायून भोगवटा सालाबाद कारकीर्द

सासलमान चालत आलें ते हाली साहेबांस मुलुक आर्जानीं जालीयावर दिवाणांत नेम जाहले हें वर्तमान राजश्री बाबाजी नाईक पुडे याचे विद- माने राजश्री कैलासवासी स्वामीचे सेवेस विनंति करून सालिना नि॥ ४०० चारशें द्यावयाचा तह करून सनद छ १ रबिलावल सन सबैन करून देवविली तेणें प्रमाणें दरहरसाल चालिले त्यावरी आपला वडील पितांबर शेणवी देवाज्ञा जाले आपण सु॥ चिटनिसाचे चाकरीस राहिलों त्यास वतन बारमाहे नि॥ होन पांच ५ तह करून दिल्हा पेशजी चारशें होनांत खर्च पडोन चाकरी करीत होतों. हल्लीं पांच होन पावतात. येणें करून आपला अवकात चालत नाहीं पहिले पालखी चालत होती तेही राहिली कुंटुंब वत्सल चालिलें पाहिजे. हाली स्वामीनें कृपाळु होऊन पारपत्य केलें पाहिजे ह्मणोन विनंती केली व पहिले चारशें होनाचा तह राजश्री कैलासवासी स्वामीनें करून सनद दिल्ही होती तेही आणून विदित केली त्यावरोन कचें वर्तमान पहिल्यापासून मनास आणून जिवाजी राम याची सरंजामी केली असे सालीना नि॥ होन १००

पेशजी चालिले ता रु॥	हालीं इा अवल साल सन खमस पासून
गुदस्त नि॥ सालीना ६०	कृपाळु होऊन सरंजामी केली नि॥ ४०

एकूण सालीना एकशें निशाणी केले आहेत येणें प्रमाणें तुह्मीं दरहरसाला ताजे सनदेचा हुजूर न करितां हरसाल शंभर होन नि॥ पैकीं आदा करीत जाऊन याचे हातें चिटनिसाची सेवा घेत जाणें तालिक लिहून घेऊन असल सनद जिवाजीराम यासाठीं देणें. रवाना छ १ जमादिलावल.

बारसुद.

नंबर ३२

रहदारी मालावरील हक्काबद्दल चिटणीस यांस दिलेली सनद. इ. सन १६८५.

श्रीमंत राजश्री खेमसावंत भोंसले सरदेसाई पा॥ कुडाळ व महालांनीं हाय ताहा वाणी महानांड परदेशी व वाणी उदमियानी तळघांट सुहूर सन सीत समानीन अलफ मा॥ जिवाजी राम चिटणीविस पा॥ मजकूर

यास विस्वा बाा फर्मान हुमायून व खुर्द खतें मोकासाई घाट आहे चालिलें आहे तें आलिकडे शिवाजी राजे यांचे कारकीर्दीमधें चालिले आहे ऐशी यास हल्लीं माा जिवाजी राम चिटनीविस हुजुरांतील आह्मांपासीं आहे ती यावरी कृपाळू होऊन बाा भोगवटा सालाबादप्रमाणें दर गोणीस एक बैलास थळ भरीत हासल मवाफिक रुका ८१८ एक चालिले तेणेंप्रमाणें विस्वा शेणवी मानुलेच कमाविसदारापासीं देणें अनमान न करणें छ १७ मोहरम तालिक लिहून असल परतून देणें.

मोर्तब.

नंबर ३३

कौलनामा.

इ. सन १६९१.

मशरुल भोंसुले व सुभेदार व जुमलेदार व लोकांनीं यांसी खेमसावंत भोंसले सरदेसाई परगणे कुडाळ व महालांनींहाय सुहुर सन इसन्ने तिस्सैनं अलफ. बाग मळेवाडी येथील बाजार खराब पड पडला होता ऐसी यास माा जिवाजी राम शेणवी चिटनिवीस याची बाग माा इनामत त्यांस दुमाला करून वाणी उदमी व रयतास कौल सादर केला आहे सुखरूप येऊन मामुरी करितील; उदीम वेवसाय करितील. तुमी कोणी त्यांस वेठ बेगार अगर तसवीस तकादा कराल तरी करावयास कारण नाहीं. सुखरूप बाजार मामुर होऊं देणें. छ १६ जमादिलावल.

नंबर ३४

दुमाला दिल्याची सनद.

इ. सन १६९१.

राजश्री बाळाजी बोरकर नामजाद व कारकून ताा आजगांव यांस खेमसावंत भोंसले सरदेसाई पाा कुडाळ व महालानीहाय सुहुर सन इसन्ने तिसैन अलफ. बाग मळेवाडी ताा माा हें बाग माा जिवाजी राम चिटनिवीस याचें पुरातन इनाम याबद्दल हल्लीं बरहुकूम सनद नबाब शिवाजखान शेणवी मााईलेस दुमाले केलें आहे तरी तुह्मी बाग माा त्याचे दुमाले करणें तालीक लिहून घेऊन असल सनद फिरावून देणें.

छ २९ रा ख　मोर्तब

बारसूद.

नंबर ३५

इनामाबद्दल सनद.　इ. सन १६९६.

मशरुल बाळाजी बोरकार (अक्षरें गेलीं) गाऊ यांसी खेमसावंत भोंस देसाई प्रो कुडाळ व महालानीहाय सुा सबातिसेन अल्लफ विठल पुंडलिक याणे हुजूर येऊन सांगितले जे मौजे नाणोस येथें आपुले कुळकर्णाचे नमस जोवती मडवळ सर्द व वाईगण आहे तें साहेबांनीं आपणास द्यावें ह्मणोन अर्ज केला त्यावरून मेहरबान होऊन नमस सदरहु शेत विठ्ठल पुंडलिक यासी इनाम दिलें आहे. तुवां याचे वाटे न जाणे रा छ २३ जिल्हे.

मोर्तब.

बारसुद.

नंबर ३६

चिटणीस यांस हक्काबद्दल दिलेली सनद.

इ. सन १६९७.

राजश्री कारकुनानीं तर्फ हाय प्रा कुडाळ यास खेमसावंत भोंसले सरदेसाई पा कुडाळ व महालांनींहाय सुा समान तिसेन अलफ. जिवाजी राम चिटनीवीस याचें हक्क कारकीर्द आदले शाई चाललें आहे अज होनु नि॥ ८० ही व हक्क चिटनिसी बा पैरवी हकदार कारागिरी देस नाडकर्णी पैकीं ४४ व ता ३६ एकूण होनु ८० गावगन्ना सालाबाद चालिले आहे पटी अलाहिदा आहे त्याप्रमाणें गांवचे गावावर जमा धरून वसुले घेऊ रसद पाठवणें तालीक लिहून घेऊन अस्सल परतून देणें छ १५ जमादिलावल.　मोर्तब

बारसूद.

नंबर ३७

श्रीदेवास इनाम दिल्याची सनद. इ. सन १७०३.

मो कृष्णभट कमाविसदार मुकासे गाऊ व तालुका आजगांव यास खेम सावंत भोसले सरदेसाई प्रा कुडाळ व महालानीहाय सुा आर्बा मया अलुफ. शेतकरी मौजे मळगांव हें मागां श्री मौजे कालेली गुा वाळ सावंत म्हालटकर अमानत करून साला होनु देणें म्हणोन सनद पेशजी चालली होती असेस हाली मनांस आणून कुली सदरहु ठिकण श्रीस देविलें असे सोडून देणें रा छ १४ रमजान.

मोर्तब.

बारसुद.

नंबर ३८

दस्तीबाद सनद. इ. सन १७०४.

मशरुल विसो गणेश यास खेम सावंत भोंसले सरदेसाई पा कुडाळ व महालांनींहाय सुा खमस मयां अलफ. हरभट सातोसेकर यास मौजे सातोसें मधें घराजवळील कुणगा व चिंचेचेपातीचा कुणगा एकूण कुंबळें .।१० दीड खंडी साल गुा सोडिलें होतें ते प्रों साल मारीं सोडीलें असे दस्तीबाद देणें रा छ ११ जमादिलावल. पुरातन प्रों सदरहु सोडिलें असे दस्तीदाद देणें. मोर्तब.

बारसुद.

नंबर ३९

वसूल परत देण्याबद्दल ताकीद. इ. सन १७०४.

शेखा गांवकरान कसबा बांदें. सुा खमस मयां अलफ रामभट गोसावी कसबे मजकुरीं आहे त्याचे खतेस पटी धरितां ती एकंदर यास पटी सरदेशमुखी देखील गावपटी न घेणें. साडेचार होनु याकडे पटी घेतली आहे ते होन याचे फिराऊन देणें याउपर यास उपद्रव न करणें. छ १६ रमजान मागती फिर्याद येऊं न देणें लावणचिठी करून दिली प्रों कुबळें देणें मोर्तब.

नंबर ४०

वजाकरीबद्दल सनद. इ. सन १७१४.

रोखा गाउकरान मौजे कालेली सुा खमस अशर मयां अलफ. नमस शेत कमाविशी गोंद सावंत म्हालटकर यासी ठिकणें पो धर्मादाव चार होनु सनद दिल्हा आहे यास दाणातूप मुडेपटी वतनबाव सालाबाद प्रो मना केलें असे छ ५ मोहरम.

मोर्तब.

बारसुद.

नंबर ४१

देवस्थान इनामाची सनद. इ. सन १७१५.

श्रीमंत राजश्री नार सावंत भोंसले सरदेसाई प्रो कुडाळ व महालांनीहाय. ताहा गांवकरान कसबा बांदें सुा सब्वा अशर मयां अलफ. श्री संकर नारायण यास कसबे मजकुरचीं ठिकणें दत्त करून दिली असे.

कित्ता ठिकणें.	पानवळपैकीं ठिकण व नाईक
नारळ कुंबळें सर्दवनिशाणी होनु	कटवण होनु ।. व नारळ ३७ झा
१००० १॥।	।.

एकूण ठिकणें दोन एकूण कुंबळें नारळ एक हजार व निशाणी होनु दोन दत्त करून दिलें असे. साल दरसाल याकडे चालों देणें. तालिक लिहून घेऊन असल फिरावून देणें छ १२ जमादिलाखर.

मोर्तब.

बारसुद.

नंबर ४२

जात इनामाबद्दल सनद. इ. सन १७१९.

श्रीमंत राजश्री फोंडसावंत भोंसले सरदेसाई प्रांत कुडाळ व महालांनीहाय. ताहा गांवकरांनीं कसबा नारूर सुा अशरीन मया अलफ वेदमूर्ती रा॥ हरभट जोतशी कसबा मजकूर थोर ब्राम्हण सत्पात्र

(अक्षरें गेलीं) करितां यास इनाम शेतें कुंबळें सर्द ठिकणें बी तपशील कुडाळी मापें.

.।।।१० खेमराई याचें फोंड पश्चिमेकडील ठिकण १ ए.

.।।१० ठिकण तळें.

१।।

एकूण सहा खंडी कुंबळेंची जमीन दत्त करून दिल्हें आहे दस्ती बाद देणें आण कुलकानु व बाब व गांवपटी वेठबेगार कांहींच याकडे न घेणें ठिकणेंच बाद दिल्हीं असत बाद देणें हा भोगवटेचा कागद या करितां या पत्राची तालिक गांवीं लिहून घेऊन असल पर्तोन देणें छ १९ जमादिलाखर.

मोर्तब.

बारसुद.

नंबर ४३ इ. सन १७३०.

मच्छीदुकानाचा फायदा देवास दिल्याबद्दल सनद.

रोखा गांवकरान मौजे कारीवडें तर्फ मनोहर सुरुसन इहिदे सल्लासीन मयां अल्लफ मौजे मजकूर येथील श्रीदेवास मौजे मजकूरचे मासळीचे दुकानाचा हांसील होईल तो श्रीचे जोतीबद्दल दिला आहे म्हणोन सनद छ २५ मोहरम सन सब्बा तिसैन पेशजी इनाम विसो गणेश याचे नांवें सनद चालली त्याप्रमाणें सालाबाद बाा चालों देणें जाणिजे. छ २९ सफुर

मोर्तब.

बारसुद.

नंबर ४४ इ. सन १७३५.

देवस्थान इतलाग नेमणुकीबद्दल सनद.

रोखा गांवकरांनीं मौजे सातरल तर्ा बोरडवें सुरु सन सीत सलासेन मयां अलफ बाा अभिषेक श्रावण मास श्री देऊ मौजे मजकूर ताा रघुभट करबळकर साल गुदस्ता प्राा निाा होनु .।।. प्रताप देणें. छ २५ सफर.

मोर्तब.

बारसुद.

नंबर ४५ इ. सन १७०७.

साताराचे छत्रपतींकडून सरदेसाई यांस सनद.

राजश्री खेमसावंत भोंसले सरदेसाई प्रा कुडाळ
व महालानींहाय गोसावी यांस.

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य प्रति राजश्री राजा शिव छत्रपती उपरी तुह्मी विनंति केली कीं आपण स्वामीच्या पायांशीं आजिवरी निष्ठापूर्वक वर्तत आलों व पुढेंही दिवसेंदिवस स्वामीची दया संपादून घ्यावी अन्यत्र अवलंब न धरावा सर्व प्रकारें सेवा करावी ऐसा शपथपूर्वक निश्चय केला आहे तरी स्वामीनें आपणावरी दया करून प्रा कुडाळ व पांच महाल वतनादाखल व मुकासा करून दिल्हें पाहिजेत ह्मणून विनंती केली त्यावरून मनास आणितां तुह्मी वतनदार प्रामाणिक आहां आजिवरी स्वामीच्या पायांशीं निष्ठेनें वर्तणूक केली व पुढेंही अन्यत्र अवलंब न धरितां सर्व प्रकारें सेवा करावी ऐसा आपल्या आराध्याचा शपथपूर्वक निश्चय केला याकरितां स्वामी तुह्मावरी बहुत संतोसी जाहले आणि तुह्मांस प्रांत कुडाळ व पांच महाल वतनादाखल मोकासे चालवावे यामधें गडकोट व जंजिरे यांस तनखा महाल व देहे व जकाती सालाबाद तहां साल गुदस्तां चालत आला आहे तो खेरीज करून वरकड महाल पैकीं इनाम देवा ब्राह्मणांस व वरकडांस स्वामीचे सनदेनें आहेत तें खेरीज करून वतनादाखल मुकासा दिल्हे असत प्रा कुडाळ पा बांदें. पा पेडणें. पा डिचोली. पा सांखळी. पा मणेरी.
एकूण महाल सहा दिल्हे असत तरी तुम्ही निष्ठापूर्वक स्वामीची सेवा करीत जाणें जाणिजे छ १६ जिल्हेज सुा समान मयां अल्लफ बहुत लिहिणें काय आहे.

नंबर ४६ इ. सन १७०८.

सर सबानिसी हकाबद्दल वृत्तिपत्र.

श्री.

सिक्का आहे.

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३४ सर्वधारी नाम सवत्सरे चैत्र बहुल

प्रतिपदा गुरुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणीं राजश्री विश्राम अनंत शेणवी सबनीस यांस दिल्हें वृत्तिपत्र ऐसेंजे तुम्ही पाटगांवचे मुकामीं येऊन स्वामीस विनंति केली कीं आपण स्वामीची सेवा एकनिष्ठपणें करीत असतों तरी स्वामींनीं ता बांदें, ता सांखळी, ता पेडणें, ता डिचोली, ता साळशी येथील सरसबनि (फाटलें) करून दिली पाहिजे म्हणोन विनंती केली त्यावरून स्वामी तुम्हावरी कृपाळु होऊन सरसबनिसी वतन करून देऊन हकरयत निसबतीनें करून दिला बी तपशील.

शिक्का आहे त्यांतील मजकूर.
चंद्र श्री सूर्य
शिव नरपति हर्षनिधान
मोरेश्वर सुत भैरव
मुख्य प्रधान.

१ ता डिचोली.	५०	१ ता मणेरी	३६
१ ता साळशी.	५०	१ ता सांखळी	३६
१ ता बांदें.	३६	१ ता पेडणें.	५०
३	१३६	३	१२२

एकूण सहा महालांची सरसबनिसी व हक्क होनु बिशाणी २५८ दोनशें अठ्ठावन रयते निसबत करून दिल्हे असे तरी तुम्ही (फाटलें) चें वतन आपले पुत्रपौत्रादि वौंशपरंपरेनें अनुभऊन सुखरूप राहणें आणि सदरहु हक्क घेत जाणें जाणीजे निदेश समक्ष. मोर्तब

बारसुरुसुद.

नंबर ४७ इ. सन १७०८.

सरसबनिसी हक्काबद्दल आज्ञापत्र.

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक ३४ सर्वधारी नाम संवत्सरे चैत्र बहुल प्रतिपदा गुरुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शाहु छत्रपति स्वामी याणीं देशमुखांनीं व देशपांडियांनीं महालांनीहाय बीा ता बांदें, ता डिचोली, ता पेडणें, ता सांखळी, ता मणेरी, ता साळशी. यांस आज्ञा केली ऐसीजे राजश्री विश्राम अनंत शेणवी सरसबनीस यांणीं

शिक्का वरील लेखांत दिल्याप्रमाणें आहे.

स्वामीची सेवा एकनिष्ठपणें केली याकरितां स्वामी यावरी कृपाळु होऊन सदरहू महालींची सरसबनिसीचें वतन अजरामऱ्हामत करून दिलें (फाटलें) हक्क होन निशाणी बी तपशील.

३६ ता बांदें	३६ ता सांखळी
५० ता डिचोली	३६ ता मणेरी
५० ता पेडणें	५० ता साळशी
१३६	१२२

एकूण सहा महालीं हक्क होन निशाणी दोनशें अठावन्न रयत निसबतीनें करून दिल्हें असे तरी तुम्ही ता मजकूरचे सरसबनिशीची सेवा याचे हातें घेत जाऊन हक्क देत जाणें आणि सरसबनिसीचें वतन यास व याचे पुत्रपौत्रादि वौंशपरंपरेनें चालवीत जाणें या पत्राची प्रती लेहून घेऊन मुख्य पत्र भोगवटी यास विश्राम अनंत याजवळ परतोन देणें जाणीजे निदेश समक्ष. मोर्तब.

वारसुरुसुद.

नंबर ४८

छत्रपतींकडून सरदेसाई यांस हत्ती, घोडे पाठविल्याबद्दल पत्र.

राजश्री फोंडसावंत भोंसले सरदेसाई महालांनींहाय प्रा कुडाळ गोसावी यांसी.

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य प्रति राजश्री राजा शंभु छत्रपती उपरी तुम्हीं राजश्री कृष्णाजी पंडित प्रतिनिधी यांसमागमें राजश्री विश्राम अनंत यांस हुजूर पाठविले यांणीं तुमचें एकनिष्ठेचे कितेक वर्तमान विदित केले त्यावरून स्वामी तुम्हावर संतोसी जाहले तरी तुम्ही एकनिष्ठ वतनदार आहां विश्राम अनंत यांणीं जमावानशीं हुजूर सेवा बहुत केली हल्लीं स्वामी तुम्हावरी कृपाळु होऊन तुम्हांस हस्ती एक व घोडा एक व वस्त्रें राजश्री येसाजी नाईक घाटगे व राजश्री गंगाधरराव केशव यांसमागमें पाठविलीं आहे घेणें. व कुडाळचा कोट स्वामीनीं

तुम्हांकडे दिला आहे. आपले स्वाधीन करून घेणें. पूर्वीं प्रसिद्धगडचे मुक्कामीं तुम्ही निष्ठेनें सेवा केली आणि तुमचें चालविलें पुढेंही स्वामी तुमचें चालवितील. तुम्ही निष्ठेनें सेवा करून स्वामीची कृपा संपादून घेणें. तुम्ही स्वामीस हत्ती व घोडा व वस्त्रें पाठविलीं त्याप्रमाणें प्रविष्ट जाहलीं व विश्राम शेणवी कार्य कर्ते आहेत. यांस स्वामीनीं पालखी दिल्ही आहे. तुम्ही द्यावी वरकड मार लेख आज्ञा केली आहे. आज्ञेप्रमाणें सांगतील छ ५ रबिलाखर बहुत काय लिहिणें.

नंबर ४९

राजश्री विश्राम अनंत
गोसावी यास.

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य

स्नो सेखोजी आंगरेसर खेल राम राम उपरी येथील कुशळ जाणून स्वकीय लेखन करणें विशेष. तुह्मी पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन बहुत समाधान जाहालें कितेक कार्य प्रयोजनाचा अर्थ शिवाजी विठ्ठल यांणीं विदित केला (फाटलें) त्यास जें सांगणें तें सांगितलें आहे. सांगतां कळेल. सारांश तुमच्यासाठीं त्यास येथून सर्वथा अंतराये होणार नाहीं सर्वांविशीं आपलें समाधान असों देणें जाणीजे रा छ २९ माहे शाब्बान बहुत काय लिहिणें (मोर्तब)

नंबर ५० इ. सन १७१८.

सबनीस यांस हुजूर येण्याविषयीं आज्ञापत्र.

राजमान्य राजश्री विश्राम अनंत सबनिवीस प्रती फोंड सावंत भोंसले सरदेसाई पा कुडाळ व महालांनींहाय सुा

सिक्का आहे. तिसां अशर व मयां अलफ. पत्र पावेल ते क्षणीं तुह्मी हुजूर येणें कोणेविशीं संदेह न धरणें अभय असे रा छ ९ रजबु.

मोर्तब.

नंबर ५१ ता. ६ जून १७३५.

सबनीस यांस हुजूर येण्याविषयीं आज्ञापत्र.

श्री

सिक्का आहे.

राजमान्य राजश्री विश्राम अनंत यांप्रती फोंड सावंत भोंसले सरदेसाई प्रा। कुडाळ व महालांनींहाय सुहर सन सीत सलासेन मया अलफु विशेष. राजश्री सुलतान जी रायजादे बुधवारीं निरोप देऊन रवानगी केली लवकरीच डिचोलीस पावतील. तदनंतर यांची आपली भेटी होऊन सकलार्थ कळों येईल. सें चित्तास आणून कोणे गोष्टीविशीं दुसरा विचार चित्तांत न आणितां दर्शनास आलें पाहिजे कागदावर थोरला शिक्का करावा ऐसें नव्हतें परत सांगोन पाठविल्यावरून केला आसे रा। छ २५ माहे मोहरम

मोर्तब.

नंबर ५२ इ. सन १७३६.

सबनीस यांचें वतन सोडून देण्याबद्दल सनद.

रा। कमाविसदारान व तर्फांनीं व सरकार व बागायतान व गाऊकरांनीं प्रांत कुडाळ व प्रांत भिवगड यांस फोंडसावंत भो। सरदेसाई प्रा। कुडाळ व महालांनींहाय सुहूर सन सब्वा सलासेन मयां अलफ राजश्री विश्राम अनंत सबनीस यांचीं कुळकर्ण व नारळाचीं बागें व शेतें (फाटलें) यास विदळ व उभिल व मिठागरामागील शेतें व बागा हीं पेशजी अमानत केलीं होतीं तीं हल्लीं याचे दुमाला केलीं आहेत सालबाद प्रमाणें चालों देणें याचे कुंवळेंस दाणा व तुप व वतनभाव व नक्द व मुडे जहाज व पटी पासोडी व गांवी पटी येणें प्रमाणें मना केली आहे व शेताचा अर्दलीचा फायदा पेशजी जमेस होता तो साल मजकूरपासोन दूर करून सालाबाद कुंवळें आहे तेणें प्रमाणें गांवीं वसूल घेणें रा। छ २२ माहे रबिलाखर.

मोर्तब.

नंबर ५३ इ. सन १७३६.

दळवी सेनापती यास गावगन्ना हक्क दिल्याबद्दलची सनद.

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री रघुनाथ दळवी भोंसले यांप्रती फोंड सावंत भोंसले सरदेसाई पाणे कुडाळ व महालांनीं हाय सुरु सन सब्वां सल्लासीन मयां अलफ तुह्मी पत्र पाठविलें पावोन लिहिला मजकुर कळों आला त्यांत लिहिलें कीं हक्क व वतन व शेत सनद व बाग बागायत व सेनापती याखेरीज गांवगन्ना व महालांनीं हाय येथें चिटीया वसलाच्या रुपयेपैकीं करीत होते त्याप्रमाणें आज्ञा करावी ह्मणोन लिहिलें व राजश्री गणेश विठल व चुडे फर्जद याणेही विदित केलें तर गांवगन्ना व महालांनीं हाय येथें करार मक्ता दरसदें रुपये २॥ अडीज येणें प्रों तुह्मांस करार करून दिलें असे हीच सनद समजोन हुजूर यावयास येणें हुजूर आले नंतर गांवगन्ना व महालांनींहाय येथें सनद अलाहीदा देवीली जाईल श्रीची आज्ञा आहे. दुसरी चित्तीं न आणितां येणें छ २९ रजबु.

मोर्तब.

नंबर ५४ इ. सन १७३६.

दळवी सेनापती यास तैनात करून दिल्याबद्दल सनद.

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य रघुनाथ दळवी भोंसले यांप्रती फोंडसावंत भोंसले सरदेसाई प्रा कुडाळ व महालांनींहाय सुरु सन सब्वां सल्लासेन मयां अलफ तुह्मीं पत्र पाठविलें पावलें. त्यांत लिहिलें कीं, सेनापती व गांवगन्ना शेतें व बागें व हक्कें गांवगन्ना पुरातन आहेत त्या प्रों आह्मांस आमचे भावबंद यांस समध नाहीं ह्मणोन साहेबांची सनद आले नंतर शेवेशीं हजर होईन ह्मणोन लिहिलें तर सेनापती व गांवगन्ना शेतें व बागें व हक्कें गांवगन्ना पुरातन चाललीं असतील तीं तुह्मांस दिलीं असत वरकड दळवी तुमचे भावबंद यांस सदरहू चोंवकल मास समध नाहीं तुह्मीं येथें आले नंतर खुद्द तैनात नि॥ होनु सनद

एक हजार करार केले असत हीच सनद ऐसी समजोन निघोन येणें वरकड मुक्ता सांगणें तें राा गणेश विठ्ठल व चुडो फर्जंद यांस सांगितलें आहे हे दखल करतील तुह्मी निघोन येणे बहुत काय लिहिणें राा छ १५ माहे रबिलाखर.

मोर्तब.

नंबर ५५

भूमिदानाबद्दल सनद. इ. सन १७३९.

श्रीमंत राजश्री जयराम सावंत भोंसले व राजश्री रामचंद्र सावंत भोंसले सरदेसाई प्रा कुडाळ व महालानीहाय ताहा गांवकरानी मौजे आजगांव तालुका मजकूर सुहुर सन आर्बैन मयां अलफ. राजश्री शिव-भट गोसावी परिसराम यास राजश्री खासे कैलासवासी जाहले ते समयीं भूमिदान ठिकण केसरखान पैकीं त्यांणीं विकत घेतलें होतें त्यापैकीं दान दिले तकसिमेचे पैके हुजरून त्यास देऊन ते तक्षीम त्यास दत्त करून दिली त्याचे कुंबळें दस्तीबाद जाहलें नाहीं ह्मणोन भट गोसावी यांहीं हुजूर विदित केलें त्यावरून मनास आणून त्या ठिकणाचे तक्षीमेची सीमा पूर्व दिशा सिदाळी ठिकण राा दळवी, उत्तर दिशा पाणदीची मेरेनमेर, पश्चिम दिशा केशरखान बागायतीचे मेरेनमेर, दक्षिण दिशा घातला आडा गुा कृष्ण फोड शेणवी कमाविसदार व गांवकर आबाडेचे मेरेनमेर येकूण चतुरसिमेमधील जागती झाड व माड पतीत भूमकाजळ स्तळ काष्ठ पाषाण तृणादिकरून दत्त करून दिलें असे त्याचें कुंबळें.

नारळ कुंबळें रुजु गुदस्ता नारळ १५४० पदराशें चाळीस पैकीं गांवाकडे जमीन राहिली तेचें कुंबळें वजा करून बाकी कुंबळें जागते माडासुळें १२०५	गल्ला सर्द कुंबळें रुजु गुदस्तां कुडाळी मापें ८१० दहा कुडव पैकीं गांवाकडे जमीन राहिली तेचें कुंबळे वजा करून बाकी कुंबळें माडामधील भरडाचें कुडाळी मापें ८४

येणें प्रमाणें नारळ बाराशें पांच व सर्द ८४ कुडव दस्तीबाद दिल्हें असे सालमजकुरापासून बाद देणें. सदरहू ठिकाणाची तक्षीम दत्त दिली

असे ते यास व याचे वौंशपरंपरेस चालों देणें. ताजे सनदीचा हुजूर न धरणें या सनदेची तालिक लिहून घेऊन असल पत्र याकडे भोगवटेस असों देणें रवाना छ २५ माहे सफर.

मोर्तब.

नंबर ५६

भूमिदानाबद्दल सनद.

इ. सन १७४२.

मा। आंताजी कृष्ण कमाविसदार ता। आजगाऊ तळवडे वेंगुर्लें व बागायत यास जयराम सावंत भोंसले व रामचंद्र सावंत भोंसले सरदेसाई पा। कुडाळ व महालांनींहाय सु॥ सल्लास आरबेन मयां अल्लफ वेदमुहर्ती राजश्री बाबलेभट दादंभट ताटकर यांस भूमिदानाबद्दल राजश्री खासे कैलासवासी जाहले व मातोश्री रुखमीण बाई कैलासवासी जाहली ते समई भूमिदानास संकल्प केला होता याबद्दल ठिकण कोंबडवाड बागायत मौजे तळवडें हें साल मजकुरापासून दिलें असे याच्या चतुरसीमा.

पश्चिमदिशा नदीचे मेरेन १	उत्तरदिशा गणेशाचा उंचवळा मेर १
पूर्वदिशा ठिकण गाळवी नाग दळवी याचे मेरेन १	दक्षिणदिशा खरवड व विठ सावंत परुळेकर याचे निसाचे मेरेन १

एवंच चतुरसिमेमधील जागतीं झाडें व पतित भूमका व शेत जमीन जळ स्थळ काष्ट पाषाण भूमिदानाबद्दल दिलें असे हें वौंशपरंपरेस दिलें असे चालों देणें या ठिकणाचा दस्त सर्द गिमास नारळ जो दस्त असेल तो सालमजकुरापासून बाद दिल्हा असे. बाद देणें सदरहू ठिकण भूमिदानाबद्दल दिलें असे चालों देणें. सनदीची तालिक लिहून घेऊन अस्सल सनद बाबलेभटाजवळ भोगवटेस असों देणें. रवाना छ १ रावल.

बारसुद. मोर्तब.

नंबर ५७

आज्ञापत्र. इ. सन १७३२.

मा। अनाम प्रांत चंदगडे यांस. हिंदु राऊ घोरपडे मालकतमदार सुहुर सन सल्लास सल्लासीन मयां अल्लफ. तुम्हांकडील मुकासी याचा ऐवज पेसजी याकडील दूर करून हल्लीं राजश्री नाग सावंत भोंसले सरदेसाई पा। कुडाळ यांच्या जमावाच्या बेगमीस मुकासे दिल्हे आहेत तरी आकाराप्रमाणें मोकास बाबेचा ऐवज मा।रनुलेच्या जमावास पावित करणें जाणिजे रा। छ ३ सोवाल.

नंबर ५८

जिवाजी विश्राम यास सुलतान रावजाद यांचें पत्र.

श्री.

राजश्री जिवबा सेणवी सबनिवीस दादा गोसावी यांसी.

७ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य

स्नो। सुलतानजी रायजादे रामराम विनंती येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे विशेष आपला निरोप घेऊन आलों ते पनरावे रोजीं सातारां दाखल जाहालों. येथे येऊन सर्व गृहस्थांची भेट जाहाली. त्यामधें राजश्री येसवंतराऊ खासनवीस हे फार अगत्य धरतात गतवर्सींही त्याणीं फार अगत्य धरिली होती परंतु परिणाम आपल्या तर्फेने लागला नाहीं. यंदांही फारसी अगत्य धरून बोली चाली बहुत प्रकारें केली आहे. आपणासही त्याणीं पत्र लिहिलें आहे. मुख्य गोष्ट आंगरे यांच्या मुलखात पत्र पावेल तेक्षिणी राजश्री सरदेसाई यांस समजाऊन मातबर फौजेनसीं येऊन खारेपाटण, राजापूर मारून लांजें प्रांतीं यावें. तेथून पत्रें लिहून राजश्री यसवंतराऊ व राजश्री

भिंवराऊ खासकील यांकडे पाठवावीं ऐसा सिद्धांत केला आहे. ह्मांस कांहीं तुमचे तर्फेचा बोलीचा विश्वास वाटत नाहीं ते ह्मणतात जे आज दोन चार वर्सें बोलतात परंतु परिणाम कांहीं लागत नाहीं. त्याचा सेवट इतकाच जो आपण स्वारी करून आंगरे यांच्या मुलुकांत यावें. मग यांचा बोलण्याचा परिणाम सहजच कळेल. तुह्मी आपले तर्फेनें स्वारी केली ह्मणजे खरे जाहलां यांचे हाते बेजमी न जाहली तर लटीकपण यांकडे आलें. आपण स्वारी करून येतील तेव्हां राजश्री यसवंतराऊ यांस व सिवाजीपंत व घनबादादा व आनंदराऊ चिटनीस व भिंवराऊ खासकील इतकी यांस राजश्रीचीं पत्रें पाठवावीं त्यांत लिहावें जे आम्ही आपल्या वचनावर आलों आतां सर्व साहित्य करून पाठवावें अथवा तेथून कोण पाठवावयाचा असेल तर पाठवावा नाहीं तर आह्मांस सांगाल तर आमचें नांव घालून सर्व वर्तमान हे सांगतील त्यावरून कळों येईल ऐसें लिहावें. आणि स्वारी बाहेर निघोन तेक्षिणी आह्माकडे जासूद टांकोटांक् पाठवावे आह्मांसच बहुतकरून जा ह्मणोन सांगत होते परंतु पुण्यास नालबंदीचा हंगाम याकरितां पुण्यास जावयास गेलों. आण यांस सांगितलें जे आह्मी खालीं जावयास जातों. महाराज राजश्री स्वामीचें व धननीचें दर्शन अंतस्तीं घेतलें. बोली चाली सर्व राजश्री चे पत्रीं लिहिलें त्यावरून कळों येईल. तुह्मांविसीं विनंती केली त्यास मुख्य गोष्ट आंगरे याच्या मुलुकांत आल्याउपर तुह्मांस येथ आणून बहुमान करून सर्व मनोदयानुरूप होईल हें सर्व वृत्त भेटी नंतर कळों येईल. माधवराव अद्याप आला नाहीं. तुह्मी आमची सर्व गोष्टीचा अभिमान धरून रवानगी केली. त्यावरून येथें गृहस्थासीं बोललों. त्याचा सेवट लाविला पाहिजे. आपण व आह्मी कितेक बोलिलों तें सर्वश्च येथें निवेदन करून बळकट केलें आहे. येव्हांस तुह्मांस येणेंविसींचीं पत्रें उभयतां खावंदांचीं व चौ गृहस्थाचीं पाठविणार होतों त्यास

बोली प्रसंगीं यावयाची युक्त दिसोन आली नाहीं. कां ह्मणाल तर सर्वांमधें निशा ऐसा जाहला जो तुह्मामधें कांहीं ताकद राहिली नाहीं ऐसें जाहलें आहे त्यास आपण मनावर धरून खामखां आंगरे यांच्या मुलुखांत स्वारी करावी. राजश्री न आले तरी तुह्मी फौजेनसी यावें. तेणें-करून तुमचा लौकीक साजरा होईल. आण उभयतां खावंदांची मेहर-बानी तुह्मांठाई होऊन आह्मी कितेक वचनें बोलिलों यापासीं तीं खरीं होऊन सर्व तुमच्या मनोदयानरूप होईल व मार्गे राजश्री सबनीस यांस सरसबनीसीच्या सनदा माहाराज राजश्री स्वामीनीं दिल्या आहेत त्याचीही उजळणी होईल. आह्मांवर येथें मेहनत पडली ती ईश्वर जाणे भेटीनंतर सर्व कळों येईल. आह्मी बोलिल्याप्रमाणें द्दढोतर केलें आहे. परिणाम लावणार ईश्वर आहे. राजश्री चे लाखोटे आधीं आपण वाचून पाहावे. सर्व मजबूत्त चित्तास आणून कार्य केलें पाहिजे. आह्मांस पनरावीस रोज पुण्यास लागतील त्याआलीकडे जासूद येऊन पोहोंचत ऐसें करावें. वाड्यामधें धननीस द्यावयास व गृहस्तांस ऐसे नारळ जून-सुके हजार व सुपारी चार मण चित्तास येईल तरी पाठवावी. लिहिले प्रमाणे अक्षरशा चित्तांत आणून याउपर करणे कर्तव्य तें आधीं सत्वर केलें पाहिजे. बहुत काय लिहिणे लोभ असों दीजे हे विनंती.

नंबर ५९

पांडुरंग विश्राम व जिवाजी विश्राम यांस कान्होजी शिर्के यांचें पत्र.

श्री

राजश्री देवबा तथा राजश्री जिउबा गो-
सांवी यांसि.

७ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य.

स्ना कान्होजी राजे सिर्के राम राम विनंती उपरी येथील कुशल

जाणून स्वकीय कुशल लेखन करणे विशेष. राजश्री सरदेसाई यांनीं पत्रें पाठविलीं व राजश्री सुलतानजी रायजादे यांनीं कितेक मनसबेचा अर्थ सांगितला त्यावरून माहाराज राजश्री स्वामीस व सौभाग्यादि संपन्न बाई साहेब यांस विदित केलें. मुख्य गोष्टीं आंगरे यांचें पारपत्य करावें हें उभयतां खावंदांस अगत्य फार लागलें आहे तर तुह्मी राजश्री सरदेसाई यांस बहुत प्रकारें सांगोन आपले फौजेसुद्धां कुच करून आंगरे यांच्या मुलुकांत आलें पाहिजे. तेणेकरून महाराज संतोश होऊन तुमचे मुद्दे प्रमाणे होऊन येईल हे गोष्टीचा संदेह आहे ऐसें नाहीं. व तुमच्या वडिलांस महाराज राजश्री स्वामींनी सरसबनीसीचें वतन करून दिल्हें आहे ह्मणून मशारनिले यांनीं सांगितलें त्यावरून उभयतां श्रीमंतांस विदित केलें तरी तुह्मी लांज्याचे मुकामीं आलियावेर तुह्मांस हुजूर बोलाऊन आणवितों आण बहुमान करून तुमचा एक भाव हुजूर धणनी जवळ ठेवितों हे गोष्टीचा सर्व अर्थ मशारनिले लिहितील. त्यावरून कळो येईल बहुत काय लिहिणे हे विनंती.

नंबर ६०

पांडुरंग विश्राम व जिवाजी विश्राम यांस आपाजी आंगरे यांचें पत्र.

श्री

राजश्री पांडुरंग विश्राम व राजश्री
जिवाजी विश्राम गोसांवी यांसि.

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो आपाजी आंगरे सरखेल राम राम विनंती येथील कुशल जाणून स्वकीये लेखन केलें पाहिजे विशेष. लक्ष्मण पंवार याजबराबरी राजश्री सरदेसाई यांचें व आपलें पत्र पाठविलें प्रविष्ट होऊन लेखनाभिप्रायें बहुत संतोश जाहला मतबार मनुष्य व कारकून पाठऊन द्यावे बोलीचा धडितार्थ करून कार्य

सत्वर करावें लागतें ह्मणोन लिहिलें त्यावरून हाली येथून राजश्री कानो कासी व लक्ष्मण पंवार यांस पाठविले आहेत. यांजपासीं निश्चयाची गोष्टी जे सांगणें ते सांगितली आहे. मुखांतरें सांगतां कळेल. तरी तुह्मी यासमयीं मनसबी यांचा अगत्यवाद धरिलाच आहे तेथें विस्तारें लिहावें ऐसें नाहीं. पूर्वापार स्नेह चालत आहे त्याहीपेक्षां विसेषात्कारें चालावा.

० सूर्य ◡
शाहू नृप हर्षण सरखेल
समुन्नत आपाजी आंग-
रेण भद्रेय समुत्कर्ष
विराजित.

तुह्माकडील जे मनोदय असतील ते सिद्धीस जातील. राजश्री कानोपंत आपलेच आहेत. संशय चित्तांत न आणावा. शीघ्र कार्यास उदीत व्हावें हा समय पुढें येणार नाहीं. तुह्मीं तो जाणतच आहां. येविशीं राजश्री पंतअमात्य याणीही लिहिलें असे. तोही अर्थ चित्तांत आणून त्वरा केली पाहिजे. बहुतकाय लिहिणे लोभ असों दीजे रा छ ११ माहे सव्वाल हे विनंती.

लेखनसीमा.

नंबर ६१

पांडुरंग विश्राम सबनीस यांस आपाजी आंगरे यांचें पत्र.

श्री

राजश्री पांडुरंग विश्राम गोसांवी यांसि.

७ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य

स्नो आपाजी आंगरे सरखेल रामराम विनंती येथील कुशल जाणून स्वकीय लेखन केलें पाहिजे विशेष. राजश्री कानो कासी यांजबरोबर पत्रें पाठविलीं व मुखतां सांगितलें त्यावरून कळों आलें. आपणाकडील तयारी जाहली. स्वारीही सत्वरच होणार. ऐशास या प्रांतीं आलियावरी भेटीनंतर जो घडितार्थ करणें तो केला जाईल. फिरंगी याकडील अनुसंधान पेशजी करावें ऐसें होतें. परंतु तुमचा त्यांचा वैरसंबंध याकारितां तो मजकूर राहिला होता. प्रस्तुतकाळें तुमचा त्याचा स्नेह चालावा ऐसें

परस्परें कळों आलें. ऐशास ईश्वर इच्छेनें हेंही उत्तमच घडोन आलें. याकरितां हें पत्र आपणाकडे पाठविलें आहे. मागाहून कारकून पाठऊन देऊं. तरी ही गोष्टी आपण चित्तावर धरून खामखां त्यांचा आमचा बीद बसोन येई तें केलें पाहिजे.

O श्री
शाहू नृप हर्षण सरखेल
समुन्नतें आपाजी आंगरेण
मुद्रेय समुत्कर्ष विराजीत.

त्याजकडील मुद्दे मकसूद जे असतील ते आपल्या विचारानुरूप सिधीस जातील. तुह्मी चित्तावर धरिल्या त्याचा आमचा स्नेह होऊन शत्रूस तंबी पोंचेल ऐसा पूर्ण चित्ताचा निशा आहे. आह्मांकडील सविस्तर अर्थ माहादजी जिनगर सांगतां कळेल. बहुतकाय लिहिणें लोभ असों दीजे रा छ ९ माहे जिल्काद हे विनंती.

लेखनसीमा.

नंबर ६२

रामचंद्र सावंत महाराज यांस पेशवे यांचे पत्र.

श्री

राजश्री रामचंद्र सावंत भोसले सरदेसाई पा कुडाळ
माय गोसावी यांसि.

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य

स्नो बाळाजी बाजीराव प्रधान आसिर्वाद येथील कुशल जाणोन स्वकीय लिहिणे विशेष. पत्र पाठविलें तें पावलें. घरकलहाचा मजकूर विस्तारें लिहिला व रा वेंकाजी यार्णी विदित केला त्याजवरून कळलें. ऐशास तुह्मांकडील राजश्री जिवाजी विश्राम येतात उत्तम असे. त्याजकडील मातबर येतील त्यांस पाठवणें. दुसरी गोष्टी हेरे चंदगडे वगैरे ठाणीं जयराम सावंत यांनीं सरकारांत दिल्हीं. भिंवगड पारगडच्या तनख्याचे महाल आहेत परंतु महालचा लढा तुह्मांकडे आहे तरी तेथील तुमचा गुता रुता असेल तो उरकून ठाणीं खालीं करून द्यावयाचे जिवाजी विश्राम यांस

O श्री
राजा शाहू नृपती हर्ष निधान
बाळाजी बाजिराव प्रधान.

सांगून हुजूर पाठविणे येविसींची आज्ञा करणे ते राजश्री विठ्ठल विश्राम यांस केली असे हे तुह्मास लिहितील त्याजवरून कळेल. आवाडियाचें ठाणें किल्या खालील तें किल्याकडेच आस्लिलें पाहिजे तर किल्याकडे देणे जाणिजे छ २६ रज्जब बहुतकाय लिहिणें

लेखनसीमा.

नंबर ७२

पांडुरंग विश्राम व जिवाजी विश्राम यांस पेशवे यांचें पत्र.

श्री

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री पांडुरंग विश्राम व जिवाजी विश्राम स्वामी गोसावी यांसी.

सेवक बाळाजी बाजिराव प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये लिहित जाणे विशेष. पत्र पाठविलें तें पावलें सावंतांकडील विरुद्धाचरणाचा अर्थ लिहिला व राजश्री जिवाजी विश्राम सेवेसी पाठविले ह्मणोन लिहिलें तें कळलें उत्तम आहे. जिवाजी विश्राम यांस सत्वर पाठवणें. हेरें चंदगड वगैरे ठाणी महाल भिवगड पारगडच्या सरंजामाचे राजश्री जयराम सावंत यांनीं सरकारांत दिल्हे. राजश्री रामचंद्र सावंत यांचा लढा आहे तो तेथील दूर जाला पाहिजे येविसींची आज्ञा करणे ते राजश्री विठ्ठल विश्राम यांस केली असे हे लिहितील तेणेंप्रमाणें उगऊन ठाणी जिवाजी विश्राम यांनीं सरकारांत द्यावी ऐसें करून मारनिलेस पाठवणे आवाडियाचेही ठाण्याचा मजकूर राजश्री रामचंद्र सावंत यांजसीं बोलोन येणें. ठाणें सरकारांत घ्यावें लागतें जाणिजे छ २६ रज्जब बहुतकाय लिहिणे हे विनंती.

नंबर ६४

पांडुरंग विश्राम, व जिवाजी विश्राम सबनीस यांस पेशवे यांचें पत्र.

ता. १४ आगष्ट १७५२

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री पांडुरंग विश्राम व जिवाजी विश्राम गोसावी यांस.

सेवक बाळाजी बाजिराव प्रधान नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहिणें विशेष. राजश्री जयराम सावंत व रामचंद्र सावंत हे उभयतां परस्परें कलहास प्रवर्तले आहेत हे गोष्टी त्यांचे महत्वास व दौलतीचे संरक्षणार्थास योग्य नव्हे. घरकलह निर्माण होणें हेंच दौलतीचे अपायाचें कारण. बुद्धिमंत आहां. तुम्हांस नकळेसारिखें काय आहे आमचा व त्यांचा स्नेह. उभयपक्षीं भिन्नता नाहीं. त्या दौलतीस अपाय म्हणिजे आपलेच पदरींचें गेलें ऐसें आहे. तेव्हां ज्या रीतीनें त्यांचा घरकलह तुटोन दौलतीचें संरक्षण होये ते गोष्ट आम्हांस खामखां केलीच पाहिजे. तुम्ही तेथील पुरातन प्रमुख आहां तुम्हांस आमचा अंतर्भाव कळावा तदनुरूप तुम्ही वर्तोन तें संस्थान संरक्षावें याकरितां राजश्री रामचंद्र बावाजी यांसी पाठविले आहेत हे सांगतील तीं आमचीं वचनें जाणोन तें संस्थान संरक्षण होय तें करणें. मुख्य गोष्ट उभयतांही आमचे स्नेहीत उभयतांचेंही आम्हांस अवश्यक. याकरितां लहानापासून थोर त्या दौलतीचे लोक कोण्ही यांचें कोण्ही त्यांचे मोहांत मायेंत गुंतोन कलह करवितील तरी हे गोष्ट परिछिन्न होऊं न देणें. मारनिले पाठविले आहेत हे व तुम्ही व समस्त मंडळी एक विचार होऊन उभयतांचा कलह निवारणें या गोष्टींत जो दिगर करील, क्षुद्रबुद्धिनें कोण्ही इकडे कोण्ही तिकडे ऐसें करून उभयतांस लढवितील त्याचा परिछिन्न मुलाहिजा होणार नाहीं हें जाणोन सर्वत्रांस ताकीद करणें उभयतांस बहुतांप्रकारें सांगणें. तेही आमची गोष्ट ऐकतील जाणीजे छ १९ सव्वाल बहुतकाय लिहिणें हे विनंति.

नंबर ६५

या अस्सल पत्राचा वरील कांहीं भाग फाटून गेला आहे.

ता. १८ डिजंबर १७५२.

येथील कुशल जाणून स्वकीय लिहित जानें विशेष. राजश्री जयराम सावंत व रामचंद्र सावंत भोंसले या उभयतांमधें घरकलहे निर्माण होऊन संस्थानास अपाय व्हावा त्यास रा पांडुरंग विश्राम व जिवाजी विश्राम याणीं शर्तमर्दीनें आजवर संस्थान राखून धरिलें. कलहे तुटला नाहीं. याविशींचा कितेक अर्थ तुम्हीं व राजश्री पांडुरंग विश्राम व जिवाजी विश्राम याणीं लिहिला तो कळों आला. जयराम सावंत याचा हेत जे येथवरी यावें आल्याविना उभयपक्षीं कलहे तुटोन संस्थान जगत नाहीं म्हणोन लिहिलें त्याजवरून विचार करून हल्लीं उभयतांस पत्रें पाठविलीं आहेत जे. रामचंद्र सावंत यांणीं वाडीस रहावें; जयराम सावंत यांणीं आपले सामानसुद्धां दर्शनास यावें. पांडुरंग विश्राम याणीं जयराम सावंत या बा यावें. जिवाजी विश्राम याणीं तेथें रामचंद्र सावंत याजपाशीं राहून संस्थानचा बंदोबस्त काडीनकाडी करावा याप्रमाणें तुम्ही उभयतां सबनीस मिळोन उभयतां देसाई यांस सांगोन (फाटलें) आणून लिहिले प्रमाणें करून मशारनुलेस घेऊन हुजूर येणें छ ११ सफुर बहुतकाय लिहिणें

लेखनसीमा.

नंबर ६६

पांडुरंग विश्राम व जिवाजी विश्राम सबनीस यांस पेशवे यांचें पत्र.

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री पांडुरंग विश्राम व जिवाजी विश्राम गोसावी यांस.

सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार (फाटलें) उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहित (फाटलें) विशेष. राजश्री जयराम सावंत व रामचंद्र सावंत भोंसले या उभयतांचा घरकलह होऊन बहुत नासाडी

---

१ हें पत्र रामचंद्र बाबा शेणई यांस लिहिलें असावें असें वाटतें.

व्हावी त्यास तुह्मी शर्तमर्दीनें आजवर उभयतांस जगवून संस्थान जतन करून राहिलां हा कितेक मजकूर राजश्री रामचंद्र बावाजी यांणीं लिहिला तो कळला व तुह्मी पत्रें पाठविलीं त्याजवरून कळों आला ऐसियासी तुह्मीं पुरातन घराणदाज मातबर याजप्रमाणें करीत आलां आहां पुढांही करालच हा भरोंसाच आहे. याज उपरी उभयतांचा घरकलहे तुटोन एक विचारें राहून संस्थान (फाटलें) ऊन तुह्मां लोकांचा आब राहे या विचारास्त (फाटलें) तेक तपशील राजश्री विठ्ठल विश्राम याणीं विदित केले त्याजवरून उभयतां देसाई यांस पत्रें लिहिलीं आहेत तरी राजश्री रामचंद्र सावंत यांणीं तेथ रहावें. राजश्री जयराम सावंत याणीं आपलें सामानसुद्धां दर्शनास यावें. राजश्री जिवाजी विश्राम यांणीं रामचंद्र सावंत याजपाशीं राहून संस्थानाचा काडीनकाडी बंदोबस्त करावा. तुम्ही जयराम सावंत याजबराबर दर्शनास यावें. उभयतां सावंत यांचा मिलाफ तु (फाटलें) व याचें करावें वरकड राउताचा व (फाटलें) पाटल्या व चा करार करावा तो राजश्री विठ्ठल विश्राम यांजकडे करून दिल्हा आहे. तुम्ही आल्यानंतर त्याप्रमाणें पावेल बहुतकाय लिहिणें हे विनंती.

नंबर ६७

रामचंद्र सावंत महाराज यांस विठ्ठल विश्राम सबनीस यांचें पत्र.

ता. १८ डिसेंबर १७५२.

श्रीमंत राजश्री रामचंद्र बावा साहेब
स्वामीचे शेवेसीं.

सेवक विठ्ठल विश्राम रामराम विनंती ता छ सहुर सुा नजिक गुंडलाबकल स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. या नंतर स्वामीनीं पत्रें पाठविलीं तीं सर्व पावली सविस्तर वाचून पाहिलीं ऐसें यास हे गोष्टीचा माहित सर्व राजश्री रामचंद्र बावांस विदित आहे. तेथ आपलीं पत्रेंच वाचून दाखवून निशा करावा ऐसें नाहीं आपण येथ आहुं तेव्हां एवढा (फाटलें) काय आहे परंतु उभयतांचा कलह होऊन

राज्य बुडावें या विचारांत येऊन लौकिक जाहला याजकरितां न मेहनत करावी ती करून बगर राजश्री जयराम बावास तेथून आणिलेविना कलह तुटून राज्य नांदत नाहीं हा विचार करून हल्लीं मारनुलेस दौलतसुद्धां आणून थारवावे आपणास तेथें पूर्ववत प्रमाणे (फाटलें) असावें व बंदोबस्त तीर्थस्वरूप राजश्री जिवबादादा यांणीं करावा ऐसा विचार राजश्री रामचंद्र बावा यांचे विचारें व श्रीमंतांचे विचारें करून मारनुलेस आणवावयाचा केला तर या उपरी उभयतांहीं एकचित्त होऊन आपण जाणते. सर्वांस ठाऊक आण न ठाऊक याचाही आम्ही निशा करून वडीलपण अगर भारीपण स्वामीपासीं ऐसें करून दाविलेचें सार्थक करावें जे उभयतां एकचित्त होऊन राजश्री जयराम बावाची रवानगी इकडेस जसी म्हणतील तैशी करून द्यावी. जसें रवानगीविशीं आपणास सांगतील तैसें ऐकावें. आण रवानगी करून द्यावी. आपण तेथें सुखरूप रहावें. एवढें केलें ह्मणजे गेली दौलत आणून जास्ती आणखी मिळवितों याप्रकारें केलें आहे एक वेळ (फाटलें) उभयतां सौरस होऊन आले म्हणजे आपण स्वस्थ तेथें बसावें यांचा आपला हर्षामर्ष कधीं होऊं देणार नाहीं हा निशाच असों द्यावा कितेक गोष्टी आपणास कळाव्या लागतात परंतु उक्त पत्रीं लिहूं नयेत सूचनार्थ लिहिलें आहे. गड किल्लेवर गोत्रज चांगले इमानें इतबारें क्रियेनशीं नेऊन ठेवावे याप्रमाणें त्यास लिहिले आहे आपण कानवीन करूं नये. कोठें जात नाहीं दोघे मूल जयराम बावांनीं थोरले बरोबर आणावे. लहानगे मुल व बाईका स्वामीजवळ असाव्या त्या ठायीं आपण माया ममता फार करून आधीं त्यांची खबर घ्यावी मग आपण जेवावें. याप्रमाणें करून वर्तावें सर्व राज्यतव आपल्या स्वाधीन भाहीरतव जिवबादादा स्वाधीन बंदोबस्त सर्व यांहीं करावा हे आपण एकचित्त तेथें दुसरा विचार नाहीं आपण मात्र धणीपणीं मुजरा घ्यावा. वरकड राज्याचें लचांड वडिलांवर घालावें म्हणजे देवी धर्मी लौकिकांत व राजश्री जयराम बावा यांचा निशा व्हावा याकरितां लिहिले प्रमाणें करावें. केलेनें स्वामीचा गुणानुवाद आम्ही प्रेरिल्याचें सार्थक होईल नाहीं तर लहान माणूस मनस्वी मिळतील भलतेचें-भलतें करितील स्वा-

मीसी नानाते प्रकारें सिकवितील स्वामीस ते सत्य वाटेल आण मागुती केल्या कर्तृत्वाची घाण होईल मग आम्हांशीं शब्द नाहीं. स्वामीसच भारी पडेल राज्यामध्यें पाईं दुसरे घालितील. आपण तत्रस्थानीं पाहावें लागेल. तेव्हां मग यत्न होणार नाहीं याकरितां हें सर्व रामचंद्रबावा आम्ही बोलून याप्रमाणें साध्यांत लेहून पाठविलें आहे आपणांस फिरंगी यांची पाठ आहे ह्मणून भरोंसा धराल तर तें मृगजळ आहे. कांकीं मजला सर्व कळत आहे येथें राहिलेमुळें. याकरितां हद्द तोडून लिहिलें आहे. आण जयराम बावा श्रीमंताचे पदरीं पडले तेव्हां याचा श्रीमंत अभिमान धरतीलच याकरितां सूचनार्थ लिहिलें आहे. येथें जयरामबावांचे वगवशिले फार आहेत. परंतु येवढेही आम्ही दुश्यवाद करून बावांच्या बळावर टाकिलें आण त्यांस आणावतों येथें तरी आमचे कहेखालीं चाले ऐसेंच हदबून आणविला आहे. या दरबारीं डावेउजवे केलेनें परिणाम नाहीं हें पुर्ते त्याणें समजावें. परंतु इतकेंही लिहिलें त्याचा कळस तुह्मांपाशीं आहे कागद वाचून फाडून टाकावे प्रस्तुत श्रीमंतांचे मुक्काम वागणगीर नजीक आहे येथून मजल दर मजल पुढां येत आहेत. वरकड वर्तमान राजश्री रुपाजी दळवी सागतां विदित होईल हे विनंति.

नंबर ६८ ता. १८ डिजंबर १७५२.

अस्सलपत्राचा वरचा भाग फाटून गेला आहे.

सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार सुा सलास खमसैन मयां अल्लफ राजश्री जयराम सावंत भोंसले यांस दर्शनास आणविले आहेत. आपले सामानाशीं येणार आहेत मागां राजश्री रामचंद्र सावंत भोंसले वाडीस राहातील. राजश्री जिवाजी विश्राम त्यांजपाशीं आहेत प्रसंगीं तुह्मांस भलत्या साहित्याविशीं लिहितील तर तेव्हां राऊत व जमाव ऐसा घेऊन जाऊन सर्व प्रकारें साहित्य करीत जाणें छ ११ सफर बहुत काय लिहिणें.

लेखनसीमा.

नंबर ६९ ता. २९ मार्च १७५३.

सरदेसाई यांस शंभु छत्रपतींचें पत्र.

राजश्री रामचंद्र सावंत भोंसले सरदेसाई प्रा कुडाळ व माहाय
गो यांसी.

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राम मान्य प्रती राजश्री राजा शंभु छत्रपती उपरी तुम्ही माहाद शेट लाड व विठ्ठल राम या बराबरी लिस्ताबद्दल रुपये ९०० पाठविले ते हुजूर पावले वरकड सावंत अर्थ आलाहिदा पत्रावरून व राजश्री यशवंतराव गायकवाड यांचे सांगण्यावरून कळेल बहुतकाय लिहिणें

नंबर ७० इ. सन १७५४.

सबनीस यांस बांव गांव इनाम दिल्याचा रोखा.

रोखा गांवकरान मौजे बांव तर्फ हवेली यास रामचंद्र सावंत भोंसले सरदेसाई प्रा कुडाळ व माहालानिहाय सुरु सन खम्मस खमसेन मयां अलफ मौजे मजकूर हा गांव कुलबाब कुलकानु पेसजी राजश्री जिवाजी विश्राम सबनिवीस यांस देवविला आहे त्याप्रमाणें मारनिल्हेकडेस चालूं देणें. सदर्हू गांव कुलबाब कुलकानु देखील तंबाकू इनाम करून दिल्हा आहे यास व याचे जाहाले जातेस भोगवटा करूं देणें ताजे सनदीचा हुजूर न धरणें. तालिक लिहून घेऊन अस्सल त्याकडेस असूं देणें. छ २९ मोहरम मोर्तब.

नंबर ७१

कडुबाणाबद्दल सनद. इ. सन १७६५.

श्रीमंत राजश्री खेमसावंत भोंसले सरदेसाई प्रा कुडाळ व महालानीहाय. ताहा कानभगत सुा सीत सीतेन मय्यां अलफ मौजे आकेरी

---

१ कुडाळ येथें सरदेसाई आणि तुळाजी आंग्रे यांच्यामध्यें इसवी सन १७५० मध्यें जी मोठी लढाई झाली तींत जिवाजी विश्राम यांनीं केलेल्या मर्दुमकीबद्दल हा गांव त्यावेळीं त्यास इनाम दिला होता तो अद्याप त्यांचे वंशजांकडे चालतो.

तर्फ माणगावूं येथें ठिकण थटियाचें गाळूं व लवियाचें गाळूं हें गांवानीं तुझा बाप गोंद भगत कान भगत यास शके १३७ वर्षे दुमुखी नाम संवत्सरीं सदर्हू ठिकाणें उपरजनेबद्दल मक्ता करून गांवानीं दिल्हें निशाणी होनु २ दोन त्याप्रमाणें ठिकाणामधें कमाविशी व कीर्दमाहासुरी माड व पोंफळी व हरजिन्नस झाडें लावणी केली व पुढांहि उपरजना करीन त्यास गांवचे पटे प्रमाणें चालू देणेंविशीं हुजुरची सनद द्यावी ह्मणून हुजूर अर्ज केलास त्यावरून गांवास आलाईदा सनद सादर केली असे ठिकाणाची कमाविशी कीर्द महासुरी माड व सुपारी व हरजिन्नस झाडें उप्परजनाकरून गांवानें सदर्हु मक्ता करून दिले प्रमाणें गांवाकडे देऊन तुह्मी व तुमचे वंशपरंपरेनें साल दरसाल दोन्ही ठिकाणांचा भोग-वटा करणें हुजुरांतून ज्यास्ती जलाल कांहीं होणार नाहीं. तुमचे दोन्ही ठिकाणांमध्यें कुणबी असतील त्यांस वेठबेगार गांवांचे पटे प्रमाणें मना असे छ १ जमादिलाखर मोर्तब

बारसुद.

नंबर७२ इ. सन १७६५.

श्रीदेवाचे चाकरीसाठीं इनाम दिल्याची सनद.

रोखा गांवकरान मौजे वालावल तर्फ हवेली सुरुसन सीत सीतेन मयां अल्लफ वेदमूर्त राजश्री रामचंद्र भट उपाध्ये यांस श्रीदेवु मौजे मजकुरचे अभिषेकाबद्दल ठिकाण गोंदो अत नाईक पाटंबामधील नाकीर्द जमीन तुह्मी पटा करून दिला आहे त्यास सदर्हु ठिकाणामधें भट मशारनिल्हे माड व फणस व हरजिन्नस झाडें मांडणी करून ठिकाणाची उपरजना ह्मणोन तुह्मी विदित केलें त्यावरून त्यास सुखरूप ठिकाणामधें मांडणी करूं देणें आण पटे प्रमाणें ठिकण श्रीचे अभिषेकाबद्दल त्याकडेस साल दरसाल चालों देणें. सनदांची तालिक घेऊन अस्सल सनद त्याकडेस असों देणें ह्मणोन साल गुदस्तामध्यें छ ९ जमादिलाखरीं सनद सादर आहे त्याच्या चतुरसीमा बरहुकूम पटा.

१ पूर्व दिशा आंबेचे मेरेनें मठकराचे शेताचे मेरेनमेर.

१ पश्चिम दिशा माडापासून आंबलिया दोन उत्तरेच्या मेरेनमेर.
१ दक्षण दिशा शेणवी याच्या शेताचे घाळीचे मेरेनमेर.
१ उत्तर दिशा २ दोन आंबलेचे मेरेन पूर्वेकडील आंबेचे मेरेनमेर.
४

येणें प्रमाणें चतुरसीमा याचें कुंबळें बरहुकूम बखर.

सर्द कुंबळें.	नारळ सुमार कुंबळें.	फणस निा होनु.
८२८१	४०	८/

एकूण सर्द दोन कुडव एक शेर व नारळ चाळीस व फणस होनु दुवल जमेस आहे तें दस्तिबाद दिलें या ठिकाणाची उपर्जना करून श्रीस अभिशेक करून राज्यास कल्याण इच्छुं ह्मणोन भट मशारनिल्हे यांणीं विनंती केली त्यावरून त्यावर संतोशी होऊन सदरहु सर्द दोन कुडव एक शेर व नारळ चाळीस व फणस होनु दुवल दस्तिबाद दिलें असे. बाद देऊन ठिकण श्रीचे अभिशेकाबद्दल देवीलें असे भट मशारनुले त्या ठिकणामध्यें माड व फणस व हरजिन्नस झाडें मांडणी करतील आण हे व यांचे वौंशपरंपरेस साल दरसाल ठिकाणाचा भोगवटा करितील त्यास सुखरूप करूं देणें ताजे सनदीचा उजूर न धरणें तालिक घेऊन असल सनद त्याकडेस असों देणें. छ २९ रजबु.

बारसुद. मोर्तब.

नंबर ७३ इ. सन १७६६.

बरवे यांस कंवठी गांव इनाम दिल्याची सनद.

राजश्री एकनाथभट बरवे गोत्र सूत्र गोसावी यांस.

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य

स्नो खेम सावंत भोंसले सरदेसाई पाा कुडाळ व माहालांनींहाय दंडवत सुा सब्वा सीतैन मयां अल्लफु तुह्मी वाडीचे मुकामीं विनंती केलीजे आपण पुरातन परंपरागत आपले आश्रित आपलें कल्याण चिंतन करीत आहों त्यास आपले सन्निध या राज्यांत कुटुंबसुद्धां राहून कालक्षेप करावा ऐसें मनास आहे त्यास योगक्षेम चालला पाहिजे यास्तव एक

गाऊ इनाम करून देऊन योगक्षेम चालेसा करावा ह्मणोन विदित केलें त्याजवरून मनास आणितां तुह्मीं परंपरागत आश्रित आहां तुमचें चाल-विल्यास तुमचें वास्तव्य सन्निध असलेस आह्मांस व राज्यास श्रेयस्कर आहे हें जाणोन तुह्मांवर कृपाळू होऊन मौजे कवठी ता। पाट हा गावु पेस्तर सालापासून खेरीज दस्त निस्पत जंजिरे सिंधुदुर्ग व मौजे मजकुरीं (येथें शिक्का आहे.) सनदकरी वतनबाब व हक्कदार सालाबाद प्रमाणें वजा करून वरकड कुलबाब कुलकानु जळ स्थळ काष्ट पाषाण त्रुण आदि-करून तुह्मांस व तुमचे पुत्रपौत्रादि वौंशपरंपरेस इनाम करून दिला असे तुह्मीं व तुमचे वौंशपरंपरेनें अनभवून सुखरूप राहावें व मौजे मजकुरीं बागायत आहे त्यामधील बाग ठिकणवाडी हें तुह्मांस घर बांधावयास इनाम करून पेस्तर सालापासून दिलें असे घर बांधून सुखरूप राहाणें. सुा सब्बा सीतैन मयां अल्लफु छ १२ माहे जिल्काद.

बारसुद मोर्तब.

नंबर ७४

उदीम व्यापार करण्याविषयीं कौलनामा.

श्री ता. २९ जानेवारी १७३९.

श्रीमत् राजश्री जयराम सावंत भोंसले व राजश्री रामचंद्र सावंत भोंसले सरदेसाई प्रा कुडाळ व महालानीहाय तहां राजश्री गोविंदसेट रया व त्रिविक्रमसेट सावकार प्रांत बऱ्हाणपूर वास्तव्य सातारा व राजापूर सुहुरसन तिसां सल्लासीन मया अल्लफ रा बाबले कामत यास पाठऊन वाडीचे मुक्कामीं अर्ज केला व पहिले (फाटलें) रघु (फाटलें) ह याकडे सांगोन पाठविलें त्यावरून विदित जाहलें जे आमचे मुद्दे-माफिक चालविलेवर उदीम व्यवसाव या प्रांतीं करूं त्यावरून येणें-प्रमाणें करार करून दिले असे बी तपशील.

मौजे कंवठी तर्फ पाट हा गांव तुह्मांस दिला तुह्मी पंचवीस वर्षें भोगोन लावणी सचणी करून गांवची माहामुरी करून भोगावा खेरीज वतनबाब व पाजी वरकड गांवची बेरीज दिवाणचा ऐवज होईल तो तुह्मांस तश्रीपेबद्दल दिल्हा असे. पंचवीस वर्षें भोगावें तंवपावेतों सरकारांतून काडीमात्र उपसर्ग होणार नाहीं. कलम १

सरकारामधें जिन्नस पाहिजे तो रास्तादरीनें घ्यावा त्याचा ऐवज देऊं. कलम १

सवदागिरीस बागायत सरकारचे नारळ घ्यावे याचे पैकें सिरिस्ता प्रा घ्यावे. कलम १

गोवें प्रांतास अगर हरकोठें आमच्या बंदरांतून उदीम करणार सुखें करावा. कलम १

गल्ला भरून मस्कतास तरांडीं रवाना करणार तरांडेवरून बोडीं आणले तर आमचे बंदरीं दखल करावें दुसरेकडे नेऊं नये. दिवाणचे दखलगिरीनें न्यावे वरकड जिन्नस आपले चित्तास येईल तेथें विकावा. कलम १

सरखेलाचा व आमचा प्रसंगें बेबनाव जाहला तर गल्ले वितरुक्त उदीम करावा तिकडील आबदरफ्ती तरांडेची दखलगिरीनें करावी तुमचे घरीं गल्ला आमचे मुलकांतून सरखेल याचा सल्ला आहे तंव दरसाल शंभर खंडी न्यावा. कलम १

बाहेरील बंदरींचे उदमी येऊन तुह्मांकडील व्यवसाय करितील त्याची वरकड बंदरीं दलाली घेत असली तर या बंदरीं द्यावी. कलम १

मुलकांतील रयतेचे नारळ व सुपारी व बाजे जिन्नस रयतेचे रजावंदीनें घ्यावे दुसरेस देऊं नये. कलम १

जं विकत आणाल ते आमचे बंदरीं माप करावें व त्यापैकीं विकेल त्याची जकात द्यावी. येथ विकरा न होय तें दुसरे बंदरीं फिराऊन

नेतां माप करून न्यावें त्याची जकायत न द्यावी. कलम १

येणें प्रमाणें तह करून दिला असे. कोणे गोष्टीविसीं शंका न धरितां या प्रांतें सुखें व्यवसाय करणें.

सदरील मौजे कंवठी हा गांव तुह्मांस पंचवीस सालें भोगलेनंतर पुढांही हा गांव तुह्मांस दिला असे. सदरहु गांवची बेरीज तपशील.

ऐन जमे नि॥ होनू.		कित्ता जमे नि॥ होनू	
६९।=।	सर्द व गिमवास	·। ·	नक्त बाब फणस
	५॥१४ सर्द	२।≡	सण नारळ ३४०
	९८१४ गिमवास	१॥।≡।	वर्तोळा दाणा तूप
	१४॥।८	८=	वर्सासन
१०६।	नारळ १७०००	२।-।	बाणेबगा
	दर हजार होन ६।·		
७८।·	सुपारी वजन ·।·		
	एकूण	१७९॥।-	

एकूण निशाणी होन सालिना एकसे पावणे ऐसी दुवल हा ऐवज तुह्मांस तश्रीपेबद्दल देविला असे. सदरहूची मांडणी करून गांव कमाविसी करणें. तुह्मांस देविला असे खेरीज वतनबाब व पाजी करून वरकड दिला असे गांव मा॥ ही वेठबेगारी विसीं सरकारांतून उपसर्ग होणार नाहीं गांवची कीर्द महामुरी करणे. सदरहु गांवचा ऐवज तुह्मांस दिला जाणिजे छ २९ माहे सवाल.

नंबर ७५

सबनीस यांस रहदारी मालावरील जकातीची सनद.

श्री ता. ११ मे १७६१.

राजमान्य राजश्री जिवाजी विश्राम यांप्रती खेमसावंत भोंसले सरदेसाई प्रा॥ कुडाळ व महालांनींहाय सुा॥ इहिद्दे सीतैन मयां अल्लफ तुह्मांस समस्त उदेमी सादेशी व परदेशी यांणीं प्रांत कुडाळ व प्रांत भीमगड येथें जकातीच्या कानुवा सन खमस खमसैन चे सालीं कागद करून दिले

आहेत त्याप्रमाणें तुमचा भोगवटा चालला आहे त्यास तुह्मीं व तुमचे वंशपरंपरेनें भोगवटा करावा याविशीं कमाविसदारांस व खोतांस सनद आलाइदा सादर केली आहे त्याप्रमाणें भोगवटा करणें रवाना छ ५ माहे सव्वाल. बारसुद मोर्तब.

नंबर ७६

कर्जासाठीं सबनीस यांजकडे महाल ठेविल्याची सनद.

ता. ५ जून १७६१.

श्री

राजमान्य राजश्री जिवाजी विश्राम यांप्रती खेमसावंत भोंसले सरदेसाई प्रां कुडाळ व महालानीहाय सुा इसन्ने सीतैन मयां अल्लफ फिरंगी यांकडेस डिचोली व हळवर्णचा किल्ला होता त्यास तुमचे विद्यमाने राजकर्ण करून दोनही किल्ले सोडविले त्यास पैका पडला तो तुह्मी कर्ज काढून देविलेत व त्याखेरीज सरकारांत तुह्मांकडून कर्ज घेतलें व राजश्री विठ्ठल विश्राम यांकडूनही कर्ज सरकारांत घेतलें आहे तें पावत होईपर्यंत सदरहु डिचोली माहाल व पेडणें व सांखळी माहाल किल्ले सुद्धां तुह्मांकडेस असों देणें. कर्ज वारिलेनंतर ठाणीं सरकारांत देणें. सदरहु माहालचा व जकायतीचा व बाजे ऐवज कर्जांत सालदरसाल कर्जांत वजा करणें जाणिजे रा छ १ माहे सवाल.

बारसुद मोर्तब

नंबर ७७

सबनीस यांजकडून फिरंगी यांस पैसा देविल्याबद्दल दाखला.

ता. २८ डिसेंबर १७६१

राजमान्य राजश्री जिवाजी विश्राम यांप्रती खेमसावंत भोंसले सरदेसाई प्रा कुडाळ व माहालानीहाय सुहूर सन इसन्ने सीतैन मयां अल्लफ. जमा रुपये कर्ज गुजारत खुद परभारें आदा फिरंगी यास हा जमा वर्क.

रुा.
४३००० ऐन रुपये
१५०९ वाटाव बाबत.

एकूण चवेचाळीस हजार पांचसी पांच रुा हुजूर पोता जमा जाहाले.
छ १ माहे जमादिलाखर. मोर्तब.

बारसुद.

नंबर ७८

सबनीस यांस डिचोली व पेडणें महालांतील गांव इनाम दिल्याची सनद.

श्री ता. २४ जानेवारी १७६५.

राजमान्ये राजश्री जिवाजी विश्राम सबनीस यांप्रती खेमसावंत भोंसले सरदेसाई प्रांा कुडाळ व माहालानीहाय सुाा खमस सीतैन मयां अल्लफ तुह्मी कस्त मेहनत करून डिचोली व पेडणें व सांखळी तीन माहाल फिरंगी यांकडून घेतलेत त्याजकरितां तुह्मांवर संतोशी होऊन तुह्मांस इनाम करून दिलें असे.

तर्पे डिचोलीपैकीं पाली हा गांव कुल्लबाब कुलकानु खेरीज हकदार इनाम करून दिला असे १	तर्पे पेडणेंपैकीं मौजे चोपडें कुलबाब कुलकानू देखील कुळकर्ण व सरकार बागबागायत इनाम करून दिलें असे १

एकूण दोन गाऊं तुह्मांस कुलबाब कुलकानू इनाम करून पेस्तर सालापासून दिले असेत. तुह्मी व तुमचे पुत्रपौत्रीं वंशपरंपरेनें भोगवटा करीत जाणें याविसीं गांवासही आलाइदा सनदा देविल्या असेत. राा छ २ माहे शाभान. मोर्तब.

बारसुद.

नंबर ७९

जिवाजी विश्राम सबनीस यांस सरदेसाई यांचें पत्र.

ता. ७ मार्च १७६५.

राजमान्य राजश्री जिवाजी विश्राम यांप्रती खेमसावंत भोंसले सरदेसाई प्रा कुडाळ व माहालानीहाय सुरुसन खंमस सीतैन मयां अल्लफ तुह्मी सिरवडेस गेले उप्पर एक पत्र पाठविलेंत तें प्रातःकाळीं प्रविष्ट जाहलें. दुसरें पत्र आतां दोनप्रहरां प्रविष्ट जाहालें. लिहिला मजकूर सविस्तरें विदित जाहाला इंग्रज कालच्या रोजांत तड घेऊन शाहरकोटामधें येऊन जागा धरला लोकांनीं (फाटलें) केली जखमी जाहले थोडी (फाटलें) मी जाहलेचें लिहिले विदित जाहलें. (फाटलें) बळ थोडकें ह्मणोन त्यास हुजूरचा जमाव लोक परदेशी व बारगीर व खासकील हुजराती व मोघम कुळीं रात्रीं किल्लेस यशवंतगडचें लिहिणें आलेवरून ताकीद करून रवाना केलेच आहेत. तेथ इजीर कोण जाहले कोण राहिले ते नांवनिसीवार लेहून पाठवावे व मुलकी लोकांसही ताकीद घालोन हजरत लोक बाहीर काडोन रेडीस रवाना करणेविशीं हुजुरून खासकील रवाना केले असेत तुह्मी तेथून आजगांव तर्फ व (फाटलें) तांतील व बाजेलोक (फाटलें) तील त्यांस ताकीद करून आणऊ (फाटलें) तरतुद कर्तव्य करणें त्याविशीं तुह्मांस ल्याहावें ऐसें काय आहे. दारूबलें कोठीपैकीं रवाना केली असे व तंबाकू वगैरा जिन्नस आलादा रवाना केला असे तेथ पोंचलेचें लिहिणें. बाकी राहिले ताकीद करून रवाना केलें जाईल. राजश्री दळवी आजीच घरीं आले रवाना के[illegible]सेत. दारवे नाजुक डिचोलीस असेल तर तेथून कांहीं आणवावी. फिरंगेस कागद ल्याहावे व इंग्रजास मालवणास कागद लिहिणें असेल तर लेहावे त्या प्रो रवाना केले जातील. श्रीस विनंती केली आहे येस देईल छ १४ राजान मोर्तब.

नंबर ८० ता. १६ मे १७६९.

जमिनीचे वादाबद्दल निवाडा केल्याची सनद.

रोखा गाऊकरान मौजे वालावल तर्फ हवेली सुा तिस्सां सीतेन मयां

अल्लफ. ठिकण राजीवडें व माळेचें टेंब यास नाराय० पुरुषोत्तम भट पुजारी व राम मलंभट शेंबेकर याचा वेव्हार होऊन हुजूर विदित केलें त्यावरून अनंत रामकृष्ण शेणवी पेडणेकर व पुंडलिक भास्कर नाडकर्णी ता पेडणें व कानोजी मीठ नाईक धामापूरकर व कृष्णे गांवकर मळगां-उकर मनसुबदार याचे मतें मनास आणितां बाबाजी प्रभु व गाऊकर कुळकर्णी मौजे मजकूर यांणीं छ ७ मोहरमी लिहून दिलें जे सदरहु दोन्ही ठिकणें माळेचीं वृत्त करून श्रीस माळा दोन घालाव्या ऐसें करून नारायणभट यांचे वडिलांस दिलीं होतीं. याचे आजेनें आपल्या मुलास मलंभट शेंबेकर यांची कन्या मांडून दोन्ही ठिकाणें यास दिलीं त्याप्रमाणें याकडेस ठिकाणाचा भोगवटा होऊन श्रीस माळा दोन व तुळशी व पुजेस फुलें आणून देत गेला ह्मणोन बरवर लिहून हुजूर दिली त्याप्रमाणें दोन्ही ठिकाणें राम मलंभट यास सरेत असा निवाडा झाला त्याप्रमाणें सदरहु ठिकाणें राम मलंभट याकडेस चालों देणें आण याकडून श्रीस माळा दोन तुळशी व फुलें पुजेस घेणें सनदीची तालिक लिहून घेऊन असल सनद राम मलंभट याकडेस असों देणें. छ ९ मोहरम.

बारसुद मोर्तब

नंबर ८१

जमिनीचे तंट्याचा निवाडा केल्याबद्दल ताकीद.

ता. १६ मे १७६९.

राजश्री नारायण पुरुषोत्तमभट वालावल यास खेमसावंत भोंा सरदे-साई परगणे कुडाळ व माहालांनींहाय सुा तिस्सां सीतैन मयां अल्लफ. ठिकण राजिवडें व मालेचें टेंब यास तुजा व राम मलंभट याचा वेव्हार होऊन हुजूर आलेत याजवरून बाबाजी प्रा व गांवकर कुळकर्णी मौजे मजकूर यांस हुजूर आणून हुजूरचे मनसुफदार यांचे मतें निवाडा करून निवाडेची सनद गांवकर कुळकर्णी मौजे मजकूर यांचे नांवें आलाईदा सनद सादर झाली आहे त्याप्रमाणें दोन्ही ठिकाणें राम मलंभट याकडेस

चालों देणें. अटक एकंदर न करणें सनदीची तालिक लिहून घेऊन असल सनद राम मलंभट याकडेस असों देणें छ ९ मोहरम.

बारसुद. मोर्तब

नंबर ८२ इ. सन १७७०.

ठिकाण दत्त करून दिल्याची सनद.

रोखा गाऊकरान मौजे आजगाऊ तर्फ मजकूर सुा इहिदे सब्बैन मयां अल्लफ. रा काशिनाथ बावा अवधूत यांणीं हुजूर येऊन विदित केले जे ठिकण खाजणादेऊ मौजे मजकूर हें आपणास गांवानें दत्त करून दिलें आहे त्याचें कुंबळें हुजुरून बावले प्रभु भिक प्रभु याचे गुजारतीनें नूतन साल मजकुरीं कुंबळें ८३। सवातीन कुडव आकारून केलें आहे तें बाद देऊन ठिकण दत्त करून द्यावें ह्मणोन त्यावरून ते गोसावी चांगले तपेस्वी यांचे मठाचा खर्च चालावा यदर्थीं व ठिकणाची उपरजना होऊन त्याचा खर्च चालेल असें मनास आणून ठिकण त्यांस दत्त करून दिलें असे त्याच्या चतुरसीमा बा बखर.

१ पूर्व दिशा व्हाळाचे मेरेनमेर.
१ पश्चिम दिशा नव्या खाजणाचे मेरेनमेर.
१ उत्तर दिशा खाजनाचे व्हाळीचे मेरेनमेर.
१ दक्षण दिशा व्हाळाचे मेरेनमेर.

४

येणें प्रमाणें चतुरसीमा याचे कुंबळें सदरहू कुडाळी मापें ८३। सवातीन कुडव पेस्तर सालपासून बाद दिले असे बाद देऊन ठिकण दत्त करून दिलें असे याचे सिशपरंपरेस व यांस साल दरसाल चालों देणें ताजे सनदीचा उजूर न धरणें सदरहु ठिकण यांस व यांचे सिशपरंपरेस साल दरसाल चालों देणें. सनदीची तालिक लिहून घेऊन अस्सल सनद त्याकडेस असों देणें जाणीजे रवाना छ २२ जिलेहु मोर्तब.

बारसुद.

नंबर ८३

वेरें गांव सबनीस यांस इनाम दिल्याची सनद.

श्री ता. २५ डिसेंबर १७६४.

७ मेाा अनाम देशमूख व देशपांडे ताो अंतरुज मामले फोंडा यांसी भगवंतराव धुळप सुभेदार सुाा खमस सीतैन मयां व अल्लफ राजश्री जिवाजी विश्राम सबनवीस यांणीं भसलतीच्या समयीं कित्येक उपयोगी साहित्य केलें सबब मौजे वेरें ताा मजकूर हा गांव इनाम करून दिला असे तरी कुलबाब कुलकानू खेरीज पुरातनचे हकदार करून सदरहु इनाम गांव माारनिले यासी पुत्र-पौत्रादि वौंशपरंपरेनें इनाम चालवीत जाणें. या पत्राची तालिक लेहून घेऊन अस्सल पत्र भोगवटी यासी माारनिले यांजवळ परतोन देणे जाणिजे छ १ माहे रज्जबू

सिक्का. माधवराव कारकीर्द.

मोर्तब सुद.

नंबर ८४

सरदेसाई यांस जिवाजी विश्राम यांचें पत्र.

सेवेसी जिवाजी विश्राम विनंती उपर आज शुक्रवार दुपार जाणोन यानंतर इंग्रजानें चोंवकडून सिलांदाज करून रात्रींपासून किल्ला जेर केला किल्लेकरांमधीं अवसान राहिलें नाहीं. बाहिरलेकडून येलगार करावा तर इलाज नाहीं तशामधें उपाय होईल तें करितों दारू अगदीं नाहीं. पाठविली तीही सरली त्यामुळें घात जाहला

फिरंगी यास कागद सांभाळकीचे लिहून त्यांत यशवंतगडची कुमक करावी असें लिहावें व दारूगोळेविसी लिहून सत्वर कागद रवाना करून द्यावे.

नंबर ८५

जिवाजी विश्राम यांस कोल्हापूरकर यांचें पत्र.

श्रीशंभु प्रा. ता. १२ मार्च १७६५.

राजमान्य राजश्री जिवाजी विश्राम यांसी श्रीमन्महाराज मातुश्री

आईसाहेब यांणीं आज्ञा केली ऐसीजे सुा खमस सीतैन मयां व अल्लफ सांप्रत तुह्मांकडील विनंतीपत्र येऊन वर्तमान श्रवण होत नाहीं तरी ऐसें न करितां निरंतर विनंतीपत्रीं साकल्यार्थ लेहून संतोष पाववीत जाणें. सध्यां इंग्रज आरमारसुद्धां जंजिरे यशवंतगडा जाऊन बैसोन तोफांची मारगिरी अतिशयानिसीं करून जंजिरा हस्तगत शनवारीं केला ह्मणोन परभारें निवेदनांत आलें तुह्मीं कांहींच लिहिलें नाहीं हें उचित कीं काय एक जंजिरे सिंधुदुर्ग गेल्याची चिंता वाहत असतां हें निवेदन जाहले वरून बहुतच आयासास कारण जाहलें. जंजिरे मजकुरची बोली तुमचे मार्फतीनें लागली लोकही सोड (फाटलें) निवेदन कार्यभाग सिधीचा संतोष मानीत असतां एकाएकींच विपरीत वर्तमान कळलें तेव्हां गोष्टी परम अनुचित जाहली शत्रूस बळ पडोन समुद्रकिनारा जागे स्वाधीन होऊन सर्व प्रकारें साहित्य घडोन आलें पुढें राहिले जागे जतन होणें आणि गेलेले घेणे याचा साधन प्रकार कोणे रितीचा योजिला हा प्रकार साभिप्राय लेहून पाठवावा कोंवळा मोड आहे तों मोडिल्यानें उत्तम भारी जाहलेनें सर्वांचें वाईट हें पुर्तें चित्तांत आणून समर्पक तें करावें छ १९ रमजान बहुत काय लिहिणें

लेखनसीमा.

नंबर ८६

जिवाजी विश्राम सबनीस यांस कोल्हापूरकर यांचें पत्र.

ता. १९ जून १७६५.

श्री शंभु प्रा.

राजमान्य राजश्री जिवाजी विश्राम यांस श्रीमन्महाराज मातुश्री यांणीं आज्ञा केली ऐसीजे (फाटलें) सीतैन मयां अल्लफ सांप्रत तुह्मांकडून विनंतीपत्र येऊन वर्तमान श्रवण होत नाहीं ऐसें नसावें निरंतर विनंतीपत्रीं साकल्यार्थ लेहून संतोष पाववीत जाणें इंग्रजांही जंजिरे सिधुदुर्ग व जंजिरे यशवंतगड दोन्ही महास्थळें घेतलीं प्रांतांत तसदी आरंभिली समीप तुह्मीं असोन त्यांच्या पारपत्याचा किंबहुना स्नेहाचा

प्रकार योजोन स्थळें हस्तगत करावीं तें सर्वही सोडून देऊन स्वस्तता मानोन राहिलां तेव्हां आश्चर्याची सीमा जाहली साहेबांचे संग्रहीं मातबर सेवक तुह्मीं त्या प्रांतें आहां तेव्हां सरकारची मातबर फौज त्यांच्या संनिधानासीं आहे ऐसें समजोन तुह्मांस आज्ञापत्रें सादर होतात त्या प्राो तुह्मी मातबर (फाटलें) दाखवून कृपेस पात्र व्हावें उचित आहे येविसीं साहेबांस ऐसें दुस्वप्न तुह्मीं लौकीं दृष्टांतास येऊं न द्यावें. पूर्वी तुमच्या वडिलांहीं कोणे प्रकारें सेवा केली हें तुह्मांस साहेबीं आज्ञा करून कळवावें असें नाहीं. त्याहीपेक्षां तुमचे ठाईं साहेबांची ममता विसिष्ट त्याप्रमाणें तुह्मीं सेवा एकनिष्ठतेनें करून दाखविणे येविसीं सविस्तर आज्ञा हुजरे पाठविले आहेत आज्ञेप्रमाणें सांगतां कळों येईल. जाणिजे रवाना छ २९ माहे जिल्हेज बहुत काय लिहिणें

लेखनसीमा बार.

नंबर ८७

जिवाजी विश्राम सबनीस यांस पेशवे यांचें पत्र.

श्री ता. २८ आगष्ट १७७२.

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री जिवाजी विश्राम

स्वामी गोसावी.

पोष्य माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणें विशेष. तुह्मी पूर्वीपासून सरकारच्या लक्षांत राहून सावंताचे संस्थानचा बंदोबस्त केलात आलीकडे सावंतांनीं तुह्मांवर निग्रह केला यामुळें तुह्मी निघोन केरीस आलां तें वर्तमान सविस्तर कळलें ऐशास राजश्री खेम सावंत भोंसले यांचे चित्तांत विपर्यास दिसतो याजकरितां राजश्री सोमसावंत भोंसले यांस पत्र लिहिलें असे तरी ते व तुह्मी एक विचार होऊन संस्थानचा बंदोबस्त करणें. सरकारांतून पुस्तपन्हा होईल. जाणीजे छ २८ जमादिलावल सुा सलासब्बैन मया व अल्लफ बहुत काय लिहिणें हे विनंती.

नंबर ८८

जिवाजी विश्राम सबनीस याचा विनंती अर्ज.

श्री

याद दास्त कलमें जिवाजी विश्राम यांची लिहिली अर्जी अक्षरसा वाचून पाहून विवेक करावा तपशील.

सडे वरून खावंदांच्या विश्वासावर आलों परिणामीं कारभार जाऊन कर्जदारी होऊन सेतभात बागबागायत वृत्तभूम न सुटतां आकेरीस उगे होतों तेथून आणून पैका मागितला आह्मी कबूल केला आह्मापासीं नाहीं ह्मणून मुलाची क्रियाही दिली असतां सुटत नाहीं. परंतु इजत अब्रू रक्षून पैका घ्यावा तेंही नाहीं केवळ संकट प्राप्त जाहलें सोडवणार खावंद त्याणीं निष्ठूरपण धरिलें. तेव्हां पैकाही नाहीं. इजत जाऊन जीवही जातो ऐसें निदर्शनास आलें तेव्हां निघोन आलों. १

पुणेहून बोलावणें येतें न जावें तर येथ कोणाचें ह्मणून राहावें. राहावें तर कर्ज वारून पोट कैसें भरतें. यास्तव आह्मींहून नव जावें परंतु श्रीमंत आग्रह करून बोलावितात तेव्हां गेल्यास चाकरी सांगतील ती कबूल करावी त्यामुळें अपायास पात्र होतों याकरिता पैका पंचावन हजार कबूल केले. त्यापैकीं तीस हजार द्यावे. त्यांचे हवाले तुटले त्या पैकीं कांहीं पावले वरकड राहिले ते द्यावयास पाहिजेत सुटत नाहींत. याजकरितां देशांतरास जावें दुसरेची सेवा करावी हें प्राप्त जाहलें. परंतु आजवैर दुसरा धनी केला नाहीं आतां करावा तर खावंदाचाही लौकिक आण आपलेही निश्चयास अंतर येतें याकरितां अद्याप वैर धीर धरिला आतां धरवत नाहीं याकरितां कर्जातून मुक्त होऊन आपलें पोट चालावें खावंदांची मेहरबानी संपादावी सेवा करावी हा निश्चय. नूतन मागत नाहीं. जें आहे तें द्यावें त्याचा तपसील लिहून अनवे करून पाठविले आहेत त्याप्रमाणें सनदा द्याव्या. कलम १

नंबर ८९

जिवाजी विश्राम सबनीस यांस सकुबाई शिंदे यांचें पत्र.

ता. १५ जानेवारी १७७३.

राजश्री जिवाजी विश्राम गोसावी यांस.

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य

स्नो सकुबाई शिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन करीत असावें विशेष. तुह्मांकडील जाबसालविशीं चिरंजीव राजश्री सरदेसाई यांजशीं बहुत प्रकारें भाषणें जालीं त्यांची मर्जी कीं तुम्ही समीप असावें येविशीं त्यांची खातरजमा कोणतें गोष्टीनें होईल ते करून देतों आपण उत्तर आणवावें त्यावरून तुम्हांस लिहिलें जातें कीं आमचाही हेत कीं तुम्ही येऊन आमचे देखतां चिरंजिवांचें कामकाज करून कल्याणरूप गोष्टी करून दाखवाव्या यांत उत्तम तरी क्षुल्लक प्रकरणें असतील तो एकीकडे ठेवावीं आणि खातरजमेचे प्रकार कोण-कोणते आसतील ते लेहून पाठवणें तदुनरूप याजला श्रवण करवून निश्चय करून लिहून पाठवूं ह्मणजे यावयाचें करावें तुम्ही सर्व अर्थी शाहाणे वाकफगार आहांत याकरितां किंचित् रहश सुचविलें आसे तिसरे दिवशीं उत्तर आम्हांस प्रविष्ट करणें लहाण गोष्टी अधिक न लिहितां एकच निश्चयोत्तर पाठवावें अधिकाचें कारण नाहीं प्रथमता विस्तारयुक्त पत्रीं सुचवीत गेलां व कारकुनाजवळही बोलिलां तो विचार आतां न करितां येथें येणेचे आर्थी ज्यांत मनाची प्रशस्ता जेणेंकरून होईल तें लिहिणें त्यासारिखें चिरजिवाचें पत्रही पाठविलें जाईल. रवाना छ २१ माहे रमजान बहुतकाय लिहिणें हे विनंती.

नंबर ९०

जिवाजी विश्राम सबनीस यांस सरकारचें आज्ञापत्र.[१]

ता. ३० मे १७७३.

रोा जीवबादादा यांस आज्ञाजे मागां तुह्मी येथून गेलां त्यासमयीं तुह्मांस एक पत्र पाठविलें होतें त्याचें उत्तर लिहिलें कीं कोठे तरी असलों

१ खेमसावंत महाराजांनीं हें पत्र आपल्या स्वहस्तें लिहिलें आहे.

तरी आपलेच आहुं ऐसें संदिग्ध पत्र पाठविलें तर तुह्मी बाहीर असावें ऐसें काय आहे. सहज पेंचामुळें बाहीर पडलां तर तुह्मी संदेह धरिला कीं मागां चिटीनें वाडीस गेलों आण रुपयांनिमित्य अबरु घेतली हा संदेह तुह्मांस आहे तर हल्लीं हें पत्र तुह्मांस लिहिलें आहे यानंतर तुह्मांस रुपयांविशीं व हर कोने गोष्टीविशीं उपद्रव देऊं तर आह्मांस आराध्याची शेपथ आहे व बेल, तुळशी. पुष्पें तुमचे निशेविशीं पाठविलीं आहेत तर लक्ष कामें टाकून आपले स्वस्थळास यावें हें सर्वप्रकारें उत्तम आहे जें तुमचें अन्नवस्त्र चाललें आहे त्याप्रमाणें चालवूं यास अंतर नाहीं यानंतर पत्राचें उत्तर न पाठवावें आपणच यावें. यानंतर कोने गोष्टीचा संवशई न धरावा बहुत काय लिहिणें छ ७ माहे रबिलावल सन आरबां सबैन मयां अल्लफ चंद्र मजकूर.

नंबर ९१

कंपनीतर्फे ब्रूमसाहेब यांनीं दिलेला हिशोब वगैरे.

ता. १९ अक्टंबर १७७३.

बोली जिवाजी विश्राम यांजवळ कबूल केली त्याचा तपशील.

ता इंग्रजी १९ अकटोंबर सन १७७३

बांबे मार्चंट गुराबा व आणखी सिबाडांचे जिनसाची नुकसानी त्याचा हिसाब दरबारामधें पटी दिली आहे ते प्रमाणें रुपये. २२०९७।८०।.

नोरी गांठली मनोटदास रुपजी याबाबद बांबे मर्चंट गुराबीमधें होती त्याची किंमत लिहून आले नंतर आमची निशा करून तुह्मी द्यावी.

व आणखी एक सिबाड जिनसासुद्धां खेमसावंत देसाई यांहीं धरून आणिली त्याचा निशा करून आह्मांस आमचे हातीं हिसाब आले नंतर निशा करून द्यावा.

विगुरलेबाबद बोली याचा तपसील रेडीस मेस्तर मोष्टिनास रुपये आदा जाहले ते रुपये देसाई यांस

जमेस दिले रुपये ८००००

विगुरलेचा वसूल खेरीज करून विठोजी कामतीस रुपये नक्त जे दिले असतील त्याचा निशा करून दिलेवर देसाई यांस मजरा हिसेबीं देऊं रुपये

साहा वर्शांचा वेंगुर्लेचा वसूल दरसाल रुपये साडेसात हजार प्रा॰ एकूण रुपये देसाई यांसी मजरा देऊं ४५०००

साहा वर्शे खेरीज करून दुसरे सालपैकीं जो वसूल आदा जाहला असेल त्यामधें खर्च जाहाला असेल तो बाद करून मजरा देऊं.

बाकी रुपये अजम खेमसावंत देसाई यांजवळ राहिले त्याची निशा नक्त रुपये वेंगुर्लेस करार केले मुजती प्रमाणें वेंगुर्लेस द्यावे किंवा हुंडी कोण इजतेचा साउकार मुंबईस असेल त्यावर घ्यावी येणें प्रमाणें बोली तुह्मी करार केली तर उत्तम असे नाहीं तर आह्मीं निघोन वेंगुर्लेस जाणार येणे प्रमाणें इजानेबांस बोली करायाची असें इजानेबाचे खावंदांनीं ही सेवटची बोली केली असे आणखी बोली करार करणार नाहीं.

Sal Cha Broom.

नंबर ९२

गांवचे मतमानाबद्दल वगैरे निवाडा केल्याची सनद.

ता. १७ मे १७७४.

रोखा गांवकरान मौजे कळमुली तर्फ मजकूर सुरु सन आर्बासबेन मयां अल्लफ. नारसावंत मालसावंत पटेल मौजे मजकूर याचा व दळवी पटेल मौजे मजकूर यांचा मतमानाविशीं व सावजाचे वेगाविशीं वेव्हार होऊन हुजूर विदित केलें त्यावरून रामचंद्र अनंत देसाई कसबा पेडणें व पुंडलिक भास्कर नाडकर्णी तर्पे पेडणें मनसुबदार व नार धुरी माणगाऊंकर व गोपाळ नाईक आरवदेकर याचे मतें मनास आणितां नाग दळवी व होनो गुण दळवी व राम दळवी व गोद दळवी व गण दळवी पटेल व आल घाडी व गण घाडी मौजे मजकूर याणीं छ २९ सफरीं

करीनें लिहून दिले जे, नारसावंत काळसावंत हा मौजे मजकुरीं तिसरे तक्षिमेचा पटेल खरा व याचे सावजाची पटेलकीचे वेगाची तिसरी तक्षीम व मतमान दळवी पटेल या आदीं सावंत मजकूर यास भोगत आला ह्मणून लिहून दिल्हें त्यावरून सावंत मजकूर हा मौजे मजकूरचा तिसरे तक्षिमेचा पटेल खरा व सावजाचे वेगाची तिसरी तक्षीम व पटेलकीचा पैला मतमान यास सरे ऐसा निवाडा जाहाला त्याप्रमाणें मौजे मजकुरचा पटेलकीचा तिसरे तक्षिमेनें वैवाट याकडेस चालों देणें व सदरहु प्रमाणें सावजाचे वेगाची तिसरी तक्षीम व पटेलकीचा मतमान पैला याकडेस चालों देणें व पटेलकीची वृतभुक तिसरे तक्षिमेप्रमाणें सावंत मजकूर याकडेस चालों देणें सनदीची तालिक लिहून घेऊन अस्सल सनद सावंत याकडेस भोगवटेस असों देणें छ १ रबिलावल.

बारसुद मोर्तब.

नंबर ९३

खून झाल्याबद्दल ठिकाण दिल्याची सनद.

ता. २६ फेब्रवारी १७७५.

रोखा गांवकरान मौजे सातोसें तर्फ सातर्डे सुा खमस सब्बैन मयां अल्लफ. बाळधुरी मौजे मजकूर याणें बाबु कामत यास जिवें मारिला आणि गांऊ सोडून गैरहजर जाहला त्याचें खतें खुद्द तक्षिमेचें बाबु पुंडलिक कामत सातोसकर याची आई पार्वती ईस कुंबळें मिरास करून दिलें असे त्याचें कुंबळें बरहुकूम बखर.

नारळ १२७ सर्द कुंबळें ।।।५ गीमास कुंबळें ८५।।। विदळ कुंबळें ८१० कुडव एकूण नारळ कुंबळें सुमार एकशें सत्तावीस व सर्द कुंबळें सवा तीन खंडी व गीमास कुंबळें पावणेसहा कुडव व विदळ कुंबळें दहा कुडव ईस मिरास करून दिलें असे ईस व इचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेस सालदरसाल चालों देणें ताजे सनदीचा हुजूर न धरणें तालिक घेऊन अस्सल सनद तीकडे असों देणें. छ २५ जिल्हेज.

बारसुद मोर्तब.

नंबर ९४

जंजिरे सिंधुदुर्ग येथें जाणारे तंबाखूची जकात न घेण्याबद्दल आज्ञापत्र.[1] ता. २९ नोव्हेंबर १७५९.

राजमान्य राजश्री जिवाजी विश्राम यांस आज्ञा केली ऐसीजे. सुहुर सन सीतैन मयां अल्लफ हुजूर निसबत कोठीचे बैल सर १० जंजिरे सिंधुदुर्गचे बेगमीबद्दल तंबाकु भरोन राजश्री त्र्यंबक खंडेराव यांजबराबरी जंजिरे मजकुरास रवाना केले आहेत तरी तुह्मी आपणाकडील जकायतदारांस घांटमाथा व कोंकणांत ताकीद देऊन सदरहु बैलांस इकडून जातां व तिकडून हरजिन्नस भरोन आणितां मार्गी जकायतीचा व वरकड कोणेविसीं उपसर्ग न लागे तें कर्णे व सदरहु बैलांस पुढें सरसालपर्यंत सुखरूपणें जंजिरा अमदरफ्ती करूं देणे जाणिजे रा छ ८ माहे रबिलाखर.

नंबर ९५

कोणाचें पत्र कोणास तें कळत नाहीं.

स्वामीचे सेवेशीं साष्टांग नमस्कार विनंती येथील क्षेम आज सोमवार जाणोन सर्व सुखरूप आहों यानंतर इकडील वर्तमान राजश्री जेवून माळीवर गेले तेथें कलमदान न्हेवून स्वहस्तें पत्र लिहिलें आण तें ब जिन्नस आणून राम पवार व दाऊद यास पाठविले दुसरेस कोणास नकळे ते आदले दिवस तागायत. कांहीं चर्च्याच नव्हती जी वासना चित्तांत आली ते घटकेस कागद लिहून पाठविला तर तेथील सर्व निशा जो करावा तैसा करून घेतला त्याचे चित्तांत फारच करुणा उपजली आहे. तेवढ्या गोष्टी मजकडे बोलले तेव्हां तेथील सर्व निशा करून घ्यावा तैसा घेतला आपण चित्तांत कांहीं संषई न वागवा विलंब न करावा हे विनंती.

नंबर ९६

जिवाजी विश्राम सबनीस यांस सरकारचें आज्ञापत्र. ता. २१ जून १७७३.

रो। जिवबादादा यांस आज्ञा जे. तुह्मी पत्र पाठविलें तें पावलें.

---

१ हें पत्र कोल्हापुरकर ह्यांचें असावें असें वाटतें.

लिहिला मजकूर कळों आला त्यांत लिहिलें कीं मातोश्रीस न्याहावें कीं, तुह्मी समागमें घेऊन या ह्मणोन न्याहावें ऐसें लिहिलें तर यांत कांहीं जात नाहीं परंतु लोकीं बेल तुळशीस अंतर दिसो नये तें जें प्रथम पाठविलें आहे तें सर्व इमानाचें इमान आहे. त्यांत दिकत ध्यावी ऐसें नाहीं. तर यानंतर पत्र पावतांच निघोन यावें कां जे येथें धकारनामाचा बोलीचा प्रकार लागला आहे यांत उत्तम दिसेल तें करावें बहुत काय लिहिणें छ २९ माहे रबिलावल चंद्र मजकूर

नंबर ९७

जिवाजी विश्राम सबनीस यांस सरकारचें आज्ञापत्र.

श्री शंभु ता. ४ जुलई १७७३.

राजमान्य राजश्री जिवबादादा यांस हुजुरची आज्ञा जे. कोणते मुक्कामीं यावें ह्मणोन सांगोन पाठविलेंत तर चराठेस येऊन हुजूर सांगोन पाठविणें. छ ६ रबिलाखर चंद्र मजकूर.

नंबर ९८

यादी आंग्रे वगैरे यांस पोशाक पाठविल्याबद्दल.

श्री शंभु

इ. सन १७७३.

यादी रवानगी कुलाबा व राजपुरी राजश्री भवानजी राय जादे व कृष्णे प्रभु केळुसकर

पोशाक सणगी.

४ राजश्री राघोजी आंग्रे.	२ निंबाजी घराडे.	४ राजपुरीस.
१ तिवट.	२ रावजी मोहिते.	१ तिवट.
१ शेला.	२ गोविंदपंत फडणीस.	१ शेला.
१ तुमान.	२ चिटणीस.	१ तुमान.
१ झगा.	२ आकाबाई पाटणकरीण.	१ झगा.
२ गोविंदशेट.	१ पातळ.	भेट नाहीं
१ तिवट	१ चोळी.	लोक ७
१ शेला.		

आंगऱ्यांस भेटेस जिन्नस

बंदुकाची जोडी १	उत्तम	खडावाचे जोड सोंवळेचे.
पंखे उत्तम १०	गंजिफे उत्तम ५	६ दांडाच्या पाळ्या.
भाले काठ्या १०	गव्याचीं शिंगें ५	४ थोर.
ह्मोवे नारळ १०	काजीचे गर १ कुडव	२ लहान.
सांबरी कातडीं २	बरोबर लोक सरकारपैकीं	
	१ दिवट्या ५ शिपाई.	
आर्बा सब्बैन मयां अल्लफ.	१ भालेदार.	

नंबर ९९

जिवाजीराम कारकून यांस हुजुरचें आज्ञापत्र.

ता. ७ आगष्ट १७७५.

मा अनाम जिवाजीराम कारकून सरकार बा बांशंद परिवीक तुह्मी छ २६ ज्यालावल ची मरकूम अर्जी पाठविले तीवरून तमाम हकीकत मफसल जाहिर जाहली तुह्मी दुसरे चौथे रोजीं तेथील गोरेंदारपाशीं जाऊन दर्यांत जाहाजें फिरणेचें मोसम ही नजदीक आहे अव्वल मोसमेत तरी तुह्मी पक्की मसलत करून कांहीं कामकाज करणार कीं अगर खालीं दीन टाळणारच कीं काय ह्मणून विचारून त्यांची मर्जी कळून घेऊन वरचेवर मालूम करीत जाणें चहूंकडील तहकीक खबर दर्याफ्त करून मफसल अर्जदास्त करीत जाणें खर्चाचा मजकूर लिहिला तर खर्चासही येथून अनकरीब पाठवीत असों. जिवाजी विश्राम यांचे मारास तुह्मी साशक लिा असतां त्याचा जबाब पहिलेच पाठविला असे मारनिले हुजूर आले बादज त्यांची मातबरी व लायकी प्रा करीनेचा जबाब सवाल होईल याचप्रमाणें त्यांस समजाऊन सांगोन मारनिलेस हुजूर रवाना करून पाठवावे छ ९ जमादिलाखर सन ११८९ हिजरी.

नंबर १०० ता. २६ फेब्रुवारी १७७६.

ब्राह्मण धर्मदायाची सनद.

रोखा गाउकरान मौजे सरंबळ तर्फ हवेली सुा सब्बा सबैन मयां

अलफ बा धर्मदाव रामचंद्र भट शेवडे यास बरहुकूम बार साल गुदस्ता प्रमाणें जमा होनु ·॥· पावण होनु देविले असत देणें सदरहु सर्द कुंवळें तीन खंडी कुंबळेस दाणा, तूप मना असे जाणीजे छ ९ राखर.

बारसूद मोर्तब

नंबर १०१

जिवाजी विश्राम सबनीस यांस फिरंगी यांजकडे जाण्याविषयीं पत्र.

श्री ता. ६ डिसेंबर १७७६.

राजमान्य राजश्री जिवाजी विश्राम यांप्रती खेमसावंत भोंसले सरदेसाई प्रा कुडाळ व महालानींहाय मुा सबां सब्बैन मयां अल्फ तुह्मी पत्र पाठविलें तें पावोन लिहिला मजकूर कळला व राजश्री जगन्नाथ विश्राम यांणीं सविस्तर अर्थ सांगितलेवरून कळला फिरंगी याणीं येणेविसीं आपणास लेहून पाठविलें त्यास हुजूरचे कागद फिरंगी यास तीन लेहून पाठवावे, हुजूरचेही काजकामाचा मजकूर होईल ऐसें लिहिलें त्याजवरून आलाइदा तीन कागद पाठविले आहेत त्यांतील मजकूर पाहून लखोटी करून बरोबर न्यावे आण कार्याची सुरत संपऊन येई तें करणें एका महिनेची बेजमीविसीं लिहिलें तर सध्यां डिचोली माहालीं बखेडा जाहला आहे. आण रयत डावा डुल आण ऐवजही तेथें नाहीं. तर हरकैसेंही करून मोबदला खर्च करावा कामकाज सोपून आले नंतर खर्चाचाच प्रकार अधिक नाहीं सर्व गोष्टी घडोन येतील. वेंगुर्लेविसींचा मजकूर तर गोंवेंहून तरांडें मुंबईस जाणेस तयार जाहालेवर येथ लिहून पाठवावें व तेथील कागदाचे अनवे व कोणते प्रकारे ते लेहून पाठवावे. त्याप्रमाणें पाठविले जातील व राजश्री विठ्ठल विश्राम हेही तेथून हैदराकडे कधीं जाणार तें लिहावें जाणेचे अगोदर हैदराचे कागदाचा अनवा करून पाठवणें त्याप्रमाणें कागद व वस्त्रें पाठविलीं जातील वस्ताचा मजकूर तर रा रतन भटही तुह्माजवळ जावयास गेला आहे तेथ वस्तांचा मजकूर त्याजवळ मनास आणणें जाणिजे रा छ २४ सवाल.

मोर्तब.

नबर १०२

जिवबादादा सबनीस यांस आपाजीराम यांचे पत्र.

श्री

पुा राजश्री जिवबादादा स्वामीचे सेवेशीं

सेवक आपाजीराम साष्टांग नमस्कार विनंती ऐसीजे आपण खालीं घरीं बसलेत वेहार चालणें योचना काय. येथ यजमान साहेबांचे चितीं तुह्मांसारखे पदरीं असावे हें मानस पांचचार वेळ तुमचा मजकूर निघाला कां आणवीत नाहीं ह्मणून बहुत बोलणें जाहलें आम्ही परयायें बोललों कदीम स्तल समाधानें निरोप घेऊन यावा लागतो त्यास स्थळीं एकादा कोणी राहिलेस होईल किमपी गांव खेडीं इनाम सरंजामास देतों करितों असें बोलले तेव्हां वतनें आहेत टांकून येतां कसें बनेल ह्मणतां वतनेंही करून देऊं असेंही कितेक अश्वासनाचे मजकूर बोलणेत आले तुमच्या येणेची आस्ता मुख्य स्थळीं फार तर येणें निश्चय असल्यास कळवावे. उत्तरेकडील निर्जीव जाहाले तमाम बंदर किनारा साधीत जावें हेच मसलत मुख्याची घट आहे अशास येणें सिद्धांत असल्या सर्व सरंजामाचे बोलोन ठीक करोन हुजुरांतून बोलाऊं पाठऊं दादा येतों ह्मणोन ऐन समयीं न आले तर माझा आब जाईल मागां येणारसें कळोन गांव खेडीं खर्चास घरच्या नेमोर परवाने दिले येणें न होई. श्रम बोलणेचा जातो इतके दिवसांचा प्रकार भिन्न. आतां या खाविंदाचा आक्रम भारी दिसतो शहापूर जिरले धारवाड घेऊन बेळगांव हालीं आक्रमितात. आजून आस्ते जागा राहिल्यास लौकीक कदीम स्तळ तुमचे कुडाळ प्रांत खरा परंतु आतां अनास महाग होणे तेथील मजकूर तेव्हां कदीम स्तळ काय करावें ईश्वरदये जवळही खल्प रोजांत सरकार अंमल पडतो. इकडे राहून प्रसंगीं कदीम खाविंदांवर उपकार केले तर काय लौकिकास उणें पडेल मुख्यार्थ येणें खचित असावें सर्व गोष्टीचें उटावण मोडेल कुली कामकाज तुह्मांकडेस खाविंद लावितील. हालीं बंकापूर तालुका आह्माकडे दिला व साधेल तो देणार करणार कोणी उथेला नाहीं मजकूर असा.

तुमचा निसेये अंतरंगे खराखुरा कळलेवर मना प्रो जबाब स्वाल बनाऊन पाठवीन. कदीम स्तळ ह्मणून बसल्यास तेथ स्तलच्या मुख्यास कर्ते संग्रहीं माणूस असल्या आपले राज्यास कार्यास प्रसंगी येईल हे बूज नाहीं. मजकूर मज असा रिकामे बसविले तेव्हां दिसतो. मर्जी कळलेप्रमाणे सीध हे विनंती.

नंबर १०३

सांखळीकर राणे यांस खेमसावंत महाराज यांचें आज्ञापत्र.

ता. ५ नोव्हेंबर १७८२.

श्री

राजश्री खंडोजी राणे देसाई ताो सांखळी गोसावी यांसी.

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य

स्नेहपूर्वक खेमसावंत भोंसले सरदेसाई प्राा कुडाळ व माहालानीहाय येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन करणें विशेष तुह्मी कितेक आपलेकडील निष्ठेचा अर्थ राजश्री माये गंवस देसाई ताा मणेरी यांचे विद्यमानें ह्याा विदित केलेत अशास तुह्मी या राज्यांतील वतनदार आण सरकारचे पदरचे तेव्हां तुह्मी हुजूर एकनिष्ठेनें असोन सरकार सेवेसीं तत्पर राहून आपलें उर्जीत करून घ्यावें ही तुमची उमेद आण निखालसता जाणोन तुह्मांवर कृपाळू होऊन हें आज्ञापत्र सादर केलें असे याचा तपशील.

शिक्का.

१ तुमचें वतन जें आहे तें जिवाजी विश्राम याणीं तुह्मांस देविले प्रमाणें तुह्मांकडेस चालवूं.

१ जैतोजी राणे यास पेसजीं हुजूर आणविले तेव्हां कतबा रुपयेचा घेतला तो तुह्मांवर कृपाळू होऊन ते रुपये तुह्मांस माफ करून कतबा तुमचा तुह्मांस देविला असे.

१ ताो सांखळी येथें तुमचे लोकांसीं सनद पहिलेपासोन चालत आहे त्या प्रो देवऊं व माहाल ताो मजकूरची बोली ज्याप्राों केली होती त्याप्राों चालविली जाईल.

१ तुह्मी राजश्री कान दळवी आहेत तेथें आले नंतर तुह्मांस हुजुरून घोडा एक व कडें सोनेचें व वस्त्रें देविलीं जातील.

१ सांखळीचा कोट फिरंगी याजकडेस आहे त्यास तुह्मी सरकारचे फौजेस सामील होऊन कोट हस्तगत जाहालेवर मोडून टाकिला जाईल.

४

येणें प्रमाणें चार कलमें करार करून देविलीं आहेत. त्यास तुह्मी कोण गोष्टीविसीं चित्तांत शंका न धरितां सरकार सेवेसीं तत्पर असोन धणीकामाविसी एकनिष्ठ राहून धणीकाम करीत जाणें तुह्मी सरकारची फौज डिचोली व सांखळी प्रांतीं आहे त्यास राजश्री दळवी आहेत तेथ येऊन धणीकाम करीत जाणें तुह्मी एकनिष्ठेनें राहून सरकारी सेवा केलेस तुमचें चालवणेस दुसरा अर्थ नाहीं सुा सह्लास समानैन मयां अल्लफ रवाना छ २८ जिलकाद. मोर्तब.

नंबर १०४

खेमसावंत महाराज यांस राजेबहादर पदवी दिल्याचें फरमान.

श्रीगजानन प्रा.

वकील मुमालक मुखत्यार सदाशिव रामचंद्र नायब बक्षी बहादर मसुदा ऐसाजे अर्जी हजरत जहां पन्हा यांस केली वकील मुतलिक मुखत्यार उलमुल् उमददुल् उमराव फर्जंद आलिज्या माहाराजाधिराज माधोराव सिंदे बहादुर श्रीनाथ मनुरीया नायब मवददुल सलतनत असा तुनंखिलाफ सवाई माधोराव नारायण बहादूर फीदवी पन्हां गुलाम बादशहा गाजी याणीं डिगेच्या मुकामी अर्ज केला जे खेमसावंत भोंसले सरदेसाई यांसी राजेबहादर भोंसले यांच्या वंशीं ही मरामत व मोर्छेलें आहेत परंतु यांजकडेस चालत नाहींत आण खेमसावंत यांची मर्दुमीही बहुतच आहे मोर्छेलें व मरामत देणें योग्य आहेत ऐशा कितेक सिपारसींचा वगैरे अर्ज केला तो ध्यानीं आणून मरातब दिली जे राजे खेमसावंत भोंसले बहादूर व मोर्छेलें व खिलात सातपारची व निमअस्तनी भरजरी दासची व झगा व शिरपेंच व मोत्यांची माळा व झ्यालरदार पालखी व समशेर हफ्तहजारी ही मरामत दिली आण सरंजाम मुलुक

मशारनिलेकडेस पूर्वीपासून चालत आला आहे ऐसा भोगवटा मनास आणिला आण तेणें प्रमाणें फरमानांत लिहून दिलाजे प्रा कुडाळ व तर्पे बांदें व तर्फ माणगांव व तर्फ सांतर्डे व महाल सर्पे पेडणें व डिचोली व सांखळी पंचमहाल व फोंडें पंचमहाल व हेवाळें व उसप व मणेरी व सडा जांबोटी व तर्फ मनोहर व साळसी पंचमहाल निमे पंचडी व कर्यादनारूर व कर्याद पाटगांव व आयणे घोळ मायणे घोळ व हेरे ताा व चंदगडें ताा वगैरे पुरातन चालत आलें आहे त्याप्रमाणे फरमान हुजरून दिलें सुभा विजापूर मरातब वगैरे फरमानें मेहरबान होऊन सन सीतेचे सालीं डिगेच्या मुकामी करून दिलीं अशास फरमाने जैपूरच्या बैद्यांत गैरविलेस पडलीं त्याजवर हल्लीं जिवाजी बल्लाळ बक्षी बहादूर याणीं पुनरुपी अर्ज केला जे नीवीन फरमानें तयार करणेस ज्याहां पन्हाचा हुकूम व्हावा तो अर्ज ध्यानीं आणून मेहरबान होऊन फरमानें तयार करून देविलीं आण ऐविसीं मांडलिक राजे व पंतप्रधान यांसही साहित्यपत्रें दिलींजे हुजरून मरातब व मोर्छलें वगैरे सरंजाम करून दिला त्या प्रों चालत जावा आण कोणेगोष्टीची दिकत न करावी हुजुरून करून दिले तें प्रमाण जाणोन वर्तणूक करावी कोणेगोष्टीचा अंदेशा न धरावा ह्मणून सुके येणे प्रा.

१ शाहू छत्रपती हर्षनिधान यांस
१ करवीरवासी राजे यांसी
१ सवाई माधोराव नारायण पंतप्रधान यांस
१ फिरंगी गोमांतकवाले यांस
१ निजामन मुलुक यांस
१ टिपु सुलतान मियां यांस

६

१ सरंजाम नेमणूक बक्षी मीरर्ना अकबर शाहा यांस हुकूम करा येणे प्रमाणें नेमणूकीची सनद हफ्तहजारी वगैरे नेमणूक सनद रुकार.

नंबर १०५

दळवी यांस दत्तक घेण्याची सनद.

श्री

ता. ७ मार्च १७८४.

चाकरमाना लोकां दिा राजश्री दळवी भोंसले सुार सन सीतसमा-

नेन मयां अल्लफ राजश्री भान दळवी भोंसले यांचे पुत्र दौलत दळवी भोंसले यांचे स्त्रीचे होटीमधें घालावा ऐसें करून सन आर्बा समानेनचे सालीं दसरेस कुली लोक तुह्मी त्याबराबर चाकरी करणेविशीं सनद सादर जाहाली होती त्यास दौलत दळवी भोंसले आसतां रो कान दळवी भोंसले याचा पुत्र रा रघुनाथ दळवी भोंसले दत्तक घेतला तोच मुकरार करणेविशीं श्रीची आज्ञा जाहाली असे तर पुरातन प्रमाणें राजेश्री रघुनाथ दौलत दळवी भोंसले यांकडेस चाकरी कर्णें याविशीं कारकून दिा मजकूर यासही ताकीद आसे जाणिजे छ १४ माहे राखर.

नंबर १०६

पुरोहित कोळंबेकर यांस गावगन्ना वर्षासन करून दिल्याची सनद.

श्री ता. ३१ अक्टोबर १७८५.

विनायेकं गुरुं भानुं ब्रह्माविष्णु महेश्वर सरस्वती प्रणम्यादौ सर्व कार्यार्थ सिधये नमस्तुंग सिरश्चंडी चंद्र चामर चारवे त्रैलोक्य नगरालंभ मूलस्तंभाये शभ वो स्वस्ती श्री नृप शालिवान सके
शिक्का
१७०७ सत्राशीं सात प्रवर्तमान वेव्हारीक विश्वावसु नामसंवत्सरे आश्विन वद्य त्रयोदशी रविवासरे श्रीमंत राजश्री राजे खेम-सावंत भोंसले बहादर सरदेसाई प्रा कुडाळ व माहालांनींहाय सुरुसन सीत समानेन मयां व अल्लफ वेदशास्त्र संपन्न राजश्री सदाशिव बावाभट कोळंबेकर पुरोहित तुह्मी हुजूर विनंती केली जे आपले वडिलांस प्रांत मजकुरीं थोरले महाराजांनीं वर्सासन करून दिल्हें आहे तें पत्र अजी जीर्ण जाहालें त्या पत्राप्रमाणें ताजें पत्र करून द्यावें. ह्मणोन त्यावरून कैलासवासी श्रीमंत खेम सावंत भोंसले महाराज यांणीं श्रौतस्मार्त कर्मानुष्ठाण तत्पर वेदशास्त्र संपन्न हरभट सुत अनंतभट कोळं-बेकार पुरोहित गोसावी हे तुमचे वडील यांस वर्शासन शके १६१४ सोळाशीं चौदावस प्रवर्तमान वेव्हारिक आंगिरा नाम संवत्सरे आश्विन सुद दसमी रविवारीं तदिनीं तुमचे घरीं वेदध्ययेन चालावें या कारणें देस

समधें वर्शासन करून दिलें निशाणी होनु ६० साठ यास

गांववार तपशील आहे.

येणें प्रमाणें तुह्मांस सालदरसाल वेतन धारा दत्त करून दिलें असे आह्मी व आमचे जाहाले जातेनें व जातप्रजातीनें पाळून द्यावें तुह्मी व तुमचे जाहाले जातेनें यावश्चंद्रार्कवर भोगीत जावें ह्मणोन पूर्वील अस्सल पत्र तुह्मांकडील पाहून त्या अन्वयें हें पत्र सादर केलें असे सालदरसाल भोगीत जावें छ २७ माहे जिल्हेज. मोर्तब.

नंबर १०७

गौडसारस्वतांचे स्वामींस गांवगन्ना वर्षासन दिल्याची सनद.

श्री ता. २ डिसेंबर १७९७.

श्री सचीदानंद सरस्वती
श्री पूर्णानंद सरस्वती
श्री शिवानंद सरस्वती

(शिक्का)

श्रीमंत राजश्री राजे खेमसावंत भोंसले बहादर सरदेसाई प्रो कुडाळ य महालांनींहाय ताहा गांवकरान व कुळकर्णी व देहाय प्रागणे कुडाळ व महालांनींहाय सुरुसन समान तिसेन मयां अल्लफ श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य पदवाक्य प्रमाण श्रीमत् स्वामी यतिवर्य तत्कर कमल संजात श्रीमत् स्वामी तदनुग्रहीत श्रीमत् स्वामी यतिवर्य अनेक तीर्थक्षेत्रें पूर्वपश्चिमोत्तर श्री जगन्नाथ द्वारकाधीश समस्त तीर्थ पर्याटण करून श्री वाराणशी माहाक्षेत्रीं चिरकाल निवास करून दक्षण यात्रां श्री रामेश्वर आधीं समस्त तीर्थें दर्शस्पर्श यथाविधी करून पूर्वस्थळ मठ सोनवडें येथें श्रीसमाधी दर्शणार्थ श्रीमत् स्वामी यतिवर्य तत्कर कमल संजात आले तेव्हां आह्मी बहुमान पुरस्कर वाडीस आणून यथोरचित विधीपूर्वक पूजा सन्मान केला आण सोनवडेचे मठीं नैवेद्य नंदादीप पुण्यतिथि नवरात्र मोहोत्साह चालावा यदर्थीं सालिना वर्षासन गांवनिसबतीनें करून दिलें

असे बरहुकूम पटादेश व तीर्थस्वरूप लखम सावंत भोंसले आमचे वडील यांचें पत्र नळनाम संवत्सरींचें बजिनस पाहून सन इहिदे सीतेनचे सालीं विक्रमनामसंवत्सरीं पौष शुा ७ सप्तमी भोम्यवासरीं छ ६ माहे जमादिलाखरीं पत्रें सनदा करून आम्ही दिल्हा त्यास सन समान समानेन मयां अल्लफचे सालीं करवीरवाशी श्रीमन्महाराज छत्रपती यांची स्वारी प्रांत मजकुरीं जाहाली तेव्हां श्रीमठ सोनवडें येथें पेंढारी यानीं नागावा केला त्यावेळीं सर्व कागदपत्र मठींचे गेले त्यास वर्शासन चालत आहे परंतु सरकारचीं पत्रें असावीं ह्मणोन श्रीमत् स्वामी यतिवर्य बहुतीर्थे प्रयाटण करून सालमजकुरीं सोनवडे आले त्यांणीं आह्मांस आज्ञा दिलेवरून सरकार कागदीं दाखला पाहून हें ताकीदपत्र सादर केलें असे सालदरसाल वर्शासन गांव निसपतीनें चालों देणें निा होनु

प्रथम गांववार तपशील असून त्या खालीं तर्फवार
तेरीज आहे तें.

२०॥।	तर्फ हवेली	९८१५	१२८४-।·।	तर्फ सातर्डें	३८२
१४॥	तर्फ माणगांव	३॥१०	१३	तर्फ तळवडें	३।
१२॥	तर्फ आजगांव	३८१०	१४।	तर्फ पाट	३॥५
६	तर्फ मनोहर	१॥	१२॥	तर्फ कळसुली	३८१०
१२	तर्फ बोर्डवें	३	४	कर्यातनारूर	१
१२॥।·।-	तर्फ मसुरें	३८१६	२२	तर्पें पेडणें	५॥
९८-।·।	तर्फ मालोंड	२।२	१२	तर्पें मणेरी	३
११।	तर्फ घराड	२॥।९	२१॥।	तर्पें डिचोली	५।१५
१४	तर्पें बांदें	३॥	१२	तर्पें साखळी	३
२	कर्यात पाटगांव	·॥·	१॥	मौजे चौकुळ तर्पें चंदगडें	·।१०
६	बंदर वेंगुर्लें	१॥			
			१	मौजे आंबोली	·।·
२४७			६१॥।		

एकूण ऐन जिनसी भात पावणे बासस्ट भरे याचे नक्ती निा होनु दोनशें सत्तेचाळीस सालदरसाल वर्षासन वेतन दत्त करून दिलें असे

आह्मी व आमचे जाहाले जातेनें व जातप्रजातीनें पाळावें याप्रमाणें करार करून दिलें असे यावश्चंद्रार्कवर चालों देणें सदरहु प्रमाणें वर्शासन श्रीमठ सोनवडेंकडेस देत जाणें वर्शासनास तफावत केल्यास शासन होईल. शके १७१९ सत्राशें एकोणीस प्रवर्तमान वेव्हारीक पिंगलनाम संवत्सरे जाणीजे छ १२ माहे जमादिलाखर.

बारसुद.

नंबर १०८ ता. १३ मे १८०१.

बांदें येथील पिराचे चाकरीबद्दल सनद.

श्रीमंत राजश्री राजे खेम सावंत भोंसले बहादर सरदेसाई प्रागणे कुडाळ व माहालांनींहाय ताहा शेख दाऊद बिन शेख म्हामद बांदेकर मुंजावर सुा इहिदे मयातेन व अल्लफ तुवां हुजूर येऊन अर्ज केला जे शेख रजा मुंजावर याची बायको पीर इस्मेल कसबा बांदें व बोरमाणकी घोडी सरकारी ही कसबा मजकुरीं पेशजीं मयत जाहाली होती याचे सरकारांतून थडें बांधिलें तिची व पीर मजकूर याची चाकरी करीत होती त्यास तिणे सन तिसा तिसैन मयां अल्लफचे सालीं बद अमल केले तेव्हां पिराची चाकरी करून पिरावर हात घालतां नये असें ह्मणोन राा अबदुल रजाख काजी बांदेकर याचे मतें जाहालें तेव्हां तिणे मज आपले आत्मसंतोषें सांगितलें जे पिराचे वगैरे चाकरीबद्दल शेत दस्तीबाद पिराचें इनाम अदलशापासून चालत होतें त्याचे पटे फारशी पादशाई कारकीर्दीचे होते ते आपणास तिणें दिल्हे आण ती चाकरी आपणास सांगितली व बद अमलाचे कज्यास व जाजती मिळोन रुपये ६० साठ दिल्हे त्याऐवजीं ठिकाण सुद्धां पटे आपणास दिल्हे ह्मणोन त्यावरून हुजूर मनास आणून ते पटे सरकारी पाहून तूज दिले असत ठिकाणही तुज दिलें असे सालदरसाल पिराची वगैरे पुरातन प्रों तूं करणें येविशीं सन तिसाचे सालीं शंभूचा कागद छ २५ जिल्कादीं सादर केला असे त्याप्रमाणें तीं ठिकाणें तूं व तुझे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें सालदरसाल अनुभवीत जाणें याविशीं गांवकर कसबा बांदें यांस ताकीद जे सनदीची

तालिक घेऊन अस्सल सनद याकडेस भोगवटेस असों देणें. ताकीद असे जाणीजे रा। छ २९ माहे जिल्हेज.

बारसुद. मोर्तब.

नंबर १०९

राजघराण्यांतून झालेला खून थारविण्यासाठीं इनाम दिल्याची सनद.

ता. १६ जून १८०३

राजश्री लक्ष्मण कृष्ण नेरूरकर कमाविसदार सरकार यास लक्ष्मीबाई भोंसले सरदेसाई प्रा। कुडाळ व म्हांलांनीहाय सुरु सन आर्बा मयातेन व अलफ गोदो टिळवा यास पेशजी तीर्थस्वरूप नानासाहेब यांणीं कागलचे मुक्कामीं जिवें मारिला याजकरितां त्याचा मूल नागो टिळवा यास सरकार मौजे कोलगांव तर्फ माणगांव पैकीं ठिकण तोरपाची गाळवी पेस्तरसालपासून दस्तीबाद देऊन सालदरसाल त्यास चालों देणें तेणेंकरून त्याचे खुनाची थारणूक होती ह्मणोन श्रीनें सांगितलें त्यावरून मनास आणून त्यास तें ठिकण दिलें असे त्याच्या चतुःसीमा बरहुकूम बखर.

१ पूर्व दिशा गांवचे ठिकणाचे मेरेनमेर.
१ पश्चिम दिशा चंद्र गंवस व विठो देवजी राऊळ याचे ठिकणाचे मेरेनमेर.
१ उत्तर दिशा रामजी राऊळ याचे ठिकणाचे मेरेनमेर.
१ दक्षण दिशा कुंबारभाटलेचे मेरेनमेर.

४

येणें प्रमाणें चतुःसीमा याचें कुंबळें सर्द खंड कुडाळी मापें ॥ दोन खंडी पेस्तर सालपासून दस्तीबाद देऊन सदरहु ठिकण त्यास दिलें असे. सालदरसाल चालों देणें ताजे सनदीचा उजूर न धरणें सनदीची तालिक लिहून घेऊन अस्सल सनद त्याकडेस भोगवटेस असों देणें. जाणीजे रवाना छ २९ माहे सफर. मोर्तब.

नंबर ११०

कातेखुमारी व मासळी याचा मक्ता ठरवून दिल्याची सनद. ता. ११ जुलई १८१४

श्रीमंत दुर्गाबाई भोंसले सरदेसाई प्रागणे कुडाळ व महालांनींहाय ताहा माडदुलें किरिस्तावीण वस्ती वाड सुा खमस अशर मयां तेन व अल्लफ. तूं हुजुर येऊन अर्ज केलास जे मौजे साळगांव तर्फ माणगांव येथील खुमारी व मासळी व माडी व गूळ याचा मक्ता करार करून दिलेवर दुकान लावून कराराचे बेरजेप्रमाणें वसूल देईन ह्मणोन त्यावरून मनास आणून बरहुकूम कबूलखत बेरीज सालमजकुरीं एक साली मक्ता ३० करार करून दिलें आहे. अखेरसालपर्यंत दुकानें लावून वसूल देणें सदरहु प्रमाणें एक साला तीस माप करार करून दिलें असे. छ १२ रजब रुजु.

बार.

नंबर १११

तोतया भाऊसाहेब याचे संबंधानें दुर्गाबाईसाहेब यांणीं लिहिलेलें पत्र. ता. ३० अक्टंबर १८१८.

यानंतर राजश्री शिदोजीराव राजश्री निंबाळकर सर लष्कर यांच्या बंदोबस्तांत चिरंजीव भाऊसाहेब देवाधीन झाले असें समजल्या समयीं चिरंजीव यमुनाबाई भोंसले व आह्मीं सर्वांनीं निधन जाहल्या मुलास पाहिला आणि दहन करविलें. नंतर उत्तरकर्म आदि करून सर्व संस्कार केला असतां कारागृहांतून त्या मुलास आबांनीं पार केला तो पाटणांत आला आहे असें सुा सांगणें आलें त्याशास चिरंजीव भाऊसाहेब मृत्यु पावले हें आह्मांदेखत घडलें त्यापक्षीं आणखीं शोधाशोध करावी असें नाहींच परंतु परअमलांत त्याचें नांव सांगतो त्यास आणोन खोटा असा करावा ह्मणोन तेथें माणसें पाठवून वाडीस आणला त्या समागमें चिरंजीव राजश्री द्वारकोजीराव पाटणकर यांचे मूल व पुतणे आले. ते राजश्री पंतप्रधान यांचे पदरचे मानकरी. आमचे तर आसच. त्यांणीं अशा बरोबर येऊं नये हेंच लौकिकाच्या मनुष्यास योग्य असें असोन आले; चिंता

नाहीं. ते आल्यावर संस्थानच्या सर्व समुदायानिशीं जाऊन आणल्या मनुष्यास पाहतां तो तोतया. आमचा खिजमतदार बाबी दूलशेट तानवडा याचा मुल मुकुंद तानवडा. चिा बाबा साहेब यांजकडेस खिजमतगारीवर असतां चोरी करून पळून गेला होता तो हा असें सर्वमतें ठरलें त्याचें पारपत्य व्हावें परंत उभयतां पाटणकर त्यास पार करणार ह्मणों लागले त्यामुळें सोडून दिला त्यांणीं आणल्या तोतयास लावून देऊन आपण आप्तविषय त्यापक्षीं त्यांणीं चार दिवस येथें रहावें असें मनास होतें तें त्यांजकडून घडलें नाहीं तोतयास घेऊन सर्वच निघोन गेले. समागमें मातुश्री राजसबाई यांसही नेलीं आहेत. त्यांचा वृद्धापकाळ, बायकोपणाचा समज. कोणही सांगेल तें त्यांस खरें वाटतें. आपण संस्थानचे शुभचिंतक. घडला मजकूर तुह्मांस कळावयास्तव लिहिला आहे. ध्यानीं घेऊन पत्रोत्तर पाठवावें रवाना छ २९ जिल्हेज. तिस्सां अशर मयांतेन व अल्लफ.

नंबर ११२

मेरेचा निवाडा करण्यासाठीं गांवकामदारास दिलेला हुकूम.

ता. २४ जुलई १८२०

रोखा गाऊकरान मौजे वालावल तर्फ हवेली सुा इहिदे अशरीन मयांतेन व अल्लफ वो रा गणेश रामभट शेंबेकर याचें ठिकण माळणीचें टेंब यांतील मेरेस गोविंद गणो चौधरी मौजे मजकूर हा कज्या करितो ह्मणोन हुजूर विदित जाहालें तर त्याचे मेरेचे निवाडेस हुजुरून पाठविले याचे गुार्तीनें मेरेचा निवाडा पुरातनचे दाखले भोगवटे पाहून रास्ता करून बखर लिहून हुजूर पाठविणें नांवानिशी.

१ रामचंद्र प्रा नेरूरकर	१ भानो गणोजी कांडरकर
१ फट धुरी पिंगुळकर	१ नारो विठजी राऊळ तेंडोलकर
१ साक्रे प्रा सरंबळकर	१ राम प्रा चेंदवणकर

६

एकूण साहा असामी पाठविले याचे गुजारतीनें निवाडा करणें या सदो

काळशेट गाईचोर खासकील पाटविला यास ज्याकडेस गैरी लागेल त्या पैकीं मसाला होनु १ एक देणें छ १३ सव्वाल.

बारसुद. मोर्तब.

नंबर ११३

श्रीजगद्गुरु शंकराचार्य स्वामी यांस गांव इनाम दिल्याची सनद.

ता. ४ डिसेंबर १८२०

श्री शंभु

श्री स्वामी संक्राचार्य संवस्थान मठ

करवीर स्वामीचे शेवेसीं.

सेवक राजे खेमसावंत भोंसले बहादर सरदेसाई प्रागणे कुडाळ व महालांनींहाय चरणावर मस्तक ठेवून दंडवत विज्ञापना तागायत कार्तिक वद्य त्रयोदशीपर्यंत वर्तमान यथास्थित असे विशेष. श्रींची स्वारी वाडीस जाहाल्या समयीं श्रीच्या संस्थानीं आन्नसंतर्पण व दीपाराधना चालावी यांत आपलें कल्याण आहे ह्मणोन आज्ञा जाहली त्याजवरून श्रीचे आशिर्वादें सेवकाचें कल्याण होणार ऐसें ध्यानीं आणून मौजे आंबडपाल तर्फ हवेली हा गांव सालमजकुरापासून श्रीदेव व ब्राह्मण धर्मदाव व किल्ले प्रसिद्ध गडकरी व वतनीबाब रुपये खेरीज करून वरकड गांव कुलबाब कुलकानु श्री स्वामीस इनाम दिला असे गावास आलाहिदा सनद देविली आहे. त्याप्रमाणें सालदरसाल श्रीचे परंपरागत अनभव करीत असावा श्रीचे सेवक वौंशपरंपरागत चालवितील शके १७४२ विक्रमनाम संवत्सरे सुहूर सन इहिदे आश्रीन मयातेन व अल्फ छ २७ माहे सफूर.

बारसुद. मोर्तब

नंबर ११४

गुळदुवें गांव इनाम दिल्याची सनद.

श्री शंभु ता. ३० नवंबर १८२४

राजश्री मुराररावं घांटगे सर्ज्याराव गोसावी यांस.

७ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य

स्नो। राजे खेमसावंत भोंसले बहादर सरदेसाई प्रा। कुडाळ व महा-

लांनींहाय राम राम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत जावें विशेष. तुमच्या वडिलांपासोन तुह्मी सरकारी उपयोग बहुत केला हें लक्षांत आणोन तुमच्या चालवण्यास मौजे गुळदुवें तो आजगांव हा गांव वतनबाब व श्रीदेव ब्राह्मणधर्मदाव व सरकार बागायत व हक्कदार खेरीज करून वरकड मौजे मजकूरचा ऐवज बाब त्यासुद्धां सालमजकूर पासोन सालदरसाल तुह्मांस व तुमचे पुत्रपौत्रादि वौंशपरंपरेस दिला आसे येविशीं सनद गांवास आलाईदा सादर आहे त्याप्रमाणें भोगवटा करीत जावें. मौजे मजकुरीं सनद सादर आहे त्याची तालिक गांवीं देऊन आसल सनद तुह्मांकडेस आसों द्यावी. सुा खमस आशरीन मयातेन व अल्लफ. छ ८ माहे रबिलाखर बहुतकाय लिहिणें लोभ कीजे हे विनंती. शिका आहे मोर्तब.

नंबर ११५ ता. १४ फेब्रुवारी १८२७.

बाण लिंगाची स्थापना व त्यास सनद.

रोखा गांवकरान मौजे मातोंड तर्फ तळवडें सुा सबा अशरीन मयातैन व अल्लफ श्रीदेव बाणलिंग हे राम बापे प्रा मौजे मजकूर याचे घरीं बहुतवर्शें नकळतपणें धोंडा ह्मणोन घरांत कामास होता तेव्हां साल गुदस्तां मातोश्री बाबई पाटणकर समुद्रस्नानास मौजे आरवली येथें गेली होतीं तीं माघारें मौजे मजकुरचे मार्गानें येऊन प्रा मौजे मजकुर याचे घरीं राहिली तेथें कामास धोंडा दिल्हा तो पाहून चौकशी केली आण आणखी ब्राह्मण मिळोन चौकशी करितां धोंडा तो बाणलिंग असें ठरलें. व त्याची स्थापना होऊन अर्चा करावी ह्मणोन श्रीदेव मौजे मजकुर याचे प्रसाद जाहले त्यावरून त्याचे पुजेस व श्रीदेव नारायण मौजे मजकूर ता वो राजश्री बाबु रघुनाथ भट वाटवे यास पुजा करावयास साल मजकुरपासून सांगितली असे त्यास धर्मादाव ऐन जिनसी सर्द निा होन ८ आठ साल मजकुरपासून साल दरसाल याचे खतेकडेस देविले आहेत. याचे खतेकडेस मजरा देऊन सालदरसाल चालों देणें छ १७ रजब.

बारसुद. मोर्तब.

नंबर ११६

लढाईंत जखमी झालेल्या असामीस इनाम दिल्याची सनद.

ता. १ आगष्ट १८२९.

रोखा गांवकरान मौजे नेरूर तर्फ हवेली सुा सलासेन मयातेन व अल्लफ नारो अर्जुन कांडेरकर दिमत खासकील गुा राजश्री तातो रघुनाथ नेरुरकर यास किल्ले महादेवगडचे लढाईंत तोफेचा गोळा पायास लागोन पाय अखम जाहाला याबद्दल त्याजवर कृपाळु होऊन त्याचें कुंबळें मौजे मजकुरीं आहे त्यापैकीं सर्दपैकीं कुंबळें मापें भरे ·॥· नक्ती रुपये ५

एकूण दोन खंडी सर्द कुंबळें व नक्ती रुपये पांच सालमजकूरपासून साल दरसाल दस्तीबाद देऊन इनाम करून दिल्हें असे यास व याचे वौंशपरंपरेस साल दरसाल चालों देणें सनदीची तालिक घेऊन अस्सल सनद कांडरकर मजकूर याजकडेस भोगवटेस असों देणें जाणीजे छ ३० माहे मोहरम. बारसुद. मोर्तब.

नंबर ११७

मक्त्याचा मामलत घेणारे इसमाचा मागणीचा अर्ज व त्यावर सरकारचा हुकूम.

इ. सन १८३०

यादी कलमबंदी तर्फ आजगांव व तर्फ पाट खेडीं ११ याची मामलत राजश्री वेंकु मुकुंदशेट आंदारी व दादु धोंडशेट अरवारी यांस दिल्ही सुा इहिदे सल्लासीन मयातैन व अल्लफ.

१ कंपनी सरकार त्रिजोरीचे भरिणे पैकीं बाकी रुपये राहिले ते आह्मांकडून कंपनी सरकारांत देविले त्यांस व्याज दरमहा दरशेंकडा रुपये २ व मनोती एकंदर शेंकडा रुपये ५ प्रमाणें ऐवज दिला त्याबद्दल यावे व ते रुपये हिशेबसुद्धां ऐवज पावेपर्यंत सोडचिठी आह्मांकडेस असावी.

तिजोरीचे तूर्त तुह्मांकडून रुपये देविले जातील त्यास मनोती एक वेळ दरशेंकडा रुपये २॥ प्रमाणें व व्याज दरमाहे दरसदे रुपये १॥ दीड प्रों देविले जातील सोडचिठीचे तुह्मांकडेस कारण नाहीं.

कलम १

१ मामलेची द्यावयास आज्ञा असावी.

सदरहु अकरा गांवची मालम-तिची सनद देविली जाईल.

कलम १

१ कंपनी सरकारांत किल्ले प्रसिद्धगडचे तनखेबद्दल ऐवज द्यावा त्याकरितां आह्मांस तीन साल बाकीदार दिल्हेत त्या ऐवजाचा उलगडा मामलेहून जाहलेशिवाय मामलेसंबंधीं चिठी होऊं नये. सदरहु ऐवज वजा होऊन बाकी राहील तो ऐवज आह्मीं माघ महिनेपासून अखेरसालपर्यंत हावते बंदीनें वारून देऊन परभारें हरएकविसीं चिठी होऊं नये.

सदरहु मामलतीची जमा ठरावून देविला जाईल त्याचे आठ हप्ते करून देविले जातील त्या प्रों तक्षिमवार तिजोरीचे तिजोरीस पावत्या हप्तेचे हप्तेस सरकारीं रुजु कराव्या व सरकारचे रुपये सरकारांत अवेल हाप्त्यापासून तक्षिमवार सनदी बरहुकूम वारून देत जाणें त्यापैकीं तुह्मांकडून तूर्त तिजोरीस ऐवज देविला जाईल तो मजरा देऊं. कलम १

१ मामलेदार यास दरमहा पगार रुपये ७५ प्रों यावा.

दरबार शिरस्ते बरहुकूम देविले जातील. कलम १

१ तहसलीस प्यादे असामी १५ दरमहा रुपये ४ दर असामीस प्रों रुपये ६०

तहसलीस प्यादे सरकारचे तहसीलदार देविले जातील.

कलम १

१ खिसमतगार असामी २ दरमहा रुपये ३ प्रों.

देविले जातील.

कलम १

१ कारकून असामी २ दरमहा रुपये २५ प्रों.

कारकून एक असामी यास सालिना रुपये १०० देविले जातील.

कलम १

१ शागिर्दी असामी १ दरमहा रुपये ४ प्रों.

शागिर्दी असामी १ यास दरमहा रुपये ३ प्रों देविले जातील.

कलम १

१ कागद बहा सरसाल रुपये ५०

कागद बहा सरसाल रुपये २५ देविले जातील. कलम १

१ भोजन खर्च दरमहा रुपये व धर्मादाव वगैरा ह्मालीं सरसालीं खर्च आहे त्याची बेरीज ठरोन आज्ञा असावी.	देणेचा शिरस्ता नाहीं कलम १
१ अस्मानी सुलतानी मजरा असावी.	चौकशीनें ठरल्यास मजरा येईल. कलम १
१ मनसुभींतून परभारें गांवगन्ना तकादा होऊं नये जें कूळ लागेल तें आह्मांस दखल करावें ह्मणजे आह्मीं हजर करून देऊं.	खुनी खेरीज करून वरकड कुळा-विशीं आज्ञा होईल त्या प्रों हजर केलेस चिठी होणार नाहीं. कलम १
१ खंड जकात व आडवी पाताड व धनगरमहाल व कात चुलाण व काती खुमारी व शेरी सरकार बागायत वगैरे मामलेंत असावीं.	शेरी सरकार मात्र जमा ठरवून मामलेचे बेहडेंत धरून देविली जाईल वरकड कमाविसदार खेरीज होणार. कलम १
१ सनदकरी व कटुबाणकरी व बदलमुशाहिरेकरी वगैरे सालाबाद-चे असतील त्याचा ठराव करून द्यावा त्यांणीं परभारें चिटी करूं नये.	हिशेबी ठरावून ताकीद रोखे देविले जातील. त्या प्रों देणें पर-भारें त्याणीं चिटिया केलेस न धरणें. कलम १
१ गावगन्ना बगर कामी शिपाई आले असतां जेवे वगैरे कांहीं घेऊं नये.	येविशीं ताकीद सनद देविली जाईल. कलम १
१ हक्कदार याणीं गांवगन्ना हक्का-विशीं व परभारें चिटी करूं नये आह्मांकडून सालाबाद प्रों ध्यावें.	परभारें चिटिया त्याणीं केल्या तरी सालाबाद प्रों घेऊं देणें ज्याजती न देणें. कलम १
१ गांवगन्नाची जमाबंदी वसुली बेरीज रुजु गुा प्रों पत्रका अन्वयें घेऊन गांवगन्नाचे जमाबंदीचे कागद द्यावयास आज्ञा असावी.	जमाबंदी ठरवून जमेचे कागद देविले जातील. कलम १

१ सालमजकूरचा ऐवज पंचतीस खेड्यांपैकीं बाकी असेल ती आमचे गुजारतीनें वसूल व्हावा आण त्रिजोरीस तूर्त रुपये कंपनी सरकारांत देविले तो ऐवज हिशेब सुद्धां सदरहु वसुलांत वजा करून बाकी राहील तो देऊं आगर कमी वसुल होऊन बाकी राहिलेस मामलेंत वजा करून घेऊं.	पसतीस खेड्यांपैकीं त्रीपन्न खेड्यांतील हवेली तर्फेचीं खेडीं वजा करून बाकीच्या खेड्यांचा वसूल हिशेब करून बाकी ठरावून देविली जाईल. त्या प्रों वसुल करणें आण तूर्त तुह्मी तिजोरीचे भरीणेस रुपये द्याल ते वजा करून बाकीचा ऐवज सरकारीं वारून देणें यांत तुमचा ऐवज तिजोरीस द्याल तो वजा न पडल्यास सदरहु मामलतींत मजरा येईल ह्मणोन सदरीं टांक मारून दिला आहे. कलम १
१ मोर्तब मामलेंत द्यावयास आज्ञा असावी.	वरकड मामलेदार यांस दिलें तर देविलें जाईल. कलम १

१९

येणें प्रमाणें एकुणीस कलमें सदरहु बरहुकूम ठरावून देविलें असे छ जिल्हेज.

येणें प्रमाणें याद आलाईदा त्याणीं लिहून दिली ती रवाना झाली आहे. त्याजवर सदरीं कलमाच्या कलमास शेरे मारले आहेत त्याच प्रमाणें राजश्री चिटणीस यांचे हातून शेरे मारवून खालीं तारखेकडेस शिक्का व जडगिरीवर दोन बाजूस दोन शिक्के होऊन यादी सत्वर रवाना व्हावी.

नंबर ११८

श्रीजगद्गुरु शंकराचार्य स्वामी यांस दुसरा गांव इनाम दिल्याची सनद. ता. २ डिसेंबर १८३१.

श्रीस्वामी शंकराच्यार्य संवस्थान मठ करवीर
स्वामीचे शेवेसीं.

सेवक राजे खेमसावंत भोंसले बहादर सरदेसाई प्रागणे कुडाळ व

महालांनिहाय चरणावर मस्तक ठेवून दंडवत विज्ञापना तागायत कार्तिक वद्य १३ त्रयोदशीपर्यंत वर्तमान यथास्थित असे विशेष श्री ची स्वारी वाडी जहाल्या समयीं श्रीमठ संवस्थान संकेश्वर येथें रथउत्साहाबद्दल कांहीं खर्चास चालवावें यांत कल्याण आहे ह्मणोन श्रीची आज्ञा जाहाली त्याजवरून श्रीचे आशिरवादें शेवकांचें कल्याण आहे हें ध्यानीं आणून मौजे वोंवळियें तर्फ मनोहर हा गांव सालमजकुरापासून श्रीदेव व ब्राह्मण धर्मदाव व किल्ले मनोहरकरी व वतनबाब मक्ता रुपये १६ सोळा खेरीज करून वरकड गांव दरोबस्त कुलबाब कुलकानु हक्कदार वगैरे श्री स्वामीस इनाम दिल्हा असे या गांवास अलाहिदा सनद देविली आहे त्याप्रमाणें साल दरसाल श्रीचे परंपरागत गांवचा अनभव करीत असावा श्रीचे शेवक वौंशपरंपरागत चालवितील शेवेसीं सदरीं लिहिले प्रमाणें गांव इनाम करून दिल्हा असे सिशपरंपरागत अनभव करीत असावा शके १७९३ खरनाम संवत्सरे सुा इसन्ने सल्लासेन मयातेन व अलफु छ २६ माहे जमादिलाखर.

बारसुद. मोर्तब.

नंबर ११९

टोळधाडीविषयीं गांवकामगारांचा रिपोर्ट.

ता. १८ नोव्हेंबर १८३४.

श्री

साहेबांचे शेवेसी सेवक गांवकर व फौजदार मौजे कुसगांव तर्फ कलसुली प्रार्थना विनंती विज्ञापना तागायत छ १६ माहे रजब पावेतों मौजे मजकुरचें वर्तमान गांवीं टोळ येऊन डोंगर शेतें नाबूद खाऊन नाशाडी जाहालीं. रयत परगांवची येऊन शेतें केलीं होतीं ती शेतें सोडून जावयास गेली. पुढें गांवांतीलही रयत जावयास जाणार. साहेबांस विदित व्हावयाकरितां विनंती श्रुत केली आहे. निवेदन होऊन आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नंबर १२०

दस्तऐवज रजिष्टर करण्याविशीं पहिला जाहिरनामा.

ता. ६ फेब्रुवारी १८३५.

जाहीरनामा सरकार श्रीमंत राजे खेम सावंत भोंसले बहादर सरदेसाई प्रागणे कुडाळ व महालानिहाय सुरुसन खमस सलासीन मयातैन व अलफ. हालीं हा जाहीरनामा सर्व लोकांस महशूर व्हावयाकरितां लिहिला जातो ऐसाजे. हरएक इनाम गांव ठिकाण शेत वगैरे कोणी गाहण अगर खरेदी देतात तो कोणी कृत्रिमानें किंवा मतलब करून वारसाचा ठराव जाहल्याखेरीज वहिवाट होत्ये आणि असें कितेक पटे खोटेपणानें बहुत लोक करितात येणेंकरून रयत लोकांचें नुकसान होऊन मनेस्वी तंटे पडतात हा शिरिस्ता केवळ गैरवाजवी सरकार नजरेस येऊन हा जाहिरनामा सादर केला जातो जें बी तपशील.

१ आजपावेतों सरकार सनदीनें गहाण अगर खरेदी घेणें देणें करून सरकारची सनद असावी असा दस्तुर प्राचीनपासून चालत असतां आलिकडे कितेकवर्षें सरकार सनदीशिवाय गाहाण खरेदी होतें याजकरितां आज पावेतों जे पटे सरकार सनदीखेरीज जाहले असतील ते ज्याचे त्याणीं तारीख मजकूरापासून तीन महिन्यांत हुजूर कचेरीस आणोन रुजू करणें ह्मणजे दरोबस्त पटे दप्तरीं दाखल करून शिरस्तेप्रमाणें गाहाणाचा दर सदे अडीच रुपये व विक्रित पांच रुपये दर आहे त्या शिरस्त्यानें सरकार जमेस करून पट्यावर सरकार निशाणी होऊन पटे त्याचे त्यास देविले जातील ऐसें न जहाल्यास जे पटे सरकारी दाखल्याशिवाय राहातील त्याजबाबद फिर्याद सरकारांत आल्यास पटे रद्द होऊन सरकारांतोन गाहाण खरेदीचा वारसा रहाणार नाहीं. कलम

१ या उपर ज्यास गाहाण खरेदी घेणें असेल त्याणीं गांवकर कुळकर्णी याची बखर घेऊन त्यांत अमुक असामीनें अमुक असामीस खरेदी अगर गाहाण दिलें हे रुपये ज्याचे त्यास पावले व ज्या पटेबाबद देणार घेणार याचें कांहीं कृत्रिम नाहीं या मजकुराची बखर

सरकारांत आणोन असल पटा व गाहाण खरेदी देणार अगर त्याच्या अखत्यारपत्रानें मुखत्यार माणस सरकारांत रुजु होऊन पटा दाखवावा ह्मणजे त्याची रुजुवात घेऊन दप्तरीं वार होऊन सरकार मोहरेनशीं असल पटा परत देविला जाईल. या शिरस्त्याखेरीज कोणीं पटा घेतल्यास रद्द असे. रादरहू पट्याविशीं गांवकर कुळकर्णी वगैरे सरकार चाकरसुद्धां सामील होऊन कपट केल्यास त्याबाबद मोठें शासन केलें जाईल. कलम

२

एकूण दोन कलमें लिहिल्याप्रमाणें गांवकरकुळकर्णी यांहीं गांवगन्ना सर्व लोकांस जाहीरनामा सादर केल्याबाबें दरोबस्त बखरी हुजूर रवाना कर्णे आणि सदरीं लिहिल्याप्रमाणें बंदोबस्त ठेवणें जाणीजे छ ७ माहे सव्वाल.

नंबर १२१

लढाईंत बाप वारल्यामुळें मुलास बाळप्रवेशीं नेमणूक दिल्याची सनद. ता. २२ फेब्रुवारी १८३५.

रोखा गांवकरान मौजे साळगांव तर्फ माणगांव सुरुसन सीत सलासीन मयातैन व अल्लफ. पांडो साब सावंत वस्ती मौजे मजकूर निसबत राजश्री धोंडो संभू सरसुभेदार याणें हुजूर येऊन अर्ज केला जे. जैराम सावंत तांबुळकर वगैरे बंडवाले लोक याच्या पारिपत्यास सालमजकुरीं सरकारांतून लोकांची नेमणूक जाहाली तेव्हां मौजे पारपोली तर्फ मनोहर येथें लढाई जाहाली तेथें आपला बाप साबो पांड सावंत यास छ ११ माहे जमादिलावल रोजीं गोळी लागोन ठार जाहाला त्यास साहेबीं कृपाळू होऊन माझें अन्नवस्त्र चालविणेंविशीं आज्ञा असावी ह्मणोन त्यावरून मनास आणून त्याचा बाप सरकार चाकरीवर ठार जाहाला याबद्दल त्याजवर कृपाळु होऊन यास बाळप्रवेशीं रुपये १७ सतरा सालमजकुरापासून साल दरसाल देविले असे. खुद्द त्याचे खतेपैकीं देऊन पावती घेत जाणे. सनदीची तालिक लिहून घेऊन अस्सल सनद त्याजकडेस भोगवटेस असों देणें जाणीजे छ ४ माहे जिल्काद.

बारसुद मोर्तब.

नंबर १२२.

श्री

तारीख ३० एप्रिल १७९४.

रोखा कुळकर्णी पैकीं सुा आर्बा तिसैन मया आलफु. बा मुा रामचंद्र नारायण खोटलेकर दप्तरदार निा होनु ४२ वजा सनद होनु ७ बाकी होनु ३५ यास ऐवज देऊन सन इहिदे तिसैनचा हिशेब दप्तरीं रुा केले नाहीं याजबाा देऊन रुा करणें. निा होनु.

१ सांतर्डें १ मडुरें ·॥· मळगांव ·॥· निगोडें ·॥· इनसुली ·॥· शेरलें १ आरोस ·॥· सोनुर्ली १॥ आजगाऊ १॥ आरवली १॥ आसोली १ साळगांऊ १ नानेली ४ माणगाऊ १॥ तळवडें १ होडावडे ·॥· मठ ·॥· आडेली .॥. वजराट .॥. न्हावेली ४ वेंगुर्लें २ पाट २ परउळें १ कोचरें १॥ खानोली १ दाभोली .॥. चेंदवण १॥ केळूस.

३५

एकूण पंचतीस होनु देवविले आहेत. देऊन पावती घेणें. पाा यास दर होनु ८〰 दुतल प्रों देणें छ २९ रमजान. मोर्तब.

नंबर १२३.

श्री

ता. २० आक्टोबर १७९९.

रोखा गांवकरान ताा तळवडें व बाजेपैकीं सुा मयातैन व अल्लफ. लक्ष्मण नारायण खोटलेकर दप्तरदार यास पक्षास व उपांगललितेस रुा १५ यास ऐवज समान तिसैनचा हिशेब दप्तरीं रुजु केला नाहीं या बाा गांवकर कुळकर्णी पैकीं देऊन हिशेब रुजू कण रुा

२ मौजे आडेली १ मौजे वजराट १ मौजे न्हावेली १ मौजे वाडीवरावडें १॥ मौजे विबवणें २ मौजे आजगांव १ मौजे सोनुर्ली २ मौजे इनसुली २ मौजे आरोस १॥ मौजे मठ

१५

एकूण १५ शा देविले असेत. देऊन पावती घेणें. या कामास दरगांऊ निा होतु ८। बेळ प्रों देणें. छ २० जमादिलावल. मोर्तब

बारसूद

नंबर १२४.

ब्रिटिशसरकारानें कारभार हातांत घेतल्याबद्दल जाहिरनामा.

जाहिरनामा विद्यमान अजम रिचार्ड स्पूनर साहेब इस्कायर बहादूर पोलिटिकल सुपरीटेंन्डेंट ह्मणजे मुख्य कारभारी संस्थान सुंदरवाडी सुरु सन तिसा सलासीन मयातैन व अल्लफ. हल्लीं हा जाहिरनामा सर्व लोकांस कळावयाकरितां प्रकट केला जातो जे संस्थान मजकूर येथील राज्याचे धनी अजम राजे खेम सावंत भोसले बहादर सरदेसाई हे आहेत व पुढही मुलूख त्यांजकडेच चालेल परंतु तूर्त येथील वगैरे व्यवस्था यथास्थित चालत नाहीं व मुलुखांत बंडवाल्यांचा उपद्रव होऊन रयत लोकांस बहुत इजा पोहोंचू लागली सबब मुंबै सरकारचे हुकुमावरून संस्थान येथील बंदोबस्ताचे तजाविजेसाटीं खासास्वारी येथें येऊन हा जाहिरनामा संस्थान मजकूर येथील सर्व लोकांस मालूम होणेकारितां लिहिला जातो ऐसाजे. संस्थान मजकूर येथील वसुलाचे व फौजदारी व दिवाणी वगैरे हरएक कामासंबंधानें जो हुकूम कर्णे तो अजम मोरो कृष्ण लेले कारभारी यांचे विचारें वाजवींचे रीतीनें आह्मीं केला जाईल. आमचे व लेले कारभारी यांचे हुकुमाशिवाय हरकोणी सबब सांगून आपल्यास अमुक तऱ्हेचा अमक्याचा हुकूम आहे असें बोलेल तर ती सबब ऐकूं नये. हरएक हुकुमावर किंवा ताकिदीवर वगैरे ज्या कागदावर आमची अगर लेले कारभारी यांची सही होईल त्या प्रमाणें वर्तणूक करीत जाणें. हें संस्थान अमलांतील सर्व रयत लोकांस मालूम व्हावें जाणिजे. इंग्रेजी तारीख १७ माहे सप्टेंबर सन १८३८

परिशिष्ट २ रें.

ब्रिटिश सरकार व सावंतवाडीचे सरदेसाई यांच्यामध्यें झालेले तह.

तारीख ३० जानेवारी सन १७३० रोजीं झालेला तह.

तहनामा मोहबत व यखलास मुकरर करावयास हिशमतपन्हा फोंड सावंत भोंसले सरदेसाई प्रो कुडाळ व माहालानिहाय यांचे तर्फेनें अजम बापूजी नाईक तोंडोलकर नामजाद आरमार दिमत मशारनिल्हे हे किताबत घेऊन अकबाल पन्हाआजर राबर्ट कोयन प्रजिदेंत गोवरदोर जनराल पातशाहीवाला ज्याहा बारतानी इंग्रजान व बिलकुल येखतियार फेतोरिया हाये ज्याहापन्हा वेनराबल कुंपनी आहद हिंदुस्थान तहद पारस व आरबस्थान हा किल्ले जंजिरे मुंबै याचे नजीक हुजूर येऊन तहनामे याबाबे जाहीर केले त्याजवरून अजम नाईक मारनिल्हेचे मारुफातीनें तहनामा करारदाद केला त्याची कलमें ७ सात बी तपशील.

१ सदरहु तहनामासल्लेचा करारदाद जाहले दिवसापासून ज्याहापन्हा सरकार कोंपनी इंग्रज अंमलदार व रयता नोकर लोकान हिशमतपन्हा सरदेसाई मशारनिल्हेचे तर्फेचे अंमलदार व रयत व नोकर या हरदु तर्फेमध्यें निश्चयेसी दृढतह बमोजीब चालावे तफावत पडों न द्यावा. कलम एक.

२ दर्यामध्यें ज्याहापन्हा सरकार कुंपनीचे आरमारास व कुंपनी दिमतीचे व्यापारी याचे तराडीयांस व सरदेसाई मारनिलचे तराडी आरमारी यास भेट जालियावरी उभयतांनीं निशाण सोडून एक गलबत लहानसें आह्माकडील तराडीयाचे नजीक पाठवून खबर द्यावी कीं हें आरमार हिशमतपन्हा सरदेसाई याचे तर्फेचें असे यावरी एकमेकांस मुजाहिला न होतां सुखरुप आपआपले मार्गी जात येत असावें अगर एकटें तराडें आह्मांकडील तुह्मांकडील आरमाराचे नजरेस पडलेयावरी तें तराडें इंग्रजी निशाण सोडील त्यास तुह्मांकडील एक गलबत आरमारी येऊन तहकिकी करून सुखरूप जाऊं द्यावें त्याच बमोजीब तुह्माकडील

एकटें तराडें आह्मांकडील आरमारासी भेटी जाहालीयावरी तेच रितीनें चालले जाईल. कलम दुसरें.

३ एक वक्तशीर तुफानामुळें अगर हरएक कजियामुळें आमचे तर्फेची तराडी लहानापासून थोर तुमचे तालुकांत गांव व बंदरें आहेत तेथें लागलीयावरी त्या तराडीयाची व त्याजवरील लोकांची मदत हिमदाद शरीयतीनें करून मालमत्ता व तराडी काहढावी व त्यांची कुमक बरेवजानें करावी त्यास त्याचे रजावदीनें ते मालमत्ता न्हेतील तरी सुखरूप न्हेऊं द्यावा अगर ते व्यापारी आपले रजावदीनें माल तेथें फ्राक्त करतील तरी करूं द्यावा त्या मालाची जकायत व हरएक कानु कवायत तुह्मीं न घेतां त्याच बमोजीब तुह्मांकडील तराडी ज्याहापन्हा सरकार कुंपनीचे मुलखांत अगर बंदरांत शिकस्त होऊन आलियावरी तेच रितीनें चालले जाईल. कलम तिसरें.

४ जीं कांहीं बंदरें व गांव व कोठीया व फेतोऱ्या सरकार कुंपनी दिमतीनें आहेत व तुह्मांकडील मुलुख व जागे असतील त्यामध्यें दुतर्फा रयत व सावकार लोक हमेशा सुखरूप अमदरफ्ती करतील त्याजकडील मालमत्ता जो असेल त्याची जकायत शिरस्ते मोजीब अगर फुडे जो कांहीं करारदाद होईल त्या मोजीब देतील घेतील. कलम चौथें.

५ कानोजी आंग्रे यांचे मूल प्रतक्ष कुंपनीचे दुसमान व तुमचेही दुसमान त्यास खामखां मारून काहाडावे या मोजीब तजविजेनें इलाज करावा त्यास सरकार कुंपनी तर्फेचीं भांडतीं आरमारी तराडीं यांस जो कांहीं दर्यामार्गीं सज्या देववेल तो दिला जाईल व तुह्मींही दर्यामार्गे आपले आरमारानशीं व खुषकीचे मार्गे आपले जमावानसीं त्या दुशमानास सज्या द्यावा समयानुसार तुह्मांस आह्मांकडील मदत हिमदाद जे करावयाची ते करून दुसमानास नस्तनाबुद केला जाईल याबदल तुह्मांकडील आरमारास सामील व्हावयासी आह्माकडील भांडतें तराडें एक अगर गैरा तराडी जे वक्तीं जे रितीनें अनुकूल पडून येईल त्या रितीनें दिलीं जातील सबब कीं गनिमास बेरवजाने तंबी पोहोंचवावयास दुतर्फा एकमतें सामील जाहालेयावरी दर्यामध्यें दुतर्फाचे आरमार असेल त्यास

आह्मांकडील सरदार आरमारचा जो इंग्रज असेल त्याचे अनुमतें चालावें कलम पांचवें.

६ हरएक वक्तशीर तुह्मांस मोठे भांड्याचा अगर हरएक जिन्नस, भांडणाचा दरकार पडला तरी सरकार कोंपनी होऊन जो कांहीं द्यावयाचा असेल तो रास्ता निर्खबरहुकूम पैसे घेऊन दिला जाईल. कलम सहावें.

७ गनिमाकडील मुलुख व किल्ले कोट जे कांहीं लढाईमुळें कबजदस्त होतील ते तुह्मांस दिल्हे जातील खेरीज गीरेयांचा कोट व जंजिरे खांदेरी हे दोन्ही जागे सरकार कोंपनीस द्यावे. कलम सातवें.

सदरहू प्रमाणें तहनामा करारदाद जाहाला असे तेरीख १३ आब्रील मीन १७३० छ ७ शोवाल.

तारीख ७ माहे एप्रील सन १७६५ रोजीं झालेला तह[१].

तहनामा आबालीपन्हा सरकार कोंपनी इंग्रेज व खेमसावंत भोंसले सरदेसाई प्रां कुडाळ व महालांनींहाय या हरदुमधें करार किल्ले रेडीचे मकानीं केला बी तपशील कलमवार ता। इंग्रजी ७ माहे अप्रील सन १७६५

१ सरकार कोंपनी व भोंसले व त्याची अवलाद व वारीसदार यांसी काईम सल्ला व निखालस दोस्ती चालावा याबद्दल दोघे मातबर भले अदमी कबिलासुद्धां आपले खर्चानशीं भोंसले तर्फेनें मुंबईस ठेवावे.

२ भोंसले यांहीं साळशीची खाडीपासून तहद कर्लीचीखाडी यांमधील मुलुख घाटाचे पायापासून तों बंदरकिनारा पावेतों जंजिरे सिंधुदुर्गाचे तनख्यांत सरकार कोंपनीस द्यावा. सर्व सत्ता साहेबी वसूल सरकार कंपनी घेतील. त्यांतील दरसाल तिजाई भोंसले मागतात ऐशीयास आबालीपन्हा जनराल कौंसल बरहुकूम प्रमाणें दिल्हा जाईल. परंतु भोंसले यांहीं दाहावे कलमीं करार केले असे त्याप्रमाणें चालावें त्या ऐवजीं पैका किंवा हरजिन्नस दिल्हा जाईल. व सिंधुदुर्गाचा पुरातन तनखा करलीचे खाडी पलीकडे भोंसले यांसी दिल्हा आहे. तो त्यांहीं भोगावा.

---

१ हा तह सन १७६६ च्या तहानें रद्द झाला आहे.

३ भोंसले यांहीं सरकार कोंपनी यांसी करार केला ऐसाजे. एकलक्ष रुपये उभयतांचे लढाईमुळें सरकार कोंपनीस खर्च जाहला तो भोंसलेहीं भरून द्यावा बी तपशील रुपयें पन्नासहजार हाल्लीं रोख आजपासून आठा दिवशीं द्यावे. पंचवीस हजार आजपासून बारा महिन्यानें द्यावे. बाकी पंचवीस हजार आजपासून तिहीं वर्षांत द्यावे.

४ भोंसुले यांहीं जो मुलुक सरकार कंपनीस दिल्हा आहे त्यांतील रयतीस मागांपुढां कोणे बाबे दहशत न देतां गांवगांवची रयत कबिलासुद्धां आपले ठिकाणीं येतील त्यास अटक न करावी.

५ सरकार कोंपनीकडील व भोंसुलेकडील रयत वगैरा व्यापारी एकमेकांशीं उदीम व्यवसाव करतील त्यास उभयपक्षीं अटक नसावा.

६ भोंसुले यांहीं आपले मुलुकांत बंदर किनारास सरकार कोंपनीस उदमास फेतोऱ्या घालावयास जागा द्यावा अगर हरकोठें भोंसले यांचे मुलुकांत तेथें सरकार कोंपनी तर्फेचे चाकर व माणसें रखवालीस जीं लागतील तीं सुखरूप ठेवावीं व भोंसले तर्फेचे व्यापारी व रयत सरकार मजकूरचें देणें अगर कर्जदार होतील तर त्यांचे ऐवजसुद्धां दस्त करून पैका घ्यावा भोंसुलेकडून अटक नसावी.

७ भोंसले यांहीं आपले मुलुकांत सरकार कोंपनी व फिरंगी याशिवाय गैरा टोपीवाल्यास विलायती जिन्नस, सकलाद, शिसें, लोखंड, तिखें, तांबें वगैरा जिन्नस आणूं न द्यावा. किंवा आपले मुलुकांतूनही दुसरे मुलुकांत नेऊं न द्यावा.

८ भोंसले यांचे मुलुकांतून वणजारी व्यापारी हरजिन्नस सिंधुदुर्गाहून नेतील व आणितील व बैल व गाडे व गठ्ठे भरून आमदरफती हमखास करितील त्यास आटक नसावा. सालाबाद प्रमाणें त्याजपासून वाजवी जकात घ्यावी.

९ भोंसले यांचे मुलुकांत सिंधुदुर्गाहून गलबतें भरून जिन्नस मालमिळकत नाळी वगैरा सामान नेला आहे तो हाल्लीं अगर पुढां तहकीक जालीयावर सरकार कोंपनीस भोंसले यांहीं भरून द्यावा.

१० माहाराज जिजाबाई राणी यांहीं सरकारचे मुलुकांत किंवा भोंसले

याचे मुलुकांत दंगा करितील व्यापारी वणजारे यांसी अटकाव जाहलियावर सरकार कोंपनीस जरुर कंवरबंदी व चढाई करायास जाहाली तर भोंसले यांहीं आपले फौज व सरंजाम बैल गाडासुद्धां येऊन सरकार कोंपनीस मदत करावी.

११ भोंसले यांहीं आरमारी तराडीं व गलबतें लढाईस न ठेवावीं.

१२ सरकार कोंपनी जे वक्तीं च्याहातील मराठीयांपासून सिंधुदुर्गचा तनखा प्रांत साळशींत आहे तो उगवून घेतील तेच समईं भोंसले यांचा पुरातन तनखा तेंच प्रांतास आहे तोही उगवून भोंसले यांस देववितील त्यास खर्च होईल तो हिसाप्रमाणें भोंसले देतील.

१३ मसुरेचा किल्ला सामान नाळी गाड्या गोळे वगैरा सामान हाल्लीं आहे त्यासुद्धां सरकार कोंपनी यांचे हवालीं करावा तेंच रीतीनें रेडीचा किल्ला ज्या सामानसुद्धां सरकार कोंपनीनें घेतला तेच वजेनें भौंसले यांचे हवालीं करावा आजपासून आठा दिवसांत.

१४ भोंसले यांहीं आमचे सरकारचे चाकर इंग्रेज वगैरा आपलेकडेस चाकरीस न ठेवावे. कोणी इंग्रेज वगैरा पळोन जातील तर जागजागांचे अंमलदारास ताकीद देऊन दस्त करून सिंधुदुर्गचे किल्ल्या हवाला करावे त्यास सजा न देतां क्षमा करतील त्याच वजेनें भोंसले तर्फेचे लोक गुलाम सरकार कोंपनी देतील.

१५ कदाचित् समयानुसार सरकारचीं अगर व्यापारी यांचीं तराडीं व गलबतें उभयपक्षांकडून शिकस्त होऊन मालसुद्धां किनारां व हरजागां लागलीं तर त्यास हरबाबें मदत करोन तराडीं जिन्नससुद्धां किनारास काढावीं त्यांतील हिसा न घेतां ज्यांचीं त्यांस द्यावीं मजुरांचा खर्च होईल तो व्यापारी ज्याचा माल असेल त्याजकडून देववावा.

१६ समयानुसार भोंसले यांस दारु गोळे वगैरा जिन्नस लढाईचा सरंजाम याचा दरकार असला तरी सरकार कंपनी जितुका देववेल तितुका देतील त्याचा पैका वाजवी शिरीस्ताप्रमाणें भोंसलेपासोन भरोन घेतील.

१७ भोंसले यांसी सरकार कोंपनीचे शिपाई लोकांचा दरकार भोंसले

यांचे व सरकार कोंपनीचे दुस्मान यांशीं लढायांशीं तर अनुकूल होईल तर दिले जातील.

१८ भोंसले यांशीं करार केले कीं, आजपासून आठां दिवसांचे अव-काशांत पहिले, दुसरे व तिसरे व तेरावे कलमाचा गुत्ता लावावा. त्या मुदती न जालियावर सरकार कोंपनी खर्च किल्ले रेडीस होईल तो भोंसले यांहीं भरून द्यावा तेव्हां किल्ला रेडी हवाले करितील.

१९ येणें प्रमाणें सर्व कलमें सरकार इंग्रेज कोंपनी व भोंसले या उभयतां तर्फेनें कुलअखतीयार घेऊन करार केलीं आहेत आणि आह्मीं आपलींही कलमें केलीं आहेत. व उभयपक्षींचे शिक्के केले आहेत. हा करार किल्ले रेडीमध्यें केला. तारीख इंग्रजी सातवी संवत् १७६५

तारीख २४ अक्टोबर सन १७६६ रोजीं झालेला तह

श्रीमंत राजश्री खेमसावंत भोंसले सरदेसाई परगणे कुडाळ व महा-लांनींहाय व आवालीपन्हा सरकार कोंपनी इंग्रेज काईमभकान विलायत उभयपक्षीं तहनामा ऐसाजे. आबाली मर्तबात आजम चार्लीस फामलिन इस्कोयर प्रेसिडेंट व गोवर्नदोर जनराल मुक्काम मुंबई यांहीं किल्ले रेडी स्वाधीन करतेसमई अजम टामस मास्टीन इस्कोयेर बिलकुल अखत्यार निसबत सरकार व राजश्री सरदेसाई उभयतांचे विद्यमान्य किल्लेमजकुरीं तह जाला बी तपशील. कलमवार तारीख इंग्रजी २४ अक्टोबर सन १७६६ सुरुसन सब्बा सीतैन छ २०. जमादिलावल.

१ सरकार कोंपनी व खेमसावंत भोंसले सरदेसाई व त्यांची वंशपरं-परायासी काईम सल्ला व निखालस दोस्ती चालावी याजकरितां हनराबेल कोंपनी मागेल तर भोंसले यांहीं करार केला असे जे. आपले तर्फेनें दोघे मातबर भले आदमी कबिल्यासुद्धां आपले खर्चानशीं मुंबईस ठेवावे. करार कलम एक.

२ सरदेसाई यांहीं करार केले रुपये सुमार दोन लक्ष किल्ले रेडी याजवर सरकारची फौज आली व किल्यांतील फौज वगैरा शिपाय याची शिवबंदी व खर्च सुटावा याजकरितां भोंसले यांहीं सरकार कुंप-

नीस करार केले रुपये दोन लक्ष हुकेरी व पिरखानी द्यावे. पैकीं तारीख २४ अक्टोबर सन १७६६ सन इंग्रजीपासून तिहीं महिन्यांनीं रुपये ८०००० ऐशीं हजार वी तपशील. रुपये ५०००० पन्नास हजार आजपासून महिन्याचे मुदतीनें देऊन २४ आकटोबर पासून तिहीं महिन्यांनीं ३०००० हजार वारून द्यावे बाकी १२०००० एक लक्ष वीस हजार सदरहु तेरीखेपासून दोहों वर्षांनीं वारून द्यावे. दरसाल रुपये ६०००० साठ हजार हे चालवणेबद्दल भोंसले यांहीं आपले तर्फेनें राजश्री विठोजी कामत साहुकार गोंवेकर जामीनकीस दिल्हे आहेत. किल्ला रेडीचा दिल्यापूर्वीं रुपये ८०००० ऐशीं हजार द्यावे. हनराबेल कोंपनीस सरदेसाई तर्फेनें विठोजी कामत रुपये निभावणीस जामीन जाहले त्यास मशारनिल्हेस जामीनकीस रा। शिवरामबावा व रा। दौलत दळवी यांहीं आपआपले खर्चानशीं मुंबईस राहावें कलम दुसरें.

३ हनराबेल कोंपनीस भोंसले सरदेसाई यांहीं वरले कलमीं करारमदार केला आहे त्याप्रमाणें चालवून प्रथम करारापैकीं रुपये ८०००० ऐशीं हजार दिल्यावर किल्ले रेडी स्वाधीन करून मुलकाशी व जमीनशी सरकारचा इलाखा नाहीं. कलम तिसरें.

४ हनराबेल सरकार कोंपनीकडून सामान तोफा व गाड्या व गरनाळा गोळे गरनालाचे गोळे व दारु वगैरे सामान व सरंजाम येथें आणिलें आहे तें सरकार कोंपनी जाते समयीं घेऊन जाईल आणि किल्ले रेडी येथील तुमच्या तोफा व गाड्यापैकीं शिल्लक ज्या राहिल्या असतील त्या सरदेसाई यांचे स्वाधीन सरकार करील. कलम चौथें.

५ खेमसावंत भोंसले यांहीं आपले मुलकांत रेडीस सरकार कोंपनीस फेतोरीस व वखारीस जागा द्यावी. अगर हनराबेल कुंपनीचे चित्तास येईल तेथें फेतोरी व वखारी उदमास करून फेतोरीवर कुंपनीचें निशाण उदवून कुंपनी तर्फेचीं थोर जहाजें व तरांडीं व गलबतें चाकर माणसें रखवालीस जीं लागतील तीं सुखरूप ठेवावीं. सरदेसाई तर्फेचे वेपारी व रयत सरकार मजकूरचें देणें अगर कर्जदार होतील तर त्याचे ऐवजसुद्धां दस्त करून पैका घ्यावा भोंसले कडून अटक नसावी. कलम पांचवें.

६ सरदेसाई यांजकडील व सरकार कुंपनीकडील रयत गैरा बेपारी एकमेकांची उदीम व्यवसाव करतील त्यांस उभयपक्षीं अटक नसावी. कलम सहावें.

७ सरकार कोंपनीची वगैरा बेपारीं यांचीं तरांडीं थोरलीं व लहान शिलशिला याजवर इंग्रेजी निशाण अथवा सरकारचा कौल अगर इंग्रेजी वलाव्या समागमें जात येत असतील त्यांस सरदेसाई तर्फेनें हस्तें परहस्तें कळतां न कळतां कोणे गोष्टीविशीं मुजाहीम व जलल न व्हावें त्याच बमोजीब सरकार कोंपनी भोंसले यांचे दस्तक अथवा कौल शिक्‍क्यानशीं पाहून लिहिल्याप्रमाणें चालवील. कलम सातवें.

८ सरदेसाई यांहीं करार केला आहे कीं, आपले मुलकांत येणें प्रमाणें विलायती जिन्नस सकलाद, शिसें, लोखंड, तिखें व तांबें वगैरा विलायती जिन्नस इंग्रजाचे व फिरंग्याचे जातीनें आणोन विकावा भोंसले यांहीं आपले मुलुकांतून जाऊं देऊन हरदु टोपीकरांखेरीज दुसऱ्यांस आणूं न द्यावा कलम आठवें.

९ सरदेसाई भोंसले यांचे मुलकांतून बेपारी वणजारी हरजिनस भरून नेतील व आणितील त्यांस मालाची जकात मागील शिरस्त्याप्रमाणें व्यापारी यांजकडून घ्यावी. ज्याजती घेऊं नये. कलम नवें.

१० खेमसावंत भोंसले सरदेसाई यांहीं आमचे सरकार चाकर व इंग्रज व गुलाम वगैरा आपलेकडेस चाकरीस न ठेवावे कोणी इंग्रज व हरगैरा पळोन जातील तर जागजागांचे अंमलदारांस ताकीद देऊन दस्त करून फेतोरी सरदार असेल त्याचे स्वाधीन करावे त्यांस उपसर्ग न देतां क्षेमा करून त्याच रीतीनें सरदेसाई तर्फेचे लोक व गुलाम सरकार कोंपनी देतील कलम दाहावें.

११ कदाचित समयानुसार इंग्रेजाची व बेपारी यांची देखील इंग्रेजाचे निशाणाखालीं राहाणवाले असतील त्यांचीं तराडीं व गलबतें उभयपक्षींकडून सिकस्त होऊन मालमालियतसुद्धां किनारावर हरजागा लागली तर त्यांस हरबाह मदत हकदाद करून तरांडें जिन्नससुद्धां किनारा काढून त्यांतील हिसा न घेतां जिन्नससुद्धां ज्यांचीं त्यांस देऊन मजुरांचा

खर्च होईल तो ज्याचा माल असेल त्याजकडून देववावा. कलम अकरावें.

१२ किल्ले रेडी येथील रयत व लोक कितीएक किल्ला घेतल्यापासून इंग्रेजांचे निशाणाखालीं राहिले व कितीएक चाकरीस व वेपारा करितां आले त्यांस भोंसले यांहीं आह्मांस कळतां न कळतां हरगोष्टीनें उपसर्ग न देतां त्यांची जमीन व घरें व वतनबाब पूर्वींपासून ज्या प्रमाणें त्यांचे चालविलें त्याच बमोजीब किल्ला स्वाधीन जाहल्यास ज्याचे त्यास देऊन सुरळीत चालवावें याप्रमाणें भोंसलेकडून घडून न आलें तर सरकार कुंपनी हे विसींचा विषाद मानून सरदेसाई यांजवर चढाई करील. कलम बारावें.

१३ खेमसावंत भोंसले सरदेसाई यांहीं करार केला ऐसाजे. एकादे समयीं हनराबेल कुंपनीस हरजागा कोणी मुजाईम होऊं लागल्यास आपल्या फौजेनसीं सरकार कुंपनीस मदत करावी. फौजेस सरकारकडून अडेसरी मात्र दिली जाईल. त्याचप्रमाणें सरदेसाई यांसी अगत्य जाहलियावर सरकार कंपनी अनकूल असेल त्याप्रमाणें लोकानसी साहित्य करील कलम तेरावें.

१४ खेमसावंत भोंसले सरदेसाई यातर्फेनें राजश्री विठोजी कामत सरकार कंपनीस तहनामेमध्यें बेरीज जाहली त्यास जामीन जाहले ह्मणोन सरदेसाई यांजकडून गांव बंदर वेंगुर्लें घेतलें जिराईत व बागाईत व तंबाकू महाल मीठ बंदर खमारी जकात जळमार्ग व कुलबाब व कुलकानु दरोबस्त वर्षें तेरा पावेतों सरकार कुंपनी आपणाकडेस ठेऊन मौजे मजकुरींचा उपभोग घेऊन फेतोरीस चाकर व लोक सामान सरंजाम जें लागेल तें ठेऊन सरकारचें निशाण उडऊन मौजे मजकुरीची न्यायमनसुबी अथवा राहणवाले यांसी हरगोष्टीनें सरदेसाई यांजकडून उपसर्ग नसावा एकादे समईं भोंसले यांहीं कलमी लिहिल्याप्रमाणें बेरजेची निभावणी मारनिले कामत याची न केली तर बंदर वेंगुर्लें सरकार कुंपनी दरोबस्त निभावणी होई पावेतों ठेवील रुपये उगावा जालियावर मौजे गांव माघारा देऊन खातरेस आलियावर फेतोरी ठेवितील करार कलम चवदावें.

१५ हनराबेल कोंपनी तर्फेनें अजम तामसन माष्टीन इस्कोयर बिलकूल आख्तियार घेऊन खेमसावंत भोंसले सरदेसाई पाा कुडाळ व महालानिहाय उभयतां मिळून किह्ले रेडीस तहनामे करून सिके केले तारीख इंगजी २४ आगटोंबर सन १७६६ सुरुसन सबासीतैन मयां व अलफ छ २० जमादिलावल.

टीप–वरील तहावर सावंतवाडीच्या सरदेसायांची तारीख २८ अक्टोबर सन १७६६ रोजीं सही झाली आणि तो कलम १४ यांतील ज्या भागांत आनरेबल कंपनीचा बावटा वेंगुर्ले येथें लावावा असा करार होता तो भाग खेरीज करून आणि शक्य असेल तर तो काढून टाकण्यास टामस मास्टीनला सांगून नोव्हेंबर महिन्याच्या ३ ऱ्या तारखेला मुंबई सरकारानें पसंत करून कायम केली. तथापि मागाहून मास्टीननें दिलेल्या कारणांवरून हें कलम तसेंच राहूं दिलें.

तारीख ३ अक्टोबर सन १८१२ रोजीं झालेला.

तहनामा ठराव राजे फोंडसावंत भोंसले बहादर सरदेसाई पाा कुडाळ व माहालानिहाये एक पक्ष पूर्वदिशे इंदी कुंपनी यांचे तर्फ दी रैट हनराबल गिलबर्ट लार्ड मिंतो गोवरनर जनराल बहादर तर्फ इष्टिजे यांचे आज्ञेप्रमाणें दी हनराबल कुंपनी सरकार निस्पतीनें कोर्ट लार्ड इंस्किलेर इस्कुंवेर कपितान इंग्रजी पादशाही रजिमेट चौऱ्यासी ब्रुटिस इचे बंदर गोवा याणी दुसरा पक्ष.

शिक्का संस्थानचा आहे.

१ हनराबल कुंपनी सरकार इंग्रेज बहादर व राजे फोंड सावंत भोंसले बाहादर या उभयतांचे औंश परंपरा दोस्तीची वृद्धि होत असावी कलम.

२ राजे फोंड सावंत भोंसले बहादर यांचे निस्पतीकडून दर्यांत लुटी नागावा जाहाले कलमबंद करण्याविसीं राजे बहादर याणीं ठरावून कोट वेंगुर्लें बतेरी चौकी गणोराम टेब व बंदर देखील व सरहद सुद्धां हनराबल कुंपनी बहादर यांस सारोद्धार सोंपून दिलें असे. आपल्या जिमा करून घ्यावें कलम.

३ आज तागायेत फोंड सावंत भोंसले राजे बहादर याचे बंदरांत

लुटी नागावा करावयाचे पतेमारी गलबत खटारे वगैरे हत्यारसुद्धां नजरेस आले तर हनराबल कुंपनी बहादर सरकारचे ताबे करावे ह्मणोन राजी जाहले कलम.

४ राजे फोंड सावंत भोंसले बहादर याणीं करार केलाजे पतेमारी गलबत वगैरे दोणी देखील निवती बंदरांतून इंग्रेज निस्पतीचें मोकरार करून ठेविले लोकांकडून झाडझडती घेतल्या सिवाई जातां येतां नये हें कमाविसी निवती बंदरांत इंग्रेजी सरकारचे चौकी ठेवणेस येईल कलम.

५ राजे फोंडसावंत भोंसले बहादर याणीं व त्याचे आवलादी आफलादी सुद्धां राजी जाहले आजि तागायत रेडी व निवती वगैरे राजेबहादर यांचे बंदरांतून लुटी नागावा जाहले तर वेंगुर्लेचे ठाणीं ज्याप्रमाणें हनराबल कुंपनी सरकार बहादर यांचे जिमा केले आहे त्या बमोजीब रेडी व निवती जिमा करून देऊं कलम.

६ हनराबल कुंपनी सरकार इंग्रेज बहादर यांणीं राजे फोंडसावंत भोंसले बहादर यांपासीं राजी जाहले जे ज्या वक्तीं वेंगुरलेचें ठाणें हनराबल कुंपिनी सरकारचे कैदींत ठेऊन ठाणे घातले घडीस रखवालीचे कामावर वाडी तालुकेचे बंदरीं आहेत त्या पतेमारी काडितील सिवाय हनराबल कुंपनी सरकार बहादर तालुकेचे साउकार रयत व राजे बहादर तालुकेचे साहुकार रयत वगैरे लोकांनीं हमखास बेपार चालवावा कलम.

७ हनराबल कुंपनी सरकारचे साहुकार रयत वगैरे लोक राजे बहादर याचे तालुकेंत व्यापार करण्याविसीं बैल काडा वगैरे तालुकेच्या लोकांबरोबर माहासूल वगैरे चालून येऊं जाऊं द्यावे कांहीं जाजती हरयेकविसीं असों नये.

८ हनराबल कुंपनी सरकार बहादर ठाणेचे लोकांस वगैरे राजे फोंड सावंत भोंसले बहादर यांचे मुलुखांत असणारास तालुकेचे रयत वगैरे लोकांस धान्य दाणा वगैरे मुलुख पैदास्त जिनस खरेदी होत आहे त्या बमोजीब असावें जाजती होऊं नये कलम.

९ हनराबल कुंपनी सरकार बहादर निस्पत लोकांकडून राजेबहादर

यांच्या मुलखांत जुलमी तंटा तगादा होऊन येईल त्या लोकांस राजेबहादर या निस्पतीनें सिक्षा न व्हावी हनराबल कुंपनी सरकारचे कमिंडंग हफीसर सरदार लोक राहतील त्यांस कळवावें ते नसियेत करितील त्या बमोजीब राजे बहादर निस्पत लोकांस चालविलें जाईल. कलम

१० किल्लेंत असणार सरदार व सिपाई वगैरे लोक राहतील त्यांस जंगी सरंजाम व खावयाचे जिन्नस देखील विलायती येईल त्यास तुमची चौकशी असूं नये व माहासूल माफ असावा.

११ इत्यादीस साक्षी आह्मीं उभयतां खालीं सही देविले कोर्ट लार्ड इस्कलेर इस्कुवेर कपितान इंग्रेजी बादशाही रेजमेंन्ट चौऱ्याऐंसीं ब्रुटीस इचे बंदर गोवा व राजे फोंड सावंत भोंसले बहादर सरदेसाई प्रागणे कुडाळ व महालानिहाय हे तहांत आपआपले मोहर दसखत जाहले आहे.

सावंतवाडीचे मुलुखांत दरजागा तर्फ सांतडें मौजे मडुरें ग्राम तारीख तीन माहे अकटोंबर सन १८१२ इंग्रेजी सुरुसन सल्लास अशर मयातैन व अल्लफ जाणिजे रवाना छ २६ माहे रमजान.

लिहिले प्रो सई छ मजकूर.

ताजाकलम वेंगुर्ले किल्लेचे व गणोराम टेंबी खालीं सरहदेंत राजे फोंड सावंत बहादर याचे निस्पत लोकांचे खासगत जमीन वगैरे ज्याचे ते भोगतील व कोणी राजे बहादर निस्पत लोक बदलाम होऊन इंग्रज सरकार आसरेस आले तरी आसरा होणार नाहीं तसेंच राजे फोंडसावंत भोंसले यांणीं इंग्रेज निस्पत लोकांस पाळावें तेरीख सन सदर जाणिजे छ माहे मजकूर छ मजकूर. संस्थानचें मोर्तब.

कंपनीचा लाखेचा शिक्का.

गवरनर जनरलचा लहान शिक्का.

(सही) मिंटो.

,, एन्. बी. एडमन्स्टन

,, ए. सेटन्.

टीप–हा तह जादा कलमासह राइट आनरेबल गवरनर जनरल ह्यानें फोर्ट वइलियम येथें तारीख १५ जानेवारी सन १८१३ रोजीं मंजूर केला.

तारीख १७ फेब्रुवारी सन १८१९ रोजीं झालेला.

तहनामा कंपनी सरकारासीं खेमसावंत भोंसले बहादर सरदेसाई प्रांत कुडाळ वगैरे माहाल यांचे तर्फेनें त्यांची मातुश्री सावित्रीबाई व नर्मदाबाई करीत आहेत मार्फत कंपनी सरकार तर्फेनें मेजर जनराल सर विलीयम ग्रांत किर नैत आफ ती आरदर आफ मेरेया तिंरीसा बहादर साहेब व सावंत यांचे तर्फेनें राजश्री राजे खेमसावंत भोंसले बहादर सरदेसाई प्रागणे कुडाळ व माहालानिहाय.

खुद त्याणी मुखत्यार होऊन ठराविला.

इंग्रजी सरकारासीं व वाडीकर सावंत सरदेसाई यांसी अक्षय सल्ला व मैत्रत्व राहील करार

कलम १

इंग्रजी सरकार वाडी संस्थान व प्रांत संरक्षण करितील ह्मणोन कबूल आहेत करार

कलम २

राजश्री खेमसावंत भोंसले सरदेसाई यांचे तर्फेनें मातुश्री नर्मदाबाई व सावित्रीबाई कबूल करित्यात इंग्रज बहादरासीं अंकितपणें वर्तणूक करावी आण इंग्रजी सरकार आधिपत्य स्वीकारावें आण इतर राजा व सरकारासीं मिळणें वर्ज करावें करार

कलम ३

राजश्री खेमसावंत भोंसले सरदेसाई यांचे तर्फेनें मातुश्री नर्मदाबाई व सावित्रीबाई कबूल करित्यात कीं कंपनी सरकारास न सांगतां कीं रुजवातीविना परकी राजा व सरकारास बोलणें चालणें करणार नाहीं करार

कलम ४

राजश्री खेमसावंत भोंसले सरदेसाई यांचे तर्फेनें मातुश्री नर्मदाबाई व सावित्रीबाई कबूल करित्यात कीं परकीवर जबरी बळत्कार करणार नाहीं कदाचित वांकडें परक्यासीं पडलें तरी हनराबल कंपनी सरकारास न्याय निवडायाविसीं दाखल केलें जाईल करार

कलम ५

कंपनी सरकार तर्फेन करार केले जे वाडी संस्थान सावंत भोंसले याणीं स्वतंत्रपणें आधिपत्य भोगावें. वाडी प्रांतांत कंपनी सरकारची राजनीत स्थापिली न जाईल करार

कलम ६

राजश्री खेमसावंत भोंसले बहादर सरदेसाई यांणीं कंपनी सरकार न्यायाचे ठायीं विश्वास धरिला ह्मणोन कबलात कीं कदाचित वाडी संस्थानांतील कोणी एक इंग्रजी अमलांत बदलामी केल्यास त्याचा निवाडा न्याय कंपनी सरकार निस्पत करून आज्ञेप्रमाणें पारपत्य केलें जाईल. यासिवाय कप्तान कोडतलांद इस्कलेर साहेब बहादर यांसी राजश्री राजे फोंड सावंत भोंसले यांचा तहनामा सन १८१२ अठरासें बाराचे सालीं ताा ३ अक्टोबरीं मोजे मङ्करें येथें दाहा कलमाची जाहाली आहे तो बहालबार करार असे करार

कलम ७

राजश्री खेमसावंत भोंसले बहादर सरदेसाई यांचे तर्फेन मातुश्री सावित्रीबाई व नर्मदाबाई कबूल करित्यात कीं कंपनी सरकार अंमलांत चोरी दरवडे वाडी प्रांतांतील लोकांनीं केले ह्मणोन संभाजी सावंत व बाबणो गोपाळ यांणीं करविलेकारण त्यांस आपले चाकरीस कदापि ठेवणार नाहीं. याउपर चोरांची नांवनिसी मेजर जनराल सर विल्यमग्रांत कीरनेत आफ ती आरदर आफ मेरेया तिरीसा बहादर साहेब यांणीं लिहून दिलें तें सांपडल्यास धरून कंपनी सरकारचे हस्तक करणार. पुढें वाडी प्रांतांतील कोणी चोरी दरवडा हनराबल कंपनी कीं पक्षपातीच्या अमलांत केला तर त्यांस स्वाधीन करूं येतील. आण कंपनी सरकार नीतीप्रमाणें पारपत्य केलें जाईल. कदाचित ते हस्तगत न जहाले तरी वाडी दरबार जे खराबी होईल ती इंग्रजी दरबारास भरून दिली जाईल करार

कलम ८

राजश्री खेमसावंत भोंसले सरदेसाई बाहादर यांचे तर्फेन मातुश्री सावित्रीबाई व नर्मदाबाई यांणीं किल्ले यशवंतगड व निवती निस्पत प्रांत तर्फ पाट व तर्फ आजगांव व समुद्र किनारा तार कर्लीचे नदीपासून वेंगुर्लें उत्तर सीमा पावेत आण वेंगुर्लें दक्षिण सिमेपासून तेरेखोल सीमा पावेतों कंपनी सरकारास अक्षय दिल्हें आहे. याउपर संभाजी सावंत व बाबणो गोपाळ यास नागावा भरोन द्यावयास सामर्थ नाहीं ह्मणोन

राजश्री सरदेसाई बहादर यांस मैत्रत्व दाखवायार्थ दरवडेची खराबी भरपाय येणें ती सोडून दिल्ही करार कलम ९

पुढें वाडी प्रांतींच्या लोकांकडून पुंडावकेच्या बंदाविसीं राजश्री खेम सावंत यांचे तर्फेन मातुश्री नर्मदाबाई व सावित्रीबाई कबूल करत्यात कीं पुंड चोर धरावयार्थ इंग्रजी सरकारचे लोक पतकी वगैरे जसे पाहिजे त्याप्रमाणें प्रांतांत यावयास देणार आण सर्व गोष्टीस साह्य करणार करार कलम १०

सदरहु तहनामेचा ठराव माजगांव येथें जाहला सुरुसन तिसां अशर मयातैन व अल्लफ तारीख २१ माहे जमादिलाखर.

सदरहु कलमबंदी तहनामेप्रमाणें मातुश्री नर्मदाबाई भोंसले सरदेसाई प्रां॰ कुडाळ व माहालानिहाय यांचे रुजवातीनें राजे खेमसावंत भोंसले बाहादर यांचा करार असे. मोर्तब.

तारीख १७ फेब्रुवारी सन १८२० रोजीं झालेला.

(वाडी संस्थानचा मोठा शिक्का.)

तहनामा कंपनी सरकार इंग्रज बहादर व राजे खेमसावंत भोंसुले बहादर सरदेसाई प्रागणे कुडाळ व माहालानिहाय यांची मातोश्री नर्मदा-बाई व सावित्रीबाई मान्य होऊन करीत आहेत मार्फत कंपनी सरकार तर्फेनें पूर्णाधिकार प्रावोन कप्तान अचिसन इनचार्ज्य आफ ती पोलिति-काल दुतीस बहादरं साहेब.

१ कलम प्रथम सावंतवाडी निस्पत लोकांनीं पुंडावकें हनराबल कंपनी सरकारचे अमलांत केलें तें अगदींच बंद करायास तर्फ पाट व तर्फ आजगांव ह्या तर्फा राजे.बहादर सरदेसाई वाडीकर याणीं साल गुदस्तां कंपनी सरकार बोलणें प्रमाणें तहनामा ता॥ १७ माहे फेब्रुवारी सन १८१९ तेदिनीं करून दिल्हा हेच कारण मात्र होतें ह्मणोन हनराबल कंपनीसरकार किल्ले यसवंतगड व निवती व समुद्र किनारेचे गांव खेरीज करून बाकी गांव बी तपसील.

ता। आजगांव.	तर्फ पाट.	तर्फ बोर्डवें
१ मौजे आजगांव.	१ मौजे पाट.	१ मौजे ओरोस.
१ ,, आसोली.	१ ,, तेंडोली.	१ ,, वसरगांव.
१ ,, नाणोस.	१ ,, चेंदवण.	१ ,, कुंदें.
१ ,, आरवंदें.	१ ,, कंवठी.	१ ,, कासरल.
१ ,, तळावणें.	४	१ ,, कसवण.
१ ,, तिरवडें.		१ ,, कसाल.
१ ,, किदळें.		१ ,, पडवें.
१ ,, गुळदुवें.		१ ,, गांवराई-वाडी तिरवडें.
८		८

येणें प्रमाणें हे गांव अक्षय पुत्रपौत्रादि वंषपरंपरेनें दिल्हे असेत करार.

२ कलम दुसरें राजे खेमसावंत यांचे तर्फेनें त्यांची मातोश्री नर्मदाबाई व सावित्रीबाई कबूल करितात कीं सदरहु तर्फातील वगैरे गांव जे देत जातील त्यांत जे कोण कंपनी सरकार आज्ञेनें व विद्यमानें कांहीं केले असिल्यास देविले तारखे पावेतों त्यांस हरएकविसीं वाजपुसी व उपद्रव देणार नाहीं करार

सदरहु तहनामेचीं कलमें दोन राजे खेमसावंत भोंसले बहादर सरदेसाई प्रागणे कुडाळ व महालानिहाय यांची मातोश्री नर्मदाबाई व सावित्रीबाई मान्य होऊन कबूल केला असे. तारीख १७ माहे फेब्रुवारी सन १८२० छ ३ माहे जमादिलावल सुा। अशरीन मया तैन व अल्लफ.

सदरहु कलमबंदी तहनामे प्राो मातुश्री नर्मदाबाई व सावित्रीबाई भोंसले सरदेसाई पाा कुडाळ व माहालानीहाय यांचे रुजवतीनें राजे खेमसावंत भोंसले बहादर सरदेसाई पाा कुडाळ व माहालानीहाय यांचा करार असे. मोर्तब.

टीप-हा तह मुंबई सरकारानें तारीख ९ मार्च सन १८२० रोजीं कायम केला.

तारीख २५ डिसेंबर सन १८३२ रोजीं केलेला करार.

यादी राजे खेमसावंत भोंसले बहादर सरदेसाई पा कुडाळ व माहालानिहाय सुरुसन सल्लास सल्लासीन मयातैन व अल्लफ. आमचे राज्यांत आह्मांकडून चांगला बंदोबस्त जाहाला नाहीं यामुळें दोन तीन वेळां बंडें जाहालीं आणि बिन बंदोबस्तामुळें खराबी जाहाली सबब अजम कंपनी इंग्रज बहादूर आमचे बोलण्यावरून आमचें राज्य काईम ठेऊन राज्याचे बंदोबस्ता प्रकर्णी खालीं कलमें लिहिलीं आहेत त्याप्रमाणें आह्मीं वहिवाटीस कबूल जाल्यास कंपनी सरकार दोस्ती ठेऊन मदत करितील नाहीं तर करणार नाहीं हें समजोन आह्मीं खालीं लिहिलीं कलमें कबूल केलीं तीं.

कलमें.

१ आह्मी विठ्ठलराव माधव सबनीस यांस राज्यकारभाराचे कामावर काईम केले आहेत त्यास कंपनी सरकारचे समत्ताखेरीज काहाडणार नाहीं.

१ आमचे जातीचा खर्च व संस्थानाचा खर्च कमी कर्णें व ज्यास पोहोंचवयाचे बाजबी असेल ते पोहोंचत नसल्यास देववणें व आमचे राज्याचे चालीमुळें कोणी नाखूष असतील त्यास देणें व कोणाच्या नेमणुका ठरवावयाच्या असतील त्या ठरवणें याविसीं कारभारी यांचे विद्यमानें कंपनी सरकारचे अनुमत्तें ठराव होईल त्याप्रमाणें आह्मीं वर्तणूक करूं व कारभारी कारभार चालवितील त्यांत हरकत करणार नाहीं. आह्मी आपले हुकमतीप्रमाणें त्यांस चित्तापासून मदत करूं.

१ सदरहु कल्माप्रमाणें आमची वहिवाट न होईल तर कंपनी सरकारांनी दोस्ती व भरंवसा ठेऊं नये. ज्या प्रमाणें कंपनी सरकारचे मनांत गादीचा बंदोबस्त करावयाचा असेल त्याप्रमाणें आह्मांस आमचे कुटुंबीत ठेऊन आमचे चिरंजीवास राज्यावर बसऊन तह मबोजीब करावें त्यास आह्मीं कबूल आहों.

१ संस्थानचे बंदोबस्तास लस्कर ठेऊन त्यास वगैरे खर्च जाला असेल व पुढें होईल तो आह्मीं देऊं.

एकूण चार कलमें कबूल करून करार केले असेत छ २ माहे साबान

ऊर्फ पौष्य सुद्ध ३ तीया शके १७५४ नंदननाम संवत्सरे इंग्रजी तारीख २५ दिजेंबर सन १८३२ रोजीं याद लिहिली होती परंतु त्या यादींत कारभारी याचें नांव काईम करून लिहिलें नव्हतें सबब ती याद फाडून ही याद केली असे तारीख मजकूर. मोर्तब असे.

टीप-हा करार तारीख १५ जानेवारी १८३३ रोजीं मुंबई सरकारानें पसंत केला.

तारीख १९ सप्टंबर सन १८३८ रोजीं सावंतवाडीच्या सरदेसायांबरोबर केलेला करार.

अलेक्झांडर एल्फिन्स्टन एस्कायर कलेक्टर जिल्हा रत्नागिरी आणि अजम राजे खेमसावंत भोंसले बहादुर सरदेसाई प्रांत कुडाळ संस्थान सुंदरवाडी यांच्यामध्यें झालेला करार छ २९ जमादिलाखर सुरसन तिस्सां सल्लासीन मयातेन व अल्लुफ. (तारीख १९ सप्टंबर १८३८)

कलम १

ह्या तहानें संस्थानांत त्याचप्रमाणें संस्थानच्या मुलखाच्या हद्दीवर आजपर्यंत जमा केलेला कापड मालावरील छापाबद्दल कर यासुद्धां जलमार्गाच्या आणि खुष्की मार्गाच्या सर्व जकातींवरलि हक्क अजम राजे बहादुर सोडून देतों इतःपर वर लिहिलेल्या जकातींवर राजे बहादुरांचा दावा राहणार नाहीं.

कलम २

ह्या तहानें वाडी अमल आणि पेडणें आणि इतर महाल येथील गोंव्याच्या पोर्तुगीजांचा मुलुख यांच्या हद्दीवर नाकीं बसविण्याचा आणि जकात घेण्याचा त्याचप्रमाणें बांदें बंदरांत जलमार्गाची जकात घेण्याचा हक्क अजम राजे बहादुर ब्रिटिश सरकारला देत आहे. ब्रिटिश सरकारानें आपल्या स्वतःच्या नियमाप्रमाणें आणि पाहिजे त्या पद्धतीनें जकात वसूल करावी. त्या वसुलाला राजे बहादर यानें कोणत्याही सबबीवर कोणतीहि हरकत घेऊं नये.

कलम ३

ह्या कराराच्या दुसऱ्या कलमांत सांगितलेल्या जागा खेरीज करून वाडी संस्थान अमलांतील इतर सर्व ठिकाणीं कापडमालावरच्या छापावरील करासुद्धां सर्व खुष्कीच्या जकातींचा वसूल बंद केला आहे.

कलम ४

आजपर्यंत वाडी संस्थानानें वसूल केलेल्या कापड मालाच्या छापावरील करासुद्धां जलमार्गाच्या व खुष्कीच्या सर्व जकातींबद्दल आणि हक्कदारांना मिळत असलेल्या हक्कांबद्दल तीन वर्षांचे ह्मणजे सन १८३४।३५, १८३५।३६ आणि १८३६।३७ ह्या वर्षांचे वसूल तपासून ब्रिटिश सरकार राजे बहादुर यास दरसाल एक नियमित रकम देईल. आणि ह्या तीन वर्षांच्या वसुलाची सरासरी ह्मणजे त्यांच्या बेरजेचा तृतीयांश काढून सरासरीची रकम दरसाल राजे बहादुर यास देण्यांत येईल.

कलम ५

आपल्या स्वतःच्या आणि आपल्या दरकदारांच्या उपयोगासाठीं गोव्याहून आणलेल्या जिन्नसांवर ५०० रुपयांच्या रकमेपर्यंत जकातीची माफी असावी अशी इच्छा राजे बहादूर यानें ब्रिटिश सरकाराकडे प्रदर्शित केल्यावरून ब्रिटिश सरकारानें ती विनंती मान्य केली. आणि नेहमींचा त्रास चुकविण्यासाठीं ब्रिटिश सरकार कलम ४ मध्यें उल्लेख केलेल्या सरासरीच्या रकमेशिवाय ह्या सुटीबद्दल दरसाल पांचशें रुपयांची रकम रोख देण्याचें कबूल करितें आणि ह्मणून वरील माफी संबंधी राजे बहादुर यानें कोणतेंही भांडण उपस्थित करूं नये.

कलम ६

जर ब्रिटिश सरकार आपल्या राज्यांत खुष्कीच्या जकातीचा वसूल करण्यास हुकूम देईल तर राजेबहादुर यानें वरील जीं वाडी आणि गोवें याच्या सरहद्दीवरील आणि बंदरावरील नाकीं ब्रिटिश सरकाराला नाकीं स्थापन करण्यासाठीं दिलेलीं आहेत तीं खेरीज करून बाकी आपल्या मुलखांतील सर्व खुष्कीच्या नाक्यांवर जकात वसूल करण्याला त्याला मोकळीक

आहे. जर ब्रिटिश सरकारानें आपल्या राज्यांत खुष्कीची जकात वसूल करण्यास हुकूम दिला नाहीं तर राजे बहादूर यालाही आपल्या स्वतःच्या राज्यांत जकात वसूल करतां येणार नाहीं. परंतु जर ब्रिटिश सरकारानें जकात घेण्याचा हुकूम सोडला तर मग सरहद्द आणि बंदरें येथील नाक्यांच्या जकातीची सरासरी आणि कलम ४ यामध्यें राजेबहादुर यांस देऊं केलेली सरासरी ह्मणजे राजेबहादुर ज्या जागीं जकात वसूल करणें सुरू करील त्या नाक्यांवरील जकातीची सरासरी ब्रिटिश सरकारानें त्याला देऊं नये.

करार झालेलीं वरील सहा कलमें आहेत छ २५ जमादिलाखर.
(तारीख १५ सप्टेंबर १८३८) मोर्तब.

टीप–हा करार मुंबई सरकारानें तारीख १२ अक्टोबर सन १८३८ रोजीं कायम केला.

———

परिशिष्ट ३ रें.

राजघराण्यांतील पुरुषांचे पोवाडे.

हे व अशा प्रकारचे दुसरे पोवाडे गोंधळी व ठाकरलोक परंपरेनें शिकतात, व समेळ किंवा तुंणतुणें वाजवून त्यावर गातात. अशा पैकीं एका ठाकरापासून हे पोवाडे मिळविले आहेत. त्यानें पोवाडे ह्मणून दाखवीत असतां मधून मधून सांगितलेली माहिती टिपेंत दिलेली आहे.

(जयराम महाराज यांजवरील पोवाडा.)

भोंसल्याचा मुलुख थोडा गलीम चालून येई । कुडाळास रोषनाई नाहीं । कुडाळानें शोभा भोंसल्याच्या मुलखाला । काय नांव भरतगडाला । पांचहजार माणूस आणून आंग्र्यानें घेतला । चोखट बांधिला किल्ला । जयरामासी खबर पाठविली किल्ला देईना तुला । बाण देसायास लागला । भला जयराम भला गुगुत होती त्याला । दळवी धाडिला साळशीला । मुलुखामधिं हुंक घातली तिकडे जयराम गेला । त्यानें कर्णा बाका केला उफराटी[1] घोली करूनि मसुऱ्याला गेला । त्यानें कर्णा बाका केला । कुणासि नकळतांना त्याचा[2] नायकवडी[3] बोलाविला । भरतगड किल्ला एवढा भेदुनि दे मला । कडीं घालीन तुला मोहन माळ गळ्याला । नवशें सिलेदार घेऊनि जयराम किल्ल्यावर चढला । कुणाच्या वहाणा कोण नेतो । कोणाची पगडी कोण नेतो । कवलानशीं लोक तीन हजार खालीं उतरले पळून गेले विजयदुर्गाला । दिवटीच्या मुजऱ्याला त्यांनीं कागद लिहिला । तुझें माझें भाऊपण आह्मीं सुखाचे शेजारी अक्षर घातलें कागदाला । रामा लक्ष्मणाची जोडी दोन माझीं भांडीं पाठवून दे विजयादुर्गाला । नाहीं भांडीं दिल्यावर

---

१ बाजू. २ किल्ल्याचा. ३ धामापूरचे महार नारनाक व येसनाक हे नायकवडी होते.

साडेतीन लक्षांचा मुलुख धूळ फुकीन मुलुखाला। एक वेळ जयराम महाराज मी तंव धरीन बोलला। रुप्याची बेडी घालीन आणून ठोकीन बंदीला। विजयादुर्गाचे बुरुजावर। खडाखडीचे जोडे पोंचले सुंदरवाडीला। चुलत्या पुतण्याची जोडी धनी बैसले सदरेला। सबनीसांनीं पत्र वाचून पाहिलें। उद्यां याथाचा गुलाम आजिच ये कुडाळ विलातीला। खडाखडीचे जोडे पोंचले आंग्र्यांचे सदरेला। धन्याचा कागद आंग्र्यानें वाचून पाहिला। जैसा डफ चढतो तैसा आंगरा चढला। पटी धरिली साळस परगण्याला। धरिली रत्नागिरी दिल्लीला। ज्याच्या घरचे चौघेजण तीन काढा लढाईला। ज्याच्या घरचे तिघेजण दोन काढा लढाईला। ज्याच्या घरचे दोघे जण एक काढा लढाईला। एक ठेवा कुंटुंब पोसायाला। तिसरे दिवशीं भर दोन प्रहरीं। बावीस हजार जमाव कचेरी जमली सदरेला। पशांनीं रुपये लोकांच्या घालितो पदराला। सावंताचीवाडी धूळ फुकावी मुलखाला। एक वेळ जयराम महाराज धरारे बोलला। तुह्मांला जरबावी पोषाख करीन सैन्याला। पहिला नगारा वाजविला। लोकांनीं कमरबस्ता केला। दुसरा नगारा वाजविला। ताजीम दिली आंगऱ्याला। तिसरा नगारा वाजविला। रव[1] पहेली[1] मार्गाला। मजलीवर मजली तिसरे दिवशीं पावले असीयामठाला। असीयामठाचा गलीम तळगांव गांवाला पावला। दळवी याचा गांव सरकारच्या हुकुमानें गांव तळगांव नागविला। तळगांवाचा गलीम आला बांदर्‍या गांवाला। डेरे दिले त्या मळ्याला। सुन्न मध्यान्हरात्रीं निघाले कुडाळच्या कोटाला। सिवेजी[2] तो लोंड्या होता भंगसाळीं। ढवळ्या घोड्याचा करवाल[3]। तुझ्या माईचा मी यार। तुळाजी आंगऱ्या आलों आलों

१ सैन्य चालूं लागलें. २ हा वांदें पेट्यांतील कोनाळ गांवचा राहणारा. त्याचे वंशज अझून तेथें आहेत. ३ हा आंग्र्यांचा सरदार होता.

बोलला । त्याची दुरांटी बंदुक लाविली शिन्याला । ढवळ्या घोड्याचा करवाल जमिनीला पाडिला । पावला कुडाळच्या कोटाला । सुन्न मध्यान्ह रात्रीं कुडाळचा किल्ला तो वेढिला । पहिला प्रसाद लाविला कोटेश्वरा देवाला । दे गा हुकूम मी जातों लढाईला । सवापार दिवसपर्यंत किल्ला नाहीं हातास दिला । तीन हजार माणूस शिवाजी तो लोंड्या जैसे सिगम्यांतले खेळे खेळूं लागला । तेथुनि निघाला तो आला बिबवण्या गांवाला । भर दोन प्रहरीं पोंहचला सुंदरवाडीला । रामचंद्र महाराज धनी बैसले सदरेला । ऐका ऐका बापूसाहेब । अल्प गोष्टीवरून बादशाही देवडी गेली गलिमाच्या हाताला । ऐका ऐका काकासाहेब मला द्यावा तुह्मीं हुकूम जातों गोव्या बारदेसाला । आमचीं सरकारी माणसें जाऊं द्या सड्या जांबोटीला । भले भले जी बापूसाहेब । मी तव जयराम महाराज आलों या भोंसल्याच्या वंशाला । दिवटीच्या मुजऱ्यानें कागद लिहिला सड्या जांबोटीला । जांबोटकर कुंभाप्पा देसाई सडेकर सटवापा देसाई जलदी यावें वाडीला । दुसरा कागद पाठविला हेवाळ्या गांवाला । हेवाळकर देसाई पाटयेकर देसाई यावें तुह्मीं वाडीला । तिसरा कागद पाठविला नारवें ह्या गांवाला । नारवेकर रघ सावंत जलदी यावें वाडीला । चवथा कागद पाठविला पेडणें ह्या गांवाला । सातशें पेडणेकर तीनशें कवठणकर जलदी यावें वाडीला । पांचवा कागद पाठविला वेंगुर्ल्या गांवाला । नाईकाचा वंश यमाजी नाईक बोलाविला । सहावा कागद धाडिला होडवडें गांवाला । कान दळवी भान दळवी भद दळवी बोलाविला । सातवा कागद धाडिला माजगांवा गांवाला । दळव्याचा वंश जलदी यावें वाडीला । तिसरेका दिवशीं बारा हजार नळी नवशें शिलेदार तीनशें सरदार कचेरी जमली सदरेला । दीड दीड शेर भात लोकांच्या घालितो पदराला । पाव राज्याच्या देवा ।

---

१ दोन नळ्यांची. २ छातीला. ३ शिवाजी लोंड्यानें.

तुझे हे फटकुरे घेउनि जातों लढाईला । यश द्यावें फटकुऱ्यांला । दीड मणाचा टोप सात मणाचें चिखलत धन्यानें चढाविलें आंगाला । दीडा मणाचा गुंडदा[१] हातांत घेतला । ज्याची बोरमाणकी घोडी रामप्रसाद हत्ती पुढल्या बिंदीला । बाराहजार नळी पुढल्या बिंदीला । तीनशें सरदार पुढल्या बिंदीला । नवशें शिलेदार उजव्या बाजूला । बोलतां चालतां पोंचले आकेरी गांवाला । आकेरीचा रामेश्वर नारळ देवाला ठेविला । देवा तुझे हे फटकुरे घेउनि जातों लढाईला । यश द्यावें फटकुऱ्यांला । धनी तेथुनी निघाले पोंहचले पंढूचे पाथरीला[२] । वंश नाईकाचा नारळ ठेविला । दळव्याचा वंश बोंब मारिली त्या जाग्याला । धनी तेथुनी निघाले मुकाम जागा योजिला । बांबर्ड्याच्या मळयांत डेरे दिले त्या जाग्याला । ज्याचा चाळेगती हत्ती रघसावंत सुभेदार हत्ती तेथुनी निघाला । पहिला रामराम केलौ[३] कलेश्वरा देवाला । दुसरा रामराम केला नारोबाला[४] । तिसरा रामराम केला कुडाळच्या संताला । खुळावला[६] हत्ती करड खाऊं लागला । ज्याचा बडेखान पिलॅवान रडूं लागला । ज्याचा चाळेगती हत्ती पिलवानाच्या पाठीवर सोंड फिरवूं लागला । धीर देतो त्या महाताला[७] । मग ते रुद्राजी धुळप सातशें राउत वेढा पडला हत्तीला । पहिला जासूद पाठविला जयराम महाराजाला । तुमचा चाळेगती हत्ती गलीमांनीं वेढिला । बापूसाहेब महाराज बाराहजार नळी चला तुम्हीं हत्तीच्या शुद्धीला । काळतोंड घेउनी जाऊं वाडीला । खासा धन्याचा शबद हत्ती कानानें ऐकिला । सोंड घेऊन पटा हातीं धरून सांखळ हत्ती लढूं

१ गदा. २ ही पाथर (शिला) झाराप गांवीं आहे. ३ हत्तीनें. ४ नेरूर गांवचा देव. ५ वालावल गांवचा. ६ वर सांगितलेल्या पंढूच्या पाथरीकडे गाऱ्हाणें केल्यामुळें चाळा (पिशाच्चगण) उठून त्यानें हत्तीच्या आंगांत संचार केल्यापासून हत्ती खुळावला असें मानिलें आहे. ७ महात.

जों लागला । सातशें राउत हत्तीनें कापिले त्या वेळेला । सकाळच्या सवाप्रहर दिवसाला पोहोंचला सुंदर वाडीला । आंगोजी काव्या नवसिंग रजपूत दोघां बंधूंची जोडी । आह्मीं जी लढतों महाराज नजर राखोजी बोलले । आंगोजी काव्या नवसिंग रजपूत मारूं जों लागला । पांचशें माणूस ठार मारिले वेळेला । तेवढी फळी गा फोडून पहिले [1]बेंगेस पार जाहला। ढवळ्या घोड्याचा करवाल जेजालीं बार जो भरिला । उडी आली रजपूतांची जेजालीं बार जो मारिला । गोळी लागली काळजाला । रजपूत जमिनीला पडला । त्या कारण मातापिता त्या कारण पेटीका लडका । हमारा भाई मरगया आह्मीं लढतों जी महाराज नजर राखोजी बोलला । बंधूच्या दुःखानें मार मारूं लागला । सातशें माणूस ठार मारिलें वेळेला । तेवढी फळी गा फोडून ढवळ्या घोड्याचा करवाल जेजालीं बार जो भरिला। उडी आली रजपूताची जेजालीं बार जो मारिला । गुळी लागली ललाटाला रजपूत जमिनीला पडला । खासा जयराम महाराज कठीण जाहला त्या वेळेला । नाईकाचा वंश त्यानें नारळ ठेविला । दळव्याचा वंश बोंब मारिली त्या जाग्याला । मग [2]निंगुंडीचे टाळे न येती वांव्या लोकांला। गोदड बुवाच्या आड्यांत होतीं गांजलाचीं मालीं । मालीं तेथुनि निघालीं । येउनी सैन्यांत फुटलीं । खासा जयराम महाराज धनी झुंजूं जों लागला । मार मारी दुथड करी त्याच्या मुडद्यां नाहीं मित । ढवळ्या घोड्याचा करवाल जेजालीं बार जो भरिला। आली जयरामाची उडी जेजालीं बार जो मारिला । उजव्या हाताचा तो बार त्यांनीं करवालावर मारिला । घोड्या राउताचीं तोडें चार केलीं त्या जाग्याला । खासा मानाजी फांकडा भले जी भले फांकडेराव । काय सांगूं रे गुलामा । घोड्या राउताचीं तोडें चार करितों ह्या जाग्याला । पायां पडतों माझ्या

१ बाजूस. २ ढिंगुडीचे.

धन्या[1] माझा अपराध जाहला । आतां पाव राज्याच्या देवा । वांचेल जयराम महाराज अन्न पुरविल ह्या रयतेला । खासा मानाजी फांकडा त्यानें घोडा उडविला । आली फांकड्याची उडी । खासा जयराम महाराज महाराजानें घोडी बैसविली । उजव्या हाताचा तो वार फांकड्यानें जयरामावर मारिला । झाली भगवंताची दया वार त्याचा चुकविला । भले जी भले फांकडेराव । खासा जयराम महाराज महाराजानें घोडा उडविला । झाली भगवंताची दया फांकड्याचा घोडा लचकला । उजवे हाताचा तो वार जयरामानें फांकड्यावर मारिलों[2] । घोड्या राउताचीं तोडें चार केलीं त्या जाग्याला । कुपिथर गुंडा चार आंगळें तुटला । मग तो रुद्राजी धुळप लवलाहीं पावला । उडी आली जयरामाची धुळपा सांभाळ आपली घोडी । राउता पाइकासरशी करितों तुझी मुंडी । धाक मर्दाचा जयरामाचा । धनी तेथुन निघाले आले कुडाळच्या कोटाला । साडेतीनशें गोळी अडकून होती चिलखताला । खासा जयराम महाराज लिहून कागद पाठविला पुण्यासाताऱ्याला । अगंध्या शाहीर सरकारानें जवळ बोलाविला । छत्री आणि घोडा दिला अगंध्या शाहिराला । खासा जयरामाचा पोवाडा त्यानें संपूर्ण गाइला । साधुसंतांनीं ऐकिला । तुह्माला जोड काय पुण्य । तुह्माला धनी प्रसन्न ॥ १ ॥

भाऊसाहेब (रामचंद्र सावंत) यांजवरील पोवाडा.

नमीन मंगलमूर्ति नमिली वाचे सरस्वती । ऐका गातों मी सुरमर्दांच्या कीर्ति । भोंसल्या रायाच्या कीर्ति । पित्या

---

१ मानाजी फांकडे हा पूर्वीचा सावंतांकडील सरदार असून नंतर तो आंगऱ्यांकडे जाऊन राहिला होता ह्मणून त्यानें जयराम महाराजांस ओळखतांच त्यांस पूर्वी 'गुलामा' ह्मणून हाक मारिल्याबद्दल क्षमा मागितली.

२ या सरदाराचें थडगें कुडाळानजीक पांवशी गांवीं आहे असें समजतें.

रावसाहेबांचे वंशीं । माते दादीबाईचे कुशीं । जन्मले भाऊसाहेब वाडी सूर्य उगवला । वडिलांचे मागें राज्य करितो या वाडीला । दीडवर्ष राज्य भाऊनें केलें या वाडीला । मग ती लक्ष्मीबाई ती बाई काय बोले भाऊसाहेबाला । मग तो भाऊसाहेब बोले लक्ष्मीबाईसाहेबांला । साडेतीन लक्षांचा मुलुख अर्धा नाहीं बाई मला । अर्धा माझा मुलुख बाई गडकऱ्यानें घेतला । अर्धा मुलुख बाई फिरंग्यानें घेतला । तुमचा बेवकूब कारभार एवढा बाईला जाब दिला । मग ते भलेभले कारभारी समजले हा तो वाघाचा बच्चा ठेविना आह्मांला । मग ती लक्ष्मीबाई बोले भाऊसाहेबांला । तुह्मी काढुनी गळ्यांतले शिक्के नेउनी ठेवा देवारपाव्याला । भाऊ अज्ञान लेंकरूं भाऊ क्रोधवंत झाला । पाटेकराची दया वडिलांचें पुण्य समर्थ शिक्के देईना तुला । शिक्के सुखासनासाठीं दोघांचा घरकलह लागला । बाई मला हुकूम दे मी जातों स्वारीला । भाऊ तूं लेंकरूं नको जाऊं स्वारीला । ज्याचा नगाऱ्याचा घोडा पुढच्या बिंदीला । निशाणाचा हत्ती पुढच्या बिंदीला । हल[१]क्यांचे जोड धन्याच्या दोहीं दोहीं बाजूंला । सुन्न मध्यान्ह रात्रीं पावला रेडीच्या किल्ल्याला । दुधभा[२]ताच्या क्रिया झाल्या वाडीच्या दरबाराला । दुधभात होतें रक्त झालें त्या वेळेला । मोहऱ्या धन्याचा बिचवा खंजीर जमिनीला पड[३]ला । डोईचा मंदील धन्याचा जमिनीला पडला । सांगतों रामचंद्र[४]दादाला जातां नये

१ टिमक्यांचे. २ भाऊसाहेबांचा व दुर्गाबाई साहेबांचा जवळचा आप्तपणा असल्यामुळें दुर्गाबाईनीं रेडीहून त्यांस आणवावें असें लक्ष्मीबाईचें ह्मणणें होतें. भाऊसाहेबांच्या जीवास धोका पोंचणार नाहीं अशाबद्दल दुर्गाबाई साहेबांनीं शपथ मागितल्यावरून लक्ष्मीबाई साहेबांनीं दूधभातावर शपथ दिली अशी याची हकीगत पोवाडे ह्मणणारे सांगतात. ३ भाऊसाहेब रेडीहून निघाले त्यावेळीं त्यानां हे अपशकुन झाले. ४ रामचंद्रराव खानविलकर यास.

हो वाडीला । भर दोन प्रहरीं पोंचला बांद्याच्या किल्ल्याला । चंद्रोबा जैतोबा येऊन भेटले धन्याला । सव्वासहा महिने जाहले भाऊ तों नये वाडीला । भले भले कारभारी समजले मनाला । सांगती लक्ष्मी बाईला । मग दिवटीच्या मुजऱ्यानें बाईनें कागद लिहिला । मग ते खडाखडीचे जोडे पोंहचले बांद्याच्या किल्ल्याला । खासा बाईचा कागद भाऊनें वाचून पाहिला । सांगतो रामचंद्र दादाला । चला जाऊं वाडीला । चंद्रोबा जैतोबा धन्याला मिळाला ! नको जाऊं वाडीला । होणार जाणार कळेना ब्रह्मलिखित टळेना । ज्याचें मरण त्या ठायीं चालून जाई आपुले पायीं । मोहरे लाविलीं वाजंत्रें मार्ग सदरेचा धरिला । मग ती लक्ष्मीबाई बाई बैसली सदरेला । पांचशें मुजरा त्यानीं बाईसाहेबांला केला । भाऊ साहेबांनीं मुजरा केला । लक्ष्मी ती बाई मुजरा घेईना त्या वेळेला । मारा मारा रे पोराच्या तोंडांत शिक्के घ्या ह्मणून जाब दिला । भाऊ अज्ञान लेंकरूं मोठा क्रोधवंत झाला । बाई गे वडिलांचें पुण्य समर्थ पाटेकराची दया शिक्के देईना तुला । सात चौक्या आठवा जमादार ठेविला । मार्ग नाहीं भाऊ साहेबांला । हरि नारायणा तारीं नारायणा देवा जन्माचा मांडिला । लक्ष्मीबाई बाई ठेवीना मला । तिसरे दिवशीं भाऊसाहेब जमिनीला पडला । दादा शिक्के देतों आह्मीं जाऊन सांगा त्या बाईला । काढुनि गळ्यांतले शिक्के दिधले बाईच्या हाताला । आतां पाव राज्याच्या देवा आज बुडालें बोलला । आलें तुझ्या मनांत तेथें कोणाचें चालेना । नव्या चौपदींत बारू फिरवाया लागला । भले भले कारभारी समजले मनाला । त्यांनीं ताकीद केली लोकांला । दरवाजा कोटाचा लाविला । सांपळ्यांतला वाघ सुटला गावेना हाताला । नव्या गा कोठरींत भाऊला बंदींत घातला । खबर गेली लक्ष्मी बाईला । गुपित मारायाचा

१ भाऊसाहेब राज्याच्या देवाच्या दर्शनास गेले असतां तेथें त्यांस अडकविण्यासाठीं हा पहारा ठेविला.

त्यांनीं कावा यत्नजिला । विखांचे ते लाडू भेट धाडिली भाऊला । सात त्या चौक्या आठवा जमादार ठेविला । हरि नारायणा तूं तारीं नारायणा ठेवा जन्माचा मांडिला । लक्ष्मीबाई ठेवीना मजला । पुढें बाळ भाऊसाहेब एकटा[2] राहिला । शोधितो रामचंद्र दादाला । दूर माझा दादा अंतरला । आज मारिला दादाला उद्यां मारील बाई मला । मग तो जातीचा जमादार अभय देतो भाऊला । मारीन पाठकुळीला नेईन निपाणीला । माझें पोट गा चिरीन पोटांत घालीन भाऊ तुला । जमादार वांचवा माझा प्राण सोन्याचा करीन तुह्मांला। कंठा मोहनमाळा सोन्याच्या घालीन बक्षीस तुह्मांला । बिचवा खंजीर त्यावर जमादाराला दिला । भेदली जमादाराची चौकी खबर गेली त्या बाईला । मोहरा चंद्रोबा जैतोबा याला वर्तमान कळला । मोहरा दिवट्याच्या मुजऱ्यानें कागद त्यानीं लिहिला । धाडिला पेडण्या गांवाला । धाडिला फिरंग्यांच्या राज्याला । देरे दारूगोळा लढाई करितों या वाडीला । माझा राज्याचा धनी बंदीला पडला। फसला तटाचा[3] कावा हनुमंतगड आला हाताला । बाई ग दे हुकूम आह्मांला आह्मी जातों त्या कोटीला । मारारे मारा भाऊसाहेब

---

१ ह्या पैकीं एक लाडू भाऊसाहेबांनीं खाण्यासाठीं हातांत घेतला असतां त्यावर रामचंद्रराव खानविलकर जवळ होते त्यांनीं हात मारिला. त्यामुळें तो फुटून जमिनीवर पडला तो जवळ कुत्रा होता त्यानें खाल्ला. त्यापासून तो कुत्रा तात्काल मेला. तेव्हां कांहीं दगा आहे अशी खात्री होऊन खानविलकर यांनीं भाऊसाहेबांस लाडू खाऊं दिला नाहीं. २ रामचंद्रराव खानविलकर भाऊसाहेबांजवळ असेपर्यंत आपले हेतु सफल होणार नाहींत हें मनांत येऊन लक्ष्मीबाईनीं रामचंद्ररावास युक्तीनें तेथून काढिलें. ३ चंद्रोबानें सावंतवाडीचा कोट व हनुमंतगड हे दोन्ही एकदम सर करण्याकरितां दोन्ही किल्ल्यांवर सैन्य पाठविलें, परंतु सावंतवाडीचा कोट त्याच्या हातीं आला नाहीं.

एवढा बाईनें हुकूम दिला। सुन्न मध्यान्ह रात्रीं पोंचले कोठीच्या दरवाजाला । जाऊन सांगती जमादाराला। बाई बोलाविती तुह्मांला। बळकटीच्या हातानें जमादार हातांनीं धरिला। खेंचुनी बाहेर काढिला। दादा वांचवा माझा प्राण सोन्याचे करीन तुह्मांला। कंठा मोहनमाळा बक्षीस घालीन तुह्मांला। भाऊसाहेब बाळ धनी रडूं तो लागला। मग दोन हातीं दोन पटे घेई धबके मारी दरवाजाला। दरवाजा फुटेनासा झाला। मोहरा तो भाऊसाहेब धनी हाताला धरिला। भाऊ जमिनीला पाडिला। धरिलें नाकतोंड भाऊ तो घुमूं तो लागला। दावेदार दुस्मान माया नाहीं चांडाळाला। काळू भिकाजी यानें मुठका मारिला नाकाला। प्राण जातांना किंकाळ मारिली त्या जाग्याला। यातीचा जमादार काय बोले भाऊसाहेबाला। भाक दिली तुला राहिली मोतिया तळ्याला। जमादार तेथुनी निघाला पावला थोरले सदरेला। बडा सैतान लक्ष्मीबाई आग लागो तुझ्या राज्याला। वडे सांगोती[2] भेट पाठविली कोठीच्या दरवाजाला। खापुरलें शिद्दीण बोले त्या बाईला। आग लागो या भेटेला भाऊचा अपघात झाला। आकाबाई बाईनें गळफांस लाविला। उभ्याच बाजारानें भाऊ बाहीर काढिला। बाजारकर वाण्यांनीं दुकानें लाविलीं त्या वेळेला। वाडी नगरांत मोठा हाहाःकार पडला। दिल्ही भांड्यांला बत्ती बंदुकां नाहीं हो गणती। उभ्या बाजारांत लोक ढळढळां रडती। वडिलांच्या माठ्यांत भाऊ अग्नि मिळविला। तीन दिवस झाले एक हात गा उरला। आतां पाव राज्याच्या देवा आतां हें बुडालें बोलेला[3]। पळती वाट पुरे केली त्याणें निपाणकराला। बंद्याच्या वंशीं काय नांव झालें चंद्रोबाला। चंद्रोबा सुभेदारानें आपला मुलुख सोडविला।

---

१ ह्या मारेकऱ्यांचीं नांवें काळू भिकाजी, लक्ष्मण हिर्लोककर व लक्ष्मण भट अशीं होतीं. २ भाऊसाहेबांची बहीण जांबोटीला दिली होती तिनें ही भेट पाठविली होती. ३ चंद्रोबा सुभेदार.

बंद्याच्या वंशीं नांव झालें चंद्रोबाला । आज धन्याच्या नांवानें देती वस्त्रदान । जाती काशीखंडा कारण । उदारकी झुंजार गाजी मर्दाचा ठिकाण । तुमच्या ढालीला यश देईल नारायण ।

चवथे खेमसावंत ऊर्फ बापूसाहेब यांजवरील पोवांडा.

बापूसाहेब सगुणमूर्ति सदाशिव शंकर । बहुत जनावरी केले उपकार कृपेचे सागर । शत्रु मित्र सक्षान त्यानां नाहीं केला मत्सर । चार तप हें राज्य केलें राहिले धरणीवर । (चाल) गोकुळीं कृष्ण भगवान । तसे बापूसाहेब जाण । गोपींचें काम पुरवून । निराळे कृष्ण नारायण । राज्य केलें जनका प्रमाण । अग्नींत पाय घालून । गरिबावरि दृष्टि ठेवून । कैलासीं राहिले जाऊन । बापूसाहेब राजा खरा रे । जो अवघ्या राज्यामधिं हिरा । किती सांगूं त्याची तऱ्हा रे । जो दानधर्माला बरा । त्यानीं पूजिला उमावरा रे । कैलासीं केला थारा । (चाल बदलून) बापूसाहेबांसारखा राजा होणार नाहीं । राम ह्मणुनी गेलें लक्ष्य शिवाचे पायीं । जनकावाणी रे जनकावाणी । जनकावाणी राजा ठरून । बापूसाहेबांनीं राज्य करून । त्रैलोक्यामधिं कीर्ति धरून ॥ १ ॥ बापूसाहेब धनी महाराज सत्वगुणी निर्मळ । त्याची पुण्याई मोठी सबळ पळून जात होते खळ । देव राज्याचा प्रसन्न त्याला पावत होता तात्काळ । ज्यावरि त्याची कृपा झाली काळ त्याचा सफळ । वासुदेवतात्या[2] सरकार संनिध बहुत बुद्धीचें बळ । बाळोजीचा[3] अनुग्रह त्याला

---

१ हा पोवाडा सावंतवाडींत राहणारा कृष्ण कवी यानें केला. हा कवि मरून सुमारें पंधरा वर्षें झालीं. २ वासुदेव आत्माराम चिटणीस. ३ हा सावंतवाडींत राहणारा एक साधु होता.

दिलें मुक्तीचें फळ। तात्या बाळाजी बापूसाहेब नैषध पुरींचे नळ। एकच रंग जाहला तिघांचा ध्रुवापरि अढळ। वैकुंठाला जाऊनि राहिले सोडुनी मायाजाळ। (चाल) माझा मजला कळूनि आला। काय वर्णू महाराजाला। बापूसाहेब अमृत प्याला। अमर करी भक्ताला। जाहली मर्जी तिकडे झाली रे। देऊनि द्रव्य खुषी केली। अशा बापूसाहेबांच्या चाली रे। कोण लक्ष करी मग खालीं। (चाल बदलून) त्याचें लक्ष पाठ्याकडे त्रिकाल नमस्कार। प्रार्थिती शंभुला पाव ह्मणती लवकर। लहान थोरांवर कृपा ठेवा निरंतर। आह्मी येतों आतां जोडूनि पाठ्यास कर। बापूसाहेब गेले स्मरूनि हरिहर। बालाजी पाठीं कर धरून। बापूसाहेबांनीं राज्य करून ॥२॥ बापूसाहेबांचे मुखत्यार साहेब स्नायडर। चोवीस वर्षें कारभार केला दरबारीं महशूर। जेकबाचा शिष्य स्नायडर बुद्धीचे चतुर। जिकडे तिकडे रस्ते केले आंब्याचे तरुवर। मळगांवाचा घांट बांधिला फोडुनी डोंगर। रयतेवरती दया साहेबांची कृपेचा विस्तार। (चाल) बापूसाहेबांच्या कामाला। स्नायडर साहेब आला। मग अंतकाळ समयाला। बापूसाहेबांच्या बाजूला। त्या स्नायडर साहेबावरती रे। फार बापूसाहेबांची प्रीती। मसलत खलबत एकांतीं रे। सांगावें साहेबांप्रती। राहावी मागें कीर्ति रे। राज्याची बंदोबस्ती। (चाल बदलून) पाठ्याकडे लक्ष्य लागावें सेवेला। माठ्यांत जाऊनी भजा खेमरायाला। असें सांगुनी महाराज गेले निजधामाला। तिरोदशी दिवशीं रे तिरोदशी दिवशीं। तिरोदशी विठ्ठल स्मरून। बापूसाहेबांनीं राज्य करून ॥ ३ ॥

परिशिष्ट ४ थें.

गांवांचीं नांवें, कायदे व लोकस्थितीविषयीं पत्रकें.

सावंतवाडी संस्थानांत हल्लीं असलेले गांव २२६.

पेटा कुडाळ—एकंदर गांव ६०.

तर्फ हवेली गांव १६:—कुडाळ, नेरूर, वालावल, सरंबळ, सोनवडें, बांबुळी, बांव, अणाव, वाडीहुमरमळा, पणदूर, पांवशी, मुळदें, पिंगुळी, विववणें, वाडीवरावडें, आंबडपाल.

तर्फ पाट, गांव ४:—कसबा पाट, तेंडोली, कंवठी, चेंदवण.

तर्फ कळसुळी, गांव २४:—कळसुळी, शिवडांव, दारिस्तें, कुपवडें, जांबवडें, सोनवडें, घोटगें, भरणी, पांगरड, निरुखें, भडगांवखुर्द, पोखरण, कुसुंबें, भडगांवबुद्रुक, वर्दें, ओरोस खुर्द, आंवळेगांव, कडावल, किनळोस, हिर्लोक, कुसगांव, गिरगांव, दिगस, बांबर्डें.

तर्फ बोर्डवें गांव १६:—बोर्डवें, आंब्रड, तळवडें, कसवण, शिरवल, हळवल, वांकदें, सांतरल, कांसरल, वसरगांव, कसाल, कुंदें, ओरोसबुद्रुक, बांबुळी, पडवें, गांवराई.

पेटा वाडी एकंदर गांव ६६.

शहर सुंदरवाडी.

तर्फ माणगांव, गांव १९:—माणगांव, साळगांव, केरवडें, मांडकुली, तुळसुली, घावनळें, नानेली, कुणकेरी, आकेरी, झाराप, बांबर्डें[1], कोलगांव, माजगांव, ओटवणें, चराठें.

---

१ हे पांच गांव हल्लीं मुलकी कामासाठीं कुडाळ पेट्यांत दिलेले आहेत.

तर्फ तळवडें गांव १३:—तळवडें, होडवडें, मठ, न्हावेली, तुळस, आडेली, वजराट, मातोंड, मळगांव, निरवडें, कोनापाल, वेतोरें, नेमळें.

कर्यात नारूर, गांव १६:—नारूर, आंबेरी, वाडोस, चांफेली, गोठोस, केरवडें, निळेली, हातेरी, आंजिवडें, शिवापूर, तुळसुली, वासोली, वाशी, सांकडें, नेरूर, निवजें.

तर्फ मनोहर, गांव १९:—कालेली, सांगेली, केसरी, पारपोली, शिरशिंगें, कांदुळी, आंबेगांव, पुळास, वेर्ले, कलंबिस्त, सांतुळी, वावळाट, देवसूं, उपवडें, दाणोली, मोरें, माडखोल, कारिवडें, ओंवळियें.

इतर गांव ३:-आंबोली, गेळें, व चौकूळ.

पेटा बांदें एकंदर गांव १००.

तर्फ आजगांव, गांव ८:-आजगांव, तिरवडें, आसोली, नाणोस, गुळदुवें, आरवंदें, तळवणें, किनळें.

तर्फ सांतर्डें, गांव १५:-सांतर्डें, सातोसें, साटेली, कवठणी, मडुरें, पाडलोस, निगुडें, रोणापाल, इनसुली, सोनुर्ली, वेत्यें, आरोस, शेर्लें, कास, वाडीफणसवडें.

तर्फ बांदें, गांव ३३:-बांदें, वाफोली, विलवडें, डेगवें, मोरगांव, आडाळी, फडवें, माजगांव, ओोळंबें, फुकेरी, खडपडें, कुंभवडें, तळकट, कोलझर, कुंब्रल, उगाडें, कळणें, सासोली, डिंगणें, डोंगरपाल, नेतर्डें, फोंडियें, गाळेल, कणसवडें, सरंबळ, भालावल, दाभील, तांबुळी, असणयें, कोनाल, घारास, मेवली, उडेली.

तर्फ उसप, गांव २५:-उसप, मणेरी, परमें, कुडासें, साटेली, पणतुर्ली, कोनाळ, सोनावळ, पाळयें, मांगेली, खान्याळें, झोंकरल, केंडदें

पिकुळें, झरें, कामटें, आंबडगांव, आंबेली, गिरोडें, माटणें, कसई, तळे-खोल, विर्डी, आ.ई, वझरें.

तर्फ हेवाळें, गांव १०ः-हेवाळें, आयनोडें, पाटयें, पाल, सरमळें, खराडी, घांटिवडें, बांबर्डें, केंद्रें बुद्रुक, केंद्रें खुर्द.

किरकोळ गांव ९ः-केर, शिरवल, भेकुर्ली, खडपडें, शिरंगें, कोनाळ, घोटगें, तेरवणमेढें, आवाडें.

सावंतवाडी संस्थानचे अमलाखालील गांव परअमलाखालीं गेले ते.

इंग्लिशांकडे गेलेले ४५.

तर्फ मसुरें, गांव ११ः-मसुरें, कांदळगांव, चौकें, आंबेरी, आंब-डोस, साळेल, मालवण, माळगांव, खेडी, वेरलें, हडी व देवली.

तर्फ मालंड, गांव १७ः-मालंड, डागमोडें, वोंवळीयें, आसरोंडें, वडाचें पाट, वाईगवेड, किरलोक, शिरवडें, खोटलें, चुनवरें, असगणी, हेदुळ, पोईप, मसदें, राटिवडें, हिवळें, गोळवण.

तर्फ वराड, गांव ८ः-वराड, काळसें, तळगांव, नांदोस, धामा-पूर, पेंडूर, पराड आणि कुबावें.

तर्फ पाट, गांव ६ः—परुळें, कोचरें, आपण, केळूस, खानोली, दाभोली.

तर्फ आजगांव, गांव ३ः-आरवली, शिरवडें, रेडी.

बंदरः-वेंगुर्लें.

गोवें अमलाखालीं गेलेले १४६.

तर्फे पेडणें, गांव २६ः-पेडणें, मांद्रें, चोपडें, हळर्ण, इब्राम-पूर, तांबोसें, हरमळ, पारसें, चांदेक, वझ्री, खाजणें, उगें, परसकोडें,

धारगळ, पाळयें, मोप, कासारवर्णे, विरनोडें, वारखंड, कोरगांव, तुयें, केरी, मोरज, चापोर, आंबेरें, तोरसें.

तर्पे डिचोली, गांव ३०:–डिचोली, मुळगांव, मेणकुरें, धुमासें, वेर्ळी, वेळगें, पाळी, कुडणें, अडवळपाल, साळ, आमोणें, मयें, सुरल, हरवळें, न्हावेली, मावळिंगें, पिळगांव, सरवण, हातुर्ली, पिसुर्ले, उसगांव, बोरडें, शिरगांव, लाटंबारसें, लामगांव, नारवें, वाइंगिणी, कोठंबी, गांजें, कारापूर.

तर्पे सांखळी, गांव ९०:–आंबेडेंबुद्रुक, आरूवी, बोरयें, करमळी(नाडकर्णी), कारापूर, कोदावदें, सिरवाळें, कोदाळी, कोलावडें, होंड, भुईपाळ, कुमारखण, वागुर्ये, सोनसवोंवळीयें, वानतें, पणशें, पाडेली, असोळयें, नागवें, सालेली, अडवई, धामशें, कणाकिरें, मलपण, गवाणें, असोडें--सिरसोडें, सरंगुळी, शेळपखुर्द, खोतोडें, मेळावली, गुळेली, साठरें, देरोडें, आंबेचा-गवळ, आंबेडें--चांदेडें, आंबेडेकोदाळ, सुर्ल, नानेली, शेळपबुद्रुक, आंबेडें--भोंबेडें, नगरगांव, हेदोडें--सातोडें, भिरोडें, सावरसें, मासोरडें, वेळूस, कुडसें, झाऊस, दावें, झरंबें, कोपारडें, कुडचिरें, शिरोली, गुळ्ळें, केलवडें, पणसुली, चरवंदें, सिंगणें, माळोली, आंबेली, खोडयें, रावण, करंबळी-बुद्रुक, करंजोळें, कडवळ, पेंडाळ, वाईगिणी, नानोडें, उसदें, धांवें, सांवरडें, पोडोसें, पाल, हिवरेंखुर्द, हिवरेंबुद्रुक, गोळावली, हणजूणें, मोरलें, घोटेली, वण, मावळिंगें, परियें, केर, रिवें, ठाणें, बोकाल, खडकी, वेळगें, सोनाळ, नाणूस.

कोल्हापूर संस्थानाकडे गेलेले १२.

कर्याद पाटगांव, गांव १२.

संस्थानांत सन १८८८ पासून अमलांत आलेले कायदे.

आक्टाचा नंबर व साल. सन.	वर्णन.	जाहिरनाम्याची तारीख.	सुरू झाल्याची तारीख.
१८२७ चा ८ वा मुं.	कायदेशीर वारस मानण्याबद्दल कायदा.	१०।३।८८	१०।३।८८
१८६६ चा २ रा मुं.	कितीएक मुकद्म्याविषयीं मुंबई इलाख्यांतील रेव्हिन्यु कोर्टांत अधिकार आहेत ते काढून दिवाणी इनसाफाचे कोर्टांस देण्याविषयींचा आक्ट.	,,	,,
१८६६ चा ७ वा मुं.	हिंदूंच्या वारसांस कर्जांतून मुक्त करण्याविषयीं.	,,	,,
१८६६ चा ८ वा मुं.	मुंबई इलाख्यांत विषें विकण्याबद्दल नियम करून मर्यादा ठरविण्याविषयीं.	,,	,,
१८६७ चा ७ वा मुं.	मुंबई इलाख्यांतील डिस्ट्रिक्ट पोलिसांचे नियम ठरविण्याविषयीं (हा आक्ट कलम ३३ व ३४ खेरीज करून मुंबईचा आक्ट सन १८९० चा नंबर ४ यानें रद्द झाला.)	,,	,,
१८६७ चा ८ वा मुं.	मुंबई इलाख्यांतील गांव पोलीसाचे नियम ठरविण्याविषयीं.	,,	,,
१८६८ चा २ रा मुं.	मुंबई इलाख्यांतील सार्वजनिक तरीं विषयीं.	,,	,,
१८६९ चा ३ रा मुं.	लोकलफंड आक्ट.	,,	,,
१८७३ चा ७ वा मुं.	मुंबईचा मिठाचा आक्ट सन १८८२ चा नंबर ९ यानें सुधारलेला [संस्थानचा कायदा सन १८९६ चा नं. १ यानें रद्द झाला.]	,,	,,

१८७४ चा २ रा मुं.	मुंबई शहर व इलाख्यांतील तुरुंगांविषयीं आक्ट सन १८८२ चा नंबर २ अन्वयें सुधारलेला.	,,	,,
१८७४ चा ३ रा मुं.	वंशपरंपरेच्या हुद्यांविषयीं आक्ट सन १८८६ चा नंबर ५ अन्वयें सुधारलेला.	,,	,,
१८७५ चा ३ रा मुं.	मुंबई इलाख्यांतील सार्वजनिक रस्ते व पुलांवर टोल सरकारानें घेतां येण्याविषयीं आक्ट (सन १८८१ चा नंबर ५ अन्वयें सुधारलेला.)	,,	,,
१८७६ चा ३ रा मुं.	मामलेदारांच्या कोर्टांचा आक्ट.	,,	,,
१८७८ चा ५ वा मुं.	मुंबई अबकारी आक्ट.	,,	,,
१८७९ चा ५ वा मुं.	मुंबईचा जमीन महसुलाचा कायदा सन १८८६ चा नंबर ४ अन्वयें सुधारलेला. या कायद्याच्या ८६ व्या कलमाला गांवकरांच्या हक्कासंबंधींचा मजकूर जोडला [जाहिरनामा ता० १४।३।०८]	,,	,,
१८६० चा ४५ वा हिं.	इंडियन पिनलकोड सन १८७० चा आक्ट १७ वा, १८७२ चा १९ वा, १८७३ चा १० वा, १८८२ चा ८ वा व १८८६ चा १० वा या कायद्यांनीं सुधारलेला. सन १८९४ चा नं. ३ यानें दुरुस्त झाला. [जाहिरनामा ता. १४।५।९९]	,,	,,

	ता० १८।१।९८ चा जाहिरनामा नंबर २०८ यानें दुरुस्त झाला. सन १८९८ चा नं. ४ यानें सुधारला [जाहि. ता.८।११।९८] सन १८९९ चा नंबर १२ यानें दुरुस्त झाला (जाहिरनामा ता. १६।६।०४).		
१८६४ चा ६ वा हिं.	फटके मारण्याची शिक्षा कांहीं प्रसंगीं ठरविण्याबद्दल अधिकार देण्याविषयीं.	”	”
१८६४चा २० वा मुं.	मुंबई इलाख्यांतील अल्पवयी मुलांचा व त्यांचे मिळकतींचा अधिक चांगला बंदोबस्त करण्याविषयीं आक्ट [सन १८९० चा नंबर ८ यानें रद्द झाला.]	”	”
१८६५चा १० वा हिं.	हिंदुस्थानांतील मालाचे वारसाविषयीं आक्ट [सन१८८१ चा नंबर ६ अन्वयें सुधारलेला.] सन १८८९ चा नंबर ६ यानें दुरुस्त झाला [जाहिरनामा ता. ३।९।९०.]	”	”
१८६९चा १५ वा हिं.	कैद्यांच्या साक्षीचा आक्ट.	”	”
१८७० चा ७ वा हिं.	कोर्ट फीचा आक्ट सन १८८१ चा ९ वा आणि सन १८८७ चा ७ वा यांनीं सुधारलेला. सन १८९१ चा नं. १२ यानें दुरुस्त झाला. [जाहिरनामा ता. १९।२।९१.]	”	”

१८७०चा १० वा हिं.	सार्वजनिक कामासाठीं व कंपन्यांसाठीं जमीन घेण्याविषयीं आक्ट (सन १८९४ चा नंबर १ यानें रद्द झाला.)	,,	,,
१८७१ चा १ ला हिं.	गुरांचे अतिक्रमणाबद्दल आक्ट सन १८८३ चा नंबर १८ अन्वयें सुधारलेला सन १८९१ चा नंबर १ यानें दुरुस्त झालेला. [जाहिरनामा ता. २४।९।११.]	,,	,,
१८७२ चा १ ला हिं.	पुराव्याचा आक्ट सन १८८७ चा ३ रा यानें सुधारलेला. सन १८९१ चा नंबर ३ अन्वयें दुरुस्त झाला. (जाहिरनामा ता. २४।९।११).	,,	,,
१८७२ चा ९ वा हिं.	कराराचा आक्ट सन १८८६ चा ४ था यानें दुरुस्त झालेला.	,,	,,
१८७३चा १० वा हिं.	शपथांविषयीं आक्ट.	,,	,,
१८७५ चा ९ वा हिं.	व्यवहार्य वयासंबंधीं आक्ट.	,,	,,
१८७६चा १० वा मुं.	रेव्हिन्यु हुकमतीचा आक्ट सन १८७७ चा १६ वा यानें सुधारलेला.	,,	,,
१८७७ चा १ ला हिं.	स्पेसिफिक रिलीफ (विशेष न्यायाचा आक्ट.)	,,	,,
१८७७चा १५ वा हिं.	मुदतीचा आक्ट सन १८७९ चा १२ वा, सन १८८१ चा ९ वा व सन १८८७ चा ९ वा यांनीं सुधारलेला. सन १८९२ नंबर ६ यानें दुरुस्त झाला.	,,	,,

	[जाहिरनामा ता० २०।३।९३] सन १९०८ चा नंबर ९ यानें रद्द झाला.		
१८७८ चा १ ला हिं.	अफिणीचा आक्ट.	”	”
१८७८ चा ६ वा हिं.	निधिनिक्षेपाचा आक्ट.	”	”
१८७८ चा ७ वा हिं.	जंगलाचा आक्ट.	”	”
१८७८ चा ११ वा हिं.	हत्यारांचा आक्ट.	”	”
१८७९ चा १ ला हिं.	स्टांपाचा आक्ट. (सन १८९९ चा नंबर २ यानें रद्द झाला.)	”	”
१८७९ चा २ रा हिं.	निरुपयोगी दप्तराचा नाश करण्याविषयीं	”	”
१८८० चा ४ था हिं.	पोर्तुगीज तहनाम्याचा आक्ट.	”	”
१८८२चा १० वा हिं.	क्रिमिनल प्रोसीजर कोड सन १८८४ चा ३ रा, सन १८८६ चा १० वा व सन १८८७ चा ९ वा यांनीं सुधारलेला [सन १८९८ चा नंबर ५ यानें रद्द झाला.]	”	”
१८८२चा १४ वा हिं.	सिव्हिल प्रोसीजर कोड सन १८८२ चा १५ वा आणि सन १८८७ चा ७ अन्वयें सुधारलेला. सन १८८८ चा नंबर ७ यानें दुरुस्त झाला. (जाहिरनामा ता. १।९।८८) सन १८८८ चा १० वा यानें दुरुस्त झाला. [जाहिरनामा ता. १४।३।८९]	”	”

	सन १८९० चा ८ वा यानें दुरुस्त झाला. (जाहिरनामा ता. ३।३।९२) सन १८९२ चा ६ वा यानें दुरुस्त झाला. [जाहिरनामा ता. २०।३।९३] सन १८९४ चा ५ वा यानें दुरुस्त झाला. (जाहिरनामा ता. १४।५।९५) सन १८९५ चा ७ वा यानें दुरुस्त झाला. [जाहिरनामा ता. १५।२।९६] दुरुस्त झाला. [जाहिरनामा ता. २९।६।०१] सन १९०८ चा नंबर ५ यानें रद्द झाला.		
१८८७ चा ९ वा हिं.	प्राव्हिन्सियल स्मालकाज कोर्ट आक्ट.	”	”
१८७६	सावंतवाडी संस्थानांत खतें पत्रें नोंदण्याविषयीं केलेले नियमांचा कोड [संस्थानचा आक्ट सन १९०१ चा १ यानें रद्द झाला]	”	”
१८८७ चा ४ था मुं.	जुगाराविषयीं कायदा. सन १८९० चा १ ला यानें दुरुस्त झाला. [जाहिरनामा ता. २४।९।११]	११।७।८८	११।७।८८
१८५८चा ३५ वा हिं.	इनसाफाचे सुप्रीम कोर्टाचे हुकमतीचे ताब्यांत नसणारे वेड्यांचे मिळकतीचा सांभाळ करण्याविषयीं ठराव आहेत त्याहून	१४।३।८९	१४।३।८९

	चांगले ठराव करण्याविषयीं.		
१८९० चा ४ था मुं.	मुंबई इलाख्यांतील डिस्ट्रिक्ट पोलिसाचे नियमन करण्याबाबदचा कायदा सुधारण्यासाठीं आक्ट.	२४।९।९१	२४।९।९१
१८९० चा १ ला हिं.	महसूल वसूल करण्यासाठीं आक्ट.	,,	१५।१२।९१
१८८२ चा ५ वा हिं.	हिंदुस्थानचा ईजमेंटचा आक्ट.	३।५।९२	३।५।९२
१८९० चा ८ वा हिं.	पालन करणारे व वार्ड यांसंबंधीं कायदा एकत्र करून सुधारण्याविषयीं आक्ट.	,,	१।७।९२
१८९२ चा १ ला मुं.	मुंबईचा जिल्हानिहाय गोस्तनदेवी काढण्याबाबद आक्ट.	२०।३।९३	१।४।९३
१८९२चा १० वा हिं.	खासगी इस्टेटीची सरकारानें वहिवाट करण्याबाबद आक्ट.	३०।११।९४	१।१।९५
१८९३ चा १ ला हिं.	पेढीवाल्यांचा वह्या पुराव्यास घेण्याचा आक्ट.	,,	,,
१८९३ चा ४ था हिं.	वांटप करण्यासंबंधीं कायदा.	,,	,,
१८९४ चा १ ला हिं.	सार्वजनिक कामासाठीं जमीन संपादन करण्याविषयीं कायदा.	१४।५।९५	१।७।९५
१८४१चा १९ वा हिं.	वारसाचे बाबतींत स्थावर जंगम मिळकतीच्या अन्यायाचे कबज्याच्या निवारणार्थ आक्ट.	१५।२।९६	१।४।९६
१८९६चा १ला सा.वाडी	सावंतवाडीचा मिठाचा कायदा.	४।७।९६	४।७।९६
१८९७ चा ३ रा हिं.	भयंकर सांथीच्या रोगाचा फैलाव होण्याची अधिक चांगल्यारीतीनें बंदी करण्यासाठीं तजवीज करण्याबाबद आक्ट.	२४।११।९७	२४।११।९७
१८९८चा १ला सा. वा.	सावंतवाडीचा गांवाच्या आरोग्यरक्षणाबाबद आक्ट.	१८।१।९८	१८।१।९८

१८९८ चा ५ वा हिं.	क्रिमिनल प्रोसिजर कोड.	८।११।९८	१।१२।९८
१८९७चा १० वा हिं.	सामान्य कलमाचा आक्ट.	,,	,,
१८९९चा १ला सा. वा.	वेड्यांच्या आश्रयस्थानाविषयीं आक्ट.	६।६।९९	६।६।९९
१८९९ चा २ रा हिं.	स्टांपाचा कायदा.	२१।२।००	१।४।००
१९००चा १० वा हिं.	सन १९०१ सालच्या प्रजागणतीचा कायदा.	२०।१२।००	२०।१२।००
१९०१चा १ला सा. वा.	दस्तऐवज नोंदण्याबद्दल आक्ट.	३०।१०।०१	१।४।०२
	कलम १२ (क) रद्द झालें आणि कांहीं शब्द गाळले (जाहिरनामा ता. १३।२।०५)		
१८९८ चा ६ वा हिं.	पोष्ट आफिसाविषयीं कायदा सन १९०३ चा नंबर २ वरून सुधारलेला.	१६।६।०४	१।८।०४
१८८५चा १३ वा हिं.	टेलिग्राफासंबंधीं आक्ट सन १८८८ चा नं. २ वरून सुधारलेला	१६।६।०४	१।८।०४
१९०४चा १ला सा. वा.	सावंतवाडी शहर वहिवाट कायदा.	१।८।०४	१।९।०४
१९०७चा १ला सा. वा.	देवस्थानांबाबद कायदा.	२७।४।०७	१।७।०७
१९०७चा २रा सा. वा.	भाड्याचे वाहनाबाबद नियम ठरविण्यासाठीं आक्ट	,,	,,
१९०७चा ३रा सा. वा.	जंगली पक्षांच्या आणि पारधींच्या संरक्षणाबाबद आक्ट	,,	,,
१८८२ चा ४ था हिं.	मिळकत तबदील करून देण्याबाबदचा कायदा	२५।६।०७	१५।७।०७
१९०८ चा ६ वा हिं.	बार होणाऱ्या पदार्थांसंबंधीं कायदा	१२।८।०८	१५।८।०८
१९०८ चा ९ वा हिं.	मुदतीचा कायदा	११।२।०९	१।४।०९

१९०८ चा ५ वा हिं.	सिव्हिल प्रोसीजर कोड	१९।२।०९	,,
१९०७ चा ३ रा हिं.	प्राव्हिन्सियल नादारीचा आक्ट	,,	,,
१९१० चा १ ला हिं.	छापखान्याबाबद आक्ट	२८।१०।०९	१०।११।१०
१८६७ चा २५ वा हिं.	छापण्याच्या प्रेसी व वर्तमानपत्रें याबाबद नियम ठरविण्याविषयीं व ब्रिटिश इंडियांत छापलेल्या बुकाच्या प्रती सांभाळून ठेवण्याविषयीं व सदर्हू प्रकारचीं बुकें नोंदण्याविषयीं आक्ट	,,	,,
१९०१ चा ७ वा हिं.	नेटिव्ह ख्रिश्चनाच्या इस्टेटीविषयीं कायदा	१९।११।१०	१९।११।१०
१९१० चा १६ वा हिं.	हिंदुस्थानच्या प्रजागणतीबाबद कायदा	२६।१।११	२६।१।११

नंबर १-लोकवस्ती व तिजमधील फेरफार.

साल.	लोकसंख्या.			शेंकडा वाढ [+] किंवा तूट [−]	दर चौरस मैलास लोकसंख्या.
	पुरुष.	स्त्रिया.	एकूण.		
१८५२	७६९५६	७३११०	१५००६६		१६२
१८७२	९३४९५	९७३१९	१९०८१४	+ २७.२	२०६
१८८१	८६०६१	८८३७२	१७४४३३	− ८.६	१८८
१८९१	९३५२०	९९४२८	१९२९४८	+ १०.६	२०८
१९०१	१०६०७७	१११६५५	२१७७३२	+ १२.६	२३५
१९११	१०३००१	११४२३९	२१७२४०	− ०.२३	,,

नंबर २-धर्म व जातवार संख्या आणि निर्वाहाचीं साधनें.

जातींचीं नांवें संख्यानुक्रमानें.	संख्या.	शेंकडा शिक्षित.	निर्वाहाच्या निरनिराळ्या साधनांचें शेंकडा प्रमाण.					
			शेती व जमिनीचें इतर उत्पन्न.	उदीम व्यापार	हस्त कौशल्य.	नोकरी.	इतर.	दुसऱ्यानें केलेल्या धंद्यांवर निर्वाह करणारे.
मराठा	११५६२२	३.८	५५.६	.४	.७	.६	१.७	४१
भंडारी	२५६९४	३.७	४८.३	१	१	.६	३.६	४५.५
वाणी	१२३७१	११.५	३२	१०.६	.६	.२	१.१	५५.५
महार	१११४२	.१	२९.३	.४	२५.७	.८	४	३९.९
गौड सारस्वत ब्राह्मण	९६३८	३०.९	२६.४	३	.३	२.१	३.१	६५
सुतार	४८११	३.९	२२.९	.०६	२३.९	.०८	१.२	५१.८६
धनगर	२३४२	.०४	५४.४	.०४	.	.०४	.८	४४.७२
हजाम	२२९०	२.५	२९.९	.२	१९.३	.२	.८	४९.६
कुंभार	२२५८	१	३४.३	.२	२३.४	.	१.९	४०.७
कऱ्हाडे ब्राह्मण	२१७७	३२.५	१४.७	.५	.३	.६	१९.९	६४

चाभार	२०८०	.७	१४.७	.०५	३५.२	.१	२.२	४७.७५
तेली	१८११	२.७	३८.६	४.३	११.४	.१	.७	४५.९
चित्तपावन ब्राह्मण	१६५४	३१.२	२५.३	१.८	.१	.८	१२.५	५९.४
देवळी (मराठे)	१४३६	६.९	४०.७	.५	.९	.५	१७	४०.४
सोनार (दैवज्ञब्राह्मण)	१४२८	१८	१३	.३	२३.६	.४	.७	६२
गाबीत	१२६०	३.२	३२	११.४	.४	१.२	.८	५४.२
परीट	११४०	२.६	४३.१	.१	९.७	.५	२.८	४३.८
मीठगावडा	१११८	१.५	६०.८	१.६	.६	.१	१.६	३५.३
ठाकर	१०८२	.८	२९.४	.३	७.४	.	३२.३	३१.६
देवळी [भंडारी]	८६४	३.५	३६.८	.८	.२	.३	२३.५	३८.३
गोसावी	६७८	२.९	४२.५	३.४	.२	.१	१०.६	४३.३
कासार	४७३	५.१	३७.६	१३.५	२.५	.	.४	४६
भोई	३३४	१.८	५४.५	१०.७	.९	.९	३.३	२९.७
गवळी	२०४	२	५२.९	१३.७	.	.	.	२३.४
तारी	१९०	.	३७.९	१४.२	४.७	१.१	२.१	४०
लोहार	१६६	१.२	४.८	.६	४१	.	१.८	५१.८

कातगावडा	१२५	१.६	६०.८	.	.	.	.	३९.२
धवड	१२४	.८	१७.७	.	३१.५	.	.	५०.८
शिंपी	१०६	२१.९	१.९	४.९	२३.८	१	१	६७.५
फार कमी वस्ती असलेल्या जातींचे लोक	७३१	१६	२५.९	६.३	१०.३	१.५	१२	४४
एकूण हिंदु	२०५३५१	५.८	४६.८	१.४	३.७	.६	२.६	४४.९
मुसलमान	५६३३	१२.४	२८	३.२	१.२	४.५	४.५	५८.६
ख्रिश्चन	५८१५	६	३२.२	६.२	३.८	१.८	५.८	५०.८
जैन	४३९	१६.४	२६.६	२०.३	.५	.२	६.४	४६
पारशी	२							

यांचा तपशीलः—गाण ९३, किरवंत जोशी ८२, बेरड ७१, बोगार ६५, हणबर ६५, कोष्टी ५१, जिनगर ५०, देशस्थ ब्राह्मण ४८, गुरव २५, रामोशी २४, कोमटी २१, घाडी १९, भंगी १६, गोंधळी १५, कोमारपैक १२, प्रभु पाठारे १२, प्रभु कायस्थ ११, नाथ गोसावी ९, तांबेट ९, कोळी ६, पांचाळ ५, बैरागी ४, भाट ४, चितारी ४, रजपूत ४, जोगी ३, डौरी २, भोरपी २, गुजराथी ब्राह्मण १, वाजंत्री १.

नंबर ३—अबकारी दारू.

साल.	दारूचें उत्पन्न रुपये.	दारूचा खप ग्यालन.	दर माणशीं सरासरी खप ग्यालन.
१८७१	१९५२१		
१८७६	२०७९५		
१८८१	२४८४४		
१८८६	३२९४०	४६१४२	.२६
१८९१	२९३१८	४६५८९	.२५
१८९६	३७७२२	६६१०१	.३४
१९०१	३९५५२	४४४३८	.२०
१९०६	४४४३२	३०२८२	.१४
१९११	५५५००	४९१३१	.२२

नंबर ४-पाऊस आणि धान्यांचे भाव.

साल.	पाऊस इंच.	जिनसांचे भाव दर रुपयास.					
		तांदुळ.		नाचणी.		नारळ नग.	सुपारी शेर [कुडाळी.]
		पौंड	तोळे	पौंड	तोळे		
१८७१	१.३१	२०	५	४१	३३	३०	१०
१८७६	१८८	२२	३२	४४	२२	३०	९
१८८१	१०९	२२	३२	४१	९	३२	९
१८८६	१३९	२२	३०	४८	४	२८	४
१८९१	१८१	२४	३०	४९	१७	३१	७
१८९६	१४९	२९	६	४६	१	२२	६
१९०१	१९८	२०	१३	२७	९	२८	५॥
१९०६	८३	२०	४	३६	१	२१	६।
१९११	१२७	१७	२८	३३	२१	१६	५

टीपः—कुडाळी मापाचें एक शेर धान्य ह्मणजे सुमारें दीड पौंड होतें.

नंबर ५-दिवाणी दावे व फौजदारी गुन्हे.

साल.	दिवाणी दावे.				फौजदारी गुन्हे.			
	लहान दावे.	मोठे दावे.	पहिलीं अपिलें.	दुसरीं अपीलें	खून.	चोऱ्या.	मारामाऱ्या.	इतर.
१८७१	९३६	९७८	१५१	१४	०	५८	५६	१४१
१८७६	१७२३	१०४१	१११	२६	१	१०९	४३	२२९
१८८१	१६१७	७३४	१६८	५२	७	२९३	२४८	२९४
१८८६	१३५६	५७०	१३९	४१	१	१५७	२२४	२३७
१८९१	१४४८	३४६	१३९	६५	४	१०१	२०९	३४६
१८९६	११४७	९४६	१२५	३१	१	७८	१३६	३२३
१९०१	१२८०	९९७	१४२	२३	२	१५२	१०७	४०८
१९०६	१६१२	३७३	१४३	५०	२	७४	७२	२७९
१९११	१८६४	५९४	१३५	२९	१	७४	१४५	२०७

नंबर ६-देवघेव (सांपत्तिक स्थिति)

साल.	रजिस्ट्रेशन.		मनिआर्डर.	
	दस्तऐवजांची संख्या.	किंमत रुपये.	आलेल्या मनिआर्डरींची रक्कम रुपये.	गेलेल्या मनिआर्डरींची रक्कम रुपये.
१८७१	११३८	१६७४८९	१६२१०	९८४५
१८७६	२६६७	३०७९२७	१९८८१	५४२६
१८८१	२९५३	२५७५२९	३८९३९	११२२७
१८८६	१६८१	१९५६१३	७१०५६	२११२५
१८९१	१९६९	२२१७७३	१५१९६६	२५६७५
१८९६	२०९१	२५७२३६	१८४०१५	३६७९४
१९०१	२२०३	२७१९८४	१४३३१९	४१४११
१९०६	२०३३	२७४९८७	२९५९०१	६८१९९
१९११	२२८४	४६६९०८	३४११७३	६७०८१

नंबर ७—चालू उत्पन्न व खर्च.

खातें.	जमा.		खर्च.		फायदा(+) किंवा (−) तोटा
	जमा.	एकूण जमेशीं शेंकडा प्रमाण.	खर्च.	एकूण खर्चाशीं शें०प्र०	
जमेचीं खातीं.					
जमीन महसूल.	२९८२२८	५९.१	३६११४	८.९	+२८३८५३
सायर वसूल	२१७३९	४.३			
अबकारी वसूल.	६३६०१	१२.६	५०६९	१.३	+५८५३२
जंगलखातें.	४९८६०	९.९	१०५९१	२.६	+३९२६९
स्टांप.	४८५९१	१०.२	२१९७	६	+२६९३७
न्याय खातें.	२५८८		२२०४५		
नोंदणी खातें.	४८५५	१	१३८७	.३	+३४६८
कर्जाऊ दिलेल्या पैशाचें व्याज.	८७७१	१.७	०	०	+८७७१
घर भाडें.	६५३	.१	०	०	+६५३
किरकोळ.	३५४३	.७	३९८६	१	−४४३
खर्चाचीं खातीं.					
राजकुटुंबाचा व दरबारचा खर्च.	०	०	७९८०१	१९.६	−७९८०१
पागा.	०	०	२१६७०	५.३	−२१६७०
सुपरिन्टेंडेन्सी व जनरल ॲडमिनिस्ट्रेशन.	०	०	४४३३३	१०.९	−४४३३३
पोलीस.	०	०	४४६३०	११	−४४६३०
छापखाना.	०	०	२७६४	.७	−२७६४
मेडिकल.	०	०	१५९१०	३.९	−१५९१०
पब्लिकवर्क्स.	१८५७	.४	३१०६२	७.६	−२९२०५
शिक्षण.	०	०	१४०००	३.४	−१४०००
पेन्शन व ग्रॅच्युटी.	०	०	१७४६७	४.३	−१७४६७
नक्त नेमणुका.	०	०	५०१४५	१२.३	−५०१४५
रिफंड.	०	०	३८२३	.९	−३८२३
एकूण	५०४२८६		४०६९९४		+९७२९२

१ हे आंकडे सन १९१०।११ सालचे वार्षिक रिपोर्टावरून घेतले आहेत.

नंबर ८—जनरल शिक्षण.

साल	इंग्लिश		मराठी व उर्दु				शिकण्याजोग्या* वयाच्या मुलांशीं शाळेंत जाणाऱ्या मुलांचें शेंकडा प्रमाण.		एकंदर लोकसंख्येशीं शिकलेल्या लोकांचें शेंकडा प्रमाण.	
			मुलगे		मुली					
	शाळा	मुलें	शाळा	मुलगे	शाळा	मुली	मुलगे	मुली	पुरुष	स्त्रिया
१८५४	०	०	४९	८१७	०	०	२	०		
१८६६	१	८६	१४	७९२	१	१८				
१८७१	१	९९	१९	११९३	१	२९				
१८७६	१	७६	२५	१६७९	२	९७				
१८८१	१	११८	४१	२०२५	२	८९				
१८८६	१	२१०	५३	३०९५	२	१२०				
१८९१	१	२९०	१२२	४६९३	४	२९५	१९.६	१.२	१४.७	.४
१८९६	१	३१०	१४२	९७६०	९	३६३	१९.२	१.८		
१९०१	१	२२०	१३६	५९७३	४	३०५	१४.६	१.१	१२.८	.७
१९०६	५	४९०	११७	५६०९	४	३२९	१९.३	१.२		
१९११	४	४०८	१३७	९९१२	५	९९९	१६.९	२.३	११.८	.८

* ५ पासून २० वर्षेंपर्यंत वयाचे मुलगे व ५पासून १५ वर्षें पर्यंत वयाच्या मुली शिकण्यायोग्य मानून हें प्रमाण काढिलें आहे.

पोलिटिकल सुपरिन्टेंडेंट.

नांव.	कारकीर्द.	
मि. रिचर्ड स्पूनर.	१७।९।३८ पासून	१।६।४०
मि. उइलियम कोर्टनी.	२।६।४०	२४।३।४५
मेजर (सर जी. लिग्रांड) जेकब.	२५।३।४५	२३।१।५१
मि. एच्. एल्. अंडरसन.	२४।१।५१	४।१०।५२
	५।११।५२	३।२।५३
कर्नल एफ्. स्नायडर.	५।१०।५२	४।११।५२

	४।५।५३	१९।५।५३
	२४।३।५६	७।४।५६
	१।२।५९	११।११।५९
	६।१२।५९	१।४।६१
	१३।११।६१	२६।८।६२
	२७।९।६२	१४।९।६४
	७।५।६४	९।११।६४
	७।८।६६	२३।४।७१
	१।६।७३	२१।४।७४
मेजर जे. डब्ल्यु. आल्ड.	२०।५।५३	२३।३।५६
	८।४।५६	३।११।५९
क्याप्टन ए. सी. वे.	१२।११।५९	५।१२।५९
	२।४।६१	२०।५।६१
	२७।८।६२	२६।९।६२
	१५।३।६४	६।५।६४
	१०।११।६४	६।८।६६
मेजर ए. एम्. गार्डन.	२१।५।६१	१२।११।६१
मेजर डब्ल्यु. एफ्. एफ्. वालर व्ही. सी.	२४।४।७१	२२।५।७१
	११।८।८१	९।१०।८१
क्याप्टन् एच्. एल्. रीव्हज.	२३।५।७१	२५।१२।७२
ले० कर्नल ई. डब्ल्यु. वेस्ट.	२६।१२।७२	३।५।७३
	१।४।८२	१०।९।८३
कर्नल जे. एफ्. लेस्टर.	२२।४।७४	३।७।७६
	५।१२।७६	१३।८।७७
कर्नल जी. आर्. सी. वेस्ट्राप.	४।७।७६	४।१२।७६
	१४।८।७७	११।७।८१
	१०।१०।८१	३१।३।८२
	४।४।८४	१९।१२।८८
क्याप्टन् जे. एस्. किंग.	१२।७।८१	१०।८।८१
क्याप्टन् एल्. एल्. फेन्टन.	११।९।८३	३।४।८४
क्याप्टन् एफ्. डब्ल्यु. स्नेल.	२०।१२।८८	१५।३।८९
कर्नल ए. एम्. फिलिप्स.	१६।३।८९	१४।७।८९

	१९।९।८९	१०।१२।९०
मेजर सी. डब्ल्यु. एच्. सीलि.	१९।७।८९	१४।९।८९
कर्नल एच्. एल्. नट.	११।१२।९०	३।९।९२
	११।११।९२	२७।८।९३
	९।३।९९	८।८।९६
मेजर जे. डब्ल्यु. रे.	४।९।९२	१०।११।९२
मि. पी. एस्. व्ही. फिट्झ्जराल्ड.	२८।८।९३	२३।५।९४
मेजर डब्ल्यु. बी. फेरिस.	२४।९।९४	४।३।९९
मि. एल्. पी. वाल्श सी. आय. ई.	९।८।९६	४।१।९७
	२३।१२।९७	१०।५।९९
	१३।११।९९	२२।७।१९००
मेजर एच्. एम्. एबड.	९।१।९७	२२।१२।९७
	११।५।९९	१२।११।९९

पोलिटिकल एजंट.

मि. एल्. पी. वाल्श सी. आय. ई.	२३।७।१९००	३।२।०१
	२३।१०।०२	२७।९।०३
मेजर ई एफ्. म्यारिअट.	४।२।०१	२।३।०१
	९।९।०१	२२।१०।०२
ले. कर्नल एल्. एल्. फेन्टन.	३।३।०१	४।९।०१
ले. कर्नल जी. बी. ओडोनेल.	२८।९।०३	१६।५।०४
मेजर एच्. डब्ल्यु. बर्थन.	१७।९।०४	९।७।०५
	७।११।०९	३१।३।११
ले. कर्नल जी. ई. हाईड्केट्स्.	१०।७।०५	१३।१०।०६
ले. कर्नल जे. डेव्हिस.	१४।१०।०६	१०।६।०८
मेजर एच्. एफ्. जेकब.	११।६।०८	१३।४।०९
लेफ्टनेंट. सी. सी. जे. ब्यारेट	१४।४।०९	३।११।०९
क्याप्टन् जे. डब्ल्यु. बेल.	१।४।११	३।४।११
मेजर आर्. एस्. पॉटिंजर	४।४।११—	

समाप्त.

समाप्त